महाराष्ट्र शासन

मैत्री बालमनाशी

आधारशिला बालवाटिका – १, २, ३ (वय वर्षे ३ ते ६)

मार्गदर्शक हस्तपुस्तिका - भाग २

अंगणवाडी सेविका/बालवाटिका शिक्षिका यांच्यासाठी



राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

मैत्री बालमनाशी : आधारशिला बालवाटिका १, २, ३ (मार्गदर्शक हस्तपुस्तिका - भाग २)

◈ **प्रवर्तक** : **शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन**

◈ **प्रकाशक** : **राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.**

◈ **प्रेरणा** : **मा. रनजीत सिंह देओल (भा.प्र.से.)**
प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र राज्य.

◈ **मार्गदर्शन** : **मा. सचिन्द्र प्रताप सिंह (भा.प्र.से.)**
आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
मा. संजय यादव (भा.प्र.से.)
राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.

◈ **संपादक** : **मा. राहूल रेखावार (भा.प्र.से.)**
संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

◈ **सहसंपादक** : **श्रीम. अनुराधा ओक**
सहसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

◈ **कार्यकारी संपादक** : **डॉ. माधुरी सावरकर**
उपसंचालक, सेवापूर्व शिक्षण, बालशिक्षण व मानसशास्त्र विभाग
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

◈ **कार्यकारी सहसंपादक** : **डॉ. गितांजली बोरुडे**
विभाग प्रमुख, बालशिक्षण व मानसशास्त्र विभाग,
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

◈ **संपादन साहाय्य** : **श्रीमती सुषमा कोंडूसकर**
अधिव्याख्याता, बालशिक्षण व मानसशास्त्र विभाग
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
श्रीमती सुप्रिया नवले
विषय साहायक, बालशिक्षण व मानसशास्त्र विभाग
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

◈ **प्रथम आवृत्ती** : जून २०२५

◈ **अर्थसाहाय्य** : राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

◈ **मुद्रक** : रुना ग्राफिक्स, पुणे.

◈ © सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन.

महाराष्ट्र शासन

मैत्री बालमनाशी

आधारशिला बालवाटिका - १, २, ३ (वय वर्षे ३ ते ६)

मार्गदर्शक हस्तपुस्तिका - भाग २

अंगणवाडी सेविका/बालवाटिका शिक्षिका यांच्यासाठी



राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

प्रस्तावना

व्यक्तीच्या जीवनातील इतर कोणत्याही टप्प्यातील विकासाच्या गतीपेक्षा, पहिल्या आठ वर्षांच्या कालावधीमध्ये मेंदूच्या विकासाची गती ही अधिक वेगवान असते. जागतिक स्तरावर मेंदू संदर्भात झालेल्या विविध महत्त्वपूर्ण संशोधनाचा परिपाक म्हणून राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मध्ये पूर्वप्राथमिक शिक्षणाला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात पायाभूत स्तरावर समाविष्ट करण्यात आले.

पायाभूत स्तरावर वय वर्ष ३ ते ८ या वयोगटाचा समावेश करण्यात आलेला आहे. या स्तरावरील बालकांच्या शिक्षणाविषयी राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा : पायाभूत स्तर २०२२ वर आधारित महाराष्ट्राच्या शैक्षणिक, सामाजिक, भौगोलिक परिस्थितीचा विचार करता महाराष्ट्र राज्यासाठी राज्य अभ्यासक्रम आराखडा : पायाभूत स्तर विकसित करण्यात आला. ३ ते ६ वयोगटाला अध्ययन करण्यास सुलभन करणाऱ्या अंगणवाडी ताई/ बालवाडीच्या शिक्षिका/ पूर्वप्राथमिक स्तरावरील शिक्षक यांच्यासाठी शिक्षक हस्तपुस्तिका असावी असे पायाभूत स्तर अभ्यासक्रम २०२४ यामध्ये नमूद केले आहे. तसेच ३ ते ६ या वयोगटातील बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी नमूद सर्व क्षमता साध्य होण्यासाठी कोणतेही पाठ्यपुस्तक तयार करणे अपेक्षित नाही. मात्र बालकास मिळणारे अध्ययन पूरक वातावरण, वर्गात व वर्गाबाहेर देण्यात येणारे अध्ययन अनुभव हे समृद्ध असणे अधिक महत्त्वाचे मानले गेले आहे.

पायाभूत स्तर अभ्यासक्रम २०२४ व महिला व बालविकास विभाग, नवी दिल्ली यांचे मार्फत ३ ते ६ वर्षे वयोगटासाठी आधारशिला अभ्यासक्रम २०२४ यावर आधारित आधारशिला बालवाटिका अभ्यासक्रमानुसार प्रस्तुत मार्गदर्शक हस्तपुस्तिका विकसित करण्यात आलेली आहे.

मार्गदर्शक हस्तपुस्तिकेचे दोन भाग आहेत. मार्गदर्शक हस्तपुस्तिका भाग १ मध्ये बालशिक्षणातील प्रारंभिक वर्षे, वर्ग व्यवस्थापन, बालकांचे समावेशन आणि दिनचर्या या महत्त्वाच्या बाबींवर प्रकाश टाकण्यात आला आहे. तसेच आठवडानिहाय वेळापत्रक व २ परिशिष्टे समाविष्ट करण्यात आलेली आहे.

वेळापत्रकाची रचना आधारशीलामधील वेळापत्रकाच्या धर्तीवर करण्यात आलेली आहे. बालमानसशास्त्राचा विचार करून वेळापत्रकातील काही कृतींचा क्रम थोडा फार बदलण्यात आलेला आहे. वेळापत्रक तयार करताना मी, माझे कुटुंब व परिसर, पाऊस पाणी, भाज्या व फळे, वनस्पती व फुले, प्राणी, पक्षी व कीटक, ऋतू, वाहन आणि मदतनीस असे एकूण नऊ विषयगोफ (थीम) समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत. वेळापत्रकात सुरुवातीचे चार आठवडे हे आरंभीचे व समावेशनाचे आहेत, जे शैक्षणिक वर्षाच्या जून महिन्याच्या अखेरपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. एकदा बालक बालशिक्षणात पालकांच्या मदतीशिवाय उपस्थित राहू लागले कि, साधारणपणे जुलै महिन्याच्या सुरुवातीच्या आठवड्यापासून वेळापत्रकानुसार दैनंदिन अध्ययन अनुभव देणे सुरू करणे अपेक्षित आहे. साधारणपणे पहिल्या चार थीमवर आधारित १६ आठवडे पूर्ण झाल्यानंतर सराव व दृढीकरण करण्यासाठी तीन आठवड्यांची रचना करण्यात आलेली आहे. दुसऱ्या सत्रात उर्वरित पाच थीमवर आधारित २० आठवड्यांचे वेळापत्रक देण्यात आलेले आहे. दिवाळीच्या दोन आठवड्यांच्या सुट्टीचा विचार करता साधारणपणे जून ते एप्रिल असे ११ महिन्यातील एकूण ४६ आठवड्यांचे वेळापत्रक समाविष्ट करण्यात आलेले आहे.

वर्गात कृती घेताना ताई किंवा शिक्षिका यांच्या हाताशी काही गाणी गोष्टी असाव्यात या हेतूने परिशिष्टमध्ये काही गाणी व गोष्टी यांचा समावेश करण्यात आलेला असून त्या केवळ सूचक आहेत. याव्यतिरिक्त इतर उपलब्ध गाणी, गोष्टी यांचा वापर देखील करणे अपेक्षित आहे. अभ्यासक्रमाची ध्येये, क्षमता व अध्ययन निष्पत्ती यांचा एकत्रित संबंध वर्गातील कृती घेताना व मूल्यांकन करताना लक्षात येण्यासाठी परिशिष्ट २ मध्ये त्यांचा समावेश करण्यात आला आहे.

मार्गदर्शक हस्तपुस्तिका भाग – २ मध्ये वर्गातील दैनंदिन कृतींचे सविस्तर विवेचन दिलेले आहे. यामध्ये मुख्य १३० कृती असल्या तरीही उपकृतींसह एकूण १८१ कृती समाविष्ट आहेत. या कृतींचे लेखन करताना महाराष्ट्रातील अंगणवाडी ताई व पूर्वशालेय शिक्षणातील शिक्षिका यांना समजेल अशा सहज सोप्या भाषेचा वापर केला आहे. समाविष्ट करण्यात आलेल्या कृती वयोगटनिहाय देण्यात आलेल्या आहेत. प्रत्येक कृतीसाठी लागणारे साहित्य, संबंधित थीम त्यांचाही उल्लेख प्रत्येक कृती लिहिताना करण्यात आलेला आहे. कृतीमध्ये विविधता आणण्यासाठी देखील पुरेसा वाव व संधी देण्यात आलेली आहे. प्रत्येक कृतीतून साध्य होणाऱ्या क्षमता व कृती सुरू असताना करावयाच्या निरीक्षणाच्या बाबीदेखील नमूद करण्यात आलेल्या आहेत. वेळापत्रकानुसार आवश्यक कृती शोधण्यास सुलभ व्हावे यासाठी सुरुवातीला कृतींची अनुक्रमणिकादेखील उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

'मैत्री बालमनाशी' या मार्गदर्शक हस्तपुस्तिकेचे वैशिष्ट्य म्हणजे यातील कृतीशी संबंधित अभ्यासक्रमातील ध्येय व क्षमता या सोबतच वयोगटनिहाय अध्ययन निष्पत्तीचा उल्लेख करण्यात आला आहे. वेळापत्रकाची रचना विषय गोफ (थीम नुसार) केलेली असून प्रत्येक थीमसाठी एकूण चार आठवड्यांचा कालावधी निश्चित करण्यात आलेला आहे. बालभारतीने विकसित केलेल्या पाठ्य साहित्याशी समन्वय साधण्यात आलेला आहे. प्रत्यक्ष बालके आणि अंगणवाडी/बालवाडीतील सेविका यांचे समवेत काम करणाऱ्या बालशिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींच्या सहकार्याने ही दर्जेदार मार्गदर्शक हस्तपुस्तिका विकसित करणे शक्य झाले आहे. अशी ही सर्व समावेशक, वैशिष्ट्यपूर्ण व सुलभ मार्गदर्शक हस्तपुस्तिका आपणास सुपूर्त करताना मला अत्यंत आनंद होत आहे.

'मैत्री बालमनाशी' ही मार्गदर्शक हस्तपुस्तिका आपणास वय वर्ष ३ ते ६ वयोगटातील आपल्या बालकांच्या बालमनाशी मैत्री करत त्याचा सर्वांगीण विकास साध्य करण्यास निश्चित मदत करेल याचा मला पूर्ण विश्वास आहे. आपल्या पुढील वाटचालीस मन:पूर्वक शुभेच्छा!

राहूल रेखावार (भा.प्र.से.)
संचालक,
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
महाराष्ट्र, पुणे.

अनुक्रमणिका

अ. क्र.	तपशील	पृष्ठ क्र.
१)	भाग क : दैनंदिन घ्यावयाच्या कृतीचे सविस्तर विवेचन	१
२)	संदर्भग्रंथ सूची	३१०
३)	निर्मिती व लेखन	३११
४)	श्रेयनामावली	३१२

नोंद घ्यावी...

१) 'मैत्री बालमनाशी' या मार्गदर्शक हस्तपुस्तिकेमध्ये मुले, मुली किंवा अन्य असे स्वतंत्र शब्द न वापरता बालक हाच शब्द वापरण्यात आला आहे. बालक या संज्ञेत मुलगा, मुलगी किंवा अन्य या तिन्ही संज्ञा अंतर्भूत आहेत.

२) 'मैत्री बालमनाशी' ही मार्गदर्शक हस्तपुस्तिका राज्यातील पायाभूत स्तरातील वय वर्षे ३ ते ६ या वयोगटातील बालकांना शिकविणाऱ्या सर्व शिक्षकांसाठी आहे. राज्यात प्राधान्याने अंगणवाड्या या जास्त प्रमाणात आहेत. त्यामुळे शिक्षकांना उद्देशून ताई हा शब्द वापरण्यात आला आहे.

भाग क : दैनंदिन घ्यावयाच्या कृतीचे सविस्तर विवेचन

वयोगटनिहाय कृती व पृष्ठ क्र. दर्शक सारणी

अ. क्र.	कृती क्रमांक व कृतीचे नाव	पृष्ठ क्र.
१)	१. गोष्ट	५
२)	२. गाणी	७
३)	३. चित्रगप्पा	९
४)	४. गोष्ट वाचूया.	१०
५)	५. गोष्ट सांगूया.	१२
६)	६. प्राणी, पक्षी व कीटक ओळखूया.	१४
७)	७. रंग ओळखूया.	१६
८)	८. आकारांची ओळख करूया.	१८
९)	८.१ आकारांच्या जोड्या लावूया.	२०
१०)	९. प्रत्येक वस्तूला जागा व प्रत्येक वस्तू जागेवर.	२३
११)	९.१ वस्तू जागेवर ठेवूया.	२४
१२)	१०. खाण्यास योग्य व अयोग्य पदार्थ	२६
१३)	१०.१ काय खातो; काय पितो	२७
१४)	१०.२ भाज्या ओळखूया आणि खाऊया.	२९
१५)	११. लहान-मोठे समजून घेऊया.	३०
१६)	११.१ लांब-आखूड समजून घेऊया.	३२
१७)	११.२ उंच-बुटका समजून घेऊया.	३४
१८)	११.३ जड-हलके समजून घेऊया.	३५
१९)	११.४ आकारमान ओळखूया.	३७
२०)	१२. भोवतालच्या फळांची नावे सांगूया.	३८
२१)	१३. पाण्यात कोण विरघळते चला पाहूया.	४०
२२)	१३.१ पाण्यात कोण तरंगते चला पाहूया.	४१
२३)	१४. रंग तयार करूया.	४३
२४)	१५. तंत्रज्ञान समजून घेऊया.	४४
२५)	१६. रंगांसोबत खेळूया.	४५
२६)	१७. पाहुणा ओळखूया.	४७
२७)	१८. अवतीभोवती पाहू बोलू...	४८
२८)	१८.१ बनवू तोरण...	४९
२९)	१९. मोजू आनंदे...	५१
३०)	२०. वर-खाली	५३
३१)	२०.१ आत-बाहेर	५४
३२)	२१. गरम आणि गारची गंमत	५५
३३)	२२. सारखे की वेगळे	५७
३४)	२३. TANGRAM आकारांची कोडी	५९
३५)	२४. बाजाराला जाऊ	६०
३६)	२५. चला क्रमाने मोजूया.	६१
३७)	२६. अप्रमाणित एकक - ओळख	६३
३८)	२६.१ प्रमाणित एकक - ओळख	६४
३९)	२७. चित्रकोडी	६५
४०)	२७.१ हरवलेला भाग ओळखा.	६७
४१)	२८. मिळवू मिळवू एकात एक...	६८
४२)	२९. घटनाक्रम	७०
४३)	३०. नकाशा तयार करूया.	७२
४४)	३१. घरांच्या प्रकारांची ओळख.	७३

अ. क्र.	कृती क्रमांक व कृतीचे नाव	पृष्ठ क्र.
४५)	३२. सांकेतिक चिन्हे	७५
४६)	३३. ओळख घड्याळाची	७७
४७)	३४. वर्णनानुसार चित्र ओळखूया.	७८
४८)	३५. असा मी असा मी	८०
४९)	३६. आवाज ऐकू आणि ओळखू.	८२
५०)	३७. ओळखा मी कोण? भाषिक कोडी	८४
५१)	३८. शब्दातील ध्वनी ओळखूया	८५
५२)	३८.१ शब्दातील ध्वनी ओळखूया L2	८७
५३)	३९. सुगंध व दुर्गंध समजून घेऊया.	८८
५४)	४०. हात स्वच्छ करूया आणि छान दिसूया.	९०
५५)	४१. आपले मदतनीस व व्यावसायिक	९१
५६)	४१.१ मदतनीस – गप्पा व वेशभूषा शोधूया.	९२
५७)	४२. पोषक खाऊ ओळखू	९४
५८)	४३. माझे कुटुंब	९६
५९)	४४. दिनचर्या	९७
६०)	४५. पादचारी नियम	९९
६१)	४६. परिसरात काय काय आहे बघूया.	१०२
६२)	४७. ऐकून कृती करूया.	१०३
६३)	४८. वस्तूवर्णन	१०६
६४)	४८.१ जादूची पिशवी	१०८
६५)	४९. ऋतूंची ओळख	१०९
६६)	५०. यमकाची गंमत	१११
६७)	५१. सुरुवातीचा आवाज ओळखू	११३
६८)	५१.१ शेवटचा आवाज ओळखू.	११५
६९)	५१.२ सुरुवातीचा आवाज व अक्षर ओळखूया L2.	११७

अ. क्र.	कृती क्रमांक व कृतीचे नाव	पृष्ठ क्र.
७०)	५१.३ शब्दकार्ड भेंड्या L2.	११८
७१)	५२. नाटक करूया.	११९
७२)	५३. लोकगीत व लोकनृत्य	१२१
७३)	५३.१ पारंपरिक खेळ	१२२
७४)	५४. स्मरणशक्ती खेळ	१२३
७५)	५५. आठवडा आणि महिना	१२५
७६)	५६. अक्षरध्वनी	१२८
७७)	५७. मला काय काय आवडते?	१२९
७८)	५८. सूचना ऐकून वस्तू देऊया.	१३१
७९)	५९. परिचित-अपरिचित व्यक्ती	१३३
८०)	६०. जर आणि तर	१३४
८१)	६१. खाऊ तयार करूया.	१३६
८२)	६२. क्षेत्रभेट	१३८
८३)	६३. ठसेकाम	१४०
८४)	६४. मुक्त चित्र व रंगकाम	१४२
८५)	६५. वाळूत खेळू	१४४
८६)	६६. मी सजवलेले खोके	१४५
८७)	६७. चित्रावर कागदी गोळे चिकटविणे.	१४६
८८)	६८. घडीकाम	१४८
८९)	६९. प्राण्यांचे मुखवटे	१५०
९०)	७०. आभार चित्रकार्ड	१५२
९१)	७१. चाट/भेळ बनवूया	१५३
९२)	७२. मातीसोबत खेळूया, तुलना करूया.	१५५
९३)	७३. पदार्थांची गंमत	१५६
९४)	७४. फाडकाम व चिकटकामातून कलानुभव.	१५८

अ.क्र.	कृती क्रमांक व कृतीचे नाव	पृष्ठ क्र.
९५)	७५. सजीवांचा निवारा	१६०
९६)	७६. शिल्पकला	१६१
९७)	७७. चला नाचूया	१६३
९८)	७८. वस्तूचा आकृतिबंध	१६४
९९)	७८.१ हालचालींचा आकृतिबंध	१६६
१००)	७८.२ ध्वनीचा आकृतिबंध	१६७
१०१)	७९. ठशातून कलाकृती	१६८
१०२)	८०. मला कसे वाटते?	१७०
१०३)	८१. कचऱ्यातून कला आणि खत	१७२
१०४)	८२. काळजीने वस्तू वापरूया	१७३
१०५)	८३. वाजवून पाहूया, आवाज करूया.	१७५
१०६)	८३.१ लयीत गाऊया.	१७७
१०७)	८४. रेषांची रचना करूया.	१७९
१०८)	८५. आकारावर बिया, पाने, फुले लावू	१८१
१०९)	८६. रांगोळी काढूया	१८२
११०)	८७. प्रतिकृती बनवूया.	१८४
१११)	८८. सण साजरे करूया.	१८५
११२)	८९. नियम तयार करूया.	१८७
११३)	९०. वस्तू गुंडाळणे	१८९
११४)	९१. माझे गाणे	१९१
११५)	९२. कागदी लगद्याच्या वस्तू बनवूया.	१९२
११६)	९३. रेषा व आकार शोधूया.	१९४
११७)	९४. माझ्या चित्रातील गोष्ट	१९६
११८)	९५. मला माझ्या जागेवर ठेवा.	१९८
११९)	९६. वनस्पतींची ओळख	२००
१२०)	९७. रंगीबेरंगी आकारांचा खेळ खेळूया	२०१

अ.क्र.	कृती क्रमांक व कृतीचे नाव	पृष्ठ क्र.
१२१)	९८. आवाजातील फरक ओळखूया.	२०४
१२२)	९९. स्वच्छता	२०५
१२३)	१००. परिसरातील प्राणी व पक्षी यांची ओळख	२०६
१२४)	१०१. वस्तू आणि उपयोग	२०९
१२५)	१०२. हवेचे प्रयोग	२११
१२६)	१०३. रंग व आकारानुसार वर्गीकरण	२१२
१२७)	१०३.१ त्रिमितीय आकारांचे वर्गीकरण	२१५
१२८)	१०४. वाहतुकीचे साधन	२१८
१२९)	१०५. हे आहे माझे कुटुंब	२१९
१३०)	१०६. परिसरातील वस्तूंच गट करूया.	२२०
१३१)	१०७. परिसरातील प्राणी, पक्षी व कीटक जाणून घेऊया.	२२१
१३२)	१०८. घसरणे आणि घरंगळणे.	२२२
१३३)	१०९. माझ्या भावना	२२४
१३४)	११०. शोधा म्हणजे सापडेल.	२२७
१३५)	१११. कडक व मऊ स्पर्श समजणे.	२२८
१३६)	१११.१ खडबडीत व गुळगुळीत स्पर्श समजणे.	२३०
१३७)	११२. जसा ऋतू तसा वेश	२३३
१३८)	११३. मदत करूया.	२३४
१३९)	११४. जरा हळू जरा जपून	२३६
१४०)	११५. चित्र बघूया व वाचूया.	२३९
१४१)	११६. चित्र बघून भावना ओळखू.	२४१
१४२)	११७. हा खेळ सावल्यांचा	२४३
१४३)	११८. जीवनचक्र	२४५
१४४)	११९. ओळख माझ्या भारत देशाची	२४७

अ.क्र.	कृती क्रमांक व कृतीचे नाव	पृष्ठ क्र.
१४५)	१२०. ओळख थोरामोठ्यांची	२४८
१४६)	१२१. चेंडू फेकूया आणि झेलूया.	२४९
१४७)	१२१.१ चेंडू खेळूया – ढकलूया व पायाने उडवूया.	२५१
१४८)	१२२. तोल सांभाळूया.	२५२
१४९)	१२२.१ क्रियाकार्ड	२५३
१५०)	१२३. योग	२५४
१५१)	१२४. चेंडू पायाने ढकलूया	२५६
१५२)	१२५. मजेशीर चालूया आणि उड्या मारूया.	२५८
१५३)	१२६. मूर्ती बनूया.	२५९
१५४)	१२७. प्राण्यांसारख्या हालचाली	२६१
१५५)	१२७.१ जिन्यावरचा खेळ	२६२
१५६)	१२८. चला पळूया.	२६४
१५७)	१२९. वर खाली उड्या मारूया.	२६५
१५८)	१३०. रिबन डान्स करूया.	२६७
१५९)	१३१. माझा खाऊ	२६९
१६०)	१३२. मी माझे कपडे घालतो.	२७०
१६१)	१३३. भांडी स्वच्छ करूया.	२७२
१६२)	१३४. फुंकर मारूया.	२७३
१६३)	१३५. रंगकाम करूया.	२७५
१६४)	१३६. मला पण करता येते.	२७७
१६५)	१३७. सामान उचलून ठेवूया.	२७९
१६६)	१३८. स्प्रे पेंटिंग	२८१
१६७)	१३९. बघ आणि वाच	२८३
१६८)	१४०. आकाश बघूया.	२८५
१६९)	१४१. दिवस–रात्र व ऋतू ओळखूया.	२८७
१७०)	१४२. पशू–पक्ष्यांना मदत करूया.	२८९
१७१)	१४३. एकास एक संगती	२९१
१७२)	१४४. वस्तू मोजून देऊया.	२९३
१७३)	१४५. कमी–जास्त सांगूया.	२९४
१७४)	१४६. गट कितीचा ओळखूया.	२९७
१७५)	१४७. बेरीज करूया.	२९८
१७६)	१४८. वाटप करूया.	३००
१७७)	१४९. संभाषण (सर्कल टाईम)	३०१
१७८)	१५०. अक्षरध्वनी जोडूया.	३०३
१७९)	१५१. डॉमिनो लावूया.	३०५
१८०)	१५२. वाक्य तयार करूया.	३०६
१८१)	१५३. हा, ही, हे वाचूया. .	३०८

आधारशिला कृती क्र. : 1. Story Telling (Read Aloud)		
उपक्रमाचे नाव	गोष्ट	
उपक्रमाला लागणारे साहित्य	गोष्टींची चित्रे, चित्रकथा कार्ड्स, पुस्तके	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
• वस्तू आणि चित्र दाखवून त्यावर गप्पा माराव्यात. • आपल्याकडे उपलब्ध असलेल्या फ्लॅशकार्डच्या, पुस्तकांच्या आणि चित्रांच्या मदतीने विविध गोष्टी सांगाव्यात. • बालकांना गोष्ट, चित्रकथा यांची पुस्तके किंवा कार्डे दाखवावीत.	**कृती : चित्रगप्पा** • बालकांच्या भावविश्वाशी संबंधित गप्पा माराव्या. • चित्रकार्डाच्या माध्यमातून बालकांना त्यांच्या परिचयाची गोष्ट सांगून त्यांना बोलण्यास प्रवृत्त करावे. • सांगितलेली गोष्ट बालकांना त्यांच्या भाषेत सांगण्याची संधी द्यावी. • बालकांना कथा, चित्रकार्ड देऊन त्यांच्या कल्पनेने गोष्ट पूर्ण करण्यास सांगावे. • बालकांना गोष्ट पूर्ण करण्यासाठी प्रोत्साहित करावे. • बालकाने पूर्ण केलेल्या गोष्टीच्या शेवटावर यावर गप्पा माराव्या. • ताईने बालकांना रोज गोष्टींची पुस्तके वाचायला व चित्रे बघायला द्यावी.	सुरुवातीला वयोगट ४ ते ५ मधील कृती करून घ्यावी. **कृती : गोष्ट पूर्ण करणे.** • ताईने बालकांना एखाद्या गोष्टीची सुरुवात करून द्यावी. व गोष्ट पूर्ण करण्यास सांगावी. • रोज एका बालकाला गोष्ट पूर्ण करायला सांगितली तर सगळ्या बालकांना संधी मिळेल. • बालक जी गोष्ट सांगते आहे, ती पूर्ण ऐकावी. मध्येच 'गोष्ट अशी सांग' असे सांगणे टाळावे. • बालकाला त्याच्या कल्पनेप्रमाणे गोष्ट पूर्ण करून द्यावी. काही ठिकाणी मदत लागली, तर करावी. • बालकांना गोष्टींची चित्रे द्यावीत त्यानुसार त्यांना गोष्ट सांगण्यास प्रोत्साहन द्यावे.
पंचकोश		
अन्नमय, प्राणमय कोश	मनोमय कोश	विज्ञानमय कोश
विविधता	**स्टोरी बॉक्स :** विविध वस्तू असलेला एक डबा तयार करावा. त्यामध्ये परिचित खेळणी ठेवावी. उदाहरणार्थ : मांजर, बाहुली इत्यादी बालकांना डब्यातून खेळणी काढून, त्यावर गोष्ट तयार करण्यास प्रवृत्त करावे.	

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
	गोष्टींचा सप्ताह : आठवड्यातून रोज विविध प्रकारे गोष्ट सांगावी. त्यातून त्यांना अंदाज लावून गोष्ट सांगण्यास प्रोत्साहित करावे आणि ती गोष्ट वर्गात, कुटुंबात सादर करण्यास सांगावे. हस्तपुस्तिकेतील प्रकरण ४ मध्ये दिलेल्या विविध तंत्रांच्या आधारे गोष्टी सांगाव्यात.	
थीम/विषय	मी, माझे कुटुंब, परिसर, पाणी-पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन	
ताईसाठी सूचना	प्रकल्पनिहाय गोष्टी सांगण्यास प्रोत्साहन द्यावे. ताईने हस्तपुस्तिकेत दिलेल्या विविध तंत्रांच्या आधारे गोष्टी सांगाव्यात. **३ ते ४ वर्षे :** या बालकांना चांगल्या सवयीच्या गोष्टी/ स्वच्छतेच्या गोष्टी जास्त सांगाव्यात. **४ ते ५ वर्षे :** संस्कारक्षम गोष्टी सांगाव्यात. उपलब्ध कार्यपुस्तिकेत देण्यात आलेल्या चित्रकार्ड स्वरूपातील गोष्टीचा वापर वेळापत्रकानुसार करावा.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-9** बालके दोन भाषांमध्ये दैनंदिन संवाद साधण्यासाठी प्रभावी संवादकौशल्ये विकसित करतात. **C-9.5** कथन केलेल्या/वाचलेल्या गोष्टी समजून घेतो आणि त्यातील पात्रे, गोष्टीची मध्यवर्ती कल्पना आणि लेखकाला काय सांगायचे आहे, ते लक्षात घेतो. **अ) LO-9.5.1** अल्प कालावधीसाठी गोष्टी लक्षपूर्वक ऐकतो. (५ ते ७ मिनिटे) **ब) LO-9.5.1** गोष्टीतील पात्रे व काही प्रसंग आठवतो यांना स्वभाषेत सांगतो. **क) LO-9.5.1** गोष्टीची सुरुवात, मध्य आणि शेवट लक्षात घेऊन गोष्ट स्वतःच्या शब्दात सुसंगतपणे सांगतो. गोष्ट सांगताना गोष्टीतील महत्त्वाच्या शब्दांचा वापर करतो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	कल्पनाशक्ती, भाषिक विकास व सर्जनशीलतेचा विकास होण्यास मदत होईल. तसेच शब्दसंग्रह वाढण्यास मदत होईल. तसेच बालकांचे भावविश्व तयार होईल.	

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
निरीक्षण करावयाच्या बाबी	• कथा सांगताना सर्व बालके लक्षपूर्वक ऐकत होती का हे पाहावे. • बालके चित्रकथा कार्डांच्या क्रमानुसार गोष्ट सांगत आहेत का हे पाहावे. • गोष्टीतून बालकाला आनंद मिळतो का हे पाहावे. • वर्तनातील बदलात गोष्टींचा प्रभाव दिसतोय का याचे निरीक्षण करावे.	
आधारशिला कृती क्र. : 2. Singing Rhymes		
उपक्रमाचे नाव	गाणी	
उपक्रमाला लागणारे साहित्य	टाळ, खंजिरी, घुंगरू, चमचा, वाटी, दगड अशा विविध वस्तू तालासाठी, गाण्यांची पुस्तिका	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
कृती : साधी बडबडगीते ऐकविणे. • बालकांना वर्तुळाकार बसवावे किंवा अभिनय गीतासाठी उभे करावे. • घरात, परिसरात ऐकली जाणारी बडबडगीते, साधी गाणी, योग्य हावभावांसह, योग्य ताल आणि आवाजातील योग्य चढउतारांसह ऐकवावी. • तंत्रज्ञानाच्या (मोबाईल, टीव्ही, प्रोजेक्टर, साऊंड इत्यादी) मदतीने गाणी, बडबडगीते बालगीते ऐकवावीत. • ऐकवलेली साधी गाणी, बडबडगीते योग्य हावभावांसह म्हणण्याची बालकांना संधी द्यावी.	**कृती :** बडबडगीते ऐकूया म्हणूया. • बालकांना वर्तुळाकार बसवावे किंवा अभिनय गीतासाठी उभे करावे. • बालकांना परिसरातील विविध भाषेतील, बोलीभाषेतील गाणी ऐकवून त्यांना म्हणण्याची संधी द्यावी. • पारंपरिक गाणी उदा. ओव्या, अभंग, भजन, भुलाबाई, मंगळागौर इत्यादी गाणी घ्यावी. • चित्रे ध्वनिफीतीच्या साहाय्याने सोपी बडबडगीते ऐकवावीत. • तंत्रज्ञानाच्या (मोबाईल, टीव्ही, प्रोजेक्टर, साऊंड इत्यादी) मदतीने गाणी, बडबडगीते बालगीते ऐकवावीत.	**कृती :** बडबडगीते ऐकूया म्हणूया. • बालकांना वर्तुळाकार बसवावे किंवा अभिनय गीतासाठी उभे करावे. • बालकांच्या परिसरातील, भावविश्वातील संबंधित पूर्वानुभव लक्षात घेऊन गाणी, बडबडगीते म्हणून घ्यावी. • बालकांकडून योग्य हावभावांसह, तालासुरांत गाणी म्हणून घ्यावी. • गाणी, बडबडगीते, कविता यांविषयी अनौपचारिक गप्पागोष्टी गट करून वारंवार कराव्या. • बालकांच्या बोलीभाषेतील मूळ गाणे त्याच गाण्याचे माध्यम वापरून (मराठी) भाषेत भाषांतर करून दोन्ही भाषांमधील गाणी कृतियुक्त पद्धतीने म्हणून घ्यावीत. **(अधूनमधून हिंदी/इंग्रजी बडबडगीते देखील म्हणवून घ्यावीत.)**

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td>अन्नमय, प्राणमय, आनंदमय कोश,</td><td>मनोमय व आनंदमय कोश</td><td>प्राणमय व विज्ञानमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">टाळ, खंजिरी, घुंगरू, ढोलक व परिसरातील उपलब्ध साहित्याचा वापर तालासाठी व पेटी सुरासाठी वापरावी.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">मी, माझे कुटुंब, परिसर, पाणी–पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">• आपल्याकडे उपलब्ध असलेल्या बडबडगीतांच्या संग्रहातील गीत घ्यावे. कृती पुस्तिकेतील कृती करून घ्यावी.
• सण, समारंभ, दिन विशेष (उदा. आषाढी एकादशी, दहीहंडी) यानुसार गाणी, श्लोक, अभंग घ्यावे.</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-9 बालके दोन भाषांमध्ये दैनंदिन संवाद साधण्यासाठी प्रभावी संवादकौशल्य विकसित करतात.
C-9.1 साधी गाणी, बडबडगीते आणि कविता ऐकतो आणि आवड व्यक्त करतो.
अ) LO 9.1.1 विविध प्रकारची गाणी आणि कविता ऐकतो.
अ) LO 9.1.2 साधी गाणी, बडबडगीते ऐकून म्हणतो.
ब) LO 9.1.1 घरात आणि परिसरात वारंवार म्हटली जाणारी विविध भाषांमधील गाणी ऐकतात आणि आनंद घेतो.
ब) LO 9.1.2 हावभाव व आवाजातील चढउतारासह गाणी म्हणतो.
क) LO 9.1.1 जास्त लांबीची (४ ते ८ ओळी) परिचित गाणी/बडबडगीते, कविता लक्ष देऊन ऐकतो, त्याबद्दल संभाषण करतो.
क) LO 9.1.2 लहान (४ ते ५ ओळी) गाणी/कविता बडबडगीते गातो.
CG-11 बालके भाषा वाचन आणि लेखनाचा आरंभ करतात.
C-11.1 शब्दध्वनीची जाणीव होऊन शब्दध्वनी/अक्षरे एकत्र करून, शब्द तयार करतो व शब्दांमधील शब्दध्वनी/अक्षरे वेगळी करतो.
क) LO 11.1.1 बडबडगीते गातो.</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये</td><td colspan="2">• श्रवणक्षमतेचा विकास, मौखिक भाषा विकास, शब्दसंपत्तीत वाढ होऊन स्मरणशक्तीचा विकास होण्यास मदत होईल. भावभावनांचा विकास आकलन क्षमतेचा विकास साध्य करणे.</td></tr>
</table>

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">• बालके गाणी लक्षपूर्वक आणि आनंदाने ऐकत आहेत का? तसेच त्यात सहभागी होतो का? याचे निरीक्षण करावे.</td></tr>
<tr><td colspan="3">आधारशिला कृती क्र. : 3 Let' describe pictures talk and discuss what one can see.</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">चित्रगप्पा</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">मोठ्या आकाराचे रंगीत चित्र, जादूई पिटाऱ्यातील चित्रगप्पा कार्ड</td></tr>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td colspan="2">चित्रगप्पा
• बालकांना चित्र दाखवावे.
• चित्रात दिसणाऱ्या वस्तू, व्यक्ती, गोष्टींची नावे सांगण्यास सांगावे.
• बालकांना दीर्घ प्रतिसादाचे प्रश्न विचारून चित्रातील व्यक्तींविषयी, घटनेविषयी बोलते करावे.
• बालकांच्या भावभावनांना चालना द्यावी.
• बालकांना चित्रातील घटनेविषयी स्वतःचे अनुभव सांगण्यास प्रोत्साहित करावे.
• चित्राविषयी नेहमीच्या वापरातील शब्द फळ्यावर किंवा चार्टपेपरवर लिहावे आणि त्यांचे साईट रीडिंग पद्धतीने वाचन घ्यावे.</td><td>चित्रगप्पा
• बालकांना चित्र दाखवावे.
• चित्रात दिसणाऱ्या, वस्तू, व्यक्ती, गोष्टींची नावे सांगण्यास सांगावे.
• बालकांना दीर्घ प्रतिसादाचे प्रश्न विचारून चित्रातील व्यक्तींविषयी, घटनेविषयी बोलते करावे.
• का, कसे, कशामुळे असे प्रश्न विचारून बालकांच्या कल्पनेला आणि तर्कशक्तीला चालना द्यावी.
• चित्रावषयी नेहमीच्या वापरातील शब्द फळ्यावर किंवा चार्टपेपरवर लिहावे आणि त्यांचे साईट रीडिंग पद्धतीने वाचन घ्यावे.
• बालकांनी सांगितलेल्या शब्दांची वाक्ये करून ती फळ्यावर लिहावीत आणि बालकांबरोबर वाचावीत.</td></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">अन्नमय, प्राणमय व विज्ञानमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">• चित्रास नाव देण्यास सांगावे.
• चित्रातील आवडलेल्या गोष्टीचे चित्र काढण्यास सांगावे.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">मी, माझे कुटुंब, परिसर, पाऊस-पाणी, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन</td></tr>
</table>

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">आपल्याकडे उपलब्ध असलेल्या मोठ्या आकाराच्या चित्रांच्या संग्रहातील चित्र घ्यावे. चित्रगप्पा उपक्रमासाठी सोबत दिलेल्या कार्यपुस्तिकेतील विषय गोफाप्रमाणे चित्रगप्पा कार्ड जाड पुठ्ठ्यावर चिटकवून घ्यावे व त्याचा वापर करावा.</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-9 बालके दोन भाषांमध्ये दैनंदिन संवाद साधण्यासाठी प्रभावी संवादकौशल्ये विकसित करतात.
C-9.7 दैनंदिन संवाद परिणामकारकरीत्या साधण्यासाठी पुरेसे शब्द आत्मसात करतो व आत्मसात केलेल्या शब्दसंग्रहाचा वापर करून नवीन शब्दांचा अर्थ लावतो.
अ) LO 9.7.1 दैनंदिन परिचयातील काही वस्तू आणि अनुभव यांसाठी योग्य शब्दांचा वापर करतो. (उदा. स्वतःचे व मित्राचे नाव, सामान्य वस्तू, चित्रे, गोड-आंबट, वर्तुळ-मोठा इत्यादीची नावे सांगतो.
ब) LO 9.7.1 विशिष्ट प्रसंग किंवा वर्गामध्ये अनुभवलेल्या विषयातून प्राप्त शब्दसंग्रहाचा उपयोग त्याच्या संभाषणात करतो.
क) LO 9.7.1 वाढीव शब्दसंग्रहाचा वापर करून कृतियुक्त, वर्णनात्मक व कालदर्शक शब्दांचा हेतुपुरस्सर वापर करतो.</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये</td><td colspan="2">• परिचित वस्तू, अनुभव मांडण्यासाठी योग्य शब्दांची निवड करण्यास मदत होईल.</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">• शब्द मांडणी योग्य करतो की नाही, भावना योग्य शब्दांत सांगता येतात का याचे निरीक्षण करावे.</td></tr>
<tr><td colspan="3">आधारशिला कृती क्र. : 4 Free Picture Book / Story Book Reading Time</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">गोष्ट वाचूया.</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">मोठे चित्र असलेले पुस्तक</td></tr>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td colspan="2">• ताईंनी बालकांना आपल्या जवळ बसवून पुस्तकातून गोष्ट वाचून दाखवावी.
• गोष्ट सोप्या भाषेत किंवा बालकांच्या बोलीभाषेत असावी.
• गोष्टीचा कालावधी ५-६ मिनिटे इतका असावा.
• गोष्ट सांगताना आवाजाचा चढउतार करत, हावभावांसह गोष्ट सांगावी.</td><td>• वयोगटाप्रमाणे पुस्तकांमधील काही सामान्य शब्दांवर चर्चा करा.
उदाहरणार्थ, आकाशात खूप काळेकाळे ढग दाटून आले.</td></tr>
</table>

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td colspan="2">पुस्तक निवडीसंदर्भात
• ताईने बालकांना आवडतील अशी मोठमोठी चित्रे असलेली गोष्टींची पुस्तके द्यावीत.
• एका पानावर एक वाक्य आणि मोठे चित्र असे पुस्तक द्यावे.
• बालकांना त्यांची स्वतःची पुस्तके निवडू द्यावीत. बालकांना पुस्तके वाचण्यासाठी त्यातील चित्रांची नावे सांगावीत, चित्राद्वारे नावे वाचावीत.
• बालकांना पुस्तके वाचण्याचे नाटक करू द्यावे. ''पुस्तकातील पाने उलटा काय गोष्ट आहे ते वाचा.'' असे सांगून अशाप्रकारे बालकांना पुस्तके वाचण्यास प्रवृत्त करावे.
• गोष्टीशी संबंधित प्रश्न विचारून बालकांना बोलते करावे.
• बालक जे पुस्तक वाचत आहेत त्याबद्दल बोला जसे की, ''तुम्ही कोणते पुस्तक वाचत आहात? गोष्टीत कोण आहे? काय आहे? या चित्रात काय काय दिसत आहे.'' याबद्दल चर्चा करावी.
• बालकांच्या वाचनाच्या प्रयत्नांचे कौतुक करावे.</td><td>पुस्तक निवडताना
• बालकांना पुस्तकांमध्ये गुंतण्याची संधी द्यावी.
• पुस्तकाचे वाचनगटातील सगळ्या बालकांबरोबर एकत्रित घ्यावे.
• एक पुस्तक एक बालक.
• पुस्तकाबद्दल चर्चा करावी. जसे की 'पुस्तकाचे शीर्षक/नाव कुठे आहे?', 'पुस्तक कोणी लिहिले आहे?' 'कथा/गोष्ट कशाची आहे?', 'कोणते तुम्हाला पात्र आवडते?', 'आपण पुस्तक डावीकडून उजवीकडे किंवा उजवीकडून डावीकडे कसे वाचू शकतो?'</td></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">अन्नमय, प्राणमय व विज्ञानमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">मोठमोठी चित्रे असलेली गोष्टीची पुस्तके, विविध मुखवटे, पपेट, कळसूत्री बाहुल्या, तंत्रज्ञानाचा वापर करून विविध गोष्टी सांगाव्या.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">मी, माझे कुटुंब, परिसर, पाऊस-पाणी, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन.</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">आपल्याकडे उपलब्ध असलेल्या मोठ्या आकाराच्या चित्रपुस्तकांच्या संग्रहातील चित्रपुस्तक घ्यावे. सहभागी वाचन करावे.</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-10 बालके भाषा एक L1 मध्ये सफाईदारपणे वाचन व लेखन करतात.
C-10.5 स्वतःहून पात्रांची ओळख, कथाबीज व लेखकाला जे सांगायचे आहे ते समजून कथा वाचतात व त्याचा अर्थ समजून घेतात.
अ) LO 10.5.1 प्रकटवाचन ऐकतो आणि ताईंनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देतो.
ब) LO 10.5.2 चित्र पुस्तके वाचतो आणि कृती व वस्तू ओळखतो.</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
	क) **LO 10.5.1** शिक्षकांसोबत सहभागी वाचनात भाग घेतो आणि वाचलेल्या भागा विषयीच्या चर्चेत सहभागी होतो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	• श्रवण विकास, अभिव्यक्ती विकास, भावनात्मक विकास, अनुभव मांडण्याची क्षमता विकसित होण्यास मदत होईल. क्रमबद्ध विचार करणे विकसित होईल.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	• स्वतःच्या शब्दांत गोष्टी सांगता येतात का ते पाहावे, कथेतील घटनाक्रम लक्षात ठेवून सांगतो की नाही याचे निरीक्षण करावे.	
आधारशिला कृती क्र. : 5. Craft your own creative stories.		
उपक्रमाचे नाव	गोष्ट सांगूया.	
उपक्रमाला लागणारे साहित्य	गोष्टीची पुस्तके, गोष्टीचा घटनाक्रम असलेली चित्रे, संत, थोर पुरुष, सण समारंभ यांची चित्रे,	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
• ताईने बालकांना त्यांच्या वयोगटाला अनुसरून गोष्ट ऐकवावी. कथा छोटी आणि रंजक असावी. कथा निवडताना त्यातील पात्रे, घटना परिचित असाव्या. • ही गोष्ट बालकांच्या बोलीभाषेतील असावी. • बालकांना मधूनमधून प्रश्न विचारून कथानक, गोष्टीतील पात्रे, घटना यांचे स्मरण राहते आहे का हे पाहावे. • सांगितलेली गोष्ट बालकांना परत सांगण्यास प्रोत्साहित करावे. त्यासाठी सुरुवातीला काय झाले? मग काय झाले? नंतर काय घडले? कोण भेटले? असे प्रश्न विचारावेत.	• ताईने बालकांना एक गोष्ट ऐकवावी. • बालकांनी ऐकलेली गोष्ट स्वभाषेत क्रमशः सांगण्यास सांगावे. यासाठी बालकांना प्रश्न विचारावेत. आवश्यकता असल्यास ताईने मदत करावी. • ऐकलेली गोष्ट त्याच पात्रांसकट तशाच क्रमाने बालकाने सांगितली पाहिजे, असा अट्टाहास न धरता बालकाला त्याच्या भाषेत, त्याला वाटते तशी गोष्ट सांगू द्यावी. • बालकांना चित्रकार्डे देऊन त्यावरून गोष्ट सांगण्यास प्रोत्साहित करावे.	(बालकांना परिचित असणाऱ्या गोष्टी सांगाव्या. उदाहरणार्थ, टोपीवाला आणि माकडे) • ताईने बालकांना गोष्ट सांगून तीच गोष्ट क्रमाने सांगण्यास प्रोत्साहित करावे. • ऐकलेल्या गोष्टीत कोण कोण होते, असे विचारावे. • गोष्टीतील पात्रे एकमेकांशी काय काय बोलतात असे विचारावे. • बालकांना चित्रकार्डे देऊन त्यावरून त्यांची स्वतः बनवलेली गोष्ट सांगण्यास प्रोत्साहित करावे. • बालकांना ताईने अर्धी गोष्ट पूर्ण करण्यासाठी सांगावे. ताईने बालकांना नवीन गोष्ट अर्धी सांगावी. गोष्टीत पुढे काय

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
• बालकांना चित्रकार्डे देऊन त्यावरून गोष्ट सांगण्यास प्रोत्साहित करावे.		घडेल, काय वाटते हे बालकांना सांगण्यास सांगावे. प्रत्येक बालकाला समान संधी द्यावी.
पंचकोश		
अन्नमय, प्राणमय, विज्ञानमय कोश	अन्नमय, प्राणमय, विज्ञानमय कोश,	मनोमय व विज्ञानमय कोश

विविधता	ऐकलेल्या गोष्टींचे सादरीकरण : घटनाक्रम असलेली वेगवेगळी चित्रे दाखवून गोष्ट सांगण्यास सांगावी.
थीम/विषय	पाऊस–पाणी, भाज्या व फळे, वनस्पती आणि फुले, प्राणी (पाळीव व जंगली), पक्षी व कीटक, वाहन (आकार), मदतनीस
ताईसाठी सूचना	यासाठी आपल्या कल्पकतेने आपल्याकडे उपलब्ध असलेली चित्रकार्डे, फ्लॅशकार्डे, पपेट, नाट्यीकरण यांचा वापर करावा.
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-9** बालके दोन भाषांमध्ये दैनंदिन संवाद साधण्यासाठी प्रभावी संवादकौशल्ये विकसित करतात. **C-9.5** कथन केलेल्या/वाचलेल्या गोष्टी समजून घेतो आणि त्यातील पात्रे, गोष्टींची मध्यवर्ती कल्पना आणि लेखकाला काय सांगायचे आहे ते लक्षात घेतो. **अ) LO 9.5.1** अल्प कालावधीसाठी छोट्या गोष्टी लक्षपूर्वक ऐकतो (५–७ मिनिटे) **ब) LO 9.5.1** गोष्टीतील पात्रे व काही प्रसंग आठवतो ते स्वतःच्या भाषेत सांगतो. **क) LO 9.5.1** गोष्टीची सुरुवात, मध्य व शेवट लक्षात घेऊन गोष्ट स्वतःच्या शब्दांत सुसंगतपणे सांगतो, गोष्ट सांगताना गोष्टीतील महत्त्वाच्या शब्दांचा वापर करतो.
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	• क्रमबद्ध विचार, श्रवण, भावनात्मक विकास इत्यादीमध्ये वाढ होण्यास मदत होईल.
निरीक्षण करावयाच्या बाबी	• ऐकलेली गोष्ट स्वभाषेत आणि योग्यक्रमाने सांगता येते की नाही हे पाहावे. याचबरोबर गोष्टीत नवी पात्रे, नव्या घटना बालकाने समाविष्ट केल्या, तर त्याचेही निरीक्षण करावे. गोष्टीतील भाव बालक जाणून घेते का याचे निरीक्षण करावे. • गोष्टीतील भाव बालक जाणून घेते का याचे निरीक्षण करावे.

आधारशिला कृती क्र. : 6. Animals around us : Identify and describe common animals.		
उपक्रमाचे नाव	प्राणी, पक्षी, कीटक ओळखूया.	
उपक्रमाला लागणारे साहित्य		
प्राणी, प्राण्यांची घरे, त्यांची चित्रकार्डे व चित्रफिती	प्राणी पक्षी यांचे कटआऊट	प्राणी, प्राण्यांची घरे, त्यांची पिल्ले यांची चित्रकार्डे
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
• छोटे गट तयार करून बालकांना चित्रे, चित्रकार्डे द्यावीत. • बालकांच्या अवतीभोवती असणाऱ्या प्राण्यांविषयी बोलण्यास चालना द्यावी. • पाळीव प्राणी आणि उपयुक्त प्राण्यांमधील फरक, साम्य सांगण्यास प्रेरणा द्यावी. चर्चा करावी.	• बालकांना छोट्या गटात विभागावे. • प्राणी, पक्षी आणि कीटक यांची चित्रे बालकांना द्यावे. • बालकांना चित्रांचे निरीक्षण करून, काय दिसते, ते सांगण्यास सांगावे. • प्राणी, पक्षी, कीटक असे वर्गीकरण करण्यास बालकांना प्रोत्साहन द्यावे. • प्राणी, पक्षी, कीटक हे मानवापासून वेगळे कसे, यावर ताईने बालकांबरोबर चर्चा करावी. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	• बालकांचे घर ते अंगणवाडीपर्यंत येताना कोणकोणते प्राणी, पक्षी पाहिले यावर मुक्त चर्चा घडवून आणावी. • अपरिचित प्राणी, पक्षी ओळखण्यास ताईने प्रोत्साहन द्यावे. • जंगलातील प्राणी आणि पाळीव प्राणी यांवर ताईने चर्चा घडवून आणावी. बालकांना प्राण्यांबद्दल माहिती सांगून ते जंगलातील आहेत की पाळीव, यावर गप्पा माराव्यात व चर्चा करावी. • हे प्राणी मानवापासून वेगळे कसे, यावर चर्चा घडवून आणावी. प्राणी, पक्षी अंघोळ कशी करत असतील, प्राणी, पक्षी आजारी पडल्यावर काय करत असतील, अशा स्वरूपाचे प्रश्न विचारून चर्चा करावी. • प्राण्यांचे खाद्य, त्यांचे घर, त्यांची पिले, प्राणी आणि पक्षी यांतील फरक याची बालकांना ओळख करून द्यावी. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
पंचकोश		
विज्ञानमय, अन्नमय, मनोमय व आनंदमय कोश	विज्ञानमय, मनोमय, आनंदमय कोश	विज्ञानमय, मनोमय, आनंदमय कोश
विविधता	बालकांना पक्षी, प्राणी यांचे भूमिकाभिनय करण्यास द्यावे. बालकांना त्यांच्या आवडीचे पात्र भूमिका करण्यास संधी द्यावी.	
थीम/विषय	प्राणी (पाळीव व जंगली), पक्षी व कीटक	
ताईसाठी सूचना	• वरील सर्व कृती करून घेतल्यावर आपल्याकडे यासंबंधी उपलब्ध वयोगटनिहाय कृतिपत्रिका सोडवून घ्याव्यात. • ऑडिओ – व्हिडिओ माध्यमातून प्राणी – पक्ष्यांचे आवाज ऐकवावेत • प्राणी–पक्षी यांच्याबद्दल बालकांमध्ये प्रेम आत्मीयता, दयाभाव निर्माण करावे. त्यांच्या संगोपनाची सवय विकसित करावी. • निसर्गभ्रमण/क्षेत्रभेटीस न्यावे. • संबंधित सण, दिनविशेष साजरे करावे.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-7** बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात. **C-7.1** वेगवेगळ्या वर्गांतील/गटांतील वस्तूंमधील फरक व वस्तूंचा एकमेकाशी संबंध याचे निरीक्षण करतात व समजून घेतात. **अ) LO 7.1.1** वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी, घटना या इतरांच्या मदतीने नावांसहित ओळखतो. **ब) LO 7.1.1** वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी, घटना इ. नावासह ओळखून स्वतः त्याचे वर्णन करतो. **क) LO 7.1.1** लगतच्या परिसरातील वस्तू, व्यक्ती, प्राणी, पक्षी आणि त्यांच्या प्रतिकृती, चित्रे ओळखतो. त्यांची सर्वसाधारण वैशिष्ट्ये सांगतो/वर्णन करतो. (घराचा मोठा दरवाजा)	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	• बालकांना प्राणी, पक्षी, कीटक यांचे वर्गीकरण करता येते. • त्यांच्याबद्दल प्रेम, आत्मीयता निर्माण होते.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	• बालके परिसरातील परिचित प्राणी, पक्षी, कीटक यांचे निरीक्षण करून कसे व्यक्त होतात याचे निरीक्षण करावे. • बालकांनी केलेले निरीक्षण ते योग्य शब्दांत व्यक्त करतात काय, याचे निरीक्षण करावे.	

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
	• बालकांच्या स्मरणशक्तीचे, कल्पनाशक्तीचे निरीक्षण करावे. बालकांच्या उच्चारांचे निरीक्षण करावे. • बालकांमध्ये प्राणी, पक्ष्यांबद्दल प्रेम आत्मीयता निर्माण झाली का? याचे निरीक्षण करावे.	

आधारशिला कृती क्र. : 7. Colours around us : Identify, Find and Sort.	
उपक्रमाचे नाव	रंग ओळखूया.
उपक्रमाला लागणारे साहित्य	**वेगवेगळ्या रंगांच्या वस्तू** : ठोकळे, खडू, कागद, पेन, कापडाचे तुकडे, स्केच पेन इत्यादी. ओले रंग – निळा, पिवळा, लाल, केशरी, हिरवा, जांभळा या रंगाच्या वस्तू. लाल, निळ्या, पिवळ्या रंगांच्या वेगवेगळ्या छटा असलेल्या वस्तू.

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
• बालकांना लाल, पिवळा व निळा या मूळ रंगाची ओळख करून द्यावी. • बालकांना वर्गात वेगवेगळ्या मूळ रंगांच्या वस्तू द्याव्यात. • घरून एकेका बालकाला एकेका रंगाची वस्तू आणायला सांगावे. • त्या वस्तू वर्गात विखरून निरनिराळ्या ठिकाणी ठेवाव्यात. • खेळ पळा पळा पळा – थांबा हा खेळ घेऊन बालके थांबल्यावर त्यांना एका रंगाचे नाव सांगून त्या रंगाच्या वस्तू एका वर्तुळात ठेवायला सांगावे. • सर्वांनी वर्तुळात त्या रंगाच्या वस्तू ठेवल्यावर त्या परत वर्गात विखरून ठेवाव्यात. • पुन्हा खेळ सुरू करून दुसरा रंग सांगावा. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	• दोन मूळ रंग एकत्र करून मिश्र रंग करता येतात. • सर्व रंग बालकांसमोर ठेवावे. • मूळ आणि मिश्र रंग बालकांना ओळखण्यास सांगावे. • आपण दिलेले रंग त्यांना आजूबाजूला, परिसरात कोठे दिसतात, हे सांगण्यास प्रोत्साहन द्यावे. • रंगांचा परिचय झाल्यावर वैयक्तिक आणि गटांमध्ये रंग ओळखण्याची कृती करून घ्यावी. • बालकाला रंग आणि त्यासंबंधित वस्तू ओळखण्यास, आठवण्यास सांगावे. • बालकाला कोणता रंग आवडतो हे विचारावे. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	• सर्व रंग बालकांसमोर ठेवावे. मूळ आणि मिश्र रंग तसेच त्यांच्या फिकट आणि गडद छटा बालकांना ओळखण्यास सांगावे. • आपण दिलेले रंग त्यांना आजूबाजूला, परिसरात कोठे दिसतात, हे सांगण्यास प्रोत्साहन द्यावे. • रंगांचा परिचय झाल्यावर वैयक्तिक आणि गटांमध्ये रंग ओळखण्याची कृती करून घ्यावी. • चित्र निरीक्षणातून कोणते रंग दिसताहेत हे विचारावे. • बालकाला रंग आणि त्यासंबंधी वस्तू ओळखण्यास, आठवण्यास सांगावे. • चित्र काढून वेगवेगळे रंग वापरून रंगवून घ्यावे. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
पंचकोश		
अन्नमय, मनोमय व विज्ञानमय कोश		
विविधता	कागदाचे विविध भौमितिक आकार कात्रीने कापण्यास सांगणे व त्याचे कोलाज निसर्गचित्र तयार करून घेणे, विविध साहित्यांचा वापर करून (उदा. मुखवटे, कपडे, रंगांच्या पाट्या) यावरून रंगांचे दृढीकरण करावे.	
थीम/विषय	भाज्या व फळे, वनस्पती आणि फुले, प्राणी (पाळीव व जंगली), पक्षी व कीटक, ऋतू (कपडे), वाहन (आकार)	
ताईसाठी सूचना	• रंग ओळखून त्यासंदर्भात रंगाच्या जोड्या जुळविणे, वर्गीकरण करणे यासारख्या कृतिपत्रिका सोडवून घ्याव्यात. • निसर्गभ्रमणास न्यावे, निसर्गातील रंग दाखवावे.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-2** बालके ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात. **C-2.1** आकार, रंग आणि त्याच्या छटा यांमधील फरक ओळखतो. **अ) LO 2.1.1** मूळ प्राथमिक रंग (लाल, निळा आणि पिवळा) आणि परिसरातील इतर रंग यांच्यातील फरक ओळखतो आणि त्यांची नावे सांगतो. (काळा, पांढरा, तपकिरी इत्यादी.) **ब) LO 2.1.1** मूळ प्राथमिक व दुय्यम रंगांमधील छटा यातील फरक ओळखतो. उदाहरणार्थ : फिकट निळा, गडद निळा, फिकट हिरवा, गडद हिरवा. **क) LO 2.1.1** दोन रंग मिसळल्यावर एकत्र केल्यावर कोणता नवीन रंग तयार होईल याचा अंदाज लावण्याचा प्रयत्न करतो. (उदाहरणार्थ : निळा आणि पिवळा एकत्र केल्यावर हिरवा दिसतो आणि लाल आणि पांढरा एकत्र केल्यावर गुलाबी दिसतो.)	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	• संभाषण, वर्गीकरण, विश्लेषण, निर्णयक्षमता, तर्कक्षमता, कार्यकारण–संबंध, रंगज्ञान, शोधकवृत्ती.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	• विशिष्ट रंग आणि आकाराच्या वस्तू ओळखता येतात का? व वेगळ्या करता येतात का हे पहावे. • रंगछटा ओळखतात का हे पाहावे.	

आधारशिला कृती क्र. : 8. Shapes around us : Identify, Find and Sort.	
उपक्रमाचे नाव	आकारांची ओळख करूया.
उपक्रमाला लागणारे साहित्य	वर्तुळ, त्रिकोण, चौकोन यांची फ्लॅश कार्ड्स किंवा कटआऊट्स, बांगड्या, त्रिकोणी व चौकोनी पुठ्ठा, ताट, बटणे, त्रिकोणी आकाराचे फोमचे तुकडे, पुठ्ठे, चोळीचा त्रिकोणी खण असलेले चित्र,ताटली, लाकडी ठोकळ्यांमधील/रंगोमेट्री तुकडे. विविध आकारांच्या वस्तू–मोठ्या आकाराची बटणे, झाकणे, कपाळाला लावायची मोठ्या आकाराची टिकली, ताटली, चौरस आणि आयत कागदाचे किंवा पुठ्ठ्यांचे तुकडे, आयताकृती पिशवी, पतंग, वर्तमानपत्राची घडी, रुमाल, वही, त्रिकोणी पताका, हँगर, अंडे, पायपुसणे, बॅडमिंटन रॅकेट, चांदणीसाठी त्या आकाराचे वेगवेगळे कटआऊट्स, ओरिगामी कागदाच्या विविध आकाराच्या घड्या.

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
कृती : आकार व वस्तूची जोडी लावणे. (या वयोगटाला फक्त वर्तुळ, त्रिकोण, चौरस हे तीनच आकार शिकवावेत.) • बालकांना बसवावे. ताईने ट्रेमध्ये वर्तुळ, त्रिकोण, चौकोन यांचे फ्लॅश कार्ड्स किंवा कटआऊट घ्यावे. त्याच ट्रेमध्ये बांगड्या, खोके, झाकण, बटणे, त्रिकोणी–पेन्सिलचे रिकामे खोके, सामोसा असलेले चित्र, ताटली, लाकडी ठोकळ्यांमधील/रंगोमेट्री तुकडे घ्यावेत व वर दिलेले इतर साहित्य घ्यावे. • बालकांना एका वेळी एकाच आकाराचा कटआऊट किंवा फ्लॅशकार्ड हाताळायला द्यावे. आकाराच्या कडेवरून बोटे	**कृती : आकाराचे खेळ** **कृती १** • बालकांना विविध आकारांचे कटआऊट्स हाताळायला द्यावे. • वर्तुळ, चौकोन, त्रिकोण हे आकार सारखेच आहेत का, त्यात काही फरक आहे, हे बालकांना विचारावे. काय फरक आहे, हे एक एक करून बालकांना विचारावे. • चौकानाला ४ टोके आहेत, वर्तुळाचा आकार घेऊन त्याला टोके नाहीत, हे सांगावे. त्रिकोणाला किती टोके आहेत, हे मोजायला सांगावे. **कृती २** • आधीच्या पद्धतीने लंबवर्तुळ, आयत व चांदणी या आकारांची ओळख करून द्यावी व त्या	**कृती : आकाराचे खेळ** **कृती १** • बालकांना विविध आकारांचे कटआऊट द्यावे. • प्रत्येक आकाराला किती कडा/बाजू आहेत आणि किती कोन आहेत यावर बोलावे. त्यांना कटआऊटला स्पर्श करून, त्याचा अनुभव घेण्यास सांगावे. **कृती २** • बालकांना वर्तुळात उभे करावे. ट्रेमध्ये विविध आकारांच्या वस्तू मांडाव्यात. खंजिरी वाजवावी. तेव्हा बालकांनी वर्तुळात पळावे. खंजिरी वाजवायची थांबवून ताईंनी एका आकाराचे नाव घ्यावे.

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>फिरवण्यास उत्तेजन द्यावे. त्या आकाराचे नाव सांगावे.
• ट्रेमधील वस्तू बालकांच्या समोर ठेवाव्यात व एका एका बालकाला जो आकार शिकवला असेल, त्या आकाराच्या वस्तू शोधून काढण्यास सांगावे. उदाहरणार्थ, वर्तुळ – बांगडी, ताटली; चौकोनी – खोके.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td><td>आकाराच्या वस्तू ट्रेमध्ये ठेवलेल्या वस्तूंमधून शोधायला सांगावे.
• आकारांची गोष्ट सांगावी.</td><td>त्या आकाराची वस्तू ट्रेमध्ये ठेवलेल्या वस्तूंमधून बालकांनी शोधून आणावी व ताईला द्याव्यात. सर्व बालकांना पुरतील एवढ्या वस्तू ट्रेमध्ये ठेवाव्यात.
• विविध आकारांचे कोलाजकाम करून घ्यावे.</td></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td>प्राणामय, विज्ञानमय, मनोमय कोश</td><td>प्राणमय, विज्ञानमय व मनोमन कोश</td><td>प्राणमय, विज्ञानमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">बालकांना रांगोळीमध्ये किंवा वाळूमध्ये विविध आकार काढण्यास सांगावे. बालकांना विविध आकारच्या सांगून, त्या आकाराच्या वस्तू घरून घेऊन येण्यास सांगावे. बालकांना खडूने विविध आकार काढण्यास सांगावे. आकार शोधून प्रदर्शन मांडण्यास सांगावे.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">भाज्या व फळे, वनस्पती आणि फुले, वाहन (आकार)</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">• आकाराची ओळख होण्यासाठी वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्याव्यात.
• विविध संग्रहालयांना भेट द्यावी.
• विविध वस्तूंच्या प्रदर्शनातून आकार ओळखण्यास शिकवावे.</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-8 बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात.
C-8.12 राशी, आकार, अवकाश आणि मोजमापे या संकल्पनांचे आकलन होण्यासाठी आणि संकल्पना व्यक्त करण्यासाठी सुयोग्य व पुरेशी शब्दसंपत्ती विकसित करतो.
अ) LO 8.12.1 आकारांची नावे व त्यांचे काही गुणधर्म सांगतो.</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
	ब) **LO 8.12.1.1** संख्यानामे आणि आकारांच्या नावांचा उपयोग करून साध्या सूचनांचा अर्थ लावतो. ब) **LO 8.12.2** संख्यानामे, आकारांच्या नावांचा योग्य प्रकारे उपयोग करतो. क) **LO 8.12.1** योग्य मापन क्रियेसाठी संख्या, आकारनामे व क्रिया यांचा उपयोग करतो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	• आकारांची नावे व त्यांचे काही गुणधर्म समजणे, प्रभावी संवाद, साक्षरताविषयक कौशल्ये माहिती, चिकित्सक विचार, सृजनशीलतेचा विकास.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	• दिलेले आकार ओळखता येतात का याचे निरीक्षण करावे. • परिसरातील दिसणाऱ्या आकाराचे नाव घेतात का, हे बघावे.	
आधारशिला कृती क्र. : 8.1 Shapes around us : Identify, Find and Sort.		
उपक्रमाचे नाव	आकारांच्या जोड्या लावूया.	
उपक्रमाला लागणारे साहित्य		
खडू, वाळू, माती, रांगोळी.	खडू, वाळू, माती, रांगोळी.	प्रत्येक आकाराच्या वस्तू– मोठ्या आकाराचे बटण, झाकणे, कपाळाला लावायची मोठ्या आकाराची टिकली ताटली, चौरस आणि आयत कागदाचे किंवा पुठ्ठ्याचे तुकडे, आयताकृती पिशवी, पतंग, वर्तमानपत्राची घडी, रुमाल, वही, त्रिकोणी पताका हँगर, अंडे पाय पुसणे, बॅडमिंटन रॅकेट, चांदणीसाठी त्या आकाराचे वेगवेगळे कटआऊट्स.
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
• बालकांना रांगोळीमध्ये किंवा वाळूमध्ये विविध आकार काढण्यास सांगावे.	**कृती : आकाराचे खेळ** • ताईने वर्गाच्या बाहेर समोरासमोर दोन रेषा काढाव्यात. एका रेषेवर	**कृती : आकाराचे खेळ** • दिलेल्या मोठ्या चौकोनी आकारात (आयताकार) छोटे चौकोन ठेवण्यास सांगावे.

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
• जमिनीवर काही मोठी वर्तुळे, चौकोन व त्रिकोण काढावे. ताईने एका आकाराचे नाव घ्यावे व बालकांना त्या आकारामध्ये उडी मारण्यास सांगावे. • वरील कृतींचा सराव झाल्यावर ताईने बालकांना त्यांतील फरक विचारावा. • गाण्यातून व खेळातून आकाराच्या जोड्या लावून घ्याव्यात. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	वर्तुळ, त्रिकोण, चौकोन आकारांच्या १५ ते २० वस्तू ठेवाव्यात. • दुसऱ्या रेषेवर त्यातील वस्तू ठेवण्यास सांगव्यात. उदाहरणार्थ, ४ बांगड्या समोरच्या रेषेवर ठेवून ये, २ चौकोनाच्या वस्तू रेषेवर ठेवून ये, ५ त्रिकोणाच्या वस्तू समोरच्या रेषेवर ठेवून ये. **कृती २** • जमिनीवर काही त्रिकोणी, वर्तुळाकृती, चौकोनी आकार काढावे व ते एका रेषेने जोडून मजेचा खेळ तयार करावा. त्यानंतर बालकांकडून कृती करून घ्यावी. • वर्तुळात दोन उड्या मार, त्रिकोणात तीन उड्या मार, चौकोनात टाचेवर चालत जा. • मधल्या रेषेवर टाचेला दुसऱ्या पायाची बोटे जोडून चालत जा. अशा प्रकारे एकेका बालकांकडून कृती करून घ्यावी.	• चौकोन पूर्ण भरण्यास किती चौकोन लागले हे विचारावे. • गरज भासल्यास चौकोन ठेवण्यास मदत करावी. • ताईने बालकांना वर्गाच्या बाहेर न्यावे. बालकांना एकमेकांचे हात धरून मोठे वर्तुळ करण्यास सांगावे. वर्तुळ करून झाल्यावर हात सोडण्यास सांगावे. • ताईने बालकांच्या मोठ्या वर्तुळाच्या आत एक लहान वर्तुळ काढून त्यात विविध आकारांचे तुकडे ठेवावेत. • खेळ सुरू करण्याआधी सूचना द्याव्यात. • ताईने टाळ्या वाजवायला सुरुवात केली, की मोठ्या वर्तुळावर पळायचे आहे. • ताईने टाळ्या वाजवणे बंद केले, की ताईने सांगावे. ३ चौकोन उचल, ४ वर्तुळ उचल, ६ त्रिकोण उचल, २ वर्तुळ उचल अशा प्रकारे हा खेळ पूर्ण करावा. बालकांच्या संख्येनुसार आकारांचे प्रमाण असावे. (किमान १५ ते २० आकारांचे तुकडे घ्यावेत.) बालकांना असे आकार खेळण्यासाठी दिल्यास आकार आणि संख्यानामे लक्षात राहण्यासाठी मदत होईल.

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
पंचकोश		
विज्ञानमय, मनोमय कोश		
विविधता	• बालकांना विविध आकार सांगून घरून त्या आकाराच्या वस्तू घेऊन येण्यास सांगा. • विविध आकारांच्या वस्तूंचा संग्रह व प्रदर्शन भरवावे. • बालकांना खडूने विविध आकार काढण्यास सांगा. • ताईने दिलेल्या आकारावर सारखा आकार बालकांनी लावावा.	
थीम/विषय	भाज्या व फळे, वनस्पती आणि फुले, वाहन (आकार)	
ताईसाठी सूचना	• आकाराची ओळख होण्यासाठी वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्याव्यात. • खेळ, गाणी यांच्या साहाय्याने कृती करून घ्यावी.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-8** बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात. **C-8.12** राशी, आकार, अवकाश आणि मोजमापे या संकल्पनांचे आकलन होण्यासाठी आणि संकल्पना व्यक्त करण्यासाठी सुयोग्य व पुरेशी शब्दसंपत्ती विकसित करतो. **अ) LO 8.12.1** आकारांची नावे व त्यांचे काही गुणधर्म सांगतो. **ब) LO 8.12.1.1** संख्यानामे आणि आकारांच्या नावांचा उपयोग करून साध्या सूचनांचा अर्थ लावतो. **ब) LO 8.12.2** संख्यानामे, आकारांच्या नावांचा योग्य प्रकारे उपयोग करतो. **क) LO 8.12.1** योग्य मापन क्रियेसाठी संख्या, आकारनामे व क्रिया यांचा उपयोग करतो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	• आकारांची नावे व त्यांचे काही गुणधर्म माहिती होतात. प्रभावी संवाद, साक्षरताविषयक कौशल्ये माहिती, चिकित्सक विचार, सृजनशीलता	
निरीक्षण करावयाच्या बाबी	• दिलेले आकार ओळखता येतात का, याचे निरीक्षण करावे. परिसरातील दिसलेल्या आकारांची नावे घेतात का, हे बघावे. • संवादामध्ये आकारांच्या नावाचा वापर करतात का हे पाहावे.	

<table>
<tr><th colspan="3">आधारशिला कृती क्र. : 9. Exploring my Anganwadi Centre</th></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">प्रत्येक वस्तूला जागा व प्रत्येक वस्तू जागेवर.</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">अंगणवाडीत सर्वसाधारणपणे असणारे साहित्य</td></tr>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr>
<td>• डबा, बाटली, चप्पल या वस्तूंच्या नियोजित ठिकाणी ताईने चित्रे किंवा स्टिकर्स लावावीत.
• बालके वर्गात आल्यानंतर ताईने त्यांना एकत्र बसायला सांगावे.
• ताईने डबा, बाटली हातात घेऊन तसेच पायात बूट घालून उभे राहावे.
• ताईने चप्पल काढण्याच्या जागी जाऊन चपला ठेवाव्या. तसेच डबा, बाटली यांच्यासाठी ठरवलेल्या जागी त्या त्या वस्तू नेऊन ठेवाव्यात. हे करत असताना आपण काय करतो आहोत, ते ताईने सांगावे. उदाहरणार्थ, ‘येथे चप्पल असे लिहिले आहे. चपलांचे स्टीकर लावले आहे. आता मी येथे चपला ठेवते.’
• ताईने बालकांना त्यांच्या वस्तू ठरवलेल्या जागी ठेवण्याच्या सूचना द्याव्या. तसेच वस्तू ठेवताना तिथे लावलेली चित्रे किंवा स्टिकर्स बालकांना दाखवावी. जेथे जे चित्र आहे तेथेच ती वस्तू ठेवा असेही सांगावे.</td>
<td>• ताईने बालकांना एकत्र बसवावे एका वेळी अंगणवाडीमध्ये उपलब्ध असलेल्या चमचा, वाटी, ताट, खेळणी अशा परिचित वस्तूंची नावे घेऊन वैयक्तिक आणि गटाने आणण्यास सांगावे.
• एका वेळी एका बालकाला तुझा ‘डबा घेऊन ये, डबा जागेवर नेऊन ठेव’ अशा सूचना द्याव्या. प्रत्येक बालकाला संधी देत विविध वस्तू जागेवरून घेण्याची आणि नेऊन ठेवण्याची कृती करून घ्यावी. जेणेकरून अंगणवाडीमधील गोष्टींचा कळत नकळत परिचय होईल.
• गप्पागोष्टींमधून ताईंनी कोणती वस्तू कोठे ठेवावी हे सांगावे.
• वरील कृती खेळाच्या माध्यमातून घ्यावे. जसे : ताई म्हणते..... हे करा. या खेळाद्वारे.</td>
<td>• ताईने अंगणवाडीतील वस्तू बालकांना दाखवून त्यांच्या उपयोगाबद्दल चर्चा करावी.
• नीटनेटकेपणा व स्वावलंबन याविषयी चर्चा करावी.
उदाहरणार्थ, बाटलीचे झाकण कसे उघडावे–कसे बंद करावे, वस्तू योग्य जागी नीट कशा ठेवाव्या, नळ कसा बंद करावा. हात पुसल्यावर नॅपकिन कुठे ठेवावा. तसेच वस्तूंची फेकाफेक केली, तर काय होईल वस्तू नीट हाताळल्या, तर काय होते या मुद्द्यांवर चर्चा बालकांबरोबर करावी.</td>
</tr>
<tr><th colspan="3">पंचकोश</th></tr>
<tr><td>अन्नमय व मनोमय कोश</td><td>अन्नमय व मनोमय कोश</td><td>विज्ञानमय कोश</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
विविधता	• बालके वर्गात वापरत असणाऱ्या वस्तूंच्या जागा ठरवाव्या आणि त्या ठिकाणी स्टिकर/चित्रे लावून बालकांना त्याची ओळख करून द्यावी. उदाहरणार्थ, खेळणी ठेवण्याच्या जागा, पुस्तके ठेवण्याच्या जागा इत्यादी. • वर्गातील विविध साहित्य–बाटली, डबा, पुस्तके, खेळणी एकत्र करावी. बालकांना साहित्याभोवती बसवावे. बालकांना योग्य जागी योग्य वस्तू ठेवण्यास सांगावे. • रोज वर्ग आवरण्याच्या कामात बालकांना सामावून घ्यावे. • बालकांच्या पाण्याच्या बाटल्या व दप्तरे एकत्र ठेवावीत व त्यांना घरी जायच्या वेळी स्वत:च्या वस्तू व दप्तरे घेण्यास सांगावे. • हेच कार्य घरी करते का? बालक याविषयी पालकांशी चर्चा करावी.	
थीम/विषय	मी, माझे कुटुंब व परिसर	
ताईसाठी सूचना	बालकांना स्वत:च्या वस्तू ओळखण्यास व त्या व्यवस्थित ठेवण्यास प्रोत्साहन द्यावे.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-1** बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात. **C-1.3** वर्ग, शाळा व परिसर इत्यादी स्वच्छ आणि नीटनेटका ठेवतो. **अ) LO 1.3.1** स्वतःच्या वस्तू जसे की, पिशव्या, बाटल्या, बूट, रुमाल इत्यादी यांच्याबद्दल सजग असतो. **ब) LO 1.3.1** स्वतःच्या वस्तू योग्य जागी ठेवतो आणि योग्य जागेवरून घेतो. **क) LO 1.3.1** स्वतःच्या वस्तूंची चांगल्या प्रकारे देखभाल करतो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	अनुकरण, नीटनेटकेपणा, स्वावलंबन, वस्तूचे मूल्य जाणणे.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	बालकांना वस्तू ओळखता येतात का, त्या नीटनेटक्या ठेवतात का, वस्तूंची काळजी घेतात का, ठरलेल्या जागी व्यवस्थित ठेवतात का याचे निरीक्षण करावे. दिलेल्या सूचना समजतात का, हे पाहावे.	
आधारशिला कृती क्र. : 9.1 Exploring my Anganwadi Centre		
उपक्रमाचे नाव	वस्तू जागेवर ठेवूया.	
उपक्रमाला लागणारे साहित्य	अंगणवाडीत सर्वसाधारणपणे असणारे साहित्य : बाहुली, भातुकली गोष्टींची पुस्तके, चित्रकार्डे इत्यादी.	

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr>
<td>• बालके वर्गात वापरत असणाऱ्या वस्तूंच्या जागा ठरवाव्या आणि त्या ठिकाणी स्टिकर/चित्रे लावून बालकांना त्याची ओळख करून द्यावी.
उदाहरणार्थ, खेळणी, पुस्तके, पाण्याची बाटली इत्यादी ठेवण्याच्या जागा.
• रोज वर्ग आवरण्याच्या कामात बालकांना सामावून घ्यावे.</td>
<td>• अंगणवाडीमध्ये बाहुलीघर, वाचन कोपरा, कलेचा कोपरा असे कोपरे तयार करावेत. प्रत्येक कोपऱ्यामध्ये योग्य त्या वस्तू ठेवाव्यात. उदाहरणार्थ, बाहुलीघरामध्ये भातुकली, वाचन कोपऱ्यांमध्ये पुस्तके व चित्रकार्डे.
• बालकांना अंगणवाडीतील ताईची भूमिका देऊन त्याप्रमाणे अभिनय करण्यास प्रोत्साहन द्यावे. अंगणवाडीमध्ये दररोज ताई व मदतनीस ज्याप्रमाणे उपक्रम घेतात तशी नक्कल करण्यास बालकांना प्रोत्साहन द्यावे.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td>
<td>• बालके वर्गात वापरत असणाऱ्या वस्तूंच्या जागा ठरवाव्या आणि त्या ठिकाणी स्टिकर/चित्रे लावून बालकांना त्याची ओळख करून द्यावी.
• बालकांना अंगणवाडीचे चित्र काढण्यास सांगावे व तिथे रोज काय काय होते, याबाबत चर्चा करून बालकांना त्याबद्दल स्वलिपीमध्ये लिहिण्यास सांगावे.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td>
</tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">अन्नमय व मनोमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">रोज वर्गात आल्यावर, जेवणानंतर ताईने प्रत्येक बालकाकडून वरील कृती करून घ्यावी. उदाहरणार्थ, खेळणी ठेवण्याची जागा, पुस्तके ठेवण्याची जागा इत्यादी.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">मी, माझे कुटुंब व परिसर, ऋतू (कपडे), वाहन (आकार)</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">बालकांना स्वतःच्या वस्तू ओळखण्यास व त्या व्यवस्थित ठेवण्यास प्रोत्साहन द्यावे.
पालकांच्या सहकार्याने घरीही बालकांना सवयी लावण्याबद्दल बोलावे.</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-1 बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात.
C-1.3 वर्ग, शाळा व परिसर इत्यादी स्वच्छ आणि नीटनेटका ठेवतो.
अ) LO 1.3.1 स्वतःच्या वस्तू जसे की, पिशव्या, बाटल्या, बूट, रुमाल इत्यादीबद्दल सजग असतो.
ब) LO 1.3.1 स्वतःच्या वस्तू योग्य जागी ठेवतो आणि योग्य जागेवरून घेतो.
क) LO 1.3.1 स्वतःच्या वस्तूंची चांगल्या प्रकारे देखभाल करतो.</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	• अनुकरण, स्वावलंबन, वस्तूचे मूल्य जाणणे, नीटनेटकेपणा	
निरीक्षण करावयाच्या बाबी	• बालकाला वस्तू ओळखता येते का, नीटनेटकी ठेवतो का, वस्तूंची काळजी घेतो का, ठरलेल्या जागी व्यवस्थित ठेवतो का याचे निरीक्षण करावे. • पालकांच्या सहकार्याने घरीही बालकांना सवयी लावण्याबाबत बोलावे.	
आधारशिला कृती क्र. : 10. Vegetables Around Us : Identify and name of vegetables.		
उपक्रमाचे नाव	खाण्यास योग्य व अयोग्य पदार्थ	
उपक्रमाला लागणारे साहित्य	फळे, पाणी, दूध, चित्रकार्डे, अन्नपदार्थांची चित्रकार्डे इत्यादी.	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
(आधी प्रत्यक्ष पदार्थ वापरावेत व संकल्पना समजल्यावर चित्रकार्डे वापरावी.) • विविध अन्नपदार्थ/त्यांची चित्रकार्डे बालकांचे डबे वर्गात मांडावेत. • बालकांना प्रत्येक पदार्थाचे नाव विचारून हा पदार्थ आपण खातो का, हे विचारावे. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	• बालकाला रोजच्या जेवणातील वेगवेगळ्या प्रकारच्या अन्न-पदार्थांचा प्रत्यक्ष वस्तू दाखवून, त्याची चव देऊन किंवा ते शक्य नसल्यास चित्रपत्त्यांच्या आधारे वस्तूचा परिचय द्यावा. उदाहरणार्थ, त्या पदार्थाचे नाव काय, तो पदार्थ कशापासून बनतो, तू कधी खातोस, तुला आवडतो का? इत्यादी. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	• ताईने बालकांना डब्यात रोज वेगवेगळे पदार्थ आणण्यास सांगावे. पोषक आहार मिळत असेल, तर पालकांना घरी पदार्थ करण्यास सांगावे. उदाहरणार्थ, पालेभाजी, डाळ/वरण/आमटी, भाकरी इत्यादी.
पंचकोश		
अन्नमय कोश		
विविधता	खाऊसंदर्भात काही बडबडगीते म्हणवून घ्यावीत.	
थीम/विषय	मी, माझे कुटुंब व परिसर, भाज्या व फळे, ऋतू, वाहन	
ताईसाठी सूचना	बालकांना त्यांच्या आवडीचे पदार्थ सांगण्यास सांगावे. त्या पदार्थांची माहिती विचारावी. आपल्याकडील अन्नपदार्थ दर्शविणारे चित्रकार्ड यांचा वापर करावा. बालकाने खाताना उजव्या हाताने खावे. एकच हात वापरावा, अन्न व्यवस्थित खावे याबाबत प्रात्यक्षिकातून त्यांना सजग करावे. • कृतिपुस्तिकेतील कृती करून घ्यावी.	

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-1 बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात.
C-1.1पोषक आहाराबाबत रुची आणि समज दर्शवतो व अन्नपदार्थ वाया घालवत नाही.
अ) LO 1.1.1.2 मोठ्यांच्या सूचनेप्रमाणे वेगवेगळे अन्नपदार्थ खाण्यास सुरुवात करतो व त्यांची नावे सांगतो.
ब) LO 1.1.1 मोठ्यांच्या मदतीने वेगवेगळे अन्नपदार्थ खातो (उदाहरणार्थ, धान्य, भाज्या, फळे, डाळी, शेंगा, सुकामेवा (nuts), दुधाचे पदार्थ.
क) LO1.1.1 स्वतःहून विविध अन्नपदार्थ खातो.</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये</td><td colspan="2">• संभाषण, वर्गीकरण, विश्लेषण, निर्णयक्षमता, तर्कक्षमता, कार्यकारणसंबंध, सादरीकरण, अभिनय.</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">• खाण्यायोग्य आणि खाण्यायोग्य नसलेल्या वस्तू वेगळ्या ओळखू शकतात का?
• बालके त्यांच्या पोषणास आवश्यक सर्व पदार्थ, सर्व चवी असलेले पदार्थ व्यवस्थित खातात का?
• बालके त्यांच्या पोषणास आवश्यक सर्व पदार्थ, सर्व चवी असलेले पदार्थ व्यवस्थित खातात का?</td></tr>
<tr><td colspan="3">आधारशिला कृती क्र. : 10.1 Vegetables Around Us : Identify and name of vegetables.</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">काय खातो; काय पितो</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">विविध अन्नपदार्थ, अन्नपदार्थांची चित्रकार्डे.</td></tr>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>(आधी प्रत्यक्ष पदार्थ वापरावेत व संकल्पना समजल्यावर चित्रकार्डे वापरावीत.)
• ताईने पदार्थाचे नाव सांगून बालकांना 'खातो, खातो', 'पितो, पितो' असे म्हणण्याचा खेळ घ्यावा. उदाहरणार्थ, भाजी–खातो खातो, पोळी – खातो खातो, पाणी – पितो पितो, दूध पितो पितो.</td><td>• ताईंनी बालकांना वर्तुळाकार बसवून खाण्यायोग्य आणि खाण्यायोग्य नसलेल्या पदार्थांची नावे प्रत्येक बालकाच्या कानात सांगावी.
• ही नावे ऐकल्यावर तो पदार्थ खाण्यायोग्य आहे किंवा नाही हे ठरवून बालकाने मोठ्याने पदार्थाचे नाव उच्चारावे आणि तो खाण्यास</td><td>• ताईंनी बालकांना काही पदार्थांची नावे सांगावी.
• खाण्यायोग्य पदार्थ असल्यास एक टाळी आणि खाण्यायोग्य नसल्यास दोन टाळ्या वाजवण्यास सांगावे.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
	योग्य की अयोग्य ते सांगावे आणि जागेवर जाऊन बसावे. • **खाऊचे वर्गीकरण :** फरशीवर एक चौकोन आखावा. त्याचे दोन भाग करावे. एका भागात खाण्यायोग्य पदार्थ ठेवण्यास सांगावे. दुसऱ्या भागात खाण्यास अयोग्य असणारे पदार्थ ठेवण्यास सांगावे.	
पंचकोश		
अन्नमय कोश		
विविधता	**खाऊचे नाटक :** बालकांना काही पदार्थ प्यावे लागतात, काही पदार्थ चावून खावे लागतात, काही पदार्थ चोखून खावे लागतात. पदार्थांच्या खाण्याबाबतची विविधता बालकांना मूकाभिनयातून दर्शवावी. मूकाभिनयाद्वारे हे गमतीदार सादरीकरण करून घ्यावे.	
थीम/विषय	मी, माझे कुटुंब व परिसर, भाज्या व फळे, ऋतू	
ताईसाठी सूचना	बालकांना त्यांच्या आवडीचे पदार्थ सांगण्यास सांगावे. त्या पदार्थांची माहिती विचारावी. बालकाने खाताना उजव्या हाताने खावे. खाण्यासाठी एकच हात वापरावा. याबाबत प्रात्यक्षिकातून सजग करावे.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-1** बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात. **C-1.1** पोषक आहाराबाबत रुची आणि समज दर्शवतात व अन्नपदार्थ वाया घालवत नाहीत. **अ) LO 1.1.1.2** मोठ्यांच्या सूचनेप्रमाणे वेगवेगळे अन्नपदार्थ खाण्यास सुरुवात करतो व त्यांची नावे सांगतो. **ब) LO 1.1.1** मोठ्यांच्या मदतीने वेगवेगळे अन्नपदार्थ खातो. (उदाहरणार्थ, धान्य, भाज्या, फळे, डाळी, शेंगा, सुकामेवा (nuts), दुधाचे पदार्थ इत्यादी.) **क) LO1.1.1** स्वतःहून विविध अन्नपदार्थ खातो.	

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये</td><td colspan="2">• संभाषण, वर्गीकरण, विश्लेषण, निर्णयक्षमता, तर्कक्षमता, कार्यकारणसंबंध, सादरीकरण, अभिनय.</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">• खाण्यायोग्य आणि खाण्यायोग्य नसलेल्या वस्तू वेगळ्या ओळखू शकतो का?</td></tr>
<tr><td colspan="3">आधारशिला कृती क्र. : 10.2 Vegetables Around Us : Identify and name of vegetables.</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">भाज्या ओळखूया आणि खाऊया.</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">प्रत्यक्ष वेगवेगळ्या भाज्या आणि भाज्यांची चित्रे.</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td>कृती १
• बालकांना वेगवेगळ्या भाज्या दाखवून, त्यांची नावे सांगावी.
कृती २
• बालकांना वेगवेगळ्या भाज्या दाखवून त्यांच्या घरी कोणकोणत्या भाज्या करतात, त्यांना त्यातल्या कोणत्या भाज्या आवडतात ते विचारावे.</td><td>कृती १
• कांदे व बटाटे एकत्र करून त्यांना वेगवेगळे करण्यास सांगावे.
कृती २
• वेगवेगळ्या भाज्यांची चित्रे काढण्यास सांगावे.
कृती ३
• भाज्या खाणे कसे चांगले आहे, याबाबत गप्पा माराव्यात.
कृती ४
• भाज्यांचे रंगाप्रमाणे, आकाराप्रमाणे वर्गीकरण करण्यास सांगावे.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td><td>कृती १ :
• पालेभाजी, शेंगाभाजी, फळभाजी असे भाज्यांचे प्रकार सांगून त्यांची चित्रे देऊन वर्गीकरण करण्यास सांगावे.</td></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td>अन्नमय कोश</td><td colspan="2">अन्नमय, प्राणमय व विज्ञानमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">• बालकांना एक दिवस भाज्यांचे वेगवेगळे प्रकार – रंगाप्रमाणे, प्रकाराप्रमाणे डब्यात आणायला सांगावे.
• बालकांना भाजी बाजारात किंवा मळ्यात घेऊन जावे आणि भाज्यांचे निरीक्षण करण्यास सांगावे.
• ऋतुनुसार कोणत्या भाज्या खातात ते सांगावे.</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
थीम/विषय	भाज्या व फळे	
ताईसाठी सूचना	बालकांना त्यांच्या आवडीचा पदार्थ सांगण्यास सांगावे. त्या पदार्थाची माहिती विचारावी. खाताना उजव्या हाताने खावे. एकच हात वापरावा. याबाबत प्रात्यक्षिकातून बालकांना सजग करावे.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-1** बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात. **C-1.1** पोषक आहाराबाबत रुची आणि समज दर्शवतात व अन्नपदार्थ वाया घालवत नाहीत. **अ) LO-1.1.1.2** मोठ्यांच्या सूचनेप्रमाणे वेगवेगळे अन्नपदार्थ खाण्यास सुरुवात करतो व त्यांची नावे सांगतो. **ब) LO-1.1.1** मोठ्यांच्या मदतीने वेगवेगळे अन्नपदार्थ खातो. (उदाहरणार्थ धान्य, भाज्या, फळे, डाळी, शेंगा, सुकामेवा (nuts), दुधाचे पदार्थ.) **क) LO-1.1.1** स्वतःहून विविध अन्नपदार्थ खातो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	• निरीक्षण संभाषण, वर्गीकरण, विश्लेषण, निर्णयक्षमता, तर्कक्षमता, कार्यकारणसंबंध, सादरीकरण, अभिनय.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	• बालके त्यांच्या पोषणास आवश्यक सर्व पदार्थ, सर्व चवी असलेले पदार्थ व्यवस्थित खातात का? • विविध ऋतूंमधील भाज्या खातो की, हे विचारावेत.	
आधारशिला कृती क्र. : 11. Let's Compare - Understand and Compare Basis Number, Length, Size, Weight and Volume		
उपक्रमाचे नाव	लहान मोठे समजून घेऊया.	
उपक्रमाला लागणारे साहित्य		
• (लहान-मोठ्या) अशा तीन वस्तू (ताटे, चमचे, खडू, चेंडू, फळे, बशा, वाट्या इत्यादी).		• लहान-मोठे चेंडू पाचचा सेट, एकात एक बसू शकणाऱ्या पाच वाट्या, एकात एक बसणारी पाच पातेली. अशा प्रकारची चित्रकार्डे.

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
• ताईने बालकांना आकाराने (लहान–मोठ्या) अशा वस्तू (चमचे, चेंडू, फळे, बशा, वाट्या इत्यादी) हाताळण्यास द्याव्या. • बालकांना या वस्तूंचे निरीक्षण करण्यास सांगावे. • एकसारख्या वस्तूच्या जोड्या (चमचे–चमचे, वाट्या–वाट्या) लावण्यास सांगावे. • जोडीत लहान काय, मोठे काय हे विचारावे. (लहान चमचा – मोठा चमचा) **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	• लहान–मोठे क्रमवारिता : ताईने बालकांना आकाराने (लहान–मोठ्या) तीन वस्तू (ताटे, चमचे, खडू, चेंडू, फळे, बशा, वाट्या इत्यादी) हाताळण्यास द्याव्या. • बालकांना या वस्तूंचे निरीक्षण करण्यास सांगावे. • एकसारख्या वस्तूंचा क्रम (मोठी ताटली, माध्यम ताटली आणि छोटी ताटली.) लावण्यास सांगावे. जोडीत लहान–मोठे काय, त्यापेक्षा मोठे काय, हे विचारावे. (उदाहरणार्थ, मोठा चमचा, मध्यम चमचा, लहान चमचा याप्रमाणे). • मोठ्यापासून लहान क्रम लावता यायला लागल्यावर लहानापासून मोठा क्रम लावण्याचा सराव करून घ्यावा. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	वय वर्ष ३ ते ४ व ४ ते ५ या गटातील कृती सुरुवातीस करून घ्याव्यात. • ताईने बालकांना अर्धवर्तुळात बसवावे. बालकांना एकात एक बसणाऱ्या पाच वाट्या द्याव्यात. बालकांच्या डाव्या हाताला जमिनीवर एक रेष काढावी. (लेखन–वाचनाची दिशेनुसार) बालकांना वस्तू मोठी ते लहान या क्रमाने ठेवायला सांगाव्या. प्रत्येक बालकाला संधी द्यावी. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**
पंचकोश		
विज्ञानमय कोश		
विविधता	लहान–मोठ्या अशा वस्तू दाखवून तुलना करावी.	
थीम/विषय	मी, माझे कुटुंब, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू , प्राणी (पाळीव व जंगलातील), वाहन	
ताईसाठी सूचना	प्रत्यक्ष वस्तू देऊन संकल्पना स्पष्ट करा. कृतिपुस्तिकेतील कृती करून घ्यावी.	

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-8 बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात.
C-8.9लगतच्या परिसरातील वस्तूंची लांबी, वजन आणि आकारमानानुसार साधी मोजमापे करण्यासाठी साधन व घटक निवडतो.
अ) LO 8.9.2 कविता आणि कथांद्वारे वजन संकल्पना व्यक्त करण्यासाठी शब्दसंग्रह वापरतो.
ब) LO 8.9.2 दोन वस्तूंची तुलना त्यांच्या वजनाच्या सदंर्भात करतो. च्या पेक्षा जड, च्या पेक्षा हलका.
क) LO 8.9.2 तीन वस्तूंची तुलना त्यांच्या वजनाच्या सदंर्भात करतात. सर्वांत जड सर्वांत हलके.</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये</td><td colspan="2">• तुलनात्मक शब्दसंग्रह, तार्किक विचारशक्ती.</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">बालक वस्तूची तुलना कशी करते हे पाहावे. बालकांना काही मुक्त प्रश्न विचारावेत. जसे की, तुला हे कसे माहीत? तू हे कसे ठरवले? या वस्तू मोजण्यासाठी आपण आणखी काय वापरू शकतो?</td></tr>
<tr><td colspan="3">आधारशिला कृती क्र. : 11.1 Let's Compare - Understand and Compare Basis Number, Length, Size, Weight and Volume</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">लांब-आखूड समजून घेऊया.</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य :</td><td colspan="2">• चमचे, शेंगा, काड्या, पेन्सिल, दोरी, खडू.
• वजनाच्या वस्तू - जड, हलक्या, कापूस, ठोकळे, माती, वाळू, कापड.</td></tr>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>ताईने बालकांना लांब-आखूड अशा वस्तू (चमचे, शेंगा, काड्या इत्यादी) हाताळण्यास द्याव्या.
कृती १
• बालकांना या वस्तूंचे निरीक्षण करण्यास सांगावे. एकसारख्या वस्तूंच्या जोड्या (चमचे-चमचे, शेंगा-शेंगा, काड्या-काड्या) लावण्यास सांगावे.</td><td>लांब-आखूड क्रमवारिता :
कृती १
• ताईने बालकांना लांब - आखूड अशा तीन वस्तू (चमचे, शेंगा, काड्या, पेन्सिल, खडू इत्यादी) हाताळण्यास द्याव्या.
• बालकांना या वस्तूंचे निरीक्षण करण्यास सांगावे एकसारख्या वस्तू क्रमाने (मोठ्यापासून लहान अशा क्रमाने लावण्यास सांगावे.</td><td>ताईने बालकांना पाच वस्तूंमध्ये तुलना करण्यास सांगावे.
हलके-जड क्रमावारिता :
कृती १
• तुलनात्मक शब्दसंग्रहाचा परिचय करून द्यावा. हळूहळू हा शब्दसंग्रह विकसित करावा. जसे : सर्वांत आखूड, सर्वांत लांब.</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
कृती २ • त्या वस्तू एका शेजारी एक मांडण्यास सांगावे. जोडीत लांब काय, आखूड काय हे विचारावे. (उदाहरणार्थ हिरवी शेंग, लांब शेंग, पिवळी शेंग, आखूड शेंग.) **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	कृती २ • जोडीत लांब काय, आखूड काय हे विचारावे. हाच क्रम उलट घ्यावा. याप्रमाणे योग्य तेथे मदत करावी. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	कृती २ • बालकांना पाच वस्तूंमध्ये वरील प्रमाणे तुलना करण्यास संधी, प्रोत्साहन द्यावे. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**

पंचकोश	
विज्ञानमय कोश	
विविधता	लांब–आखूड अशा वस्तू दाखवून तुलना घ्याव्यात.
थीम/विषय	भाज्या व फळे, वाहन
ताईसाठी सूचना	लांब–आखूड या संकल्पनेची क्रमाक्रमाने ओळख करून द्या. प्रत्यक्ष वस्तू देऊन संकल्पना स्पष्ट करा. यासंदर्भातील वयोगटनिहाय कृतिपत्रिका सोडवून घ्याव्यात.
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-8** बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात. **C-8.9** परिसरातील वस्तूंची लांबी, वजन आणि आकारमानानुसार साधी मोजमापे करण्यासाठी साधन व घटक निवडतो. **अ) LO 8.9.1** कविता आणि कथांद्वारे लांबी व्यक्त करण्यासाठी शब्दसंग्रह वापरतो. (लांबी, रुंदी, उंची, अंतर) **ब) LO 8.9.1** दोन वस्तूंच्या लांबीच्या सदंर्भात तुलना करतो. च्या पेक्षा लहान, च्यापेक्षा उंच, च्यापेक्षा आखूड. **क) LO 8.9.2** तीन वस्तूंची त्यांच्या लांबीच्या दृष्टीने तुलना करतो. सर्वांत लांब, सर्वांत लहान, सर्वांत उंच, सर्वांत आखूड.
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	तुलनात्मक शब्द्संग्रह विकास, तार्किक विचारशक्ती.
निरीक्षण करावयाच्या बाबी	बालक वस्तूंची तुलना कशी करतात ते पाहावे. बालकांना काही मुक्त प्रश्न विचारावेत. जसे की, तुला हे कसे माहीत? तू हे कसे ठरवले? या वस्तू मोजण्यासाठी आपण आणखी काय वापरू शकतो?

<table>
<tr><th colspan="3">आधारशिला कृती क्र. : 11.2. Let's Compare : Understand and compare Basis Number, Length, Size, Weight, Volume</th></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">उंच-बुटका समजून घेऊया.</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">कागद, तेली खडू</td></tr>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>• ताईने बालकांना (उंच-बुटका) उंच-बुटका अशा दोन, तीन बालकांना उभे करावे. यातील उंच बालकाला पुढे करावे. इतर बालकांना हा उंच आहे, हे सांगावे.
• दुसऱ्या बालकाला पुढे करावे आणि सांगावे, हा बुटका आहे. असे करून वर्गातील सगळ्या बालकांना उंच आणि बुटका याप्रमाणे उभे करून त्यातील फरक सांगावा. घरात उंच कोण कोण आहे हे विचारावे.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td><td>• ३ ते ४ वर्षे या वयोगटांना दिलेली कृती घ्यावी. परिसरात उंच-बुटके काय काय दिसते, हे बघण्यासाठी वर्गाबाहेर न्यावे. परिसरातील झाडे दाखवावी.
• त्यामध्ये उंच झाडे आणि बुटकी झाडे दाखवावी.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td><td>• ३ ते ४, ४ ते ५ या वयोगटांना दिलेल्या कृती घ्याव्या. परिसरात उंच-बुटके काय काय दिसते हे बघण्यासाठी वर्गाबाहेर न्यावे.
• परिसरातील झाडे दाखवावी त्यामध्ये कोणती झाडे उंच आणि कोणती बुटकी आहेत, हे विचारावे.
• वर्गात आल्यावर त्याचे उंच-बुटके अजून काय काय असते हे विचारावे आणि चित्र काढण्यास द्यावे. (इमारत, झाडे, मुले अशी चित्रे)
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td></tr>
<tr><th colspan="3">पंचकोश</th></tr>
<tr><td colspan="3" align="center">विज्ञानमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">उंच, बुटका, अशा वस्तू दाखवून तुलना करावी.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">मी, माझे कुटुंब व परिसर वनस्पती (फुले, शेती, रंग), प्राणी (पाळीव व जंगलातील)</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">उंच-बुटका या संकल्पनेची क्रमाक्रमाने ओळख करून द्या.
प्रत्यक्ष वस्तू देऊन संकल्पना स्पष्ट करा. यासंदर्भातील वयोगटनिहाय कृतिपत्रिका सोडवून घ्याव्यात.</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-8 बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात.
C-8.9 लगतच्या परिसरातील वस्तूंची लांबी, वजन आणि आकारमानानुसार साधी मोजमापे करण्यासाठी साधन व घटक निवडतात.</td></tr>
</table>

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td></td><td colspan="2">अ) LO -8.9.1.1 कविता आणि कथांद्वारे लांबी व्यक्त करण्यासाठी शब्दसंग्रह वापरतो. (लांबी, रुंदी, उंची, अंतर)
ब) LO -8.9.1.1 दोन वस्तूंच्या लांबीच्या सदंर्भात तुलना करतो. च्या पेक्षा लहान, च्या पेक्षा उंच, च्या पेक्षा आखूड.
क) LO -8.9.1.1 तीन वस्तूंची त्यांच्या लांबीच्या दृष्टीने तुलना करतो. सर्वांत लांब, सर्वांत लहान, सर्वांत उंच, सर्वांत आखूड</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये</td><td colspan="2">तुलना करता येणे. तुलनात्मक शब्दसंग्रह विकसित करणे, तार्किक विचारशक्ती.</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">बालके वस्तूंची तुलना कशी करते हे पाहावे. बालकांना काही मुक्त प्रश्न विचारावेत. जसे की, तुला हे कसे माहीत? तू हे कसे ठरवले? या वस्तू मोजण्यासाठी आपण आणखी काय वापरू शकतो?</td></tr>
<tr><td colspan="3">आधारशिला कृती क्र. : 11.3. Let's Compare: Understand and compare Basis Number, Length, Size, Weight, Volume</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">जड हलके समजून घेऊया.</td></tr>
<tr><td colspan="3">उपक्रमाला लागणारे साहित्य</td></tr>
<tr><td>• जड-हलक्या वजनाच्या वस्तू : स्पंज चेंडू, रबरी चेंडू, कापूस, दगड, फरशीचे तुकडे, कापड इत्यादी.</td><td colspan="2">• जड-हलक्या वजनाच्या पिशव्या, दोरा, वाळू, धान्य, माती, कापड, काड्या इत्यादी.</td></tr>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>• ताईने जड हलक्या वस्तू बालकांना हातळण्यास द्याव्या. उदाहरणार्थ, स्पंज चेंडू, रबरी चेंडू, कापूस, दगड, फरशीचे तुकडे, कापड इत्यादी बालकांना या सगळ्या वस्तू हातात द्याव्या.
• त्यातील जड काय आहे, ते सांगावे.
• हलके काय काय आहे, ते सांगावे. परिसरात अशा कोणत्या वस्तू आहेत का, हे शोधण्यास सांगावे.</td><td>सुरुवातीला वयोगट ३ ते ४ ची कृती घ्यावी. त्यानंतर पुढील कृती करून घ्यावी.
कृती :
• वेगवेगळ्या वजनाच्या पिशव्या तयार कराव्यात. वाळू २ पिशव्या, काड्या २ पिशव्या, दगड २ पिशव्या, कापूस २ पिशव्या, दोऱ्याच्या २ पिशव्या, धान्य २ पिशव्या, माती २ पिशव्या, बिया २ पिशव्या, दोन्ही पिशव्या सारख्याच वजनाच्या करायच्या.</td><td>वयोगट ३ ते ४, ५ ते ६ या वयोगटांच्या कृती आधी घ्याव्यात.
• ताईने बालकांना कमी-जास्त वजनाच्या पिशव्या द्याव्या. बालकांनी पिशवी हातात घेतल्यावर ती जड आहे की हलकी हे विचारावे. वाळू २ पिशव्या, काड्या २ पिशव्या, दगड २ पिशव्या, कापूस २ पिशव्या, दोऱ्याच्या २ पिशव्या, धान्य २ पिशव्या, माती २ पिशव्या, बिया २ पिशव्या यातील जड-हलक्या</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
• घरी असे जड–हलके काय आहे, ते शोधण्यास सांगावे त्यांची नावे दुसऱ्या दिवशी विचारावी. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	• बालकांना अर्धवर्तुळात बसवून त्यांना सारख्या वजनाच्या पिशव्यांच्या जोड्या लावण्यासाठी द्यायच्या. वाळू–वाळू, काड्या–काड्या, दगड–दगड अशा प्रकारे पिशव्या भरून हातात घ्याव्या आणि कोणती जड आहे कोणती हलकी आहे ते विचारावे. प्रत्येक बालकाला उपक्रमात सहभागी करून घ्यावे. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	पिशव्या वेगळ्या करून घ्याव्यात. • अशा प्रत्येक बालकाला उपक्रमात सहभागी करून घ्यावे परिसरातील जड–हलक्या वस्तू शोधण्यासाठी सांगावे.

पंचकोश	
विज्ञानमय कोश	
विविधता	परिसरातील जड–हलका अशा वस्तू दाखवून तुलना करावी.
थीम/विषय	भाज्या व फळे, प्राणी
ताईसाठी सूचना	जड–हलका या संकल्पनेची क्रमाक्रमाने ओळख करून द्यावी. प्रत्यक्ष वस्तू देऊन संकल्पना स्पष्ट करा. या संदर्भातील वयोगटनिहाय कृतिपत्रिका सोडवून घ्याव्यात.
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-8** बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात. **C-8.9** लगतच्या परिसरातील वस्तूंची लांबी, वजन आणि आकारमानानुसार साधी मोजमापे करण्यासाठी साधन व घटक निवडतो. **अ) LO 8.9.1.2** कविता आणि कथांद्वारे वजन संकल्पना व्यक्त करण्यासाठी शब्दसंग्रह वापरतो. **ब) LO 8.9.1.2** दोन वस्तूंची तुलना त्यांच्या वजनाच्या सदंर्भात करतो. च्यापेक्षाजड, च्यापेक्षा हलका. **क) LO 8.9.1.2** तीन वस्तूंची तुलना त्यांच्या वजनाच्या संदर्भात करतो. सर्वांत जड, सर्वांत हलका.
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	तुलना करता येणे. तुलनात्मक शब्दसंग्रह विकसित करणे, तार्किक विचारशक्ती.

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">बालके वस्तूंची तुलना कशी करतात हे पाहावे. बालकांना काही मुक्त प्रश्न विचारावेत. जसे की, तुम्हाला हे कसे माहीत? तुम्ही हे कसे ठरवले? या वस्तू मोजण्यासाठी आपण आणखी काय वापरू शकतो?</td></tr>
<tr><td colspan="3">आधारशिला कृती क्र. : 11. 4 Let's Compare : Understand and compare Basis Number, Length, Size, Weight, Volume</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">आकारमान ओळखूया.</td></tr>
<tr><td colspan="3">उपक्रमाला लागणारे साहित्य</td></tr>
<tr><td>• चमचे, मणी, काड्या, बिया, झाकण, बांगड्या, लाकडी ठोकळे.</td><td colspan="2">• वर्तुळ, त्रिकोण, चौकोन, लहान, मध्यम, मोठ्या आकाराचे तुकडे.</td></tr>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>• ताईने बालकांना अर्धवर्तुळाकार बसवावे.
• ताईने या गटातील बालकांना वस्तूंचे गट करण्यासाठी वेगवेगळ्या वस्तू द्याव्यात. चमचे, मणी, काड्या, बिया, झाकणी, बांगड्या, लाकडी ठोकळे.</td><td colspan="2">• आकारमान या संकल्पनेचा अध्ययन अनुभव देण्यासाठी
• ताईने प्रत्येक आकारासाठी एक फासा तयार करायचा आहे. एका फास्यावर वेगवेगळ्या रंगाचे व आकारमानाने लहान, मोठे वर्तुळ, मध्यम आकारमानाचे उदा. लहान आकारमानाचे लाल वर्तुळ, मोठ्या आकारमानाचे हिरवे वर्तुळ, मध्यम आकारमानाचे पिवळे वर्तुळ असे सर्व बाजूने काढावे. याचप्रमाणे चौकोन व त्रिकोण या आकारांसाठी देखील स्वतंत्र फासा तयार करून घ्यावा.

• ताईने पुठ्ठ्याचे, कार्डशीटचे, लग्नपत्रिकांचे, शुभेच्छापत्रांचे कडक कागद यांचे फास्यावर असलेल्या रंगाचे व आकारमानाचे वर्तुळ, त्रिकोण किंवा चौकोन असे तुकडे कापावेत. हे तुकडे किमान वर्गातील पटसंख्येइतके असावेत. त्यावर त्या त्या रंगाचे घोटीव कागद चिकटवावेत किंवा पोस्टर कलरने रंगवावेत.

• पूर्वतयारीनंतर ताईने बालकांबरोबर कृतीसाठी वर्तुळाकार बसावे. तयार केलेले सर्व तुकडे त्या वर्तुळामध्ये विखरून ठेवावेत.</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
	• प्रत्येक बालकाला हातात एक फासा घेऊन टाकायला द्यावा आणि त्यावर ज्या आकारमानाचे व रंगाचे चित्र आले असेल तो तुकडा त्याला उचलून स्वत:जवळ ठेवण्यास सांगावा. • फास्यावरील आकारांचे रंग व आकारमानाविषयी ताईने बालकांना माहिती द्यावी. • यानंतर बालकांना आपापल्या हातातील आकारांच्या तुकड्यांचे त्यांच्या आकारमानानुसार गट करून ठेवण्यास सांगावे. बालकांकडून आकारमानाप्रमाणे गट मांडून घ्यावे.	

पंचकोश	
विज्ञानमय कोश	
विविधता	लहान, मोठे, मध्यम आकारमान या विविध वस्तू वापरून समजावून सांगणे.
थीम/विषय	पाणी–पाऊस, प्राणी (पाळीव व जंगलातील)
ताईसाठी सूचना	आकारमान लहान, मध्यम, मोठा या संकल्पनेची क्रमाक्रमाने ओळख करून द्या. प्रत्यक्ष वस्तू देऊन संकल्पना स्पष्ट करा.
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-8** बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात. **C-8.9** लगतच्या परिसरातील वस्तूंची लांबी, वजन आणि आकारमानानुसार साधी मोजमापे करण्यासाठी साधन व घटक निवडतात. **ब) LO 8.9.3** आकारमान संकल्पना कविता/कथा यांच्याद्वारे व्यक्त करतो. **क)LO 8.9.3** दोन भांड्यांच्या आकारमानाची तुलना करतो. (उदा. पिंप, बादली, तांब्या)
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	तुलना करता येणे. तुलनात्मक शब्दसंग्रह विकसित करणे, तार्किक विचारशक्ती.
निरीक्षण करावयाच्या बाबी	बालके वस्तूंची तुलना कशी करतात हे पाहावे. बालकांना काही मुक्त प्रश्न विचारावेत. अजून कोठे अशा वस्तू सांगता येतात, याचे निरीक्षण करावे.
आधारशिला कृती क्र. : 12. Fruits Around Us : Identify and name fruits	
उपक्रमाचे नाव	भोवतालच्या फळांची नावे सांगूया.
उपक्रमाला लागणारे साहित्य	फळांची चित्रकार्डे

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
कृती १ • परिसरातील विविध फळांच्या चित्रांची मांडणी करावी. (सफरचंद, केळी, आंबा, संत्री यांची नावे सांगण्यास आणि ओळखण्यास बालकांना प्रोत्साहन द्यावे.)	**कृती १** • विविध फळांची चित्रे दाखवून त्यांची नावे, रंग, चव यांवर लक्ष केंद्रित करून चर्चा घडवून आणावी. **कृती २** • पूर्ण फळाचे चित्र आणि कापलेल्या फळाचे चित्र यांची जोडी लावण्यास द्यावी. **कृती ३** • फळे खाण्याचे फायदे आणि ते खाण्यापूर्वी फळे धुवून घेण्याचे महत्त्व यांवर चर्चा घडवून आणावी. • कोणती फळे सालीसकट खातो, कोणती फळे साल काढून खातो, कोणत्या फळामध्ये बी असते आणि केवढे असते यांवर चर्चा घडवून आणावी. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	**कृती १** • विविध फळांची चित्रे दाखवून त्याचे नाव, रंग, चव यांवर लक्ष केंद्रित करून चर्चा घडवून आणावी. **कृती २** • पूर्ण फळाचे चित्र आणि कापलेल्या फळाचे चित्र यांची जोडी लावण्यास द्यावी. **कृती ३** • फळे खाण्याचे करण्याचे फायदे आणि ते खाण्यापूर्वी फळे धुवून घेण्याचे महत्त्व यांवर चर्चा घडवून आणावी. • कोणत्या ऋतूमध्ये कोणती फळे मिळतात यांवर चर्चा घडवून आणावी.
पंचकोश		
अन्नमय कोश		
विविधता	बालकांना अंगणवाडीजवळील बाजारात घेऊन जावे. त्यांना विविध फळे पाहू द्या, निरीक्षण करू द्या, त्याचे आकार, रंग पाहू द्या. विविध भाज्यांचे सुद्धा निरीक्षण करण्यास सांगा. फळांना, भाज्यांना स्पर्श करून अनुभव घेण्यास प्रोत्साहन द्यावे.	
थीम/विषय	भाज्या व फळे	
ताईसाठी सूचना	विशेष गरजा असलेल्या बालकांना प्रत्यक्ष फळे दाखवून त्यांना स्पर्श करता येईल, अनुभवता येईल, अशी संधी द्यावी. आवश्यक तिथे गृहभाषेचा वापर करावा. बहुभाषेचा वापर आवश्यकतेप्रमाणे करावा.	

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-1** बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात. **C-1.1** पोषक आहाराबाबत रुची आणि समज दर्शवतो व अन्नपदार्थ वाया घालवत नाहीत. **अ) LO1.1.1.1.2** मोठ्यांच्या सूचनेप्रमाणे वेगवेगळे अन्नपदार्थ खाण्यास सुरुवात करतात व त्यांची नावे सांगतो. **ब) LO 1.1.1** मोठ्यांच्या मदतीने वेगवेगळे अन्नपदार्थ खातो. (उदाहरणार्थ धान्य, भाज्या, फळे, डाळी, शेंगा, सुकामेवा (nuts), दुधाचे पदार्थ.) **क) LO 1.1.1** स्वतःहून विविध अन्नपदार्थ खातो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	संभाषण कौशल्य, तार्किक विचार, निरीक्षण, वर्गीकरण, विश्लेषण, निर्णयक्षमता, अर्थकारण संबंध	
निरीक्षण करावयाच्या बाबी	कोणते बालक कृतिशील आहे, त्याचे भाषिक कौशल्य, शारीरिक हालचाली, आंतरक्रिया करण्याची पद्धत तसेच, दुकानदाराशी काय बोलते, याचे निरीक्षण ताईने करावे. बालके विविध ऋतूंमध्ये त्यांच्या पोषणास योग्य फळे खातात का? हे पाहावे.	
आधारशिला कृती क्र. : 13. Experiment with water : See what sinks, floats, dissolves, settels, changes colour etc.		
उपक्रमाचे नाव	पाण्यात काय विरघळते, चला पाहूया.	
उपक्रमाला लागणारे साहित्य	रंग, मीठ, साखर, पीठ, न विरघळणारे साहित्य, पारदर्शक डबा, ग्लास, पाणी, दगड, वाळू.	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
ताईने बालकांना छोट्या गटात पाण्याने भरलेले (डबा/ग्लास) पुरवावे. रंग, मीठ, साखर, पीठ, न विरघळणारे साहित्य हे वेगवेगळ्या ग्लास/डब्यातील पाण्यात टाकण्याची संधी लहान वयोगटातील बालकांना द्यावी. बालकांना काय विरघळेल व काय विरघळणार नाही याचा अंदाज बांधण्यास आणि एकमेकांना सांगण्यास प्रवृत्त करावे. विविध पदार्थ पाण्यात टाकल्यावर त्यात होणारे बदल काळजीपूर्वकसांगण्यास प्रोत्साहित करावे. बालकांना विविध पदार्थ पाण्यात टाकण्यास देऊन त्यांनी बांधलेले अंदाज तपासण्याची संधी द्यावी. विविध वस्तू देऊन पाण्यात टाकण्यास सांगावे व परिणामाचा अंदाज तपासण्यास संधी द्यावी व इतरही पदार्थांबरोबर प्रयोग करण्यास सांगावे.		
पंचकोश		
विज्ञानमय कोश		

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
विविधता	बालकांना काही ग्लासमध्ये पाणी द्यावे. विविध पदार्थ स्वतंत्रपणे पाण्यात टाकण्यास सांगून कोणती वस्तू विरघळण्यास जास्त वेळ लागतो, कोणत्या पदार्थास विरघळण्यासाठी कमी वेळ लागतो हे निरीक्षण करण्याची संधी द्यावी.	
थीम/विषय	पाऊस–पाणी	
ताईसाठी सूचना	विशेष गरजा असणाऱ्या बालकांना स्पर्श करण्यास, अनुभवण्यास विविध संधी उपलब्ध करून द्याव्या. विविध कृती करण्यास प्रोत्साहित करावे. बालकांना सुरक्षित वातावरण द्यावे. बालकांचे कौतुक करावे. छोटे छोटे प्रश्न विचारावे.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-7** बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात. **C-7.2** निसर्गाच्या निरीक्षणातून कार्यकारणभाव समजून घेऊन, तो दर्शविणारी साधी परिकल्पना मांडतात व त्याच्या स्पष्टीकरणाकरिता/पडताळणीकरिता निरीक्षणाचा आधार घेतो. **क) LO-7.2.1.1** एका वस्तूचा दुसऱ्या वस्तूवर होणारा परिणाम ओळखतो. (उदाहरणार्थ मीठ पाण्यात घातले तर ते विरघळेल, मी बर्फ उन्हात ठेवला तर तो वितळेल.)	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	भाषा कौशल्ये, तुलनात्मक शब्दसंग्रह वापरण्याचे संज्ञानात्मक कौशल्य पर्यावरणीय जागरूकता, जीवनकौशल्य	
निरीक्षण करावयाच्या बाबी	बालक कृतिशीलता, भाषिक कौशल्ये दाखवते, शारीरिक हालचाली, आंतरक्रिया करण्याची सहजता यांबाबत निरीक्षण करावे. कोणती वस्तू हलकी आहे, काय विरघळेल आणि पुढे काय होईल, असे का वाटते, यांसारख्या प्रश्नांना उत्तरे देताना बालक वापरत असलेल्या शब्दसंग्रहाचे निरीक्षण करा.	
आधारशिला कृती क्र. : 13.1 Experiment with Water: See what sinks, floats, dissolves, settles, changes colour etc.		
उपक्रमाचे नाव	पाण्यात काय तरंगते, चला पाहूया.	
उपक्रमाला लागणारे साहित्य :	मोठा टब भरून पाणी, कागद, दगड, बिया, झाडांची पाने, फुले, लाकडी ठोकळा, कापूस, खडू, काड्या, प्लॅस्टिक चेंडू, रबरी खेळणी,	

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td colspan="3">

• ताईने बालकांना रोज वापरात येणाऱ्या वस्तू आणि पाण्याने भरलेला टब द्यावा. एकेक वस्तू पाण्यात टाकण्यास मार्गदर्शन करावे. कागद, दगड, बिया, झाडांची पाने, फुले, लाकडी ठोकळा, कापूस, खडू, काड्या, प्लास्टिक चेंडू, रबरी खेळणी पाण्यात टाकल्यावर त्यामध्ये होणाऱ्या बदलांचे काळजीपूर्वक निरीक्षण करून एकमेकांना सांगण्यास प्रोत्साहित करावे.
• वयोगट ५ ते ६ वर्षातील बालकांना वस्तू पाण्यात टाकल्यावर बुडेल का तरंगेल याविषयी अंदाज बांधायला आणि प्रयोग करायला प्रोत्साहन द्यावे. तसेच यातील काही वस्तू का बुडाल्या किंवा तरंगल्या असतील, यांविषयी कारणे विचारावीत आणि संवाद साधावा.

</td></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">विज्ञानमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">बालकांना पाणी आणि साबण देऊन बुडबुडे करण्यास द्यावे, कागदी बोट पाण्यावर ठेवावी, ती तरंगत असताना त्यामध्ये दगड ठेवावा किंवा बोटीवर पाणी ओतावे. होणाऱ्या बदलांचे बालकांना निरीक्षण करण्यास सांगावे.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">पाणी–पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), वाहन</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">विशेष गरजा असणाऱ्या बालकांना स्पर्श करण्यास, अनुभवण्यास विविध संधी उपलब्ध करून द्याव्या. विविध कृती करण्यास प्रोत्साहित करावे. बालकांना सुरक्षित वातावरण द्यावे. बालकांचे कौतुक करावे. छोटे छोटे प्रश्न विचारावे.</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-7 बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात.
C-7.2 निसर्गाच्या निरीक्षणातून कार्यकारणभाव समजून घेऊन, तो दर्शविणारी साधी परिकल्पना मांडतात व त्याच्या स्पष्टीकरणाकरिता/पडताळणीकरिता निरीक्षणाचा आधार घेतो.
क) LO-7.2.1.1 एका वस्तूचा दुसऱ्यावर होणारा परिणाम ओळखतो. (उदाहरणार्थ, मीठ पाण्यात घातले तर ते विरघळेल, मी बर्फ उन्हात ठेवला तर तो वितळेल.)</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये</td><td colspan="2">भाषा कौशल्ये, तुलनात्मक शब्दसंग्रह वापरण्याचे संज्ञानात्मक कौशल्य पर्यावरणीय जागरूकता.</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">बालकांची कृतिशीलता, भाषिक कौशल्ये, शारीरिक हालचाली, आंतरक्रिया करण्याची सहजता याचे निरीक्षण करावे. कोणती वस्तू हलकी आहे? काय तरंगते आणि पुढे काय होईल? असे का वाटते? यांसारख्या प्रश्नांना उत्तरे देताना बालक वापरत असलेल्या शब्दसंग्रहाचे निरीक्षण करा.</td></tr>
</table>

आधारशिला कृती क्र. : 14. Colours and Shades : Identify, Create, Compare and Match

उपक्रमाचे नाव	रंग तयार करूया.	
उपक्रमाला लागणारे साहित्य :	परिसरात मिळणाऱ्या आणि घरात उपलब्ध असणाऱ्या लाल, निळ्या आणि पिवळ्या रंगाच्या वस्तू उदाहरणार्थ, टोमॅटो, हळद, रंगीत खडू, कागद, टॉर्च, लाल, निळा, पिवळा या रंगाचे जिलेटिन कागद, जलरंग, क्रेयोन.	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
• विशिष्ट रंगांचे रंग दिवस साजरे करावे. • प्रत्येक महिन्यात एक दिवस रंग दिवस साजरा करावा. • सर्वप्रथम ताईने कोणताही एका रंगाच्या बऱ्याच वस्तू जमा कराव्यात. त्या वस्तू दाखवून त्या रंगाचे नाव बालकांना सांगावे. आजूबाजूला त्या रंगाच्या कोणत्या वस्तू दिसत आहेत ते विचारावे. • वर उल्लेख केलेल्या रंगांच्या वस्तू दुसऱ्या दिवशी अंगणवाडीमध्ये घेऊन येण्यास सांगावे. अंगणवाडी ताईनेसुद्धा त्या रंगाच्या वस्तू आणून मांडाव्या. • साधारण १५ दिवस ही मांडणी करून रंगकोपरा तयार करावा. शक्य असल्यास बालकांना त्या रंगाचे कपडे घालून येण्यास सांगावे.	• प्रत्येक रंगाचे गडद आणि फिका अशा दोन रंग छटांची कार्डे घ्यावी. त्यानंतर बालकांना फिका, आणि गडद रंग कोणता ते सांगावे. • बालकांना दोन रंगछटांमधला फरक रंगकार्डांमधून कळायला लागल्यावर, फिका आणि गडद रंगाच्या वस्तू लावून दाखवाव्या व त्यातील फरक ओळखण्यास सांगावे. • बालके एकाच रंगाच्या दोन छटा ओळखायला लागल्यावर, क्रमाने फिका, मध्यम आणि गडद रंगाच्या वस्तू लावण्यास सांगावे. • रंग तयार करायला सांगावे. लाल + निळा, लाल + पिवळा **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	• मिश्र रंग : वेगवेगळ्या रंगाचे जिलेटीन पेपर टॉर्चच्या समोर धरून त्याचा जमिनीवर किंवा भिंतीवर प्रकाश पाडून वेगवेगळे रंग दाखवावे. • दोन रंगाचे जिलेटीन कागद एकत्र धरून तयार होणारा नवीन रंग कसा तयार होतो ते दाखवावे. (लाल + निळा, लाल + पिवळा, पिवळा + निळा) • तयार झालेल्या रंगछटा घर/ अंगणवाडी परिसरात कोठे दिसतात त्याचा शोध घेण्यास सांगावे.
पंचकोश		
आनंदमय कोश		
विविधता	लाल, पिवळा, निळा, हिरवा, केशरी, गुलाबी इत्यादी रंगांच्या वेगवेगळ्या छटा दाखवाव्यात, रंगपंचमी, दिवाळी रांगोळी यात वापरले जाणारे रंग	
थीम/विषय	पाणी-पाऊस, वनस्पती (फुले, शेती, रंग)	
ताईसाठी सूचना	या संदर्भात वयोगटनिहाय कृतिपत्रिका सोडवून घ्याव्यात.	

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-2** बालके ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात. **C-2.1** आकार, रंग आणि त्याच्या छटा यांच्यामधील फरक ओळखतात. **अ) LO 2.1.1** मूळ प्राथमिक रंग (लाल, निळा आणि पिवळा) आणि परिसरातील इतर रंग यांच्यातील फरक ओळखतो आणि त्यांची नावे सांगतो. (काळा, पांढरा तपकिरी) **ब) LO 2.1.1** मूळ प्राथमिक आणि दुय्यम रंगांच्या छटा यातील फरक ओळखतो. फिकट निळा, गडद निळा, फिकट हिरवा, गडद हिरवा. **क) LO 2.1.1** दोन रंग मिसळल्यावर/एकत्र केल्यावर कोणता रंग तयार होईल, याचा अंदाज लावण्याचा प्रयत्न करतो. निळा आणि पिवळा एकत्र केल्यावर हिरवा दिसतो. पांढरा आणि लाल एकत्र केल्यावर गुलाबी दिसतो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	रंग ओळखता येणे, रंगांनुसार त्याच्या छटा ओळखणे.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	रंग ओळखता येतात का? याचे निरीक्षण करावे.	
आधारशिला कृती क्र. : 15. Explore Technology : Identify, Tools and Understand Uses		
उपक्रमाचे नाव	तंत्रज्ञान समजून घेऊया.	
उपक्रमाला लागणारे साहित्य :	तंत्रज्ञान साधनाची चित्रकार्डे व कटआउट	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
• ताईने बालकांना रिमोट, टीव्ही, मिक्सर, फ्रीज यांची चित्रकार्ड्स दाखवून त्या वस्तू ओळखण्यास व त्याचे नाव सांगण्यास सांगावे.	• ताईने बालकांना विविध तंत्रज्ञान साधने चित्रकार्ड्स दाखवावी आणि त्याची नावे ओळखण्यास सांगावे. • त्याच्या वापराबाबत, तसेच या साधनांचे फायदे, तोटे सुरक्षेबाबत प्रश्न विचारावेत. • प्रत्येक साधनाचे कार्डबोर्डचे कटआउट तयार करावेत. बालकांना त्यांच्या परिसरात ते कसे वापरतात याबाबत सादरीकरण करण्यास प्रोत्साहन द्यावे. • ताईने मोबाइल, स्मार्ट टीव्ही, संगणक यांची चित्रे किंवा ते प्रत्यक्ष दाखवून, त्यांचा वापर करण्याची पद्धत सांगून, त्यांच्या उपयोगांविषयी चर्चा करावी. • यापैकी शक्य ती साधने बालकांना हाताळण्यास द्या.	

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
पंचकोश		
विज्ञानमय कोश		
विविधता	बालकांना साधनासंबंधी कोडे सोडवण्यास देता येईल. बालकांना क्ले, कागद, कार्डबोर्ड किंवा अन्य साधनांपासून अशी साधने करण्यास द्या. त्यांना त्यांच्या कल्पनाशक्तीनुसार वस्तू तयार करू द्या. त्यांचे कौतुक करा. प्रोत्साहन द्या. त्यांनी केलेले काम वर्गात इतरांना दाखवा.	
थीम/विषय	मी, माझे कुटुंब व परिसर	
ताईसाठी सूचना	• तंत्रज्ञान साधनांचे कटआऊट तयार करावे. • तंत्रज्ञानाचा अति वापर धोकादायक कसा? हे सांगावे, मोठ्या लोकांबरोबर बसून वापरावे.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-7** बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात. **C-7.3** दैनंदिन जीवनातील परिस्थितीमध्ये व अध्ययन करण्यासाठी सुयोग्य साधने व तंत्रज्ञान वापरतो. **ब) LO 7.3.1.2** डिजिटल व दृक्श्राव्य साहित्य वापरताना लक्ष देतो. **क)LO 7.3.1.2** शिक्षकांच्या मदतीने डिजिटल तंत्रज्ञान जसे की, स्मार्ट फोन व टॅब यांचा वापर करतो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	कृतीमध्ये सहभागी होण्याची सहजता, भाषिक कौशल्य.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	बालकाची कृतीमध्ये सहभागी होण्याची सहजता, भाषिक कौशल्य, आंतरक्रिया करण्याची पद्धती याचे निरीक्षण करा. ते कसे संभाषण करते, संवाद साधते याचेही निरीक्षण करा.	
आधारशिला कृती क्र. : 16. Fun with Colours : Sort, Match, Mix and Create Colours		
उपक्रमाचे नाव	रंगासोबत खेळूया.	
उपक्रमाला लागणारे साहित्य :	रंग, रंगाचे ब्रश, प्लेट, मूळ रंग चित्रकार्डे, वस्तूंची चित्रकार्डे, रंगीत खेळणी, विविध फळांची चित्रकार्डे, पालेभाज्यांची चित्रकार्डे.	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
• ताईने सारख्या रंगाच्या वस्तू मांडाव्या आणि बालकांना त्याचे नाव सांगण्यास सांगावे, रंगाप्रमाणे जोडी आणि	**कृती १** • बालकांचे छोटे छोटे गट तयार करावे. त्यांना विविध रंग देऊन त्यांचे मिश्रण करण्यास सांगावे. दोन किंवा तीन रंग एकत्र केल्यावर होणाऱ्या बदलांचे निरीक्षण करण्यास आणि कथन करण्यास प्रोत्साहन द्यावे.	

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
वेगळे करण्यास द्यावे. • मूळ रंगाची कार्डे बालकांना दाखवावी. रंगाप्रमाणे आजूबाजूला असणाऱ्या वस्तू शोधण्यास सांगावे.	**कृती २** • नवीन तयार झालेल्या रंगासारख्या दिसणाऱ्या वस्तू सांगण्यास, ओळखण्यास प्रोत्साहन द्यावे. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	
पंचकोश		
आनंदमय कोश		
विविधता	डफली किंवा खंजिरी वाजवून रंग, नाव याचा खेळ घ्यावा. संबंधित रंगकोपरा शोधण्यास किंवा वस्तू शोधण्यास प्रोत्साहित करावे, आकाश निरीक्षण करण्यास सांगावे.	
थीम/विषय	मी, माझे कुटुंब व परिसर, पाणी–पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, वाहन	
ताईसाठी सूचना	–	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-2** बालके ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात. **C-2.1** आकार, रंग आणि त्याच्या छटा यांच्यामधील फरक ओळखतो. **अ) LO 2.1.1** मूळ रंग (लाल, निळा आणि पिवळा) आणि परिसरातील इतर रंग यांच्यातील फरक ओळखतो आणि त्यांची नावे सांगतो. (काळा, पांढरा, तपकिरी) **ब) LO 2.1.1** मूळ आणि दुय्यम रंगांच्या छटा यांतील फरक ओळखतो. फिकट निळा, गडद निळा, फिकट हिरवा, गडद हिरवा. **क) LO 2.1.1** दोन रंग मिसळल्यावर/एकत्र केल्यावर कोणता रंग तयार होईल याचा अंदाज लावण्याचा प्रयत्न करतो. निळा आणि पिवळा एकत्र केल्यावर हिरवा रंग तयार होतो. पांढरा आणि लाल एकत्र केल्यावर गुलाबी रंग तयार होतो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	भाषा कौशल्य तुलनात्मक शब्दसंग्रह.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	रंगांची नावे सांगता येतात का, दोन रंग मिसळल्यावर तयार होणाऱ्या रंगाचे नाव सांगता येते का ते पाहावे.	

<table>
<tr><th colspan="3">आधारशिला कृती क्र. : 17. Find the Odd Picture/Object Out</th></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">पाहुणा ओळखूया.</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य :</td><td colspan="2">वस्तू, प्राणी, पक्षी, यांची चित्रकार्डे</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td>कृती १
• बालकांपुढे चार सारखी चित्रे आणि एक वेगळे चित्र असलेली चित्रपट्टी ठेवावी. उदा. ३ वेगळ्या रंगाचे चेंडू आणि बॅट. तीन हिरवी पाने आणि एक पिवळे पान, एका प्रकारची तीन फुले आणि एक वेगळे फूल इत्यादी.
कृती २
• बालकाला या चित्रातील वेगळे काय आहे, ते ओळखण्यास सांगावे. बॅट, पिवळे पान, वेगळे फूल हे वेगळे ओळखता आले नाही, तर त्याचे कारण समजावून द्यावे.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td><td colspan="2">कृती १
• बालकांपुढे चार सारखी चित्रे आणि एक वेगळे चित्र असलेली चित्रपट्टी ठेवावी. उदाहरणार्थ, तीन एका रंगाच्या वस्तू आणि एक वेगळ्या रंगाची वस्तू, तीन प्राणी आणि एक प्राण्याचे पिल्लू, तीन जंगली प्राणी आणि एक पाळीव प्राणी, तीन एका लांबीच्या पेन्सिली आणि एक आखूड किंवा जास्त लांब पेन्सिल, तीन स्वयंपाक घरातल्या वस्तू आणि एक वेगळी वस्तू खेळणे इत्यादी.
कृती २
• बालकाला या चित्रातील वेगळे काय आहे ते ओळखण्यास सांगावे. वेगळे चित्र ओळखता आले नाही, तर त्याचे कारण समजावून द्यावे.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">विज्ञानमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">वस्तूंची अनेक वैशिष्ट्ये वापरून विविधता आणता येते.
• ३ मुली – १ मुलगा किंवा ३ मुलगे – १ मुलगी
• ३ रस्त्यावरची वाहने आणि एक पाण्यातील वाहन
• ३ लहान मुले आणि एक मोठा माणूस.
• रंगानुसार फुले वापरून पाहुणा ओळखूया.
• कमीजास्त पाकळ्या असलेली फुले यातील पाहुणा ओळखूया.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">मी, माझे कुटुंब व परिसर, पाणी–पाऊस, भाज्या व फळे, प्राणी (पाळीव व जंगलातील)</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
ताईसाठी सूचना	प्रकल्पनिहाय चित्रकार्डे किंवा प्रत्यक्ष वस्तू दाखवून पाहुणा ओळखण्यास सांगावे तसेच त्यांचे स्पष्टीकरण करण्यास सांगावे. पुरेसा सराव झाल्यावर यावर आधारित प्रकल्पनिहाय कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-7** बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात. **C-7.1** वेगवेगळ्या वर्गातील/गटातील वस्तूंमधील फरक व वस्तूंचा एकमेकाशी संबंध यांचे निरीक्षण करतो व समजून घेतो. **अ) LO-7.1.3.1** गटात आणि श्रेणीबद्ध संबंध ओळखतो. **अ) LO-7.1.3.2** गटात आणि गटांमध्ये तुलना करतो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	वर्गीकरण, वस्तूंचे गणुधर्म व गुणधर्मानुसार वस्तूंची गटनिर्मिती, वस्तूंची अनेक वैशिष्ट्ये, जीवनकौशल्य.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	बालकांच्या तुलनेच्या विविधतेचे निरीक्षण करावे, बालकांना पाहुणा का आहे, त्याचे सकारण सांगता येते का याचे निरीक्षण करता येते का हे पाहणे.	
आधारशिला कृती क्र. : 18. Pattern Making : Recognize, Repeat, Extend and Create Patterns.		
उपक्रमाचे नाव	अवतीभोवती पाहू बोलू...	
उपक्रमाला लागणारे साहित्य :	लाल, पिवळा, हिरवा, रंगांचे ठोकळे, खडे, पाने, मणी, ग्लास, चमचे.	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
कृती : आकृतिबंध • बालकांसमोर लाल, पिवळा, हिरवा अशा रंगांचे ठोकळे मांडावे. • ताईने एक हिरवा ठोकळा त्यापुढे एक लाल ठोकळा अशी मांडणी ३-४ वेळा सलग करून दाखवावी.  याप्रमाणे इतर रंगांचे ठोकळे घेऊन बालकांना त्याप्रमाणे पुढे मांडणी करण्यास सांगावे. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	**कृती :** आकृतिबंध • बालकांसमोर खडे, पाने असे साहित्य मांडून ठेवावे. • ताईने दोन पाने त्यापुढे एक खडा अशी मांडणी ३-४ वेळा सलग करून दाखवावी.  नंतर ही रचना योग्यप्रकारे वस्तू मांडून पुढे नेण्यास सांगावी.	**कृती :** आकृतिबंध • बालकांसमोर ग्लास, चमचे, मणी अशा वस्तू मांडाव्या. • ताईने ३ मणी-ग्लास-चमचा अशी मांडणी ३-४ वेळा सलग करून दाखवावी. यानंतर ३ मणी मांडून बालकांना आता पुढे काय मांडायचे ते विचारावे व त्याप्रमाणे मांडणी पुढे नेण्यास सांगावी.

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
पंचकोश		
विज्ञानमय कोश		
विविधता	विविध माध्यमे/साहित्य/पर्याय निवडून उपरोक्त कृतीत विविधता आणता येईल. याप्रकारे टाळ्या, उड्या, कवायत यांचे आकृतिबंध करून घ्यावेत.	
थीम/विषय	भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), वाहन	
ताईसाठी सूचना	ताईने या कृती वारंवार घ्याव्यात. प्रत्येक बालकाला संधी मिळेल याची खबरदारी घ्यावी. भाज्या, फळे, फुले, पाने यांचा वापर करून आकृतिबंध करून घ्यावा या संदर्भात प्रकल्पनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-8** बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात. **C-8.2** आपल्या परिसरातील आकार आणि संख्या यांच्यातील साधे आकृतिबंध ओळखतो आणि त्यांचा विस्तार करतो. **अ) LO 8.2.1.1** आकृतिबंध ओळखतो. आकार पाने-फुले यांचा जोड्यांमधील पुनरावृत्तीनुसार आकृतिबंध तयार करतो. (पान, फूल, अ..ब.., अ..ब..) **ब) LO 8.2.1.1** आकृतिबंधातील पुनरावृत्ती असणारा घटक ओळखतो. ३ ते ४ वस्तू, आकार, चित्रे यांचा वापर करून, विविध प्रकारचे आकृतिबंध़ तयार करतो. (पेन-पुस्तक-पेन्सिल, पेन-पुस्तक-पेन्सिल, अ ब क, अ ब क) **क) LO 8.2.1.1** रंग, आकार, माप या विविध वैशिष्ट्यांनुसार नवीन आकृतिबंध स्वतः तयार करतो. **क) LO 8.2.1.2** आकृतिबंधातील नियम सांगतात आणि वेगवेगळ्या वस्तूंमध्ये नवीन आकृतिबंध तयार करतो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	कृतींतून वस्तूंची समज, उपयुक्तता समजून घेण्याची क्षमता, कलाभिरुची मेंदू आणि हात यांचा समन्वय साधण्याची कौशल्ये.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	बालकाच्या मांडणीचे निरीक्षण करावे. आकारांची व रंगांची समज विचारात घ्यावी.	
आधारशिला कृती क्र. : 18.1 Pattern Making : Recognize, Repeat, Extend and Create Patterns.		
उपक्रमाचे नाव	बनवू तोरण	
उपक्रमाला लागणारे साहित्य :	विविध आकारांची पाने, विविध फुले, गोट्या, साबणाची-औषधांची रिकामी वेष्टणे, रबर, पेन्सिल, पेन, खडू, पेले, वाट्या, बशा, काटे, चमचे इत्यादी.	

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
• बालकांना विविध वस्तू हाताळण्यास द्या. बालकांना या वस्तू रांगेत मांडायला सांगा. (जसे–पेला, वाटी, बशी/खडू, रबर, पेन्सिल, पेन) अशा प्रकारे बालकांकडून आकार, प्रमाण, रंग, वजन असे वैविध्य देऊन आकृतिबंधांची मांडणी करवून घ्यावी.	• बालकांना विविध वस्तू हाताळण्यास द्या. बालकांना या वस्तू रांगेत मांडायला सांगा. (जसे–पान–फूल, पान–फूल–फूल, पान–पान–फूल अशा प्रकारे बालकांकडून आकार, प्रमाण, रंग, वजन असे वैविध्य देऊन आकृतिबंधाच्या मांडणीचा विस्तार करवून घ्यावा. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	• बालकांना विविध वस्तू हाताळण्यास द्या. बालकांना या वस्तू दोन दोन गटात रांगेत मांडायला सांगा. (जसे पान–पान–फूल–फूल, पान–पान–फूल/पेन्सिल–पेन्सिल–पेन–पेन–खडू–खडू) अशा प्रकारे बालकांकडून आकार, प्रमाण, रंग, वजन असे वैविध्य देऊन आकृतिबंध मांडणीचा अधिक विस्तार करवून घ्यावा.

पंचकोश	
विज्ञानमय कोश	
विविधता	बालकांच्या कल्पनशक्तीला वाव देऊन आणि त्यांना मांडणीचे स्वातंत्र्य देऊन या कृतीत विविधता आणता येईल उत्सव सण समारंभ प्रसंगी विविध रंगाचा वापर.
थीम/विषय	वनस्पती (फुले, शेती, रंग)
ताईसाठी सूचना	बालकांची मांडणी चुकीची वाटत असेल, तर त्याबद्दल त्याला बोलते करावे. त्यांचा मांडणीबद्दलचा विचार समजनू घ्यावा. यासंदर्भात प्रकल्पनिहाय व वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-8** बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात. **C-8.2** आपल्या परिसरातील आकार आणि संख्या यांच्यातील साधे आकृतिबंध ओळखतो आणि त्यांचा विस्तार करतो. **अ)LO 8.2.1.1** आकृतिबंध ओळखतात. आकार पानेफुले यांच्या जोड्यांमधील पुनरावृत्तीनुसार आकृतिबंध तयार करतो. (पान–फूल, अ..ब..,अ..ब..) **ब)LO 8.2.1.1** आकृतिबंधातील पुनरावृत्ती असणारा घटक ओळखतो. ३ ते ४ वस्तू, आकार, चित्र यांचा वापर करून, ABC

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
		ABC प्रकारचा आकृतिबंध तयार करतो. (पेन–पुस्तक–पेन्सिल, पेन–पुस्तक–पेन्सिल, अ ब क, अ ब क)
	क) LO 8.2.1.1	रंग, आकार, माप या विविध वैशिष्ट्यांनुसार नवीन आकृतिबंध स्वतः तयार करतो.
	क) LO 8.2.1.2	आकृतिबंधातील नियम सांगतो आणि वेगवेगळ्या वस्तूंमध्ये नवीन आकृतिबंध तयार करतो.
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	आकार, प्रमाण, मोजमाप या संकल्पना समजण्याच्या क्षमता, विकसित होतात. मांडणीचे कौशल्य, सर्जनशीलता	
निरीक्षण करावयाच्या बाबी	बालकांच्या मांडणीच्या आवर्तनाचे निरीक्षण करावे.	
आधारशिला कृती क्र. : 19. Introduction to Numbers : Match and Count.		
उपक्रमाचे नाव	मोजू आनंदे	
उपक्रमाला लागणारे साहित्य :	खडू, वाट्या, फुले, चमचे, फळे.	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
• ताईने तीन वस्तू मांडून ठेवाव्या. (तीन खडू, वाट्या, फुले, चमचे, फळे इत्यादी.) बालकांना या वस्तू क्रमाने मोजून दाखवाव्या, (उदाहरणार्थ, एक वाटी, दोन वाट्या, तीन वाट्या इत्यादी) ताईने हे गणन बालकांकडून समूहात व वैयक्तिक करवून घ्यावे. • अंकगीत ऐकावा व म्हणून घ्या. (उदा. एक लहान बोट, ५ बाई चिमण्याभारी चिवचिव, एका बोटाची टाळी. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	• ताईने पाच वस्तू मांडून ठेवाव्या. (तीन खडू, वाट्या, फुले, चमचे, फळे इत्यादी.) • बालकांना या वस्तू क्रमाने मोजून दाखवाव्या, (उदाहरणार्थ, एक वाटी, दोन वाट्या, तीन वाट्या इत्यादी.) • ताईने हे गणन बालकांकडून समूहात व वैयक्तिक करवून घ्यावे. ताईने बालकांना योग्य तेथे मार्गदर्शन करावे. • अंकांची गाणी घ्यावी. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	• ताईने दहा वस्तू मांडून ठेवाव्या. (दहा खडू, वाट्या, फुले, चमचे, फळे इत्यादी.) • बालकांना या वस्तू क्रमाने मोजून दाखवाव्या, (उदाहरणार्थ, एक वाटी, दोन वाट्या, तीन वाट्या, चार वाट्या, पाच वाट्या इत्यादी.) • ताईने हे गणन बालकांकडून करवून घ्यावे. • ताईने बालकांना योग्य तेथे मार्गदर्शन करावे. • अंकांची गाणी घ्यावी. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
पंचकोश		
विज्ञानमय व आनंदमय कोश		
विविधता	विविध माध्यमे/साहित्य/पर्याय आणि अंकाची गाणी निवडून उपरोक्त कृतीत विविधता आणता येईल.	
थीम/विषय	मी, माझे कुटुंब व परिसर, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), पक्षी व कीटक, वाहन	
ताईसाठी सूचना	ताईने या कृती वारंवार घ्याव्यात. प्रत्येक बालकाला संधी मिळेल याची खबरदारी घ्यावी. यासंदर्भात प्रकल्पनिहाय व वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-8** बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात. **CG-8.3** १० आणि २० या टप्प्याने ९९ पर्यंतच्या संख्या (दोन्ही प्रकारे पुढे आणि मागे) मोजतो. **अ) LO 8.3.1.2** तीनपर्यंत संख्यांची नावे आणि वस्तूंमधील एकास एक संगती वापरून मोजणी करताना मोठ्यांचे अनुकरण करतो. **ब) LO 8.3.1.1** १० पर्यंतची संख्यानामे योग्य क्रमाने सांगतो/गातो आणि ५ पर्यंतची संख्यानामे व वस्तू यांची एकास एक संगती लावतो. **ब) LO 8.3.1.2** संख्येचे मूल्य समजनू घेऊन वस्तूंची मोजणी करतो. (५ पर्यंतचा संच ओळखतात) **ब) LO 8.3.1.3** संख्येबाबतची समज दर्शवतो. (उदाहरणार्थ, ५ म्हणजे ५ विविध वस्तू – ५ व्यक्ती, ५ पेन्सिली इत्यादी) **क) LO 8.3.1.1** २० पर्यंत संख्यानामे म्हणतो आणि मोजतो. संख्यानामे आणि वस्तू यांची १० पर्यंत एकास एक संगती लावतो. **क) LO 8.3.1.2** संख्यांचे मूल्य समजून घेऊन १० पर्यंत वस्तूंची मोजणी करतो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	गणिती कौशल्य विकसित होतात.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	बालकाच्या गणनक्षमतेचे निरीक्षण करावे.	

आधारशिला कृती क्र. : 20. Spatial Concepts : Understand in/out, over/under top/bottom, front/back etc.

उपक्रमाचे नाव	वर–खाली	
उपक्रमाला लागणारे साहित्य	विविध वस्तू, खेळणी, कागद, पेन्सिल, खडू इत्यादी.	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
• वर्गात काही वस्तू विखरून ठेवाव्यात. बालकांना या वस्तूंची ठिकाणे पाहण्याची संधी द्यावी. एकेकाला बोलते करावे. प्रश्न विचारावे. (टेबलावर काय आहे? टेबलाच्या बाजूला काय आहे? टेबलाच्या खाली काय दिसते? इत्यादी.)	• सराव म्हणून वयोगट ३ ते ४ वर्षे च्या कृतीची पुनरावृत्ती करावी. नंतर बालकांना प्रत्येकी एक कोरा कागद आणि रंगीत पेन्सिल द्यावी. काही सूचना कराव्यात. (जसे–कागदावर मधोमध वर्तुळ काढ., त्याच्या खाली चौकोन काढ., वर त्रिकोण काढ.) • त्याच्या खाली चौकोन काढ, वर त्रिकोण काढ. वर्तुळात आयत काढ याप्रमाणे कृती करावयास द्यावी.	• सराव म्हणून वयोगट ३ ते ४ आणि ४ ते ५ वर्षे च्या कृतीची पुनरावृत्ती करावी. ताईने बालकांना एकेक कृती करण्यास सांगावे. उदाहरणार्थ, टेबलावर निळ्या रंगाचे पुस्तक ठेव. टेबलावर ४ ते ५ पुस्तके ठेव, त्यावर पान ठेव.
पंचकोश		
विज्ञानमय कोश		
विविधता	विविध कल्पना, युक्त्या वापरून आणि बालकांच्या कल्पकतेला वाव देऊन या कृतीत विविधता आणता येईल. टोपलीचे चित्र काढून द्यावे. त्यात फुले, पाने काढायला सांगावे.	
थीम/विषय	मी, माझे कुटुंब, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), वाहन	
ताईसाठी सूचना	ताईने या कृती वारंवार घ्याव्यात. प्रत्येक बालकाला संधी मिळेल याची खबरदारी घ्यावी.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-8** बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात. **C-8.8** मूलभूत भौमितिक आकार ओळखतो ते तयार करतो, त्याचे वर्गीकरण करतो, समजून घेतो आणि समजावून सांगतो. **ब) LO 8.8.1.4** स्थितिदर्शक शब्द समजून आकृतिबंध तयार करण्यासाठी आकार, रंग, स्थान यांचा वापर करून टप्प्याटप्प्याने	

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td></td><td colspan="2">दिलेल्या सूचनांचे पालन करतो. जसे की ठिपक्यांची रांगोळी काढणे, कोलाज बनवणे, त्यासाठी मध्यभागी, वर, खाली हे स्थानदर्शक शब्द समजून घेतो.
क) LO 8.8.1.3 वस्तुमाप, आकार यांचे वर्णन करण्यासाठी स्थलदर्शक शब्द वापरतो. (वर, खाली, आत, बाजूला)</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्य</td><td colspan="2">वर, खाली स्थानदर्शक शब्दांची समज</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">बालकांच्या निरीक्षण क्षमतेकडे लक्ष द्यावे. उत्तरांचे निरीक्षण करावे.</td></tr>
<tr><td colspan="3">आधारशिला कृती क्र. : 20.1 Feel the difference : Experiment, Explore, Compare Temperature Differences</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td>आत–बाहेर</td><td></td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">विविध वस्तू, खेळणी, कागद, पेन्सिल, खडू इत्यादी.</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td>• ताईने बालकांचा तळ्यात –मळ्यात हा खेळ घ्यावा. ताईने बालकांना वर्गाच्या बाहेर न्यावे.
• बालकांना एकमेकांचे हात धरून मोठे वर्तुळ करून उभे करावे. तळ्यात म्हटल्यावर आत उडी मारायची हे सांगावे. मळ्यात म्हटल्यावर बाहेर उडी मारायची हे सांगावे.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td><td>• ताईने बालकांना एकमेकांचे हात धरून मोठे वर्तुळ करून उभे करावे. पेरू म्हणाले की आत उडी मारायची. आंबा म्हणाल्यावर बाहेर उडी मारायची अशी सूचना द्यावी.
• ताई पेरू म्हणाली, की आत उडी मारायची. ताईने सूचना देताना पेरू आंबा, आंबा पेरू, पेरू आंबा, आंबा पेरू, पेरू पेरू अशा सूचना द्याव्या.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td><td>• ताईने पासिंग द पार्सल हा खेळ घेण्यासाठी बालकांना अर्धवर्तुळात बसवावे. ट्रेमधील वस्तू – ठोकळे, खडू, बिया, झाकण, पुस्तक, कागद. ट्रेबाहेरील वस्तू – काड्या, मणी, रंगीत कागद.
• ताईने खंजिरी वाजवावी. खंजिरी वाजवताना बालकांनी चेंडू पुढे बालकांकडे देत राहावे. ताईने खंजिरी वाजायची थांबली, की ज्या बालकाकडे चेंडू येईल त्या बालकाला ताईने सूचना द्यावी. जसे, ट्रेच्या आत असलेला लाल ठोकळा बाहेर काढून ठेव. रंगीत कागद ट्रेच्या आत ठेवाव्या. ट्रेच्या आत ठेवलेला खडू बाहेर काढून ठेवा.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
	पंचकोश	
	आनंदमय कोश	
विविधता	विविध कल्पना, युक्त्या वापरून आणि बालकांच्या कल्पकतेला वाव देऊन या कृतीत विविधता आणता येईल. टोपलीचे चित्र काढून द्यावे. त्यात फुले, पान काढायला सांगावे.	
थीम/विषय	मी, माझे कुटुंब, भाज्या व फळे, वाहन	
ताईसाठी सूचना	ताईने या कृती वारंवार घ्याव्यात. प्रत्येक बालकाला संधी मिळेल याची खबरदारी घ्यावी. यासंदर्भात प्रकल्पनिहाय व वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-8** बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात. **C-8.8** मूलभूत भौमितिक आकार ओळखतात ते तयार करतो, त्याचे वर्गीकरण करतो, समजून घेतो आणि समजावून सांगतो. **ब) LO 8.8.1.4** स्थितिदर्शक शब्द समजून आकृतिबंध तयार करण्यासाठी आकार, रंग, स्थान यांचा वापर करून टप्प्याटप्प्याने दिलेल्या सूचनांचे पालन करतो. जसे की ठिपक्यांची रांगोळी काढणे, कोलाज बनवणे, त्यासाठी मध्यभागी, वर, खाली हे स्थानदर्शक शब्द समजून घेतो. **क) LO 8.8.1.3** वस्तुमाप व आकार यांचे वर्णन करण्यासाठी स्थलदर्शक शब्द वापरतो. वर, खाली, आत, बाजूला.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	आत, बाहेर स्थलदर्शक शब्दांची समज	
निरीक्षण करावयाच्या बाबी	बालकांच्या निरीक्षण क्षमतेकडे लक्ष द्यावे. उत्तरांचे निरीक्षण करावे.	
	आधारशीला कृती क्र. : 21. Feel the difference : Experiment, Explore, Compare Temperature Differences	
उपक्रमाचे नाव	गरम आणि गारची गंमत	
उपक्रमाला लागणारे साहित्य	चित्रे – गरम, गार पदार्थांची चित्रे, गरम (कोमट) पाणी	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
कृती : थंडीत काय खाऊया. • ताईंनी बालकांना अर्धवर्तुळाकार बसवावे.	**कृती : गार-गरमची गंमत** • ताईंनी बालकांना अर्धवर्तुळात बसवावे.	वयोगट ३ ते ४, ४ ते ५ वर्षेच्या कृती आधी घ्याव्या.

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
• बालकांच्या गटात वेगवेगळे अन्नपदार्थ असलेली चित्रांची कार्डे देणे. • गार व गरम अन्नपदार्थ या चित्रांचे वर्गीकरण करण्यास सांगावे. • घेतलेल्या अनुभवांवर बालकांशी बोलावे. • विविध प्रकारे गार व गरम स्पर्शांचा अनुभव द्यावेत. (उदा. उन – सावली गार – गरम पाणी) • गार व गरम पदार्थांची नावे सांगावीत.	• भांड्यामध्ये गरम (पाणी कोमट असावे) पाणी, बर्फ हे घ्यावे. • एक एक करून सर्व बालकांना दोन्ही भांड्याला हात लावण्यास सांगावे. • ताईने सर्व बालकांनी एक एक करून भांड्याला हात लावल्यावर काय त्यांना जाणवले हे विचारावे. • घेतलेल्या अनुभवांवर चर्चा करावी.	**कृती : क्रम लावूया.** • चहा, बिस्किट, आईस्क्रिम अशी चित्रे बालकांसमोर मांडावी. • बालकांना गरम ते गार अशा क्रमाने चित्रे लावण्यास सांगावे. • तसेच गरम पदार्थातून वाफ येते, मग ती कुठे जात असेल अशी चर्चादेखील करावी. • पोषक आहाराबद्दल बोलावे. • ताईने गार पाणी, गरम पाणी, कोमट पाणी अशी तीन भांडी ठेवावीत. एकेका बालकाला पुढे बोलावून डोळे मिटून पाण्यात बोटे बुडवायला सांगावे. आणि पाणी गरम, कोमट, की गार लागले ते विचारावे. असे पाणी कुठे आणि केव्हा अनुभवले आणि वापरले ते विचारावे.
पंचकोश		
अन्नमय, विज्ञानमय व मनोमय कोश		
विविधता	आपण कोणते गार/थंड पदार्थ खातो हे विचारावे. आपण कोणते गरम पदार्थ खातो हे विचारावे. उन्हाळा आणि हिवाळा यांची वेगवेगळी चित्रे वापरून गप्पा/चर्चा उपक्रम घेणे, सण समारंभाची चित्रे.	
थीम/विषय	पाणी-पाऊस, भाज्या व फळे ऋतू	
ताईसाठी सूचना		
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-2** बालके ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात. **C-2.5** विविध प्रकारच्या स्पर्शांमधील फरक करण्याची क्षमता विकसित होते. **अ) LO 2.5.1** कठीण/कडक-मऊ, गार-गरम, खरखरीत, खडबडीत, गुळगुळीत स्पर्शामधील फरक समजतो.	

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td></td><td colspan="2">ब) LO 2.5.1 दोन वस्तूंमधील कठीण/कडक–मऊ, गार–गरम, खरखरीत, खडबडीत व गुळगुळीत अशी स्पर्शाची तुलना करू शकतो.
क) LO 2.5.1 ३ ते ५ वस्तूंची कठीण/कडक–मऊ, गार–गरम, खरखरीत, गुळगुळीत अशा स्पर्शानुसार क्रमवार मांडणी करू शकतो. (उदाहरणार्थ, अतिमऊ, मऊ, टणक, अतिटणक)</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये</td><td colspan="2">• गार, गरम, कोमट हे स्पर्श संवेदन</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">गार, गरम, कोमट स्पर्श अनुभवल्यानंतर कोणती प्रतिक्रिया देतात याचे निरीक्षण करावे.</td></tr>
<tr><td colspan="3">आधारशिला कृती क्र. : 22. Identical Object Challenge : Observe and Compare Object Basic Change in Appearance</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">सारखे की वेगळे</td></tr>
<tr><td colspan="3">उपक्रमाला लागणारे साहित्य</td></tr>
<tr><td>वेगवेगळ्या वस्तू</td><td>सारख्या दोऱ्या</td><td>वेगेवगळ्या आकारांची व उंचीची भांडी</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td>• सारख्या वेगवेगळ्या वस्तूंचा परिचय करून द्यावा.
• दोन वस्तूतील लहान मोठेपणा ओळखण्याची संधी द्यावी.
• वस्तूंचे विविध प्रकारे वर्गीकरण करण्यास सांगावे. सारखे – वेगळे, लहान–मोठे इत्यादी.</td><td>• बालकांना समान लांबीच्या दोन दोऱ्या घ्याव्या. त्या जमिनीवर आडव्या मांडाव्या. दोऱ्या मांडताना पहिल्या दोरी पेक्षा दुसऱ्या दोरीचे टोक थोडे पुढे ठेवावे. बालकांना निरीक्षण करून कोणती दोरी लांब आहे, असे विचारावे. चर्चेच्या अंती दोन्ही दोऱ्या समान लांबीच्या आहेत. पुढे मागे जरी ठेवल्या तरी त्यांची लांबी समान आहे, हे लक्षात आणून द्यावे.</td><td>• तीन वेगवेगळ्या उंचीची भांडी घ्यावी. त्यात समान मापाचे पाणी भरावे. बालकांना तीनही भांड्यांतील पाण्याचे निरीक्षण करून कोणत्या भांड्यात पाणी जास्त आहे, असे विचारावे. बालकांची उत्तरे लक्षात घेऊन एकाच मापाने तीनही भांड्यातील पाणी मोजून दाखवावे. उंचीने तीनही भांडी वेगळी असली तर त्यात असणाऱ्या पाण्याचे प्रमाण सारखेच होते हे लक्षात आणून द्यावे.</td></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">अन्नमय, विज्ञानमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">पाने, फुले बिया अशा वस्तू सुट्या तसेच गटात मांडून बालकांना अंदाज करायला सांगावे. वस्तू सारख्या आहेत की नाही असे विचारावे. समान लांबीच्या</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
	पट्ट्या, पाईप, काठ्या यांचा वापर करून एका खाली एक न मांडता, मांडणी करताना पहिल्या वस्तूपेक्षा दुसऱ्या वस्तूचे टोक थोडेपुढे ठेवावे. बालकांनी निरीक्षण केल्यानंतर कोणती वस्तू लांब आहे, असे विचारावे. वेगवेगळी भांडी वापरून पाण्याचे प्रमाण सारखे आहे की नाही याचा अंदाज बांधायला सांगावे. उदाहरणार्थ, तांब्या, पिंप, बाटली, माठ इत्यादी.	
थीम/विषय	पाऊस–पाणी, प्राणी (पाळीव व जंगलातील)	
ताईसाठी सूचना		
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-7** बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात. **C-7.1** वेगवेगळ्या वर्गातील/गटातील वस्तूंमधील फरक व वस्तूंचा एकमेकाशी संबंध यांचे निरीक्षण करतो व समजून घेतो. **C-7.2** निसर्गाच्या निरीक्षणातून कार्यकारण भाव समजून घेऊन, ती दर्शविणारी साधी परिकल्पना मांडतो व त्याच्या स्पष्टीकरणाकरिता/पडताळणीकरिता निरीक्षणाचा आधार घेतो. **CG-8** बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार, मापे, यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात. **C-8.3** १० आणि २० या टप्प्याने ९९ पर्यंतच्या संख्या (पुढे आणि मागे) दोन्ही मोजतो. **अ) LO 8.3.1.6** दोन किंवा तीन वस्तूंचा गट ओळखून निरीक्षणाने तात्काळ सांगतो. **C-8.9** लगतच्या परिसरातील वस्तूंची लांबी, वजन आणि आकारमानानुसार साधी मोजमापे करण्यासाठी साधन व एकक निवडतो. **ब) LO 8.9.1** दोन वस्तूंच्या लांबीच्या सदंर्भात तुलना करतो. च्यापेक्षा लहान, च्यापेक्षा उंच, च्यापेक्षा आखूड. **क) LO 8.9.3** दोन भांड्यांच्या आकारमानाची तुलना करतो. (उदाहरणार्थ, पिंप, बादली, तांब्या)	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	निरीक्षण, तार्किक विचार, तुलना करणे या क्षमता साध्य होण्यास मदत होते.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	• बालके कृती करत असताना सारखे आणि वेगळे ओळखतात का ते बघावे.	

आधारशिला कृती क्र. : 23. Playing with shape tangrams and making different figures		
उपक्रमाचे नाव	**TANGRAM** आकारांची कोडी	
उपक्रमाला लागणारे साहित्य	पांढरे कागद, कात्री, रंग, ब्रश, Tangram आकार इत्यादी.	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
• टॅनग्राम बालकांना द्यावे व मुक्तपणे त्या आकारांच्या रचना करू द्याव्यात.	• बालकांना Tangrams आकार द्यावेत, त्यांचे निरीक्षण करण्यास सांगावे, प्रत्येक आकाराचे नाव विचारावे. • Tangrams च्या मदतीने त्याच्या मनाप्रमाणे विविध आकार तयार करण्याची कृती करवून घ्यावी. तयार आकृतीच्या संदर्भात बालकांना बोलते करावे. (उदाहरणार्थ, तू हे कुठे पाहिलेस ? याला काय म्हणतात ? असे प्रश्न विचारावे.)	• बालकांना, टॅनग्राम देऊन आकार बनविण्यास सांगावे. बनविलेल्या आकाराचे निरीक्षण करण्यास सांगावे. ताईने बालकांना गरजेनुसार मदत करावी.
पंचकोश		
विज्ञानमय व प्राणमय कोश		
विविधता	वर्तुळ, त्रिकोण, चौकोन, आयत आकाराचे फोमचे तुकडे द्यावेत. त्यातून रचना करायला सांगाव्यात.	
थीम/विषय	वाहन	
ताईसाठी सूचना	• सदर उपक्रमासाठी सोबत दिलेल्या कार्यपुस्तिकेतील वयोगट निहाय टॅनग्रामचे आकार कापून आवश्यकतेनुसार जाड पुठ्ठ्यावर चिटकवून घ्यावे व त्याचा वापर करावा.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-8** बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात. **C-8.3** १० आणि २० या टप्प्याने ९९ पर्यंतच्या संख्या (दोन्ही प्रकारे पुढे आणि मागे) मोजतात. **C-8.13** राशी, आकार, अवकाश आणि मोजमापे या संदर्भात सोपी गणिते सोडवितात व तयारही करतात. **ब) LO 8.13.1** टॅनग्रामचा वापर करून विशिष्ट आकृत्यांची रचना करतात.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	आकार, अवकाश आणि मापन या गणितीय संकल्पना समजतात.	

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
निरीक्षण करावयाच्या बाबी	आकार, अवकाश आणि मापन या गणितीय संकल्पना समजून वापरता येतात काय? याचे निरीक्षण करावे.	
आधारशिला कृती क्र. : 24. Money Matters : Understand and Transact		
उपक्रमाचे नाव	बाजाराला जाऊ	
उपक्रमाला लागणारे साहित्य	नोटा, नाणी, खेळातील नाणी–नोटा	
• अंगणवाडीताईने पैशांच्या उपयोगासंबंधाने संवाद घडवून आणावा. (उदाहरणार्थ, आपण पैशांचे काय करतो? खाऊ घेण्यासाठी काय हवे असते? दुकानात सामान कसे मिळते?) अंगणवाडी ताईने बालकांना काही खऱ्या नोटा व नाणी दाखवावी. • गाणी, गोष्टीतून परिचय द्यावा. उदा. भटजीबुवा गेले नारळ आणायला.	• अंगणवाडीताईने वेगवेगळी नाणी बालकांच्या पुढ्यात ठेवावी. अंगणवाडी ताईने बालकांना एक नाणे उचलण्याची सूचना करावी. या नाण्यांची किंमत विचारावी. योग्य तेथे मदत करावी. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	• अंगणवाडीताईने वर्गात छोटासा बाजार आयोजित करावा. अंगणवाडीताईने काही बालकांना दुकानदार म्हणून नेमावे. काही बालकांना गिऱ्हाईक करावे. खेळण्यातील नाणी, नोटा यांच्या साहाय्याने खरेदी–विक्री करण्याची कृती करवून घ्यावी. वस्तू व पैसे यांची देवाणघेवाण समजावून द्यावी. योग्य तेथे मदत करावी.
पंचकोश		
मनोमय व विज्ञानमय कोश		
विविधता	बालकांना वेगवेगळ्या ठिकाणी क्षेत्रभेटीसाठी न्यावे. उदाहरणार्थ, फूल बाजार, भाजी बाजार, भांड्यांचे, कपड्यांचे दुकान, नाट्याभिनय	
थीम/विषय	भाज्या व फळे, मदतनीस	
ताईसाठी सूचना	यासंदर्भात प्रकल्पनिहाय व वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्यावी. दिव्यांग बालकांनाही दुकानदार, गिऱ्हाईक बनण्याची संधी द्यावी.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-8** बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात. **C-8.11** १०० रुपयांपर्यंतचे साधे व्यवहार करतो. **अ) LO 8.11.1** कविता आणि गोष्टींच्या आधारे पैशाशी संबंधित शब्दसंपत्तीचा वापर करतात. **ब) LO 8.11.1** भारतीय चलनातील नाणी ओळखतो. **क) LO 8.11.1** भारतीय चलनातील नोटा ओळखतो.	

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये</td><td colspan="2">बालकांची गणन क्षमता विकसित होते. व्यवहारातील गणिती कौशल्ये विकसित होण्यास मदत होते. खरेदी-विक्रीची माहिती होते.</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">बालकाच्या व्यवहारक्षमतेचे निरीक्षण करावे. पैशाची देवाणघेवाण यांकडे लक्ष द्यावे.</td></tr>
<tr><td colspan="3">आधारशिला कृती क्र. : 25. Number Vocabulary : Understanding and Counting in Correct Sequence</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">चला क्रमाने मोजूया.</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य :</td><td colspan="2">खडू, पाटी, दोरी, लेस, धूळपाटी, काटकी, गोट्या, खडे, चिंचोके, अंककार्ड इत्यादी.</td></tr>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>• गाण्यातून परिचय
एक चंद्र आभाळात,
एक सूर्य आभाळात,
दोन चाके सायकलला,
तीन चाकी रिक्षाला,
चार पाय टेबलाला,
पाच बोटे हाताला
(हे गाणे दहापर्यंत वाढवत नेणे) अशा गाण्यातून अंकांचा परिचय करून द्यावा.
• बालकांना एक ते पाचपर्यंत अंक तोंडी म्हणण्यास सांगावे. एक, दोन अशा वस्तू दाखवून अंक ओळखण्यास सांगावे. पाटीवर, फरशीवर, एक ते तीन अंकांचे आकार काढण्यास सांगावे. वाळू, हवा, पाण्यावर एक ते तीन अंकांचे आकार काढण्यास सांगावे.</td><td>• बालकांना एक ते नऊपर्यंत अंक तोंडी म्हणण्यास सांगावे. एक, दोन अशा नऊपर्यंत वस्तू दाखवून अंक ओळखण्यास सांगावे. पाटीवर, फरशीवर, एक ते नऊ अंकांचे आकार काढण्यास सांगावे. वाळू, हवा, पाण्यावर एक ते नऊ अंकांचे आकार काढण्यास सांगावे.
• एक ते नऊ अकांची संकल्पना चित्रे दाखवावीत.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td><td>• एक ते नऊ वस्तू (गोट्या, खडे, चिंचोके इत्यादी) मांडून ठेवाव्या. प्रत्येक बालकाला एक ते नऊ अंकांची कार्डे द्यावी. वस्तू मोजून अंककार्ड ठेवण्यास सांगावे. (हीच कृती उलट घेता येईल.) अंककार्ड दाखवावे. त्यावरील अंक ओळखण्यास सांगावे. अंकाएवढ्या वस्तू मोजून कार्ड जवळ ठेवण्यास सांगावे.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
• एक ते पाच अंकांची संकल्पना चित्रे दाखवावीत. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**		

पंचकोश	
अन्नमय व विज्ञानमय कोश	
विविधता	जिना चढताना, उतरताना पायऱ्या मोजण्यास सांगणे, चालताना पावले किती झाली हे मोजण्यास सांगणे, जेवायला बसताना ताटे, वाट्या, चमचे मोजण्यास सांगणे, जेवायला किती माणसे बसणार आहेत ते मोजायला सांगणे.
थीम/विषय	मी, माझे कुटुंब, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), पक्षी व कीटक, वाहन
ताईसाठी सूचना	वर्गात सर्व ठिकाणी अंककार्डे लावून ठेवणे, जाता येता सहज कोणत्याही वस्तू मोजायला सांगणे. यासंदर्भात प्रकल्पनिहाय व वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्यावी. दिव्यांग बा लकांनाही अंक तोंडी म्हणणे, मोजणे यासाठी स्वतंत्र संधी द्यावी. अन्य गाणी द्यावीत.
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-8** बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात. **C-8.3** १० आणि २० या टप्प्याने ९९ पर्यंतच्या संख्या (दोन्ही प्रकारे पुढे आणि मागे) मोजतो. **अ) LO 8.3.1.1** संदर्भासह क्रमाने पाच पर्यंतच्या संख्यांचे गाणे गातो/संख्यानामे सांगतो. **ब) LO 8.3.1.1** १० पर्यंतची संख्यानामे योग्य क्रमाने सांगतो/गातो आणि ५ पर्यंतची संख्यानामे आणि वस्तू यांची एकास एक संगती लावतो. **ब) LO 8.3.1.2** संख्येचे मूल्य समजून घेऊन वस्तूंची मोजणी करतो. (५ पर्यंतचा संच ओळखतो.) **ब) LO 8.3.1.3** संख्येबाबतची समज दाखवितो. (उदाहरणार्थ, ५ म्हणजे ५ विविध वस्तू – ५ व्यक्ती, ५ पुस्तके, ५ पेन्सिली इत्यादी.) **क) LO 8.3.1.1** २० पर्यंत संख्यानामे म्हणतो आणि मोजतो. संख्यानामे आणि वस्तू यांची १० पर्यंत एकास एक संगती लावतो.

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
	क) LO 8.3.1.2 संख्यांचे मूल्य समजून घेऊन १० पर्यंत वस्तूंची मोजणी करतो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	• मोजणी आणि अंक ओळखणे या क्षमता विकसित होण्यास मदत होईल.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	• बालक बोटे ठेवून वस्तू मोजतात का? एकावेळी एकच अंक मोजला जातोय का? याचे निरीक्षण करावे.	
आधारशिला कृती क्र. : 26 Measure and Compare : Length, Weight and Height		
उपक्रमाचे नाव	अप्रमाणित एकक – ओळख	
उपक्रमाला लागणारे साहित्य	वर्गात आणि भोवताली उपलब्ध काही वस्तू, पेन, पेन्सिली, वेगवेगळ्या लांबीच्या दोऱ्या, लेस, मोजपट्टी, शिवणकामासाठी लागणारा टेप, लाकूड बांधकाम यांमध्ये वापरला जाणारा टेप, वजन मोजण्याचा काटा, उंची मोजण्याचे साधन	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
कृती : मोजून बघूया. • बालकांना वर्गात दिसणाऱ्या लांबी असणाऱ्या वस्तू शोधून एकत्र करण्यास सांगावे. या वस्तू ओळीने मांडून ठेवण्याची सचूना करावी. या वस्तूंची लांबी बोटे, वीत, पाऊल, दोरी, हात या अप्रमाणित साधनांनी मोजण्यास सुचवावे. नंतर आखूड–लांब या क्रमाने मांडणी करण्यास सांगावे. (जसे– आखूड पेन्सिल–लांब पेन्सिल, आखूड दोरी–लांब दोरी याप्रमाणे) • अप्रमाणित एककांनी टेबल, खिडकी, फरशी यांची लांबी मोजावी.	**कृती : मोजावे कसे.** • ताईने बालकांना अर्धवर्तुळाकार बसवावे. हाताची वीत, पाऊल, दोरी, बोटे या अप्रमाणित साधनांनी एखादी वस्तू कशी मोजता येते, याविषयी बोलून सुरुवात करावी. आता एकेक प्रमाणित वस्तू दाखवून त्या वस्तूबद्दल बोलावे. त्यावर कसे आकडे लिहिलेले असतात, ती वस्तू कशी धरतात, कोण कुठली वस्तू जास्त वापरतो. म्हणजेच कोणत्या व्यवसायात ते साधन वापरले जाते. एकाच वस्तूची मापे मोजण्यासाठी किती जास्तीतजास्त उपयोग होतात, याविषयी सांगावे. • मोजणीसाठी विविध वस्तू उपलब्ध करून द्यावात.	**कृती : मोजण्यासाठी काय?** • ताईने बालकांना अर्धवर्तुळाकार बसवावे. हाताची वीत, पाऊल, दोरी, बोटे या अप्रमाणित साधनांनी एखादी वस्तू कशी मोजता येते यांविषयी बोलून सुरुवात करावी. आता एकेक प्रमाणित वस्तू दाखवून त्या वस्तूबद्दल बोलावे त्यावर कसे आकडे लिहिलेले असतात, ती वस्तू कशी धरतात, कोण कुठली वस्तू जास्त वापरतो. म्हणजेच कोणत्या व्यवसायात ते साधन वापरले जाते. एकाच वस्तूची मापे मोजण्यासाठी किती जास्तीतजास्त उपयोग होतात, याविषयी सांगावे. • मोजलेल्या वस्तूंमध्ये सर्वांत लांब सर्वांत आखूड काय ते विचारावे.

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">प्राणमय व विज्ञानमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">वर्गात सर्व बालकांसमोर उंची, शरीराची मापे अप्रामाणित एककांनी घ्यावी. त्याविषयी बोलत राहावे. वर्गातील टेबल, सतरंजी, स्टूल, खिडकी, दार यांची मोजणी वीत पाऊल, हात, पेन्सिल, दोरी यांच्या साहाय्याने मोजण्यास सांगावे.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">पाणी–पाऊस, भाज्या व फळे, ऋतू</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">भाषा सोपी असावी. दिव्यांग बालकांना जवळ बसवावे.</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-8 बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात.
C-8.9 लगतच्या परिसरातील वस्तूंची लांबी, वजन आणि आकारमानानुसार साधी मोजमापे करण्यासाठी साधन व एकक निवडतो.
ब) LO 8.9.1.1 दोन वस्तूंच्या लांबीच्या सदंर्भात तुलना करतो. च्यापेक्षा लहान, च्यापेक्षा उंच, च्यापेक्षा आखूड.
क) LO 8.9.1.1 तीन वस्तूंची त्यांच्या लांबीच्या दृष्टीने तुलना करतो. सर्वांत लांब, सर्वांत लहान, सर्वांत उंच, सर्वांत आखूड.</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये</td><td colspan="2">अप्रमाणित मोजमापे वापरण्याचे कौशल्य</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">बालकांच्या चेहऱ्यावर किती उत्सुकता आहे, याचे निरीक्षण करावे.</td></tr>
<tr><td colspan="3">आधारशिला कृती क्र. : 26.1 Measure and Compare : Length, Weight and Height</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">प्रमाणित एकक – ओळख</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">वर्गात आणि भोवताली उपलब्ध काही वस्तू (उदाहरणार्थ, खेळणी, खडू, वही, पुस्तक, खुर्ची, टेबल, पिंप, ग्लास, ताट, वाट्या, बूट इत्यादी)</td></tr>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>• प्रत्यक्ष प्रमाणेच मापनाची साधने /चित्रे हाताळण्यास द्यावीत. उदाहरणार्थ फुटपट्टी, मीटर पट्टी, लिटर व किलोचे मापे ही साधने त्यांनी यापूर्वी पाहिली आहेत काय? आणि पाहिली असतील तर कुठे याविषयी</td><td colspan="2">• बालकांना मापनाच्या साधनांची चित्रे (वजने, मापे, फुटपट्टी, तराजू इत्यादी) दाखवावी. याबाबत त्यांना बोलते करावे. (ही चित्रे ओळखण्यास सांगावे.) ही साधने कुठे दिसतात व कशासाठी वापरतात हे विचारावे. बालक चुकल्यास मार्गदर्शन करावे. प्रत्यक्ष वस्तूंचे मापन करण्याची कृती प्रत्येकाकडून करवून घ्यावी. (उदाहरणार्थ, दगडाचे वजन करणे. लीटरने पाणी मोजणे, रिबीनची लांबी मोजणे इत्यादी)
• बालकांना क्षेत्रभेटीस नेऊन प्रत्यक्ष साधनांचा वापर दाखवावा.</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
विचारावे. या साधनांचा वापर कशासाठी केला जातो त्या विषयी बोलावे.		
पंचकोश		
विज्ञानमय कोश		
विविधता	या कृतीत वेगवेगळ्या वस्तू व मापनाची साधने वापरून विविधता आणता येते. वर्गात बालकांची उंची मोजणे, वजन करणे, शरीराची मापे घेणे. हे बालकांच्या मदतीने करावे. ज्या वस्तूची लांबी, अप्रमाणित एककाने मोजली तीच टेप, पट्‌टी यांच्या साहाय्याने मोजून दाखवावे.	
थीम/विषय	पाणी–पाऊस, भाज्या व फळे, ऋतू	
ताईसाठी सूचना	साधनांच्या चित्राचा तक्ता वर्गात लावून ठेवावा.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-8** बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात. **C-8.12** राशी, आकार, अवकाश आणि मोजमापे या संकल्पनांचे आकलन होण्यासाठी आणि संकल्पना व्यक्त करण्यासाठी सुयोग्य व पुरेशी शब्दसंपत्ती विकसित करतो. **क) LO 8.12.1** योग्य मापनक्रियेसाठी संख्या, आकारनामे व क्रिया यांचा उपयोग करतो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	मापनाचे विविध पदार्थ व मापन करण्याचे कौशल्य विकसित होते. मापनातील अचूकता निश्चित करण्याची क्षमता विकसित होते.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	बालकांच्या कृती व व्यवहारांचे बारकाईने निरीक्षण करावे.	
आधारशिला कृती क्र. : 27. Playing with jigsaw puzzles : Complete and Identify missing Parts		
उपक्रमाचे नाव	चित्रकोडी	
उपक्रमाला लागणारे साहित्य	कार्यपुस्तिकेतील चित्रकोडी	
२ ते ६ तुकड्यांचे चित्र क़ोडे	६ ते १० तुकड्यांचे चित्र क़ोडे	८ ते १४ तुकड्यांचे चित्र क़ोडे
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
• प्रथम २ तुकड्यांचे चित्र कोडे एका बालकासमोर ठेवावे. ते त्याला जुळवण्यास सांगावे.	• बालकांना ६ तुकड्यांचे चित्र कोडे एका बालकांसमोर ठेवावे. ते त्याला जुळवण्यास सांगावे.	• प्रथम ८ तुकड्यांचे चित्र कोडे एका बालकांसमोर ठेवावे. ते त्याला जुळवण्यास सांगावे.

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
• जुळवून झाल्यावर ते चित्र कशाचे आहे, हे विचारावे. याचप्रमाणे सराव झाला, की तीन तुकड्यांचे चित्र, चार तुकड्यांचे चित्र, ६ तुकड्यांचे चित्र द्यावे.	• जुळवून झाल्यावर ते चित्र कशाचे आहे, हे विचारावे. त्याच प्रमाणे सराव झाला, की दहा तुकड्यांचे चित्र द्यावे.	• जुळवून झाल्यावर ते चित्र कशाचे आहे, हे विचारावे. याच प्रमाणे सराव झाला, की १० तुकड्यांचे चित्र, १२ तुकड्यांचे चित्र, १४ तुकड्यांचे चित्र द्यावे.

पंचकोश	
विज्ञानमय कोश	
विविधता	अर्ध्या चित्रांची जोडी लावणे, अर्धे चित्र पूर्ण करणे.
थीम/विषय	मी, माझे कुटुंब व परिसर, पाणी–पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू , प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस वाहन
ताईसाठी सूचना	**लक्षात ठेवा :** बालकांना चित्र स्वतंत्रपणे जुळवू द्या; तुम्ही मदत करू नका. तुम्हीही वर्तमानपत्रातील मोठी चित्रे कापून पझल तयार करा. मात्र दिव्यांग बालकांना मदत लागल्यास लक्ष ठेवावे. प्रत्येकाला समजत आहे, याची खात्री करून घ्यावी. सदर उपक्रमासाठी सोबत दिलेल्या कार्यपुस्तिकेतील वयोगट निहाय चित्रकोडी कापून आवश्यकतेनुसार जाड पुठ्ठ्यावर चिटकवून घ्यावे व त्याचा वापर करावा.
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-7** बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात. **C-7.1** वेगवेगळ्या वर्गातील/गटातील वस्तूंचा एकमेकांशी संबंध यांचे निरीक्षण करतो व समजून घेतो. **अ) LO 7.1.2.1** परिचित वस्तूच्या चित्रातील हरवलेला भाग ओळखतो. **ब) LO 7.1.2.1** परिचित वस्तूच्या चित्रातील हरवलेले ३ ते ५ भाग ओळखतो. **क) LO 7.1.2.1** परिचित वस्तूच्या चित्रातील हरवलेले ५ ते ६ भाग ओळखतो.
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	निरीक्षण क्षमता, स्मरणशक्ती
निरीक्षण करावयाच्या बाबी	बालकांच्या प्रत्येक कृतीचे निरीक्षण करा. त्यांच्या उत्तराकडे विशेष लक्ष ठेवा. त्यांच्या निरीक्षणाला आणि उत्तराला लागणारा वेळ लक्षात घ्या.

<table>
<tr><th colspan="3">आधारशिला कृती क्र. : 27.1 Playing with jigsaw puzzles : Complete and Identify Missing Parts</th></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">हरवलेला भाग ओळखा.</td></tr>
<tr><td colspan="3">उपक्रमाला लागणारे साहित्य</td></tr>
<tr><td>निसर्ग चित्रे</td><td>प्राण्याचे चित्र (काही अवयव नसलेले)</td><td>चित्रातील फरक ओळखण्यासाठी काही समान चित्रे</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td>• व्यक्तीचे किंवा निसर्गाचे चित्र, कोणतेही प्राणी, पक्षी चित्र घ्यावे. चित्र असलेला कागद प्रत्येक बालकाला द्यावा. हा कागद दोन किंवा चार तुकडे करण्याची सूचना करा. फाडलेला कागद पुन्हा जोडण्यास सांगा.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td><td>• एखादा अवयव नसलेल्या प्राण्याचे चित्र बालकांना दाखवा. चित्राचे निरीक्षण करण्यास सांगा. चित्राबद्दल बालकांना बोलते करा. (चित्रात काय दिसते? चित्रातील प्राणी कोणता?
या चित्रात प्राण्याला कोणता अवयव नाही? असे प्रश्न विचारा.)
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td><td>• दोन सारखीच दिसणारी चित्रे बालकांना दाखवा. (पैकी एका चित्रात काही बाबी कमी असतील.) त्यांना दोन्ही चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगा. चित्रांबद्दल बोलते करा.
(चित्रात काय काय दिसते? कोणत्या चित्रात काय कमी झाले/राहून गेले? असे प्रश्न विचारा.) दोन्ही चित्रातील कमी-अधिक शोधण्यास बालकांना प्रेरित करा. योग्य वेळी मदत करा.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">विज्ञानमय कोश</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">वनस्पती (फुले, शेती, रंग), प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस वाहन</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">सावकाश बोलावे, प्रत्येकाला समजत आहे याची खात्री करून घ्यावी. यासंदर्भात प्रकल्पनिहाय व वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्यावी. दिव्यांग बालकांनाही प्रश्न विचारून बोलते करावे.</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-7 बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात.
C-7.1 वेगवेगळ्या वर्गातील/गटातील वस्तूंचा एकमेकांशी संबंध यांचे निरीक्षण करतो व समजून घेतो.</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
	अ) LO 7.1.1 वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी, घटना या इतरांच्या मदतीने नावासहित ओळखतो. **ब) LO 7.1.1** वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी, घटना इत्यादी नावासहित ओळखून स्वतः त्याचे वर्णन करतो. **क) LO 7.1.1** लगतच्या परिसरातील वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी आणि त्यांच्या प्रतिकृती, चित्रे ओळखतो, त्यांची सर्वसाधारण वैशिष्ट्ये सांगतो/वर्णन करतो. (उदाहरणार्थ, घराचा मोठा दरवाजा)	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	निरीक्षण क्षमता, स्मरणशक्ती विकसित होण्यास मदत होते.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	बालकांच्या प्रत्येक कृतीचे निरीक्षण करा. त्यांच्या उत्तराकडे विशेष लक्ष ठेवा. त्यांच्या निरीक्षणाला आणि उत्तराला लागणारा वेळ लक्षात घ्या.	
आधारशिला कृती क्र. : 28. How Many Do I Have? Give, Take, Divide and Count Object		
उपक्रमाचे नाव	मिळवू मिळवू एकात एक	
उपक्रमाला लागणारे साहित्य	चेंडू, गोट्या, पाने, दगड, फुले, रंग. (चेंडू, रंगीत ठोकळे, रंगीत कागद, रुमाल, मणी, रंगवलेल्या बिया, रंगवलेली पिस्त्याची, भुईमुगाची टरफले)	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
• बालकांना अर्धवर्तुळात बसवून घ्यावे किंवा टेबलाभोवती एकत्रित करावे. मध्ये वेगवेगळ्या रंगांच्या वस्तू व एक वाडगा ठेवावा. • प्रथम एका बालकाला एका रंगाची (हिरवा) एक वस्तू (चेंडू) वाडग्यात टाकण्यास सांगावे. • दुसऱ्या बालकाला दुसऱ्या रंगाच्या (लाल) दोन वस्तू (दोन चेंडू) वाडग्यात टाकण्यास सांगावे.	• बालकांना अर्धवर्तुळात बसवून घ्यावे किंवा टेबल भोवती एकत्रित करावे. मध्ये वेगवेगळ्या रंगांच्या वस्तू व एक वाडगा ठेवावा. • प्रथम एका बालकाला एका रंगाच्या (पिवळा) दोन वस्तू (चेंडू) वाडग्यात टाकण्यास सांगावे. • दुसऱ्या बालकाला दुसऱ्या रंगाच्या (निळा) तीन वस्तू (तीन चेंडू) वाडग्यात टाकण्यास सांगावे. • आता तिसऱ्या बालकास वाडग्यातील एकूण वस्तू	• बालकांना अर्धवर्तुळात बसवून घ्यावे किंवा टेबलाभोवती एकत्रित करावे. मध्ये वेगवेगळ्या रंगांच्या वस्तू व एक वाडगा ठेवावा. • प्रथम एका बालकाला एका रंगाच्या (गुलाबी) चार वस्तू (चेंडू) वाडग्यात टाकण्यास सांगावे. • दुसऱ्या बालकाला दुसऱ्या रंगाच्या (जांभळा) पाच वस्तू (पाच चेंडू) वाडग्यात टाकण्यास सांगावे. • आता तिसऱ्या बालकास वाडग्यातील एकूण वस्तू मोजण्यास सुचवावे.

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
• आता तिसऱ्या बालकास वाडग्यातील एकूण वस्तू मोजण्यास सुचवावे. वस्तूंची संख्या विचारावी. (अशा प्रकारे तीनपर्यंतची बेरीज करवून घ्यावी.)	मोजण्यास सुचवावे. वस्तूंची संख्या विचारावी. (अशा प्रकारे पाच पर्यंतची बेरीज करवून घ्यावी.)	वस्तूंची संख्या विचारावी. (अशा प्रकारे नऊपर्यंतची बेरीज करवून घ्यावी.)
पंचकोश		
विज्ञानमय कोश		
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
विविधता	वेगवेगळ्या वस्तू वापरून आणि बालकांना कृतीचे स्वातंत्र्य देऊन विविधता आणता येईल.	
थीम/विषय	मी, माझे कुटुंब, ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
ताईसाठी सूचना	ही कृती प्रत्येक बालकाकडून समूहात व स्वतंत्रपणे वारंवार करवून घ्यावी. नऊपर्यंत बेरीज येणाऱ्या सर्व बेरजा अशा पद्धतीने करवून घ्याव्या. दिव्यांग बालकास ही कृती करण्यास द्यावी, आवश्यक तेथे मदत करावी.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-8** बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात. **C-8.6** संख्यांची जोड (composition) व फोड (decomposition) आणि संख्यांचे गट करणे यांसारख्या लवचिक कार्यनीतींचा वापर करून दोन अंकी संख्यांची बेरीज आणि वजाबाकी अचूकपणे करतो. **अ) LO 8.6.1** तोंडी उत्तर देण्याऐवजी ३ पर्यंतच्या वस्तू बाजूला काढतो किंवा गट करतो. **ब) LO 8.6.1.1** ५ पर्यंत वस्तूंचे दोन गट एकत्र करतो, पुन्हा मोजतो. (उदाहरणार्थ, माझ्याकडे आणि माझ्या बहिणीकडे चॉकलेट आहेत. तर आता एकत्र करून मोजून माझ्याकडे एकूण किती चॉकलेट आहेत?) **ब) LO 8.6.1.2** वस्तूंच्या गटातून ५ पर्यंतच्या वस्तू बाजूला काढतात व पुन्हा मोजतात.	

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
	क) **LO 8.6.1.1** ९ पर्यंत वस्तूंचे दोन गट एकत्र करतो व पुन्हा मोजतो. उदाहरणार्थ, माझ्याकडे आणि माझ्या बहिणीकडे चॉकलेट आहेत. तर आता एकत्र करून मोजून सांग माझ्याकडे एकूण किती चॉकलेट आहेत? क) **LO 8.6.1.2** वस्तूंच्या गटातून ९ पर्यंतच्या वस्तू बाजूला काढतो व पुन्हा मोजतो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	अवधान कक्षा वाढेल, एकाग्रता वाढेल.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	बालकांच्या वस्तू मोजण्याकडे लक्ष ठेवावे. कौशल्य, गतीचे अधिकत्व किंवा कृती करण्यास लागणारा वेळ याचे निरीक्षण करावे. बालकांची वस्तू मोजण्याची क्रिया व गती यांची निरीक्षण करावे.	

आधारशिला कृती क्र. : 29. First, Then and After : Sequencing of Events

उपक्रमाचे नाव	घटनाक्रम	
उपक्रमाला लागणारे साहित्य	घटनाक्रमानुसार चित्रे	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
• बालकाच्या नेहमीच्या व्यवहारातील तीन कृतींची (दात घासणे, अंघोळ करणे, शाळेत जाणे अशी) चित्रकार्डे त्याला दाखवावीत. • याबाबत बालकाला बोलते करावे. (यापैकी तू काय काय करतो? कसे करतो? कधी करतो? असे प्रश्न विचारावे.) • नंतर या कृतींचा क्रम विचारावा (तू यापैकी आधी काय करतो? त्यानंतर काय करतो? असे प्रश्न विचारावे.) • कृतीच्या क्रमाप्रमाणे कार्डांचा क्रम लावून घ्यावा.	• बालकाच्या नेहमीच्या व्यवहारातील पाच कृतींची (झोपून उठणे, अंघोळ करणे, जेवण करणे, शाळेत जाणे, खेळणे अशी) चित्रकार्डे त्याला दाखवावीत. • याबाबत बालकाला बोलते करावे. (यापैकी तू काय काय करतो? कसे करतो? कधी करतो? असे प्रश्न विचारावे.) • नंतर या कृतींचा क्रम विचारावा. (तू यापैकी आधी काय करतो? त्यानंतर काय करतो? असे प्रश्न विचारावेत. • कृतीच्या क्रमाप्रमाणे कार्डांचा क्रम लावून घ्यावा. • या कृतीच्या संदर्भात/अनुषंगाने स्वच्छतेची चर्चा घडवून आणावी. • बालकांना संवादातून घटना सांगून त्यांचा क्रम लावण्यास सांगावे. **(वयोगटानिहाय व वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>• या कृतीच्या संदर्भात/ अनुषंगाने स्वच्छतेची चर्चा घडवून आणावी.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td><td colspan="2"></td></tr>
<tr><td colspan="3">**पंचकोश**</td></tr>
<tr><td colspan="3">विज्ञानमय, प्राणमय, मनोमय कोश</td></tr>
<tr><td>**विविधता**</td><td colspan="2">अ) झाडावरचे फळ
ब) झाडावरचे फूल, ते वाळलेले फूल
क) बी, ते झाड
ड) कोंबडीचे अंडे ते पिल्लू
इ) प्राण्याचे पिल्लू, पिल्लू खाणे खाते, मोठा प्राणी
फ) वेगवेगळ्या गोष्टी/कथातील घटनाक्रम
ग) फुलपाखराचा जीवनक्रम, गाणी, गोष्ट, चित्रफितीद्वारे.
• एक होते सुरवंटराव
ह) जलचक्र
य) शेतकरी ते भाजी
ज) गहू ते पोळी
झ) रस्ता ओलांडणे व सिग्नल यांसारख्या घटनाक्रमाचा समावेश होतो.</td></tr>
<tr><td>**थीम/विषय**</td><td colspan="2">मी, माझे कुटुंब, वनस्पती (फुले, शेती, रंग), प्राणी (पाळीव व जंगलातील)</td></tr>
<tr><td>**ताईसाठी सूचना**</td><td colspan="2">दैनंदिन जीवनातील वेगवेगळ्या कृती घ्याव्यात. रटाळपणा येणार नाही याची दक्षता घ्यावी. या संदर्भात प्रकल्पनिहाय व वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्यावी. दिव्यांग बालकांनाही बोलते करावे.</td></tr>
<tr><td>**अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती**</td><td colspan="2">**CG-8** बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात.
C 8.4 चढत्या आणि उतरत्या क्रमाने ९९ पर्यंतच्या संख्यांची मांडणी करतो.
अ) LO 8.4.1 परिचित घटना/वस्तू क्रमाने मांडतो. (उदा. दैनंदिन दिनचर्या, कथा, आकार, २-३ आकार)</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
	ब) LO 8.4.1 तीन स्तरांपर्यंत आकाराच्या आधारावर वस्तूंची क्रमवारी लावतो आणि त्यांचे स्तर शब्दबद्ध करतो. (मोठे–लहान–सर्वांत लहान, लांब–आखूड–सर्वांत आखूड) क) LO 8.4.1 आकार, लांबी, वजनावर आधारित पाच वस्तू चढत्या किंवा उतरत्या क्रमाने मांडतो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	सखोल निरीक्षण, स्मरणशक्तीचा विकास, सारासार आणि तर्कसंगत विचार	
निरीक्षण करावयाच्या बाबी	बालके कृतीतील स्वच्छतेच्या कृतीबद्दल काय आणि कसा विचार करतात याचे निरीक्षण करावे.	
आधारशिला कृती क्र. : 30. Models and Maps : Create, Read, Understand		
उपक्रमाचे नाव	नकाशा तयार करूया	
उपक्रमाला लागणारे साहित्य	कागद, क्रेयॉन इत्यादी.	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
• वर्गातील विविध वस्तू कुठे ठेवल्या याचे निरीक्षण करण्यास सांगावे. यासाठी प्रश्नांची मदत घेता येईल जसे टेबल कुठे? • वर–खाली, पुढे–मागे यांसारखी शब्दावली बालके वापरतील या करिता प्रयत्न करावे. बालकांना मुक्तपणे वर्णन करू द्यावे. वर्णन करताना शब्दावलीसाठी आवश्यक तेव्हा मदत करावी. • वर्गातील विविध वस्तू कुठे याचा एक सोपा नकाशा बालकांचा सहभागातून कागदावर काढून घ्यावा. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	• बालकांना त्यांच्या घरापासून केंद्रापर्यंतच्या मार्गाबाबत प्रश्न विचारावे, जसे तू शाळेत कसा येतो, कोणत्या रस्त्याने येतो इत्यादी बालकांच्या वर्णनात गरज पडल्यास त्याला मदत करावी. • वस्तू लपविण्याचा खेळ घ्यावा. एका बालकाला वस्तू लपवायला सांगून त्याने दिलेल्या सूचनेनुसार इतरांना वस्तू शोधायला सांगावे. जसे, वर्गाबाहेर, पायरीच्या बाजूला याप्रमाणे. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	• एखादे ठिकाण निवडून तेथे भेट द्यावी. बालकांना त्या ठिकाणांपर्यंत कसे पोहोचलो हे विचारावे. सरळ, पुढे, यांसारखे शब्द बालकांना वर्णन करताना वापरायला सांगावे. • परिसरातील एखाद्या ठिकाणापर्यंत जाण्याचा रस्ता कागदावर काढण्यास सांगावे. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
पंचकोश		
विज्ञानमय, प्राणमय कोश		
विविधता	स्थळ तसेच वस्तू लपविण्याच्या ठिकाणांत विविधता आणता येईल.	
थीम/विषय	मी, माझे कुटुंब व परिसर	
ताईसाठी सूचना	या संदर्भात प्रकल्पनिहाय व वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्यावी. दिव्यांग बालकांनासुद्धा वर्गातील बालकांचा, ताईचा हात धरून जाऊन वस्तू शोधण्याच्या खेळात सहभागी करून घ्यावे.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-8** बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात. **C 8.8** मूलभूत भौमितिक आकार ओळखतात ते तयार करतात, त्याचे वर्गीकरण करतात, समजून घेतात आणि समजावून सांगतात. **अ) LO 8.8.1** साध्या सूचनांचे पालन करतो आणि वस्तू आकार, रंग आणि माप यांनुसार जागेवर ठेवतो. उदा. लाल फुगा इथे आण आणि गोल चेंडू टेबलावर ठेव. **ब) LO 8.8.4** स्थितिदर्शक शब्द समजून आकृतिबंध तयार करण्यासाठी आकार, रंग, स्थान यांचा वापर करून, टप्प्याटप्प्याने दिलेल्या सूचनांचे पालन करतो. **क) LO 8.8.3** वस्तूचे माप, आकार वर्णन करण्यासाठी स्थलदर्शक शब्द वापरतो. (उदाहरणार्थ, वर, खाली, आत, बाजूला,)	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	शब्दसंग्रह आणि भाषिक कौशल्ये, बोधात्मक कौशल्ये	
निरीक्षण करावयाच्या बाबी	बालकांच्या सहभागाचे निरीक्षण करणे, दिशानिर्देश समजण्यासाठी बालके वापरत असलेल्या शब्दसंग्रहाचे निरीक्षण करणे.	
आधारशिला कृती क्र. : 31. Let's Construct : Houses, Bridges, Roadways and More		
उपक्रमाचे नाव	घरांच्या प्रकारांची ओळख.	
उपक्रमाला लागणारे साहित्य	कच्चे, पक्के तसेच सिमेंट काँक्रिटचे, बांबूचे घर अशी विविध प्रकारच्या घरांची, पूल, रस्ते यांची चित्रकार्डे, लाकडी ठोकळे, प्लास्टिक ठोकळे, रिकामी खोकी, पुठ्ठा, बाटल्यांची झाकणे.	

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
• बालकांशी गप्पा माराव्यात. गप्पा मारताना ते कुठे राहतात. त्यांचे घरी कोणकोण असते? घर कसे आहे? घराचे बांधकाम सुरू असलेले पहिले आहे काय? ते विचारावे. • विविध प्रकारच्या घरांची चित्रकार्डे दाखवावीत. चित्र कार्डांवर आधारित चर्चा करावी, गप्पा माराव्यात. • घर बांधण्यासाठी कोणकोणत्या वस्तू/साहित्याचा वापर केला जातो याबद्दल विचारावे. बालकांची उत्तरे स्वीकारावीत. • घराचे काय महत्त्व आहे याबद्दल चर्चा करावी. इतर प्राणी-पक्षी यांच्या घराविषयी देखील बोलावे.	• चित्रकार्डांच्या मदतीने विविध प्रकारची घरे दाखवावीत. • चित्रातील विविध प्रकारच्या घरांविषयी बोलते करावे. संबंधित घर बांधताना कोणते साहित्य वापरले असेल यावर चर्चा करावी. • कोणत्या प्रकारचे घर हे अधिक मजबूत असेल. ऋतुमानानुसार कोणत्या प्रकारचे घर उपयुक्त होईल यावर चर्चा करावी. • इतर भौगोलिक क्षेत्रातील घरांचीदेखील चित्रे दाखवून त्याबद्दल माहिती सांगावी. • बालकांना त्यांच्या आवडीचे घराचे चित्र काढून रंगविण्यास सांगावे.	• चित्रकार्डांच्या मदतीने विविध प्रकारची घरे दाखवावीत. • चित्रातील विविध प्रकारच्या घरांविषयी बोलते करावे. संबंधित घर बांधताना कोणते साहित्य वापरले असेल यावर चर्चा करावी. • कोणत्या प्रकारचे घर हे अधिक मजबूत असेल. ऋतुमानानुसार कोणत्या प्रकारचे घर उपयुक्त होईल यावर चर्चा करावी. • इतर भौगोलिक क्षेत्रातील घरांची देखील चित्रे दाखवून त्याबद्दल माहिती सांगावी. • बालकांना त्यांच्या आवडीचे घराचे चित्र काढून रंगविण्यास सांगावे.
पंचकोश		
विज्ञानमय, प्राणमय, मनोमय कोश		
विविधता	• ताईने विविध प्रकारच्या साहित्यातून बनविलेल्या घरांची, रस्त्यांची, पूलांची चित्रकार्डे बालकांना दाखवावीत. • अशा प्रकारची घरे, पूल, रस्ते त्यांनी कुठे पाहिले आहेत यावर चर्चा करावी. • ताईने बालकांना लाकडी ठोकळे, प्लॅस्टिक ठोकळे, रिकामी खोकी, पुठ्ठा, बाटल्यांची झाकणे असे साहित्य देऊन पूल, रस्ता, घर तयार करायला सांगावे. • गाणी व गोष्टी यातून देखील बालकांची घर ही संकल्पना स्पष्ट करावी.	
थीम/विषय	मी, माझे कुटुंब व परिसर प्राणी, पक्षी आणि कीटक, ऋतू असे लिहावे.	
ताईसाठी सूचना	दिव्यांग बालकांना गटात सामील करून घेण्यास इतर बालकांना सांगावे.	

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-7** बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात. **C-7.2** निसर्गाच्या निरीक्षणातून कार्यकारण भाव समजून घेऊन, तो दर्शवणारी साधी परिकल्पना मांडतो व त्याच्या स्पष्टीकरणाकरिता/पडताळणीकरिता निरीक्षणाचा आधार घेतो. **अ) LO 7.2.2** निरीक्षणावर आधारित कल्पनांचा, युक्त्यांचा उपयोग करतो. **ब) LO 7.2.2.2** ज्ञात माहितीचा नवीन संदर्भात वापर करतो. **क) LO 7.2.3.2** निरीक्षण करून सामान्यीकरण करतो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	वर्गीकरण व सामन्यीकरण	
निरीक्षण करावयाच्या बाबी	प्रतिसादाचे निरीक्षण करावे.	
आधारशिला कृती क्र. : 32. Identify Common Symbols/Logos : Road Safety, Washroom, Food, Danger etc.		
उपक्रमाचे नाव	सांकेतिक चिन्हे	
उपक्रमाला लागणारे साहित्य	विविध चिन्ह असलेली फ्लॅशकार्डे	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
• केंद्रासाठी विविध ठिकाणे सांगणारी काही संकेतचिन्हे ताईंनी तयार करून लावावी. त्यांची ओळख मुलांना सहजपणे करून द्यावी. जसे, हात धुण्याचे चिन्ह हात धुण्याच्या जागी इत्यादी.	• परिसरात बालकांना फिरायला न्यावे असे चिन्ह दिसतायेत का ते बघावे त्यांचे महत्त्व सांगावे. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	• वस्तूवर विविध संकेतचिन्हे असतात. त्यांचा अर्थ त्यांना सांगावा. • बालकांच्या सहभागातून विविध संकेतचिन्हे तयार करून घ्यावी.
पंचकोश		
विज्ञानमय, मनोमय कोश		
विविधता	• सार्वजनिक ठिकाणच्या सांकेतिक चिन्हांची ओळख क्षेत्रभेटीतून करून द्यावी, पालकांची मदत घ्यावी. • वाहतुकीच्या विविध चिन्हांची ओळख, तशी रचना वर्गात तयार करून करता येईल. बालकांना खेळणीतील गाड्या चालविण्यास सांगता येईल.	
थीम/विषय	मी, माझे कुटुंब, मदतनीस, वाहन	

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
ताईसाठी सूचना	रस्त्यावर नेताना काळजी घ्यावी. यासंदर्भात प्रकल्पनिहाय व वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्यावी. एखादया दिव्यांग बालकास दृष्टीदोष असल्यास ताईने त्याच्याशी संवाद साधावा, वर्णन करावे यासंदर्भात उपलब्ध कार्यपुस्तिकेचा संदर्भ घ्यावा.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-1** बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात. **C-1.5** हालचालींमध्ये सहजता दाखवतो आणि योग्यरितीने वागतो. (चालणे, धावणे, सायकल चालवणे) **अ) LO 1.5.1.2** वाहतुकीची चिन्हे ओळखतो. (सिग्नल, झेब्रा क्रॉसिंग, यूटर्न, पूल/रेल्वेपूल इत्यादी.) **CG-2** बालके ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात. **C-2.2** चिन्हे आणि प्रतीके याकरिता दृक्स्मृती (visual memory) विकसित करतो. **अ) LO 2.2.1** दोन सारखे आकार,चिन्हे यांच्या समान दिशा यांनुसार जोड्या लावतो. उदाहरणार्थ ⟷ + **ब) LO 2.2.1** समान रचना परंतु भिन्न आकार व दिशा असणारी चिन्हे/ प्रतीके जोडतो. **क) LO 2.2.1** समान रचना परंतु भिन्न आकार व दिशा असणारी चिन्हे/ प्रतीके जोडतो. **CG-4** बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात. **C-4.5** शाळेत आणि वर्गात सामाजिक नियम समजून घेऊन त्याप्रमाणे सकारात्मक वर्तन करतो. **अ) LO 4.5.2** शिक्षकांच्या मदतीने साध्या सूचनांचे पालन करतो. **ब) LO 4.5.2.2** साध्या लहान सूचनांचे पालन करतो. **क) LO 4.5.2** शाळेत मोठ्यांनी आठवण करून दिल्याशिवायही साध्या नियमांचे पालन करतो. **CG-13** बालके अध्ययनाच्या सवयी विकसित करतात, यामुळे त्यांना शालेय वर्गासारख्या औपचारिक वातावरणात सक्रिय राहता येते. **C-13.4** वर्गखोली नियामके : नियामके समजपूर्वक स्वीकारतो आणि पालन करतो.	

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
	अ) **LO 13.4.1** वर्गातील नियमकांसाठी प्रौढ व्यक्तींच्या वर्तनाचे निरीक्षण व अनुकरण करतो. ब) **LO 13.4.1** शिक्षकांनी दिलेल्या संकेतानुसार वर्गातील नियम पाळतो. क) **LO 13.4.1** वर्गातील नियम पाळतो व इतरांना पाळण्यास मदत करतो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	भाषा क्षमता, समस्या निराकरण	
निरीक्षण करावयाच्या बाबी	विविध चिन्हे ओळखतो का ते बघावे. बालकांच्या सहभागाचे निरीक्षण करावे.	

आधारशिला कृती क्र. : 33. Clock Quest : Understand and explore concepts of time, types of clocks, watches		
उपक्रमाचे नाव	ओळख घड्याळाची	
उपक्रमाला लागणारे साहित्य	वेगवेगळ्या प्रकारची घड्याळे	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
कृती : घड्याळाची ओळख • घड्याळात वाजला १ घड्याळ दादा, घड्याळ दादा अशा गाण्यातून घड्याळाची ओळख करून द्यावी. • बालकांना वर्तुळाकार बसवावे. • वेगवेगळ्या प्रकारची घड्याळे दाखवावी. • हे काय आहे? उपयोग काय? काय सारखे आहे? काय वेगळे आहे? तुम्ही कुठे पाहिले आहे? असे प्रश्न विचारावे. • मोबाईल आणि कॉम्प्युटरवरील घड्याळ दाखवावे.	**कृती : घड्याळाची ओळख** • बालवाटिका 'अ' ची कृती घ्यावी. • बालकांना घड्याळातील आकडे ओळखण्यास सांगावे. • वेगवेगळे काटे दाखवावे. कोणता काटा जोरात पळतो, कोणता हळू ते ओळखण्यास सांगावे. • कोणत्या वेळी कोणत्या गोष्टी करतो हे विचारावे.	**कृती : घड्याळाची ओळख** • बालवाटिका 'ब' ची कृती घ्यावी. • किती वाजले ते कसे ओळखायचे ते सांगावे. उदाहरणार्थ, ९ वाजले, ९ वाजून गेले, १० वाजायला आले. • सेकंद काट्याबरोबर सेकंद मोजून किती सेकंदाने मिनिट काटा हलतो ते सांगावे. • सेकंद काट्याबरोबर चालण्यास सांगावे. • ताईने बालकांना घरातून अंगणवाडीत यायला किती वेळ लागला, हे विचारावे. • किती वाजता जेवतात, हे विचारावे. बालकांना अंदाजे वेळ सांगता येते का हे बघावे.

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
पंचकोश		
विज्ञानमय, मनोमय कोश		
विविधता	रोजच्या कामात घड्याळाचा वापर करणे – १० मिनिटे खेळूया, १ मिनिटांत हात धुवून येऊ, १० मिनिटांत चित्र रंगवूया. एक मिनिटात म्हणजेच पटकन १० मिनिटे म्हणजे बराच वेळ, असेही सांगावे.	
थीम/विषय	ऋतू , मी व माझे कुटुंब	
ताईसाठी सूचना	प्रत्यक्ष घड्याळ दाखवून हे खेळ घ्यावेत.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-8** बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात. **C-8.10** मिनिटे, तास, दिवस, आठवडे आणि महिने, वेळेची मोजमापे या एककामध्ये कालमापन करतो. म्हणजेच उदयोन्मुख साक्षरतेला चालना मिळेल.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	घड्याळातून वेळ बघता येणे हे समजणे या क्षमतेच्या विकासास मदत होईल.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	बालके घड्याळाचे विविध प्रकार सांगू शकतात का? (मनगटावरचे, भिंतीवरचे, डिजिटल)	
आधारशिला कृती क्र. : 34. Picture Hunt : Observe and match basic criteria		
उपक्रमाचे नाव	वर्णनानुसार चित्र ओळखूया.	
उपक्रमाला लागणारे साहित्य	परिसरातील परिचयातील वस्तू, व्यक्ती, प्राणी, पक्षी, घटना यांची चित्रे	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
• ताईने बालकांना अर्धवर्तुळात बसवावे. चित्रकार्डे बालकांना दिसतील अशी ठेवावे. • चित्रकार्डांवर असलेल्या चित्राचे वर्णन बालकांना करण्यास सांगावे. जसे, पिवळा रंग असलेली वस्तू. • मी पक्षी आहे. आकाशात उडतो, कावकाव करतो. • माझा रंग हिरवा, मी पक्षी आहे. • मी आहे फळ, आधी असतो हिरवा. • जंगलात राहतो, काळे पिवळे पट्टे असलेला. • संबंधित वर्णनाच्या वस्तूचे कार्ड बालकास शोधून आणून देण्यास सांगावे. • त्यानंतर बालकांना या खेळात वस्तूचे वर्णन करून शेजारील बालकास त्यानुसार वस्तूचे चित्रकार्ड शोधण्याची संधी द्यावी. • सर्व बालकांना वस्तूचे वर्णन करणे व वर्णनानुसार वस्तू शोधण्याची संधी द्यावी.		

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
पंचकोश		
अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय कोश		
विविधता	परिसरातील वस्तू, प्राणी, पक्षी याबद्दल कोडी तयार करणे. उदाहरणार्थ, माझा रंग हिरवा, मी सगळ्या झाडांवर आहे? ओळखा मी कोण	
थीम/विषय	भाज्या व फळे, प्राणी (पाळीव व जंगलातील), मदतनीस, वाहन	
ताईसाठी सूचना	–	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-7** बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात. **C-7.1** वेगवेगळ्या वर्गातील/गटातील वस्तूंमधील फरक व वस्तूंचा एकमेकाशी संबंध यांचे निरीक्षण करतो व समजून घेतो. **अ) LO 7.1.1** वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी, घटना या इतरांच्या मदतीने नावासहीत ओळखतो. **ब) LO 7.1.1** वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी, घटना इत्यादी नावांसह ओळखून स्वतः त्याचे वर्णन करतो. **क) LO 7.1.1** लगतच्या परिसरातील वस्तू, व्यक्ती, प्राणी, पक्षी आणि त्यांच्या प्रतिकृती, चित्रे ओळखतो. त्यांची सर्वसाधारण वैशिष्ट्ये सांगतो/वर्णन करतो. (घराचा मोठा दरवाजा)	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	• सामाजिक-भावनिक विकास, साहचर्याची भावना, निरीक्षणशक्तीचा विकास, भाषिक (श्रवण आणि भाषण) विकास होण्यास मदत होईल. • सूचनांचे अनुपालन करण्याची क्षमता विकसित होते. • कुटुंब, घर, परिसर यांतील वस्तू, सजीव यांबद्दल साहचर्याची भावना विकसित होते. • कल्पनाशक्ती, स्मरणशक्ती विकसित होऊन बालकांना वस्तू, प्राणी, पक्षी यांची वैशिष्ट्ये कळण्यास मदत होईल.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	• परिसरातील परिचित वस्तू, व्यक्ती, प्राणी, पक्षी, घटना यांचे निरीक्षण करून व्यक्त होतात याचे निरीक्षण करावे. • बालकांनी केलेले निरीक्षण ते योग्य शब्दांत व्यक्त करतात, याचे निरीक्षण करावे. • बालकांच्या स्मरणशक्तीचे, कल्पनाशक्तीचे निरीक्षण करावे. बालाकांच्या उच्चारांचे निरीक्षण करावे.	

आधारशिला कृती क्र. : 35. My family and me : Introduce, talk about self and family		
उपक्रमाचे नाव	असा मी असा मी	
उपक्रमाला लागणारे साहित्य	चित्रकार्ड, शब्दकार्ड, चेंडू, खंजिरी	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
दैनंदिन वापरातील वस्तू, फळे, भाजीपाला, रंग, खेळण्यातील प्राणी, खाद्यपदार्थांचे चित्र, आवडती वस्तू नावासह चित्रकार्डे इत्यादी. **कृती १ : मला काय आवडते – चित्र** • बालकांना वर्तुळात बसवून एका मुलाचे नाव घ्यावे. • नाव घेतलेल्या बालकाने उभे राहावे. • जमवलेल्या वस्तू एक गट किंवा चित्रकार्ड दाखवून त्यातले त्याला काय आवडते ते विचारावे. • त्याने सांगितलेली वस्तू त्याला का आवडते, ते विचारावे. • बालकाने चॉकलेटसारखी वस्तू सांगितल्यास छान म्हणून नंतर जास्त खाल्ले, खाल्ल्यावर दात घासले नाहीत, चूळ भरली नाही तर दात किडतात, बरं का ! असा त्याचा परिणाम सांगावा. मला काय आवडते–खाऊ मला काय आवडते–प्राणी मला काय आवडते–पक्षी मला काय आवडते–फूल यात्रमाणे, आवडता पदार्थ, प्राणी, पक्षी, फूल, आवडत्या व्यक्तीचे नाव विचारावे.	बालकांच्या नावांची व आडनावांची कार्डे तयार करून ठेवावी. **कृती : शोध आपले नाव** • बालकांना परिसरात फिरण्यास न्यावे. • तेथे असणाऱ्या झाडांची, फळा–फुलांची, पक्षांची नावे सांगावी. आपल्यालादेखील असे नाव आहे का, असे विचारावे. • एकेका बालकाकडून त्याचे नाव व आडनाव विचारून घ्यावे. • नाव सारखे असल्यास वेगळे आडनाव आहे, हे समजून सांगावे. • वर्गात आल्यानंतर त्यांच्या नावाच्या पाट्या त्यांना द्याव्या/गळ्यात घालाव्या. • बालकाच्या स्वतःच्या नावासह असलेले कार्ड खोक्यामध्ये टाकून हजेरी घ्यावी. **गप्पा – माझे कुटुंब** बालकांशी ताईंनी कुटुंब, शाळा, याबाबत गप्पा माराव्या. प्रश्न विचारावे. घरातील व्यक्ती कोणकोणते व्यवसाय करतात ते विचारावे. जसे : तुझ्या घरी कोणकोण आहे? तुझी आई काय करते? तुझा मित्र, मैत्रीण कोण?	**कृती १** खेळ : सांगा सांगा लवकर सांगा. • तुमच्या आईचे नाव सांगा. • मुलांना वर्तूळात उभे करावे. • एका मुलांच्या हातामध्ये बॉल द्यावा. • खंजिरी वाजवायला सुरुवात करावी. खंजिरी वाजताना मुलांनी बॉल शेजारच्या मुलाकडे देत जावे. • खंजिरी वाजवताना ताईंनी 'सांगा सांगा पटकन सांगा तुमच्या आईचे/बाबांचे/दादाचे/ताईचे नाव सांगा,' असे म्हणत राहावे. • खंजिरी वाजवायचे थांबल्यांवर ज्या मुलांच्या हातामध्ये बॉल असेल त्यांनी विचारलेले नाव सांगावे. नंतर खेळ पुन्हा पुढे सुरू ठेवावा. • अशा तऱ्हेने सर्व आई बाबा, आजी आजोबा, ताई दादा, अंगणवाडी ताई इत्यादींचे नावे विचारून घ्यावी. • सर्व बालकांना नावे सांगण्याची संधी द्यावी. **कृती २ : माझा पत्ता** • बालकांना त्यांचे घर कोठे आहे ते विचारावे.

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
• प्रथम बालकांना त्यांचा आवडता खेळ, खेळणी विचारावीत, आवडते कपडे विचारावे, मग आवडता खाऊ, प्राणी, पक्षी फूल नातेवाईक विचारावे.	तुमच्या शेजारी कोण राहते? ते काय करतात? **गप्पा – माझी शाळा** शाळेविषयी माहिती विचारता येईल. शेजारी कोण राहते याविषयी माहिती विचारता येईल.	• प्रत्येक बालकाला त्याचा पत्ता सांगून तो म्हणवून घ्यावा. • बालकांना स्वत:चा पत्ता पाठ होईपर्यंत रोज सराव घ्यावा. • पत्ता सांगता यायला लागल्यावर 'सांगा सांगा लवकर सांगा' हा खेळ घेऊन स्वत:चा पत्ता सांगण्यास सांगावे. **कृती २ : माझे कुटुंब** • प्रत्येक बालकाला त्याच्या घरात किती व्यक्ती रहातात ते विचारावे. • वरील प्रकारे खेळ घेऊन त्या व्यक्ती काय काम करतात, कोणते कपडे घालतात, ते विचारावे. **टाळ्या वाजवू–माहिती सांगू** • बालकांना वर्तुळाकार बसवून टाळ्यांची संख्या व अपेक्षित माहिती यांविषयी मार्गदर्शन करावे. बसलेल्या बालकांनी जेवढ्या टाळ्या वाजतील. त्याप्रमाणे माहिती सांगावी. उदाहरणार्थ, एक टाळी – शाळेचे नाव सांगा, दोन टाळ्या – कुटुंबातील व्यक्तींची संख्या सांगा, तीन टाळ्या – बाबा काय करतात ते सांगा.

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">मनोमय व विज्ञानमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">रंग, आकार, कपडे, खाऊ, कोणत्या गावाला जायला आवडते याबद्दल चर्चा करावी.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">मी, माझे कुटुंब व परिसर</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">दिव्यांग बालकांनासुद्धा प्रश्न विचारून सहभागी करून घ्यावे.</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-4 बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.
CG-4.1 कुटुंब आणि समाजाचा एक घटक या नात्याने स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्वतःला ओळखायला सुरुवात करतो.
अ) LO - 4.1.1 स्वतःची स्वतंत्र व्यक्ती म्हणून ओळख दर्शवतो आणि आवड सांगतो. (उदाहरणार्थ, आवडता शर्ट, बॅग, वस्तू)
अ) LO - 4.1.2 स्वतःचे नाव व आडनाव सांगतो.
ब) LO - 4.1.2 स्वतःच्या ओळखीबाबतची इतर माहिती देतो. जसे, पालकांचे नाव.
ब व क) LO - 4.1.1 स्वतःला कुटुंब, शेजारी, शाळा आणि शहर यांचा एक घटक म्हणून ओळखतो. जेथे वेगवेगळ्या व्यक्ती वेगवेगळ्या भूमिका निभावत असतात.
क) LO - 4.1.2 ओळखी बाबतची वैयक्तिक माहिती देतो. जसे, घरचा पत्ता, कुटुंबातील व्यक्तींची माहिती, शाळेची माहिती.</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये</td><td colspan="2">बौद्धिक विकास होतो, स्वचे भान, सहकार्य, आदर भाषिक विकास स्व–कुटुंब, परिसर यांचे ज्ञान</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">• बालके स्वतःच्या वैशिष्ट्यांनुसार नाव उच्चारल्यावर उभे राहतात का? स्वतःची आवड सांगतात का?
• बालके स्वतःचे नाव व आडनाव बिनचूक सांगतात का? हे पहावे.
• बालके आपल्या कुटुंबातील नावे व्यवस्थित सांगतात का हे पहावे.</td></tr>
<tr><td colspan="3">आधारशिला कृती क्र. : 36. Guess the sound : Create, recognize and differentiate</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">आवाज ऐकू आणि ओळखू.</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">मोबाईल आणि स्पीकर्सच्या साहाय्याने प्राणी, पक्षी, वाहने असे विविध आवाज.</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
कृती : परिसरातील विविध आवाज ऐकणे आणि वेगळेपण ओळखणे. **कृती १ :** • ताईने मोबाइल आणि स्पीकर्सच्या साहाय्याने प्राणी, पक्षी, वाहने असे विविध आवाज ऐकवावे. • आवाज ऐकवून झाल्यावर कोणता आवाज कशाचा आहे, असे ताईने बालकांना विचारावे. • बालकांना रोज ऐकत असणाऱ्या विविध आवाजांबद्दल ताईने विचारणे आणि आवाज काढून दाखवायला सांगावे. • प्राणी, पक्षी यांचे आवाज बालकांना काढायला सांगावे. • विविध वस्तूंनी आवाज करायला सांगावे.	**कृती : वस्तू/वाद्य यांचे विविध पातळीतील आवाज ऐकणे.** • वरील साहित्यापैकी कोणतेही साहित्य वापरून ताई आधी हळू आवाज ऐकवेल. • त्यानंतर आवाजाची पातळी वाढवून वस्तूचा आवाज ऐकवेल. • खूप मोठ्या आवाजात वस्तूचा आवाज ऐकवेल. • ताई वस्तू वापरून ज्या पातळीचा आवाज करेल तो ऐकून बालकांनी त्याच पातळीच्या आवाजात टाळ्या वाजवण्याची कृती करावी. • बालकांना विविध पातळीमध्ये पक्षी, प्राणी यांचे आवाज काढायला सांगावे.	**कृती : मध्यम आवाज ओळखणे.** • वरील पैकी एक वस्तू वापरून तीन पातळ्यांमध्ये त्या वस्तूचा आवाज ताईने करून दाखवावे. • मध्यम पातळीचा आवाज ऐकू आला, की बालकांनी ताईला आवाज थांबवायला सांगावे. • बालकांचे गट करून गटांमध्ये तीनही पातळ्यांमधील विविध आवाज (प्राणी, पक्षी) काढायला सांगावे.

पंचकोश	
अन्नमय, प्राणमय कोश	
विविधता	परिसरातील आवाज, ओल्या-वाळलेल्या पानांचे, कागदांचे, प्लॅस्टिक पिशव्यांचे आवाज ऐकवावे. नादाच्या तीव्रतेसाठी स्टीलच्या ताटल्या, भांडी, वाट्या, चमचे, यादवारे ही खेळ घ्यावेत, वाद्यांचे आवाज, प्राण्यांचे आवाज
थीम/विषय	पाणी-पाऊस, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, वाहन
ताईसाठी सूचना	• आवाज ऐकवण्यासाठी मोबाइल फोनचा व साहित्याचा वापर करावा. श्रवणदोष असणाऱ्या विशेष बालकांसाठी हावभाव करून त्यांना सांगावे.
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-2** बालके ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात. **CG-2.3** आवाजातील चढ-उतार (आरोह-अवरोह) सूर-ताल-लय यांनुसार आवाजातील फरक ओळखतो. **अ)LO - 2.3.1** मानव, प्राणी, वाहने, टाळ्या यांचा आवाज, पाण्याचा आवाज, वस्तूंचा आवाज, इत्यादी. वातावरणातील आवाज यातील वेगळेपणा ओळखतो.

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
	ब) LO - 2.3.1 पक्षी, प्राणी, वाद्य आणि मानवी आवाज यांच्या आवाज पातळीमधील चढ–उतारातील फरक ओळखतो. **क) LO - 2.3.1** आवाजाच्या पातळीमधील माध्यम स्वर ओळखतो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	श्रवणक्षमता, वर्गीकरण	
निरीक्षण करावयाच्या बाबी	• परिसरातील विविध प्रकारचे आवाज ओळखता येतात की नाही, हे पाहणे. • बालके विविध पातळीमधील आवाज ओळखू शकतात की नाही, हे पाहणे. • बालके तीनही पातळीतील आवाज ओळखू शकतात की नाही, ते पाहणे.	
आधारशिला कृती क्र. : 37. Who Am I? : Guess, Identify and describe object		
उपक्रमाचे नाव	ओळखा मी कोण? भाषिक कोडी	
उपक्रमाला लागणारे साहित्य	खिडकी, फळा इत्यादींची चित्रे, चित्रकार्ड	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
• खिडकी, फळा इत्यादींची चित्रे बालकांसमोर ठेवावीत. • बालकांना वर्गातील वस्तूंची नावे भाषिक कोडी तयार करून विचारावी. उदाहरणार्थ, माझा रंग आहे काळा त्यावर तुम्ही खडूने लिहिता ओळखा मी कोण? • माझे नाव सुरू होते 'क' पासून मी आहे फूल पाण्यात येणारे. ओळखा मी कोण? • मी आहे भिंतीवर बटण दाबताच तुम्हाला देतो उजेड. ओळखा मी कोण?	• ताईने बालकांना फळांबद्दल फुले, प्राणी कोडी तयार करून विचारावी. • भाषिक कोडी : ➢ माझा रंग आहे पिवळा मला सोलून खातात. ओळखा मी कोण? (केळी) ➢ मी आतून असतो लाल वरून हिरवा, माझ्यात असते पाणी खूप. ओळखा मी कोण? (कलिंगड) ➢ माझा रंग आहे केशरी. ओळखा मी कोण? (संत्री) ➢ माझे नाव आहे 'प' या अक्षरावरून ओळखा मी कोण? (पपई) ➢ काटेरी माझे अंग, हिरवा माझा रंग, ओळखा मी कोण? (फणस) ➢ वर्गातील वस्तू, परिसरातील व्यक्ती, फळे, फुले, प्राणी, पक्षी यांची कोडी विचारावीत. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	
पंचकोश		
मनोमय, प्राणमय व विज्ञानमय कोश		
विविधता	प्राणी, पक्षी, भाज्या, फुले, वस्तू इत्यादी	
थीम/विषय	भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन	

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">कृतिपुस्तिकेतील कृती करून घ्यावी.</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-7 बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात.
C7.1 वेगवेगळ्या वर्गातील/गटातील वस्तूंमधील फरक व वस्तूंचा एकमेकाशी संबंध यांचे निरीक्षण करतो व समजून घेतो.
अ) LO - 7.1.1 वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी घटना इत्यादी इतरांच्या मदतीने नावांसहित ओळखतो.
ब) LO - 7.1.1 वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी घटना इत्यादी नावासहित ओळखून स्वतः त्याचे वर्णन करतो.
क) LO - 7.1.1 लगतच्या परिसरातील वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी, आणि त्यांच्या प्रतिकृती चित्रे ओळखतो. त्याची सर्वसाधारण वैशिष्ट्ये सांगतो/वर्णन करतो. (उदाहरणार्थ, घराचा मोठा दरवाजा)</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये</td><td colspan="2">भाषिक कोडी सोडवता येणे, वर्णनावरून प्राणी, पक्षी, भाज्या, फुले, व्यक्ती हे ओळखणे.</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">भाषिक कोडी सोडवता येतात का? वर्णनावरून प्राणी, पक्षी, भाज्या, फुले, व्यक्ती हे ओळखता येतात का?</td></tr>
<tr><td colspan="3">आधारशिला कृती क्र. : 38. Playing with sounds : Identify and differentiate beginning andending sound</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">शब्दातील ध्वनी ओळखूया.</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">–</td></tr>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>गाण्यातील सारखे शब्द ओळखूया.
• ताईने ओळीच्या शेवटी समान आवाज ऐकू येणारे शब्द असणाऱ्या बडबडगीतांचा संग्रह करावा.
• संग्रहातील बडबडगीत ऐकवल्या नंतर ओळीच्या शेवटी ऐकू येणाऱ्या शब्दांमध्ये सारखेपणा आहे, हे लक्षात आणून द्यावे.</td><td>गाण्यातील सारखे शब्द ओळखूया.
• ताईने ओळीच्या शेवटी समान आवाज ऐकू येणारे शब्द असणाऱ्या बडबडगीतांचा संग्रह करावा.
• संग्रहातील बडबडगीत ऐकवल्या नंतर ओळीच्या शेवटी ऐकू येणाऱ्या शब्दांमध्ये सारखेपणा आहे, हे लक्षात आणून द्यावे.</td><td>• बालकांना समान ध्वनी असणाऱ्या शब्दांची काही उदाहरणे द्यावीत. बालकांना शब्दाच्या सुरुवातीला समान ध्वनीने सुरू होणारे शब्द सांगण्यास सांगावे.
• अशा समान ध्वनींचे शब्दचक्र तयार करून घ्यावे. मुलांनी सांगितलेले शब्द फळ्यावर लिहावेत.</td></tr>
</table>

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr>
<td>• सुरुवातीला बालकांना अपरिचित शब्द असलेले बडबडगीत ऐकवावे.
• हे शब्द, समूहात म्हणून घ्यावे.
• हे शब्द, वैयक्तिक म्हणून घ्यावे.
• या शब्दांतील प्रथमध्वनी पुन्हा ऐकवून त्याप्रमाणे उच्चार करावयास लावावा.
• या शब्दातील अंतिमध्वनी पुन्हा ऐकवून त्याप्रमाणे उच्चार करावयास लावावा.
• बालकांना त्यांच्या परिचयातील शब्द ऐकवावे.</td>
<td>• बालकांना यमक साधणारी शब्दयोजना असणारे बडबडगीत सोबत गाऊन घ्यावे.
• त्यानंतर वरीलप्रमाणे विविध बडबड गीते ऐकवून त्यातील यमक असणारे शब्द ओळखण्याची संधी बालकांना द्यावी.
बडबड गीतातील ओळींमध्ये वारंवार येणारी अक्षरे किंवा शब्द ओळखूया.
• ताईने बडबड गीतातील ओळींमध्ये वारंवार येणारी अक्षरे किंवा शब्द असणाऱ्या बडबडगीतांचा संग्रह
• सुरुवातीला बालकांना अपरिचित शब्द असलेले बडबडगीत ऐकवावे.
• या शब्दांतील प्रथमध्वनी पुन्हा ऐकवून त्याप्रमाणे उच्चार करावयास लावावा.
• या शब्दांतील अंतिमध्वनी पुन्हा ऐकवून त्याप्रमाणे उच्चार करावयास लावावा.
• बालकांना त्यांच्या परिचयातील शब्द ऐकवावे.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td>
<td>• बालकांना शब्दाच्या शेवटचे ध्वनी समान असणाऱ्या शब्दांच्या जोड्या सांगण्यास सांगावे. बालकांनी सांगितलेले शब्द फळ्यावर लिहावेत.
• असे काही शब्द असणारे (यमक असणारे) बडबडगीत आठवून सांगण्यास सांगावे.
• सामूहिक पद्धतीने बडबडगीत गाऊन घ्यावे.
• बालकांना चिऊ–काऊ–माऊ, पोळी–टाळी–विळी असे शब्द म्हणून दाखवावे. बालकांना या शब्दांसारखे अधिक शब्द विचारावे, करावे व म्हणवून घ्यावे. योग्य तेथे योग्य दुरुस्ती करून हे शब्द बालकांकडून म्हणवून घ्यावे.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td>
</tr>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><th colspan="3">पंचकोश</th></tr>
<tr><td colspan="3">प्राणमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">गाणी, गोष्टी यांमधून वेगवेगळ्या शब्दांची ओळख करून द्यावी.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">पाणी–पाऊस, भाज्या व फळे, मदतनीस</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">या संदर्भात प्रकल्पनिहाय व वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्यावी. दिव्यांग बालकांनाही संधी मिळेल याची खबरदारी घ्यावी.</td></tr>
</table>

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-10 बालके भाषा एक (LI) मध्ये सफाईदारपणे वाचन व लेखन करतात.
CG-10.1 शब्दध्वनीची जाणीव होऊन शब्दध्वनी/अक्षरे शब्दात गंफुतो आणि शब्दांपासून शब्दध्वनी/अक्षरे वेगळी करतो.
अ) LO-10.1.2 शब्दांची नक्कल आणि निर्मिती करतो.
ब) LO-10.1.2 शब्दांतील प्रारंभिक आणि अंतिम अक्षरे ओळखतो.
क) LO-10.1.2 अक्षरे स्वर आणि व्यजंने यामध्ये वेगळी करतो.</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये</td><td colspan="2">• श्रवणकौशल्य, सूचना समजून पालन करणे या कौशल्यांचा विकासास मदत होईल.</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">• शब्दांची नक्कल करताना बालके शब्दध्वनींचे नीट श्रवण करत आहेत का याचे निरीक्षण करावे.</td></tr>
<tr><td colspan="3">आधारशिला कृती क्र. : 38.1 Playing with sounds : Identify and differentiate beginning and ending sound</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">शब्दातील ध्वनी ओळखूया L2</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">–</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td>• बालकांना इंग्रजी व अन्य भाषेतील गाणे ऐकण्याची व सोबत म्हणण्याची संधी द्यावी.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td><td colspan="2">ही कृती इंग्रजीसाठी आहे. L2
• ताईने इंग्रजी व अन्य भाषेतील गाणी म्हणताना ओळींमध्ये वारंवार येणारी अक्षरे किंवा शब्द असणाऱ्या इंग्रजी गीतांचा संग्रह करावा.
• सुरुवातीला बालकांना त्यांच्या परिचयातील शब्द ऐकवावे, या शब्दांतील प्रथमध्वनी पुन्हा ऐकवून त्याप्रमाणे उच्चार करावयास लावावा. या शब्दांतील अंतिमध्वनी पुन्हा ऐकवून त्याप्रमाणे उच्चार करावयास लावावा. बालकांना त्यांच्या परिचयातील शब्द म्हणण्यास सांगावे. इंग्रजी गाणी – Rabbits are Red, Action Song, Rain, The Fat Cat, Clouds</td></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">प्राणमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">गाणी, गोष्टी यांमधून वेगवेगळ्या शब्दांची ओळख करून द्यावी.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">पाणी–पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग),</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
ताईसाठी सूचना	• या संदर्भात प्रकल्पनिहाय व वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्यावी. • वेगवेगळ्या भाषेतील गाणी ताईंनी म्हणून घ्यावी.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-11** बालके भाषा दोन (L2) मध्ये वाचन आणि लेखनाचा आरंभ करतात. **C11.1** शब्दध्वनींची जाणीव होऊन शब्दध्वनी/अक्षरे शब्दात गंफुतो आणि शब्दांपासून शब्दध्वनी/अक्षरे वेगळी करतो. **क) LO-11.1.1** बडबडगीते म्हणतो. **क) LO-11.1.2** अक्षरध्वनीची नक्कल करतो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	• (Alphabet) अक्षर आणि त्याचा ध्वनी यांची सांगड घालणे आणि ते स्मरणात ठेवणे.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	• ध्वनीवरून शब्द ओळखता येतो का याचे निरीक्षण करावे.	
आधारशिला कृती क्र. : 39 smell and tell : Identify, distinguish pleasant/unpleasant		
उपक्रमाचे नाव	सुगंध व दुर्गंध समजून घेऊया.	
उपक्रमाला लागणारे साहित्य	अत्तर, फुले, साबण, पावडर, चंदन, कापूर, अगरबत्ती, परफ्यूम, साबण, कुजलेली फुले, कुजलेली पाने, कारखान्यातून निघणाऱ्या धुराचे चित्र. भाजी मंडईत सडलेल्या भाज्यांचे चित्र. कचराकुंडीचे चित्र, ओसंडून वाहणाऱ्या गटाराचे चित्र इत्यादी.	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
कृती : विविध सुगंधित आणि दुर्गंधित वस्तूंची ओळख करून देणे. • सगळ्या बालकांना वर्तुळात बसवावे. अत्तर, फुले, साबण, पावडर, चंदन, कापूर, अगरबत्ती अशा सुगंधी वस्तूंची ओळख वास देऊन प्रत्यक्ष करून द्यावी. • आणखी काही सुगंधी वस्तू, फुले, पाने यांचा सुगंध बालकांना प्रत्यक्ष द्यावा.	**कृती : विविध सुगंधित आणि दुर्गंधित वस्तूंची ओळख करून देणे.** • ताईने बालकांना वस्तूंचा वास घेऊ द्यावा आणि नाव देऊ द्यावे. • काही वेगळ्या वासाच्या वस्तू शोधा. जसे : अत्तर, साबण, कुजलेली फुले, कुजलेली पाने इत्यादी. • बालकांना त्यांचे डोळे बंद करण्यास सांगा आणि एक–एक करून त्यांना वास घेण्यासाठी वस्तू द्या.	• बालकांना वर्तुळात बसवून विविध धोकादर्शक गंध निर्माण होणाऱ्या स्रोतांची चित्रे दाखवणे व माहिती सांगणे. उदाहरणार्थ, कारखान्यातून निघणाऱ्या धुराचे चित्र. • भाजी मंडईत सडलेल्या भाज्यांचे चित्र. • कचराकुंडीचे चित्र/ओसंडून वाहणाऱ्या गटाराचे चित्र. • गाडीतील धूर, पेट्रोलपंपावरील वास, डसांची कॉईल इत्यादी.

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
• कोणकोणत्या गोष्टींचा वास/दुर्गंध आपल्याला नकोसा वाटतो, अशा गोष्टींची उदाहरणे द्यावी. उदाहरणार्थ, खराब झालेली भाजी, कचऱ्याचा डब्बा, शू केल्यावर पानी नाही टाकले तर... इत्यादी. वास ओळखूया. • बालकांना वासाची ओळख झाली की सराव घ्यावा. • बालकांना डोळे बंद करायला सांगा आणि एका-एका वस्तूचा गंध द्या. त्यानंतर सुगंध आहे की दुर्गंध हे, त्यांना ओळखायला सांगा. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	• बालकांना वासांमध्ये फरक करण्यास सांगा. फुले आणि अत्तर वास. • सुगंध आणि दुर्गंधाबद्दल चर्चा करा. कोणत्या वासाशी मिळताजुळता आहे का, हे विचारा. जसे : अत्तर काही लोकांना सुगंधी वाटते, तर काहींना त्या वासाचा त्रास होतो म्हणून त्यांना अत्तरचा दुर्गंध येतो. • गुलाब सुगंधी वास आहे, तर पेट्रोलचा वास बहुतेक लोकांसाठी आवडता आहे, तर काही लोकांना आवडत नाही याबद्दल चर्चा करावी.	• कीटकनाशक, यांच्या वासाबद्दल चर्चा करावी. • आणखी माहिती असलेल्या किंवा त्यांच्या अनुभवतील धोकादायक गंधांची चर्चा करावी.

पंचकोश	
अन्नमय, प्राणमय व विज्ञानमय कोश	
विविधता	फुले, भाज्या, मसाल्याचे पदार्थ, फळांचे असे विविध सुगंध व दुर्गंध द्यावेत.
थीम/विषय	पाणी-पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग)
ताईसाठी सूचना	प्रत्यक्ष वस्तू दाखवून ही कृती करून घ्यावी आणि सरावानंतर कृती पुस्तिकेतील कृती करून घ्यावी.
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-2** बालके ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात. **CG-2.4** वेगवेगळे गंध आणि चव यांतील फरक ओळखतो. **अ) LO-2.4.1** सुगंध आणि दुर्गंध ओळखतो. **ब) LO-2.4.1** फूल, अत्तर, खाद्यपदार्थ यांच्या सुगंधामधील फरक ओळखतो. **क LO-2.4.1** धोकादायक गंध ओळखतो. उदाहरणार्थ, धूर, सडलेली अंडी इत्यादी.
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	• सुगंध आणि दुर्गंध यांमध्ये फरक करण्याची क्षमता

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
निरीक्षण करावयाच्या बाबी	• बालकांना सुगंध आणि दुर्गंध यांतील फरक समजतो की नाही याचे निरीक्षण करावे.	
आधारशिला कृती क्र. : 40. Health and hygiene : Discussion on routine, body parts, tools to clean		
उपक्रमाचे नाव	हात स्वच्छ करूया आणि छान दिसूया.	
उपक्रमाला लागणारे साहित्य	चित्रकार्डे : साबण, हात पुसायला टॉवेल/नॅपकिन, आरसा, कंगवा	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
• गोष्टीतून हात धुण्याचे महत्त्व बालकांना सांगावे. • हात धुण्याच्या योग्य पद्धतीचे प्रात्यक्षिक करून दाखवावे. • चित्रफीत किंवा फ्लॅशकार्ड दाखवावे. • बालकांशी चर्चा करावी. • 'शी' करायला जाण्यापूर्वी व नंतर इतरांची मदत घेऊन हात धुवायला व पुसायला सांगावे. • जेवणापूर्वी व नंतर इतरांची मदत घेऊन हात धुवायला व पुसायला सांगावे. • डोळ्यांची स्वच्छता, नाकाची स्वच्छता, पायांची स्वच्छता, डोळे, नाक व पाय या इतर अवयवांची स्वच्छता करण्याच्या योग्य पद्धतीचे प्रात्यक्षिक करून दाखवणे.	• जेवणापूर्वी व जेवणानंतर हात स्वच्छ धुणे व पुसणे या क्रियांसाठी बालकाला नियमित प्रोत्साहित करत रहावे. • 'शी' करायला जाण्यापूर्वी व नंतर हात धुवायला व पुसायला ताईने नियमित सांगत रहावे. • बालकांकडून योग्य पद्धतीने हात धुण्याची क्रिया नियमित करून घ्यावी. • **आवश्यक पूर्वतयारी :** वर्गात आरसा, कंगवा अशा वस्तू ठेवाव्या. **छान दिसूया** • टुथब्रश, कंगवा, दप्तर अशा स्वतःच्या वस्तूंचा नीटनेटकेपणान वापर कसा करावा, हे कृती/गोष्टींच्या स्वरूपात दाखवावे. • आरसा, कंगवा या वस्तू बालकांना वापरण्यास सांगाव्या व वापरून झाल्यावर जाग्यावर ठेवण्यास सांगावे. • गोष्टीतून स्वच्छता व छान दिसण्याचे महत्त्व सांगावे. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	• टुथब्रश, कंगवा, दप्तर अशा स्वतःच्या वस्तूंचा नीटनेटकेपणाने वापर कसा करावा, हे कृती/गोष्टींच्या स्वरूपात दाखवावे. • आरसा, कंगवा अशा वस्तू बालकांना वापरण्यास सांगाव्या व वापरून झाल्यावर जाग्यावर ठेवण्यास सांगावे. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td colspan="3" align="center">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3" align="center">अन्नमय, मनोमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">जेवणाच्या आधी-नंतर, शाळेतून घरी गेल्यावर, मातीत खेळून आल्यावर हात स्वच्छ करायला सांगावे.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">मी, माझे कुटुंब, परिसर व ऋतू</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">या संदर्भात प्रकल्पनिहाय व वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्यावी. दिव्यांग बालकांनाही सहभागी करून घ्यावे.</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-1 बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात.
C-1.2. स्वतःची मूलभूत काळजी आणि स्वच्छता यांचा अवलंब करतो.
अ) LO-1.2.1 शौचाला जाण्यापूर्वी व नंतर, तसेच जेवणापूर्वी व नंतर इतरांची मदत घेऊन हात धुतो आणि पुसतो.
ब) LO-1.2.1 शौचाला जाण्यापूर्वी व नंतर, तसेच जेवणापूर्वी व नंतर, हात धुतो आणि पुसतो. या क्रिया स्वतःहून करण्यास सुरुवात करतो.
ब) LO-1.2.3 स्वतःहून वैयक्तिक वापराच्या वस्तूंचा योग्य वापर करतो.
क) LO-1.2.3 स्वतःहून वैयक्तिक वापराच्या वस्तूंचा योग्य वापर करतो.</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये</td><td colspan="2">स्वतःच्या अवयवांची स्वच्छता राखण्याची क्षमता विकसित होईल.</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">बालक स्वतःची योग्य पद्धतीने स्वच्छता करत आहे की नाही याचे निरीक्षण करावे व त्याप्रमाणे बदल सुचवावे.</td></tr>
<tr><td colspan="3" align="center">आधारशिला कृती क्र : 41. Our community helpers: Name, identify role, tools used</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">आपले मदतनीस व व्यावसायिक</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">मदतनीसांची चित्रकार्डे</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td>• आपले मदतनीस –
परिचय कुटुंबातील व्यक्तींच्या माध्यमातून समाजातील विविध मदतनीसांची ओळख चित्र कार्डाच्या माध्यमातून घ्यावी.
• गप्पा गाष्टीतून मदतनीस व्यावसायिक, त्यांचे काम,</td><td colspan="2">• मदतनीस-ओळख
विविध मदतनीसांना/व्यावसायिकांना अंगणवाडी/बालवाडीत बोलावून मुक्त गप्पा गोष्टी करण्यास प्रोत्साहित करावे. मदतनीसांना लागणाऱ्या वेगवेळ्या अवजारांची साधनांची माहिती बालकांना द्यावी.
• जोड्या लावा –
मदतनीस व साहित्य व्यावसायिक आणि त्यांची अवजारे यांच्या चित्रकार्डाच्या जोड्या लावून घ्यावात.</td></tr>
</table>

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>कामाचे ठिकाण आपल्याला होणारी मदत याविषयी माहिती द्यावी.</td><td colspan="2">मदतनीस/व्यावसायिक यांची आपल्याला होणारी मदत यावर गप्पा माराव्यात.
• मदतनीस/व्यावसायिक यांना अंगणवाडीत बोलावून त्यांचा सन्मान व कौतुक करावे.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">मनोमय, विज्ञानमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">परिसरातील मदतनिसांची ओळख करून द्यावी.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">मदतनीस</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">आपल्या परिसरातील जो मदतनीस आपणास सहज उपलब्ध होईल त्याला त्याच्या कामाशी/व्यवसायाशी संबंधित साहित्य/अवजारे घेऊन बालकांशी संवाद साधण्यासाठी बोलवावे. यासंदर्भात वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-4 बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.
C-4.1 कुटुंब आणि समाजाचा एक घटक या नात्याने स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्वतःला ओळखायला सुरुवात करतो.
ब व क) LO - 4.1.1 स्वत:ला कुटुंब, शेजारी, शाळा आणि शहर यांचा एक घटक म्हणून ओळखतो. जेथे वेगवेगळ्या व्यक्ती वेगवेगळ्या भूमिका निभावत असतात.</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये</td><td colspan="2">भाषिक कौशल्ये, स्वत:भोवतीच्या व्यक्ती व वस्तूंची माहिती घेण्याची क्षमता</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">• विविध मदतनीस ओळखतो का? याचे निरीक्षण करावे.
• मदतनीस/व्यावसायिक यांच्याबद्दल आदरभाव निर्माण झाला का याचे निरीक्षण करावे.</td></tr>
<tr><td colspan="3">आधारशिला कृती क्र. : 41.1. Our community helpers : Name, identify role, tools used</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">मदतनीस – गप्पा व वेशभूषा शोधूया.</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">मदतनीस चित्रकार्ड</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td>• मदतनीस – वेशभूषा कशी असते याचे काही चित्र/फोटो दाखवावे.</td><td>मदतनीसांशी गप्पा
• समाजातील वेगवेगळ्या मदतनीसांना उदाहरणार्थ,</td><td>• मदतनीस – वेशभूषा (नक्कल करणे) बालकांना बालवाटिकेत विविध मदतनिसांच्या</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
• बालकांना बालवाटिकेत पोस्टमन, शेतकरी यांच्यासारखी वेशभूषा करून दाखवावी.	फुलवाला, भाजीवाला, सुतारदादा यांना त्यांचे साहित्य घेऊन शाळेत बोलवावे. त्यांची ताईने ओळख करून द्यावी. • मदतनीसांनी आपल्या कामाची माहिती सांगत बालकांशी संवाद साधावा.	वेशभूषेत तयार होऊन येण्यास सांगावे. मदतनीस – शाब्दिक कोडी • गीतरूपी कोडी घालावी. उदाहरणार्थ, चाक मी फिरवतो, मडकी मी बनवतो भराभरा, ओळखा पाहू मी कोण?

पंचकोश	
	मनोमय, विज्ञानमय व प्राणमय कोश
विविधता	• आपल्या परिसरातील पारंपरिक कामे करणाऱ्या मदतनीसांची ओळख करून घ्यावी. • नाट्यीकरण करून घ्यावे.
थीम/विषय	मदतनीस
ताईसाठी सूचना	परिसरातील मदतनीसांना शाळेत बोलवावे. त्यांच्या कामाची ओळख करून द्यावी.
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-4** बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात. **C-4.1** कुटुंब आणि समाजाचा एक घटक या नात्याने स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्वतःला ओळखायला सुरुवात करतात. **अ) LO 4.1.1** स्वतःची स्वतंत्र व्यक्ती म्हणून ओळख दर्शवितो आणि आवड सांगतो. **ब व क) LO - 4.1.1** स्वतःला कुटुंब, शेजारी, शाळा आणि शहर यांचा एक घटक म्हणून ओळखतो. जेथे वेगवेगळ्या व्यक्ती वेगवेगळ्या भूमिका निभावत असतात. **C-4.3** इतर बालके आणि प्रौढ यांच्याशी सहजतेने संवाद साधतो. **अ व ब) LO - 4.3.1.2** परिचित मोठ्या व्यक्तींशी सहजतेने संवाद साधतो. **क) LO - 4.3.1** अल्पपरिचित मोठ्यांशी सहजपणे संवाद साधायला सुरुवात करतो.
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	भाषिक कौशल्य, स्वतः भोवतीच्या व्यक्ती व वस्तूंची माहिती
निरीक्षण करावयाच्या बाबी	विविध मदतनीस ओळखतो का? याचे निरीक्षण करावे.

आधारशिला कृती क्र. : 42. Food Chart : Name, Identify Taste, Distinguish and Healthy and Unhealthy		
उपक्रमाचे नाव	पोषक खाऊ ओळखू	
उपक्रमाला लागणारे साहित्य	खाण्यास योग्य असलेले व खाण्यास अयोग्य असणारे पदार्थ/चित्रकार्डे जसे : फळे, पाणी, दूध, कागद, टरफले, खडू, पेन्सिल इत्यादी.	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
१ : कुरकुर की कचकचकच चकचक? • चित्रकार्डांच्या साहाय्याने दिलेल्या पदार्थांतून योग्य पदार्थ निवडण्यास सांगावे. जसे : पोळी - ब्रेड, दूध - बाटलीबंद दूध, घरातील पदार्थ- बाजारातील पदार्थ, यांप्रमाणे उदाहरणे देऊन योग्य पदार्थ निवडीस संधी द्यावी. • खाताना पाकीटबंद पदार्थाचा आवाज कसा येतो? - कुरकुर काकडी/फळे/पोळी खाताना आवाज कसा येतो? चकचक कुरकुर करायची नाही-म्हणजेच पाकीटबंद, पोषणमूल्ये नसलेले पदार्थ खाऊ नये. • चकचक करायचे - म्हणजेच काकडी, गाजर, फळे, पोळी इत्यादी पदार्थ पोषक असतात. ते खायचे शक्ती मिळते/मिळत नाही, पोषक खाद्यपदार्थ जसे की भात, भाजी, पोळी आणि	**१ : पोषक शिदोरी** • ताईने बालकांना डब्यात रोज वेगवेगळे पदार्थ आणण्यास सांगावे. पोषक आहार मिळत असेल, तर पालकांना घरी पदार्थ करण्यास सांगावे. उदाहरणार्थ, पालेभाजी, डाळ/वरण/आमटी, भाकरी इत्यादी. • बालकांना काय आणले/खाल्ले, तो पदार्थ कशाचा बनवला होता, ते विचारावे. तो पदार्थ का पोषक आहे, ते सांगावे आणि सरावाच्या वेळी बालकांना पोषक पदार्थ सांगता येतात का ते पहावे. **२ : पोषक शिदोरी - चित्र** • ताईने पदार्थाचे चित्र दाखवून तो पदार्थ पोषक आहे की नाही आणि त्याचे कारण विचारावे. • रंगीत शिदोरी - ताईंनी घरून बालकांना वेगवेगळ्या रंगाचे पदार्थ आणण्यास सांगावे व त्यांचे पोषणमूल्य सांगावे. लाल/	**१ : अन्नघटक ओळख.** • ताईने वर्गात वेगवेगळ्या अन्नघटकांची ओळख करून द्यावी. उदाहरणार्थ, भात, पोळी यांनी सगळ्या शरीराला साखर आणि त्यातून शक्ती मिळते. अंडी, डाळी, मोड आलेली कडधान्ये यातून हातांना आणि पायांना शक्ती मिळते, बळकटी येते. तूप, तेल यांमुळे शरीराला गरम राहायला मदत होते. फळे आणि भाज्या यांतून क्षार आणि जीवनसत्त्वे मिळतात आणि पोट साफ व्हायला मदत होते. **२ : वर्गीकरण खेळ** • सकस अन्न खाद्यपदार्थांचे वर्गीकरण वेगवगेळ्या खेळातून घ्यावे. उदाहरणार्थ, चित्रे वर्तुळात ठेवावी. वर्तुळावर बालकांना बसवावे. संगीताच्या तालावर चेंडू एकेका बालकाला पुढे द्यायला सांगावा. संगीत थांबले की, बालकाला एक चित्र घेऊन वर्गीकरण करायला सांगावे. गुणवैशिष्ट्ये सांगण्यास सांगावे.

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
अपोषक खाद्यपदार्थ उदाहरणार्थ, पिझ्झा, बर्गर, पास्ता, बिस्कीट, कुरकुरे, बटाटा वेफर्स, चॉकलेट या पदार्थांची चित्रे दाखवा. पोषक पदार्थ दाखवला की, 'शक्ती मिळते' असे म्हणायला सांगावे आणि अपोषक पदार्थ दाखवला की, 'शक्ती मिळत नाही' ते सांगण्यास सांगावे. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	केशरी (टोमॅटोची कोशिंबीर, पपई, गाजर कोशिंबीर) हिरवा (पालेभाजी, काकडी कोशिंबीर) पांढरा (ज्वारी, तांदूळ भाकरी, भात, मुळ्याची कोशिंबीर) **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	

पंचकोश	
अन्नमय कोश	
विविधता	घरी वेगवेगळ्या खाऊच्या कृती करायला सांगाव्यात. चित्रपत्ते दाखवून कोणते अन्न आपल्याला चांगले किंवा वाईट आहे हे सांगावे.
थीम/विषय	पाणी–पाऊस, भाज्या व फळे,
ताईसाठी सूचना	या संदर्भात वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्याव्यात.
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-1** बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात. **C-1.1** पोषक आहाराबाबत रुची आणि समज दर्शवतो व अन्नपदार्थ वाया घालवत नाहीत. **अ) LO-1.1.1.1** खाण्यायोग्य आणि खाण्यास अयोग्य अन्नपदार्थ ओळखतो. **अ) LO-1.1.1.2** मोठ्यांच्या सूचनेप्रमाणे वेगवेगळे अन्नपदार्थ खाण्यास सुरुवात करतो व त्यांची नावे सांगतो. **अ)LO-1.1.2** आरोग्यास पोषक आणि अपायकारक अशा काही पदार्थांची नावे सांगतो. **ब) LO-1.1.2.1** दुकानातील आरोग्यासाठी पोषक आणि अपायकारक अन्नपदार्थ स्पष्ट करतो. **ब) LO-1.1.2.1** काही पदार्थ पोषक असण्यामागाची कारणे स्पष्ट करतो.

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
	ब) LO - 1.1.2.1 वेगवेगळ्या खाद्यपदार्थांतील अन्नघटक ओळखतो आणि त्यांचे फायदे व तोटे स्पष्ट करतो. ब) LO - 1.1.2.2 पोषक आहाराची काही गुणवैशिष्ट्ये सांगतो. (अंडी आणि डाळी शरीरास शक्ती देतो. पालकाची भाजी रक्त शुद्ध करते. दुधामुळे दात मजबूत होतात.)	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	• पोषक आणि अपायकारक अन्नपदार्थ स्पष्ट होणे. • रुची विषयक समज दर्शवते. • आहारज्ञान होते.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	पोषक आणि अपायकारक अन्नपदार्थ यांची नावे सांगता येतात का, याचे निरीक्षण करावे.	
आधारशिला कृती क्र. : 43. Family : Talk about relationships, draw family tree, role play		
उपक्रमाचे नाव	माझे कुटुंब	
उपक्रमाला लागणारे साहित्य	चित्रपत्ते, पपेट, फोटो इत्यादी.	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
• बालकांना कुटुंबाचा फोटो आणावयास सांगावे. • बालकांना वर्तुळाकार बसवावे. घरी कोण कोण आहे, हे विचारावे. • बालकांशी अनौपचारिक गप्पा माराव्यात. • फोटोत कोण कोण आहे हे विचारावे. फोटोतील व्यक्तींची नावे विचारावी. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	• बालकांना चित्रकार्ड, पपेट यांच्या साहाय्याने आई, बाबा, आजी, आजोबा, दादा, ताई, बहीण, भाऊ, बाळ यांची कार्डे/पपेट्स दाखवावी. • ताईने तिच्या घरी कोण कोण आहे, ते सांगून तशी चित्रकार्डे, पपेट्स उचलावी. • एकेका पपेट/कार्डला हातात धरून त्या व्यक्तीचे नाव सांगावे. • प्रत्येक बालकाला त्याच्या घरातील व्यक्तींची चित्रकार्डे, पपेट्स उचलण्यास सांगावे.	• पालक मेळावा भरवताना कुटुंबातील सर्वांना आमंत्रित करावे. बालकाला कुटुंबातील व्यक्तींची नावे विचारावी. • सांगा सांगा, लवकर सांगा, माझ्या आजीचे नाव सांगा, असा खेळ घेता येईल. • बालकांकडून घरातील माणसांचे चित्र काढायला सांगून नावे विचारून घेता येईल. • फॅमिली ट्री – कुटुंबातील व्यक्तींचे फोटो लावणे, नावे लिहिणे, आई, वडील, आजी-आजोबा, काका-

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
	• प्रत्येक बालकाला त्याच्या घरातील व्यक्तींची नावे सांगण्यास, त्यांच्याबद्दल बोलण्यास प्रोत्साहित करावे.	काकू भाऊ–बहीण, आत्या यांचे फोटो लावून फॅमिली ट्री तयार करणे. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**

पंचकोश कोश	
मनोमय कोश	
विविधता	• नाट्यीकरण खेळ घेऊन किंवा फॅन्सी ड्रेस घेऊन वेगवेगळ्या भूमिकेत अंगणवाडीत यायला सांगावे. • गाणे – लवकर साळूबाई, मामा येतो.
थीम/विषय	मी माझे कुटुंब व परिसर
ताईसाठी सूचना	घरातील व्यक्तींचे फोटो उपलब्ध न झाल्यास बालकांकडून चित्रे काढून घ्यावी. यासंदर्भात वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-4** बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात. **C-4.3** इतर बालके आणि प्रौढ यांच्याशी सहजतेने संवाद साधतो. **अ व ब) LO-4.3.1.1** कुटुंबातील जवळच्या ठरावीक सदस्यांना ओळखतात, नावे सांगतात.
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	बौद्धिक विकास, भाषिक, सामाजिक – भावनिक विकास होण्यास मदत होईल.
निरीक्षण करावयाच्या बाबी	• बालक कुटुंबातील किती आणि कोणत्या व्यक्तींना ओळखते? नाते सांगता येते का? याचे निरीक्षण करावे. • मोठ्यांचा आदर बाळगतो का? याचे निरीक्षण

आधारशिला कृती : 44 Daily Routine : Talk, Identify, Relate time of day and other activities.

उपक्रमाचे नाव	दिनचर्या
उपक्रमाला लागणारे साहित्य	दिनचर्या दर्शविणारे विविध चित्रकार्ड

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
• ताईने दिनचर्यादर्शक काही चित्रकार्डे बालकांना दाखवावीत. चित्रातील बाबींसंदर्भात चर्चा	• बालकांकडून वयोगट ३ ते ४ वर्षे च्या कृती करून घ्याव्यात.	**कृती १ : गोष्ट सांगूया.** • ताईने बालकांना एक गोष्ट ऐकवावी. बालकांनी ऐकलेली गोष्ट

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
करावी. चित्रातील गोष्टी आपण कधी करतो, यांवर प्रश्न विचारावेत. • सकाळी उठल्यापासून काय काय केले यांवर चर्चा करावी. ताईने आधी तिची दिनचर्या सांगावी, बालकांना एक एक करून दिनचर्या विचारावी. • दिनचर्येची चित्रकार्डे उलटसुलट ठेवावीत. सकाळी उठण्यापासून केल्या जाणाऱ्या कृतींच्या आधारे त्यांचा योग्य क्रम लावण्यास सांगावे. • ताईने बालकांना काही प्रश्न विचारावेत. उदाहरणार्थ, आपण शाळेत कधी येतो? चंद्र आकाशात कधी दिसतो? सूर्य आकाशात कधी दिसतो? • याप्रमाणे, ताईने बालकांना जेव्हा अंधार होतो, सूर्य मावळतो तेव्हा रात्र होते आणि जेव्हा सूर्य उगवतो तेव्हा दिवस होतो, यावर चर्चा करावी. • याप्रमाणे आपण दिवसा काय काय करतो, रात्र झाल्यावर कोणत्या कृती करतो, यावर चर्चा करावी. • वेगवेगळी दिवस आणि रात्र असलेली चित्रे घेऊन, त्यावरून वर्गीकरण करून, खेळ घेणे. उदाहरणार्थ, झोपतो, ट्यूब लावतो, अंघोळ इत्यादी.	• बालकांना आपण दिवसभरात कोणती कामे सकाळी, कोणती कामे दुपारी व कोणती कामे संध्याकाळी करतो, यांविषयी प्रश्न विचारून त्यांच्याशी गप्पा माराव्यात. • दिवसाच्या वेगवेगळ्या वेळांत घरातील कोणकोणत्या व्यक्ती काय काय करतात या संदर्भात चर्चा करावी. • बालकांशी बोलताना आधी व नंतर या शब्दांचा/संकल्पनांचा वापर करावा. • बालकांशी बोलताना काल तुम्ही काय केले? परवा कुठे गेला होतात? उद्या काय करणार आहात? आज काय भाजी आणली आहे? असे कालवाचक शब्द वापरून प्रश्न विचारावेत व गप्पा माराव्यात.	स्वभाषेत क्रमश: सांगण्यास सांगावे. आवश्यकता असल्यास ताईंनी मदत करावी. • ऐकलेली गोष्ट त्याच पात्रांसकट, तशाच क्रमाने बालकाने सांगितली पाहिजे, असा अट्टहास न करता बालकाला त्याच्या भाषेत त्याला वाटते तशी सांगू द्यावी. • गोष्टीच्या आधारे मुलांना आधी काय झाले? नंतर काय झाले? अशा प्रश्नांच्या आधारे आधी व नंतर या संकल्पनांची ओळख करून द्यावी. • बालकांना पुठ्ठ्याचे घड्याळ खेळायला द्यावे. त्याआधारे बालकांना एकमेकांना घड्याळा-तील वेळ ओळखायला सांगण्याचा खेळ खेळण्यास संधी द्यावी.

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
पंचकोश		
विज्ञानमय कोश		
विविधता	बालकांना वर्तुळाकार बसवावे. प्रत्येकाच्या हातात सकाळी उठल्यापासून पार पाडल्या जाणाऱ्या दिनचर्येच्या चित्रांची कार्डे द्यावीत. सर्वांत पहिले कार्ड कोणते असेल, असे बालकांना विचारावे. त्या बालकापासून पुढे क्रमाने करायच्या कृतींचे चित्र ज्याच्याकडे असेल, ती मुले पुढे पुढे बसत जातील, जागा बदलत जातील म्हणजे पहिले कार्ड जर सकाळी झोपून उठण्याचे असेल तर शेवटचे कार्ड रात्री झोपण्याचे आले पाहिजे.	
थीम/विषय	मी माझे कुटुंब व परिसर, ऋतू	
ताईसाठी सूचना	–	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-8** बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात. **C-8.4** चढत्या आणि उतरत्या क्रमाने ९९ पर्यंतच्या संख्यांची मांडणी करतो. **अ) LO-8.4.1** परिचित वस्तू, घटना क्रमाने सांगतात. उदाहरणार्थ, दैनंदिन दिनचर्या, कथा, आकार. **CG-7** बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात. **C-7.2** निसर्गाच्या निरीक्षणातून कार्यकारणभाव समजून घेऊन, तो दर्शविणारी साधी परिकल्पना मांडतो व त्याच्या स्पष्टीकरणाकरिता/पडताळणीकरिता निरीक्षर१०१णाचा आधार घेतो. **अ) LO-7.2.3** दिवस–रात्रीत फरक करतो. **क) LO-7.2.3.2** दिवस–रात्रीचा संबंध, सूर्योदय आणि सूर्यास्त यांच्याशी संबंध जोडतो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	दिनचर्येचा घटनाक्रम सांगता येणे.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	दिनचर्येचा तर्कसंगत घटनाक्रम व्यक्त करतो का?	
आधारशिला कृती क्र. : 45 Road safety : Understand and role play rules		
उपक्रमाचे नाव	पादचारी नियम	
उपक्रमाला लागणारे साहित्य	रहदारी चिन्हे, खडू, रांगोळी, चुना, खेळणीतील वाहने, कार्यपुस्तिका	

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
कृती : ट्रॅफिक सिग्नल खेळ • लाल, पिवळा व हिरवा हे सिग्नल समजणे. मुलांना सहज दिसतील व समजतील अशाप्रकारे (खडू, रांगोळी, चुना) रस्ते व चौक आखावेत. • चौकामध्ये झेब्रा क्रॉसिंग आखावे. बालकांना लाल सिग्नल म्हणजे थांबा, पिवळा म्हणजे सावधपणे चाला व हिरवा म्हणजे पुढे जा, असे सिग्नलचे अर्थ समजावून सांगावेत. • रस्त्याने चालताना मोठ्यांचा हात धरून चालावे. • बालकांना खेळण्यातील गाड्या घेऊन रस्त्यावर चालायला सांगावे. ताईंनी लाल सिग्नल दाखवावा व क्रॉसिंग लाईनच्या पूर्वी थांबण्याची सूचना करावी, पिवळा सिग्नल दाखवावा व बालकांना सावधपणे पुढे जाण्यास सांगावे. नंतर हिरवा सिग्नल दाखवावा व बालकांना पुढे जाण्यास सांगावे. बालकांना सिग्नल चांगले समजल्यावर वर्गातील एखाद्या बालकाला सिग्नल दाखवण्यास सांगावे.	**कृती : रस्त्याच्या उजव्या बाजूने चालू** • वर्गामध्ये किंवा वर्गाबाहेर खडूने सरळ तसेच वळणावळणांचा रस्ता आखावा. • बालकांना रस्त्याच्या उजव्या बाजूने चाला अशी सूचना द्यावी. 'उजव्या बाजूने चालल्यावर आपल्याला समोरून येणारी वाहने दिसतात व अपघात होत नाहीत' • ताईने उजव्या बाजूने म्हणजे कोठून ते चालून दाखवावे. मुलांना रस्त्यावर विविध ठिकाणी उभे करावे. • ताईने टाळ्या वाजवल्यावर बालकांनी रस्त्याच्या उजव्या बाजूला येऊन, चालायला सुरुवात करावी. • टाळ्या वाजवायचे थांबल्यावर बालकांनी रस्त्याच्या बाहेर जाऊन उड्या मारायला आणि टाळ्या वाजवायला सुरुवात केल्यावर पुन्हा उजव्या बाजूने चालायला सुरुवात करावी. • रस्ता ओलांडताना दोन्ही बाजूला पहावे. मोठ्यांचा हात धरून रस्ता ओलांडावा. • रस्ता संपल्यावर उलट्या दिशेने चालण्यास सुरुवात करावी तेव्हा डावी बाजू कोणती आहे, हे बालकांच्या लक्षात आणून द्यावे.	**कृती १ : झेब्रा क्रॉसिंगचा खेळ** • झेब्रा क्रॉसिंग व क्रॉस लाईन आखावी. बालकांना खेळण्यातील गाड्या घेऊन रस्त्यावर चालवायला सांगावे. • ताईंनी लाल सिग्नल दाखवावा व क्रॉसिंग लाईनच्या पूर्वी थांबण्याची सूचना करावी. क्रॉस लाईनच्या आधी वाहने थांबल्यांवर इतर बालकांना झेब्रा क्रॉसिंगवरून रस्ता पार करण्यास सांगावे. नंतर हिरवा सिग्नल दाखवावा व बालकांना पुढे जाण्यास सांगावे. त्यावेळी बालकांना रस्ता पार करू नये, म्हणून सांगावे. नंतर पिवळा सिग्नल दाखावावा व बालकांना सावधपणे पुढे जाण्यास सांगावे. • बालकांना सिग्नल चांगले समजल्यावर वर्गातील एखाद्या बालकाला सिग्नल दाखवण्यास सांगावे. **कृती २ : रहदारी चिन्ह परिचय** • यूटर्न, अरुंद पूल आहे, पुढे शाळा आहे, पुढे दवाखाना आहे, नो पार्किंग, पुढे रेल्वे क्रॉसिंग आहे अशी चिन्हे कार्डबोर्डवर तयार करावीत. • रस्त्यावर ही चिन्हे लावावीत व बालकांना त्याचा अर्थ सांगून त्याप्रमाणे कृती करवून घ्यावी. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
पंचकोश		
अन्नमय, विज्ञानमय कोश		
विविधता	वर्गामध्ये सिग्नलचा खेळ खेळून घ्यावा.	
थीम/विषय	मदतनीस, वाहन	
ताईसाठी सूचना	अधिक संदर्भासाठी उपलब्ध कार्यपुस्तिकेचा वापर करावा. तसेच यासंदर्भात वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्याव्यात. दिव्यांग बालकांना हाताला धरून ताईने त्यांनाही खेळात सहभागी करून घ्यावे.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-1** बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात. **C-1.5** हालचालींमध्ये सहजता दाखवतो आणि योग्यरीतीने वागतो. (चालणे, धावणे, सायकल चालविणे) **अ) LO-1.5.1** रस्त्यावरील सुरक्षितता महत्त्वाची आहे, हे ओळखतो, रस्त्याने मोठ्यांचा हात पकडून चालतो. **ब) LO-1.5.1** रस्ता ओलांडताना दोन्ही बाजूला पाहतो, बरोबरच्या मुलांचे किंवा प्रौढांचे हात पकडून सुरक्षितपणे चालतो. **क) LO-1.5.1** स्वतंत्रपणे रस्ता सुरक्षिततेचे नियम पाळतो. (रस्त्याच्या कडेने चालणे, रस्ता ओलांडणे इत्यादी.) **क) LO-1.5.1.2** वाहतुकीची चिन्हे ओळखतो. (सिग्नल, झेब्रा क्रॉसिंग, यूटर्न, पूल/रेल्वेपूल इत्यादी.) **C-1.6** असुरक्षित/धोकादायक परिस्थिती समजून घेऊन मदत मागतो. **अ) LO-1.6.1** परिचित आणि अपरिचित व्यक्ती यांतील फरक ओळखतो. **ब) LO-1.6.1** परिचित आणि विश्वासू प्रौढांनी विचारपूस केल्यास वाटत असणारी अस्वस्थता व्यक्त करतो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	• सूचना समजून त्यानुसार वर्तन करणे. • निरीक्षणशक्ती, सामाजिक कौशल्यविकास, स्वयंशिस्त, यांच्या विकासास मदत, निरीक्षण करणे.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	• बालक स्वयंशिस्तीकडे जात आहे का याचे निरीक्षण करावे. • रस्ता ओलांडताना बालक नियम पाळते का?	

<table>
<tr><th colspan="3">आधारशिला कृती क्र. : 46. Things around us : Identify and describe fruits, vegetables, animals and birds.</th></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">परिसरात काय काय आहे बघूया.</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">चित्रकार्ड, कागद</td></tr>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>• ताईने बालकांना अर्धवर्तुळात बसवावे. बालकांना परिसरात फेरफटका मारायला जायचे आहे, हे सांगावे. परिसरात गेल्यावर काय काय दिसते, याचे बारकाव्याने निरीक्षण करण्यास सांगावे. वर्गात परत आल्यावर काय बघितले यावर चर्चा घ्यावी.
• परिसरातील परिचित वस्तू, ठिकाणे, व्यक्ती, प्राणी, पक्षी दाखवावेत. प्राणी, पक्षी पाहून ते काय खातात, कुठे रहातात याची चर्चा करावी. परिसरातील बाजार, दुकान, बस स्टॉप या ठिकाणाविषयी चर्चा करावी.
• गाण्याच्या माध्यमातून परिसरातील प्राण्यांचा परिचय करून द्यावा. गाणे – पहाट झाली सांगते कोण?</td><td>• ताईने बालकांना अर्धवर्तुळात बसवावे. परिसरात फेरफटका मारायला जायचे आहे, हे बालकांना सांगावे.
• परिसरात गेल्यावर काय काय दिसते याचे बारकाईने निरीक्षण करण्यास सांगावे. वर्गात परत आल्यावर काय काय बघितले यांवर चर्चा करावी. बालकांना भाज्या दाखवून उदाहरणार्थ, मेथी, बटाटा, भेंडी, टोमॅटो, पालक, भोपळा इत्यादींविषयी चर्चा करावी.
१) ही भाजी कोठे उगवते?
२) भाजीचा रंग कोणता आहे? या रंगाच्या आणखी कोणत्या भाज्यांची नावे तुम्हांला सांगता येतील?
३) तुम्हाला ही भाजी आवडते का?
४) या भाजीमध्ये बिया आहेत का?
५) ही भाजी झाडावर किंवा वेलीवर कुठे येते?
६) या भाजीला पान आहे का?
७) या भाजीचा आकार कसा आहे? असे प्रश्न बालकांना विचारावे.</td><td>• ताईने बालकांना अर्धवर्तुळात बसवावे. बालकांना परिसरात फेरफटका मारायला जायचे आहे, हे सांगावे.
• परिसरात गेल्यावर काय काय दिसते याचे बारकाईने निरीक्षण करण्यास सांगावे. वर्गात परत आल्यावर काय बघितले यावर चर्चा घ्यावी.
• पहिला दिवस : अंगणवाडीच्या आजूबाजूच्या परिसरात फेरफटका मारायला बालकांना घेऊन जावे. अंगणवाडीत आल्यावर आजूबाजूला कोणते प्राणी, पक्षी दिसतात याची यादी ताईने फळ्यावर लिहावी.
• पुढच्या आठवड्यात दुसरी परिसर भेट : अंगणवाडीच्या आजूबाजूला शेतात कोणत्या भाज्या, फळे दिसतात का, यावर चर्चा करावी. कोणकोणते प्राणी पक्षी दिसतात याची यादी वहीत लिहावी. स्वलिपीमध्ये यादी करायला सांगावी.</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
पंचकोश		
विज्ञानमय कोश		
विविधता	परिसरातील वस्तू, दुकाने, झाडे, भाजी-फळे विक्री करणारे याबद्दल चर्चा करावी. गाणी, गोष्टींच्या माध्यमातून परिचय करून द्यावा.	
थीम/विषय	भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक	
ताईसाठी सूचना	यासाठी बालकांना अंगणवाडीच्या जवळच्या परिसरात न्यावे.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-7** बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात. **C-7.1** वेगवेगळ्या वर्गातील/गटातील वस्तंमूधील फरक व वस्तूंचा एकमेकांशी संबंध यांचे निरीक्षण करतो व समजून घेतो. **अ) LO-7.1.1** वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी, घटना या इतरांच्या मदतीने नावांसहित ओळखतो. **ब) LO-7.1.1** वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी, घटना, इ. नावांसहित ओळखून स्वतः त्याचे वर्णन करतो. **क) LO-7.1.1** लगतच्या परिसरातील वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी आणि त्यांच्या प्रतिकृती, चित्रे ओळखतो, त्यांची सर्वसाधारण वैशिष्ट्ये सांगतो/वर्णन करतो. (उदाहरणार्थ, घराचा मोठा दरवाजा).	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	परिसराचा परिचय करून घेण्याची क्षमता	
निरीक्षण करावयाच्या बाबी	परिसरातील वस्तू, दुकान, झाडे, भाजी, फळे यांचे निरीक्षण करून सांगता येते का, त्यातील बारकावे सांगता येतात का, याचे निरीक्षण करावे.	
आधारशिला कृती : 47. Follow the instructions : body movements		
उपक्रमाचे नाव	ऐकून कृती करूया.	
उपक्रमाला लागणारे साहित्य	विविध आवश्यक सूचनांचा संच, संमिश्र सूचना असलेल्या सूचनापट्ट्या	
कृती १ : सूचना ऐकून कृती करणे. • बालकांना सहज सोप्या सूचना सांगव्यात. एक-एक कृती बालकाला करायला सांगावी.	**कृती : सूचनांचा खेळ** • बालकांना समजणाऱ्या त्यांच्या परिचित भाषेतील अनेक कृतींचा समावेश असलेल्या छोट्या व	**कृती १ : सूचना ऐकून कृती** • संमिश्र सूचनेनुसार मुलांना त्यांच्या मातृभाषा, परिचित भाषा, संमिश्र

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
उदाहरणार्थ, पळ, बस, उडी मारून खाली बस, उभे राहून टाळी वाजव, खा, पाणी पी, वर बघ, खाली बघ इत्यादी. • सूचनांचे पालन केल्यास प्रेरणा म्हणून टाळ्या वाजवणे अशा स्वरूपातील कृती घ्याव्यात. • सूचनेप्रमाणे कृती न जमणाऱ्या बालकांना ताईने मदत करावी. सर्व बालकांना ताईंनी संधी द्यावी. **कृती २ : सूचना-डबा** • एक सूचना-डबा करून त्यातील सूचनापट्टी बालकांना उचलायला लावून ती ताईने वाचून त्याप्रमाणे बालकांना कृती करण्यास सांगावे. सूचनेचे पालन केल्यास त्याला प्रेरणा द्यावी. • बालकांना एकमेकांना सूचना देण्यास सांगावे.	सोप्या सूचना देऊन जाणीवपूर्वक वातावरणनिर्मिती करावी. • दोन कृती, तीन कृती असलेल्या सूचना देऊन त्याप्रमाणे कृती करण्यास सांगावे. • सूचनांचे योग्य पालन केल्यास टाळ्या वाजवणे यांसारख्या कृती घ्याव्या. • विविध कृतींचा समावेश असलेल्या सूचना समजावून त्यांचे अनुकरण करून घ्यावे. उदाहरणार्थ, उड्या मार, उंच उडी मार, हात वर कर व उंच उडी मार, स्वत:भोवती गिरकी मार इत्यादी.	भाषा यांमध्ये पुनरावृत्ती न करता अनेक सूचना देणारी कामे द्यावी. • बालकांना स्पष्ट सूचना देऊन त्यांच्या मित्राला मदत करण्यास सांगावे. उदाहरणार्थ, चेंडूला लाथ मारणे, कोणत्याही एका रंगाचे नाव घेणे इत्यादी. • संमिश्र सूचना देऊन कृती करण्यास प्रेरणा द्यावी. बालके सूचनेनुसार कृती करत असताना त्यामध्ये न चुकता सहजता येण्यासाठी त्यांना मदत करावी. **कृती २ : सूचना ऐकून त्याप्रमाणे कृती करणे.** • ताईंनी बालकांना वर्गाच्या बाहेर न्यावे. ताई जशी सूचना देईल त्याप्रमाणे बालकांनी कृती करावी. ही सूचना द्यावी. उदाहरणार्थ, सशाप्रमाणे उड्या मारत जा, कावळ्याचा आवाज काढ व त्याप्रमाणे उडत जा, बेडकाचा आवाज करत उड्या मारत जा, सरपटत जा, टेबलवरून पिवळ्या रंगाची बाटली घेऊन ये, चपला ओळीत ठेव इत्यादी. • ताईने अशा वेगवेगळ्या कृतींचे खेळ घ्यावेत. बालकांना समजण्यास सोप्या जातील अशा सूचना द्याव्यात. या सूचनांचा सराव झाल्यावर थोड्या गुंतागुंतीच्या सूचना सांगव्यात.

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td></td><td></td><td>उदाहरणार्थ, कपाटातून लाल रंगाची बाटली आण. पाण्याच्या बाटल्या रंगानुसार वेगळ्या कर, फळा पुसून कापड जागेवर ठेव, तुझ्या बाटलीत पाणी भरून आण, राघवच्या शेजारी जाऊन बस. वर्गातील मुले आहेत तेवढे तेलखडू डब्यातून काढ इत्यादी.</td></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">विज्ञानमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">वेगवेगळ्या सूचनांचे खेळ घ्यावेत. वयोगटाप्रमाणे सूचना बदलत राहाव्या.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">मी, माझे कुटुंब व परिसर, पक्षी व कीटक, मदतनीस</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">दिव्यांग बालक या कृतीत सहभागी होतील यावर कटाक्ष ठेवावा.</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-9 बालके दोन भाषांमध्ये दैनंदिन संवाद साधण्यासाठी प्रभावी संवाद कौशल्ये विकसित करतात.
C-9.4 क्लिष्ट कार्य पूर्ण करण्यासाठी मौखिक सूचना समजून घेतो व इतरांना तशाच स्पष्ट तोंडी सूचना देतो.
अ) LO - 9.4.1 गृहभाषा/मातृभाषा/परिचित भाषा यांमध्ये दिलेल्या छोट्या सूचना समजून घेऊन व त्यांचे अनुपालन करतो. (उदाहरणार्थ, ठोकळे इकडे आण, हात स्वच्छ धू इत्यादी.)
ब) LO - 9.4.1 गृहभाषा/मातृभाषा/परिचित भाषा/संमिश्र भाषा यांमध्ये एकाच वेळी दिलेल्या दोन ते तीन सोप्या कृतींचा समावेश असलेल्या सूचना समजून घेऊन व त्यांचे अनुपालन करतो.
क) LO - 9.4.1 गृहभाषा/मातृभाषा/परिचित भाषा/संमिश्र भाषा यांमध्ये एकाच वेळी दिलेल्या चार ते पाच सोप्या कृतींचा समावेश असलेल्या सूचना समजून घेऊन, त्यांचे अनुपालन करतो.</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
	क) **LO - 9.4.2** साधी कामे करण्यासाठी इतर बालके व प्रौढ व्यक्ती यांना स्पष्ट सूचना देतो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	• ध्वनींची जाणीव, आकलनशक्ती, आत्मविश्वास, स्मरणशक्ती व एकाग्रता वाढण्यास मदत होईल. • श्रवणकौशल्य	
निरीक्षण करावयाच्या बाबी	• बालके सूचनेप्रमाणे ऐकून कृती करतात का हे पाहावे.	
आधारशिला कृती क्र. : 48. Who am I? : Touch, Feel and Guess		
उपक्रमाचे नाव	वस्तूवर्णन	
उपक्रमाला लागणारे साहित्य :	बालकांनी घरून आणलेली वस्तू, दगड, कापूस	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
• ताईने बालकांना अर्धवर्तुळात बसवावे. • ताईने बालकांना आदल्या दिवशी एक वस्तू आणायला सांगावी. • बालकांना त्यांनी घरातून आणलेली वस्तू घ्यायला सांगावी. • प्रत्येक बालकाला आणलेल्या वस्तूवर ५ ते ६ वाक्ये बोलायला सांगावी. • काही बालकांना मदत लागल्यास करावी. उदाहरणार्थ, वस्तू – बाहुली– वस्तूचे नाव काय आहे? बाहुलीच्या कपड्यांचा रंग कोणता आहे? • ताईने विविध वस्तू बालकासमोर ठेवाव्यात. • त्या वस्तूंना स्पर्श करण्यास बालकांना सांगावे व स्पर्श कसा आहे ते विचारावे.	• ताईने बालकांना अर्धवर्तुळात बसवावे. • ताईने बालकांना आदल्या दिवशी एक वस्तू आणायला सांगावे. • ताईने बालकांनी घरातून आणलेली वस्तू आपल्या पाठीमागे लपवावी. • बालकांना त्या वस्तूबद्दल एक एक सूचक प्रश्न विचारावा. जसे – मी आहे लांब, माझा उपयोग तुम्ही सगळे करता. असे सूचक प्रश्न विचारून बालकांना चमच्याबद्दल माहिती द्यावी. • आपण चमचा कशाकशाला वापरतो, कोण, कोण वापरतात, कुठे कुठे चमचे लागतात, सगळीकडे सारखेच चमचे असतात का? याप्रमाणे कृती घ्यावी. • सगळ्या बालकांनी आणलेल्या वस्तूंबद्दल चर्चा करावी. **वस्तूवर्णन** • बालकांना आपल्या जवळ अर्धवर्तुळात बसवावे. बालकांना दिसेल, अशी वस्तू ठेवावी. बालकांना त्या वस्तूचे वर्णन करण्यास सांगावे. टीप – वस्तूचे नाव, रंग, आकार, स्पर्श, ती कशाची बनली आहे, यांबाबत बालकांना बोलण्यास प्रोत्साहन द्यावे. त्या वस्तूचा उपयोग काय, ती कुठे असते, आपण ती केव्हा वापरतो असे प्रश्न विचारावे. • ताईंनी कठिण/कडक – मऊ, गार–गरम खरखरीत गुळगुळीत वस्तू आणण्यात व बालकांना स्पर्श करण्यास द्यावा. • स्पर्शानुसार वस्तूंचे वर्गीकरण करण्यास सांगावे.	

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
• स्पर्श सांगता आला नाही तर योग्य संज्ञा समजावून सांगावी.	• सारख्या स्पर्शाच्या वस्तू एकत्र करण्यास सांगावे. • बालके प्रथम एका शब्दात उत्तरे देतील. त्यांना त्या शब्दाचा वाक्यात सुसंगत वापर करायला सांगा. दोन-तीन वेळच्या उपक्रमांनंतर या सर्व माहितीच्या आधारे, त्या वस्तूविषयी ३-४ वाक्ये तरी सलगपणे त्यांना बोलता येतील. दिव्यांग बालकेसुद्‌धा उत्तरे देतील याकडे लक्ष द्यावे. • ३ ते ५ वस्तू मुलांना देऊन त्यातील स्पर्शाप्रमाणे क्रमवार मांडणी करण्यास सांगावे. उदा. मऊ, अति मऊ, टणक-अति टणक.	
पंचकोश		
विज्ञानमय कोश		
विविधता	**वस्तू :** पिशवी, पाटी, पातेले, चेंडू , बॅट, फळे इत्यादी. प्रकल्पांशी संबंधित वस्तू बालकांना वर्गात द्यावी. उदाहरणार्थ, पक्षी - अंडे, घरटे, पीस, पिसांची टोपी, मोराचे पीस, किटकाचे चित्र, अळीचे चित्र, मासा, आकाशाचे चित्र, झाडाचे चित्र इत्यादी. वाहन - खेळातल्या वेगवेगळ्या गाड्या प्राणी - चामड्याचा बेल्ट, पैसे ठेवायची छोटी पर्स, दुधाची रिकामी पिशवी, चिखलाचे चित्र, गुहेचे चित्र इत्यादी. भाज्या - फळे फुले - गुलाब, मोगरा, झेंडू इत्यादी.	
थीम/विषय	मी, माझे कुटुंब व परिसर, पाणी-पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू , प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस , वाहन.	
ताईसाठी सूचना	• विविध वस्तू बालकाला घरून आणायला सांगव्यात. • बालकाला मऊ, गार, खरखकीत, गुळगुळीत स्पर्श अभ्यासायला देऊन विविध प्रश्न विचारावे. या वस्तूंव्यतिरिक्त अन्य वस्तूचा स्पर्श अनुभवास देऊन त्यांना वेगवेगळ्या वस्तू गोळा करण्यास सांगावे. • विविध भाज्या, फळे यांचे स्पर्श देऊन प्रश्न विचारावे.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-2** बालके ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात. **C-2.5** विविध प्रकारच्या स्पर्शांमधील फरक करण्याची क्षमता विकसित होते. **अ) LO-2.5.1** कठीण/कडक-मऊ, गार-गरम, खरखरीत, खडबडीत, गुळगुळीत स्पर्शांमधील फरक समजतात.	

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td></td><td colspan="2">ब) LO - 2.5.1 दोन वस्तंमूधील कठीण/कडक–मऊ, गार–गरम, खरखरीत, खडबडीत, गुळगुळीत अशी स्पर्शांची तुलना करू शकतो.
क) LO - 2.5.1 तीन ते पाच वस्तूंची कठीण/कडक–मऊ, गार–गरम, खरखरीत, गुळगुळीत अशा स्पर्शानुसार क्रमवार मांडणी करू शकतात.
(उदाहरणार्थ, अति मऊ, मऊ, टणक, अति टणक)</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये</td><td colspan="2">वस्तूचा परिचय, शब्दसंपत्तीमध्ये वाढ, वस्तूचे स्वतःच्या भाषेत वर्णन, स्पर्शाने वस्तू ओळखणे या क्षमतांमध्ये वाढ होण्यास मदत होईल.</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">वस्तूची बोलीभाषेतील आणि प्रमाणभाषेतील नावे स्मरणात राहतात का? विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देतात का? वस्तूचा पोत, आकार, स्पर्शाने ओळखतात का याचे निरीक्षण करावे.</td></tr>
<tr><td colspan="3">आधारशिला कृती : 48.1 Who am I? : Touch, Feel and Guess</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">जादूची पिशवी</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">जादूची पिशवी, वर्गातील आणि नेहमीच्या वापरातील छोट्या वस्तू</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td colspan="2">कृती : स्पर्श पिशवी जादूची
• ताईने एका पिशवीत बालकांना ओळख झालेल्या विविध स्पर्शाच्या वस्तू भरून ठेवायच्या.
• बालकांचे डोळे बांधायचे. बालकाने पिशवीत हात घालून एक वस्तू घ्यायची. अगोदर त्या वस्तूचे नाव सांगायचे. मग ती वस्तू पिशवीतून बाहेर काढायची. डोळ्यांवरची पट्टी बाजूला करायची.
• ओळखलेली वस्तू बरोबर आहे का हे बघायचे. बरोबर असली किंवा नसली, तरी त्या वस्तूबद्दल एक वाक्य बोलायचे.</td><td>कृती : स्पर्श पिशवी जादूची
• ताईने एका पिशवीत बालकांना ओळख झालेल्या विविध स्पर्शाच्या वस्तू जोडीने भरून ठेवायच्या उदाहरणार्थ, दोन छोट्या पेन्सिली, दोन मोठ्या पेन्सिली, वेगवेगळ्या प्रकारचे पेन इत्यादी.
• बालकांचे डोळे बांधायचे. बालकाने पिशवीत हात घालून एक वस्तू घ्यायची.
• त्यानंतर तशीच दुसरी वस्तू शोधून काढायची.
• काढलेल्या वस्तूबद्दल एक वाक्य बोलायचे.</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
पंचकोश		
अन्नमय, विज्ञानमय कोश		
विविधता	प्राण्यांच्या, फळांच्या, फुलांच्या प्रतिकृती पिशवीत ठेवाव्या, विविध वस्तू आणि वेष्टने वापरून विविधता आणता येईल, स्पर्शाने जोड्या लावणे, स्पर्श बघून पिशवीतून न बघता जोडीची वस्तू शोधून काढणे असे खेळ घेऊनही विविधता आणता येईल.	
थीम/विषय	भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू	
ताईसाठी सूचना	यासाठी कोणतीही अरुंद तोंडाची कापडी पिशवी/L आकाराची पिशवी वापरावी.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-2** बालके ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात. **C-2.5** विविध प्रकारच्या स्पर्शामधील फरक करण्याची क्षमता विकसित होते. **अ) LO - 2.5.1** कठीण/कडक–मऊ, गार–गरम, खरखरीत, गुळगुळीत स्पर्शांमधील फरक समजतो. **ब) LO - 2.5.1** दोन वस्तूंमधील कठीण/कडक–मऊ, गार–गरम, खरखरीत, खडबडीत व गुळगुळीत अशी स्पर्शाची तुलना करून शकतो. **क) LO - 2.5.1** ३ ते ५ वस्तंची कठीण/कडक–मऊ, गार–गरम, खरखरीत, गुळगुळीत अशा स्पर्शांनुसार क्रमवार मांडणी करू शकतो. (उदा. अति मऊ, मऊ, टणक, अति टणक)	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	• स्पर्शसंवेदन विकसित होण्यास मदत होईल.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	वस्तू स्पर्शाने बरोबर समजते का, त्याबद्दल बोलता येते का?	
आधारशिला कृती क्र. : 49. Explore Seasons : Name and Understand Characteristics		
उपक्रमाचे नाव	ऋतूंची ओळख	
उपक्रमाला लागणारे साहित्य	ऋतूनुसार खाद्यपदार्थ, कपडे, पेये यांची चित्रकार्डे	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
• ताईने बालकांना अर्धवर्तुळात बसवावे. • भांड्यामध्ये गरम (पाणी कोमट असावे) पाणी, बर्फ हे घ्यावे. • एक एक करून सर्व बालकांना दोन्ही भांड्याला हात लावण्यास सांगावे.		**कृती १ : थंडीत काय खाऊया.** • ताईने बालकांना अर्धवर्तुळात बसवावे.

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td colspan="2">• ताईने सर्व बालकांना एक एक करून भांड्याला हात लावल्यावर काय जाणवले, हे विचारावे.
• घेतलेल्या अनुभवांवर चर्चा करावी.
• अपेक्षित उत्तर (गरम पाण्याला हात लावल्यावर पाणी गरम लागले आणि बर्फाला हात लावल्यावर खूप गार लागले.)
• ताईने बालकांना आपण स्वेटर, टोपी, हातमोजे, पायमोजे हे कपडे कधी घालतो हे विचारावे व प्रत्यक्ष दाखवावे.
• थंडीतच हे सगळे कपडे का घालतो?
• खूप गरम होते, तेव्हा कसे कपडे घालतो?
• उन्हाळ्यात व हिवाळ्यात कोणकोणती पेये पितो?
• याप्रमाणे कृती घेऊन बालकांना उन्हाळा आणि हिवाळा या संकल्पना स्पष्ट कराव्या.
• चित्र दाखवून व प्रत्यक्ष वस्तू दाखवून बालकांशी संवाद साधावा.</td><td>• २-२ बालकांच्या गटांत वेगवेगळे अन्नपदार्थ असलेली चित्रांची कार्डे देणे.
• थंड व गरम अन्नपदार्थ या चित्रांचे वर्गीकरण करण्यास सांगावे.
• घेतलेल्या अनुभवांवर चर्चा करावी.
कृती २ : उन्हाळ्यात आणि हिवाळ्यात घालायचे कपडे
• ताईने बालकांना आपण स्वेटर, टोपी, हातमोजे, पायमोजे हे कपडे कधी घालतो, हे विचारावे व हे कपडे बालकांना घालून दाखवावे.
• थंडीतच हे सगळे कपडे का घालतो?
• खूप गरम होते तेव्हा कसे कपडे घालतो?
• याप्रमाणे चर्चेतून उपक्रम घेऊन बालकांना उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा या संकल्पना स्पष्ट कराव्यात.
• वेगवेगळ्या ऋतूतील कपडे, खाद्यपदार्थ, सण, हवामान यांबाबत चर्चा करावी.
• पावसात आपण भिजू नये म्हणून काय काय वापरतो.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td></tr>
<tr><th colspan="3">पंचकोश</th></tr>
<tr><td colspan="3" align="center">विज्ञानमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">• आपण कोणते गार/थंड पदार्थ खातो, हे विचारावे.
• आपण कोणते गरम पदार्थ खातो, हे विचारावे.
• उन्हाळा आणि हिवाळा यांची वेगवेगळी चित्रे वापरून गप्पा/चर्चा उपक्रम घेणे.</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
	• ऋतूनुसार चित्रांचे गट करूया. • वेगवेगळ्या ऋतंमूध्ये वापरण्याच्या वस्तू चित्रकार्डे देऊन ती वेगळी करण्यास सांगावे. • उन्हाळा आणि हिवाळा यांची वेगवेगळी चित्रे वापरून गप्पा/चर्चा उपक्रम घेणे.	

थीम/विषय	ऋतू
ताईसाठी सूचना	कृतिपुस्तिकेतील कृती करून घ्यावी.
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-7** बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात. **C-7.2** निसर्गाच्या निरीक्षणातून कार्यकारण भाव समजून घेऊन, तो दर्शविणारी साधी परिकल्पना मांडतो व त्याच्या स्पष्टीकरणाकरिता/पडताळणी करिता निरीक्षणाचा आधार घेतो. **ब) LO-7.2.3** उन्हाळा आणि हिवाळा ओळखतो. **क) LO-7.2.3.1** उन्हाळा आणि हिवाळा ऋतूनुसार कपडे आणि अन्नपदार्थ ओळखतात.
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	• हवामानानुसार कोणते अन्नपदार्थ, खावेत कोणते कपडे घालावेत हे समजते. • वर्षात येणारे ऋतू आणि कालगणना यांची ओळख होते.
निरीक्षण करावयाच्या बाबी	ऋतुंमूळे पर्यावरणात, परिसरात होणारे बदल सांगता येतात का? याचे निरीक्षण करावे.

आधारशिला कृती क्र. : 50. Finding Rhyming Words : Recognise, Identify, Create Strings

उपक्रमाचे नाव	यमकाची गंमत.
उपक्रमाला लागणारे साहित्य :	–

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
बडबडगीते म्हणूया. • सुरुवातीला बालकांना त्यांच्या परिचयातील बडबडगीत ऐकवावे. बडबडगीत समूहात म्हणून घ्यावे. • बडबडगीत हावभावांसह म्हणून दाखवावे.	**गाण्यातील सारखे शब्द ओळखूया.** • ताईने ओळीच्या शेवटी समान आवाज ऐकू येणारे शब्द असणाऱ्या बडबडगीतांचा संग्रह करावा. • बडबडगीत ऐकवल्यानंतर	• बालकांना चिऊ–काऊ–माऊ, पोळी–टाळी–विळी असे शब्द म्हणून दाखवावे. • बालकांना या शब्दांसारखे अधिक शब्द विचारावे व म्हणवून घ्यावे. • योग्य तेथे योग्य दुरुस्ती

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
• बालकांकडून बडबडगीत हावभावांसह म्हणवून घ्यावे. • योग्य तेथे योग्य दुरुस्ती करून ती बालकांकडून म्हणवून घ्यावी.	ओळीच्या शेवटी ऐकू येणाऱ्या शब्दांमध्ये सारखेपणा आहे, हे लक्षात आणून द्यावे. • त्यानंतर वरीलप्रमाणे विविध बडबडगीते ऐकवून त्यातील यमक असणारे शब्द ओळखण्याची संधी बालकांना द्यावी.	करून हे शब्द बालकांकडून म्हणवून घ्यावे. **टीप :** बालकाला, तू चुकीचे सांगतो आहेस हे म्हणणे टाळावे व चूक दुरुस्त करून शब्दाची, वाक्याची पुनरावृत्ती करावी.

पंचकोश	
विज्ञानमय कोश व प्राणमय कोश	
विविधता	• वेगवेगळी बडबडगीते निवडून कृती/हावभाव करून बालकांपुढे सादर करावी. • बडबडगीते म्हणून घ्यावीत.
थीम/विषय	मी, माझे कुटुंब व परिसर, पाणी–पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू , प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन.
ताईसाठी सूचना	बडबडगीतातील ओळींमध्ये वारंवार येणारी अक्षरे किंवा शब्द असणाऱ्या बडबडगीतांचा संग्रह करावा.
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-10** बालके भाषा एक (L1) मध्ये सफाईदारपणे वाचन व लेखन करतात. **C-10.1** शब्दध्वनींची जाणीव होऊन शब्दध्वनी/अक्षरे शब्दात गंफुतो आणि शब्दांपासून शब्दध्वनी/अक्षरे वेगळी करतो. **अ) LO-10.1.1** बडबडगीते म्हणतो. **ब) LO-10.1.1** यमक व अनुप्रास ओळखतो. **क) LO-10.1.1** यमक व अनुप्रास तयार करतो.
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	• श्रवणकौशल्य, भाषणकौशल्य, शब्दांचा अर्थ व आशय यांची समज निरीक्षण क्षमता, अभिनय क्षमता.
निरीक्षण करावयाच्या बाबी	छोटी छोटी बडबडगीते बालके म्हणू शकतात की नाही याचे निरीक्षण करावे. बडबडगीतातील शब्द बालके क्रमाने म्हणू शकतात की नाही याचे निरीक्षण करावे.

आधारशिला कृती : 51. Recognise Alphabets : Associate common alphabets of L1 with sound and identify.

उपक्रमाचे नाव	सुरुवातीचा आवाज ओळखू	
उपक्रमाला लागणारे साहित्य	चित्रकार्ड, अक्षरकार्ड	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
कृती : अक्षर चित्रांची ओळख • वेगवेगळ्या एकाच अक्षराने सुरू होणाऱ्या वस्तू किंवा क्रियेची चित्रकार्डे पाहून बालकांना त्यातील वस्तूचे किंवा क्रियेचे नाव सांगण्यास सांगावे. • योग्य नाव बालकांनी सांगितल्यावर तो शब्द कशाने/ कोणत्या आवाजाने सुरू होतो, ते विचारावे. • सारख्या आवाजाने सुरु होणारी चित्रकार्डे गोळा करण्यास सांगावे. • सारख्या आवाजाने सुरू होणारे शब्द बालकांना ओळखायला सांगावे. उदाहरणार्थ, कप, कडक, कमर, लचक यात लचक हा शब्द वेगळ्या अक्षराने सुरू होतो.	• ताईने ‘अकाराच्या’ एका मुळाक्षरापासून सुरू होणाऱ्या वेगवेगळ्या चित्रांचे कार्ड दाखवावे. उदाहरणार्थ, पत्र, पपई, पतंग, पक्षी इत्यादी. • हे सर्व शब्द कोणत्या आवाजाने सुरु होतात, ते विचारावे. आणि त्या आवाजाचे चित्र आहे, असे सांगून ‘प’ हे अक्षर चित्र दाखवावे आणि या चित्राला ‘प’ म्हणतात किंवा ‘प’ या आवाजाचे हे चित्र आहे, अशी ओळख करून द्यावी. • अशा प्रकारे सोप्या मुळाक्षरांची अक्षरचित्रे आणि आवाज सांगावे. • अकार आणि त्यांची मुळाक्षरे यांचा पुरेसा सराव झाला की पुढील कृती करून घ्यावी. • **पहिल्या ध्वनी अक्षरावरून शब्द** एखादे विशिष्ट अक्षर सुरुवातीला येणारे शब्द सांगण्यास सांगावे. उदा. त सुरुवातीला येणारे शब्द सांगा.	• ताईने अक्षर चित्रावरील अक्षर ओळखण्याचा सराव खेळातून घ्यावा. उदाहरणार्थ, वर्तुळामध्ये कार्ड ठेवून बालकांना संगीत चालू असेपर्यंत चेंडू पुढे पुढे द्यायला सांगावे. संगीत थांबले की ज्या बालकाकडे चेंडू असेल त्याने ताईने सांगितलेल्या अक्षराचे अक्षरचित्र वर्तुळातून उचलावे. • एक मुळाक्षर सांगून त्या अक्षराने सुरु होणारे अनेक शब्द सांगण्याची शर्यत बालकांचे गट करून घ्यावी. • मुलांना एक चित्र दाखवून ते कशाचे आहे ते ओळखायला सांगावे. उदा. कमळ, विमान, कप, कावळा, कपाट, कळशी, कंगवा व त्यामध्ये क ऐकू आला का असा प्रश्न विचारावा. कुठे तरी मुलांना क ऐकू येईल. कुठल्या तरी शब्दात ऐकू येणार नाही. याच्या आधारे प्रथम फक्त शब्द ऐकून प्रश्न विचारावे. नंतर मुलांना क ऐकू येईल असे शब्द शोधायला सांगावे.

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td></td><td>जसे : तर – तुला – तरुण– तारा
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td><td></td></tr>
<tr><td colspan="3">**पंचकोश**</td></tr>
<tr><td colspan="3">प्राणमय कोश</td></tr>
<tr><td>**विविधता**</td><td colspan="2">भाऊ भाऊ एकत्र या, साईट रीडिंग, चित्र आणि चित्राच्या नावातील सुरुवातीच्या अक्षराचे अक्षरचित्र यांच्या जोड्या लावा, डॉमिनो, मॅचिंग सेट</td></tr>
<tr><td>**थीम/विषय**</td><td colspan="2">पाणी–पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, वाहन.</td></tr>
<tr><td>**ताईसाठी सूचना**</td><td colspan="2">आवश्यकतेनुसार आपणाकडे उपलब्ध सोप्या शब्दकार्डाचा वापर करावा.
कृती पुस्तिकेतील कृती सोडवून घ्यावी.</td></tr>
<tr><td>**अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती**</td><td colspan="2">**CG-10** बालके भाषा एक (L1) मध्ये सफाईदारपणे वाचन व लेखन करतात.
C-10.3 भाषा एक (L1) च्या लिपीतील सर्व अक्षरे व अवयव ओळखतो आणि या ज्ञानाचा उपयोग शब्द वाचन–लेखनासाठी करतो.
अ) LO 10.3.1 शब्दांतील आवाज अक्षरांद्वारे कागदावर लिहिले जातात याची समज दर्शवतो. म्हणजेच लेखी शब्दांतील काही मुळाक्षरांची संबंधित ध्वनींची सांगड घालण्यास सुरुवात करतो.
ब) LO 10.3.1 वर्णमालेतील काही अक्षरे व स्वरचिन्हे ओळखतो.
क) LO 10.3.1 वर्णमालेतील काही अक्षरे व स्वरचिन्हे ओळखतो.</td></tr>
<tr><td>**साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये**</td><td colspan="2">वाचनासाठी लागणारी उदयोन्मुख साक्षरता, सूक्ष्म निरीक्षण क्षमता, तर्काने वाचन पूर्वतयारी, मुळाक्षरांची ओळख, मुळाक्षरे आणि त्यांचे ध्वनी यांची सांगड आणि स्मरण.</td></tr>
<tr><td>**निरीक्षण करावयाच्या बाबी**</td><td colspan="2">पुस्तक, वर्तमानपत्र, मासिक हातात घेऊन वाचायची कृती/नक्कल करतो का? साईट रीडिंग पद्धतीने परिचयाचे शब्द वाचायचा प्रयत्न करतो का? ध्वनी आणि अक्षरे यांचा एकास एक संबंध लावू शकतो का? याचे निरीक्षण करावे.</td></tr>
</table>

<table>
<tr><th colspan="3">आधारशिला कृती क्र. : 51.1 Recognise Alphabets : Associate common alphabets of L1 with sound and Identify</th></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">शेवटचा आवाज ओळखू.</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">चित्रकार्ड, अक्षरकार्ड</td></tr>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr>
<td>कृती : अक्षर चित्रांची ओळख
• ताईने बालकांना ‘अकार’ असलेले वेगवेगळे शब्द सांगावेत आणि त्या शब्दांतील शेवटचा आवाज ओळखायला सांगावे.
उदा. ‘कऽऽऽ पऽऽऽ‘ मध्ये शेवटी ‘प’ हा आवाज येतो.
• ताईने सारख्या आवाजाने शेवट होणारे शब्द बालकांना ओळखायला सांगावे. उदा. कप, कलप, तप, सपसप, कपाट. यात कपाट या शब्दाचा वेगळ्या अक्षराने शेवट होतो.
• वेगवेगळ्या किंवा एकाच अक्षराने शेवट होणाऱ्या वस्तू किंवा क्रियेचे चित्रपत्ते पाहून बालकांना त्यातील वस्तूचे किंवा क्रियेचे नाव सांगण्यास सांगावे.
• योग्य नाव बालकांनी सांगितल्यावर तो शब्द कशाने/कोणत्या आवाजाने संपतो ते विचारावे.
• सारख्या आवाजाने शेवट होणारे चित्रपत्ते गोळा करण्यास सांगावे.</td>
<td>• ताईने ‘अकाराच्या’ एका मुळाक्षराने शेवट होणाऱ्या वेगवेगळ्या चित्रांची कार्डे दाखवावी. उदाहरणार्थ, मगर, तगर, गर इत्यादी.
• हे सर्व शब्द कोणत्या आवाजाने संपतात ते विचारावे. त्या आवाजाचे चित्र आहे, असे सांगून ‘र’ हे अक्षरचित्र दाखवावे आणि या चित्राला ‘र’ म्हणतात किंवा ‘र’ या आवाजाचे हे चित्र आहे, अशी ओळख करून द्यावी.
• अशाप्रकारे सोप्या मुळाक्षरांची अक्षरचित्रे आणि आवाज सांगावे.
• आकार आणि त्यांची मुळाक्षरे यांचा पुरेसा सराव झाला.
• अक्षरभेंड्या : ताईने एक शब्द सांगून सुरूवात करावी व त्या शब्दाच्या शेवटी येणाऱ्या अक्षरापासून पुढचा शब्द मुलांना सांगायला सांगावे. त्यानंतर पुढे येणाऱ्या प्रत्येक शब्दाच्या शेवटच्या अक्षरापासून पुढचा शब्द</td>
<td>• ताईने अक्षरचित्रावरील अक्षर ओळखण्याचा सराव खेळातून घ्यावा. उदाहरणार्थ, वर्तुळामध्ये कार्ड ठेवून बालकांना संगीत चालू असेपर्यंत चेंडू पुढे पुढे द्यायला सांगावे.
संगीत थांबले की, ज्या बालकाकडे चेंडू असेल त्याने ताईने सांगितलेले अक्षरचित्र गोलातून उचलून वाचावे.
• एक मुळाक्षर सांगून त्या अक्षराने शेवट होणारे अनेक शब्द सांगण्याची शर्यत बालकांचे गट करून घ्यावी.
• शेवटच्या ध्वनी अक्षरावरून शब्द ताईने एखादे विशिष्ट अक्षर शेवटी येणारे शब्द मुलांना सांगण्यास सांगावे. उदा. मुलांना म शेवटी येणारे शब्द सांगायला सांगावे. मामा–काम–घाम –.....
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td>
</tr>
</table>

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>• सारख्या आवाजाने शेवट होणारे शब्द बालकांना ओळखायला सांगावे. उदाहरणार्थ, कप, कडक, कमर, लचक यात लचक हा शब्द वेगळ्या अक्षराने सुरू होतो.</td><td>मुलांना सांगण्यास सांगून शब्द अक्षर भेंड्यांचा खेळ घ्यावा. जसे : मासा– सवरून पुढचा शब्द सविता–ताक–काल–लाल.......
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td><td></td></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">प्राणमय, अन्नमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">भाऊ भाऊ एकत्र या, साईट रीडिंग, चित्र आणि चिऊच्या नावातील सुरुवातीच्या अक्षराचे अक्षरचित्र यांच्या जोड्या लावा, डॉमिनो, मॅचिंग सेट</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">पाणी–पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, वाहन</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">आवश्यकतेनुसार आपणाकडे उपलब्ध सोपे शब्दकार्ड यांचा वापर करावा. कृतिपुस्तिकेतील कृती करून घ्यावी.</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-10 बालके भाषा एक (L1) मध्ये सफाईदारपणे वाचन व लेखन करतात.
C-10.3 भाषा एक (L1) च्या लिपीतील सर्व अक्षरे व अवयव ओळखतो आणि या ज्ञानाचा उपयोग शब्द वाचन–लेखनासाठी करतो.
अ) LO 10.3.1 शब्दांतील आवाज अक्षरांद्वारे कागदावर लिहिले जातात याची समज दर्शवतो. म्हणजेच लेखी शब्दांतील काही मुळाक्षरांची संबंधित ध्वनींची सांगड घालण्यास सुरुवात करतो.
ब) LO 10.3.1 वर्णमालेतील काही अक्षरे व स्वरचिन्हे ओळखतो.
क) LO 10.3.1 वर्णमालेतील काही अक्षरे व स्वरचिन्हे ओळखतो.</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये</td><td colspan="2">• वाचनासाठी आवश्यक, उदयोन्मुख साक्षरता, पूर्वतयारी, सूक्ष्म निरीक्षणक्षमता, तर्काने विचार करणे, सूक्ष्म निरीक्षण, मुळाक्षरांची ओळख, मुळाक्षर आणि त्याचा ध्वनी यांची सांगड आणि स्मरण.</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">पुस्तक, वर्तमानपत्र, मासिक हातात घेऊन वाचायची कृती/नक्कल करतो का? दृक्शब्द (साईट व्होकॅब्युलरी) वाचायचा प्रयत्न करतो का?</td></tr>
</table>

<table>
<tr><th colspan="3">आधारशिला कृती क्र. : 51.2 Recognise Alphabets : Associate common alphabets of L1 with sound and Identify</th></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">सुरुवातीचा आवाज व अक्षर ओळखूया L2.</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">चित्रकार्ड, अक्षरकार्ड, चित्र शब्द कार्ड</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td colspan="2">• मुक्त खेळ – ताईने वयोगट ३ ते ४ वर्षे व ४ ते ५ वर्षे अशा बालकांना मुक्त खेळ द्यावेत व याठिकाणी मदतनीस देखरेख करतील.</td><td>• ताईने बालकांना अर्धवर्तुळात बसवावे.
• ताईने इंग्रजीतील विविध वस्तू व क्रियेची चित्रकार्ड (ज्यावर चित्रासोबत त्या चित्राचे इंग्रजी स्पेलिंग दिलेले आहे असे कार्ड) दाखवून बालकांना विविध इंग्रजी शब्दांचा सराव करून घ्यावा.
• पुरेसा सराव झाल्यावर बालकांना गटाने विविध चित्रशब्द कार्ड वाटावीत. बालकांना कोणतेही एक इंग्रजी अक्षर चित्र दाखवून त्या अक्षराने सुरू होणारे चित्रशब्द कार्ड/इंग्रजी शब्दकार्ड हे शोधण्यास सांगावे. त्या अक्षराचा उच्चार बालकांकडून करून घ्यावा. बालकांना त्यांनी शोधलेली चित्र शब्दकार्ड मोठ्याने वाचून दाखवावी व बालकांकडून मोठ्याने मागे म्हणवून घ्यावे.</td></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">प्राणमय, अन्नमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">भाऊ भाऊ एकत्र या, साईट रीडिंग, चित्र आणि चित्राच्या नावातील सुरुवातीच्या अक्षराचे अक्षरचित्र यांच्या जोड्या लावा, डॉमिनो, मॅचिंग सेट</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">भाज्या व फळे, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन.</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">आवश्यकतेनुसार आपणाकडे उपलब्ध सोप्या इंग्रजी शब्दकार्डांचा वापर करावा.</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-11 बालके भाषा दोन (L2) मध्ये वाचन आणि लेखनाचा आरंभ करतात.
C-11.1 शब्दध्वनींची जाणीव होऊन शब्दध्वनी/अक्षरे एकत्र करून, शब्द तयार करतो व शब्दांमधील शब्दध्वनी/अक्षरे वेगळी करतो.
क) LO 11.1.2 अक्षरध्वनीची नक्कल आणि निर्मिती करतो.</td></tr>
</table>

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये</td><td colspan="2">(Alphabet) अक्षर आणि त्याचा ध्वनी यांची सांगड घालणे आणि ते स्मरणात ठेवणे.</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">शब्दांच्या ध्वनींवरून Alphabet ओळखता येते का, याचे निरीक्षण करावे.</td></tr>
<tr><td colspan="3">आधारशिला कृती क्र. : 51.3 Recognise Alphabets : Associate common alphabets of L1 with sound and Identify</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">शब्दकार्ड भेंड्या L2.</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">चित्रकार्ड, अक्षरकार्ड, चित्र शब्दकार्ड</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td colspan="2">• मुक्त खेळ – ताईने वयोगट ३ ते ४ वर्षे व ४ ते ५ वर्षे अशा बालकांना मुक्त खेळ द्यावेत व मदतनीसाने देखरेख करावी.</td><td>• ताईने बालकांना इंग्रजी अक्षरांची ओळख करून दिल्यावर इंग्रजी चित्र शब्दकार्ड वर्गातील बालकांचे दोन गट करून दोन गटात वाटावीत. ताईनी स्वतःकडील एक चित्र शब्दकार्ड बालकांना दाखववावे. त्याचे नाव वाचून दाखवावे. त्या इंग्रजी शब्दातील शेवटच्या अक्षरावरून सुरू होणाऱ्या चित्र शब्दकार्ड ताईच्या कार्डापुढे जोडावे. व शब्द वाचून दाखववावा. बालकाला शब्द वाचून दाखवता व आण्यास ताईने शब्द वाचून दाखववावा, दुसऱ्या गटातील बालकांनी शेवटच्या अक्षरावरून पुढील कार्ड जोडावे. याप्रमाणे इंग्रजी शब्द कार्ड भेंड्याचा खेळ घ्यावा.
• पुरेसा सराव झाल्यावर शब्दकार्डाच्या आधारे हा खेळ घ्यावा.</td></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">प्राणमय, अन्नमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">भाऊ भाऊ एकत्र या, साईट रीडिंग, चित्र आणि चिऊच्या नावातील सुरुवातीच्या अक्षराचे अक्षरचित्र यांच्या जोड्या लावा, डॉमिनो, मॅचिंग सेट</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">भाज्या व फळे, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन.</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">आवश्यकतेनुसार आपणाकडे उपलब्ध सोपे शब्द कार्ड यांचा वापर करावा.</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-11** बालके भाषा दोन (L2) मध्ये वाचन आणि लेखनाचा आरंभ करतात. **C-11.1** शब्दध्वनींची जाणीव होऊन शब्दध्वनी/अक्षरे एकत्र करून, शब्द तयार करतो व शब्दांमधील शब्दध्वनी/अक्षरे वेगळी करतो. **क) LO 11.1.2** अक्षरध्वनीची नक्कल आणि निर्मिती करतो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	(Alphabet) अक्षर आणि त्याचा ध्वनी याची सांगड घालणे आणि ते स्मरणात ठेवणे.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	शब्दांच्या ध्वनींवरून Alphabet ओळखता येते का, याचे निरीक्षण करावे.	
आधारशिला कृती क्र. : 52 Role Play : Understanding family Relationships and Professions		
उपक्रमाचे नाव	नाटक करूया.	
उपक्रमाला लागणारे साहित्य	आरसा, कंगवा, ओढणी, साड्या इत्यादी	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
कृती : वेशभूषा करूया. • वरील साहित्य ताईने बालकाच्या व पालकांच्या मदतीने गोळा करावे. • एका कोपऱ्यामध्ये आरशाची मांडणी करून गोळा केलेले साहित्य त्यासमोर मांडावे. • बालकांना वरील साहित्य घेऊन वेशभूषा करण्यास सांगावे. वेशभूषा करून त्यांना मुक्तपणे वावरण्याची संधी द्यावी. • बालकांना आई, आजी, दादा, बाबा कसे चालतात, बोलतात तशी कृती करून दाखवण्यास सांगावे. • बाकीच्या बालकांना भूमिका ओळखायला सांगावे.	**कृती : वेशभूषा करूया.** • वरील साहित्य ताईने बालकांच्या व पालकांच्या मदतीने गोळा करावे. • एका कोपऱ्यामध्ये आरशाची मांडणी करून गोळा केलेले साहित्य त्यासमोर मांडावे. • बालकांना वरील साहित्य घेऊन वेशभूषा करण्यास सांगावे. वेशभूषा करून त्यांना मुक्तपणे वावरण्याची संधी द्यावी. • बालकांना आई, आजी, दादा, बाबा कसे चालतात, बोलतात तशी कृती करून दाखवण्यास सांगावे. • दैनंदिन जीवनातील व्यक्तींची पात्रे जसे की भाजीवाली, पोस्टमन, डॉक्टर, कंडक्टर, आई, आजी, आजोबा, दादा,	**कृती : नाटक करूया.** • ताईने बालकांचे दोघादोघांचे गट करावे. • प्रत्येक गटाला दोन दोन कुटुंबातील व्यक्ती, मदतनीस, प्राणी/पक्षी निवडण्याची संधी द्यावी. • निवडलेल्या भूमिकेची वेशभूषा करून, प्राणी/पक्षांचे मुखवटे घालून त्यांच्यातील मुक्त संवाद अथवा नाट्यीकरण बालकांना करण्यास सांगावे. • निवडलेल्या व्यक्ती, प्राणी अथवा पक्षी कसे चालत असतील? कसे बोलत असतील? हे प्राणी पक्षी एकमेकांशी कसे गप्पा मारत असतील? असे प्रश्न विचारून बालकांना नाट्यीकरण करण्यास ताईने मदत करावी.

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
	बाबा यांपैकी निवड करायला सांगून ते कसे वागतात, बोलतात, कामे करतात तसे करण्यास सांगावे.	
पंचकोश		
आनंदमय कोश		
विविधता	• भातुकलीचे साहित्य खेळावयास उपलब्ध करून द्यावे. • साड्या, ओढणी, टॉवेल, आरसा अशा प्रकारच्या साहित्याचा कोपरा तयार करून साहित्य वापरून खेळण्याची संधी द्यावी.	
थीम/विषय	मी, माझे कुटुंब, प्राणी (पाळीव व जंगली), पक्षी व कीटक, मदतनीस	
ताईसाठी सूचना		
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-12** बालके दृक् आणि ललितकलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायी मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात. **C-12.3** बालक कलेच्या माध्यमातून स्वतःच्या कल्पना आणि भावना व्यक्त करण्यासाठी सर्जनशीलता व कल्पकतेने काम करतो. **ब) LO 12.3.1** कलेच्या माध्यमातून स्वतःच्या कल्पना साधने आणि कार्यपद्धती यांची देवाण-घेवाण करतो व परिचित उदाहरणातून सुधारणा करतो. **क) LO 12.3.1** कलेच्या माध्यमातून विविध अभिव्यक्ती कल्पना व भावना लक्षात घेतो व त्यांचा अर्थ लावतो तसेच स्वतच्या कलात्मक आविष्कारांमध्ये या बाबींचा उपयोग करतो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	• सर्जनशीलता, कल्पकता, सौंदर्यदृष्टी, संभाषण, निरीक्षण क्षमता, जीवनकौशल्य	
निरीक्षण करावयाच्या बाबी	• नाट्यीकरण करताना बालके कशाप्रकारे व्यक्त होतात? कशाप्रकारे सादरीकरण करतात याचे निरीक्षण करावे. • एखादे पात्र तयार करण्यासाठी कोणत्या साहित्याची निवड करतात याचे निरीक्षण करावे. • बालके सर्जनशीलतेने किंवा कल्पकतेने करीत असलेल्या कृतीचे निरीक्षण करून त्याच्या नोंदी कराव्या. • बालके एकमेकांशी देवाणघेवाण करतात का? एकमेकांनी सुचवलेल्या सूचना ऐकून तसे बदल करतात की नाही? याचे निरीक्षण करावे.	

<table>
<tr><th colspan="3">आधारशिला कृती क्र. : 53 My Colourful India : Explore, Understand and Appreciate Diversity</th></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">लोकगीत व लोकनृत्य</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">–</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td colspan="3">• परिसरातील संस्कृती लक्षात घेऊन लोकगीत ऐकवावे. ऐकलेल्या गाण्यावर बालकांना ताल धरायला सांगून नृत्य करण्यास प्रोत्साहन द्यावे. असे गाणे याआधी ऐकले आहे का, असे देखील विचारावे. नृत्य करताना कसे वाटले यावर चर्चा करावी.</td></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">आनंदमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">• वेगवेगळ्या प्रांतीय लोकगीतांप्रमाणे (शक्य असतील तसे व तेवढे कपडे घालून अंगणवाडीत बोलवावे, त्या त्या भाषेतील गाणी लावावीत.)
• ५ ते ६ वर्षे वयोगटाला भारताचे उत्तर, दक्षिण, पूर्व, पश्चिम असे भाग दाखवून, त्यानुसार तेथील लोक कोणते कपडे घालतात, काय खातात यावर आधारित छोटे प्रदर्शन भरवावे.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">पाणी–पाऊस, ऋतू</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">• सुलभ संदर्भासाठी उपलब्ध गीतांच्या पुस्तिका, कार्यपुस्तिकांचा वापर करावा.
• तंत्रज्ञानाचा वापर करून भारतातील लोकगीते ऐकवावीत, विविध लोकनृत्ये दाखवावीत. त्यातील वेषभूषा दाखवावीत. वार्षिक कार्यक्रमात किंवा पालकसभेमध्ये छोटी छोटी लोकगीते व लोकनृत्याचे सादरीकरण करून घ्यावे.</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-4 बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.
C-4.6 गरजेच्या वेळी इतरांना (प्राणी आणि वनस्पतींसह) मदत करतो, दयाभाव दर्शवितो.
CG-7 बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात.
C-7.2 निसर्गाच्या निरीक्षणातून कार्यकारणभाव समजून घेऊन, तो दर्शवणारी साधी परिकल्पना मांडतो व त्याच्या स्पष्टीकरणाकरिता/पडताळणीकरिता निरीक्षणाचा आधार घेतो.
CG-12 बालके दृक् आणि ललित कलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात.</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
	C-12.5 विविध कला, स्थानिक संस्कृती आणि वारसा यांची निर्मिती करताना आणि अनुभव घेताना विविध प्रकारच्या प्रतिक्रियांना प्रतिसाद देतो व प्रशंसा करतो. **CG-13** बालके अध्ययनाच्या सवयी विकसित करतात, यामुळे त्यांना शालेय वर्गासारख्या औपचारिक अध्ययन वातावरणात सक्रिय राहता येते. **C-13.3** निरीक्षण, आश्चर्य, कुतूहल आणि अन्वेषण : वस्तूंच्या सूक्ष्म बारकाव्यांचे निरीक्षण करतो. विविध ज्ञानेंद्रियांचा वापर करून अन्वेषण करतो व आश्चर्य दर्शवतो, वस्तू हाताळतो आणि प्रश्न विचारतो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	श्रवण, निरीक्षण, सामाजिक, भावनिक विकास	
निरीक्षण करावयाच्या बाबी	बालके व्यक्त कशी होतात याचे निरीक्षण करावे.	

आधारशिला कृती क्र. : 53.1 My Colourful India : Explore, Understand and Appreciate Diversity		
उपक्रमाचे नाव	पारंपरिक खेळ	
उपक्रमाला लागणारे साहित्य	खेळनिहाय साहित्य	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
• पुढील पारंपरिक खेळ वर्षभरात घ्यावेत. झिम्मा, फुगडी, लगोरी, आट्यापाट्या, सापशिडी, भोवरा, सागरगोट्या, खांब खांबोळी, रुमाल पळवी, लपंडाव, शिरापुरी		
पंचकोश		
मनोमय कोश		
विविधता	भारत देशाच्या इतर भागात, प्रदेशात खेळली जाणारी पारंपरिक खेळांची माहिती बालकांना करून द्यावी.	
थीम/विषय	मी, माझे कुटुंब परिसर, पाणी-पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन.	
ताईसाठी सूचना		
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-4** बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात. **C-4.4** इतर बालकांबरोबर सहकार्य वृत्तीने वागतो. **अ) LO 4.4.1** इतर मुलांसोबत खेळायला सुरुवात करतो. **ब) LO 4.4.1** इतर मुलांसोबत खेळताना आनंद घेतो.	

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
	क) **LO 4.4.1** इतर मुलांसोबत खेळायला सुरुवात करतो आणि खेळा संबंधी योजना आखतो. (उदा. काय खेळू, कसे खेळू, कधी खेळू) **CG-7** बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात. **C-7.2** निसर्गाच्या निरीक्षणातून कार्यकारणभाव समजून घेऊन, तो दर्शवणारी साधी परिकल्पना मांडतो व त्याच्या स्पष्टीकरणाकरिता/पडताळणीकरिता निरीक्षणाचा आधार घेतो. **CG-12** बालके दृक् आणि ललित कलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात. **C-12.5** विविध कला, स्थानिक संस्कृती आणि वारसा यांची निर्मिती करताना आणि अनुभव घेताना विविध प्रकारच्या प्रतिक्रियांना प्रतिसाद देतो व प्रशंसा करतो. **CG-13** बालके अध्ययनाच्या सवयी विकसित करतात, यामुळे त्यांना शालेय वर्गासारख्या औपचारिक अध्ययन वातावरणात सक्रिय राहता येते. **C-13.3** निरीक्षण, आश्चर्य, कुतूहल आणि अन्वेषण : वस्तूंच्या सूक्ष्म बारकाव्यांचे निरीक्षण करतो. विविध ज्ञानेंद्रिय यांचा वापर करून अन्वेषण करतो व आश्चर्य दर्शवतो, वस्तू हाताळतो आणि प्रश्न विचारतो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	शारीरिक विकास, सामाजिक, भावनिक विकासास मदत होईल, देशभक्ती	
निरीक्षण करावयाच्या बाबी	बालके कशी खेळतात, कसे सहकार्य करतात याचे निरीक्षण करावे.	
आधारशिला कृती क्र. : 54 Memory Magic : Recall Objects, Words and Patterns		
उपक्रमाचे नाव	स्मरणशक्ती खेळ	
उपक्रमाला लागणारे साहित्य	चित्र, विविध वस्तू	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
• काही वेळा गोष्टीतल्या घटना चुकीच्या क्रमाने सांगून बालक ते ओळखते का ते पाहावे. बालकांना गोष्ट सांगण्यास प्रोत्साहन द्यावे. बालक गोष्ट	**कृती : चला जोड्या शोधू.** • ताईने प्रथम या वस्तू वर्गात व्यवस्थित मांडून ठेवणे. • बालकांना एकेकाने येऊन या वस्तूंचे निरीक्षण करण्यास	वयोगट ४ ते ५ मधील कृती सुरुवातीला करून घ्याव्यात. **कृती : मी पाहिलं....** • वर्गातील साधारणपणे ५ ते ७ वस्तू निवडा. त्या सर्व बालकांना दाखवून

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>कशी सांगतो, याचे निरीक्षण करावे.
• चित्र कोडे लावायला द्यावे.</td><td>सांगावे. या वस्तूंची नावे मोठ्याने म्हणण्यास सांगावे. या वस्तूंच्या जोड्या लावण्यास सांगावे.
• उदाहरणार्थ, टूथपेस्ट–टूथब्रश, मोबाइल–चार्जर, पेन्सिल–शार्पनर, पावडरचा डबा–पफ, वही–पेन, पाटी–पेन्सिल, डबा–बाटली, कागद–तेलीखडू.
कृती : सांग कोणत्या वस्तू
• एका ट्रे मध्ये ५–६ वस्तू (उदा. चमचा, खेळणी, फळे) १० सेकंद दाखवाव्यात. मग त्या सर्व वस्तू झाकून ठेवाव्यात आणि त्यातील वस्तूंची नावे विचारावीत.
• बालकांना किती वस्तू आठवतात ते पाहावे.
• हळूहळू या खेळातील वस्तूंची संख्या वाढवत न्यावी.
• यामुळे बालकांची दृश्य स्मरणशक्ती सुधारते.</td><td>त्यांना लक्षात ठेवण्यास सांगावे.
• सर्व वस्तू ताईने एका पिशवीत झाकून ठेवाव्यात.
• आता त्यातील एका बालकास समोर बोलवावे.
• त्यातील एक वस्तू निवडून त्याविषयी इतर मुलांना काही सूचक सांगून वस्तू ओळखण्याची किंवा आठवण्याची संधी द्यावी. उदा. ''मी पाहिलं काहीतरी जे आहे.'' (उदा. ''...जे पिवळं आहे'').
• इतरांनी त्या वस्तूचा अंदाज लावायचा आणि वस्तू ओळखायची. असा खेळ घ्यावा. या खेळाचा सराव झाल्यानंतर हळूहळू वस्तूंची संख्या वाढवीत न्यावी. यामुळे बालकांना निरीक्षणशक्ती आणि स्मरणशक्ती वाढते.
कृती : स्मरणपट
• समान चित्र असलेली सम संख्येतील काड्‌र्स जोडीने खाली उलटी ठेवायची. यासाठी एका प्रकारची दोन कार्ड असावीत.
• मुलांना एकावेळी दोन कार्ड उघडण्याची संधी द्यावी. योग्य जोडी मिळाली तर ती त्या बालकाकडे राहील अन्यथा पुन्हा दोन्ही कार्ड उलटी ठेवावीत. अशा पद्‌धतीने गटात हा खेळ घ्यावा.</td></tr>
<tr><td colspan="3" align="center">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3" align="center">आनंदमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">वेगवेगळे घटनाक्रम असलेले कार्ड प्रत्यक्ष वस्तू हाताळल्यास कृतीत विविधता आणता येईल. बालकांच्या अनुभवाला वाव दिल्यास कृतीत विविधता आणता येईल. उदाहरणार्थ, भाजीपाला, किराणा, मसाले, खेळण्याचे साहित्य इत्यादी.
कळी ते फूल घटनाक्रम
बी ते झाड घटनाक्रम</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
	बागेत कोणकोणत्या वस्तू असतात? वस्तू बघून सांगायचे आहे हे लक्षात ठेवून वस्तूंची नावे सांगणे.	
थीम/विषय	भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस	
ताईसाठी सूचना	वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घेणे.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-13** बालके अध्ययनाच्या सवयी विकसित करतात. यामुळे त्यांना शालेय वर्गासारख्या औपचारिक अध्ययन वातावरणात सक्रिय राहता येते. **CG-13.2** स्मृती आणि मानसिक लवचिकता : संरचित वातावरणामध्ये अध्ययन सुलभ होण्यासाठी, योग्य कार्यरत स्मृती, मानसिक लवचिकता (योग्य प्रकारे अवधान केंद्रित होणे किंवा बदलणे), स्व–नियंत्रण (आवेगात्मक कृती किंवा प्रतिसाद रोखणे) विकसित करतो. **अ) LO 13.2.1.1** गोष्ट आठवून सांगतात किंवा समोर नसणाऱ्या चित्राचे वर्णन करणे यासारख्या कृतींच्या माध्यमातून लक्षात ठेवण्याचा सराव करतात. **ब) LO 13.2.1.1** स्वतःला आवश्यक असणारे प्रसाधन साहित्य किंवा खेळणी यांची यादी म्हणून दाखवतो. **ब) LO 13.2.1.2** स्मरणशक्तीचा खेळ आणि जोड्या लावा यासारखे सोपे खेळ खेळतो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	• स्मरणक्षमता, सामान्यतः बालक गट ओळखू शकते, जीवनकौशल्य	
निरीक्षण करावयाच्या बाबी	• बालक वस्तूंची नावे योग्य तऱ्हेने उच्चारतो याचे निरीक्षण करावे. वस्तूंची यादी योग्य गटात करतो का? याचे निरीक्षण करावे. वस्तूंची नावे आठवताना बालकाला येणाऱ्या अडचणींचे निरीक्षण करावे.	
आधारशिला कृती क्र. : 55. Weeks and Months : Name, Discuss and Associate Events		
उपक्रमाचे नाव	आठवडा आणि महिना	
उपक्रमाला लागणारे साहित्य	चित्रकार्ड, दिनदर्शिका	

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
कृती १ : • आज, काल व उद्या : अंगणवाडीच्या बाहेर झाडे लावून घ्यावीत त्याला काल पाणी घातले, उद्या पण घालायचे आहे, त्याची काळजी घ्यावी हे सांगावे. चटई, पाण्याची बाटली, झाडू या वस्तू आज आपण वापरल्या या उद्या पण लागणार आहेत हे सांगावे. नम्रताने आज मेथीची भाजी खाल्ली. तिने काल भेंडीची भाजी खाल्ली होती. नम्रता आणि रवी उद्या गावाला जाणार आहेत. या प्रसंगावर आधारित खालीलप्रमाणे प्रश्न विचारून चर्चा घडवून आणावी. जसे, नम्रताने भेंडीची भाजी कधी खाल्ली होती? रवी गावाला कधी जाणार आहे.	**कृती १ :** • ताईने बालकांना अर्धवर्तुळात बसवावे. बालकांसमोर वार असलेला तक्ता ठेवावा. तक्त्यावर आजचा वार सोमवार हे दाखवावे. असे करून सगळ्या वारांची नावे वाचावी. • ताईकडे वारांची नावे असलेली कार्डे बालकांना द्यावीत. (साईट रीडिंग) तक्त्यावर आजचा वार सोमवार हे दाखवावे. त्यासारखे कार्ड शोधायला सांगावे व तक्त्यावर आजचा वार सोमवार आहे, हे दाखवावे व कार्ड सोमवारच्या खाली ठेवावे. असे करून रोज हा उपक्रम घ्यावा. • शनिवार, रविवारच्या तक्त्यावर व कार्डवर वेगळा रंग घ्यावा. जसे लाल रंग म्हणजे त्या दिवशी अंगणवाडीला सुट्टी असते, हे सांगावे. हा उपक्रम रोज घ्यावा. • बालकांना वारांची नावे वाचता आल्यावर त्यांना दिनदर्शिका दाखवावी. **कृती २ : विशेष दिन** • ताईने बालकांना दिनदर्शिका	**कृती १ : आजचा वार** • ताईने बालकांना अर्धवर्तुळात बसवावे. बालकांसमोर वार असलेला तक्ता ठेवावा. तक्त्यावर आजचा वार सोमवार हे दाखवावे. असे करून सगळ्या वारांची नावे वाचावी. • ताईकडे वारांची नावे असलेली कार्डे बालकांना द्यावीत. (साईट रीडिंग) तक्त्यावर आजचा वार सोमवार हे दाखवावे. त्यासारखे कार्ड शोधायला सांगावे व तक्त्यावर आजचा वार सोमवार आहे, हे दाखवावे व कार्ड सोमवारच्या खाली ठेवावे. असे करून रोज हा उपक्रम घ्यावा. • शनिवार, रविवारच्या तक्त्यावर व कार्डवर वेगळा रंग घ्यावा. जसे लाल रंग म्हणजे त्या दिवशी अंगणवाडीला सुट्टी असते, हे सांगावे. हा उपक्रम रोज घ्यावा. • बालकांना वारांची नावे वाचता आल्यावर त्यांना दिनदर्शिका दाखवावी. **कृती २ : आठवड्याचे वार, महिने** • ताईने बालकांना आता चालू असलेल्या महिन्याचे नाव रोज सांगावे. • काही दिवस सराव झाल्यावर ताईने ५ ते ६ वर्षे वयोगटाच्या बालकांना आधीचा व नंतरचा महिना विचारावा. • बालकांना समोर दिसेल अशी दिनदर्शिका वर्गात लावावी. अंगणवाडीत रोज आल्यावर आजचा वार, महिना हे बालकांना विचारावे.

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
	• आता जसे शनिवार, रविवारला वेगळा रंग आहे तसेच अजून दिनदर्शिकेत कुठे वेगळा रंग दिसतो, हे विचारावे. • बालकांना वेगळा रंग का दिला आहे, हे विचारावे. • ताईने ज्या दिवशी कोणाची जयंती, सण असते त्या दिवशी असा वेगळा रंग देतात हे सांगावे. हा उपक्रम अंगणवाडीत रोज घ्यावा. • रोज भारतीय आठवडे व महिन्यांची नावे म्हणून घेण्याचा सराव करून घ्यावा. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	• ताईने बालकांना मराठी व इंग्रजी दोन्ही महिन्याची नावे सांगावी. हा उपक्रम अंगणवाडीत रोज घ्यावा. • भारतीय महिन्यांची नावे रोज म्हणून घेण्याचा सराव घ्यावा.

पंचकोश	
विज्ञानमय कोश	
विविधता	गाणी, गोष्टी ऐकवाव्यात. दिनदर्शिका वर्गात लावावी. रोज त्यात काय वेगळे आहे का हे बालकांसमोर बघावे. जसे विज्ञान दिवस, बालदिन, मराठी भाषा दिन इत्यादी.
थीम/विषय	ऋतू
ताईसाठी सूचना	यासंदर्भात वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-8** बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात. **C-8.10** मिनिटे, तास, दिवस, आठवडे आणि महिने, वेळेची मोजमापे या एककांमध्ये कालमापन करतो.

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td></td><td colspan="2">अ) LO 8.10.1 दैनंदिन जीवनात आज उद्या आणि काल या शब्दांचा वापर करतो.
ब) LO 8.10.1 विशेष दिवस ओळखतो जसे की, शनिवार, रविवार, सुट्टीचा दिवस (रविवारी सुट्टी असते.)
क) LO 8.10.1 आठवड्यातील वार आणि वर्षातील महिन्यांची नावे ओळखतो.</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये</td><td colspan="2">निरीक्षणक्षमता, तुलना, कार्यकारणसंबंध, अंदाज करता येण्यास मदत होईल.</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">वारांची नावे सांगता येतात का? संदर्भाने वार सांगता येतात का? मराठी व इंग्रजी महिन्यांची नावे सांगता येतात का? सणांच्या संदर्भाने महिन्यांची नावे सांगता येतात का? हे पाहावे.</td></tr>
<tr><td colspan="3">आधारशिला कृती क्र. : 56. Game of Sounds : Break, Join and Replace Syllables</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">अक्षरध्वनी</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">चित्रकार्ड, चित्र शब्दकार्ड, अक्षरकार्ड</td></tr>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>• सुरुवातीला बालकांना त्यांच्या परिचयातील बडबडगीत ऐकवावे.
• बडबडगीत समूहात म्हणवून घ्यावे.
• बडबडगीत हावभावांसह म्हणून व करून दाखवावे.
• बडबडगीत बालकाकडून म्हणवून व त्याबरोबर कृती करून घ्यावे.
• योग्य तेथे योग्य दुरुस्ती करून ती बालकांकडून म्हणून घ्यावी.
'ट्रिंग ट्रिंग ट्रिंग ट्रिंग
ऐकू आली फोनची रिंग
कुणीच नाही फोनपाशी
उंदीरमामा बिळापाशी
उंदीरमामा हसले मिशीत,
टेबलावरती चढले खुषीत
फोन लावला कानाला।'</td><td>• ताईने बालकांना परिचित वस्तूंचे एक चित्रकार्ड दाखवावे आणि त्यांना त्या वस्तूचे नाव देण्यास सांगावे.
• शब्दाच्या प्रत्येक अक्षरावर जोर देऊन शब्दाची पुनरावृत्ती करावी.
उदा. जो शब्द आहे त्यातील एक एक अक्षर उच्चारून प्रत्येक अक्षरानंतर टाळी वाजवावी. शब्द आहे बसा ब...टाळी सा – टाळी या पद्धतीने शब्दांची पुनरावृत्ती बालकांकडून करवून घ्यावी.
• बालकांना का (टाळी)... मा (टाळी)... ला (टाळी) सारख्या भिन्न-मात्रा वस्तूंचा सराव करू द्या आणि प्रत्येक</td><td>• ताईने बालकांना चित्रकार्ड द्यावे आणि त्यांना वस्तूंचे नाव सांगण्यासाठी प्रोत्साहित करावे.
• वस्तूच्या बरोबर संबंधित अक्षर कार्ड लावताना प्रत्येक अक्षराची पुनरावृत्ती करावी आणि
उदा.
[क] [म] [ळ] [ढ] [ग]
अशी शब्द व चित्र पूर्ण करणारी कार्ड असतील त्यातील एक कार्ड खाली ठेवावे व आलेली कार्ड जोडायला सांगावे. शब्द व चित्र पूर्ण होईल.
• अक्षरकार्डे ठेवण्यासाठी प्रात्यक्षिकांसह सुरुवात करा आणि चित्रकार्डासोबत आउटच शब्द बोला आणि प्रत्येक बालकाला वेगवेगळ्या वस्तूंसाठी स्वत:कडे वळण्यास प्रोत्साहित करा.</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
	बालकाला संधी मिळेल याची खात्री करा. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	उदाहरणार्थ, चित्रकार्ड व शब्दकार्ड का व ळा, मा ळ
पंचकोश		
विविधता	नवनवीन बडबडगीत ऐकवावीत.	
विज्ञानमय कोश		
थीम/विषय	वनस्पती (फुले, शेती, रंग), पक्षी व कीटक,	
ताईसाठी सूचना	कृती पुस्तिकेतील कृती करून घ्यावी.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**C-10** बालके भाषा एक (L1) मध्ये सफाईदारपणे वाचन व लेखन करतात. **C-10.1** शब्दध्वनींची जाणीव होऊन शब्दध्वनी/अक्षरे शब्दात गुंफतात आणि शब्दापासून शब्दध्वनी/अक्षरे वेगळी करतो. **अ) LO 10.1.1** बडबडगीते म्हणतो. **ब) LO 10.1.2** शब्दातील प्रारंभिक आणि अंतिम अक्षर ओळखतो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	श्रवण कौशल्य, शब्दसंग्रह वाढतो, शब्दाचा अर्थ व आशय यांची समज, अनुकरणक्षमता विकसित होण्यास मदत होईल.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	बालके स्वतंत्रपणे गाणी म्हणू शकतात का ते पाहावे.	
आधारशिला कृती : 57. Understanding Myself : My Choices/Preferences/Likes/Dislikes		
उपक्रमाचे नाव	मला काय काय आवडते	
उपक्रमाला लागणारे साहित्य	विविध खेळणी, चित्रमय पुस्तके	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
कृती १ : माझी आवड • ताईने वर्गात बालकांची खेळणी, मांडून ठेवावी. बालकाला तुला काय खेळायला आवडेल ते विचारावे. त्यांच्या आवडीच्या गोष्टी करण्याची संधी द्यावी. खेळून झाल्यावर आज तुला काय करावेसे वाटले? असे प्रश्न विचारावे.	• बालकांच्या समोर विविध चित्र, पुस्तके ठेवावीत. त्यांना त्यांच्या आवडीचे पुस्तक घेण्याविषयी सांगावे. बालकांनी निवडलेले पुस्तक किंवा त्यांना त्यातील आवडलेले चित्र कोणते ते विचारावे. चित्र किंवा पुस्तक का आवडले याबद्दल विचारावे. • बालकांना आवडता खाऊ, आवडती खेळणी याबद्दल विचारावे. • बालकांना विविध भावना दर्शक इमोजी दाखवावे. बालकांना विविध प्रसंग देऊन त्यांना कसे वाटेल हे ओळखण्यास सांगावे. उदा. तुम्हाला कुणी खाऊ दिला. कुणी रागावले, मामाच्या गावाला निघाले. असे विविध प्रसंग द्यावे व त्यामध्ये त्यांना कसे वाटेल याविषयी विचारावे. जादूच्या पिटाऱ्यातील इमोशन बोर्ड चा येथे वापर करावा.	

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
• चित्र, पुस्तके ठेवावीत व बालकांना आवडीची पुस्तके व त्यातील चित्रे बघण्याचे स्वातंत्र्य द्यावे. • बालकाने निवडलेले चित्र, खेळणी का आवडते याविषयी बालकाला विचारावे. • बालकाला आवडत्या वस्तूचे किंवा आवडेल ते चित्र काढण्यासाठी सांगावे. त्याने चित्रात काय काय काढले आहे ते विचारावे. • मैदानावर खेळसाहित्य मांडून ठेवावे व पाहिजे ते साहित्य निवडून खेळण्याचे स्वातंत्र्य द्यावे. **कृती २ : पुस्तक पाहूया.** • ताईने बालकांसाठी वर्गात भरपूर चित्र असलेली गोष्टीची पुस्तके जमिनीवर मांडून ठेवावीत. • वर्गात पुस्तके मांडून बालके काय करतात याचे निरीक्षण करावे. • बालकांना त्यांच्या आवडीचे पुस्तक निवडण्याचे स्वातंत्र्य द्यावे. • पुस्तक घेतल्यानंतर किती वेळ पुस्तक बघत आहेत, त्याबद्दल काही बोलता आहेत का, याचे निरीक्षण करावे. • पुस्तकांतले तुम्हाला काय आवडले असे बालकांना विचारावे?	**कृती २ : पुस्तक पाहूया.** • ताईने बालकांसाठी वर्गात भरपूर चित्र असलेली गोष्टीची पुस्तके जमिनीवर मांडून ठेवावीत. • वर्गात पुस्तके मांडून बालके काय करतात याचे निरीक्षण करावे. • बालकांना त्यांच्या आवडीचे पुस्तक निवडण्याचे स्वातंत्र्य द्यावे. • पुस्तक घेतल्यानंतर किती वेळ पुस्तक बघत आहेत, त्याबद्दल काही बोलत आहेत का, याचे निरीक्षण करावे. • पुस्तकातले तुम्हाला काय आवडले ते विचारावे.	**कृती २ : पुस्तक पाहूया.** • ताईने बालकांसाठी वर्गात भरपूर चित्रे असलेली गोष्टींची पुस्तके जमिनीवर मांडून ठेवावीत. • वर्गात पुस्तके मांडून बालके काय करतात याचे निरीक्षण करावे. • बालकांना त्यांच्या आवडीचे पुस्तक निवडण्याचे स्वातंत्र्य द्यावे. • पुस्तक घेतल्यानंतर किती वेळ पुस्तक बघत आहेत, त्याबद्दल काही बोलता आहेत का, याचे निरीक्षण करावे. • पुस्तकातले तुम्हाला काय आवडले ते विचारावे?

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
पंचकोश		
मनोमय कोश		
विविधता	विविध अन्नपदार्थ, कपडे यांची चित्रे दाखवून वरीलप्रमाणे प्रश्न विचारता येतील. मैदानावरील विविध खेळ खेळणे.	
थीम/विषय	मी, माझे कुटुंब, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक	
ताईसाठी सूचना	दिव्यांक विद्यार्थ्यांचाही या उपक्रमात समावेश करून घ्यावा.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-4** बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात. **C-4.2** विविध भावना ओळखतो. त्यावर नियंत्रण आणण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करतो. **अ) LO 4.2.1.1** स्वत:ला काय हवे आहे ते सांगतो आणि स्वत:च्या भावना ओळखतो. जसे, आज मला चित्र रंगवायचे नाही. मला बाहेर जायचे आहे. **CG-7** बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात. **C-7.2** निसर्गाच्या निरीक्षणातून कार्यकारणभाव समजून घेऊन, तो दर्शविणारी साधी परिकल्पना मांडतो व त्याच्या स्पष्टीकरणाकरिता/पडताळणीकरिता निरीक्षणाचा आधार घेतो. **ब) LO 7.2.4** स्वतःचे प्राधान्यक्रम आवड व्यक्त करतो आणि त्यानुसार निवड करतो. **क) LO 7.2.4** स्वतःची आवड आणि प्राधान्यक्रम विचारात घेऊन जबाबदारीने निवड करतो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	भावनिक विकास, स्वत:ची आवड-निवड ओळखणे, संघभावना व इतरांना मदत करण्याची भावना व्यक्त होणे या कौशल्यांच्या विकासास मदत होईल.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	बालके आपली ओळख ठामपणे सांगतात का, एकमेकांशी मिळून मिसळून वागतात का, हे पाहावे.	
आधारशिला कृती क्र. : 58. Follow the instructions : Find objects as per Instruction		
उपक्रमाचे नाव	सूचना ऐकून वस्तू देऊया.	
उपक्रमाला लागणारे साहित्य		
वर्गातील वस्तू : ठोकळे, मणी, बिया, फोमचे तुकडे	विविध आकार आणि रंगाचे ठोकळे	वर्गातील वस्तू

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
कृती : ऐकूया शोधून देऊया • बालकांना एका वाक्याची सूचना द्यावी. सूचना ऐकून सांगितलेल्या रंगाची किंवा आकाराची वस्तू शोधायला सांगावी. उदाहरणार्थ, पिवळ्या रंगाची वस्तू दे. वर्तुळाकार वस्तू आण. • मैदानावर खेळाचे विविध साहित्य चेंडू, शेंगा एकत्र ठेवावे व सूचना देऊन वेगवेगळ्या ठिकाणी ठेवण्यास सांगावे.	**कृती : ऐकूया शोधून देऊया** • बालकांना दोन वाक्यांची सूचना द्यावी. सूचना ऐकून सांगितलेल्या रंगाची आणि आकाराची वस्तू शोधायला सांगावी. उदाहरणार्थ, हिरव्या रंगाची चौकोनी आकाराची वस्तू दे. • चेंडू वेगवेगळ्या ठिकाणी टाकण्याची सूचना द्यावी. उदा. बादलीत टाक, झाडाच्या बुंध्यावर टाक, टप्पा घे, भिंतीवर टाक.	**कृती : ऐकूया शोधून देऊया** • बालकांना तीन सूचना एकत्रित द्याव्यात. सूचना ऐकून सांगितलेल्या रंग आणि आकाराची वस्तू शोधायला सांगावी. उदाहरणार्थ, काळ्या रंगाची वर्तुळाकार दाराजवळ असलेली वस्तू घेऊन ये. • ट्रेझर हंट हा खेळ (खजिना शोधा) घ्यावा.

पंचकोश	
अन्नमय कोश	
विविधता	वर्गातील वस्तू, वर्गाबाहेरील वस्तू यांचा वापर करून सूचनांचा खेळ घ्यावा.
थीम/विषय	मी, माझे कुटुंब परिसर, पाणी-पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन.
ताईसाठी सूचना	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती **LO- अ) 9.4.1** **ब) 9.4.1** **क) 9.4.1**	**CG-9** बालके दोन भाषांमध्ये दैनंदिन संवाद साधण्यासाठी प्रभावी संवाद कौशल्ये विकसित करतात. **C-9.4** क्लिष्ट कार्य पूर्ण करण्यासाठी मौखिक सूचना समजून घेतो व इतरांना तशाच स्पष्ट तोंडी सूचना देतो. **CG-7** बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात. **C-7.1** वेगवेगळ्या वर्गातील/गटातील वस्तूंमधील फरक व वस्तूंचा एकमेकाशी संबंध यांचे निरीक्षण करतो व समजून घेतो.
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	• श्रवण कौशल्य, जीवनकौशल्य
निरीक्षण करावयाच्या बाबी	• सूचना ऐकून रंग, आकार याचे आकलन होते की नाही हे पाहावे.

<table>
<tr><th colspan="3">आधारशिला कृती क्र. : 59. Let's Discuss : Safe Adults Around Us</th></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">परिचित–अपरिचित व्यक्ती</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">चित्रकार्ड, फ्लॅशकार्ड, चित्र कथा, चित्रफीत</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td>• घरातील व्यक्ती, वर्गातील मित्र–मैत्रिणी, अंगणवाडीतील व्यक्ती यांचा परिचय मुक्त गप्पांच्या माध्यमातून जाणून घ्यावा. बालकांच्या घराशेजारी, गल्लीत, परिसरात राहणाऱ्या बालकांची नावे विचारावीत.</td><td>पूर्वज्ञान : बालक परिचित व अपरिचित व्यक्तींविषयी माहिती विचारावी.
• वर्गात गप्पागोष्टी घेत असताना ताईने सर्व बालकांची आत्मीयतेने विचारपूस करावी. चर्चा करावी.
• निरीक्षण करून एखादे बालक जर अस्वस्थ, घाबरलेले वाटले तर त्याला बाजूला घेऊन त्याच्याशी संवाद साधावा.
• विविध प्रकारचे प्रसंग (सुरक्षित–असुरक्षित) बालकांना सांगावेत. त्यावर चर्चा करावी.</td><td>कृती : गप्पा – सुरक्षितता
• बालकांच्या मदतीने छोटी नाटिका, रोल प्ले सादरीकरण कुटुंबातील किंवा इतर व्यक्तींकडून अस्वस्थ वाटल्यास पालक/ताई यांच्याशी संपर्क साधण्याससांगावे. शाळा/मैदानात जाण्यासाठी एकटे, शॉर्टकट मार्ग टाळण्यास सांगावे. अनोळखी व्यक्तीने कोणी स्पर्शकेल्यास, अस्वस्थ, गोंधळल्यासारखे वाटल्यास हात लावू नका हे सांगावे.
• अपरिचित व्यक्तीने कसलेही आमिष दाखविल्यास त्यास नाही म्हणणे यांसारख्या घटना चर्चेतून, चित्रकार्डमधून दाखवावे/सांगावे.</td></tr>
<tr><th colspan="3">पंचकोश</th></tr>
<tr><td colspan="3">अन्नमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">घरातील फोटो ओळखूया. गटातील बालकांच्या वस्तू, परिसरातील वस्तू, ठिकाण चित्रांद्वारे ओळखण्यासाठी द्यावे.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">मी माझे कुटुंब व परिसर, मदतनीस</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2"></td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-1 बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात.
C-1.6 असुरक्षित/धोकादायक परिस्थिती समजून घेऊन मदत मागतो.
अ) LO 1.6.1 परिचित आणि अपरिचित व्यक्ती यातील फरक ओळखतो.</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
	ब) LO 1.6.1 परिचित आणि विश्वासू प्रौढांनी विचारपूस केल्यास वाटणारी अस्वस्थता व्यक्त करतो. क) LO 1.6.1.1 सुरक्षित आणि असुरक्षित स्पर्श कळतो. अपरिचित व्यक्तींपासून दूर राहतो. परिचित मोठ्या व्यक्तीकडे स्वतःहून अस्वस्थता भीती व्यक्त करतात.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	परिचित-अपरिचित व्यक्ती याबद्दल समज येणे. भाषिक कौशल्य विकास, सुरक्षित-असुरक्षित गोष्टींची जाणीव, स्वावलंबन, नेतृत्व, सकारात्मक शिकण्याच्या सवयी, समस्या निराकरण, आत्मसंरक्षण, जीवनकौशल्य	
निरीक्षण करावयाच्या बाबी	बालक परिचित व अपरिचित व्यक्ती ओळखतो की नाही याचे दैनंदिन निरीक्षण करावे.	
आधारशिला कृती क्र. : 60. What will happen if? : Think and Apply Reasoning to Situations		
उपक्रमाचे नाव	जर आणि तर	
उपक्रमाला लागणारे साहित्य	-	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
• ताईने बालकांना अर्धवर्तुळात बसवावे. बालकांना काही प्रश्न विचारावे. काय होईल/जर तुम्ही कराल तर. १. उदाहरणार्थ, 'स्वच्छता' या विषयावर चर्चा करा. • ताईने बालकांना खालील प्रश्न विचारावे. चिखलात खेळल्यानंतर तुम्ही हात न धुतल्यास काय होईल? झोपण्यापूर्वी तुम्ही दात घासण्यास विसरलात, तर काय होईल? तुम्ही भरपूर गोड पदार्थ खाल्ले आणि तुमचे दात चिकट झाले तर तुम्ही काय कराल? काय होईल? जर	• ताईने बालकांना अर्धवर्तुळात बसवावे. • जर तुम्ही बी पेरले तर काय होईल? तुम्ही रोपाला पाणी दिले नाही तर काय होईल? • शहरांच्या मध्यभागी उघड्यावर वन्य प्राण्यांना पाळीव प्राणी म्हणून ठेवले तर काय होईल? • मीठ, साखर, वाळू, खडे, तेल इत्यादी वस्तू पाण्यात घातल्यास काय होईल? • झाडे नसतील तर काय होईल? • ट्रॅफिक दिव्यांनी काम करणे थांबवल्यास काय होईल?	• या वयोगटातील बालकांना विविध प्रसंग सांगून तुम्हाला त्या वेळी कसे वाटेल असे विचारावे? उदाहरणार्थ, तुम्ही जास्त वेळ मोबाईल बघितला म्हणून तुमची आई रागावली तर तुम्हाला कसे वाटेल, मोठ्या बाई (सुपरवायजर) अंगणवाडीमध्ये आल्यावर तुम्ही छान गोष्ट सांगितली म्हणून त्यांनी शाबासकी दिली. तुम्हाला असा आनंद, राग, वाईट वाटणे कधी कधी होते? तुम्ही काय केले की तुमच्या आईबाबा/मित्रांना आनंद/राग/वाईट वाटणे असे होईल? तुम्हाला मित्रांबरोबर खेळायला जायचा कंटाळा आला असेल तर तुम्ही त्यांना काय सांगाल? तुमची मैत्रीण खूप रागावली असेल किंवा रडत असेल तर तुम्ही तिला कसे शांत कराल?

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
तुम्ही तुमची खेळणी कपाटात न ठेवता जमिनीवर ठेवली तर? तुम्ही तेच कपडे न धुता दररोज घातल्यास काय होईल? तुम्ही तुमची नखे नियमितपणे कापली नाहीत तर काय होईल? तुम्ही रोज अंघोळ केली नाही, तर काय होईल? जर पाणी नसेल, तर काय होईल? वापरासाठी शौचालये नसतील तर? बालकांना विचार करायला प्रोत्साहन द्यावे. प्रत्येक बालकाला मुक्तपणे व्यक्त होऊ द्या.	• खेळण्यासाठी बागा नसतील तर काय होईल? • बालकांच्या तार्किक विचारांना प्रोत्साहन द्या आणि बालकांना व्यक्त होऊ द्यावे. • तुम्ही खेळून घरी गेलात आणि घराला कुलूप असेल तर तुम्ही काय कराल?	• तुमच्या शेजारचा मुलगा खेळून आला आणि त्यांच्या घराला कुलूप आहे, तर तुम्ही काय कराल? • बालक त्यांच्या भावना व्यक्त करू शकेल, अशा प्रकारचे प्रश्न विचारा.

पंचकोश

विज्ञानमय कोश

विविधता	• बालकांना त्यांच्या दैनंदिन आयुष्याशी संबंधित वेगवेगळे प्रश्न विचारावे. • बालकांना त्यांच्या आयुष्याशी संबंधित विविध प्रसंगांचे रोल प्ले करण्यास सांगावे.
थीम/विषय	पाणी–पाऊस, ऋतू, मदतनीस, वाहन.
ताईसाठी सूचना	बालकांना त्यांच्याच रोजच्या आयुष्यातील घटनांचा वापर करून जर–तरचे प्रश्न विचारावेत.
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-7** बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात. **C-7.2** निसर्गाच्या निरीक्षणातून कार्यकारणभाव समजून घेऊन, तो दर्शविणारी साधी परिकल्पना मांडतो व त्याच्या स्पष्टीकरणाकरिता/पडताळणीकरिता निरीक्षणाचा आधार घेतो.
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	तार्किक विचार, भाषिक विकास, सामाजिक विकास होण्यास मदत होईल. जीवनकौशल्य
निरीक्षण करावयाच्या बाबी	बालक योग्य तर्क मांडू शकते का ते पाहावे.

<table>
<tr><th colspan="3">आधारशिला कृती क्र. : 61. Exploring Food : Types, Tastes, Preferences, Nutrition</th></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">खाऊ तयार करूया.</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">भाज्या, फळे, अन्नपदार्थ यांचे कटआऊट, लिंबू सरबत व कडधान्याची भेळ यांचे घटक पदार्थ</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td>• बालकांना विविध फळे, भाज्या, घरात केलेले व विकत घेतलेले पदार्थ देऊन विविध प्रकारे वर्गीकरण करण्यास सांगा. चवीप्रमाणे, रंगाप्रमाणे, आवडणारे व न आवडणारे, घरात केले जाणारे व विकत आणले जाणारे इत्यादी व त्यावर चर्चा करा.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td><td>कृती : भाकरी भाजी करू.
• भाकरी, भाजी हे कसे तयार होतात याचे वर्णन बालकांना गोष्टी/गाणी अशा रूपात व्यक्त करण्यास प्रवृत्त करावे, जसे भाकरी – दळून आणले, पीठ मळले, भाकरी थापली, तव्यावर टाकली, भाकरी भाजली गरमा गरम भाजली, ताटात वाढली, पोटभर खाल्ली. यांची चित्रकार्डे आणून बालकांना क्रम लावण्यास सांगावे.
याप्रमाणे वेगवेगळ्या पदार्थांचे वर्णन करण्यास सांगावे.
• तांदूळ, डाळी, कांदे, बटाटे, टोमॅटो यासारखे पदार्थ व धान्ये दाखवून त्यापासून कोणता पदार्थ तयार होतो ते विचारावे.
• कोणते पदार्थ शरीराला पोषक आहेत ते सांगून बालकांपुढे विविध खाद्यपदार्थांचे कटआऊट द्यावेत व त्यांना शक्तिमान होण्यासाठी यातले पदार्थ (कटआऊट) तुमच्या ताटात वाढून घ्या असे सांगा.</td><td>• कडधान्यांची भेळ, लिंबू सरबत हे पदार्थ बालकांच्या मदतीने करून घ्या.
• बालकांना एखाद्या पदार्थाचे नाव सांगून तो पदार्थ तयार होण्यासाठी कोणकोणते घटक पदार्थ लागतात, त्यांची नावे विचारावीत. जसे : खिचडी तयार करणे.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td></tr>
</table>

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td></td><td>• दुकानात असलेले धान्य, पीठे, कच्चे पदार्थ जे घरी नेऊन आई त्यापासून काहीतरी बनवते ते पोषक पदार्थ, तर कुरकुरे, वेफर्स हे तयार पदार्थ आणि मिरिंडा, रसना हे अपायकारक पदार्थ हे सांगावे. त्यानंतर वेगवेगळ्या पदार्थांची नावे सांगून खाणार खाणार आणि नाही खाणार असे म्हणायचे खेळ घ्यावा. उदाहरणार्थ, तांदूळ खाणार ज्वारी खाणार तेल छान छान, वेफर्स नाही खाणार थम्स अप नाही पिणार.</td><td></td></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">अन्नमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">• वेगवेगळ्या पदार्थांची चित्रे असलेले घटनाक्रम, चित्रकार्डे मुक्तखेळामध्ये स्वयंपाक घरातील भांड्यांचा सेट देऊन विविध पदार्थ करण्यास सांगा.
• योग्य पदार्थाची निवड या अर्थाने एखाद्या प्रसंगाचे बालकांसमोर कथन करावे, त्यापैकी योग्य कृती कोणाची यासंबंधी चर्चा घडवून आणावी (जसे, आजोबांनी दोन भावंडांना काही पैसे दिले त्यातील एकाने त्या पैशातून बाजारातील तयार व पाकीटबंद अन्नपदार्थ जसे कुरकुरे आणि दुसऱ्या भावंडांनी फळे आणली तर दोघांपैकी कोणाची कृती योग्य आणि का यांविषयी चर्चा घडवून आणावी.)
• दुकानातून जाऊन वेगवेगळे पदार्थ आणण्याचे नाट्यीकरण करावे.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">भाज्या व फळे</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">वयोगटनिहाय कृतिपत्रिका सोडवून घ्याव्यात.</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-1** बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात. **C-1.1** पोषक आहाराबाबत रुची आणि समज दर्शवतो व अन्नपदार्थ वाया घालवत नाही. **ब) LO 1.1.3** चित्रकृतींच्या मदतीने साधा नाष्टा/स्नॅक्स बनवतो. **क) LO 1.1.2.1** वेगवेगळ्या खाद्यपदार्थातील अन्नघटक ओळखतो आणि त्यांचे फायदे व तोटे स्पष्ट करतो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	• संभाषण, वर्गीकरण, विश्लेषण, निर्णयक्षमता, तार्किकक्षमता, कार्यकारणसंबंध या क्षमता व कौशल्य साध्य होण्यास मदत होईल. • बालक स्वावलंबनाकडे जावे यासाठी मदत द्यावी.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	बालकाला वेगवेगळ्या पदार्थांचे, पोषक आणि अपोषक पदार्थ यांमध्ये वर्गीकरण करता येते का, खाद्यपदार्थांतील अन्नघटक ओळखता येतात का? याचे निरीक्षण करावे.	
आधारशिला कृती क्र. : 62.		
उपक्रमाचे नाव	क्षेत्रभेट	
उपक्रमाला लागणारे साहित्य	चित्रकार्ड	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
कृती : क्षेत्रभेट/सहल (बाग, उद्यान, शेत, इत्यादी) बालकांना जवळच्या बागेत किंवा शेतामध्ये सहलीसाठी घेऊन जावे. • तेथील वृक्ष, प्राणी, पक्षी, माती, पाणी, जमीन, खडक इत्यादींचे निरीक्षण करण्यास सांगावे. • क्षेत्रभेटीच्या वेळी वनस्पती, प्राणी यांच्यामध्ये असणारे वैविध्य जाणीवपूर्वक दाखवावे. (उदाहरणार्थ, वेगवेगळ्या झाडांची पाने, त्यांचे आकार,	**कृती : क्षेत्रभेट/सहल (बाग, उद्यान, शेततळे, नदीकाठ इत्यादी)** निसर्ग सहलीमध्ये फिरताना विनाकारण पाने-फुले यांना हात लावू नये/तोडू नये. या मुद्द्यांवर भर द्यावा. **उदाहरणार्थ,** • फुलांमध्ये फुलपाखरासारख्या कीटकांचे अन्न असते. त्यामुळे विनाकारण फुले तोडू नयेत, हा मुद्दा मनावर बिंबवावा.	**कृती : क्षेत्रभेट** • परिसरातील रोपवाटिका, परसबाग उद्यान शेती, गोठा या ठिकाणी क्षेत्रभेट आयोजित करावी. • बालकांना क्षेत्रभेटीच्या परिसरात मुक्त फिरण्याची संधी द्यावी. जमिनीवर पडलेली पाने, फुले गोळा करणे, मातीत खेळणे, यांसारख्या उपक्रमांचे आयोजन क्षेत्रभेटीमध्ये करावे.

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>खोड–त्यांचे स्पर्श, प्राणी–त्यांचे आवाज, रंग, शरीरावरील पट्टे/ठिपके, अवयव)
• क्षेत्रभेटीबद्दल दुसऱ्या दिवशी चर्चा करणे.
• क्षेत्रभेटीमध्ये काय पाहिले? त्याचे चित्र काढण्यास सांगावे.</td><td>• बालकांना पुढील प्रसंगांची कार्ड्स दाखवावी.
उदाहरणार्थ, चूक का बरोबर ठरवूया.
१) झाडाची पाने तोडणारी बालके.
२) कुत्र्याला प्रेमाने गोंजारणारी बालके.
३) गाईला काठीने मारणारा माणूस.
४) झाडाला पाणी घालणारा माणूस.
५) मांजरीची शेपटी ओढणारी बालके.
वरील चित्रे बालकांसमोर ठेवून कोणते चित्र चूक आहे आणि कोणते चित्र बरोबर आहे, हे विचारणे. बालकांची उत्तरे ऐकून त्याची कारणे विचारणे.</td><td></td></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">मनोमय, आनंदमय, विज्ञानमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">अ) शांततेत डोळे मिटून तेथील पशू–पक्ष्यांचे आवाज, पाण्याचा आवाज इत्यादी विविध आवाजांचा अनुभव घेण्यास सांगावे.
ब) परिसरात असणाऱ्या प्राण्यांबद्दल बालकांशी गप्पा माराव्या.
क) प्राणी कुठे राहतात. याबद्दल चर्चा करणे.
गप्पा
प्राणी, झाडे यांच्याशी कसे वागावे, याबद्दल चर्चा करणे.
प्राण्यांना/झाडांना त्रास दिला तर काय होईल, अशा गप्पा मारणे.</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
थीम/विषय	मी, माझे कुटुंब, परिसर, पाणी–पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन	
ताईसाठी सूचना	क्षेत्रभेटीसाठी जाताना पूर्वतयारी करणे आवश्यक आहे. यामध्ये क्षेत्रभेटीसाठी जाण्याचे ठिकाण, पूर्वपरवानगी, बालकांची सुरक्षितता, विचारावयाचे प्रश्न, निरीक्षण करावयाच्या बाबी, बालकांना द्यावयाचे अनुभव यांची पूर्वतयारी करावी. यासाठी मार्गदर्शक हस्तपुस्तिका भाग १ मधील प्रकरण ४ मधील क्षेत्रभेटी संदर्भातील प्रपत्रांचा वापर करावा.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-6** बालके स्वत:भोवतालच्या नैसर्गिक वातावरणाबद्दल कृतज्ञताभाव दर्शवितात. **C-6.1** सर्व प्रकारच्या जीवांबाबत काळजी घेतो व त्यांच्यासोबत राहण्याबाबत आनंद प्रकट करतो. **अ) LO- 6.1.1** वनस्पती आणि प्राण्यांचे निरीक्षण करताना कुतूहल दर्शवितो. **ब) LO- 6.1.1** झाडे आणि प्राणी यांना विनाकारण इजा करत नाहीत. **क) LO- 6.1.3.1** स्थानिक वातावरणातील झाडे आणि प्राणी यांच्या सहवासात आनंद व्यक्त करतो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	• निरीक्षणकौशल्य, संवेदनशीलता, निसर्गप्रेम ही कौशल्ये विकसित होण्यास मदत होईल.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	बालके क्षेत्रभेटीत सूचनेचे पालन करतात का, प्रत्यक्ष क्षेत्रभेटीच्या ठिकाणी स्वत:हून विविध प्रश्न विचारतात का, सांगितलेल्या बाबींचे निरीक्षण करतात की नाही ते पाहावे.	
आधारशिला कृती क्र. : 63. Stamp and Print : Fruits and Vegetables. Create and Guess impressions.		
उपक्रमाचे नाव	ठसेकाम	
उपक्रमाला लागणारे साहित्य	रंग, विविध ठसे (उदाहरणार्थ, भेंडीचे, बटाट्याचे, कांद्याचे काप, बोटांचे ठसे रीळ, झाकणे, कागदाचे बोळे.	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
कृती १ : • परिसरामधे मिळणाऱ्या विविध वस्तू – काड्या जमवण्यास बालकांना मदत करावी व ते रंगात बुडवून त्याचे ठसेकाम करून घ्यावे.	• बालकांना विविध ब्लॉक्स स्टेन्सिल, परिसरात आढळणाऱ्या वस्तू उदाहरणार्थ, पाने, फुले इत्यादी गोळा करण्यास सांगावे.	• बालकांना विविध ब्लॉक्स स्टेन्सिल, परिसरात आढळणाऱ्या वस्तू उदाहरणार्थ, पाने, फुले इत्यादी गोळा करण्यास सांगावे.

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>कृती २ :
• भेंडी, बटाटा, कांदा यांचे काप करून द्यावे.
• हे काप रंगात बुडवून कागदावर त्यांचे ठसे उमटवण्यास द्यावे.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td><td>• बालकांना विविध पानांचे, फुलांचे रंग बनवण्यास मदत करावी.
• ब्लॉक्स स्टेन्सिल या वस्तू रंगात बुडवून त्यांचे कागदावर ठसे उमटवण्यास सांगावे.
• बोटांचे ठसेकाम – बोटांचे ठसे काढून नवीन आकृती/ चित्र बनवायला सांगावे. उदाहरणार्थ, अननसाच्या चित्रावर बोटांचे ठसे, द्राक्षाच्या घडावर बोटांचे ठसे काढावे.
• बालकांना एकत्र मोठ्या आकाराच्या कागदावर एकत्र ठसेकाम करायला द्यावे.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td><td>• बालकांना विविध पानांचे, फुलांचे रंग बनवण्यास सांगावे. ब्लॉक्स स्टेन्सिल या वस्तू रंगात बुडवून त्यांचे असे कागदावर ठसे उमटवण्यास सांगावे.
• परिसरामध्ये आढळणारे दगड, बिया, पाने, फुले जमवून गटाने एकत्र सुशोभन करण्यास सांगावे.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">अन्नमय, आनंदमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">• उपरोक्त कृती करण्यासाठी विविध माध्यमे/साहित्य/पर्याय सुचवावेत– हळद, कुंकू, बुक्का, पालक किंवा बीट पासून होणारे रंग
• बालकांना लहान मोठ्या आकारांमध्ये ठसेकाम करण्यास प्रोत्साहन द्या.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">मी, माझे कुटुंब परिसर, पाणी–पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगली)</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">• बालकांना परिसरामध्ये शोध घेण्यास प्रवृत्त करा.
• त्यांनी आणलेल्या वस्तूंबद्दल त्यांचे कौतुक करा.
• ताईने यासंदर्भात उपलब्ध वयोगटनिहाय कृतित्रिका सोडवून घ्याव्यात.</td></tr>
</table>

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-2 बालके ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात.
C-2.1 आकार, रंग आणि त्याच्या छटा यांच्यामधील फरक ओळखतो.
अ) LO 2.1.1 मूळ प्राथमिक रंग (लाल, निळा आणि पिवळा) आणि परिसरातील इतर रंग यांच्यातील फरक ओळखतो आणि त्यांची नावे सांगतो. (काळा, पांढरा, तपकिरी)
CG-12 बालके दृक् आणि ललित कलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात.
C-12.1 विविध आकाराच्या द्विमितीय आणि त्रिमितीय कलाकृती तयार करण्यासाठी विविध प्रकारचे साहित्य आणि साधने हाताळतो व त्यांबरोबर खेळतो.
ब) LO 12.1.4 ब्लॉक्स, स्टेन्सिल, सापडलेल्या वस्तू आणि नैसर्गिक साहित्य यांचे ठसे उमटवतो.
क) LO 12.1.4 ब्लॉक्स स्टेन्सिल सापडलेल्या वस्तू आणि नैसर्गिक साहित्य यांच्या सोप्या रचना करतो.</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये</td><td colspan="2">सूक्ष्म स्नायू विकास, नेत्रहस्त समन्वय हे साध्य होण्यास मदत होईल.</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">ठसा देताना बालकाने बोटांच्या स्नायूंवर किती जोर दिला आहे, याचे उठवलेल्या ठशावरून निरीक्षण करावे.</td></tr>
<tr><td colspan="3">आधारशिला कृती क्र. : 64. Artistic Adventure : Free Painting and Drawing</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">मुक्त चित्र व रंगकाम</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">रंगीत खडू, मेणकांड्या, रंगीत कागद इत्यादी.</td></tr>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>• ताईने बालकांना रंगीत खडू द्यावे. ताईने बालकांना फळ्यावर किंवा फरशीवर निश्चित जागा करून द्यावी.
• बालकांना त्याच्या मर्जीने हवे ते आकार (आंबा, झाड, दगड, टेबल, वीट, पक्षी, पान</td><td>• ताईने बालकाने काढलेल्या आकारासंबंधी प्रश्न विचारून त्याला बोलते करावे. (उदाहरणार्थ, हे काय आहे? तू हे काय काढले? याच्याबद्दल आणखी सांग.) यांप्रमाणे. ताईने बालकांना रंगीत खडू द्यावे.</td><td>• ताईने बालकांचे गट करावे. त्यांना रंगीत खडू, मेणकांड्या, रंगीत कागद इत्यादी साहित्य द्यावे.
• ताईने बालकांच्या गटाला फळ्यावर किंवा फरशीवर निश्चित जागा करून द्यावी.</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
इत्यादी) काढण्याची सूचना करावी. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	• ताईने बालकांना फळ्यावर किंवा फरशीवर निश्चित जागा करून द्यावी. बालकांना त्याच्या मर्जीने हवे ते आकार (आंबा, झाड, दगड, टेबल, वीट, पक्षी, पान इत्यादी) काढण्याची सूचना करावी. • ताईने बालकाने काढलेल्या आकारासंबंधी प्रश्न विचारून त्याला बोलते करावे. (उदाहरणार्थ, तू हे काय काढले? याच्याबद्दल तुला काय वाटते?) याप्रमाणे. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	• गटाला सामूहिकरीत्या हवे ते चित्र, आकार काढण्याची सूचना करावी. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**

पंचकोश	
अन्नमय, आनंदमय, प्राणमय कोश	
विविधता	साहित्य आणि युक्त्यांचे वेगळेपण वापरून उपरोक्त कृतीत विविधता आणता येईल.
थीम/विषय	मी, माझे कुटुंब परिसर, पाणी–पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगली), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन (आकार).
ताईसाठी सूचना	ताईने वयोगटनिहाय कृतिपत्रिका सोडवून घ्याव्यात.
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-12** बालके दृक् आणि ललित कलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात. **C-12.1** विविध आकाराच्या द्विमितीय आणि त्रिमितीय कलाकृती तयार करण्यासाठी विविध प्रकारचे साहित्य आणि साधने हाताळतो व त्याबरोबर खेळतो. **अ) LO 12.1.1** योग्य कला साहित्य साधने आणि उपकरणे हाताळतो.

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td></td><td colspan="2">ब, क) LO 12.1.2 साहित्य आणि साधने वापरताना विविध प्रकारांनी पकडतो आणि हाताळतो. (उदाहरणार्थ, काड्या, बिया. दगड, खडू, दोरा, पेन्सिली, ब्रश, भुकटी, कात्री इत्यादी.)
क) LO 12.1.3 समन्वयक, सुलभक आणि स्थानिक समुदायाच्या साहाय्याने मोठ्या स्वरूपाची कामे करतो. (उदाहरणार्थ, जमिनीवरील रांगोळी, भित्ति चित्रे, शिल्प)</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये</td><td colspan="2">सूक्ष्म स्नायू विकास, नेत्रहस्त समन्वय हे साध्य होण्यास मदत होईल.</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">या कृतीबाबत किती उत्सुकता दाखवतात. चित्रात नवनिर्मिती करून बारकावे दाखवता येतात का याचे निरीक्षण करावे.</td></tr>
<tr><td colspan="3">आधारशिला कृती क्र. : 65. Sandy Discoveries : Free Sand Play</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">वाळूत खेळू</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">भिजवलेली माती, खेळण्याची माती, कागदाचा लगदा, भिजवलेली कणीक कागद इत्यादी.</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td colspan="3">• ताईने बालकांना ट्रेमध्ये बारीक वाळू अथवा रेती उपलब्ध करून द्यावी. ४-४ बालकांच्या गटांना वाळूत/रेतीमध्ये मुक्तपणे खेळू द्यावे.
• वाळूमध्ये प्लास्टिकचे वाट्या, भांडी, चमचे, टोपल्या, नरसाळे या वस्तू वाळूत खेळण्यासाठी उपलब्ध करून द्याव्यात.</td></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">अन्नमय, आनंदमय, प्राणमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">बालकांच्या विचारांना आणि कृतींना स्वातंत्र्य देऊन आणि विविध साहित्य वापरून उपरोक्त कृतीत विविधता आणता येईल.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">मी, माझे कुटुंब परिसर, पाणी-पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगली), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन (आकार)</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">ताईने बालकांना वाळूत खेळण्याचा प्रत्यक्ष अनुभव द्यावा.</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-12 बालके दृक् आणि ललित कलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात.</td></tr>
</table>

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td></td><td colspan="2">**C-12.1** विविध आकाराच्या द्विमितीय आणि त्रिमितीय कलाकृती तयार करण्यासाठी विविध प्रकारचे साहित्य आणि साधने हाताळतो व त्यांबरोबर खेळतो.
अ) LO 12.1.1 योग्य कला साहित्य साधने आणि उपकरणे हाताळतो.
ब, क) LO 12.1.2 साहित्य आणि साधने वापरताना विविध प्रकारांनी पकडतो आणि हाताळतो. (उदाहरणार्थ, काड्या, बिया. दगड)</td></tr>
<tr><td>**साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये**</td><td colspan="2">मुक्त आकारावर शिल्पे तयार करण्याचे कौशल्य, कलाकृती निर्माण कौशल्य विकसित होण्यास मदत होईल, सृजनशीलता,कला कौशल्य</td></tr>
<tr><td>**निरीक्षण करावयाच्या बाबी**</td><td colspan="2">बालकाच्या शिल्पकला कोरण्याचे व साधन हाताळणीचे निरीक्षण करावे.</td></tr>
<tr><td colspan="3">**आधारशिला कृती क्र. : 66. My Storage Box : Decorate and Create Personal Storage Box**</td></tr>
<tr><td>**उपक्रमाचे नाव**</td><td colspan="2">मी सजवलेले खोके</td></tr>
<tr><td>**उपक्रमाला लागणारे साहित्य**</td><td colspan="2">कापडाचे तसेच कागदाचे तुकडे, स्टीकर, डिंक, रंग, मणी, रिबन इत्यादी</td></tr>
<tr><td>**वयोगट ३ ते ४ वर्षे**</td><td>**वयोगट ४ ते ५ वर्षे**</td><td>**वयोगट ५ ते ६ वर्षे**</td></tr>
<tr><td>• बालकांना त्यांच्या आजूबाजूच्या परिसरातून मोठ्यांच्या मदतीने खोके गोळा करण्यास सांगावे.
• खोकेला त्यांना हवे तसे सजविण्यास सांगावे. यासाठी रंगवणे, कापडाचे तसेच कागदाचे तुकडे चिकटविणे, स्टीकर इत्यादी वापरण्यास सांगावे.
• बालकांशी प्रश्नांच्या मदतीने संवाद साधावा. जसे कोणता रंग, वस्तू सजविण्यासाठी वापरला? सजविण्यात विविधता असेल त्यामुळे त्यांनी ते कसे सजविले यावर वैयक्तिकरित्या विचारावे.</td><td>• फाडकाम, चिकटकाम याद्वारे खोके सजविण्यास सांगावे. जसे : रंगीत कागदाला फाडून चिकटविणे.
• प्रत्येक मुलाचे खोके हा वेगळा असेल त्यामुळे त्यांना सजविण्यासाठी त्यांनी काही वेगळे केले का ते विचारावे.
• खोक्याचा वापर कशासाठी करण्यात आला यावर चर्चा करावी. सर्वांचे खोके, ते व्यवस्थित कसे ठेवता येतील याबाबत नियोजनात सहभागी करा.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td><td>• बालकांनी कोलाज, रंगकाम इत्यादी मध्ये नव्याने जाणून घेतलेल्या बाबींचा वापर खोक्यास सजविण्यासाठी करण्यास सांगावा.
• विविध वस्तूंचा वापर करून खोके सजविण्यास सांगावे.
जसे मणी, रिबन, पाने , फुले इत्यादी.
• स्वतःचे खोके वेगळे दिसावे यासाठी त्यांनी कोणते प्रयत्न केले हे सांगण्याची संधी द्यावी. खोके सजवितानाच्या गमती–जमती विचाराव्यात.
• मोठे खोके घेऊन त्यात वर्गातील कोणकोणत्या वस्तू ठेवता येतील हे बालकांना विचारावे.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
• बालकांना त्यात विविध वस्तू ठेवायला सांगा. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**		

पंचकोश	
अन्नमय, आनंदमय, प्राणमय कोश	
विविधता	परिसरात सापडणाऱ्या विविध वस्तू वापरून विविधता आणता येईल. प्रश्नांत बदल करून विविधता आणता येईल.
थीम/विषय	मी, माझे कुटुंब व परिसर, वनस्पती (फुले, शेती, रंग)
ताईसाठी सूचना	• बालकांना खोके सजविताना मुक्तपणे सजवू द्यावे. त्यात विविध वस्तू ठेवण्यास सांगावे. जेणेकरून वस्तू व्यवस्थित ठेवता येईल. • पालकांच्या सहकार्याने टाकाऊ वस्तूंचा वापर करून या कृती करून घ्यावा.
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-1** बालके आणि त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात. **CG-1.3** शाळा व वर्ग स्वच्छ आणि नीटनेटके ठेवतो. **अ) LO 1.3.1** स्वतःच्या वस्तू जसे की पिशव्या, बाटल्या, बूट, रुमाल इत्यादीबद्दल सजग होतात. **ब) LO 1.3.1** स्वतःच्या वस्तू योग्य जागी ठेवतात आणि योग्य जागेवरून घेतात. **क) LO 1.3.1** स्वतःच्या वस्तूंची चांगल्याप्रकारे देखभाल करतात.
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	सूक्ष्मकारक कौशल्य, सर्जनशीलता, कलाकौशल्य हे साध्य होण्यास मदत होईल.
निरीक्षण करावयाच्या बाबी	कृतीदरम्यान सूक्ष्मकारक कौशल्य विकासाचे निरीक्षण करावे, (विशेषतः फाडकाम, चिकटकाम).
आधारशिला कृती क्र. : 67. Paper Ball Mosaic : Make and Paste Paper Balls on Different Drawings	
उपक्रमाचे नाव	चित्रावर कागदी गोळे चिकटवणे.
उपक्रमाला लागणारे साहित्य	रद्दी कागद, ओले रंग, ब्रश, पुठ्ठे, डिंक इत्यादी.

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td colspan="2">
• ताईने बालकांना रद्दी कागद. ओले रंग द्यावे.
• वेगळ्या कागदावर अथवा पुठ्ठ्यावर प्राण्याच्या चित्राची बाह्यरेषा आखून द्यावी.
• बालकांना (त्याच्या मताप्रमाणे) कागद फाडण्यास सांगावे. फाडलेले कागद चुरगळून छोटे गोळे बनवण्याची सूचना सांगावी. बनलेल्या गोळ्यास वाटेल त्या रंगात बुडवून रंगीत करण्याची सूचना द्यावी.
• हे रंगीत गोळे प्राण्याच्या चित्राच्या बाह्यरेषेत चिकटवण्यास सांगावे.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)
</td><td>
• ताईने बालकांना रद्दी कागद आणि ओले रंग द्यावे.
• वयोगट ४ ते ५ वर्षे साठी असलेली कृती घ्यावी.
• ताईने बालकांना मोठ्या कागदावर चित्राची बाह्यरेषा द्यावी.
• बालकांना बाह्यरेषेवर बालकांना पतंगाचा कागद गोळे करण्यासाठी द्यावा.
• चित्राच्या आत केलेले गोळे बालकांना चिकटवण्यास सांगावे.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)
</td></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">अन्नमय व आनंदमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">बालकांच्या विचारांना आणि कृतींना स्वातंत्र्य देऊन आणि विविध साहित्य वापरून उपरोक्त कृतीत विविधता आणता येईल.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">परिसर, पाणी–पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगली), मदतनीस, वाहन (आकार)</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">ताईने यासंदर्भात उपलब्ध वयोगटनिहाय कृतिपत्रिका सोडवून घ्याव्यात.</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">
CG-12 बालके दृक् आणि ललित कलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात.
C-12.1 विविध आकाराच्या द्विमितीय आणि त्रिमितीय कलाकृती तयार करण्यासाठी विविध प्रकारचे साहित्य आणि साधने हाताळतो व त्यांबरोबर खेळतो.
अ) LO 12.1.1 योग्य कला साहित्य साधने आणि उपकरणे हाताळतो.
ब, क) LO 12.1.2 साहित्य आणि साधने वापरताना विविध प्रकारांनी पकडतो आणि हाताळतो. उदाहरणार्थ, काड्या, बिया, कडे, दगड, खडू, दोरा, पेन्सिली, ब्रश, भुकटी, कात्री इत्यादी.
</td></tr>
</table>

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td></td><td colspan="2">ब, क) LO 12.1.3 समन्वयक, सुलभक आणि स्थानिक समुदायाच्या साहाय्याने मोठ्या स्वरूपाची कामे करतो. उदाहरणार्थ, जमिनीवरील रांगोळी, भित्तिचित्रे, शिल्प.</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये</td><td colspan="2">सूक्ष्मकारक कौशल्य, सर्जनशीलता हे साध्य होण्यास मदत होईल.</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">कृतीदरम्यान सूक्ष्मकारक कौशल्यविकासाचे निरीक्षण करा. विशेषत: फाडकाम, चिकटकाम</td></tr>
<tr><td colspan="3">आधारशिला कृती क्र. : 68. Origami Fun : Paper Folding</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">घडीकाम</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">कागद, वर्तमानपत्र, घोटीव कागद</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td>• बालकांना कागद देऊन त्याच्या घड्या घालून घ्याव्या.
• बालकांना रुमालाची घडी कशी घालायची ते दाखवावे.
• बालकांना कागद देऊन त्याच्या घड्या कशा घालायच्या हे सांगावे व सोबत कृती पण करून दाखवावी.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td><td>• बालकांना वर्तुळाकार बसवावे.
• बालकांना घडीकामासाठी रंगीत घोटीव कागद द्यावे.
• कागदाच्या घड्या घालून होडी बनवणे ही कृती प्रथम बालकांना करून दाखवावी.
• बालकांना छोट्या छोट्या सूचना देऊन सूचनेप्रमाणे कृती करण्यास सांगावी.
• होडी तयार करण्याची कृती बालकांकडून करून घ्यावी.
• बालकाला प्रत्यक्ष घडीकाम कसे करायचे ते करून दाखवावे.
• बालकाला घडीकाम करू द्यावे. तयार झालेला आकार काय आहे? कशाचा असावा? याबाबत बालकाला काय वाटते ते जाणून घ्यावे.</td><td>घडीकाम करू चित्रात घालू.
• ताईने पाणी, बाग, सण अशी चित्रे काढून द्यावीत.
• बालकांकडून घडीकामाच्या वस्तू तयार करून घ्याव्यात. होडी, फुलपाखरू, झाड, फूल, घर, मासा दिलेल्या चित्रात योग्य ठिकाणी चिकटवण्यास द्यावे.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td></tr>
</table>

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td></td><td>• बालकाला घड्या घालून नवीन आकार करण्यास प्रोत्साहित करावे.
• बालकाने केलेल्या आकाराबाबत त्याच्याशी गप्पा मारून बालकाच्या कल्पना जाणून घ्याव्यात.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td><td></td></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">अन्नमय, आनंदमय, प्राणमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">घडीकाम – कपाटाची घडी, रुमालाची घडी, साधी, होडी, शिडाची होडी, घर, कपबशी, राजाराणी होडी, परिवार होडी इत्यादी.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">मी, माझे कुटुंब परिसर, पाणी–पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगली), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन (आकार)</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">ताईने यासंदर्भात अधिक संदर्भासाठी उपलब्ध वयोगटनिहाय कार्यपुस्तिका वापरावी व त्यानुसार कृती करून घ्याव्यात.</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-3 सुदृढ आणि लवचिक शरीर विकसित होते.
C-3.3 हाताने कृती करताना हात व बोटे यांच्या हालचालींमध्ये अचूकता आणि नियंत्रण दर्शवतो.
अ) LO 3.3.1 साध्या कृतीमध्ये सूक्ष्म स्नायू विकास, हस्त–नेत्र समन्वय आणि स्नायूंमधील बळकटपणा दर्शवतो. (उदाहरणार्थ, गिरगिटणे, कागद फाडणे, चिटकवणे, मुक्तपणे रंगविणे, मातीकाम)
ब) LO 3.3.1 ज्या कृती करताना सूक्ष्म स्नायूंना वापर केला जातो तसेच हस्त–नेत्र समन्वयात काही प्रमाणात अचूकता लागते, अशा कृती करताना स्नायूंवर नियंत्रण दर्शवतो. (उदाहरणार्थ, मोठे आकार कापणे, मोठे मणी ओवणे, बटण लावणे, स्क्रू लावणे, बाटलीचे झाकण लावणे, उघडणे, क्रेयॉन्सचा वापर करून चित्रे काढणे.)</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
	क) LO 3.3.1 जास्त अचूकता लागणाऱ्या कृती सूक्ष्म स्नायूंना समन्वयाने थोड्या मदतीसह करतो. (उदाहरणार्थ पेन्सिल चित्र काढणे, सरळ रेषेवर किंवा वक्र रेषेवर कापणे, छोटे मणी ओवणे.)	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	सूक्ष्म स्नायू विकास, हस्त-नेत्र समन्वय, कलाकौशल्य	
निरीक्षण करावयाच्या बाबी	सूक्ष्म स्नायू विकास, हस्त-नेत्र समन्वय आहे का? याचे निरीक्षण करावे.	
आधारशिला कृती क्र. : 69. Animal Face Mask : Create and Role Play		
उपक्रमाचे नाव	प्राण्यांचे मुखवटे	
उपक्रमाला लागणारे साहित्य	प्राण्यांचे मुखवटे, कागद, पेन्सिल, रंग, दोरी, कार्यपुस्तिकेतील मुखवटे इत्यादी.	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
• ताईने तयार केलेले विविध प्रकारचे प्राण्यांचे, फुलांचे, फळाचे, भाज्यांचे मुखवटे द्यावे. मुखवटा कोणत्या प्राण्याचा आहे, ते ओळखण्यास सांगावे. • मुखवटे वापरून गाणी, गोष्टी घ्याव्यात. • प्राण्यांची नक्कल करण्यास सांगावे जसे आवाज काढणे, त्याप्रमाणे चालणे इत्यादी. • प्राण्यांविषयी त्यांच्या कल्पना जाणून घ्या.	• ताईने तयार केलेले विविध प्रकारचे प्राण्यांचे, फुलांचे, फळाचे, भाज्यांचे असे विविध मुखवटे देऊन ओळखण्यास सांगावे. • नाट्यीकरण करून घ्यावे. • त्यांचे वर्गीकरण करण्यास सांगावे जसे जंगलातील प्राणी, पाळीव प्राणी, प्राण्यांचे अन्न इत्यादी. • नाट्यीकरण करून घ्यावे.	• बालकांना त्यांना आवडेल त्या प्राण्यांचे चित्र काढण्यास सांगावे. त्याला रंगवून मुखवटा तयार करण्यास सांगावे. • छोटे नाटुकले करून घ्यावे. • त्या प्राण्याविषयी त्याला सांगण्याची संधी द्यावी. जसे त्याचे अन्न, निवास इत्यादी. • छोटे नाटुकले करून घ्यावे.
पंचकोश		
अन्नमय, प्राणमय, आनंदमय, मनोमय कोश		
विविधता	प्राण्यांप्रमाणे पक्षी घेऊन विविधता आणता येईल.	
थीम/विषय	प्राणी (पाळीव व जंगली)	
ताईसाठी सूचना	बालकांना मुक्तपणे मुखवटे तयार करणे तसेच वर्गीकरण करणे यांसारख्या कृती करू द्याव्या. प्रश्नांच्या माध्यमातून बोलते करावे.	

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td></td><td colspan="2">ताईने यासंदर्भात अधिक संदर्भासाठी उपलब्ध वयोगटनिहाय कार्यपुस्तिका वापरावी व त्यानुसार कृती करून घ्याव्यात. यासंदर्भात उपलब्ध वयोगटनिहाय कृतिपत्रिका वापरावी.</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-12 बालके दृक आणि ललितकलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात.
C-12.3 बालके कलेच्या माध्यमातून स्वत:च्या कल्पना आणि भावना व्यक्त करण्यासाठी सर्जनशीलता व कल्पकतेने काम करतो.
अ) LO 12.3.2 वस्तू, व्यक्ती भावनिक अनुभव यांची प्रतीकात्मक अभिव्यक्ती करण्यासाठी विविध दृश्य प्रतिमा शारीरिक हालचाली आणि आवाज निर्माण करतात.
ब) LO 12.3.2 दृक् आणि सादरीकरण कलांच्या माध्यमातून व्यक्ती प्राणी वनस्पती वस्तू इत्यादींच्या ओळखता येण्याजोग्या शारीरिक आणि वर्तन वैशिष्ट्यांची नक्कल करतात.
क) LO 12.3.2 स्वतःच्या कल्पना आणि अनुभव व्यक्त करण्यासाठी रूप, रंग, भूमिका, आवाज, जागा आणि प्रसंग याची कल्पकतेने एकत्रित करून करतात.
C-12.5 विविध कला, स्थानिक संस्कृती आणि वारसा यांची निर्मिती करताना आणि अनुभव घेताना विविध प्रकारच्या प्रतिक्रियांना प्रतिसाद देतो व प्रशंसा करतो.
अ) LO 12.5.1 कलाकृतींबाबत आवडीनिवडी व इतर मते व्यक्त करताना शाब्दिक/अशाब्दिक प्रतिसाद देतो.
ब) LO 12.5.1 कलाकृती किंवा स्थानिक सांस्कृतिक अभिव्यक्ती यांच्या विविध पैलूंबाबत संवाद साधतो. (उदाहरणार्थ एखाद्या पात्राचा मोठा आणि थरथरणारा आवाज)</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये</td><td colspan="2">सर्जनशीलता, भाषिक अभिव्यक्ती</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">बालकाच्या सर्जनशीलतेचे निरीक्षण करावे.</td></tr>
</table>

<table>
<tr><th colspan="3">आधारशिला कृती क्र. : 70. Thank You Card - Gratitude to Our Helpers</th></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">आभार चित्रकार्ड</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">फ्लॅशकार्ड, पांढरा कागद, क्रेयॉन, गोंद, सजावटीचे साहित्य जसे की फुले, मणी, पाने.</td></tr>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>• कुटुंबातील व्यक्ती आपल्यासाठी काय काय करतात? आपल्या कामात कशी मदत करतात? याविषयी ताईने बालकांसोबत चर्चा करावी.
• फ्लॅशकार्ड वापरून मदतनीस ओळखण्यास सांगावे. मदतनीस आपणास कशी मदत करतात यांविषयी चर्चा करावी.
• क्रेयॉन आणि सजावट सामग्री वापरून धन्यवाद कार्ड तयार करण्यास सांगावे. आवश्यक तिथे ताईने बालकांना मदत करावी.
• गाणी व गोष्टींच्या आधारे कोण काय करते ते सांगावे.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td><td>• कुटुंबातील व्यक्ती आपल्यासाठी काय काय करतात? आपल्या कामात कशी मदत करतात? याविषयी ताईने बालकांसोबत चर्चा करावी.
• फ्लॅश कार्ड वापरून मदतनीस ओळखण्यास सांगावे. मदतनीस आपणास कशी मदत करतात, यांविषयी चर्चा करावी.
• परिसरातील मदतनीसाची प्रतिमा असलेले वैयक्तिक आभार कार्ड बनविण्यास सांगावे. फुले, पाने, मणी, ग्लिटर, स्टिकर्सने ते सजविण्यास सांगावे.
• तसेच बालकांकडून आईवडील आजी-आजोबा, मित्र, शिक्षक यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने शुभेच्छा कार्ड तयार करून घ्यावे.
• अन्नमय, प्राणमय, मनोमय, आनंदमय कोश
• क्षेत्रभेटीस नेऊन सणांच्या निमीत्ताने भेटकार्ड द्यावे.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td><td>• वैयक्तिक आभारकार्ड बनविताना त्यात अधिक बारकाईने काम करण्यास सांगावे.
• बालकाच्या कल्पनेप्रमाणे ते सजविण्यास सांगावे.
• त्यांनी ते कसे सजविले ते सांगण्याची संधी द्यावी. अशी आभार कार्ड गुरुपौर्णिमा, मातृदिन या दिवसांना देण्यास सांगावे. तसेच बालकांकडून आईवडील आजी-आजोबा, मित्र, शिक्षक यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने शुभेच्छा कार्ड तयार करून घ्यावे.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td></tr>
</table>

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">अन्नमय, प्राणमय, आनंदमय, मनोमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">विविध सजावटीचे साहित्य वापरून विविधता आणता येईल.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">मी माझे कुटुंब व परिसर, मदतनीस, वाहन</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">मुक्तपणे बालकांना सजावट करू द्यावे. मदतनीस करीत असलेल्या कामांवर चर्चा घ्यावी. यासंदर्भात उपलब्ध वयोगटनिहाय कृतिपत्रिका वापरावी.</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-4 बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.
C-4.1 कुटुंब आणि समाजाचा घटक या नात्याने स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्वतःला ओळखायला सुरुवात करतो.
ब, क) LO 4.1.1 स्वत:ला कुटुंब, शेजारी, शाळा आणि शहर यांचा एक घटक म्हणून ओळखतो. जेथे वेगवेगळी व्यक्ती वेगवेगळ्या भूमिका निभावत असतात.</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये</td><td colspan="2">भाषिक कौशल्य, कुतूहल, स्वत:भोवतीच्या व्यक्ती व वस्तूंची माहिती.</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">• बालक स्वत:च्या संदर्भातील व आजूबाजूच्या गोष्टींविषयी व्यवस्थित माहिती देतो का हे पहावे.
• विविध मदतनीस ओळखतो का याचे निरीक्षण करावे.</td></tr>
<tr><td colspan="3">आधारशिला कृती क्र. : 71. Let's Cook : Make Fruit and Vegetable Chaat</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">चाट/भेळ बनवूया</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">पदार्थ बनवण्याचे साहित्य व बोथट सुरी.</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td>• ताईने बालकांना उद्या घरून येताना एक एक उकडलेला बटाटा व ताटली आणायला सांगावी. दुसऱ्या दिवशी ताईने</td><td>सॅलेड तयार करणे.
• ताईने बालकांना घरून येताना एक एक काकडी, गाजर, टोमॅटो आणायला</td><td>• कडधान्याची भेळ करण्यासाठी चणे, दाणे, मटकी इत्यादी भिजत घालावे. दुसऱ्या दिवशी मोड आलेले कडधान्य धुऊन घ्यावे.</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
बालकांबरोबर उकडलेला बटाटा बालकांना सोलायला द्यावा. • सगळ्या बालकांचा बटाटा सोलून झाल्यावर ताईने बालकांना उकडलेला बटाटा बोथट सुरीने चिरायला सांगावा. किंवा कुसकरावा सगळ्यांचा बटाटा एकत्र करून त्यावर चाट मसाला टाकून बालकांना खायला द्यावा. याप्रमाणे सोप्या खाऊच्या कृती करून घ्याव्यात.	सांगावे. दुसऱ्या दिवशी बालकांना त्यांनी आणलेले काकडी टोमॅटो, गाजर बोथट सुरीने चिरायला द्यावे. • ताईने बालकांना देण्यासाठी ३ ते ४ बोथट (धार कमी झालेल्या सुऱ्या) द्याव्यात. • सगळ्या बालकांकडून सॅलेड चिरून घ्यावे. सगळ्यांचे सॅलेड चिरून झाल्यावर त्यावर थोडेसे मीठ घालून बालकांना खायला द्यावे. खाऊ खाऊन झाल्यावर ताईने बालकांना आपण काय काय कृती केली हे विचारावे.	• कांदा, टोमॅटो, कोथिंबीर इत्यादी साहित्य आणावे. भाज्या धुऊन घेणे, निवडणे या कृतीमध्ये एकेका बालकाला, एकावेळी संधी देऊन सर्व बालकांना सहभागी करून घ्यावे. चिंचेचा कोळ बालकांच्या समोर करून त्याचे गोड पाणी करावे. ताईने कांदा, टोमॅटो आणि कोथिंबीर चिरावी. • प्रमाणात साहित्य घेऊन बालकांना स्वत:पुरती भेळ करण्यास संधी द्यावी. सर्व बालकांना कृती लक्षात आणून द्यावी. बालकांना खाऊ खायला द्यावा.
पंचकोश		
अन्नमय, आनंदमय, प्राणमय कोश		
विविधता	चपातीचा/पोळीचा लाडू, शेंगदाण्याचा व गुळाचा लाडू, गाजराची कोशिंबीर इत्यादी पदार्थ करावेत.	
थीम/विषय	भाज्या व फळे, ऋतू	
ताईसाठी सूचना	–	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-1** बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात. **C-1.1** पोषक आहाराबाबत रुची आणि समज दर्शवितो व अन्नपदार्थ वाया घालवत नाही. **ब) LO 1.1.3** चित्रकृतींच्या मदतीने साधा नाष्टा/स्नॅक्स बनवितो. **क) LO 1.1.3** मोठ्यांच्या साहाय्याने पौष्टिक नाश्ता तयार करण्याच्या प्रक्रियेत सहभागी होतो. (उदाहरणार्थ, उकडलेले चणे, मोड आलेली कडधान्ये घालून भेळ करतो.)	

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये</td><td colspan="2">सूक्ष्म स्नायूंवर नियंत्रण, निरीक्षणशक्तीचा विकास</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">बालक उत्साहाने सर्व कृतीत सहभागी होते का? याचे निरीक्षण करावे.</td></tr>
<tr><td colspan="3">आधारशिला कृती क्र. : 72. Fun with Clay : Compare Creations using Relational Vocabulary</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">मातीसोबत खेळूया, तुलना करूया.</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">मातीचा किंवा पीठाचा गोळा</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td>• ताईने बालकांना शाडू मातीचा गोळा/क्ले/कणीक खेळण्यास द्यावी.
• मातीच्या गोळ्याबरोबर बालकांना मुक्तपणे खेळू द्या. (बालक मातीत खेळताना त्याचे गुणधर्म जाणून घेत असते त्यामुळे आधी मातीच्या गोळ्यावर थापट्या मारेल, मग कुटून खेळेल, त्यानंतर गुंडाळी करून खेळेल. जसे बालकाला हवे तसे खेळू द्यावे.)</td><td>• माती, पाणी मिसळून चिखल करण्यास सांगावे.
• कणकेत पाणी मिसळून घट्ट गोळा करण्यास सांगावे.
• भिजवलेली माती व भिजवलेली कणीक यांचे योग्य आकाराचे स्वतंत्र गोळे करण्यास सुचवावे.
• ओल्या गोळ्यांपासून वळकट्या तयार करण्यास सांगावे.
• तयार केलेल्या वळकट्यांपासून विविध त्रिमितीय आकार करण्यासाठी बालकांना सांगावे.</td><td>• माती, पाणी मिसळून चिखल करण्यास सांगावे. कणकेत पाणी मिसळून घट्ट गोळा करण्यास सांगावे.
• भिजवलेली माती व भिजवलेली कणीक यांचे योग्य आकाराचे स्वतंत्र गोळे करण्यास सुचवावे.
• ओल्या गोळ्यांपासून वळकट्या तयार करण्यास सांगावे. तयार केलेल्या वळकट्यांपासून विविध त्रिमितीय आकार करण्यासाठी बालकांना सांगावे.</td></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">अन्नमय, आनंदमय, प्राणमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">मैदा, शाडूची माती वापरून विविधता आणता येईल.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">मी, माझे कुटुंब परिसर, पाणी-पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगली), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन (आकार)</td></tr>
</table>

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">बालकांना आधी मुक्तपणे खेळ द्यावे.
सण समारंभाच्या निमित्ताने वेगवेगळ्या आकृती निर्माण करून घ्याव्यात. पालकांची मदत घ्यावी.</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-12 बालके दृक् आणि ललितकलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात.
CG-12.1 विविध आकाराच्या द्विमितीय (२) आणि त्रिमितीय (३) कलाकृती तयार करण्यासाठी विविध प्रकारचे साहित्य आणि साधने हाताळतो व त्याबरोबर खेळतो.
अ) LO 12.1.3 साहित्य एकत्रित मिसळून छाप व आकृती तयार करतो. (उदा. : माती आणि पाणी, वाळू आणि पाणी, पीठ आणि पाणी, रंग आणि पाणी.)
ब) LO 12.1.3 माती किंवा कणीक यांसारखे साहित्य थापून किंवा वळकटी करून त्रिमितीय (३) आकार तयार करतो.
क) LO 12.3.2 परिसरातून मिळालेले साहित्य व वस्तू यांची सरमिसळ करून त्रिमितीय रचना/जोडणी करतो.</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये</td><td colspan="2">तुलना करणे, सर्जनशीलता, भाषिक कौशल्ये</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">तुलनात्मक शब्दांचा योग्य वापर करतात का? बालकांची सर्जनशीलता याचे निरीक्षण करावे.</td></tr>
<tr><td colspan="3">आधारशिला कृती क्र. : 73. Food Magic : Recognise Smell, Taste, Texture and Cook.</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">पदार्थांची गंमत</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">लवंग, मिरी, वेलची, संत्री, फणस, आंबा, पोहे, उसळ इत्यादी.</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td>कृती १ :
• अंगणवाडी ताईने बालकांना कापलेली फळे, भाजीपाला यांचे गंध घेण्यास द्यावे.
• प्रत्येक बालकाला वैयक्तिक सराव द्यावा.
• बालकाला डोळे बंद करण्यास सांगावे.</td><td>कृती : ओळख वासाची.
• बालकांना झाडाखाली बसवून प्रत्यक्षात झेंडू, सुगंधी तेल, लवंग, मिरी, वेलची आणि संत्री, फणस, आंबा यांसारखी फळे, पोहे, उसळ अशा वस्तू आणि खाद्यपदार्थ दाखवावे.</td><td>कृती : चला खाऊ तयार करू.
• दाण्याचा लाडू-ताईने बालकांना अर्धवर्तुळात बसवावे.
• भाजलेल्या दाण्याचा व गुळाचा वास बालकांना घ्यायला द्यावा. बालकांसमोरवर्तमानपत्र अंथरावे, त्यावर प्रत्येक बालकाला मूठभर भाजलेले दाणे सोलण्यासाठी द्यावे.</td></tr>
</table>

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr>
<td>• डोळे बंद केलेल्या बालकाच्या नाकाजवळ एखादे फळ, भाजीपाला न्यावा.
• वासावरून त्या पदार्थाचे नाव ओळखण्यास सांगावे.
• ही कृती प्रत्येक बालकाकडून वैयक्तिक करवून घ्यावी.
कृती २ :
• अंगणवाडी ताईने बालकांना मैदानावर एकत्रित करावे. बालकाला डोळे बंद करण्यास सांगावे.
• डोळे बंद केलेल्या बालकाच्या नाकाजवळ एखादा पदार्थ न्यावा. या पदार्थाचा वास घेण्यास सांगावे.
• वासावरून या पदार्थाचे नाव ओळखण्यास सांगावे. ही कृती
• गंध याबरोबरच चव व स्पर्श याचाही अनुभव द्यावा.
• प्रत्येक बालकाकडून वैयक्तिक करवून घ्यावी.
• प्रत्येक बालकाला वैयक्तिक सराव द्यावा.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td>
<td>व त्यांना गंधाचा प्रत्यक्ष अनुभव घेऊ द्यावा.
वास ओळखू या.
• बालकांचे डोळे बांधून कशाचा गंध आहे, हे ओळखण्यास सांगणे.
• चव व स्पर्श याचाही अनुभव द्यावा.</td>
<td>• बालकांचे दाणे सोलून झाल्यावर ते सुपात पाखडण्यासाठी द्यावे.
• दाणे पाखडून झाल्यावर बालकांना गूळ किसण्यासाठी द्यावा.
• बालकांना दाणे कुटण्यासाठी खलबत्ता द्यावा. ताईने दाणे कसे कुटायचे हे एकदा दाखवावे.
• प्रत्येक बालकाला दाणे कुटण्यास द्यावे. सगळ्या बालकांचे दाणे, गूळ सगळे एकत्र करावे. (मिक्सर असल्यास थोडेसे मिक्सरमध्ये थोडे बारीक करून घ्यावे.) ताईने बालकांना ताटलीत बारीक केलेले दाणे, गूळ हे ताटलीत काढून द्यावे. बालकांना लाडू कसे करायचा हे दाखवावे व बारीक केलेल्या कुटाचे लाडू करण्यास द्यावे.
सगळ्या बालकांचे लाडू करून झाल्यावर सगळ्यांना त्यांनी केलेला लाडू खाण्यास द्यावा. याप्रमाणे महिन्यातून एकदा बालकांना खाऊ करायला द्यावा.</td>
</tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">अन्नमय, आनंदमय, प्राणमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">• जास्तीतजास्त उपलब्ध वस्तूचा वापर करून बालकांसोबत हा उपक्रम घ्यावा. तसेच त्याचे दृढीकरण करावे.
• पालकांच्या मदतीने आनंदनगरी व खाऊ जत्रा आयोजित करावी.</td></tr>
</table>

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">मी, माझे कुटुंब व परिसर, भाज्या व फळे</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">विशेष गरजा असणाऱ्या बालकांना ताईने मदत करावी.</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-2 बालके ज्ञानेंद्रियांची कुशलता विकसित करतात.
C-2.4 वेगवेगळे गंध आणि चव यांतील फरक ओळखतो.
अ) LO 2.4.1 सुगंध आणि दुर्गंध ओळखतो. उदाहरणार्थ, अत्तर, फुले, कचरा इत्यादी.
ब) LO 2.4.1 फूल, अत्तर, खाद्यपदार्थ यांच्या सुगंधामधील फरक ओळखतो.
ब) LO 2.4.2 वेगवेगळ्या प्रकारच्या खाद्यपदार्थांची चव व पोत यांचा अनुभव घेतो.</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये</td><td colspan="2">ज्ञानेंद्रिय विकास, सुगंधातील फरक ओळखतात. जीवनकौशल्य</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">सुगंधानुसार वस्तू ओळखतात का याचे निरीक्षण करणे.</td></tr>
<tr><td colspan="3">आधारशिला कृती क्र. : 74. Artistic Adventure : Tearing and Pasting</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">फाडकाम व चिकटकामातून कलानुभव.</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">रंगीत कागद, खोके इत्यादी.</td></tr>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>• बालकांना एक एक कोरा कागद/कृतिपत्रिका द्यावी.
• आता त्यांना दिलेले रंगीत कागद फाडून कोऱ्या कागदावर/कृतिपत्रिकेवर मुक्तपणे हवे तसे चिकटविण्यास सांगावे.
• फाडकाम व चिकटकाम यातून बालकाने कोणती कलाकृती तयार केली आहे? याविषयी संवाद साधावा. त्याचे कौतुक करावे.</td><td>• ठळक रेखाटन करून जसे झाड, पान, घर, फूल इत्यादी ते बालकांना कागद द्यावे.
• बालकांना विविध रंगीत कागद, डिंक असे साहित्य वाटावे.
• दिलेल्या आकारात त्यांना दिलेले रंगीत कागद फाडून चिकटविण्यास सांगावे.</td><td>• रिकामे खोके, रंगीत कागद, डिंक असे साहित्य बालकांना उपलब्ध करून द्यावे.
• बालकांना मुक्तपणे फाडकाम करून त्या तुकड्याचे कोलाज काम करण्याची संधी द्यावी.
• दिलेल्या रिकाम्या खोक्यावर रंगीत कागद फाडून चिकटवून त्याला सजविण्यास सांगावे.
• दिलेले खोके त्याने ते कसे सजविले याबाबत चर्चा करावी. त्याचे कौतुक करावे.</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)	• त्यांनी केलेल्या कामाविषयी संवाद साधावा. त्याचे कौतुक करावे. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	• बालकांनी स्वतःच्या आवडीच्या चित्राचे रेखाटन करावे नंतर ताईने त्याचे प्रदर्शन ठरवावे किंवा भिंतीवर लावून ठेवावे. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**
पंचकोश		
अन्नमय, प्राणमय, आनंदमय कोश		
विविधता	सजविण्यासाठी विविध साहित्य वापरून चिकटकाम करण्यास संधी द्यावी.	
थीम/विषय	मी, माझे कुटुंब परिसर, पाणी-पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगली), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन (आकार)	
ताईसाठी सूचना	यासंदर्भात उपलब्ध वयोगटनिहाय कृतिपत्रिका वापरावी.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-3** सुदृढ व लवचीक शरीर विकसित होते. **C-3.3** हाताने कृती करताना हात व बोटे यांच्या हालचालीमध्ये अचूकता आणि नियंत्रण दर्शवतो. **अ) LO 3.3.1** साध्या कृतीमध्ये सूक्ष्मस्नायू विकास, हस्त-नेत्र समन्वय आणि स्नायूंमधील बळकटपणा दर्शवतो. (उदाहरणार्थ, गिरगिटणे, कागद फाडणे, चिकटवणे, मुक्तपणे रंगविणे, मातीकाम) **ब) LO 3.3.1** ज्या कृती करताना सूक्ष्म स्नायूंचा वापर केला जातो तसेच हस्त-नेत्र समन्वयात काही प्रमाणात अचूकता लागते अशा कृती करताना स्नायूंवर नियंत्रण दर्शवतो.(उदाहरणार्थ, मोठे आकार कापणे, मोठे मणी ओवणे, बटण लावणे, स्क्रू लावणे, बाटलीचे झाकण लावणे, उघडणे क्रेयॉन्सचा वापर करून चित्र काढणे.) **क) LO 3.3.1** जास्त अचूकता लागणाऱ्या कृती सूक्ष्म स्नायूंच्या समन्वयाने थोड्या मदतीसह करतो (उदाहरणार्थ, पेन्सिलने चित्र काढणे, सरळ रेषेवर किंवा वक्ररेषेवर कापणे, छोटे मणी ओवणे)	

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	सर्जनशीलतेच्या विकासास, सूक्ष्मकारक कौशल्यांना चालना देता येईल.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	बालकांच्या फाडकाम, चिकटकाम कौशल्याचे निरीक्षण करावे.	
आधारशिला कृती : 75. Shelter : Talk About Need and Create Using Different Materials		
उपक्रमाचे नाव	सजीवांचा निवारा	
उपक्रमाला लागणारे साहित्य	विविध प्रकारच्या निवाऱ्याचे चित्र कार्ड, माती, काड्या	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
• बालकांनी घरापासून शाळेत येताना काय पाहिले आहे. जसे– प्राणी, पक्षी, वाहने (लोकांसह) यांबद्दल मुक्तपणे चर्चा करावी. • बालकांशी विविध प्राणी आणि त्यांच्या निवाऱ्याबद्दल बोलण्यास सांगावे. • ओलसर बारीक वाळूचा खोपा बनविण्यासाठी त्यांना सांगावे.	• बालकांना विविध प्राण्यांचे निवारे दाखवून ओळखण्यास सांगावे. • प्राणी व पक्षी यांची घरटी व निवारा दाखवून त्याविषयी संवाद साधावा. • त्यांना आवडेल त्या प्राण्यांची/ पक्ष्यांची घरटी बनविण्यास सांगावे. जसे – कावळ्यांचे घरटे.	• माणसाचा निवारा आणि प्राण्यांचा निवारा यातील फरक यावर चर्चा घ्यावी. • घराचे चित्र उपलब्ध कागदावर काढण्यास सांगावे. • काड्या, माती यांपासून पक्ष्यांची घरटी बनविण्याची संधी द्यावी. त्यासंदर्भात आवश्यक संवाद साधावा. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**
पंचकोश		
अन्नमय, प्राणमय, मनोमय, प्राणमय कोश		
विविधता	साहित्य उपलब्ध करून कृतीत विविधता आणता येईल.	
थीम/विषय	वनस्पती (फुले, शेती, रंग), प्राणी (पाळीव व जंगली), पक्षी व कीटक	
ताईसाठी सूचना	मुक्तपणे चर्चा करावी, साहित्य उपलब्ध होण्यास मदत करावी. यासंदर्भात उपलब्ध वयोगटनिहाय कृतिपत्रिका वापरावी.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-7** बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात. **C-7.1** वेगवेगळ्या वर्गातील/गटातील वस्तूंमधील फरक व वस्तूंचा एकमेकांशी संबंध यांचे निरीक्षण करतो व समजून घेतो.	

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
	अ) LO 7.1.1 वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी, घटना या इतरांच्या मदतीने नावासहित ओळखतो. **ब) LO 7.1.1** वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी, घटना इत्यादी नावासहित ओळखून स्वतः त्याचे वर्णन करतो. **क) LO 7.1.3.1** लगतच्या परिसरातील वस्तू, व्यक्ती, प्राणी, पक्षी आणि त्यांच्या प्रतिकृती, चित्रे ओळखतो, त्यांची सर्वसाधारण वैशिष्ट्ये सांगतो/वर्णन करतो. (घराचा मोठा दरवाजा)	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	सर्जनशीलता, परिसराचे ज्ञान ग्रहण करण्याची क्षमता याला चालना मिळेल.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	भाषिक कौशल्यांचे निरीक्षण करावे, बालकांच्या प्राण्यांविषयी असलेल्या भावना बालक कसे व्यक्त करते याचे निरीक्षण करावे.	

आधारशिला कृती क्र. : 76. Create with Clay : Make Different Tools, Discuss and Use for Role-play

उपक्रमाचे नाव	शिल्पकला	
उपक्रमाला लागणारे साहित्य	माती किंवा गव्हाचे पीठ आणि पाणी	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
• ताईने बालकांना मातीचा गोळा खेळण्यास द्यावा. मातीच्या गोळ्याबरोबर बालकांना मुक्तपणे खेळू द्या. (बालक मातीत खेळताना त्याचे गुणधर्म जाणून घेत असते त्यामुळे आधी मातीच्या गोळ्यावर थापट्या मारेल, मग कुटून खेळेल, त्यानंतर गुंडाळी करून खेळेल. जसे बालकाला हवे तसे खेळू द्यावे.)	• मातीत पाणी मिसळून चिखल करण्यास सांगावे. • कणकेत पाणी मिसळून घट्ट गोळा करण्यास सांगावे. • भिजवलेली माती व भिजवलेली कणीक यांचे योग्य आकाराचे स्वतंत्र गोळे करण्यास सुचवावे. • ओल्या गोळ्यांपासून वळकट्या तयार करण्यास सांगावे. तयार केलेल्या वळकट्यांपासून विविध त्रिमितीय आकार करण्यासाठी बालकांना	• मातीत पाणी मिसळून चिखल करण्यास सांगावे. • कणकेत पाणी मिसळून घट्ट गोळा करण्यास सांगावे. • भिजवलेली माती व भिजवलेली कणीक यांचे योग्य आकाराचे स्वतंत्र गोळे करण्यास सुचवावे. • विविध आकाराच्या गोळ्यापासून विविध आकाराची भांडी/फळे/वस्तू बनविण्यासाठी सांगावे.

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td></td><td>सांगावे. काडेपेटीचा वापर करून मातीच्या वीटा तयार करण्यास सांगावे</td><td></td></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">अन्नमय, प्राणमय, आंनदमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">बालकांना कृतीचे व कल्पकतेचे स्वातंत्र्य देऊन या कृतीत विविधता आणता येईल. बाजारात उपलब्ध असलेली वेगवेगळी माध्यमे वापरून या कृतीत विविधता आणता येईल.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">पाणी–पाऊस, भाज्या व फळे, प्राणी (पाळीव व जंगली), वाहन (आकार)</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">माती/पीठ मळण्याची कृती करून दाखवावी.</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-12 बालके दृक् आणि ललित कलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात.
C-12.1 विविध आकाराच्या द्विमितीय आणि त्रिमितीय कलाकृती तयार करण्यासाठी विविध प्रकारचे साहित्य आणि साधने हाताळतो व त्याबरोबर खेळतो.
ब) LO 12.1.3 माती किंवा कणीक यासारखे साहित्य थापून किंवा वळकटी करून त्रिमितीय आकार तयार करतात.
क) LO 12.1.3 माती किंवा कणीक यांसारखे साहित्य थापून किंवा वळकटी करून त्रिमितीय आकार तयार करतात.</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये</td><td colspan="2">• कलाकृती तयार करण्यासाठी लागणारे साहित्य हाताळण्याचे कौशल्य विकसित होते. साहित्य मिसळण्याचे योग्य प्रमाण बालकांना कळते. हात आणि मेंदू यांचा समन्वय साधता येतो. सुलभकाच्या सूचनांचे अनुपालन करण्याची क्षमता विकसित होते. गटकार्याची उपयुक्तता लक्षात येते. सहकार्य व समन्वय साधण्याची क्षमता विकसित होते.</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">• बालकाच्या गटात कार्य करण्याच्या वर्तनाचे निरीक्षण करावे. गटाच्या सुलभक समन्वयक यांच्या सूचनांकडे किती लक्ष देतो याचे निरीक्षण करावे. स्वतःहून काही वेगळे करतो का, याचे निरीक्षण करावे. सहकार्य, समन्वय व सहचार्य याचे निरीक्षण नोंदवावे.</td></tr>
</table>

<table>
<tr><th colspan="3">आधारशिला कृती : 77. Lets Dance : Create body movement patterns and perform to fast/slow beats</th></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">चला नाचूया</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">वादन साहित्य, मोबाइल/टी.व्ही. यावर बालगीते</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td>• ताईने बालकांना समूहात एकत्र करावे.
• वेगवेगळी अभिनय व नाद टाळी गीते घ्यावीत.
• आधी स्वतः एक टाळी वाजवावी. आपल्या कृतीप्रमाणे बालकांना समूहाने कृती करण्यास सांगावे. सराव घ्यावा.
• पुढे पुढे टाळ्यांची संख्या तीनपर्यंत वाढवत जावी. सर्वांची लय आणि ताल एक होत नाही तोपर्यंत सराव सुरू ठेवावा.
• बालकांच्या आवडीचे, परिचयाचे आणि वयानुरूप गाणे लावून त्यावर ताल धरत नृत्य करण्यास प्रोत्साहन द्यावे.
• विविध तालांवर नृत्य</td><td>• ताईने बालकांना समूहात एकत्र करावे.
• आधी स्वतः नृत्याची कृती करून दाखवावी. (पदन्यास किंवा हाताच्या हालचाली.)
• आपल्या कृतीप्रमाणे बालकांना समूहाने कृती करण्यास सांगावे. सराव घ्यावा.
• पुढे पुढे हालचालीची संख्या तीनपर्यंत वाढवत न्यावी. सर्वांची लय आणि ताल एक होत नाही तोपर्यंत सराव सुरू ठेवावा.
• अभिनय व नृत्यगीते घ्यावीत.
• विविध तालांवर नृत्य</td><td>• वयोगट ४ ते ५ वर्षे ची कृती घ्यावी. काठिण्यपातळी वाढवावी. बालकांच्या आवडीचे, परिचयाचे आणि वयानुरूप गाणे लावून त्यावर ताल धरत नृत्य करण्यास प्रोत्साहन द्यावे.
• विविध तालांवर नृत्य, करण्यास बालकांना प्रवृत्त करावे.</td></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">अन्नमय, प्राणमय, विज्ञानमय, आनंदमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">बालकांच्या विचारांना आणि कृतींना स्वातंत्र्य देऊन आणि विविध साहित्य वापरून तसेच वेगवेगळे प्राणी, पक्षी यांची चित्रे वापरून उपरोक्त कृतीत विविधता आणता येईल.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">मी, माझे कुटुंब व परिसर, पाणी–पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस वाहन</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">यासोबतच संगीताच्या तालावर सोपे कवायतीचे प्रकार घ्यावेत. यासाठी उपलब्ध कार्यपुस्तिकेचा वापर करावा.</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-12** बालके दृक् आणि ललितकलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात. **C-12.4** कला विषयामध्ये सहयोगाने काम करतो. **अ) LO 12.4.1** व्यक्तीश: किंवा गटात विविध आवाज किंवा हालचाली यांचे प्रयोग करतात. **ब) LO 12.4.1** समवयस्कांच्या साहाय्याने विविध संभाषण, हालचाली, ध्वनी आणि दृश्यकलेचे नमुने तयार करतात. **क) LO 12.4.1** जोडी किंवा गटामध्ये खेळताना किंवा सादरीकरण करताना संभाषण, हालचाली आणि आवाज यांचे समन्वय करण्याचा प्रयत्न करतात.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	लय, ताल यांची समज विकसित होते. सामूहिक कलेचे कौशल्य. लयबद्ध शारीरिक हालचाली. ताल, लय, ठेका अशा संगीतातील सर्जनशील महत्त्वाच्या बाबींकडे लक्ष वेधणे, पद-नेत्र समन्वय, सर्जनशीलता या सर्वांना चालना मिळण्यास मदत होते.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	बालकाला ठेक्यावर लयबद्ध हालचाल करता येते का, संगीत ऐकत असताना त्यामध्ये तल्लीनता असते का, एकाग्रता दिसते का, चेहऱ्यावरील हावभाव, देहबोली, गीतातले शब्द लक्षात घेऊन स्वतःहून एखादा पदन्यास करते का या गोष्टींचे निरीक्षण करावे.	
आधारशिला कृती : 78. Fun with Patterns Create Art/Craft/Beading/ Body-Movement Patterns		
उपक्रमाचे नाव	वस्तूचा आकृतिबंध	
उपक्रमाला लागणारे साहित्य	वाट्या, कडक वायर किंवा नायलॉन दोरी, मोठे मणी, फुले, पाने, सुई-दोरा.	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
• कडक वायर अथवा नायलॉनच्या दोरीमध्ये मोठे मणी ओवायला द्यावे. • मणी ओवता यायला लागले की दोन रंगाचे मणी देऊन त्यांना आकृतिबंधात ओवाण्यास	• कडक वायर अथवा नायलॉनच्या दोरीमध्ये मध्यम आकारमानाचे मणी ओवायला द्यावे. • दोन वेगवेगळ्या आकार आणि रंगाचे मणी आकृतिबंधात ओवून दाखवावे. उदा. मोठा लाल-	• बोथट सुईमध्ये जाड/पुडीचा दोरा ओवण्यास द्यावा. • बालकांना एका टोपलीत पाने, फुले गोळा करण्यास सांगावे.

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
सांगावे. उदाहरणार्थ, लाल–निळा, लाल–निळा • या दोन रंगांत लाल – लाल – निळा, लाल – निळा – निळा, लाल – लाल – निळा – निळा अशा प्रकारचे आकृतिबंध करून मणी ओवण्यास सांगावे.	छोटा लाल, मोठा लाल–छोटा निळा, मोठा लाल–छोटा लाल–मोठा निळा • बालकांना स्वतः नवीन आकृतिबंध तयार करून तसे मणी ओवण्यास प्रोत्साहित करावे.	• बालकांना पाने, फुले, सुई, दोरा तोरण कसे तयार करायचे त्याचे प्रात्यक्षिक दाखवावे. • बालकांना तोरण तयार करून गटात दाखवायला सांगावे.

पंचकोश	
अन्नमय, विज्ञानमय, प्राणमय, व आनंदमय कोश	
विविधता	५ ते ६ वर्षांच्या बालकांना स्पंजचे आकार कापून, खरी फुले पाने ओवायला देता येतील. यामध्ये रंगांचे आकृतिबंध तयार करून देता येतील. रंगीत कागदाचे कपटे करून ते आकृतिबंधात चिकटवायला द्यावेत. भाजीचे किंवा पानाचे ठसे आकृतिबंधात उमटवून घ्यावेत.
थीम/विषय	मी, माझे कुटुंब, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू , वाहन
ताईसाठी सूचना	–
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-8** बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार, मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात. **C 8.2** आपल्या परिसरातील आकार आणि संख्या यांच्यातील साधे आकृतिबंध ओळखतो आणि त्यांचा विस्तार करतो. **अ) LO 8.2.1** आकृतिबंध ओळखतो आकार, पाने, फुले यांचा जोड्यांमधील पुनरावृत्तीनुसार आकृतिबंध तयार करणे. (पाने – फुले, अ–ब, अ–ब, अ–ब) **ब) LO 8.2.1** आकृतिबंधातील पुनरावृत्ती असणारा घटक ओळखतो. ३ ते ४ वस्तू आकार, चित्रे, ध्वनी याना वापरून प्रकारचा आकृतिबंध तयार करतात. **क) LO 8.2.1.1** रंग आकार माप या विविध वैशिष्ट्यांनुसार नवीन आकृतिबंध स्वतः तयार करतात.
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	सूक्ष्म स्नायू कौशल्य, हस्त–नेत्र समन्वय, सौंदर्यदृष्टीचा विकास
निरीक्षण	बालकाला दिलेल्या सूचनेप्रमाणे सुई हातात धरता येते का नाही, दिलेला आकृतिबंध समजतो आहे का नाही याचे निरीक्षण करावे.

<table>
<tr><th colspan="3">आधारशिला कृती : 78.1 Fun with Patterns Create Art/Craft/Beading/ Body - Movement Patterns</th></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">हालचालींचा आकृतिबंध</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2"></td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td>• आकृतिबंध – हालचाली हालचालीचे आकृतिबंध पुढील प्रमाणे घ्यावेत. उदाहरणार्थ, हात वर, हात खाली, उभे राहून दोन पाय जवळ, दोन पाय लांब शरीर स्थितीच्या हालचालीत पुनरावृत्ती करून तयार होणारे आकृतिबंध करून दाखवावेत, त्या कृतीची पुनरावृत्ती करून घ्यावी. उदाहरणार्थ, वारकरी खाली वर टाळ्या देत चालतात, तालावर झिम्मा खेळणे इत्यादी.</td><td colspan="2">आकृतिबंध – हालचाली
• शरीर स्थितीच्या हालचालीत पुनरावृत्ती करून तयार होणारे आकृतिबंध करून दाखवावेत, त्या कृतीची पुनरावृत्ती करून घ्यावी (नृत्य हालचाली) हालचालींची संख्या पायऱ्या (step) वाढवाव्यात. त्याप्रमाणे हालचाली करून घ्याव्यात.
• एक ते चार आणि नंतर एक ते आठ अंक म्हणून व्यायामाचे प्रकार करून घ्यावेत.</td></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">अन्नमय, विज्ञानमय, प्राणमय, व आनंदमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">बालकांना त्यांच्या आवडीने काही हालचालींचे आकृतिबंध तयार करण्यास प्रवृत्त करणे.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">यासोबतच संगीताच्या तालावर सोपे कवायतीचे प्रकार घ्यावेत. यासाठी उपलब्ध साहित्याचा वापर करावा.</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-8 बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार, मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात.
C 8.2 आपल्या परिसरातील आकार आणि संख्या यांच्यातील साधे आकृतिबंध ओळखता येणे आणि त्यांचा विस्तार करता येणे.
अ) LO 8.2.1.3 हालचालीचे आकृतिबंध ओळखतो आणि पुनरावृत्ती करतो. उदाहरणार्थ, हात खाली–वर, उडी मार, उभा रहा, उडी मार, उभा रहा.
ब) LO 8.2.1.3 तीन वेगवेगळ्या आवाज किंवा तीन विशिष्ट कृतींमधील आकृतिबंध ओळखतात व विस्तार करतात.</td></tr>
</table>

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td></td><td colspan="2">**CG-12** बालके दृक् आणि ललितकलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात.
C-12.2 संगीत, भूमिकाभिनय, नृत्य आणि विविध हालचाली यांची निर्मिती करण्यासाठी स्वतःचा आवाज, शरीर, जागा आणि विविध वस्तू यांचा चौकसपणे उपयोग करतो व खेळतो.
अ) LO 12.2.1 स्वतःच्या आवाजाचा आणि शरीराचा वापर करून तालबद्धतेचा शोध घेतो (टाळ्या, बुटक्या, पावलांचा आवाज, हाताच्या लयबद्ध हालचाली, उड्या, बडबडगीतातील शब्दोच्चार)
ब) LO 12.2.1 स्वतःचा आवाज, शरीर, वाद्य व इतर साधनांचा वापर करून तालबद्धतेचा शोध घेताना द्रूत आणि संथ लय यांच्यात फरक करतो.</td></tr>
<tr><td>**साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्य**</td><td colspan="2">निरीक्षण, सौंदर्यदृष्टी सादरीकरण, कार्यकारण संबंध, श्रवण, आकलन याच्या विकासास मदत होईल.</td></tr>
<tr><td>**निरीक्षण करावयाच्या बाबी**</td><td colspan="2">आकृतिबंध समजतो का, आकृतिबंधाचा विस्तार करता येतो का, नवीन आकृतिबंध तयार करतो का याचे निरीक्षण करावे.</td></tr>
<tr><td colspan="3">**आधारशिला कृती : 78.2 Fun with Patterns Create Art/Craft/Beading/ Body-Movement Patterns**</td></tr>
<tr><td>**उपक्रमाचे नाव**</td><td colspan="2">ध्वनीचा आकृतिबंध</td></tr>
<tr><td>**उपक्रमाला लागणारे साहित्य**</td><td colspan="2">उपलब्धतेनुसार विविध वाद्ये</td></tr>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>• आकृतिबंध – श्रवण ताईने बालकांना आवाजातील आकृतिबंध करून दाखवावा. जसे –टाळ्या टिचक्यांची विशिष्ट प्रकारे पुनरावृत्ती करावी. सात सुरांचे पलटे म्हणून घ्यावेत. उदाहरणार्थ, सा रे ग–रे ग म, सा रे सा रे ग–रे ग रे ग म, इत्यादी.</td><td colspan="2">आकृतिबंध – श्रवण २ शब्द
• दोन वेगवेगळे ध्वनी ऐकवावेत त्यांची पुनरावृत्ती करून ऐकवावे. बालकांकडून पुनरावृत्ती करून घ्यावी. जसे, ग र म ग – र म ग र, वा स रू रु स वा यात बोल/ध्वनी वाढवावेत हा वाढलेला विस्तार लक्षात घेत त्याप्रमाणे उच्चारण संधी द्यावी विस्तार करून घ्यावा.
• आवाज आणि हालचाल असा एकत्र आकृतिबंध आंबा म्हणजे वर उडी, पेरू म्हणजे खाली उडी.</td></tr>
</table>

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>• बालकांकडून त्याप्रमाणे कृती करून घ्यावी. या कृतीचा सराव ३ ते ४ दिवस घ्यावा.
• साधारण दिवाळी नंतर हे आकृतिबंध घ्यावेत.</td><td colspan="2">• विविध धून तीन गतींमधे (मंद मध्यम व जलद गती) म्हणून घ्याव्यात.
धून –
१) तांबडं फूल, दुर्वांकुर यांचा बनविला तुरा पार्वतीनंदन गजाननाला नित्य तुम्ही हे स्मरा.
२) संत मंडळी जाता–जाता करा एवढे काम, पंढरपुरच्या विठोबाला सांगा रामराम.</td></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">अन्नमय, प्राणमय, विज्ञानमय, आनंदमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">तळ्यात मळ्यात हा खेळ आकृतिबंधाच्या स्वरूपात घेता येईल.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक,</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">उपलब्धतेनुसार विविध वाद्य/साहित्य यांच्या साहाय्याने ध्वनीचा आकृतिबंध तयार करावा.
कृती पुस्तिकेतील कृती करून घ्यावी.</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-8 बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार, मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात.
C-8.2 आपल्या परिसरातील आकार आणि संख्या यांच्यातील साधे आकृतिबंध ओळखतो आणि त्यांचा विस्तार करतो.
अ) LO -8.2.1.2 आवाजामधील आकृतिबंध ओळखतो व पुनरावृत्ती करतो. उदाहरणार्थ, सारेगम ध म ग ध म ग याप्रमाणे.
ब) LO -8.2.1.3 तीन वेगवेगळ्या आवाज किंवा तीन विशिष्ट कृतीमधील आकृतिबंध ओळखतात व विस्तार करतात.</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये</td><td colspan="2">निरीक्षण, सौंदर्यदृष्टी, श्रवणक्षमता, आकलनक्षमता याला चालना मिळण्यास मदत होईल.</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">आकृतिबंध समजतो का, आकृतिबंधाचा विस्तार करता येतो का, नवीन आकृतिबंध तयार करतो का याचे निरीक्षण करावे.</td></tr>
<tr><td colspan="3">आधारशिला कृती : 79 Stamping and Painings Things Around Me</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">ठशातून कलाकृती</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">रंग, पाणी, ब्रश, ठसे घेता येतील अशा वेगवेगळ्या वस्तू उदाहरणार्थ, पान, भाज्या, फुले इत्यादी</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
• बालकांना कोरा कागद द्यावा. त्याच्या हाताच्या पंजाला रंग लावून द्यावा. कागदावर हाताचा पंजा, बोटे याचे ठसे उमटवायला सांगावे. अशा प्रकारे विविध साहित्य वापरून ठसेकाम करून घ्यावे. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	• बालकांना कोरा कागद द्यावा कागदावर भेंडी, कांदा, बटाटा, अंगठ्याचे, बोटांचे ठसे रंगात बुडवून कागदावर उमटविण्यास सांगावे. बालकांनी केलेल्या दोन्ही कृतींचे कौतुक करावे. तयार केलेल्या साहित्याचे वर्गात प्रदर्शन भरवावे. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	• ठसे उमटवता येतील अशा वस्तू गोळा कराव्यात. खोडरबर, खिळा, स्पंज, दोऱ्याचा गुंता, दगड, शिंपले, पाने, फुले, अशा वस्तू रंगात बुडवून त्याचे ठसे उमटवायला सांगावे. पंजा, बोटे, अंगठा यांचे ठसे उमटवून त्यातून निरनिराळी चित्रे तयार करण्यास सांगता येईल. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**

पंचकोश	
अन्नमय, प्राणमय, व आनंदमय कोश	
विविधता	प्लास्टिकची पातळ पिशवी हवा भरून बंद करावी व त्याचा फुगा तयार होतो. त्याच्या खालच्या बाजूने ठसा उमटवता येतो. साधा फुगवलेला फुगा रंगात बुडवून त्याचाही ठसा उमटतो.
थीम/विषय	भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), पक्षी व कीटक, मदतनीस
ताईसाठी सूचना	दिव्यांग बालक असल्यास त्याचा हात धरून ठसा उमटवून घ्यावा. यासाठी वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिकेचा सोडवून घ्याव्यात.
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-12** बालके दृक् आणि ललित कलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात. **C-12.1** विविध आकाराच्या द्विमितीय (2D) आणि त्रिमितीय (3D) कलाकृती तयार करण्यासाठी विविध प्रकारचे साहित्य आणि साधने हाताळतो व त्याबरोबर खेळतो. **अ,ब) LO-12.1.4** ब्लॉक्स, स्टेन्सिल, सापडलेल्या वस्तू आणि नैसर्गिक साहित्य यांचे ठसे उमटवतो. **क) LO-12.1.4** ब्लॉक्स, स्टेन्सिल, सापडलेल्या वस्तू आणि नैसर्गिक साहित्य यांच्या सोप्या रचना करतो.

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	सूक्ष्म स्नायू कौशल्य, हस्त–नेत्र समन्वय, सौंदर्यदृष्टी याच्या विकासास मदत होईल.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	बालकांना हातावर जोर देऊन ठसा उमटवता येतो का नाही, मोठी बालके ठसे कामातून कोणत्या प्रकारचे चित्र निर्माण करतात याचे निरीक्षण करावे.	
आधारशिला कृती : 80 Identify, Draw and Share Feelings		
उपक्रमाचे नाव	मला कसे वाटते?	
उपक्रमाला लागणारे साहित्य	कागद, रंगीत खडू, रंग, ब्रश, भावना दाखवणाऱ्या चेहऱ्यांची चित्रे इत्यादी.	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
गोष्ट ऐकूया बालकांना छोटी गोष्ट सांगावी. गोष्ट सांगताना त्याला अनुसरून चित्रे दाखवावी. मनात येणाऱ्या भावना विचाराव्यात बालकांना काय वाटले असे विचारावे. **गोष्ट :** एक होती चिऊताई. ती खूप आनंदात होती. (आनंदी इमोजी) इकडे तिकडे बागडत होती. कारण तिला खेळताना एक मोती मिळाला होता. तिने तो अलगद घरात नेऊन ठेवला होता. मग तिला भूक लागली म्हणून ती खाऊ शोधायला उडत उडत खूप दूर गेली. तिच्या घराखाली बिळात एक साप राहत होता. चिऊ दूर गेलेले पाहून तो हळूच तिच्या घरी गेला त्याला दिसला मोती. त्याने तो घेतला आणि आपल्या बिळात आणला.	**गोष्टीतल्या पात्रांना कसे वाटते?** ताईने बालकांना मित्रांची किंवा मैत्रीविषयी गोष्ट सांगावी. गोष्ट सांगताना गोष्टीतल्या पात्रांना कसे वाटले ते सांगावे. बालकांना कागद द्यावा व त्यावर त्यांना ऐकलेल्या गोष्टीचे चित्र काढायला सांगावे. चित्रांच्या खाली स्वलिपीत गोष्ट लिहायला सांगावी. बालकांचे चित्र काढून झाल्यावर व त्यांनी गोष्ट लिहिल्यावर त्यांनी काय कशाकशाचे चित्र काढले आहे, हे विचारावे. त्यांची नावे त्यांच्या चित्रावर लिहावीत. तसेच त्यांनी लिहिलेली गोष्ट बाजूला लिहावी. बालकांनी काढलेली चित्रे वर्गात लावावीत. • **गोष्ट सांगायला सांगावी.**	**गप्पा – भावना** (गोष्टीद्वारे) बालकांना विविध भावनादर्शक गोष्टी सांगाव्या. (उदाहरणार्थ, धाडसी हत्ती इत्यादी) बालके त्याच्या मनातील राग, आनंद, दु:ख, शौर्य इत्यादी भावना व्यक्त करतात. त्यांना तशी बोलण्याची संधी उपलब्ध करून द्यावी. विविध स्पर्शानुभव द्यावे. उदाहरणार्थ, विविध वस्तू डोळे बंद करून स्पर्शाने अनुभवण्यास सांगावे व भावना प्रकट करण्याची बालकाला संधी द्यावी. विविध भावनांवर आधारित प्रसंग निर्माण करून ते प्रकट करण्याची संधी द्यावी. उदाहरणार्थ, दु:ख, शौर्य भावनांवर आधारित प्रसंग निर्माण करावे. ताईने बालकांना वेगवेगळ्या गोष्टी वाचून दाखवाव्यात. ज्यात वेगवेगळ्या

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
त्याला खूप आश्चर्य वाटत होते की चिऊला हा मोती मिळाला कोठे. चिऊताई दमून भागून घरी आली बघते तर काय? तिला मोती कुठेच दिसेना. तिने तो खूप शोधला पण अह तिला तो मिळालाच नाही. चिमणीला मोती हरवला म्हणून खूप दु:ख झाले. (दु:खी इमोजी) अशा प्रकारे गोष्ट पुढे न्यावी. गोष्ट सांगताना ताईने चेहऱ्यावर भाव दर्शवावेत.	• **निरीक्षणातून भावना ओळखणे.** बालकांचे दैनंदिन निरीक्षण करून तो विविध प्रसंगांमध्ये कशाप्रकारे प्रतिसाद देतो याचे नियमित अवलोकन करावे.	भावनांबद्दल बालक ताई यांच्यामधील प्रसंग असतील. (एखादे बालक शांत असल्यास त्याच्याबरोबर एकट्याने संवाद साधावा. त्याला आवडणाऱ्या गोष्टी विचाराव्यात व नंतर काय झाले यावर बोलावे. बालक बोलत नसल्यास त्याला खूप आग्रह करू नये.) • **संवादातून भावना व्यक्त करण्यास सांगावे.** • **वर्तनबदल** बालकाशी अनौपचारिक गप्पा माराव्या. एखादे बालक शाळेत चिडल्यास, रागावल्यास त्याच्याशी बोलावे. रागाचे कारण विचारावे. वरील साहित्यापैकी त्याला काय करायला आवडेल ते विचारावे. त्याला ते साहित्य द्यावे व कृती देण्यास प्रोत्साहन द्यावे. जसे – बालकाला राग आला तर तो ठेवलेले कागद फाडेल. राग आल्यानंतर तो शांत करण्यासाठी आवश्यक कृती घ्याव्यात. उदाहरणार्थ, गाणी, गोष्टी, खेळ

पंचकोश	
मनोमय कोश	
विविधता	प्राणी, पक्षी अशी चित्रे वापरून गोष्टी सांगाव्या थोर पुरुष, क्रांतीकारक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कथा सांगाव्या.
थीम/विषय	पाणी–पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन
ताईसाठी सूचना	–

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-4 बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.
C-4.2 विविध भावना ओळखतो. त्यावर नियंत्रण आणण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करतो.
अ) LO-4.2.1.2 सोप्या भावना ओळखतो. जसे : भीती, आनंद, दु:ख
ब) LO-4.2.1.1 भावनांची चेहऱ्यावरील हावभाव व शब्द यांच्याशी सांगड घालतो.
ब) LO-4.2.1.2 भावनांना शब्दाद्वारे तसेच हावभाव व इतर प्रकारे व्यक्त करतात. जसे : चित्र रेखाटन, देहबोलीतून
क) LO-4.2.1.2 स्वत:च्या भावना परिचित समवयस्क व इतरांना सांगतो.
क) LO-4.2.2.2 जेव्हा रागावलेले किंवा निराश असतात तेव्हा शांत होण्यासाठी कृती बदलण्याचे मान्य करतात.</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये</td><td colspan="2">• भावनिक बुद्धिमत्ता, आपुलकी, मदतीची भावना यांच्या विकासाला चालना मिळेल.</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">बालके एखाद्या घटनेला प्रतिसाद कसा देतात त्यांना काय वाटते याचे निरीक्षण करावे.</td></tr>
<tr><td colspan="3">आधारशिला कृती : 81. Wonders in our Bin : Reuse and Recycle Safe Waste Creatively</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">कचऱ्यातून कला आणि खत</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">प्लास्टिकचे ग्लास, कागदी ताटल्या, प्लास्टिकच्या बाटल्या, पुठ्ठ्यांची वेष्टने, ओला कचरा, सुका कचरा</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td colspan="2">• सोप्या वस्तू बालकांबरोबर बनवाव्या.
• बालकांना खाता न येण्याजोग्या रोजच्या वापरातल्या गोष्टी कोणत्या ते विचारावे.
• प्लास्टिकचे ग्लास, कागदी ताटल्या, प्लास्टिकच्या बाटल्या, पुठ्ठ्याची वेष्टने इत्यादी बालके कचरा कसा होतो, याबाबत बालकांशी चर्चा करावी.
• या वस्तू वापरून कोणत्या उपयोगी वस्तू बनवता येतील, याबाबत बालकांशी चर्चा करावी.</td><td>• कुजणाऱ्या आणि न कुजणाऱ्या वस्तूंबाबत बालकांशी चर्चा करावी.
• बालकांना ओला आणि सुका कचरा तसेच काचा, धातू, प्लास्टिक, कागद असे कचऱ्याचे वर्गीकरण करून दाखवावे.
• ओल्या कचऱ्यापासून खतनिर्मिती कशी करतात याबाबत माहिती देऊन त्याचे प्रात्यक्षिक करावे.</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
		• खत प्रकल्पाच्या खड्ड्यामध्ये ओला कचरा, पालापाचोळा नियमितपणे टाकण्याची सवय लावावी.

पंचकोश	
अन्नमय, विज्ञानमय कोश	
विविधता	तयार झालेले खत वापरून परिसरात जमिनीत किंवा कुंडीत फुलझाडे लावावी.
थीम/विषय	मी, माझे कुटुंब व परिसर, पाणी–पाऊस, ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन
ताईसाठी सूचना	पालकांच्या मदतीने घरी ही कृती करण्यास सांगावे.
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-1** बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात. **C-1.3** शाळा व वर्ग स्वच्छ आणि नीटनेटके ठेवतो. **अ) LO - 1.3.3** इतरांच्या मदतीने कचरापेटीचा वापर करतो. **ब) LO - 1.3.3** कचरा टाकण्यासाठी कचरापेटीचा वापर करायला सुरुवात करतो. **क) LO - 1.3.3** नेहमी कचरा टाकण्यासाठी कचरापेटीचा वापर करतो.
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	कचऱ्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावायची असते याचे सामाजिक भान, यासाठी कचऱ्याचे वर्गीकरण करणे, काही कचऱ्यात जाणाऱ्या वस्तूंचा पुन्हा वापर कसा करता येऊ शकतो, हे समजेल.
निरीक्षण करावयाच्या बाबी	योग्य प्रकारे कचरा वेगळा करतो का? वस्तूंचा पुनर्वापर करताना सर्जनशीलता दाखवतो का?

आधारशिला कृती : 82. Fun with Pictures : Cut/Tear Along the Outline	
उपक्रमाचे नाव	काळजीने वस्तू वापरूया
उपक्रमाला लागणारे साहित्य	आग, गॅस, सूरी, सुई, टाचणी, इस्त्री, इलेक्ट्रिक प्लग्ज अशा धोकादायक वस्तूंची चित्रे

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
• बालकांना वर्तुळात बसवून पुढील गोष्टी कराव्या : • वस्तू दाखवून त्यांचा अनुभव विचारून संवाद साधावा.	• बालकांसमोर वस्तू वाचनासाठी धारदार वस्तू एकेक करून मांडाव्यात सुरी, कात्री, सुई, टाचणी, पिन, इलेक्ट्रिकच्या	• बालकांना वर्तुळात बसवून पुढील गोष्टी कराव्या : १) सरळ रेषेवर कापूया कागदावरील सरळ रेषा

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
• आग, गॅस, सूरी, सुई, टाचणी, इस्त्री, इलेक्ट्रिक प्लग्ज अशा धोकादायक वस्तू प्रत्यक्षात/चित्र दाखवून ओळख करून द्यावी. प्रत्येक गोष्टीचा उपयोग विचारावा व त्याचबरोबर त्या वस्तूंचा धोका म्हणजे कात्री किंवा सुरीची धार त्यांना दाखवावी. या सर्व आपल्या उपयोगाच्या वस्तू आहेत, पण आपण हात लावणे टाळावे हे बालकांना सांगावे. • वरील गोष्टींपासून कसा धोका निर्माण होऊ शकतो याची माहिती द्यावी. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	वस्तूंमध्ये असलेल्या वस्तूबद्दल प्रत्येकास एक वाक्य बोलण्यास सांगावे.	प्लास्टिकच्या कात्रीने कापून घेणे. २) आकार कापूया : कागदावर सोपे वर्तुळ, त्रिकोण, चौकोन असे आकार काढून त्यानुसार प्लास्टिकच्या कात्रीने कापून घेणे. ३) भाजी चिरूया : सुरीने उकडलेले रताळे, बटाटे, दुधी भोपळा अशा प्रकारच्या भाज्या कापण्यास सांगणे. ४) टाचणी टोचूया : बोथट टाचणीने दोन कागद जोडण्यास सांगणे. ५) गवत काढूया : बोथट खुरप्याने बागेतील गवत काढण्यास सांगणे.

पंचकोश	
अन्नमय, प्राणमय, मनोमय कोश	
विविधता	• कोणत्या वस्तूंपासून काळजी घ्यावी हे सांगावे. • नाट्यीकरण करावे.
थीम/विषय	मी माझे कुटुंब व परिसर, भाज्या व फळे, ऋतू, वाहन.
ताईसाठी सूचना	या संदर्भातील वयोगट निहाय कृतिपत्रिका सोडवून घेऊया.
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-1** बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात. **CG-1.4** वस्तू आणि सोप्या साधनांचा सुरक्षितपणे वापर करतो. **अ) LO-1.4.1** आग, गॅस, सुरी, सुई, टाचणी, इस्त्री, इलेक्ट्रिक प्लग्ज अशा धोकादायक गोष्टींना हात लावणे टाळतो.

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
	ब) LO-1.4.1 कात्री सुरी, आगपेटी अशा धोकादायक आणि हानिकारक वस्तू काळजीपूर्वक हाताळतो. **क) LO-1.4.1** कात्री, सुरी या वस्तू देखरेखीखाली वापरतो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	कारक कौशल्य आणि जीवन कौशल्य निरीक्षण क्षमता वाढते आणि वस्तू हाताळून आनंद मिळतो. धोकादायक वस्तू ओळखतो. असुरक्षित वस्तूची माहिती होते.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	ओला कचरा कोणता आणि सुका कचरा कोणता, हे समजले आहे का याचे निरीक्षण संवादादरम्यान करावे.	
आधारशिला कृती : 83. Music Patterns : Create, Compare High/Low Pitch, Loud/Soft Sounds		
उपक्रमाचे नाव	वाजवून पाहूया, आवाज करूया	
उपक्रमाला लागणारे साहित्य	वाळू, खडे, डाळी, बिया, कडधान्ये भरलेल्या बाटल्या, खंजिरी, ताटली, चमचा, पत्र्याचा डबा.	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
कृती १ : बाटल्यांमध्ये वाळू, खडे, डाळी, कडधान्ये, बिया भराव्यात व बालकांना ते वाजवायला द्यावे. ताटली–चमचा किंवा वाटी–चमचा देऊन वाजवायला सांगावे. **कृती २ :** शारीरिक अवयव आणि हालचाली यांचा वापर करून आवाजावर टाळ्या वाजवणे, पाय आपटणे, वाकणे, डोलणे, उड्या मारणे अशा हालचाली तालात करून घ्याव्यात.	• स्थानिक बोलीभाषेतील संथ लयीतील गीते, ऐकावावीत. • शारीरिक अवयव आणि हालचाली यांचा वापर करून आवाजावर टाळ्या वाजवणे, पाय आपटणे, वाकणे, डोलणे, उड्या मारणे अशा हालचाली संथ व जलद तालात करून घ्याव्यात. • उपलब्ध असलेल्या विविध वस्तूंचा, वाद्याचा वापर करून संथ व जलद तालात आवाज निर्मिती करून घ्यावी. • स्थानिक बोलीभाषेतील जलद लयीतील गीते, ऐकावावीत.	• बालकांना संथ लयीत टाळ्या वाजवण्यास सांगावे. • वेळेच्या अंतराने एकच कृती जलद करण्यास सांगावी. उदाहरणार्थ, हात हलवणे, चालणे, खंजिरी वाजवणे, वाटी चमचा वाजवणे • बडबड गीत संथ व जलद गतीने म्हणावे. • संथ आणि जलद यातील फरक लक्षात आल्यावर, संथ, मध्यम आणि जलद अशा तीन वेगवेगळ्या लयीत कृती करून घ्यावी. • संथ, मध्यम, जलद अशा कृती एका मागे एक करण्यास सांगावे. उदाहरणार्थ, ठेक्याची लय क्रमाने म्हणजे संथ मध्यम जलद अशी वाढवत नेऊन त्या वेगाप्रमाणे

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
		शारीरिक हालचाली करून घ्याव्यात. • संथ, मध्यम व जलद ठेका वाजवून त्यावर विविध गीते म्हणावयास सांगावे. उदाहरणार्थ, बडबडगीत, कृतिगीत इत्यादी.
पंचकोश		
अन्नमय, आनंदमय, प्राणमय, मनोमय कोश		
विविधता	बालकांची हजेरी घेताना हजर असे म्हणताना प्रत्येकाने एखादा आवाज काढावा व हजर म्हणावे असा खेळ घ्यावा.	
थीम/विषय	मी माझे कुटुंब, पाणी–पाऊस, वाहन	
ताईसाठी सूचना	मुक्त संगीत निर्मितीसाठी बालकांना विविध वस्तू उपलब्ध करून द्याव्यात. बालकांना परिसरातील विविध वाद्ये दाखवून त्यांचा आवाज ऐकवावा. उदाहरणार्थ, झांज, टाळ, तबला, पखवाज, ढोलकी, सूरपेटी, ताशा, तारपा परिसरात म्हटली जाणारी लोकगीते ऐकवावीत.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-12** बालके दृक् आणि ललित कलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गाने कलेद्वारे व्यक्त करतात. **C-12.2** संगीत, भूमिका अभिनय, नृत्य आणि विविध हालचाली यांची निर्मिती करण्यासाठी स्वतःचा आवाज, शरीर, जागा आणि विविध वस्तू यांचा चौकसपणे उपयोग करतो व खेळतो. **अ) LO 12.2.1** स्वतःच्या आवाजाचा आणि शरीराचा वापर करून तालबद्धतेचा शोध घेतो. (टाळ्या, चुटक्या, पावलांचा आवाज, हाताच्या लयबद्ध हालचाली, उड्या, बडबडगीतातून शब्दोच्चार) **ब) LO 12.2.1** स्वतःचा आवाज, शरीर, वाद्य व इतर साधनांचा वापर करून तालबद्धतेचा शोध घेताना द्रूत आणि संथ लय यात फरक करतो. **क) LO 12.2.1** आवाज, शरीर, वाद्य व इतर साधनांचा वापर करून तालबद्धतेचा शोध घेताना द्रूत आणि संथ लय यात फरक करतो.	

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	संगीतातील ताल, लय या संकल्पना, संगीताचा आनंद घेणे आणि स्वमनोरंजन कसे करावे हे समजेल.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	संगीत लावल्यावर लय, ताल समजतो का हे शारीरिक हालचालींचे निरीक्षण करून समजून घ्यावे.	
आधारशिला कृती : 83.1. Music Patterns Create Compare-High/Low Pitch, Loud/Soft Sounds		
उपक्रमाचे नाव	लयीत गाऊया.	
उपक्रमाला लागणारे साहित्य :	वाद्य म्हणून वापरता येईल अशा विविध वस्तू	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
कृती : बडबडगीत म्हणणे • स्थानिक बोलीभाषेतील संथ लयीतील गीते, ऐकवावीत. • शारीरिक अवयव आणि हालचाली यांचा वापर करून आवाजावर टाळ्या वाजवणे, पाय आपटणे, वाकणे, डोलणे, उड्या मारणे अशा हालचाली संथ व जलद तालात करून घ्याव्यात. • उपलब्ध असलेल्या विविध वस्तूंचा वाद्याचा वापर करून संथ व नंतर जलद तालात आवाज निर्मिती करून घ्यावी. **कृती : शारीरिक हालचाली आणि आवाज** • तोंडाने विविध आवाज करण्यास सांगावे. उदाहरणार्थ, प्राण्यांचे आवाज, गाड्यांचे आवाज, आ, आ, टप टप, धप धप इत्यादी. • शारीरिक अवयव आणि हालचाली यांचा वापर करून आवाजावर टाळ्या वाजवणे, पाय आपटणे,	**कृती : बडबडगीत म्हणणे** • स्थानिक बोलीभाषेतील संथ लयीतील गीते, ऐकवावीत. • शारीरिक अवयव आणि हालचाली यांचा वापर करून आवाजावर टाळ्या वाजवणे, पाय आपटणे, वाकणे, डोलणे, उड्या मारणे अशा हालचाली संथ व जलद तालात करून घ्याव्यात. • उपलब्ध असलेल्या विविध वस्तूंचा, वाद्याचा वापर करून संथ व नंतर जलद तालात आवाज निर्मिती करून घ्यावी. **कृती : शारीरिक हालचाली आणि आवाज** • ताईने बालकांसाठी घुंगरू काठीने ताल धरावा त्या तालावर बालकांनी पायाने ठेका वाजवावा.	**कृती : गाणी म्हणणे** • बालकांना वेगवेगळी वाक्ये स्वत:च्या आवाजात म्हणण्यास सांगावे. • एकच वाक्य परत परत वेगवेगळे भाव व्यक्त करत म्हणून घ्यावे. उदाहरणार्थ, मला खाऊ दे (प्रेमाने म्हणणे हसत म्हणणे रडत म्हणणे रागाने म्हणणे इत्यादी) • बालकांना वेगवेगळी छोटी गीते स्वतःच्या आवाजात, वेगवेगळे भाव व्यक्त करत म्हणण्यास सांगावे. उदाहरणार्थ, ज्या गीतात अंक–अक्षरे यांचा वापर आहे, अशी गीते एक लहान बोट, एक लहान बोट, टाळ्या वाजवा. दोन लहान बोटे, दोन लहान बोटे, टाळ्या वाजवा, तीन लहान बोटे, तीन लहान बोटे, टाळ्या वाजवा, चार लहान बोटे, चार लहान बोटे, टाळ्या वाजवा, पाच लहान बोटे पाच लहान बोटे, टाळ्या वाजवा.

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>वाकणे, डोलणे, उड्या मारणे अशा हालचाली तालात करून घ्याव्यात.
• सुरुवातीला एक हालचाल सांगावी. सराव झाल्यावर हालचाली दोन, तीन अशा क्रमाने वाढवत न्याव्यात.</td><td></td><td></td></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">आनंदमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">बालकांची हजेरी घेताना हजर असे म्हणताना प्रत्येकाने एखादा आवाज काढावा व हजर म्हणावे असा खेळ घ्यावा, घोषणा देणे, धून म्हणणे.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">मी, माझे कुटुंब व परिसर, पाणी–पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू , प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस वाहन</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">‘मुक्त संगीत’ निर्मितीसाठी बालकांना विविध वस्तू उपलब्ध करून द्याव्यात.
बालकांना परिसरातील विविध वाद्ये दाखवून त्यांचा आवाज ऐकवावा. उदाहरणार्थ, झांज, टाळ, तबला, पखवाज, ढोलकी, सूरपेटी, ताशा, तारपा परिसरात म्हटली जाणारी लोकगीते ऐकवावीत.</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-12 बालके दृक् आणि ललितकलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात. त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गाने कलेद्वारे व्यक्त करतात.
C-12.2 संगीत, भूमिका अभिनय, नृत्य आणि विविध हालचाली यांची निर्मिती करण्यासाठी स्वतःचा आवाज, शरीर, जागा आणि विविध वस्तू यांचा चौकसपणे उपयोग करतात व खेळतात.
ब) LO 12.2.1 स्वतःचा आवाज, शरीर, वाद्य व इतर साधनांचा वापर करून तालबद्धतेचा शोध घेताना द्रूत आणि संथ लय यात फरक करतो.
अ, ब) LO 12.2.3 आवाज, शरीर, वाद्य व इतर साधनांचा वापर करून तालबद्धतेचा शोध घेताना द्रूत आणि संथ लय यात फरक करतो.</td></tr>
</table>

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td></td><td colspan="2">क) LO 12.2.1 आवाज, शरीर, वाद्य व इतर साधनांबरोबर खेळताना द्रूत, मध्यम आणि संथ लय यांच्यात फरक करतो.</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये</td><td colspan="2">गाण्यातून आनंद मिळवणे व स्वमनोरंजन, भाषाविकास, भाषासमृद्धी, शब्दसंपत्तीमध्ये वाढ या सर्वांना चालना मिळेल.</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">आवाजातील चढ-उतार करता येणे, त्यातील गंमत समजणे त्यावेळी आनंद घेत गाणी म्हणणे हे बालके करतात का याचे निरीक्षण करावे.</td></tr>
<tr><td colspan="3">आधारशिला कृती : 84. Fun with Lines Identify and Create - Curved, Zig-Zag, Straight Lines</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">रेषांची रचना करूया.</td></tr>
<tr><td colspan="3">उपक्रमाला लागणारे साहित्य</td></tr>
<tr><td>परिसरातील पाने, फुले, बिया, काड्या, दगड, सुतळी</td><td>माती, बिया, खडे, काड्या, सुतळी</td><td>वेगवेगळ्या पोताचे, आकाराचे, रंगाचे, घनतेचे साहित्य</td></tr>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>१) कृती : रचना करूया
• ताईने बालकांना परिसरातील पाने, फुले, बिया, काड्या, दगड अशा वस्तू गोळा करून आणायला सांगव्या. जमिनीवर सरल, वक्राकार किंवा झिकझॅक रेषा काढाव्यात व त्यावर पाने, फुले, बिया, काड्या, दगड वस्तू वापरून रचना करायला सांगावी.
२) कृती : चिकटकाम
• कागदावर सरळ, वक्राकार किंवा झिकझॅक रेषा काढाव्यात वेगवेगळ्या आकाराच्या आणि रंगाच्या टिकल्या चिकटवयाला सांगावे. पुठ्ठ्याच्या २ × १० इंच आकाराच्या पट्ट्या कापून</td><td>१) कृती : रचना करूया
• बालकांना माती, बिया, खडे, काड्या, सुतळी अशा वस्तू द्याव्यात व त्यांना सरल, वक्राकार, झिकझॅक रेषा तयार करायला सांगाव्यात.
• जमिनीवर विविध प्रकारच्या रेघा काढाव्यात व त्यावरून बालकांना चालायला व उड्या मारत जायला सांगावे.
२) कृती : चिकटकाम
• रंगीत कागदाचे छोटे तुकडे बालकांना वाटावेत त्याचे चुरगळून छोटे छोटे बोळे करण्यास सांगावे. त्या बोळ्यांनी विविध रेषा तयार करण्यास सांगतील.</td><td>• ३ ते ४ व ४ ते ५ वर्षे वयोगटाच्या कृती घ्याव्यात.
• ताईने बालकांना वेगवेगळ्या वाकड्यातिकड्या रेषा असलेला कागद द्यावा. बालकांनी त्या रेषा आकारातून चित्र काढायचे आहे.
• बालकांना काही ठिकाणी मदत लागल्यास करावी.
• ताईने बालकांना सुतळी, चौकोनी आकाराचा एक-एक पुठ्ठा द्यावा. बालकांनी पुठ्ठा घेऊन त्यावर डिंक लाऊन रेषा उभ्या, आडव्या वेगवेगळ्या रेषा तयार कराव्या व त्या रेषांवर डिंक सुतळी चिकटवावी. याप्रमाणे सर्व बालकांची ही कृती करून घ्यावी.</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
घ्याव्यात. त्यावर वर दिलेल्या आकारामध्ये सुतळी किंवा जाड दोरी चिकटवावी. बालकांना त्या सुतळीच्या आकारावर बोटे फिरवण्यास सांगावे. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**		• ताईने बालकांना सुतळी, चौकोनी आकाराचा एक–एक पुठ्ठा द्यावा. बालकांनी पुठ्ठा घेऊन त्यावर डिंक लाऊन रेषा उभ्या, आडव्या वेगवेगळ्या रेषा तयार कराव्या व त्या रेषांवर डिंक सुतळी चिकटवावी. याप्रमाणे सर्व बालकांची ही कृती करून घ्यावी.
पंचकोश		
अन्नमय, प्राणमय, आनंदमय कोश		
विविधता	काड्या, बिया, झाकण, फुले, पान, बांगड्या, दगड, बालकांना त्यांच्या आवडीनुसार रचना करून द्यावी.	
थीम/विषय	मी, माझे कुटुंब व परिसर, पाणी–पाऊस, भाज्या व फळे	
ताईसाठी सूचना	ताईने यासंदर्भात वयोगटनिहाय कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व	**CG-12** बालके दृक् आणि ललितकलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात. आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गाने कलेद्वारे व्यक्त करतात. **C-12.1** विविध आकाराच्या द्विमितीय (2D) आणि त्रिमितीय (3D) कलाकृती तयार करण्यासाठी विविध प्रकारचे साहित्य आणि साधने हाताळतो व त्याबरोबर खेळतो. **अ) LO 12.1.1** योग्य कलासाहित्य साधने आणि उपकरणे हाताळतो. **क) LO 12.1.1** साहित्य आणि साधने वापरताना विविध प्रकारांनी पकडतो आणि हाताळतो. (उदाहरणार्थ, काड्या, बिया, खडे, दगड, खडू, दोरा, पेन्सिल, ब्रश, भुकटी, कात्री इत्यादी)	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्य	सूक्ष्म स्नायू विकास हस्त–नेत्र समन्वय, सौंदर्यदृष्टीचा विकास, सर्जनशीलता, साध्य होण्यास मदत होईल.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	सूक्ष्म स्नायूंचा वापर कसा होतोय, वेगळ्या कल्पना सूचत आहेत का याचे निरीक्षण करावे.	

आधारशिला कृती : 85 Fun with Patterns : Create Art/Craft/Beading/ Body-Movement Patterns		
उपक्रमाचे नाव	आकारावर बिया, पाने, फुले लावू	
उपक्रमाला लागणारे साहित्य	बिया, पाने, फुले, काड्या, खडे	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
• बालकांना मोठा सोपा आकार जमिनीवर काढून द्यावा. उदाहरणार्थ, गोल, त्रिकोण, चौकोन. • या आकारावर बिया, पाने, फुले, लावायला द्याव्यात. • बालकांना स्वतः बिया, खडे यांनी आकार बनवायला सांगावे. • कोणता आकार बनवला त्याबाबत बोलण्यास प्रोत्साहन द्यावे. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	• बालकांना रांगोळी सारखे चित्र जमिनीवर काढून द्यावे. उदाहरणार्थ, ५ पाकळ्यांचे फूल • या आकारात आणि रेषेवर बिया, काड्या, खडे लावण्यास सांगावे. • कोणता आकार बनवला त्याबाबत बोलण्यास प्रोत्साहन द्यावे. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	• बालकांना परिसरात नेऊन जोडीजोडीने तेथे पडलेल्या गोष्टी (पाने, फुले, रंगीत दगड, काड्या, बिया इत्यादी.) गोळा करून आणण्यास सांगावे. • आणलेल्या वस्तूंपासून वर्ग सजावटीसाठी जोडी जोडीने रचना करण्यास सांगावी. • फुला-पानांचे तोरण, दगडाची, बियांची रांगोळी इत्यादी. वर्ग सजावट करताना उंचावरील वस्तूंसाठी ताई किंवा मोठ्यांची मदत घ्यावी. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**
पंचकोश		
प्राणमय, अन्नमय, विज्ञानमय कोश		
विविधता	वर्तुळ, त्रिकोण, चौकोन, झाडाचे चित्र, फुलाचे चित्र	
प्राणमय, अन्नमय, विज्ञानमय कोश	प्रथम बालकाला मनाप्रमाणे मुक्त रचना करू द्यावी, नंतर आकार काढून रचना करण्यास सांगावे.	
थीम/विषय	वनस्पती (फुले, शेती, रंग), वाहन	
ताईसाठी सूचना	ताईने यासंदर्भात उपलब्ध वयोगटनिहाय कृतिपत्रिका वापरावी.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-8** बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात. **C-8.2** आपल्या परिसरातील आकार आणि संख्या यांच्यातील साधे आकृतिबंध ओळखतो आणि त्यांचा विस्तार करतो.	

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
	अ) **LO 8.2.1.1** आकृतिबंध ओळखतो. आकार, पाने, फुले यांचा जोड्यांमधील पुनरावृत्तीनुसार आकृतिबंध तयार करतात. (पान-फूल, पान-फूल, अ-ब, अ-ब, अ-ब) क) **LO 8.2.1** रंग, आकार, माप या विविध वैशिष्ट्यांनुसार नवीन आकृतिबंध स्वत: तयार करतो. **CG-12** बालके दृक् आणि ललित कलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात. **C-12.1** विविध आकाराच्या द्विमितीय (2D) आणि त्रिमितीय (3D) कलाकृती तयार करण्यासाठी विविध प्रकारचे साहित्य आणि साधने हाताळतो व त्याबरोबर खेळतो. अ) **LO 12.1.1** योग्य कलासाहित्य साधने आणि उपकरणे हाताळतो. अ) **LO 12.1.2** दृश्य कलाकृतींमध्ये ठसे, रेघा, आणि इतर द्विमितीय आणि त्रिमितीय प्रतिमा तयार करताना लहान व मोठे आकार शोधतो. ब-क) **LO 12.1.1** साहित्य आणि साधने वापरताना विविध प्रकारांनी पकडतो आणि हाताळतो. (उदाहरणार्थ, काड्या, बिया, खडे, दगड, खडू, दोरा, पेन्सिल, ब्रश, भुकटी, कात्री, इत्यादी.) ब-क) **LO 12.1.2** समवयस्क, सुलभक आणि स्थानिक समुदायाच्या सहभागाने मोठ्या स्वरूपाची कामे करतो. (उदाहरणार्थ, जमिनीवरील रांगोळी, भित्तीचित्रे, शिल्पकृती).	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्य	आकाराची संकल्पना स्पष्ट होणे, सूक्ष्मस्नायू विकास, हस्त-नेत्र समन्वय, सौंदर्यदृष्टीचा विकास, सर्जनशीलता, साध्य होण्यास मदत होईल.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	आकार संकल्पना, आकार ओळखता येतात का याचे निरीक्षण करावे.	
आधारशिला कृती : 86 Floor Art : Rangoli (Shapes, Pattern and more)		
उपक्रमाचे नाव	रांगोळी काढूया	
उपक्रमाला लागणारे साहित्य	विविध रंगाच्या रांगोळ्या, छोट्या प्लास्टिक बॉटल	

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
• ताईने बालकांना प्लास्टिकच्या छोट्या बाटल्यांमध्ये रंगीत रांगोळी भरून द्यावी. बाटलीच्या झाकणाला भोक पाडलेले असावे. खाली वर्तमानपत्राचा कागद अंथरून द्यावा. त्यावर बाटली उलटी करून रांगोळी काढण्यास सांगावे. • कागदावर रांगोळी घ्यावी त्यात बालकांना बोटे फिरवण्यास सांगावे. • मुंगीने रांगोळी कागदावर सोडून ठिपके चित्र काढण्यास सांगावे.	• ताईने प्रथम ३-३ बालकांचे गट करून घ्यावे. या गटात रांगोळी द्यावी. गटातील बालकांना मिळून पाच बोटांनी रांगोळी काढायला सांगावी. बालकांना येईल तशी रांगोळी काढून द्यावी.	• ताईने बालकांना रांगोळी भरण्यासाठी जमिनीवर चित्र काढून द्यावे. पाच बोटांनी रांगोळी भरायला सांगावे. प्रत्येक बालकाला एक-एक चित्र काढून द्यावे. रांगोळीत रंग भरण्यासाठी वाटीत ६ ते ७ रंग द्यावेत. एक रंग भरून झाल्यावर दुसरा रंग घ्यावा ही सूचना द्यावी. बालक जसे रंग भरतील तसे मान्य करावे.

पंचकोश	
अन्नमय, आनंदमय, प्राणमय, विज्ञानमय कोश	
विविधता	वेगवेगळे चित्र काढून द्यावे त्यात रांगोळी भरायला द्यावी. मुक्त रांगोळी हाताने घालायला द्यावी.
थीम/विषय	मी, माझे कुटुंब व परिसर, पाणी-पाऊस, वनस्पती (फुले, शेती, रंग)
ताईसाठी सूचना	ताईने यासंदर्भातील वयोगट निहाय कृतिपत्रिका सोडवून घ्याव्यात. वयोगट ३ ते ४ वर्षे साठी ताईने आकारावर डिंक लावून द्यावा व त्यावर रांगोळी चिकटवून घ्यावी. दिव्यांग बालकालादेखील आवश्य सहभागी करून घ्यावे.
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-12** बालके दृक् आणि ललित कलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात. **CG-12.1** विविध आकाराच्या द्विमितीय (2D) आणि त्रिमितीय 3D) कलाकृती तयार करण्यासाठी विविध प्रकारचे साहित्य आणि साधने हाताळतो व त्याबरोबर खेळतो. **अ) LO 12.1.2** दृश्य कलाकृतींमध्ये ठसे, रेघा, आणि इतर द्विमितीय आणि त्रिमितीय प्रतिमा तयार करताना लहान व मोठे आकार शोधतो.

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td></td><td colspan="2">ब-क) LO 12.1.2 समवयस्क, सुलभक आणि स्थानिक समुदायाच्या सहभागाने मोठ्या स्वरूपाची कामे करतो. (उदाहरणार्थ, जमिनीवरील रांगोळी, भित्तीचित्रे, शिल्पकृती).</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्य</td><td colspan="2">स्नायू विकास, बोटाने, चिमटीने रांगोळी घालता येणे.</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">स्नायू विकास, बोटाने, चिमटीने रांगोळी घालता येते का हे बघावे.</td></tr>
<tr><td colspan="3">आधारशिला कृती : 87 Let's Create : Common Spaces in Neighbourhood</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">प्रतिकृती बनवूया.</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य :</td><td colspan="2">कागद, तेलीखडू, कार्डबोर्ड, कात्री, डिंक</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td>• ताईने बालकांना अर्धवर्तुळात बसवावे.
• अंगणवाडीत येताना काय काय दिसते यावर गप्पा गोष्टी कराव्यात.
• बालकांना त्यांच्या परिसरातील ठिकाणे ओळखण्यास आणि त्यांची नावे देण्यास मदत करावी. (उदाहरणार्थ, घरे, उद्याने, शाळा, खेळाची मैदाने).
• बालकांना अंगणवाडीत येताना ते दररोज पाहत असलेल्या वेगवेगळ्या ठिकाणांची संकल्पना समजण्यास मदत करावी.
उदाहरणार्थ, तुम्ही जाताना/येताना तुम्हाला काय दिसते ते सांगावे.</td><td>• ताईने बालकांना लागणारे हस्तकलेचे साहित्य द्यावे उदाहरणार्थ, कागद, तेलीखडू, कार्डबोर्ड, कात्री, डिंक वापरून शेजारच्या जागेची साधी चित्रे किंवा प्रतिकृती तयार करण्यात बालकांना मदत करावी.
• बालकांना त्यांच्या परिसरात काय काय दिसते ते विचारावे उदाहरणार्थ, तुम्हाला खेळाच्या मैदानाबद्दल काय आवडते? बागेच्या जवळ काय काय दिसते? त्याप्रमाणे चित्र किंवा मॉडेल्स तयार करायला सांगावे.</td><td>• ताईने बालकांना लागणारे हस्तकलेचे साहित्य द्यावे (उदाहरणार्थ, कागद, तेलीखडू, कार्डबोर्ड, कात्री, डिंक) बालकांना विविध प्रकारच्या हस्तकला साहित्याचा वापर करून शेजारच्या अंगणवाडीच्या जागेचे अधिक तपशीलवार प्रतिकृती तयार करण्यासाठी मदत करा. उदाहरणार्थ, मातीची घरे, घरापुढील झाडे, वस्तू इत्यादींचा शोध घेत असताना सर्जनशीलता आणि कल्पनाशक्ती वाढवा. त्यांना प्रतिकृती करताना अजून काय काय घालता येईल यासाठी मदत करावी.</td></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">अन्नमय, आनंदमय, प्राणमय, विज्ञानमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">बालकांना कृतीचे व कल्पकतेचे स्वातंत्र्य देऊन व विविध माध्यमे वापरण्याची संधी देऊन या कृतीत विविधता आणता येईल.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">मी, माझे कुटुंब व परिसर प्राणी (पाळीव व जंगलातील), वाहन</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
ताईसाठी सूचना	धारदार वस्तू ताईने स्वत:च्या निगराणीमध्ये बालकांना वापरण्यास द्याव्यात.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-12** बालके दृक् आणि ललितकलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात. **C-12.1** विविध आकाराच्या द्विमितीय (2D) आणि त्रिमितीय 3D) कलाकृती तयार करण्यासाठी विविध प्रकारचे साहित्य आणि साधने हाताळतो व त्याबरोबर खेळतात. **अ) LO 12.1.1** योग्य कलासाहित्य साधने आणि उपकरणे हाताळतो. **ब-क) LO 12.1.1** साहित्य आणि साधने वापरताना, विविध प्रकारांनी पकडतो आणि हाताळतो (उदा. काड्या, बिया, खडे, दगड, खडू, दोरा, पेन्सिल, ब्रश, भुकटी, कात्री इ.)	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	कलाकृती तयार करण्यासाठी लागणारे साहित्य हाताळण्याचे कौशल्य विकसित होते. साहित्य मिसळण्याचे योग्य प्रमाण बालकांना कळते. हात आणि मेंदू यांचा समन्वय साधता येतो. सुलभकाच्या सूचनांचे अनुपालन करण्याची क्षमता विकसित होते. गटकार्याची उपयुक्तता लक्षात येते. सहकार्य व समन्वय साधण्याची क्षमता विकसित होते.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	बालकाच्या गटात कार्य करण्याच्या वर्तनाचे निरीक्षण करावे. गटाच्या सुलभक, समन्वयक यांच्या सूचनांकडे किती लक्ष देतो याचे निरीक्षण करावे. स्वत:हून काही वेगळे करतो का याचे निरीक्षण करावे. सहकार्य, समन्वय व साहचर्य याचे निरीक्षण नोंदवावे. बालवाटिका २ पेक्षा बालक, बालवाटिका ३ मध्ये जास्त आत्मविश्वासाने गोष्टी हाताळते का?	
आधारशिला कृती : 88 Festivals Celebrate and Learn / Appreciate Diversity (covered in other activities)		
उपक्रमाचे नाव	सण साजरे करूया.	
उपक्रमाला लागणारे साहित्य	विविध धर्माच्या सणांचे चित्रकार्ड	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
• ताईने संबंधित आठवड्यात येणाऱ्या सण आणि उत्सव यांचे नियोजन करावे. सणाच्या आधीच्या दिवशी बालकांना परिपाठात संबंधित सण व उत्सव यांची माहिती सांगावी. आवश्यकतेनुसार संबंधित सणासंदर्भातील खाद्यपदार्थ आणण्याविषयी तसेच आनुषंगिक वेशभूषा करून येण्यासंदर्भात बालकांना अवगत करावे.		

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">अन्नमय व आनंदमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">• शाळेत काही सणांचे छोट्या स्वरूपात आयोजन करता येईल.
• सण किंवा दिनविशेष गाणी म्हणून घ्यावीत. भजन श्लोक म्हणून घ्यावेत त्यानुसार गोष्टी सांगाव्यात.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">मी, माझे कुटुंब व परिसर, पाणी–पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू , प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस वाहन</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">हस्तपुस्तिकेतील भाग १ मधील प्रकरण ४ चा संदर्भ घ्यावा.</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-12 बालके दृक् आणि ललित कलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात.
CG-12.3 बालक कलेच्या माध्यमातून स्वतःच्या कल्पना आणि भावना व्यक्त करण्यासाठी सर्जनशीलता व कल्पकतेने काम करतो.
अ) LO-12.3.1 परिसरातील स्थानिक संस्कृती आणि कलेचे नमुने यांचे निरीक्षण करतो आणि त्यांचा सहसंबंध जोडतात.
ब)LO-12.3.1 कलेच्या माध्यमातून स्वतःच्या कल्पना साधने आणि कार्यपद्धती यांची देवाण–घेवाण करतो व परिचित उदाहरणातून सुधारणा करतात.
क) LO-12.3.1 कलेच्या माध्यमातून विविध अभिव्यक्ती कल्पना व भावना लक्षात घेतो व त्यांचा अर्थ लावतो तसेच स्वतःच्या कलात्मक आविष्कारांमध्ये या बाबींचा उपयोग करतात.</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्य</td><td colspan="2">सामाजिक भावनिक विकास, सांस्कृतिक एकात्मता</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">बालकांच्या सहभागाचे तसेच चित्रातील त्यांच्या सर्जनशीलतेचे निरीक्षण करावे.</td></tr>
</table>

आधारशिला कृती : 89. Making Classroom Rules Poster/Wall		
उपक्रमाचे नाव	नियम तयार करू.	
उपक्रमाला लागणारे साहित्य	सूचनांचे चित्र कार्ड, सूचना पट्ट्या/फलक	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
• वर्गात पाळायच्या नियमाबाबत बालकांशी चर्चा करावी. • शाळेत आल्यानंतर प्रत्येक वेळी वागताना आवश्यक तेथे दिसतील अशी सूचनांची चित्रे लावून ठेवावी. • बालकांना वेळोवेळी या सूचना दाखवाव्या. • सूचनांचे पालन करण्यास सांगावे. • ताईंनी स्वतःच्या कृतीतून वर्गासाठीचे नियम लक्षात आणून द्यावे. उदाहरणार्थ, जसे चप्पल रांगेत ठेवणे. डब्याची पिशवी जागेवर ठेवणे, पाण्याची बाटली जागेवर ठेवणे. • बालकांना त्याप्रमाणे कृती करण्यास सांगावे. घरात मोठी व्यक्ती पाळत असलेल्या नियमांवर चर्चा करावी. जसे बाहेरून आल्यावर हात पाय धुणे.	• बालकांसोबत वर्गातील नियम तयार करून घ्यावे. उदाहरणार्थ वर्गकार्य करतांना कसे बसावे? हात धुतांना रांगा कशा कराव्यात याप्रमाणे त्या प्रसंगी बालकांना सूचना द्याव्या. • सूचनेनुसार बालकांकडून नियमांचे पालन करून घ्यावे. यावेळी बालकांना मदत लागल्यास ती करावी. नियमांचे पालन का करावे? याविषयी चर्चा करावी. • सुरुवातीला बालकांना सूचना द्याव्यात त्यानंतर त्यांना स्वत:हून नियम पाळण्याची संधी द्यावी.	• सूचना फलक बालकांसाठी सोप्या सूचनांचे फलक तयार करावे. ➢ हात धुवा. ➢ खेळण आवरा ➢ डबे उघडा ➢ पुस्तक वाचा ➢ दार लावा ➢ सतरंजी घडी करा • या सूचना फलकांवर प्रत्येक सूचनेबरोबर एक योग्य चित्र लावावे. • सूचना वाचून दाखवा चित्र बघण्यास सांगा आणि ठिकठिकाणी हे फलक वर्गात लावून ठेवा ते वाचून सूचनांचे पालन करण्यास शिकवावे. **कृती : वर्गाबाहेरचे नियम** • ताईंनी वर्गस्तरावर उपक्रम आयोजित करताना त्यासाठी बालकांच्या मदतीने नियम तयार करून घ्यावे. • जसे : नेचर वॉक (परिसरात फेरफटका) हा उपक्रम आयोजित करताना कसे जावे, जेणे करून इतरांना त्रास होणार नाही. दोन दोनच्या रांगेत चालत गेल्यास इतरांना बघताना मदत होईल. याप्रमाणे नियम पळताना इतरांना मदत व्हावी याकरिता काही बालाकांना

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
		सहभागी करून घेता येईल. झाडांना पाणी घालणे यासारख्या कृती करण्यास प्रोत्साहन द्यावे. चांगले काम करणाऱ्या गटाचे सर्वांसमोर कौतुक करावे. खाऊ खाताना एकत्र सर्वांनी सुरुवात करावी. सर्वांना देऊन होईपर्यंत थांबावे.
पंचकोश		
मनोमय कोश		
विविधता	वर्गातील नियमांसारखे इतर कुठे नियम असतात? ते काय असतात याबाबत चर्चा करावी.	
थीम/विषय	मी, माझे कुटुंब व परिसर.	
ताईसाठी सूचना	सूचना फलक तयार करताना मराठी सोबतच इंग्रजी भाषेतील सूचनादेखील समाविष्ट कराव्यात. यासाठी कार्यपुस्तिकेचा संदर्भ घ्यावा.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-4** बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात. **C-4.5** शाळेत आणि वर्गात सामाजिक नियम समजून घेऊन त्याप्रमाणे सकारात्मक वर्तन करतो. **अ) LO- 4.5.2** शिक्षकांच्या मदतीने साध्या सूचनांचे पालन करतो. **ब) LO- 4.5.2** साध्या लहान सूचनांचे पालन करतो. **क) LO- 4.5.2** शाळेत मोठ्यांनी आठवण करून दिल्याशिवायही साध्या नियमांचे पालन करतो. **CG-13** बालके अध्ययनाच्या सवयी विकसित करतात. यामुळे त्यांना शालेय वर्गासारख्या औपचारिक अध्ययन वातावरणात सक्रिय राहता येते. **C-13.4** वर्गखोली नियामके : मनःपूर्वक व समजपूर्वक नियामके स्वीकारतो आणि पालन करतो. **अ) LO- 13.4.1** वर्गातील नियमकांसाठी प्रौढ व्यक्तींच्या वर्तनाचे निरीक्षण व अनुकरण करतो. **ब) LO- 13.4.1** ताईंनी दिलेल्या संकेतानुसार वर्गातील नियम पाळतो. **क) LO- 13.4.1.1** वर्गातील नियम पाळतो व इतरांना पाळण्यास मदत करतो.	

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्य	श्रवण कौशल्य विकसित होते, निरीक्षण शक्ती विकसित होते.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	सूचनांचे पालन करता येते का, एकावेळी किती सूचना समजतात.	
आधारशिला कृती : 90. Wrap It Up: Shapes, Boxes, and Decorations		
उपक्रमाचे नाव	वस्तू गुंडाळणे	
उपक्रमाला लागणारे साहित्य	वर्तमानपत्राची रद्दी, वर्गात किंवा नेहमीच्या वापरातील निरनिराळ्या वस्तू	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
• बालकांना वर्गातील छोट्या वस्तू द्याव्यात. उदाहरणार्थ, एखादे खेळणे, छोटा बॉक्स, पेन्सिल, छोटी डबी इत्यादी • बालकांना त्या वस्तूंच्या आकाराबाबत बोलण्यास प्रोत्साहित करावे. • या वेगवेगळ्या वस्तूंना वर्तमानपत्राचे वेष्टन घालण्यास सांगावे. • वेष्टन घातलेल्या वस्तू ओळखण्यास सांगावे. • वेष्टन काढून आतील वस्तू बरोबर ओळखली का ते दाखवावे.	• बालकांना मध्यम आकाराच्या वस्तू द्याव्यात. उदाहरणार्थ, चेंडू, बॉक्स, कोनाच्या आकारातील टोपी बालकांना त्या वस्तूंच्या आकाराबाबत बोलण्यास प्रोत्साहित करावे. • या वेगवेगळ्या वस्तूंना वर्तमानपत्राचे वेष्टन घालण्यास सांगावे. कोणत्या वस्तूला वेष्टन घालणे सोपे किंवा अवघड होते, हे विचारावे.	• ४ ते ५ वर्षे वयोगटाची कृती घ्यावी. वेष्टन घातलेले काढायला सांगावे. • वस्तूंना घातलेले वेष्टन काढायला सांगणे. • कोणत्या वस्तूला वेष्टनासाठी कमी कागद लागला? कोणत्या वस्तूला जास्त लागला? याबाबत निरीक्षण करण्यास सांगावे.
पंचकोश		
अन्नमय, प्राणामय कोश		
विविधता	वेगवेगळ्या वस्तूंना वेष्टन घालण्यास सांगावे. उदाहरणार्थ, मित्र-मैत्रिणीसाठी काही भेटवस्तू द्यायची असेल त्या वस्तू, घरातील कोणाला भेट द्यायची असेल त्या वस्तू	
थीम/विषय	मी माझे कुटुंब, वनस्पती (फुले, शेती, रंग), वाहन	
ताईसाठी सूचना	ताईने भेटवस्तूची वेष्टने, रंगीत कागद, खाकी कागद, वर्तमानपत्र, प्लास्टिक कागद इत्यादी संग्रहित करून या कृतीसाठी वापरावे.	

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-3** सुदृढ आणि लवचीक शरीर विकसित होते. **C-3.3** हाताने कृती करताना हात व बोटे यांच्या हालचालींमध्ये अचूकता आणि नियंत्रण दर्शवतो. **अ) LO- 3.3.1** साध्या कृतीमध्ये सूक्ष्म स्नायू विकास हस्त–नेत्र समन्वय आणि स्नायूंमधील बळकटपणा दर्शवितो. (उदाहरणार्थ, गिरगिटणे, कागद फाडणे, चिकटवणे, मुक्तपणे रंगविणे, मातीकाम) **ब) LO- 3.3.1** ज्या कृती करताना सूक्ष्म स्नायूंचा वापर केला जातो, तसेच हस्त नेत्र समन्वयात काही प्रमाणात अचूकता लागते अशा कृती करताना स्नायूंवर नियंत्रण दर्शवतो. (उदाहरणार्थ, मोठे आकार कापणे, मोठे मणी ओवणे, बटण लावणे, स्क्रू लावणे, बाटलीचे झाकण लावणे, उघडणे, क्रेयॉन्सचा वापर करून चित्र काढणे.) **क) LO- 3.3.1** जास्त अचूकता लागणाऱ्या कृती सूक्ष्म स्नायूंच्या समन्वयाने थोड्या मदतीसह करतो. (उदाहरणार्थ, पेन्सिलने चित्र काढणे, सरळ रेषेवर किंवा वक्र रेषेवर कापणे, छोटे मणी ओवणे.) **CG-12** बालके दृक् आणि ललितकलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात. **C-12.1** विविध आकाराच्या द्विमितीय 2D आणि त्रिमितीय 2D कलाकृती तयार करण्यासाठी विविध प्रकारचे साहित्य आणि साधने हाताळतो व त्याबरोबर खेळतो. **अ) LO- 12.1.1** दृश्य कलाकृतींमध्ये ठसे, रेघा आणि इतर द्विमितीय व त्रिमितीय प्रतिमा तयार करताना लहान व मोठे आकार शोधतो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	वेष्टनातील वस्तूच्या आकारावरून व आकारमानावरून वस्तू ओळखता येणे म्हणजेच निरीक्षण कौशल्य	
निरीक्षण करावयाच्या बाबी	वस्तू बरोबर ओळखली का, वस्तूचे वर्णन करताना सांगता येते का, की वस्तू कशावरून ओळखली.	

<table>
<tr><th colspan="3">आधारशिला कृती : 91. Make your own rhyme/song
(Expected activities are not included anywhere)</th></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">माझे गाणे</td></tr>
<tr><td colspan="3">उपक्रमाला लागणारे साहित्य :</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td>• साभिनय छोट्या बडबडगीतांचे गायन घ्यावे. यमक असणाऱ्या शब्दांवर जोर द्यावा. बालकांना सुरुवातीला मागे म्हणायला लावून नंतर सोबत गायनसराव घ्यावा.
गाणी १ : डाळिंब
डाळिंब असते लाल लाल
सफरचंदाचे तर गुलाबी गाल
आंबा हा तर फळांचा राजा
मला आवडतो पेरू ताजा
गाणी २ : जेवण
पीठ चाळा सरसर, कणीक भिजवा भरभर भाजी कर चमचमीत दशमी कर, खुसखुशीत कोशिंबीर कर, चटकन जेवून टाका पटकन.</td><td colspan="2">कृती :
• ताईने एक कोणतेही ओळखीचे छोटे बडबडगीत म्हणावे व त्याच चालीत स्वतःचे काही शब्द गुंफून गाणे तयार करून दाखवणे.
उदाहरणार्थ,
चिऊताई चिऊताई येऊ का घरात?
येरे बाबा कावळे दादा लवकर ये घरात घर माझे शेणाचे पावसाने पाडले
घर तुझे मेणाचे छान छान राहिले
• नवीन शब्द घालून कविता :
चिमणी आणि पोपट एकदा झाडावर भेटले
पावसामुळे दोघे होते खूप खूप भिजले
पोपट म्हणे चिऊताई घर माझे खूप लांब
चिऊ म्हणे पोपटाला घरी माझ्या थांब
चल माझ्या घरी घर माझे आहे त्या
फळांच्या झाडावरी पाऊस थांबेल
तेव्हा जा तू तुझ्या घरी दोघे भुर्रकन
उडाले फळांच्या झाडावर जाऊन
बसले खूप फळे पाहून पोपटदादा
आनंदले पाऊस थांबल्यावर उडून गेले.
• सर्व बालकांनी मिळून केलेली कविता कशी असू शकेल :
चिऊताईच्या घरी एकदा कावळेदादा आले
चल दोघे चहा पिऊ, चिऊला म्हणाले
झाडावर बसले काव काव ओरडले
चिऊ म्हणाली आवाज नको करू
बाळ माझे झोपले
बाळ माझे उठल्यावर देईन तुला चहा
आत्ता तू कोपऱ्यामध्ये जाऊन बस जरा
बोलू नको ओरडू नको नाहीतर रागवेन तुला – मनीषा अष्टपुत्रे.</td></tr>
</table>

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">मनोमय व विज्ञानमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">• ५ ते ६ वर्षे वयोगटासाठी यमक जुळवून एकेक ओळ सांगायला लावणे.
• कवितेच्या ठेक्यात बोलायचा एक दिवस ठेवणे
• देशभक्तीपर व प्रासंगिक गीते.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">भाज्या व फळे, प्राणी (पाळीव व जंगलातील), मदतनीस वाहन</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">ताईने शब्द द्यावेत शब्द गुंफण्यास मदत करावी. बालकांना शब्द देण्यास सांगावे.</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-9 बालके दोन भाषांमध्ये दैनंदिन संवाद साधण्यासाठी प्रभावी संवाद कौशल्य विकसित करतात.
C-9.1 साधी गाणी, बडबडगीते आणि कविता ऐकतो आणि आवड व्यक्त करतो.
अ) LO- 9.1.1 विविध प्रकारची गाणी आणि कविता ऐकतो.
ब) LO- 9.1.2 साधे गाणे, बडबडगीते ऐकून म्हणतो.
क) LO- 9.1.1 हावभाव व आवाजातील चढउतारासह गाणी म्हणतो.
C-9.2 स्वत:हून साधी गाणी आणि कविता तयार करतो.
अ) LO- 9.2.1 परिचित गाणी आणि कवितांचा आनंद घेतो.
ब) LO- 9.2.1 गाणी आणि कवितांमधला यमकबद्ध शब्दांचा आनंद घेतो.
क) LO- 9.2.1 परिचित कवितांमधील यमक असलेला शब्द ओळखतात. आणि यमक असलेले नवीन शब्द तयार करतो.</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये</td><td colspan="2">श्रवण आकलन, स्मरण कौशल्य विकसित होणे.</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">श्रवण आकलन, स्मरण कौशल्य यांचा वापर करतो का? आधीचे बडबडगीते म्हणता येतात का याचे निरीक्षण करावे.</td></tr>
<tr><td colspan="3">आधारशिला कृती : 92. Craft and Creativity:
Create Paper-Mache Art and Objects (Activities are included somewhere else)</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">कागदी लगद्याच्या वस्तू बनवूया</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">कागदी लगदा, साचे करण्यासाठी वस्तू, जसे–पेला, वाटी, रंगविण्यासाठी रंग व रंगाचे ब्रश.</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
कृती : कागदी लगद्याचे काय करता येईल? • ताईने तयार केलेला कागदाचा लगदा बालकांना थोडा थोडा द्यावा हाताला कसा लागतोय याचे काय करता येईल ते करा या पद्धतीने खेळू द्यावे.) • लगदा तयार करताना बालकांचा सहभाग घ्यावा.	**कृती : कागदी लगद्याचे काय करता येईल?** • ताईने कागदी लगदा बालकांना वाटावा आणि त्यांच्या रोजच्या खेळण्यातील जोड तोड खेळण्याचे वेगवेगळे भाग बालकांना देऊन त्याचे छाप कागदी लगदा उठवायला सांगावेत. • उठवलेला छाप दुसऱ्या दिवशी रंगवायला द्यावा. • लगदा तयार करताना बालकांचा सहभाग घ्यावा.	**कृती : कागदी लगद्याचे काय करता येईल?** • ताईने बालकांना कागदी लगदा तयार करण्याच्या पूर्ण प्रक्रियेत सहभागी करून घ्यावे यासाठी साधारण तीन दिवस लागतात. • यामध्ये आठवड्यातील पहिल्या दिवशी वर्तमानपत्राच्या कागदाचे एकदम बारीक तुकडे करण्याचे फाडकाम द्यावे. ते सर्व तुकडे पाण्यात भिजत घालावेत. • तीन दिवसांनी तुकडे छान भिजलेले असतील. त्यादिवशी ते सर्व तुकडे बाहेर काढून कुटायचे काम द्यायचे, हाताने कुस्करायचे काम द्यायचे. बालकांचे करून झाले की ताईने स्वतः तो लगदा एकदम मातीसारखा बारीक करावा. • दुसऱ्या दिवशी त्यात थोडा डिंक किंवा खळ घालावी व त्याचा छान गोळा करून तो बालकांना वाटावा. त्याच्यापासून वस्तू तयार करण्यास सांगावे. • वस्तू वाळल्यावर रंगकाम ही कृती नियोजित करावी आणि त्याच वस्तू रंगवण्यास द्याव्या.
पंचकोश		
आनंदमय, अन्नमय, प्राणमय कोश		
विविधता	• कागदाच्या लगद्यापासून टोपल्या वाट्या अशा वस्तू तयार करण्यास देता येतील त्यासाठी प्लास्टिकच्या छोट्या टोपल्या, वाट्या याला बाहेरून लगदा चिकटवून वाळल्यावर तो आकार मिळतो. • फुगवलेल्या फुग्यावर बाहेरून लगदा चिकटवून वाळल्यावर आतला फुगा टाचणीने फोडून टाकायचा आणि त्या फुग्याच्या आकारावर चेहरा रंगवायचा.	

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>**थीम/विषय**</td><td colspan="2">मी माझे कुटुंब, पाणी–पाऊस, वनस्पती (फुले, शेती, रंग), पक्षी व कीटक, मदतनीस</td></tr>
<tr><td>**ताईसाठी सूचना**</td><td colspan="2">ताईने या कृतीसाठी पटसंख्या विचारात घेऊन बालकांच्या मदतीने पुरेसा कागदी लगदा तयार करून ठेवावा. यासाठी उपलब्ध कार्यपुस्तिकेचा संदर्भ घ्यावा.</td></tr>
<tr><td>**अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती**</td><td colspan="2">**C-12** बालके दृक् आणि ललितकलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात.
C-12.1 विविध आकाराच्या द्विमितीय (2D) आणि त्रिमितीय (3D) कलाकृती तयार करण्यासाठी विविध प्रकारचे साहित्य आणि साधने हाताळतो व त्याबरोबर खेळतो.
अ) LO- 12.1.2 दृश्य कलाकृतींमध्ये ठसे, रेघा आणि इतर द्विमितीय व त्रिमितीय प्रतिमा तयार करताना लहान व मोठे आकार शोधतात.
अ) LO- 12.1.3 साहित्य एकत्रित मिसळून छाप व आकृती तयार करतात (उदाहरणार्थ, माती आणि पाणी, वाळू आणि पाणी, पीठ आणि पाणी, रंग आणि पाणी.)
ब व क) LO- 12.1.3 माती आणि कणिक यांसारखे साहित्य थापून किंवा बळकटी करून त्रिमितीय आकार तयार करतो.</td></tr>
<tr><td>**साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये**</td><td colspan="2">स्पर्श, अवधान कक्षा, एकाग्रता, सूक्ष्म स्नायू कौशल्य, हस्त–नेत्र समन्वय, सौंदर्यदृष्टी विकसित होते.</td></tr>
<tr><td>**निरीक्षण करावयाच्या बाबी**</td><td colspan="2">नवीन प्रकारचे माध्यम हाताळताना बालक नकारात्मक आहे की सकारात्मक आहे.</td></tr>
<tr><td colspan="3">**आधारशिला कृती : 93. Draw What You See : Perspective Based Drawing**</td></tr>
<tr><td>**उपक्रमाचे नाव**</td><td colspan="2">रेषा व आकार शोधूया.</td></tr>
<tr><td>**उपक्रमाला लागणारे साहित्य**</td><td colspan="2">पाने, फुले, बिया, कागद, पेन्सिल, दगड, चित्रे, चार्ट, नेहमीच्या वापरातील लहान भांडी, साबणाची, औषधांच्या बाटल्यांचे छोटे डबे, लहान खोके इत्यादी.</td></tr>
<tr><td>**वयोगट ३ ते ४ वर्षे**</td><td>**वयोगट ४ ते ५ वर्षे**</td><td>**वयोगट ५ ते ६ वर्षे**</td></tr>
<tr><td>• बालकांना प्रथम त्यांनी बघितलेल्या अवतीभोवतीच्या वस्तूंची नावे विचारावी</td><td colspan="2">• बालकांना प्रथम त्यांनी बघितलेल्या अवतीभोवतीच्या वस्तूंची नावे विचारावी.
• सभोवताली दिसणाऱ्या वस्तूंची नावे विचारावी</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
• सभोवताली दिसणाऱ्या वस्तूंची नावे विचारावी. • या वस्तूंचे आकार कसे आहेत ते बालकांना विचारावे. या वस्तूंचे आकार ढोबळमानाने बालकांना सांगावे. उदाहरणार्थ, चौकोनी डबा, दंडवर्तुळ, कोन, पिरामिड इत्यादी • या वस्तूंच्या कडा आणि पृष्ठभाग यांचे निरीक्षण करण्यास सांगावे. • त्या वस्तूसारखी दिसणारी दुसरी वस्तू पहिली आहे का? कुठे पहिली आहे हे विचारावे. • ही वस्तू मधे ठेवून बालकांना वर्तुळाकार बसवावे आणि वस्तू कशी दिसते आहे. तसे त्या वस्तूचे चित्र काढ; असे बालकांना सांगावे. • सर्व बालकांची चित्रे एकमेकांना दाखवून त्याबाबत चर्चा करावी. आहे, तसे त्या वस्तूचे चित्र काढ; असे बालकांना सांगावे.	• या वस्तूंचे आकार कसे आहेत ते बालकांना विचारावे. या वस्तूंचे आकार ढोबळमानाने बालकांना सांगावे. उदाहरणार्थ, चौकोनी डबा, दंडवर्तुळ, कोन, पिरामिड इत्यादी. • या वस्तूंच्या कडा आणि पृष्ठभाग यांचे निरीक्षण करण्यास सांगावे. • ही वस्तू मधे ठेवून बालकांना वर्तुळाकार बसवावे आणि वस्तू कशी दिसते आहे तसे त्या वस्तूचे चित्र काढ; असे बालकांना सांगावे. • सर्व बालकांची चित्रे एकमेकांना दाखवून त्याबाबत चर्चा करावी.	
पंचकोश		
अन्नमय व विज्ञानमय कोश		
विविधता	• एकच वस्तू वेगवेगळ्या बाजूने कशी वेगवेगळी दिसते याबाबत चर्चा करावी. • द्विमितीय चित्र आरशात कसे दिसते, त्रिमितीय वस्तूची द्विमितीय सावली कशी पडते याकडे बालकांचे लक्ष वेधावे.	
थीम/विषय	वनस्पती (फुले, शेती, रंग), वाहन	
ताईसाठी सूचना	–	

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-12** बालके दृक् आणि ललितकलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात. **C-12.1** विविध आकाराच्या द्विमितीय (2D) आणि त्रिमितीय (3D) कलाकृती तयार करण्यासाठी विविध प्रकारचे साहित्य आणि साधने हाताळतो व त्याबरोबर खेळतो. **अ) LO- 12.1.2** दृश्य कलाकृतींमध्ये ठसे, रेघा आणि इतर द्विमितीय आणि त्रिमितीय प्रतिमा तयार करताना लहान व मोठे आकार शोधतो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	• बालकाला विविध वस्तूंचे आकार समजतात. बालकाला वस्तू हाताळण्याचे कौशल्य प्राप्त होते. • एकाच वस्तूचे निरनिराळे उपयोग करता येतात याची जाणीव बालकाला होते. • आपले अनुभव, आपल्या भावभावना या द्विमितीय आणि त्रिमितीय वस्तूंच्या योजनेतून प्रकट करायला मिळू शिकते.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	बालके वस्तू हाताळताना, रचताना काय विचार करतात? त्यांना काय सांगायचे असते? त्याला एखादी गोष्ट कशी भासते याबाबत बालकांच्या कलाकृतीचे निरीक्षण करून आणि त्यांच्या गप्पा मारून जाणून घ्यावे.	
आधारशिला कृती : 94. Little Authors :Design your own picture book		
उपक्रमाचे नाव	माझ्या चित्रातील गोष्ट	
उपक्रमाला लागणारे साहित्य	भावविश्वातील संबंधित विविध गोष्टींचा संग्रह, चित्रकार्ड, लेखनकार्ड, खडू, पेन्सिल क्रेऑनचे रंग, रांगोळी, परिसरातील उपलब्ध साहित्य (काडी, खडे, माती)	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
कृती : मी काढलेले चित्र • बालकाने काढलेल्या चित्राबद्दल चर्चा करावी. ताईने बालकास काढलेल्या चित्राबद्दलची माहिती स्वलिपीत लिहिण्यास प्रेरित करावे. बालकाने काढलेल्या चित्राची माहिती स्वलिपीत लिहिण्यास ताईने प्रेरित करावे.	• ताईने बालकांना वर्तुळाकार बसवावे. बालकांना त्यांची कल्पना वापरून स्वलिपीत लिहिण्यास सांगावे. • बालकांनी मांडलेले कल्पक विचार, भावना, यावर गप्पा माराव्यात. बालकांनी लिहिलेल्या स्वलिपीतील लेखनाचा स्वीकार करावा व कौतुक करावे.	

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>• चित्राबद्दलची लिहिलेली माहिती बालकाने तोंडी सांगणे अपेक्षित. ताईने बालकास स्वत:चे नाव स्वलिपीत लिहिण्यास सांगावे.
• गोष्टीचे चित्र बालकांना त्यांना आवडलेली गोष्ट कोणती ते विचारावे. ही गोष्ट सांगण्यासाठी चित्रे काढण्यास सांगावे.
• एका गोष्टीची वेगवेगळ्या बालकांची चित्रे एकमेकांना दाखवून ती गोष्ट सांगण्यास प्रोत्साहित करावे.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td><td colspan="2">• बालकांनी लिहिलेल्या स्वलिपीचे निरीक्षण करून त्यात आवश्यक तेथे सूचना देतात. आकार भेदाचे अवयव टिंबाने जोडून दाखवावे व कृतीचे वर्णन करावे. बालकांनी लिहिलेल्या स्वलिपीतील मजकुरावर गटात चर्चा घ्यावी, गप्पा माराव्यात.
कृती : माझ्या चित्रातील गोष्ट
• 'माझ्या चित्रातील गोष्ट' बालकांना स्वतः गोष्ट रचण्यास प्रवृत्त करावे. त्या गोष्टीला साजेशी चित्रे काढण्यास सांगावे. त्या चित्रांच्या आधारे बालकांना वर्गात गोष्ट सांगण्यास सांगावे. त्यांच्या प्रयत्नाचे कौतुक करावे.
• बालकांना गोष्टीला नाव देण्यास सांगावे.
• चित्रांना क्रमांक घालून त्या गोष्टीचे पुस्तक बनवण्यास मदत करावी.
• वर्गातील गोष्टीच्या पुस्तकात अशी पुस्तके ठेवावी.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">मनोमय व विज्ञानमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">चित्रे जमवायला प्रोत्साहन देऊन त्यावरून गोष्ट तयार करण्यासाठी प्रोत्साहित करावे.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">मी, माझे कुटुंब व परिसर, पाणी-पाऊस, वनस्पती</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">ताईने बालकांना चित्र काढण्यासोबतच काही तयार चित्रे/मासिके/ वर्तमानपत्रे/जुनी शुभेच्छापत्रे वापरूनदेखील गोष्ट तयार करण्यास सांगावी. कृतीपुस्तिकेतील कृती करून घ्यावी.</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-10 बालके भाषा एक (L1) मध्ये सफाईदारपणे वाचन व लेखन करतात.
C-10.8 स्वतःला समजलेल्या गोष्टी सांगण्यासाठी व स्वतःचे अनुभव व्यक्त करण्यासाठी लेखन करतात.
अ) LO-10.8.2.2 आपण काढलेल्या चित्राबद्दल स्वलिपीमध्ये लिहितो. चित्र व स्वलिपीतील लेखन वेगवेगळे दिसते.
अ) LO-10.8.2.3 आपण स्वलिपीत लिहिलेला मजकूर तोंडी सांगतात.
अ) LO-10.8.2.4 स्वत:चे नाव स्वलिपीत लिहू शकतात.
ब) LO-10.8.2.1 स्वलिपीत केलेल्या लेखनात पारंपरिक अक्षरे नसली तरीही लेखी भाषेची वैशिष्ट्ये दिसतात, जसे : स्वलिपीतील दोन शब्दांमध्ये अंतर सोडणे, स्वलिपीतील शब्दांवर शिरोरेषा देणे.</td></tr>
</table>

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये</td><td colspan="2">अभिव्यक्ती विकास, वाचनपूर्व तयारी कौशल्य, सूक्ष्म स्नायू विकास मौखिक, भाषिक विकास, सर्जनशीलता, आकलन क्षमता, नवनिर्मितीचा आनंद, भावनिक विकास, लेखन विकास, निरीक्षण एकाग्रता.</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">• ताईने बालकाच्या स्वलिपीचा स्वीकार करावा.
• बालक स्वत: काढलेल्या चित्राबद्दल स्वलिपीत कसे लिहितो, याचे निरीक्षण करावे व नोंदी घ्याव्यात.
• बालकांनी लिहिलेल्या लेखनात भाषेची वैशिष्ट्ये, दोन शब्दांत योग्य अंतर, शिरोरेषा, शब्दांचा आकार, बालकांचा सहभाग, आकलन कौशल्य यांचे निरीक्षण करावे.</td></tr>
<tr><td colspan="3">आधारशिला कृती : 95. Keep Me Where I Belong: Sort and Store Objects Appropriately</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">मला माझ्या जागेवर ठेवा</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">डबा, पिशवी, बाटली, बूट, कचरा पेटी, टोपली इत्यादी.</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td>कृती : वस्तू जागेवर ठेवूया.
पूर्वतयारी :
• डबा, बाटली, चपला/शूज या वस्तूंच्या नियोजित ठिकाणी ताई चित्रे किंवा स्टिकर्स लावतील वर्गात बालके आल्यानंतर ताईंनी बालकांना एकत्र बसायला सांगावे. ताईने डबा बाटली हातात घेऊन तसेच पायात बूट घालून उभे राहावे. ताईने बूट काढण्याच्या जागी जाऊन बूट ठेवावे. तसेच डबा, बाटली यांच्यासाठी ठरवलेल्या जागी त्या-त्या वस्तू नेऊन ठेवाव्या. ताईने बालकांना त्यांच्या वस्तू ठरवलेल्या जागी ठेवण्याच्या सूचना द्याव्या.</td><td>वयोगट ३ ते ४ वर्षासाठीची कृती सुरूवातीला करवून घ्यावी.
कृती : माझा खाऊ मला द्या.
• ताईने बालवाटिकेच्या परिसरात कचरापेटी / टोपली ठेवावी.
परिसरात मोकळ्या जागी पडलेली पाने, काड्या, कागद, प्लॅस्टिक उचलून कचरापेटी/टोपलीत टाकण्यास सांगावे.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td><td>कृती : वर्गातील साहित्य जागेवर ठेवूया.
• छोट्या छोट्या नियमांची निर्मिती बालकांच्या मदतीने करून घ्यावी. जसे रंगकांड्या वापरल्यावर कुठे ठेवायच्या? पुस्तके बघितल्यावर कुठे ठेवायची? कशी ठेवायची? खेळणी खेळल्यावर कशी ठेवावी?
• वस्तूंच्या जागा लक्षात राहण्यासाठी चित्रे काढून लावावीत.
• बालकांना अशी चित्रे काढण्यासाठी प्रोत्साहित करावे.
• स्वत:हून नियमांचे पालन करून द्यावे.</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
• तसेच वस्तू ठेवताना तिथे लावलेली चित्रे किंवा स्टिकर बालकांना दाखवावी. जिथे जे चित्र आहे, तिथेच वस्तू ठेवूया असेही सांगावे. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**		• रिकामे बॉक्स वापरून वस्तूंसाठी जागा बनवण्यास बालकांना प्रोत्साहित करावे. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**

पंचकोश	
अन्नमय कोश	
विविधता	बालके वर्गात वापरत असणाऱ्या वस्तूंच्या जागा ठरवाव्या आणि त्या ठिकाणी स्टिकर/चित्रे लावून बालकांना त्याची ओळख करून द्यावी. उदाहरणार्थ, खेळणी ठेवण्याच्या जागा, पुस्तके ठेवणीची जागा इत्यादी. पेन्सिल, कागद इत्यादी वस्तूंचा वापर करून झाल्यानंतर झालेला कचरा उचलून जागा स्वच्छ करण्यास सांगणे.
थीम/विषय	मी, माझे कुटुंब व परिसर, ऋतू
ताईसाठी सूचना	यासंदर्भात वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्याव्यात.
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-1** बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात. **CG-1.3** शाळा व वर्ग स्वच्छ व नीटनेटके ठेवतो. **अ) LO- 1.3.1** स्वतःच्या वस्तू जसे की पिशव्या, बाटल्या, बूट, रुमाल इत्यादी यांच्याबद्दल सजग असतो. **ब) LO- 1.3.1** स्वतःच्या वस्तू योग्य जागी ठेवतात आणि योग्य जागेवरून घेतो. **ब) LO- 1.3.3** कचरा टाकण्यासाठी कचरापेटीचा वापर करायला सुरुवात करतो. **क) LO- 1.3.1** स्वतःच्या वस्तूंची चांगल्या प्रकारे देखभाल करतो. **क) LO- 1.3.3** नेहमी कचरा टाकण्यासाठी कचरापेटीचा वापर करतो.
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	अनुकरण, स्वच्छतेचे महत्त्व, स्वावलंबन, नीटनेटकेपणा.

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
निरीक्षण करावयाच्या बाबी	बालके स्वतःच्या वस्तू नियोजित ठिकाणी आहेत की नाही याबद्दल सजग आहे की नाही याचे निरीक्षण करावे. वर्गात झालेला कचरा पाहून बालके स्वच्छता करतात की नाही, कचरा टाकण्यासाठी कचरा पेटीचा वापर करतात की नाही याचे निरीक्षण करावे.	
आधारशिला कृती : 96. Grow a Plant: Nurture, Understand Parts and Function		
उपक्रमाचे नाव	वनस्पतींची ओळख	
उपक्रमाला लागणारे साहित्य	खुरपे, झारी, झाडांच्या बिया (कुंड्या, माती) मोकळी जागा. वनस्पतींच्या प्रकारांचे चित्रकार्ड.	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
कृती : बिया लावू या. • जांभूळ, सीताफळ, चिंचोके, चिक्कू अशा बिया जमा करण्यास सांगाव्या. ताईनेपण बिया गोळा कराव्यात. शाळेत आणून त्या बिया लावण्यास प्रोत्साहन द्यावे. • खड्डे अगोदरच खणून ठेवावे. रोज पाणी घालण्यास सांगावे. एखादे बालक आजारी असेल तर ते लक्षात आणून द्यावे व त्याच्या झाडाला पाणी कोण घालणार म्हणून बालकांना पाणी घालण्याची संधी द्यावी.	• बालकांना परिसरातील दोन तीन झाडे ओळखण्यास मदत करावी. झाडाचे वेगवेगळे भाग, उपयोग, त्याला वाढायला काय लागते याची बालकांना ओळख करून द्यावी.	• ३ ते ५ वर्षे वयोगटाच्या कृती करून घ्याव्या. बालकांना झुडूप, मोठे झाड, रोप, वेल यातील फरकाची ओळख करून द्यावी. • बालकांना झाडाचे, त्याच्या भागांचे चित्र काढण्यास प्रोत्साहित करावे. झाडाची काळजी कशी घ्यावी याबाबत, शेताबाबत बालकांशी चर्चा करावी.
पंचकोश		
मनोमय व विज्ञानमय कोश		
विविधता	• वेगवेगळ्या प्रकारच्या झाडांची चित्रे दाखवावीत. • झाडाची काळजी कशी घ्यावी याबाबत गप्पा-गोष्टी कराव्यात. झाडांचे संगोपन संवर्धन करण्यास प्रोत्साहन घावे. • परसबाग तयार करावी.	
थीम/विषय	वनस्पती (फुले, शेती, रंग)	

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">–</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-4 बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात म्हणजे त्यांनी स्वत:च्या भावना समजून घेऊन त्यांचे व्यवस्थापन करण्याची आणि सामाजिक नियमांना सकारात्मक प्रतिसाद देण्याची क्षमता होय.
C 4.6 गरजेच्या वेळी इतरांना (प्राणी आणि वनस्पतीसह) मदत करतो आणि दयाभाव दर्शवितो.
CG-6 बालके स्वतः भोवतालच्या नैसर्गिक वातावरणाबद्दल कृतज्ञताभाव दर्शवितात.
C 6.1 सर्व प्रकारच्या जीवांची काळजी घेतो व त्यांच्यासोबत राहण्याबाबत आनंद प्रकट करतो.
अ) LO- 6.1.1 वनस्पती आणि प्राण्यांचे निरीक्षण करताना कुतूहल दर्शवितो.
ब) LO- 6.1.1 झाडे आणि प्राणी यांना विनाकारण इजा करत नाहीत.
क) LO-6.1.1.1 स्थानिक वातावरणातील झाडे आणि प्राणी यांच्या सहवासात आनंद व्यक्त करतो.</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये</td><td colspan="2">आपुलकी, प्रेम व दयाभाव निर्माण होतो. जबाबदारीची जाणीव होते. सेवावृत्ती/मदत/सहकार्य</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">बालके पशु, पक्षी प्रौढ इतर बालके यांच्याशी प्रेमाने आपुलकीने वागतात का? याचे निरीक्षण करावे.</td></tr>
<tr><td colspan="3">आधारशिला कृती : 97. Scavenger Hunt : Find Objects of Different Colour and/or Shape</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td>रंगीबेरंगी आकारांचा खेळ खेळूया</td><td></td></tr>
<tr><td colspan="3">उपक्रमाला लागणारे साहित्य</td></tr>
<tr><td>विविध आकार, बांगड्या, खोके, झाकण, बटणे, पेन्सिलचे रिकामे खोके.</td><td>विविध आकार, बांगड्या, खोके, झाकण, बटणे, पेन्सिलचे रिकामे खोके.</td><td>लाल त्रिकोण, निळे त्रिकोण, विविध रंगांचे विविध आकार.</td></tr>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>कृती २ :
• वर्तुळ, त्रिकोण, चौकोन या आकारांची ओळख करून द्यावी.</td><td>कृती १ : आकार व वस्तूंची जोडी लावणे.
• बालकांना वर्तुळात बसवावे ताईने ट्रेमध्ये वर्तुळ, त्रिकोण, चौकोन घ्यावे.</td><td>कृती १ : आकाराचा खेळ
• बालकांना वर्तुळात बसवावे.</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
• आकार ओळख करून देतांना त्या आकाराच्या भरपूर वस्तू दाखवाव्यात. वरील कृतींचा सराव झाल्यावर ताईने बालकांना त्यातील फरक विचारावा.	त्याच ट्रेमध्ये बांगड्या, खोके, झाकण, बटणे, त्रिकोणी–पेन्सिलचे रिकामे खोके, समोसा असलेला चित्र, ताटली, लाकडी ठोकळ्यांमधील/रंगोमेट्री तुकडे घ्यावेत. • ट्रेमधील वस्तू बालकांच्या समोर ठेवाव्यात व एका एका बालकाला त्याच्या जोड्या लावायला द्याव्यात. उदाहरणार्थ, वर्तुळ–बांगडी, चौकोन–खोक, वर्तुळ–ताटली इत्यादी. • ताईने सगळ्या बालकांना जोड्या लावण्याची संधी द्यावी. हा खेळ झाल्यावर ताईने बालकांना आकारांची नावे सांगावी. **कृती २ :** • वर्तुळ, चौकोन, त्रिकोण ही आकार सारखेच आहेत का त्यात काही फरक आहे, हे बालकांना विचारावे. काय फरक आहे हे एक एक करून बालकांना विचारावे. • ताईने आकार हातात घेऊन आकरांची ओळख करून द्यावी. चौकानाला ४ टोके आहेत, वर्तुळ आकार घेऊन त्याला टोके नाहीत, हे सांगावे. त्रिकोणी, आकार घेऊन त्याला किती टोके आहेत ते मोजायला सांगावे. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	जमिनीवर एका बाजूला लाल त्रिकोण मांडावे. एका बाजूला निळे त्रिकोण मांडावे. दोन्ही वेगवेगळे मोजायला सांगावे आणि नंतर एकूण त्रिकोण किती आहेत हे मोजायला सांगावे. **कृती २ : आकारांचे तुकडे उचलणे.** • ताईने बालकांना वर्गाच्या बाहेर न्यावे. बालकांना एकमेकांचे हात धरून मोठा वर्तुळ करण्यास सांगावे. वर्तुळ करून झाल्यावर हात सोडण्यास सांगावे. • ताईने बालकांच्या मोठ्या वर्तुळाच्या आत एक लहान वर्तुळ काढून त्याच आकारांचे तुकडे ठेवावेत. खेळ सुरू करण्याआधी सूचना द्याव्यात. • ताईने टाळ्या वाजवायला सुरुवात केली, की मोठ्या वर्तुळावर पळायचे आहे. ताईने टाळ्या वाजवणे बंद केले, की ताईने सांगावे. ३ चौकोन उचला, ४ वर्तुळ, ६ त्रिकोण, २ वर्तुळ अशा प्रकारे हा खेळ पूर्ण करावा. (बालकांच्या संख्येनुसार आकारांचे प्रमाण असावे. किमान १५ ते २० आकारांचे तुकडे घ्यावेत.) बालकांना असे खेळण्यास दिल्यास आकार आणि संख्या नाम लक्षात राहण्यासाठी मदत होईल. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
पंचकोश		
प्राणमय व विज्ञानमय कोश		
विविधता	विविध आकारांच्या वस्तू, वेगवेगळ्या आकाराची खोकी, कोणताही प्रकल्प विषय चालेल लपवण्याच्या वस्तू त्या प्रकल्पाला अनुसरून घ्याव्या. मी, माझा परिसर – घरातील वस्तू ओळखूया.	
थीम/विषय	भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), पक्षी व कीटक, वाहन	
ताईसाठी सूचना	विविध बालकांच्या संख्येनुसार आकारांचे प्रमाण असावे. किमान १५ ते २० आकारांचे तुकडे घ्यावेत. यासंदर्भात वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्याव्यात.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-8** बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात. **C 8.1** एकापेक्षा जास्त गुणधर्मांच्या आधारे वस्तू आणि उपगटात वेगळ्या करतो. अ) **LO- 8.1.1** आकार, लांबी, उंची वजन यांवर आधारित वस्तू दोन गटात वेगळ्या करतो. (लहान–मोठा, लांब–आखूड) ब) **LO- 8.1.1** आकार, लांबी, उंची वजन यांवर आधारित वस्तू तीन गटात वेगळ्या करतो. क) **LO- 8.1.1** गुणधर्मानुसार/गुणधर्मावर आधारित वस्तूंचे गट करतात. **C-8.8** मूलभूत भौमितिक आकार ओळखतात व तयार करतात, त्याचे वर्गीकरण करतात, समजून घेतात आणि समजावून सांगतो. अ) **LO-8.12.1** आकारांची नावे व त्यांचे काही गुणधर्म सांगतो. ब) **LO-8.12.1.1** संख्यानामे आणि आकारांच्या नावांचा उपयोग करून साध्या सूचनांचा अर्थ लावतो. ब) **LO-8.12.1.2** संख्यानामे व आकारांच्या नावांचा योग्य प्रकारे उपयोग करतो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	आकारांची नावे व त्यांचे काही गुणधर्म सांगतात, प्रभावी संवाद, साक्षरता विषयक कौशल्य माहिती, चिकित्सक विचार आकारनामे.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	दिलेले आकार ओळखता येतात का याचे निरीक्षण करावे. परिसरातील दिसलेल्या आकाराचे नाव घेतो का हे बघावे. आकारासंबंधी सांगितलेली कृती अचूक करतो का, आकार आणि वस्तू यांची जोडी लावता येते का, याचे निरीक्षण करावे.	

<table>
<tr><th colspan="3">आधारशिला कृती : 98. Loud or Soft: Identify Sounds,
Distinguish and Create Different Pitch Sounds</th></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">आवाजातील फरक ओळखूया.</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">मोबाईल, स्पीकर्स ग्लास, चमचा, खजिंरी, डफ, घंटा, घुंगरू</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td>कृती : आवाज ओळखा (एकत्रित)
• ताईने मोबाइल आणि स्पीकर्सच्या साहाय्याने प्राणी, पक्षी, वाहने असे विविध आवाज ऐकवावे. आवाज ऐकवून झाल्यावर कोणता आवाज कशाचा आहे, असे ताईने बालकांना विचारावे.
• बालकांना रोज ऐकत असणाऱ्या विविध आवाजांबद्दल ताईने विचारावे आणि आवाज काढून दाखवायला सांगावे. घरी व अंगणवाडीत कोणते आवाज ऐकता हे विचारून प्रसंगाप्रमाणे व्यक्तींच्या आवाजात होणारे बदल समजतात का ते विचारावे.
आवाज ओळखा (प्राणी),
आवाज ओळखा (पक्षी),
आवाज ओळखा (वाहने)</td><td>कृती : आवाज पातळीवर टाळ्या
• वरील साहित्यापैकी कोणतेही साहित्य वापरून ताईने आधी हळू आवाज ऐकवावे.
• त्यानंतर आवाजाची पातळी वाढवून वस्तूचा आवाज ऐकवावा.
• खूप मोठ्या आवाजात वस्तूचा आवाज ऐकवावा.
• ताई वस्तू वापरून ज्या पातळीचा आवाज करेल तो ऐकून बालकांनी त्याच पातळीच्या आवाजात टाळ्या वाजवण्याची कृती करावी.</td><td>कृती : आवाज मध्यम पातळी
• वरीलपैकी एक वस्तू वापरून तीन पातळ्यांमध्ये त्या वस्तूच्या आवाजात ताईने करून दाखवावे.
• मध्यम पातळीचा आवाज ऐकू आला की बालकांनी ताईला आवाज थांबवायला सांगावे.
• आवाज किती अंतरावरून ऐकू येतो याचा अनुभव द्यावा व त्याविषयी चर्चा करावी.</td></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">विज्ञानमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">बालकाचे डोळे रुमालाने बांधावे व वर्गातील इतर बालकांना बोलण्यास सांगून कुणाचा आवाज आहे, हे ओळखण्यास सांगावे. अशी संधी अधिकाधिक बालकांना देता येईल.
घरातील वस्तू वापरून आवाज करावेत.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">मी, माझे कुटुंब, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, वाहन</td></tr>
</table>

<table>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">–</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-2 बालके ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात.
C-2.3 आवाजातील चढ–उतार (आरोह–अवरोह) सूर–ताल–लय यांनुसार आवाजातील फरक ओळखतो.
अ) LO-2.3.1 मानव, प्राणी, वाहने, टाळ्या यांचा आवाज, पाण्याचा आवाज, वस्तूंचा आवाज, इत्यादी वातावरणातील आवाज यातील वेगळेपणा ओळखतो.
ब) LO-2.3.1 पक्षी, प्राणी, वाद्य आणि मानवी आवाज यांच्या आवाजपातळीमधील चढ–उतारातील फरक ओळखतो.
क) LO-2.1 आवाजाच्या पातळीमधील माध्यम स्वर ओळखतो.</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये</td><td colspan="2">श्रवण क्षमता, वर्गीकरण, एकाग्रता</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">• परिसरातील विविध प्रकारचे आवाज ओळखता येतात की नाही हे पाहणे.
• बालके विविध पातळीमधील आवाज ओळखू शकतात की नाही हे पाहणे.
• बालके तीनही पातळीतील आवाज ओळखू शकतात की नाही ते पाहणे.</td></tr>
<tr><td colspan="3">आधारशिला कृती : 99. Clean, Clean, Clean : Learn Why, When and How About Washing Hands</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">स्वच्छता</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">पाणी व हँडवॉश, फ्लॅशकार्ड, हात पुसण्याचा रुमाल.</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td colspan="3">कृती : हातांची स्वच्छता
• हात धुण्याच्या योग्य पद्धतीचे प्रात्यक्षिक करून दाखवावे.
• चित्रफीत किंवा फ्लॅशकार्ड दाखवावे.
• बालकांशी चर्चा करावी.
• शी करून आल्यानंतर इतरांची मदत घेऊन हात धुवायला व पुसायला सांगावे.
• जेवणापूर्वी व नंतर इतरांची मदत घेऊन हात धुवायला व पुसायला सांगावे.</td></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">अन्नमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">• डोळ्यांची स्वच्छता, नाकाची स्वच्छता, पायाची स्वच्छता याचप्रमाणे डोळे, नाक व पाय या इतर अवयवांची स्वच्छता करण्याच्या योग्य पद्धतीचे प्रात्यक्षिक करून दाखवणे.</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
थीम/विषय	मी, माझे कुटुंब व परिसर, पाणी-पाऊस	
ताईसाठी सूचना	यासंदर्भात उपलब्ध हात धुण्याची पद्धतीदर्शक तक्ता वापरावा.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-1** बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात. **C-1.2** स्वतःची मूलभूत काळजी आणि स्वच्छता यांचा अवलंब करतो. **अ) LO-1.2.1** शौचाला जाण्यापूर्वी व नंतर तसेच जेवणापूर्वी व नंतर इतरांची मदत घेऊन हात धुतो आणि पुसतो. **ब) LO-1.2.1** शौचाला जाण्यापूर्वी व नंतर, तसेच जेवणापूर्वी व नंतर हात धुतो आणि पुसतो, या क्रिया स्वत:हून करण्यास सुरुवात करतो. **क) LO-1.2.1** शौचाला जाण्यापूर्वी व नंतर तसेच जेवणापूर्वी व नंतर, नियमितपणे हात धुतो आणि पुसतो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	स्वतःच्या अवयवांची स्वच्छता राखण्याची क्षमता विकसित होईल.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	बालक स्वतःची योग्य पद्धतीने स्वच्छता करत आहे की नाही याचे निरीक्षण करावे व त्याप्रमाणे बदल सुचवावे.	
आधारशिला कृती : 100. Nature Exploration : Categorize pictures/objects in groups		
उपक्रमाचे नाव	परिसरातील प्राणी पक्षी यांची ओळख	
उपक्रमाला लागणारे साहित्य	प्राणी, पक्षी, भाज्या व फळे यांची चित्रकार्डे	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
कृती १ : • ताईने बालकांना अर्धवर्तुळात बसवावे. प्राण्यांची चित्रकार्डे दाखवा. प्राणी आणि पक्षी यांचे वेगवेगळे गट करायला सांगा. बालकांना प्राण्यांची आणि पक्ष्यांची नावे विचारा.	**कृती १ :** • ताईने बालकांना वर्तुळात उभे करावे. पक्षी, प्राण्यांचे चित्रकार्ड बालकांच्या वर्तुळात ठेवावे. ताईने खंजिरी वाजवावी व बालकांनी वर्तुळाबाहेर पळावे. ताईने प्राणी असे म्हणाल्यावर बालकांनी प्राणी असलेले कार्ड उचलावे आणि पक्षी असे म्हणल्यावर बालकांनी पक्ष्याचे चित्र असलेले कार्ड उचलावे. याप्रमाणे प्राणी, पक्षी वेगवेगळे गट करायला सांगा.	सुरुवातीला वयोगट ४ ते ५ मधील कृती करून घ्याव्यात. **कृती १ : चित्र ओळखा, वर्णन करा.** • बालकांना एखादे चित्र दाखवून त्यातील वस्तू, प्राणी, पक्षी ओळखण्यास सांगावे. बालकांना या चित्रातील वस्तूचे अधिक वर्णन करण्यास सांगावे.

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
कृती २ : • फळे/भाज्या यांचे चित्रकार्ड दाखवावे. चित्र बालकांना द्यावे, प्रत्येकाचे नाव सांगा. (कृतीपत्रीका)	**कृती २ : वस्तूवर्णन** • बालकांना परिसरातील विविध वस्तू अथवा त्यांची चित्रे दाखवून त्यांची नावे विचारावी, न आठवल्यास ताईने सांगावी. त्या वस्तू बालक कोठे पाहते? ती वस्तू कोण वापरते? कशासाठी वापरते? याबाबत प्रश्नोत्तरांच्या आणि गप्पांच्या माध्यमातून माहिती विचारावी. • त्या वस्तूच्या आधारे/बाबतीत ताईंनी रोजच्या जीवनात घडलेली एखादी घटना/अनुभव बालकांना सांगून त्यांना त्यांच्या अनुभवांविषयी, आजूबाजूला घडलेल्या घटनांविषयी बोलते करावे. बालकाने सांगितलेल्या (काल्पनिक, प्रत्यक्ष घडलेल्या, दुसऱ्या बालकाचे असूनही स्वतःचे म्हणून सांगितलेल्या) अनुभवांविषयी सकारात्मकता ठेवून ऐकून घ्यावे. • बालकाने सांगितलेल्या अनुभवातील चांगल्या, कृती, सवयी, गोष्टींना प्रोत्साहित करावे. अशाच प्रकारे व्यक्ती चित्रे दाखवून नात्याची काही खास गोष्ट/अनुभव बालकाला विचारावा. बालकाला चित्र दाखवून चित्रातील प्राणी, पक्षी यांचे वर्णन करण्यास सांगावे.	उदाहरणार्थ, **खुर्ची :** खुर्ची लाकडाची किंवा प्लास्टिकची आहे. खुर्ची बसण्यासाठी असते. खुर्ची उंच किंवा बुटकी आहे/मोठी किंवा छोटी आहे. लाल किंवा निळ्या रंगाची आहे. **पोपट :** पोपट हिरवा आहे. पोपटाची चोच लाल आहे. पोपट मिरची, पेरू खातो. पिजंऱ्यातल्या पोपटाला उडता येत नाही, म्हणून त्याला वाईट वाटते. **गाय :** आमची गाय पांढरी आहे. ती हिरवे गवत खाते. ती दूध देते अशाप्रकारे पूर्ण वाक्यांमध्ये बोलण्यास बालकांना प्रोत्साहित करावे.

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
	(आवाज, रंग, चाल इत्यादी) हे प्राणी, पक्षी कुठे दिसतात, कुठे राहतात, काय खातात, कसे खातात हे बालकांना विचारावे आणि योग्य तिथे दुरुस्ती करावी.	
पंचकोश		
मनोमय व विज्ञानमय कोश		
विविधता	• परिसरातील परिचित वस्तू, प्राणी, पक्षी, यांची चित्रकार्डे दाखवून ती काय खातात, कुठे रहातात याची चर्चा करावी. • घटनेची चित्रे दाखवून त्यांनी या प्रकारच्या घटना बघितल्या आहेत का ते विचारावे उदाहरणार्थ, बाजार, दुकान, बस स्टॉप. • विविध व्यक्ती आजोबा, आजी, दादा, ताई, बाळ अशी चित्रे दाखवून तुमच्या घरी कोण आहे ते विचारावे. त्यांच्याबद्दल बोलावे. • क्षेत्रभेट, गोष्ट, चित्रफीत या माध्यमातून कुटुंब याची ओळख करून घ्यावी.	
थीम/विषय	प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक	
ताईसाठी सूचना	ताईने शक्य त्या बाबी प्रत्यक्ष दाखवाव्यात. त्यानंतर उर्वरित बाबी दाखविण्यासाठी संबंधित चित्रकार्डे यांचा वापर करावा.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-7** बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात. **C-7.1** वेगवेगळ्या वर्गातील/गटातील वस्तंमूधील फरक व वस्तूंचा एकमेकाशी संबंध यांचे निरीक्षण करतो व समजून घेतो. **अ) LO-7.1.1** वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी, घटना या इतरांच्या मदतीने नावासहित ओळखतो. **ब) LO-7.1.2** वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी, घटना इत्यादी नावासह ओळखून स्वतः त्याचे वर्णन करतो. **क) LO-7.1.3** लगतच्या परिसरातील वस्तू, व्यक्ती, प्राणी, पक्षी आणि त्यांच्या प्रतिकृती, चित्रे ओळखतो. त्यांची सर्वसाधारण वैशिष्ट्ये सांगतो/वर्णन करतो. (घराचा मोठा दरवाजा)	

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	• बालकांना वस्तू, प्राणी, पक्षी यांची वैशिष्ट्ये कळतात. • बालकांच्या कल्पनाशक्तीचा विकास होतो. • बालकांच्या भाषिक विकासास चालना मिळते. • बालकांच्या स्मरणशक्तीला गती मिळते.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	निरीक्षण करावयाच्या बाबी बालकांच्या स्मरणशक्तीचे, कल्पनाशक्तीचे निरीक्षण करावे. बालकांच्या उच्चारांचे निरीक्षण करावे.	
आधारशिला कृती : 101. All We Use : Match Objects with their Uses		
उपक्रमाचे नाव	वस्तू आणि उपयोग	
उपक्रमाला लागणारे साहित्य		
खडू, पाटी, खोक, वाटी, चमचा	कागद, वही, चटई, झाडू	चमचा, पाटी, कागद, पेन्सिल, पट्टी, वही
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
कृती : • ताईने बालकांना अर्धवर्तुळात बसवावे. ताईने बालकांच्या समोर खडू, पाटी, खोक, वाटी, चमचा या वस्तू ठेवाव्यात. एक वस्तू हातात उचलावी.	**कृती :** • ताईने बालकांना अर्धवर्तुळात बसवावे. ताईने बालकांच्या समोर कागद, वही, चटई, झाडू या वस्तू ठेवाव्यात. एक वस्तू हातात उचलावी. झाडू बालकांना दाखववावा आणि हा झाडू तुम्ही कशासाठी वापरता हे विचारावे. वर्ग, घर, जमिन झाडण्यासाठी वापरतो असे सांगतील.	**आवश्यक पूर्वज्ञान/पूर्वतयारी :** बालकांना वस्तूंचा वापर माहिती आहे. **कृती : गप्पा** • बालकांना वस्तू परिचय देताना वस्तूचे उपयोग सांगावे. आणखी कोणते उपयोग बालकांना माहीत आहेत ते त्यांना विचारून घ्यावे. • सरावाच्या वेळी निरनिराळ्या वस्तू कशासाठी वापरतात ते विचारावे. वस्तूंची नावे : चमचा, पाटी, कागद, पेन्सिल, पट्टी, वही इ.

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
• खडू बालकांना दाखवावा आणि हा खडू तुम्ही कशासाठी वापरता हे विचारावे. बालक खडू आपण फळ्यावर चित्र काढायला, जमिनीवर चित्र काढायला वापरतो. याप्रमाणे बालकांना एक एक करून वस्तू दाखवाव्या आणि त्या आपण कशासाठी वापरतो हे विचारावे.	• याप्रमाणे बालकांना एक एक करून वस्तू दाखवाव्यात आणि त्या आपण कशासाठी वापरतो हे विचारावे.	

पंचकोश

विज्ञानमय कोश

विविधता	बालकांना विविध उपयोग सांगून त्यासाठी कोणत्या वस्तू वापरायच्या ते विचारावे उदाहरणार्थ कपडे शिवणे – सुई/दोरा, झोपणे – गादी, उशी, पांघरूण, थंडी वाजत असल्यास – स्वेटर, लिहिण्यासाठी पेन, पेन्सिल इ.
थीम/विषय	वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, मदतनीस.
ताईसाठी सूचना	ताईने उपलब्ध वस्तूंशिवाय इतर उपयोगी वस्तूंची चित्र कार्ड दाखवून त्या वस्तूंच्या उपयोगाविषयी चर्चा करावी.
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-7** बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात. **C-7.1** वेगवेगळ्या वर्गातील/गटातील वस्तूंमधील फरक व वस्तूंचा एकमेकाशी संबंध यांचे निरीक्षण करतो व समजून घेतो. **अ, ब, क) LO-7.1.3.4** वस्तू आणि त्यांचा वापर यांच्यात संबंध निर्माण करतो. (उदा. चमचा खाण्यासाठी, बादली अंघोळीसाठी)
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	• बालकांना वर्गीकरण करता येते. • बालकांना वस्तूंचे उपयोग माहीत होतात. • उपयोगानुसार वस्तूंचे गट बालकांना माहीत होतात. • बालकांना वस्तूंचे अनेक वैशिष्ट्ये माहीत होतात.
निरीक्षण करावयाच्या बाबी	बालके एका वस्तूचे जास्त उपयोग सांगतात याचे निरीक्षण करावे.

<table>
<tr><th colspan="3">आधारशिला कृती : 102. Experiment with Air : Observe what blows in wind and what does not</th></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">हवेचे प्रयोग</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">कागदाचे कपटे, वाटी, साबणाचे पाणी, स्ट्रॉ, कागदाच्या नळ्या</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td>कृती :
• बालकांना नाकाने श्वास घ्यायला सांगून समोर तळहात धरून तोंडाने सोडायला सांगा. तोंडातून हवा बाहेर आली
• नुसती फुंकर मारायला सांगा आणि कागदाचे कपटे उडवायला सांगा.</td><td>कृती :
• बालकांना नाकाने श्वास घ्यायला सांगून समोर तळहात धरून तोंडाने सोडायला सांगा. तोंडातून हवा बाहेर आली.
• प्रत्येकाला छोट्या वाटीत साबणाचे पाणी देऊन स्ट्रॉ किंवा कागदाच्या नळ्या बनवून द्या आणि फुंकर मारून साबणाचे फुगे करायला सांगा.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td><td>कृती :
• बालकांना नाकाने श्वास घ्यायला सांगून समोर तळहात धरून तोंडाने सोडायला सांगा. तोंडातून हवा बाहेर आली.
• प्रत्येकाला छोट्या वाटीत साबणाचे रंग घातलेले पाणी देऊन स्ट्रॉ, कागदाच्या नळ्या बनवून द्या आणि फुंकर मारून वाटीत साबणाचा रंगीत फेस करायला सांगा. तो फेसाचा गोळा उचलून कागदावर टाकायला सांगा. ते फेसाचे फुगे फुटले की त्या जागी साबणाच्या फुग्यांची रंगीत नक्षी तयार होते.</td></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">प्राणमय व विज्ञानमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">• रुमाल धुऊन वाळत घालायला सांगणे. ते हलतात कसे त्याचे निरीक्षण करायला सांगणे. का हलत असतील ? असे बालकांना विचारावे. नंतर ताईंनी हळूहळू संवादातून सांगावे की हवा सगळीकडे आहे ती हलली की त्याला वारा म्हणतात. त्यामुळे कपडे वाळतात.
• फुगा, पतंग का उडतात ?
• कागदाचे भिरभिरे हातात धरून पळत गेले, की का फिरते ? असे प्रयोग करून घ्यावे.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">मी, माझे कुटुंब व परिसर, वाहन</td></tr>
</table>

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">प्रयोग करत असताना आधीच उत्तरे सांगू नयेत. बालकांशी संवाद साधून, उत्तरे शोधून काढायला लावावीत.</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-2 बालके ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात.
C-2.6 अनुभवांची सर्वंकष जाणीव होण्याकरता, ज्ञानेंद्रियांमार्फत प्राप्त संवेदनांचे एकात्मीकरण करण्यास सुरुवात करतो.
अ) LO-2.6.1 जोराने श्वास बाहेर सोडणे. (उच्छ्वास)
ब) LO-2.6.1 हलक्या वस्तू जोरात फुंकर घालून उडवतो. उदा. कागद
CG-7 बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात.
C-7.2 निसर्गाच्या निरीक्षणातून कार्यकारणभाव समजून घेऊन, तो दर्शवणारी साधी परिकल्पना मांडतो व त्याच्या स्पष्टीकरणाकरता/पडताळणीकरता निरीक्षणाचा आधार घेतो.
क) LO-7.2.1.3 कार्यकारणभाव जोडतो. (उदा. अब्दुल आजारी असल्यामुळे तो शाळेत आला नाही, पाऊस न पडल्यामुळे रोप जगले नाही.)</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये</td><td colspan="2">तार्किकशक्ती विकसन, निरीक्षण क्षमता, कार्यकारणभाव विकसन</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">प्रयोग समजला आहे का, तो सांगता येतो का, प्रयोग करता येतो का याचे निरीक्षण करावे.</td></tr>
<tr><td colspan="3">आधारशिला कृती : 103. Sorting Activity : Sort basis colour, shape, size and other criteria</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">रंग व आकारांचे वर्गीकरण</td></tr>
<tr><td colspan="3">उपक्रमाला लागणारे साहित्य</td></tr>
<tr><td>वेगवेगळ्या रंगांच्या वस्तू विविध रंग व मापांचे आकार</td><td>उंच आणि बुटक्या आणि मोठ्या एकाच प्रकारच्या बाटल्या, वेगवेगळे द्विमितीय आकार (लहान व मोठे) त्रिकोण, चौरस, आयत, वर्तुळ यांचे कटआऊट/कार्डे, त्रिमितीय आकार वेगवेगळ्या आकारांचे चेंडू, खोकी, लहान–मोठ्या शंकूच्या टोप्या, विविध मापाच्या, रंगाच्या आकारांच्या, परिसरातील वस्तू.</td><td>वेगवेगळे रंग आणि आकार असणारे कटआऊट किंवा कार्ड, लाल, पिवळ्या, निळ्या रंगाचे, विविध मापाचे त्रिकोण, चौकोन, (फोम किंवा रंगोमेट्रीमधील)</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
कृती १ : पळा पळा थांबा. • बालकांना वर्गात वेगवेगळ्या रंगांच्या वस्तू द्याव्यात किंवा घरून एकेका बालकाला एकेक रंगाची वस्तू आणायला सांगावी. त्या वस्तू वर्गात विखरून ठेवाव्यात. • पळा पळा पळा थांबा हा खेळ घेऊन बालके थांबल्यावर त्यांना एका रंगाचे नाव सांगून त्या रंगाच्या वस्तू एका वर्तुळात ठेवायला सांगाव्या. • सर्वांनी वर्तुळात त्या रंगाच्या वस्तू ठेवल्यावर त्या परत वर्गात विखरून ठेवाव्या. पुन: खेळ सुरू करून दुसरा रंग सांगावा. **कृती २ : पळा पळा थांबा – अनेकातील एक गुणधर्म** • बालकांना वर्तुळात उभे करावे. बालकांच्या हातात आकार द्यावेत. • विविध आकार बालकांना देऊन, त्यांना वर्तुळात फिरायला सांगावे.फिरताना जो आकार दाखविला जाईल, तो आकार असलेल्या बालकांनी गट करावा. याचप्रमाणे विविध रंगाचे आकारही बालकांना देता येतील. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	**कृती १ : वर्गीकरण – उंची** • सगळ्या बाटल्या एकत्र ठेवाव्यात व बालकाला एक बाटली वेगळी करून दाखवावी व यासारख्या दुसऱ्या बाटल्या काढून दाखवायला सांगाव्यात. • बाटलीची उंची लक्षात येण्यासाठी आपण काढलेली बाटली हाताळायला द्यावी. **वर्गीकरण :** भौमितिक आकारासारख्या दिसणाऱ्या, मात्र वेगळ्या मापाच्या आकारांचे कटआऊट किंवा कार्डे बालकांपुढे मांडावीत. उदा. लहान–मोठ्या आकारांचे त्रिकोण, लहान–मोठ्या आकारांचे चौरस, लांबी आणि रुंदीचे गुणोत्तर सारखे असलेले वेगवेगळ्या मापांचे आयत, सर्व त्रिकोण किंवा दुसरा एखादा आकार असणारी सर्व कार्डे एकत्र करून, त्यांपैकी एक बाजूला काढावे. बालकांना या मापाची इतर कार्डे काढण्यास सांगावे. **कृती २ : आकारांच्या गप्पा – सारख्या वस्तू** • बालकांना वर्तुळात बसवावे. • विविध मापांचे आकार द्यावे. • बालकाला वस्तू मुक्तपणे हाताळू द्याव्या नंतर एकाच आकाराचे परंतु वेगवेगळ्या मापांचे तुकडे देऊन सारखे आकार एकत्र करण्यास सांगावे.	**कृती १ : शोधूया – रंग आणि आकार** • सर्व कार्डे एकत्र करावीत. बालकांना पुढीलप्रमाणे सूचना द्याव्यात. मला लाल रंगाचा त्रिकोण काढून दे, मला निळ्या रंगाचे वर्तुळ काढून दे, मला पिवळ्या रंगाचा चौकोन काढून दे. **कृती २ : आकारांच्या गप्पा – वेगवेगळ्या वस्तू** • परिसरातील वस्तू गोळा करण्यास सांगावे. यात पाने, फुले, गोट्यांचे तुकडे इ. • गोळा केलेल्या वस्तूंचे गट करण्यास सांगावे. • बालकाला वस्तू मुक्तपणे हाताळू द्याव्या. त्याच वस्तूंचे पुन्हा वेगळ्या निकषांच्या आधारे गट करण्यास सांगावे. जसे, हिरव्या रंगाच्या वस्तू व हिरव्या नसणाऱ्या वस्तू हा एक निकष तसेच झाडाचा भाग असणारी व भाग नसणारी.

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
	• याचप्रमाणे विविध रंगांचे, विविध मापांचे तुकडे देऊन, रंग व आकार एकत्र सांगून सूचनेप्रमाणे गट करण्यास सांगावे. जसे – लाल रंगाचे त्रिकोण एकत्र कर. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	

पंचकोश	
विज्ञानमय कोश	
विविधता	मणी, बिया, काड्या, वस्तूंचे गट करायला द्यावे.
थीम/विषय	भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), मदतनीस, वाहन, प्राणी, पक्षी
ताईसाठी सूचना	कृतिपस्तिकेतील कृती करून घ्यावी.
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-2** बालके ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात. **C-2.1** आकार, रंग आणि त्याच्या छटा यांच्यामधील फरक ओळखतो. **अ) LO 2.1.2** वस्तूंची त्यांच्या रंगांनुसार विभागणी, गट करतो. उदाहरणार्थ, सगळ्या लाल वस्तू एकत्रित करतो. **ब) LO 2.1.2** लांबी, रुंदी, उंची या त्रिमितींच्या आधारावर वस्तूंचे गट करतो. **क) LO 2.1.2** रंग आणि आकार यांच्या वैशिष्ट्यांनुसार वस्तूंचे गट करतो. जसे – सगळे लाल त्रिकोण, सर्व मोठी हिरवी पाने एकत्र करतो. **CG-8** बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत, जग समजून घेऊ शकतात. **CG-8.8** मूलभूत भौमितिक आकार ओळखणे आकार व मापे यांचा वापर करत, जग समजून घेऊ शकतात. **अ) LO 8.8.1** आकार, माप किंवा रंग यांपैकी एका वैशिष्ट्यानुसार जोड्या लावतो. **अ) LO 8.8.2** आकार, रंग आणि माप यांसारख्या एका घटकाद्वारे तुलना आणि वर्गीकरण करतो.

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td></td><td colspan="2">ब) LO 8.8.1 भिन्न माप आणि रंग यांच्याआधारे आकारांच्या जोड्या लावतो.
ब) LO 8.8.2 दोन घटकांनुसार वस्तूंची तुलना आणि वर्गीकरण करतो.
ब) LO 8.8.3 विविध घनाकृती/आकार यांच्या भौतिक वैशिष्ट्यांचे त्याच्या स्वतःच्या भाषेत वर्णन करतो.
क) LO 8.8.1.2 तीन घटकांनुसार वस्तूंची तुलना आणि वर्गीकरण करतो. (आकार, माप, रंग)</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये</td><td colspan="2">संभाषण, वर्गीकरण, विश्लेषण, निर्णय क्षमता, तर्क क्षमता, कार्यकारणसंबंध, रंगज्ञान, शोधकवृत्ती, आकार, आकारमान, रंग यांपैकी एका वैशिष्ट्यानुसार जोड्या लावणे, तुलना करणे, वर्गीकरण करणे ही कौशल्ये विकसित होण्यासाठी मदत होईल. चिकित्सक विचार, समस्या निराकरण, दोन घटकांनुसार वस्तूंची तुलना आणि वर्गीकरण करणे ही कौशल्ये विकसित होण्यास मदत होईल.</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">दिलेल्या वस्तूंच्या समूहामधून विशिष्ट रंगाची वस्तू बालक वेगळी करू शकते का?, विशिष्ट रंगाच्या वस्तूंचा एक गट तयार करता येतो का? विविध आकार ओळखतो का? रंगानुसार आकाराचे वर्गीकरण करतो का? बालके सूचना समजून सूचनांचे पालन करतात का? वर्ग स्तरावर विविध कृती घेताना सूचना समजून घेतात का? वर्गीकरण करताना विविध गुणधर्मांचा विचार करतात का? बालके सूचनेनुसार तीन गुणधर्मांचा विचार करून, वस्तू देतात का? ते बघावे.</td></tr>
<tr><td colspan="3">आधारशिला कृती : 103.1 Sorting Activity : Sort basis colour, shape, size and other criteria</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">त्रिमितीय आकारांचे गट करूया</td></tr>
<tr><td colspan="3">उपक्रमाला लागणारे साहित्य</td></tr>
<tr><td colspan="3">मणी, दगड, रंगीत मणी (वेगवेगळ्या आकाराच्या त्रिमितीय वस्तू उदा. वेगवेगळ्या आकाराचे चेंडू, शंकूच्या टोप्या, विविध रंगाचे व आकाराचे तुकडे) विविध रंगाचे त्रिकोण, चौकोन व वर्तुळाकार आकारांचे कागदाचे/कापडाचे/कार्डबोर्डचे तुकडे.</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td>कृती १ : गट करूया.
• तीन-चार बालकांना गटात बसवावे. प्रत्येक गटात वस्तू द्याव्यात.</td><td>कृती १ : वर्गीकरण - त्रिमितीय आकार
• वेगवेगळ्या आकारांच्या त्रिमितीय वस्तू एकत्र कराव्यात.</td><td>कृती १ : आकाराचे खेळ - वर्गीकरण
• तीन रंग : लाल, पिवळा, हिरवा</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
• एका भांड्यात मणी व दगड एकत्र करून बालकांपुढे ठेवावे. मग मणी व दगड वेगळे करण्यास सांगावे. • गट करूया – रंगीत मण्यांचे वेगवेगळ्या रंगांप्रमाणे वेगवेगळे गट करण्यास सांगावे. काही दिवसांच्या सरावानंतर बालके आपले आपण गट करतील. त्यानंतर हा गट कशाचा? याप्रमाणे प्रश्न विचारून कशानुसार गट केला हे बालकांना विचारावे.	उदा : वेगवेगळ्या आकारांचे चेंडू, खोकी, लहान मोठ्या शंकूंच्या टोप्या. • आपण एक वस्तू काढून दाखवावी व त्याच आकाराच्या व मापाच्या दुसऱ्या वस्तू काढून दाखवण्यास सांगावे. **कृती २ : वर्गीकरण – दोन गुणधर्म** • खेळणी • बालकांना वर्तुळात बसवावे. • विविध मापांचे आकार द्यावेत. • एकाच आकाराचे, परंतु वेगवेगळ्या मापांचे तुकडे देऊन, सारखे आकार एकत्र करण्यास सांगावे. • याचप्रमाणे विविध रंगांचे विविध मापांचे तुकडे देऊन रंग व आकार एकत्र सांगून, सूचनेप्रमाणे गट करण्यास सांगावे. जसे – लाल रंगाचे त्रिकोण एकत्र कर.	तीन आकार : चौकोन, त्रिकोण, वर्तुळ, आकारमान लहान, मध्यम, मोठा असे तुकडे घ्यावेत. बालकांना वर दाखवल्याप्रमाणे एकत्र करून द्यावेत. त्यावरून एक एक सूचना द्यावी. उदा. पिवळ्या रंगाचा लहान गोल शोधा. हिरव्या रंगाचा सर्वांत मोठा त्रिकोण शोधा. लाल रंगाचा सगळ्यात लहान चौकोन शोधा. • याप्रमाणे सूचना द्याव्यात व वर्गीकरण खेळ घ्यावा. याप्रमाणे कृती करण्यासाठी ताईने प्रत्येक बालकाला संधी द्याव्या. • बालकांना या सूचना समजत नसतील, तर फक्त रंग आणि आकार सांगावा. उदा. लाल वर्तुळ दे, हिरवा त्रिकोण दे, पिवळा चौकोन दे.

पंचकोश	
विज्ञानमय कोश	
विविधता	मणी, बिया, काड्या, वस्तू यांचे गट करायला द्यावे.
थीम/विषय	वाहन
ताईसाठी सूचना	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-2** बालके ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात. **C-2.1** आकार, रंग आणि त्याच्या छटा यांच्यामधील फरक ओळखतो. **अ) LO 2.1.1** वस्तूंची त्यांच्या रंगांनुसार विभागणी, गट करतो. उदाहरणार्थ, सगळ्या लाल वस्तू एकत्रित करतो. **ब) LO 2.1.2** लांबी, रुंदी, उंची या त्रिमितींच्या आधारावर वस्तूंचे गट करतो.

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
	क) LO 2.1.2 रंग आणि आकार यांच्या वैशिष्ट्यांनुसार वस्तूंचे गट करतो. जसे – सगळे लाल त्रिकोण, सर्व मोठी हिरवी पाने एकत्र करतो. **CG-8** बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत, जग समजून घेऊ शकतात. **CG-8.8** मूलभूत भौमितिक आकार ओळखणे आकार व मापे यांचा वापर करत, जग समजून घेऊ शकतात. **ब) LO 8.8.1.3** विविध घनाकृती/आकार यांच्या भौतिक वैशिष्ट्यांचे त्याच्या स्वतःच्या भाषेत वर्णन करतो. **क) LO 8.8.1.2** तीन घटकांनुसार वस्तूंची तुलना आणि वर्गीकरण करतो. (आकार, माप, रंग) **अ) LO 8.8.1.1** आकार, माप किंवा रंग यांपैकी एका वैशिष्ट्यानुसार जोड्या लावतो. **अ) LO 8.8.1.2** आकार, रंग आणि माप यांसारख्या एका घटकाद्वारे तुलना आणि वर्गीकरण करतो. **ब) LO 8.8.1.1** भिन्न माप आणि रंग यांच्याआधारे आकारांच्या जोड्या लावतो. **ब) LO 8.8.1.2** दोन घटकांनुसार वस्तूंची तुलना आणि वर्गीकरण करतो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	संभाषण, वर्गीकरण, विश्लेषण, निर्णय क्षमता, तर्क क्षमता, कार्यकारण संबंध, रंगज्ञान, शोधकवृत्ती, आकार, आकारमान, रंग यांपैकी एका वैशिष्ट्यानुसार जोड्या लावतो, तुलना करतो, वर्गीकरण करतो, साक्षरताविषयक कौशल्य माहिती, चिकित्सक विचार, समस्या निराकरण, दोन घटकानुसार वस्तूंची तुलना आणि वर्गीकरण करतो, चिकित्सक विचार, सर्जनशील विचार, तीन घटकांनुसार वस्तूंची तुलना आणि वर्गीकरण करतो.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	दिलेल्या वस्तूंच्या समूहामधून, विशिष्ट रंगाची वस्तू वेगळी करू शकतो का ते पहावे. विशिष्ट रंगाच्या वस्तूंचा एक गट तयार करता येतो का ते पहावे. विविध आकार ओळखतो का? याचे निरीक्षण करावे. रंगानुसार आकाराचे वर्गीकरण करतो का? याचे निरीक्षण करावे. बालके सूचना समजून सूचनांचे पालन करतात का? याचे निरीक्षण करावे. वर्ग स्तरावर विविध कृती घेताना, सूचना समजून घेतात का?	

आधारशिला कृती : 104. Means of Transport : Identify, Describe and Compare		
उपक्रमाचे नाव	वाहतुकीचे साधन	
उपक्रमाला लागणारे साहित्य	वाहनाची चित्रकार्डे	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
कृती : • वाहन परिचय कृतीची पद्धत बालकांसमोर विविध वाहनांची चित्रे ठेवावी. एकेक चित्र दाखवून त्याचे नाव विचारावे. त्याचा रंग, ते वाहन कुठे पाहिले आहे, कशासाठी वापर करतात असे प्रश्न विचारावे.	**कृती : गट करूया.** • बालकांसमोर विविध वाहनांची चित्रे ठेवावी. आकाशातून जाणारी, रस्त्यावर चालणारी आणि पाण्यातून जाणारी वाहने असे गट करण्यास सांगावे. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	**कृती : कोणते वाहन वापरूया.** • बालकांना प्रसंग सांगावा आणि अंतर, लोकांची संख्या यांचा विचार करून, कोणत्या वाहनाने लवकर जाता येईल असा खेळ खेळावा. उदा– तीन माणसांना गव्हाची पोती घेऊन, एका गावातून शेजारच्या गावी जायचे आहे. त्यांनी कोणत्या वाहनाचा वापर केला पाहिजे.
पंचकोश		
विज्ञानमय कोश		
विविधता	नवीन वाहनांचा परिचय देऊन, विविधता आणता येईल.	
थीम/विषय	वाहन	
ताईसाठी सूचना	ताईने यासाठी आवश्यकतेनुसार वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्याव्यात.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-7** बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात. **C-7.1** वेगवेगळ्या वर्गांतील/गटांतील वस्तंमूधील फरक व वस्तंचू एकमेकांशी संबंध यांचे निरीक्षण करतो व समजून घेतो. **अ) LO-7.1.1** वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी, घटना इ. इतरांच्या मदतीने या नावासहित ओळखतो. **ब) LO-7.1.1** वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी, घटना, इ. नावासहित ओळखून, स्वत: त्याचे वर्णन करतो. **क) LO-7.1.1** लगतच्या परिसरातील वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी आणि त्यांच्या प्रतिकृती, चित्रे ओळखतो, त्यांची सर्वसाधारण वैशिष्ट्ये सांगतो/वर्णन करतो. (उदा. घराचा मोठा दरवाजा)	

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	शब्दसंपत्ती, तार्किक विचार	
निरीक्षण करावयाच्या बाबी	वाहनांची नावे सांगता येत आहेत का, तसेच त्यांचे उपयोग माहीत आहेत का हे पाहावे.	
आधारशिला कृती : 105. How my family looks! : Draw, Paint, Create Using Clay		
उपक्रमाचे नाव	हे आहे माझे कुटुंब.	
उपक्रमाला लागणारे साहित्य	कागद, खडू, रंगीत क्रेआॅन	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
• चित्रवाचन – कुटुंबाचे चित्र दाखवून बालकांशी गप्पा – गोष्टी कराव्यात त्यांना बोलते करावे. चित्रावरून त्यांच्या कुटुंबाविषयी त्यांना प्रश्न विचारावे. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	**कृती : कुटुंबाचे चित्र काढूया.** **कृतीची पद्धत :** • बालकांना कागद खडू द्यावे. घरातील सदस्यांचे चित्र काढण्यास सांगावे. चित्र काढताना नाक, कान डोळे काढण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. • बालकांनी काढलेली चित्रे समजून घेऊन, त्या चित्रांना नावे द्यावीत, तसेच बालकांशी घरातील सदस्यांबद्दल गप्पा माराव्यात. घरात एकूण किती माणसे आहेत? कोण कोण राहते? घरात सगळ्यात मोठे कोण आहे? सगळ्यात लहान कोण आहे? इत्यादी. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	**कृती : कुटुंबाचे चित्र काढूया.** **कृतीची पद्धत :** • बालकांना कागद खडू द्यावे. घरातील सदस्यांचे चित्र काढण्यास सांगावे. चित्र काढताना नाक, कान, डोळे काढण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. बालकांनी काढलेली चित्रे समजून घेऊन, त्या चित्रांना नावे द्यावी, तसेच बालकांशी घरातील सदस्यांबद्दल गप्पा माराव्यात, तसेच घरी कोणते पदार्थ केले जातात? तुम्ही कोणते सण साजरे करता? आईनी/ बाबांनी केलेला कोणता पदार्थ सगळ्यात जास्त आवडतो? इ.
पंचकोश		
मनोमय कोश		
विविधता	विस्तारित कुटंबातील सदस्यांचा समावेश करून विविधता आणता येईल.	

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
थीम/विषय	मी, माझे कुटुंब व परिसर.	
ताईसाठी सूचना	ताईने यासाठी आवश्यकतेनुसार, वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिकेचा वापर करावा.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-4** बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात. **C-4.1** कुटुंब आणि समाजाचा एक घटक या नात्याने, स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्वतःला ओळखायला सुरुवात करतो. **अ) LO -4.1.1** स्वत:ची स्वतंत्र व्यक्ती (unique) म्हणून ओळख दर्शवतो आणि आवड सांगतो (उदा. आवडता शर्ट, बॅग, वस्तू.) **ब, क) LO -4.1.1** स्वत:ला कुटुंब, शेजारी, शाळा आणि शहर यांचा एक घटक म्हणून ओळखतो, जिथे वेगवेगळ्या भूमिका निभावत असतो. **C-4.3** इतर बालके आणि प्रौढ यांच्याशी सहजतेने संवाद साधतो. **अ, ब) LO -4.3.1.1** कुटुंबातील जवळच्या/ठरावीक सदस्यांना ओळखतो, नावे सांगतो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	संभाषण, लेखनपूर्व तयारी.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	बालकाला कुटुंबाविषयी बोलता येते की नाही, तसेच भावना व्यक्त करता येतात की नाही हे पाहावे.	

आधारशिला कृती : 106. Nature Walk : Sort and classify different objects

उपक्रमाचे नाव	परिसरातील वस्तूंचे गट करूया.	
उपक्रमाला लागणारे साहित्य	परिसरातील विविध आकार, कमी–जास्त वजनाच्या वस्तू जसे – दगड, पाने, फुले, काड्या इ.	

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
कृती : गट करूया. • बालकांना वर्गाबाहेर घेऊन जावे. विविध वस्तू गोळा करायला सांगाव्या. गोळा केलेल्या वस्तूंचे दगड, पाने, काड्या असे विविध गट करण्यास सांगावे.	**कृती : गट करूया.** • परिसरातील विविध आकारमानाच्या म्हणजे लहान–मोठ्या वस्तू गोळा कराव्यात. गोळा केलेल्या वस्तूंमधून लहान आणि मोठ्या वस्तू ओळखून, गट करण्याचा खेळ घ्यावा.	**कृती : गट करूया.** • परिसरातील विविध वजन असणाऱ्या वस्तू द्याव्यात. त्यांतून सर्वांत जड व सर्वांत हलकी वस्तू कोणती हे ओळखून गट करण्याचा खेळ घ्यावा.

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
पंचकोश		
विज्ञानमय कोश		
विविधता	• फुले, पाने यांच्या रंगांनुसार, आकारमानानुसार वर्गीकरण. • फुले त्यांच्या वासानुसार • पाने त्यांच्या स्पर्शानुसार • दगड त्यांच्या स्पर्शानुसार, आकारमानानुसार	
थीम/विषय	पाऊस–पाणी, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), प्राणी (पाळीव व जंगली), पक्षी व कीटक	
ताईसाठी सूचना	–	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-8** बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत, जग समजून घेऊ शकतात. **C-8.1** एकापेक्षा जास्त गुणधर्मांच्या आधारे, वस्तू गटात आणि उपगटात वेगळ्या करतो. **अ) LO-8.1.1** आकार, लांबी, उंची, वजन यांवर आधारित वस्तू दोन गटांत वेगळ्या करतो. (लहान–मोठा, लांब–आखूड) **ब) LO-8.1.1** आकार, लांबी, उंची व वजन यांवर आधारित वस्तू तीन गटांत वेगळ्या करतो. (लहान आकाराचे, मोठ्या आकाराचे, अधिक मोठ्या आकाराचे) **क) LO-8.1.1** गुणधर्मांनुसार/गुणधर्मावर आधारित वस्तूंचे गट करतो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	वर्गीकरण, तार्किक विचार	
निरीक्षण करावयाच्या बाबी	परिसरातील वस्तूंचे वर्गीकरण करता येते की नाही हे पाहणे.	
आधारशिला कृती : 107. Animals, insects and birds around me : Identify, Name and Describe		
उपक्रमाचे नाव	परिसरातील प्राणी, पक्षी व कीटक जाणून घेऊया.	
उपक्रमाला लागणारे साहित्य	प्राणी, पक्षी, कीटक यांचे चित्र किंवा चित्रकार्ड	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
कृती : प्राणी, पक्षी, कीटक परिचय. • प्राणी,पक्षी, कीटक यांची चित्रे बालकांना वेगवेगळ्या दिवशी दाखवावी.	**कृती : गट करूया.** • बालकांसमोर पक्षी प्राणी कीटक यांची चित्रे एकत्रित ठेवावी. • चित्रांचे तीन गट करण्यास सांगावे.	**कृती : फरक सांगूया.** • बालकांसमोर प्राणी, पक्षी, कीटक यांची चित्रे ठेवावी. त्यांच्या दिसण्यामध्ये काय फरक आहे ते विचारावे.

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
• त्यांची नावे, रंग यांबद्दल चर्चा करावी.	• काय विचार करून चित्रांचे तीन गट केले, यावर चर्चा करावी. • प्राणी, पक्षी कीटक यांच्या गुणवैशिष्ट्यांच्या आधारे गट करण्यासाठी मार्गदर्शन करावे.	आपल्याला त्यांचा उपयोग कसा होतो? माणूस आणि प्राणी, पक्षी, कीटक यांच्यामध्ये काय फरक आहे? अशी चर्चा करावी. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**

पंचकोश	
विज्ञानमय कोश	
विविधता	परिसरातील वेगवेगळे निरीक्षण
थीम/विषय	प्राणी (पाळीव व जंगली), पक्षी व कीटक,
ताईसाठी सूचना	ताईने यासाठी आवश्यकतेनुसार, वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-7** बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात. **C-7.1** वेगवेगळ्या वर्गांतील/गटांतील वस्तंमूधील फरक व वस्तूंचा एकमेकांशी संबंध यांचे निरीक्षण करतो व समजून घेतो. **अ) LO-7.1.1** वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी, घटना इ. इतरांच्या मदतीने नावासहित ओळखतो. **ब) LO-7.1.1** वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी, घटना इ. नावासहित ओळखून, स्वत: त्याचे वर्णन करतो. **क) LO-7.1.1** लगतच्या परिसरातील वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी आणि त्यांच्या प्रतिकृती ओळखतो, त्यांची सर्वसाधारण वैशिष्ट्ये सांगतो/वर्णन करतो. (उदा. घराचा मोठा दरवाजा)
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	गट करता येणे. गट केल्यानंतर त्याचे निकष सांगता येणे. फरक सांगता येणे.
निरीक्षण करावयाच्या बाबी	गट करता येतात की नाही. गट केल्यानंतर त्याचे निकष सांगतात की नाही, फरक सांगता येतो की नाही हे पाहणे.
आधारशिला कृती : 108. Roll and Slide : Predict, Experiment, Find out	
उपक्रमाचे नाव	घसरणे आणि घरंगळणे.
उपक्रमाला लागणारे साहित्य :	चेंडू, पेन, पेन्सिल, रबर, ठोकळा, सेल, बाटली, वेगवेगळ्या आकाराच्या वस्तू, फळी किंवा मोठी पाटी.

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>कृती :
• परिसरातील वेगवेगळ्या प्रकारच्या लहान–लहान वस्तू बालकांना देऊन फळीवरून सोडायला सांगाव्यात आणि त्याचे निरीक्षण करू द्यावे. असे दोन–तीन वेळा झाल्यावर ताईने स्वत: त्या वस्तू सोडून ही वस्तू घसरली की घरंगळली ते सांगावे.</td><td>कृती :
• परिसरातील वेगवेगळ्या प्रकारच्या लहान–लहान वस्तू बालकांना देऊन फळीवरून सोडायला सांगाव्यात आणि त्याचे निरीक्षण करू द्यावे. वस्तू सोडून झाल्यावर ही वस्तू घसरली की घरंगळली ते विचारावे, सगळ्यात शेवटी त्याचे दोन गटात वर्गीकरण करायला सांगावे. (घसरलेल्या वस्तू व घरंगळलेल्या वस्तू)
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td><td>कृती :
• परिसरातील वेगवेगळ्या प्रकारच्या लहान–लहान वस्तू बालकांना देऊन फळीवरून सोडायला सांगाव्यात आणि त्याचे निरीक्षण करू द्यावे.
• वस्तू सोडून झाल्यावर ही वस्तू घसरली की घरंगळली ते विचारावे, सगळ्यात शेवटी त्याचे दोन गटात वर्गीकरण करायला सांगावे.
(घसरलेल्या वस्तू व घरंगळलेल्या वस्तू) व अशा परिसरातील अजून कोणत्या कोणत्या गोष्टी फळीवरून घसरतील/घरंगळतील. ते अंदाजाने सांगण्यास सांगावे. शंका असल्यास परत प्रत्यक्ष अनुभव घ्यायला द्यावा.</td></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">विज्ञानमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">बालकांना घरी असा प्रयोग विविध वस्तूंच्या माध्यमातून करून पाहण्यास सांगावे. घसरलेल्या वस्तू व घरंगळलेल्या वस्तू यांची नावे विचारावीत तसेच एखादी वस्तू का घरंगळली असेल यावर चर्चा करावी.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">मी, माझे कुटुंब व परिसर, वाहन (आकार)</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">ताईने यासाठी आवश्यकतेनुसार वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्याव्यात.</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-7 बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात.
C-7.2 निसर्गाच्या निरीक्षणातून कार्यकारणभाव समजून घेऊन, तो दर्शवणारी साधी परिकल्पना मांडतो व त्याच्या स्पष्टीकरणाकरता/पडताळणीकरता निरीक्षणाचा आधार घेतो.</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
	क) LO -7.2.1.2 वस्तूंवरील साध्या क्रियांचे परिणाम स्पष्ट करतो. (उदा. चेंडूला जोरात लाथ मारल्यावर तो पुढे जाईल.) क) LO -7.2.1.3 कार्यकारणभाव जोडतो. (उदा. अब्दुल आजारी असल्यामुळे तो शाळेत आला नाही, पाणी न मिळाल्यामुळे रोप जगले नाही.) क) LO -7.2.2 निरीक्षण करून सामान्यीकरण करतो. (उदा. वर्तुळ फिरणाऱ्या वस्तूंचे अवलोकन/निरीक्षण करतो. चाके, बांगड्या यांचा आकार वर्तुळाकार असतो.) CG-8 बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार, मापे यांचा वापर करत, जग समजून घेऊ शकतात. C-8.1 एकापेक्षा जास्त गुणधर्मांच्या आधारे, वस्तू गटात आणि उपगटात वेगळ्या करतो. अ) LO -8.1.1 आकार, लांबी, उंची व वजन यांवर आधारित वस्तू, दोन गटांत वेगळ्या करतो. (लहान–मोठा, लांब–आखूड)	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	बौद्धिक विकास, घसरणे – घरंगळणे ही संकल्पना समजणे.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	बालके गुणधर्मांनुसार वर्गीकरण करतात का, याचे निरीक्षण करावे.	
आधारशिला कृती : 109. What am I feeling? : Talk, Label, Understand Emotions		
उपक्रमाचे नाव	माझ्या भावना	
उपक्रमाला लागणारे साहित्य		
(चित्रकार्ड, विविध भाव दर्शवणारी बालकांची चित्रे)	विविध भाव दर्शवणारी चित्रकार्डे (बालकांच्या संख्येनुसार)	गोष्ट, चित्रे
कृती : गंमत बोल • ताईंनी बालकांना अर्धवर्तुळात बसवावे. • खेळ : ताई : मसालेभात मसालेभात बालक : आम्ही नाही खात,आम्ही नाही खात.	**कृती १ : मला कसे वाटते?** • सर्व फोटो, चित्रे एकत्र समोर ठेवावी. • भावना निर्माण होतील, अशी वाक्ये बालकांना सांगावी व कशी भावना असेल? त्याचे चित्र उचलण्यास सांगावे. • चित्रावरून भावनेचा शब्द बालकांना सांगावा व चित्र सांगून	**कृती : डोंगराला आग लागली पळा – भावना** • भावनांची चित्रे बालकांना वाटून द्यावी. डोंगराला आग लागली पळा पळा म्हणून बालकांना वर्तुळात धावण्यास सांगावे. • कोणत्याही एका भावनेचा उच्चार करावा. उदा. राग – या भावनेचे

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
ताई : का नाही खात, का नाही खात बालक : मीठ नाही त्यात, मीठ नाही त्यात. वरील खेळातील वाक्य ताईंनी वेगवेगळ्या भावना वापरून म्हणायचे. उदा. हसत–हसत, जोरात ओरडत, रडत–रडत, सावकाश हळू आवाजात, रागात असे म्हणावे. • ताईने बालकांना वेगवेगळे भाव व्यक्त होणाऱ्या (शौर्य, प्रेम) गोष्टी सांगाव्यात. • लहान मुलांच्या चेहऱ्यावरील बदलण्याचे भाव दर्शवणारी चित्रे दाखवावीत. • गोष्टी सांगताना त्यातील भाव चेहऱ्यावर दाखवावेत.	सर्वांना शब्द २/३ वेळा म्हणण्यास/उच्चारण्यास सांगावे. उदा. १) मला आज मावशीने खाऊ आणला. – आनंद २) मी आज खेळताना पडले. – दु:ख **कृती २ : गोष्ट ऐकणे.** • वेगवेगळे हावभाव असलेली गोष्ट बालकांना ऐकवणे. • गोष्ट वाचताना त्यातील हावभाव चेहऱ्यावर दिसतील असे असावे. • बालक खेळताना पडला, तर रडणारा बालक, हसणारी मुलं, रागवणारी आजी इ. अशा वेगवेगळ्या उपक्रमांतून भावना ओळखायला द्याव्यात. **कृती ३ : निरीक्षणातून भावना ओळखणे.** • बालकांचे दैनंदिन निरीक्षण करून, तो विविध प्रसंगांमध्ये कशाप्रकारे प्रतिसाद देतो याचे नियमित अवलोकन करावे.	चित्र असणाऱ्या बालकांनी वर्तुळामध्ये यावे. भावनेप्रमाणे ती भावना आपल्या मनात केव्हा निर्माण झाली हे बालकाने सांगावे. • हा खेळ २ दिवसांनी परत भावनांची कार्डे अदलाबदल होतील अशा पद्धतीने घ्यावा. भावना दाखविणारे गाणे घ्यावे. • गप्पा – मला कसे वाटते? वर्गामध्ये एखादी घटना घडल्यास बालकांना काय वाटले? असे विचारावे. उदा. शिल्पा पडली, अमन झोपला. • बालकांना वेगवेगळ्या घटना सांगून, त्यांना काय वाटते यावर गप्पा माराव्यात. आईने आवडता खाऊ केला. बहिणीने/मैत्रिणीने खेळणे घेतले.
पंचकोश		
मनोमय कोश		
विविधता	• पपेटच्या माध्यमातून बालकांना भावनांची ओळख करून देता येईल. • वेगवेगळ्या इमोजी बालकांना दाखवून तुम्हांला असे कधी वाटते ते विचारावे? भावनाप्रधान – नाटुकले	

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
विविधता	• गोष्टीचे नाट्यीकरण करून घ्यावे व बालकांना पात्रांनुसार भावना दाखवण्यास प्रोत्साहन द्यावे. • बालकांशी त्यांच्या वर्तनात बदल असल्यास गप्पा माराव्यात व कारण जाणून घ्यावे. • असेच मला कोणते खेळ खेळायला आवडतात, कुठे फिरायला जायला आवडते, मला कधी राग येतो, कधी खूप आनंद होतो अशा प्रकारची चित्रे काढायला द्यावीत.	
थीम/विषय	मी, माझे कुटुंब व परिसर, मदतनीस	
ताईसाठी सूचना	कलानुभवाच्या माध्यमातून, बालकांच्या भावनांना मोकळीक मिळण्याची संधी द्यावी.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-4** बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात. **C-4.2** विविध भावना ओळखतो. त्यावर नियंत्रण आणण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करतो. **अ) LO-4.2.1.2** सोप्या भावना ओळखतो. जसे – भीती, आनंद, दु:ख. **ब) LO-4.2.1.2** भावना शब्दाद्वारे, तसेच हावभाव व इतर प्रकारे व्यक्त करतो. जसे : चित्र रेखाटन, देहबोलीतून **ब) LO-4.2.1.1** भावनांची चेहऱ्यावरील कहावभाव व शब्द यांच्याशी सांगड घालतो. **क) LO-4.2.1.1** स्वत:च्या भावना ओळखून त्याबाबत कारणे सांगतो. जसे–त्याने माझा मनोरा तोडला, म्हणून मला राग आला.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	• भावनांची ओळख व व्यक्त करणे, बौद्धिक विकास, भाषिक विकास, कुतूहल निर्माण होणे. • बालके सांगितलेल्या वाक्यावरून भावनांचे चित्र उचलतात का? भावनेबद्दल योग्य शब्द सांगतात का? याचे निरीक्षण करावे.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	भावना समजतात का? भावनांवर नियंत्रण ठेवता येते का? याचे निरीक्षण करावे.	

आधारशिला कृती : 110. Can you find me? : Find objects basis shared criteria		
उपक्रमाचे नाव	शोधा म्हणजे सापडेल.	
उपक्रमाला लागणारे साहित्य	विविध आकाराच्या व रंगाच्या वस्तू, कृतींचे चित्रकार्ड	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
कृती : शोधा म्हणजे सापडेल. • ताईंनी निरनिराळ्या वस्तू वर्गात निरनिराळ्या ठिकाणी लपवून ठेवाव्यात. त्या एकेका वस्तूची चित्रे बालकांना दाखवून त्यांना संकेत (क्लू) द्यावेत. उदा. ठोकळा दारामागे लपवला असेल तर चित्र दाखवायचे व कुठे शोधायचा हे सांगण्यासाठी म्हणायचे, 'आपण जिथून वर्गात येतो त्या बाजूला बघा'.	**कृती : शोधा म्हणजे सापडेल.** • वस्तू वर्गात वेगवेगळ्या रंगांच्या पिशव्यांमध्ये किंवा कापडात गुंडाळून लपवून ठेवाव्यात. रंगाचे वर्णन करून वस्तू शोधायला सांगावे. उदा. अ) आकाशासारख्या रंगात पेन्सिल बसलीय दडून, शोधून काढा तिला पळत पळत जाऊन. ब) कुंकवाच्या रंगात पुस्तक रंगले, बालकांनी ते शोधून काढले.	**कृती : शोधा म्हणजे सापडेल.** • ३ ते ४, ४ ते ५ च्या कृती आधी घ्याव्यात. • ताईने एका बालकाला चित्रकार्ड दाखववावे व त्यावरून चित्रातील कृती करायला सांगावी. इतर बालकांनी बालक कोणती कृती करते आहे ते पाहून चित्रकार्ड ओळखावे. जसे पुढील कृती असलेली चित्रकार्डे – झोपण्याची कृती – पाणी पिण्याची कृती – झाडून घेण्याची कृती – दात घासण्याची कृती – अंघोळ करण्याची कृती – पळण्याची कृती
पंचकोश		
विज्ञानमय कोश		
विविधता	बालकांच्या जोड्या कराव्यात. दोघांनीही एकेक वस्तू लपवावी. त्यांना एकमेकांची वस्तू शोधून काढायला सांगावी. वस्तू शोधली, की त्याबद्दल एक वाक्य बोलण्यास सांगावे.	
थीम/विषय	भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), मदतनीस, वाहन (आकार)	
ताईसाठी सूचना	–	

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-10** बालके भाषा एक (L1) मध्ये, सफाईदारपणे वाचन व लेखन करतात. **C-10.7** छोट्या बातम्या, सूचना, पाककृती आणि प्रकाशित साहित्य वाचतो आणि त्यांतील अर्थांचे आकलन करून घेतो. **क) LO-10.7.1** साध्या, सोप्या, लिखित सूचनांचा छोटा संच वाचतो आणि त्याप्रमाणे त्यांचे पालन करतो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	वाचन, चित्रशब्द वाचन करता येते, स्वलेखन करता येते.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	वाचन, चित्रशब्द वाचन करता येते, स्वलेखन करता येते का, याचे निरीक्षण करावे.	

आधारशिला कृती : 111. Touch, Feel, Recognise : Understand and Compare Textures		
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
उपक्रमाला लागणारे साहित्य	विटेचा तुकडा, आंब्याची कोय, चिंचोके, सागरगोटे, बोरांच्या बिया, स्पंजचा तुकडा, पिकलेली फळे, कापूस, कापडी खेळणी, काथ्याची दोरी, सुताची दोरी, खडबडीत दगड, गुळगुळीत दगड, कोमट आणि माठातले/फ्रीज मधील पाणी असलेले दोन पेले, उन्हात तापलेला व सावलीतील दगड, पॉलिश/सँड पेपर, घोटीव कागद, परिसरातील झाडांची खोडे, पक्ष्यांची पिसे, मळलेली कणीक, पावडर, रांगोळी, भांडी घासायची स्क्रब घासणी.	
उपक्रमाचे नाव	कडक व मऊ स्पर्श समजणे.	
कृती : • **कठीण/कडक मऊ स्पर्शाचे अनुभव देणे :** विटेचा तुकडा, आंब्याची कोय, चिंचोके, सागरगोटे, बोरांच्या बिया, स्पंजचा तुकडा, पिकलेली फळे, कापूस, कापडी खेळणी हे साहित्य एकत्र करून बालकांच्या समोर ठेवावे. बालकांना या साहित्याला प्रत्यक्ष स्पर्श करण्यास सांगावे.	**कृती :** • बालकाचे डोळे कापडाच्या पट्टीने हलकेच बंद करावे. • कठीण/कडक-मऊ अशा वस्तू एकेका हातामध्ये द्याव्यात. • बालकांना दोन्ही वस्तूंना स्पर्श करून, ते कसे आहेत ते विचारावे.	**कृतीचे नाव : क्रमवारी – स्पर्श कृती :** • बालकांसमोर दगड, खोडरबर, स्पंज अशा वस्तू ठेवाव्यात. डोळे मिटून स्पर्शाने या तीन वस्तूंची कडक ते मऊ किंवा मऊ ते कडक अशी क्रमवारी लावण्यास सांगावे.

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>• हात लावल्याबरोबर बालकांना कसे वाटले ते विचारावे. बालकांनी त्यांच्या बोलीभाषेमध्ये त्यांचा अनुभव सांगितल्यावर वीट, आंब्याची कोय, इ. गोष्टी हाताला कडक किंवा कठीण लागतात म्हणून सांगावे व स्पंजचा तुकडा, कापूस, कापडी खेळणी यांसारख्या गोष्टी हाताला मऊ लागतात म्हणून सांगावे.
• कठीण/कडक मऊ हे शब्द बालकांना माहीत झाल्यावर, वर दिलेल्या साहित्यासारखे इतर साहित्य एकत्र करून बालकांना त्याचा स्पर्श अनुभवायला सांगावा व तो कसा आहे ते विचारावे व कठीण/कडक–मऊ हे शब्द वारंवार सांगावेत व बालकांकडून म्हणवून घ्यावेत.</td><td></td><td>• याच प्रकारे तीन स्तरांत वेगवेगळ्या वस्तूंचा स्पर्शाच्या साहाय्याने क्रम लावण्यास सांगावे.</td></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">अन्नमय, विज्ञानमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">• विविध प्रकारच्या स्पर्श पाट्या तयार करून घ्याव्यात. या पाट्यांना स्पर्श करण्यास बालकांना सांगावे.
• परिसरातील विविध वस्तूंना स्पर्श करून, तो कसा लागतो हे विचारावे. बालकांच्या पावलांच्या अंतरावर वाळू, खडीचा चुरा, कापूस, स्पंजचे तुकडे, माती, पावडर इ. गोष्टी अंथरून स्पर्शरस्ता तयार करावा.
• बालकांना या रस्त्यावरून अनवाणी चालण्यास सांगावे. प्रत्येक पावलागणिक स्पर्श कसा वाटतो हे विचारावे.
• शक्य झाल्यास बालशाळेच्या परिसरात स्पर्श उद्यान तयार करावे.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">मी, माझे कुटुंब, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
ताईसाठी सूचना	स्पर्श संवेदनेसाठी जास्तीत जास्त प्रत्यक्ष अनुभव द्यावेत.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-2** बालके ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात. **C-2.5** विविध प्रकारच्या स्पर्शांमधील फरक करण्याची क्षमता विकसित होते. **अ) LO 2.5.1** कठीण/कडक-मऊ, गार-गरम, खरखरीत, खडबडीत, गुळगुळीत या स्पर्शांमधील फरक समजतो. **ब) LO 2.5.1** दोन वस्तूंमधील कठीण/कडक-मऊ, गार-गरम, खरखरीत, खडबडीत, गुळगुळीत, अशी स्पर्शांची तुलना करू शकतो. **क) LO 2.5.1** तीन ते पाच वस्तूंची कठीण/कडक मऊ, गार-गरम, खरखरीत, गुळगुळीत अशा स्पर्शांनुसार क्रमवार मांडणी करू शकतो. (उदा. अति मऊ, मऊ, टणक, अति टणक)	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	स्पर्श, सूचना समजून, त्यानुसार वर्तन करणे. विविध वस्तू ओळखता येणे.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	परिसरामध्ये वावरताना बालक विविध स्पर्शांसाठी योग्य शब्द वापरत आहे का, ते पाहणे.	
कृती क्र. : 111.1 Touch, Feel, Recognise : Understand and Compare Textures.		
उपक्रमाचे नाव	खडबडीत व गुळगुळीत स्पर्श समजणे.	
उपक्रमाला लागणारे साहित्य	विटेचा तुकडा, आंब्याची कोय, चिंचोके, सागरगोटे, बोरांच्या बिया, स्पंजचा तुकडा, पिकलेली फळे, कापूस, कापडी खेळणी, काथ्याची दोरी, सुताची दोरी, खडबडीत दगड, गुळगुळीत दगड, कोमट आणि माठातले/फ्रीजमधील पाणी असलेले दोन पेले, उन्हात तापलेला व सावलीतील दगड, पॉलिश/सँड पेपर, घोटीव कागद, परिसरातील झाडांची खोडे, पक्ष्यांची पिसे, मळलेली कणीक, पावडर, रांगोळी, भांडी घासायची स्क्रब घासणी.	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
कृती : • **स्पर्श ओळख :** खडबडीत/गुळगुळीत खडबडीत दगड, गुळगुळीत दगड, काचेच्या गोट्या सागरगोटे, चिंचोके, बोराची बी, फणसाची बी, आंब्याची कोय,	**कृती :** • ३ ते ४ वयोगटाच्या कृती घ्याव्यात. • त्यानंतर बालकाचे डोळे कापडाच्या पट्टीने हलकेच बंद करावे.	**कृती : क्रमवारी - स्पर्श** • बालकासमोर जास्त गुळगुळीत, कमी गुळगुळीत व खडबडीत असे तीन दगड ठेवावे. • बालकाला तीनही दगडांना स्पर्श करून बघण्यास सांगावे.

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
बाभळीची बी, खर, कागदाच वेगवेगळे नमुने, रांगोळी, भांडी घासायची स्क्रब घासणी हे साहित्य एकत्र करून बालकांच्या समोर ठेवावे. • बालकांना प्रत्यक्ष स्पर्श करण्यास सांगावे. • हात लावल्याबरोबर बालकांना कसे वाटले ते विचारावे. • बालकांनी त्यांच्या बोलीभाषेमध्ये त्यांचा अनुभव सांगितल्यावर, वीट, खडबडीत दगड, बोराची बी, आंब्याची कोय इ. गोष्टी हाताला खडबडीत लागतात म्हणून सांगावे व गुळगुळीत दगड, काचेच्या गोट्या, सागरगोटे, चिंचोके, बाभळीची बी यांसारख्या गोष्टी हाताला गुळगुळीत लागतात म्हणून सांगावे, तसेच खर कागदाचे वेगवेगळे नमुने, रांगोळी, भांडी घासायचा स्क्रब हे खरखरीत लागतात, असे सांगावे. खरखरीत, खडबडीत, गुळगुळीत हे शब्द बालकांना माहीत झाल्यावर, वर दिलेल्या साहित्यासारखे इतर साहित्य एकत्र करून बालकांना त्याचा स्पर्श अनुभवायला सांगावा व तो कसा आहे ते विचारावे व खरखरीत, खडबडीत, गुळगुळीत हे शब्द वारंवार सांगावेत व बालकांकडून म्हणवून घ्यावेत.	• खरखरीत, खडबडीत, गुळगुळीत अशा वस्तू एकेका हातामध्ये द्याव्यात. • बालकांना दोन्ही वस्तूंना स्पर्श करून, ते कसे आहेत ते विचारावे.	• ते तीनही दगड गुळगुळीतपणाच्या क्रमानुसार रांगेने ठेवावे. • बालकाला सर्वांत जास्त गुळगुळीत दगड दाखवून सांगा, की हा सर्वांत जास्त गुळगुळीत दगड आहे. नंतर यापेक्षा कमी गुळगुळीत दगड दाखवून सांगा, की हा यापेक्षा कमी गुळगुळीत दगड आहे व नंतर खडबडीत दगड दाखवावा. • आता तीनही दगड एकत्र ठेवून, बालकाला गुळगुळीतपणानुसार रांगेने मांडण्यास सांगावे.

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
पंचकोश		
अन्नमय, विज्ञानमय कोश		
विविधता	• विविध प्रकारच्या स्पर्श पाट्या तयार करून घ्याव्यात. या पाट्यांना स्पर्श करण्यास बालकांना सांगावे. • परिसरातील विविध वस्तूंना स्पर्श करून तो स्पर्श कसा आहे, हे विचारावे. • बालकांच्या पावलातील अंतर लक्षात घेऊन वाळू, खडीचा चुरा, कापूस, स्पंजचे तुकडे, माती, पावडर इ. गोष्टी अंथरून स्पर्श रस्ता तयार करावा. • बालकांना या रस्त्यावरून अनवाणी चालण्यास सांगावे. प्रत्येक पावलागणिक स्पर्श कसा वाटतो हे विचारावे. • शक्य झाल्यास, बालशाळेच्या परिसरात स्पर्श उद्यान तयार करावे.	
थीम/विषय	भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू	
ताईसाठी सूचना	–	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-2** बालके ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात. **C-2.5** विविध प्रकारच्या स्पर्शांमधील फरक करण्याची क्षमता विकसित होते. **अ) LO 2.5.1** कठीण/कडक–मऊ, गार–गरम, खरखरीत, खडबडीत, गुळगुळीत, स्पर्शांमधील फरक समजतो. **ब) LO 2.5.1** दोन वस्तूंमधील कठीण/कडक–मऊ, गार–गरम, खरखरीत, खडबडीत, गुळगुळीत अशी स्पर्शांची तुलना करू शकतो. **क) LO 2.5.1** तीन ते पाच वस्तूंची कठीण/कडक मऊ, गार–गरम, खरखरीत, गुळगुळीत अशा स्पर्शांनुसार क्रमवार मांडणी करू शकतो. (उदा. अति मऊ, मऊ, टणक, अति टणक)	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	स्पर्श सूचना समजून त्यानुसार वर्तन करणे. विविध वस्तू ओळखता येणे.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	परिसरामधे वावरताना बालक विविध स्पर्शांसाठी योग्य शब्द वापरते आहे का ते पाहावे, स्पर्श ओळखून सांगता येतात का याचे निरीक्षण करावे.	

कृती क्र. : 112. Dressing up : Understanding Need, Diversity and Practicing Autonomy		
उपक्रमाचे नाव	जसा ऋतू तसा वेश	
उपक्रमाला लागणारे साहित्य	हिवाळा, उन्हाळा व पावसाळा या ऋतूत वापरले जाणारे कपडे व वस्तू, कागदाचे कपडे, कागदाची बाहुली.	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
कृती : कपडे घाला बाहुलीला • ताईने बालकांना वर्तुळावर बसवावे. वर्तुळाच्या मध्यात बाहुलीचे मोठे चित्र ठेवावे. • कागदाचे विविध कपडे तयार करावेत. • ऋतू आणि रंग, सण आणि रंग असे वर्णन सांगून बाहुलीसाठी कपड्याची निवड करण्यास सांगावे. उदा. अ) आली आली थंडी बाहुलीला भरली हुडहुडी बोला बोला कपडे कोणते द्याल? ब) बाहुली निघाली लग्नाला. टिकल्यांचा लाल फ्रॉक हवाय तिला.	**कृती :** • ताईने बालकांना आपण स्वेटर, टोपी, हातमोजे, पायमोजे हे कपडे कधी घालतो ते विचारावे व प्रत्यक्ष दाखवावे. • थंडीतच हे सगळे कपडे का घालतो? • खूप गरम होते, तेव्हा कसे कपडे घालतो? **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	**कृती : कपडे घाला एकमेकांना** • ताईने दोन बालके/दोन बालिका अशा जोड्या लावाव्या. • त्यांना एक प्रसंग द्यावा. ऋतू, रंग, सण आणि रंग यांनुसार प्रत्येक बालकाला घरून कोणतातरी ड्रेस आणायला सांगावा. • रेनकोट, स्वेटर, बाहेर जायचे कपडे, रंगपंचमीला घालता येतील असे कपडे, जोडीने उभे राहून एकमेकांना घालून दाखवायला सांगावे.
पंचकोश		
विज्ञानमय कोश		
विविधता	सर्व प्रकारचे कपडे एकत्र ठेवून रंग, उपयोग, ऋतू, स्त्री-पुरुष, बाळ अशा वेगवेगळ्या प्रकारे वर्गीकरण करण्याची संधी बालकांना द्यावी.	
थीम/विषय	ऋतू	
ताईसाठी सूचना	ताईने यासाठी आवश्यकतेनुसार वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्याव्यात.	

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे

अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-7** बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात. **C-7.2** निसर्गाच्या निरीक्षणातून कार्यकारणभाव समजून घेऊन, तो दर्शवणारी साधी परिकल्पना मांडतो व त्याच्या स्पष्टीकरणाकरता/पडताळणीकरता निरीक्षणाचा आधार घेतो. **ब) LO 7.2.3.1** उन्हाळा आणि हिवाळा ओळखतो. **क) LO 7.2.3.1** उन्हाळा आणि हिवाळा ऋतुनुसार कपडे आणि अन्न–पदार्थ ओळखतो.		
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	हवामानानुसार कपडे घालण्याची समज विकसित होण्यास मदत होईल.		
निरीक्षण करावयाच्या बाबी	हवामानातील बदल सांगता येतात का, ऋतू समजतात का, त्याबद्दल बोलतात का याचे निरीक्षण करावे.		

कृती क्र. : 113. Disability and Inclusion : Recognise, Include, Understand and Respect

उपक्रमाचे नाव	मदत करूया
उपक्रमाला लागणारे साहित्य	रुमाल, दोरी, दिव्यांग व्यक्तीची चित्रकार्ड, कापूस

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
कृती : • ताईने बालकांना अर्धवर्तुळात बसवावे. बालकांना विचारा, ज्या अंध व्यक्ती असतात त्यांना दिसत नाही, ते कसे चालत असतील, वस्तू कशा ओळखत असतील. एकेका बालकाला बोलावून, त्याच्या डोळ्याला रुमाल बांधावा आणि विचारावे काही दिसत आहे का? या बालकाच्या हातात एखादी वस्तू द्यावी. कोणती वस्तू आहे हे हातात असल्यावर ओळखता येते का?	**कृती :** • ३ ते ४ वयोगटाची कृती घेऊन मग ही कृती घ्यावी. • विशेष गरजा असणाऱ्या बालकांचा समावेश करून खेळाकडे लक्ष द्यावे. • श्रवणक्षमतेचे अनुकरण करण्यासाठी कानात कापसाचे बोळे घालावे. अपंगत्वासाठी पायाभोवती पट्ट्या बांधा. चालताना काय अडचण आली यावर चर्चा करावी. • बालकांना येणाऱ्या अडचणींची चर्चा करा आणि त्याचा वास्तविक	**कृती :** • ३ ते ५ या वयोगटाच्या कृती आधी घ्याव्यात. अपंगत्व आणि इतर बालकांबद्दल चर्चा करावी. • बालकांना दिव्यांग व्यक्तीची चित्रकार्ड द्यावीत आणि प्रत्येक बालक किंवा व्यक्ती इतरांपेक्षा कसे वेगळे आहे याबद्दल बोलण्यास सांगावे. • अपंग व्यक्तींनी वापरलेल्या साधनांची चित्रे सादर करा, त्यांची नावे आणि उद्देश स्पष्ट करून, त्यावर चर्चा करावी. त्यांची नावे आणि उद्देश स्पष्ट

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>असे प्रश्न विचारावे. याप्रकारे चर्चा करावी.</td><td>जीवनातील अनुभवांशी संबंध ठेवा.
• कानात बोळा घालून ऐकायला येते का हे विचारावे.
• ज्या लोकांना ऐकायला येत नाही, ते कसे बोलत असतील.
• आपल्या आजूबाजूला जर अशा व्यक्ती असतील तर, आपण यांना कोणती मदत करावी, याबद्दल बालकांना सांगावे.</td><td>करून, त्यावर चर्चा करावी.
• आपल्या आजूबाजूला जर अशा व्यक्ती असतील, तर आपण त्यांना कोणती मदत करावी, याबद्दल बालकांना सांगावे.</td></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">मनोमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">आपल्या आजूबाजूला अशा दिव्यांग व्यक्ती असतील, तर त्यांचे अनुभव किंवा त्यांना त्यांनी कशी मदत केली यावर चर्चा करावी.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">मी, माझे कुटुंब व परिसर</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">उपलब्ध चित्रकार्ड यांचा वापर करून चर्चा करावी.</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-4 बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.
C-4.4 इतर बालकांबरोबर सहकार्यवृत्तीने वागतो.
अ) LO 4.4.1 इतर बालकांबरोबर खेळायला सुरुवात करतो.
ब) LO 4.4.1 इतर बालकांबरोबर खेळताना आनंद घेतो.
क) LO 4.4.1 इतर बालकांबरोबर खेळायला सुरुवात करतो आणि खेळासंबंधी योजना आखतो. (उदा. काय खेळू, कसे खेळू, कधी खेळू)
C-4.6 गरजेच्या वेळी इतरांना (प्राणी आणि वनस्पतींसह) मदत करतो आणि दयाभाव दर्शवितो.
ब) LO 4.6.1 इतर बालके आणि प्रौढांप्रति आपुलकी दर्शवतो.
क) LO 4.6.1 साहित्य काळजीपूर्वक हाताळतो.
C-4.7 इतर बालकांचे विचार, त्यांचे प्राधान्य, भावनिक गरजा लक्षात घेऊन, त्यांना सकारात्मक प्रतिसाद देतो.</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
	ब) LO 4.7.1 बालक सर्व बालकांशी, त्यांची पार्श्वभूमी व क्षमतांबद्दल विचार न करता, खेळतो व संवाद साधतो. **क) LO 4.7.1** बालकांमधील सारखेपणा, वेगळेपणा ओळखण्यास सुरुवात करतो. (उदा. उंची, लिंगभाव, बोलण्याची पद्धती, खाण्याच्या आवडीनिवडी)	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	संवेदनशीलता, समानानुभूती	
निरीक्षण करावयाच्या बाबी	इतरांबद्दल काळजी, प्रेम वाटते का, काळजी घेतात का हे बघावे.	
कृती क्र. : 114. Let's discuss : Safe and unsafe situations around us		
उपक्रमाचे नाव	जरा हळू, जरा जपून	
उपक्रमाला लागणारे साहित्य	जाड दोरी व त्याला एकेका फुटावर गाठ मारलेली असावी, खडू, रांगोळी, चुना, ट्रॅफिक सिग्नल.	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
कृती : दोर धरून चालूया • एक जाड दोरी किंवा ओढणी घेऊन तिला साधारण एका फुटावर गाठी माराव्यात. • प्रत्येक बालकाला एकेक गाठ पकडून उभे राहण्यास सांगावे. • बालकांना सांगावे, की मोठ्या रस्त्यावर जाताना, प्रत्येकाने दोरीची गाठ धरून चालायचे आहे आणि बागेत आलो की झाडाखाली बसून, खाऊ खाताना दोरी सोडायची आहे. • आता ताईने सांगावे, की आपण खेळ खेळू या ''आपण मोठ्या रस्त्याने चाललो आहोत.'' असे म्हटले, की बालकांनी दोरी धरून चालावे आणि ''बागेत झाडाखाली बसलो.'' असे म्हटले, की दोरी	**पूर्वज्ञान :** डावा व उजवा या दिशादर्शक संकल्पना माहीत असणे. **कृती :** **रस्त्याच्या उजव्या बाजूने** • वर्गामध्ये किंवा वर्गाबाहेर खडूने सरळ तसेच वळणावळणांचा रस्ता आखावा. • बालकांना रस्त्याच्या उजव्या बाजूने चाला अशी सूचना द्यावी. 'उजव्या बाजूने चालल्यावर आपल्याला समोरून येणारी वाहने दिसतात व अपघात होत नाहीत.' • ताईने उजव्या बाजूने म्हणजे कुठून, ते चालून दाखवावे. • बालकांना रस्त्यावर विविध ठिकाणी उभे करावे.	**कृती :** ट्रॅफिक सिग्नल खेळ लाल, पिवळा, व हिरवा हे सिग्नल समजणे. • बालकांना सहज दिसतील व समजातील अशा प्रकारे (खडू, रांगोळी किंवा चुना वापरून) रस्ते व चौक आखावेत. चौकामध्ये झेब्रा क्रॉसिंग आखावे. • बालकांना लाल सिग्नल म्हणजे थांबा, पिवळा म्हणजे सावधपणे चाला व हिरवा म्हणजे पुढे जा असे सिग्नलचे अर्थ समजावून सांगावेत. • बालकांना खेळण्यातील गाड्या घेऊन रस्त्यावर चालवायला सांगावे. • ताईने लाल सिग्नल दाखवावा व क्रॉस लाईनच्या पूर्वी थांबण्याची सूचना करावी नंतर हिरवा

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
सोडून खाली बसावे.	• ताईने टाळ्या वाजवल्यावर बालकांनी रस्त्याच्या उजव्या बाजूला येऊन चालायला सुरूवात करावी. • टाळ्या वाजवायचे थांबल्यावर, बालकांनी रस्त्याच्या बाहेर जाऊन उड्या मारायच्या आणि टाळ्या वाजवायला सुरुवात केल्यावर, पुन्हा उजव्या बाजूने चालायला सुरुवात करावी. • रस्ता संपल्यावर उलट्या दिशेने चालण्यास सुरुवात करावी तेव्हा डावी बाजू कोणती आहे हे बालकांच्या लक्षात आणून द्यावे. • आजोबांबरोबर चालूया बालकांच्या जोड्या कराव्यात. एका बालकाला मोठ्या माणसाची भूमिका द्यावी. • रस्ता आला म्हटल्यावर, लहान बालकाने मोठ्या बालकाचा हात धरावा आणि झाडाखाली बसलो म्हटल्यावर हात सोडावा. • पुढील गाणे तालासुरात आणि हावभावांसहित म्हणावे. गाणे-चिऊताईच्या पिला, खरं सांग मला आभाळातले रस्ते कसे सापडतात तुला आभाळातील रस्त्यांवर पांढऱ्या खुणा असतात का? लाल, हिरवे, पिवळे दिवे पोलीसदादा असतात का?	सिग्नल दाखवावा व बालकांना पुढे जाण्यास सांगावे. • तर पिवळा सिग्नल दाखवावा व बालकांना सावधपणे पुढे जाण्यास सांगावे. • बालकांना सिग्नल चांगले समजल्यावर वर्गातील एखाद्या बालकाला सिग्नल दाखवण्यास सांगावे. **कृती क्र. २** **कृती :** झेब्रा क्रॉसिंगचा खेळ. • झेब्रा क्रॉसिंग व क्रॉस लाईन आखावी बालकांना खेळण्यातील गाड्या घेऊन रस्त्यावर चालवायला सांगावेत. • ताईने लाल सिग्नल दाखवावा व क्रॉस लाईनच्या पूर्वी थांबण्याची सूचना करावी. • क्रॉस लाईनच्या आधी वाहने थांबल्यावर, इतर बालकांना झेब्रा क्रॉसिंगवरून रस्ता पार करण्यास सांगावे. • नंतर हिरवा सिग्नल दाखवावा व बालकांना गाड्या पुढे जाऊ द्या असे सांगावे. त्यावेळी बालकांना पादचारी यांनी रस्ता पार करू नये म्हणून सांगावे. • नंतर पिवळा सिग्नल दाखावावा व बालकांना सावधपणे पुढे जाण्यास सांगावे.

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
	वाट विसरून चुकलास, तर गेटावर नेतात का? नाव गाव, पत्ता विचारून घरी जाऊ देतात का?	• बालकांना सिग्नल चांगले समजल्यावर वर्गातील एखाद्या मुलाला सिग्नल दाखविण्यास सांगावे. **कृती क्र. ३** **कृती :** रहदारी चिन्ह परिचय • यू टर्न, अरुंद पूल आहे, पुढे शाळा आहे, पुढे दवाखाना आहे, नो पार्किंग, पुढे रेल्वे क्रॉसिंग आहे ही चिन्हे कार्डबोर्डवर तयार करावीत. रस्त्यावर ही चिन्हे लावावीत व बालकांना त्याचा अर्थ सांगून, त्याप्रमाणे कृती करवून घ्यावी.

पंचकोश	
अन्नमय कोश	
विविधता	रस्त्याने चालताना कोणती काळजी घ्यावी. रस्त्यावरील सांकेतिक चिन्हांचा अर्थ समजून घेऊन वागणे याविषयी वर्गात नाट्यीकरण करून घ्यावे. शहरातील रस्त्यांवरील चौक, सिग्नल या संदर्भातील मोठ्या चित्रकार्डाचे चित्रवाचन करून घ्यावे.
थीम/विषय	मी, माझे कुटुंब व परिसर, वाहन
ताईसाठी सूचना	–
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-1** बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात. **C-1.4** हालचालींमध्ये सहजता दाखवतो आणि योग्य रीतीने वागतो. या दोन ओळी सुरुवातीला कराव्यात म्हणजे जागा ॲडजेस्ट होईल. **अ) LO 1.5.1** रस्त्यावरील सुरक्षितता महत्त्वाची आहे हे ओळखतो, रस्त्याने मोठ्यांचा हात पकडून चालतो. **ब) LO 1.5.1** रस्ता ओलांडताना दोन्ही बाजूला पाहतो, बरोबरच्या बालकांचे किंवा प्रौढांचे हात पकडून सुरक्षितपणे चालतो.

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">क) LO 1.5.1.1 स्वतंत्रपणे रस्ता सुरक्षिततेचे नियम पाळतो. (रस्त्याच्या कडेने चालणे, रस्ता ओलांडणे इ.)
क) LO 1.5.1.2 वाहतुकीची चिन्हे ओळखतो. (सिग्नल, झेब्रा क्रॉसिंग, यू टर्न, पूल/रेल्वे पूल इ.)
CG-4 बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.
C-4.5 शाळेत आणि वर्गात सामाजिक नियम समजून घेऊन, त्याप्रमाणे सकारात्मक वर्तन करतो.
अ) LO 4.5.2 ताईंच्या मदतीने साध्या सूचनांचे पालन करतो.
क) LO 4.5.2 शाळेत मोठ्यांनी आठवण करून दिल्याशिवायही साध्या नियमांचे पालन करतो.</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये</td><td colspan="2">जीवन कौशल्यांचा विकास, सामाजिक विकास, स्वयंशिस्त, सूचनांचे अनुसरण, रंगांची ओळख, नियम व कायदे यांबाबतचा आदर जागरूक होण्यास मदत होईल.</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">दैनंदिन जीवनात बालके या प्रकारे नियमांचे पालन करत आहेत का, याचे निरीक्षण करावे.</td></tr>
<tr><td colspan="3">कृती क्र. : 115. Logo Wall / Word Wall</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">चित्र बघूया व वाचूया.</td></tr>
<tr><td colspan="3">उपक्रमाला लागणारे साहित्य :</td></tr>
<tr><td>साबण/बिस्कीट/चहा/पेस्ट/पेन्सिल/दूध यांचे रॅपर्स.
गोष्टीची पुस्तकं.</td><td colspan="2">पुस्तके, वर्तमानपत्रे, दिनदर्शिका, तक्ते, निमंत्रण पत्रिका इत्यादी लिखित स्वरूपातील विविध नमुने.</td></tr>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>कृती : रॅपर्स पाहून वस्तू ओळखूया.
• ताईने साबण/बिस्कीट/चहा/पेस्ट/पेन्सिल/दूध यांसारख्या वस्तूंचे कागद (रॅपर्स) यांचा संग्रह करावा.
• वर्गामध्ये खाली जमिनीवर वरील रॅपर्स मांडून ठेवावी. बालकांना</td><td colspan="2">कृती १ : माहिती मिळवूया.
• ताईने बालकांना रस्त्यावर असलेले बोर्ड, पुस्तकातील चित्रे, मासिकातील जाहिराती दाखवाव्यात. यातून काय काय माहिती मिळते, याबाबत बालकांबरोबर चर्चा करावी.
• वर्तमानपत्रातील खाऊच्या जाहिरातीचे चित्र, फळांचे, भाज्यांचे चित्र यांवर आधी चर्चा घ्यावी. उदा.</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
मांडलेल्या रॅपर्सचे निरीक्षण करावयास सांगावे. प्रत्येक रॅपरवर बोट ठेवून, हे कोणत्या वस्तूचे रॅपर आहे असे विचारावे. ताईने प्रत्येकाचे दोन दोन रॅपर जमवावे. बालकांना त्याच्या जोड्या लावायला द्याव्यात. ताईकडे अशा रॅपरचा संग्रह असावा. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	**कृती २ : नावे ओळखूया.** • ताईने वर नमूद केलेले विविध लिखित स्वरूपातील नमुने गोळा करून, त्याचे वर्गात प्रदर्शन करावे. उदा. टूथपेस्ट, दूध, खाद्यपदार्थांच्या पॅकेटवरील नावे असलेली कार्डे • बालकांना प्रदर्शनाचे निरीक्षण करण्यास सांगावे. • पाहिलेल्या लिखित नमुन्यांबद्दल पुढील प्रश्न विचारावे. • प्रश्न – हे आधी पाहिले आहे का? कुठे पाहिले आहे? याचा उपयोग कशासाठी करतात? यामध्ये कशाकशाची माहिती असते?	
पंचकोश		
अन्नमय, प्राणमय, विज्ञानमय कोश		
विविधता	बालकांना जध प्रकारचे रॅपर्स घरून आणावयास सांगावे आणि सारख्या दिसणाऱ्या रॅपर्सच्या जोड्या लावण्याचा खेळ घ्यावा. वर्गात पुस्तकांचा वाचन कोपरा तयार करावा. त्यामध्ये मोठ्या व रंगीत, आकर्षक चित्र असणाऱ्या पुस्तकांचा, वर्तमानपत्रांचा संग्रह करावा.	
थीम/विषय	मी, माझे कुटुंब व परिसर, वाहन	
ताईसाठी सूचना	वयोगटनिहाय उपलब्ध करून देण्यात आलेल्या कृतिपत्रिका सोडवून घ्याव्यात.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG - 10** बालके भाषा एक **(L1)** मध्ये सफाईदारपणे वाचन व लेखन करतात. **C - 10.2** पुस्तकाची मूलभूत रचना/स्वरूप, मुद्रित अक्षरांची कल्पना ओळखतो, मुद्रित झालेल्या मजकुराची दिशा समजून घेतो व पुस्तकातील प्राथमिक विरामचिन्हे ओळखतो. **अ) LO 10.2.1** सर्वसामान्य चिन्हे, प्रतीके, मुद्रा (लोगो) ओळखतो.(उदा. बिस्किट किंवा साबणाचे आवरण किंवा रंगावरून विशिष्ट बिस्किट किंवा साबण ओळखतो.) **अ) LO 10.2.2** मुद्रित मजकूर आणि चित्रांमध्ये फरक करतो.	

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
	ब) LO 10.2.1 पुस्तक पकडतो, उघडतो व चाळण्यासाठी पान पलटतो. ब) LO 10.2.2 डावीकडून-उजवीकडे आणि वरून-खाली शब्दांचे अनुसरण करतो. क) LO 10.2.1 मुद्रित साहित्यातून माहिती मिळते असे वर्णन करतो (उदा पुस्तक, वर्तमानपत्र, माहितीपत्रक).	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	निरीक्षण, साम्यभेद, वाचन पूर्वतयारी.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	रॅपर्स वरील लोगो, चिन्ह पाहून वस्तू ओळखता येतात का ते पाहावे. बालके पुस्तक हातात उचलून, पाने उलटण्याची योग्य क्रिया करत आहेत की नाही याचे निरीक्षण करावे. पुस्तके पाहिल्यानंतर त्याबद्दल बोलता येते की नाही हे पाहावे.	
कृती क्र. : 116. Big Feelings : Express Release and Manage		
उपक्रमाचे नाव	चित्र बघून भावना ओळखू.	
उपक्रमाला लागणारे साहित्य	विविध इमोजी, चित्रकार्ड, चेंडू	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
• ताईने आनंद, दु:ख, निराश, रागीट, आश्चर्य अशा इमोजीज बालकांना दाखवाव्यात. • चेहऱ्यावर भाव आणावे. • बालकांना एक एक इमोजी दाखवून, त्यांना त्या ओळखण्यास सांगावे, तसेच त्यांना कोणतेही एक भावनाकार्ड दाखवून, त्यांना असे कधी वाटते? याबद्दल चर्चा करावी. • चेहऱ्यावरचेही भाव ओळखण्यास सांगावे. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	• बालकांना वर्तुळाकार बसवावे. • वर्तुळामध्ये संगीताच्या तालावर चेंडू शेजारच्या बालकाकडे पास करण्यास सांगावे. • संगीत बंद झाले, की ज्याच्या जवळ चेंडू असेल, त्याने वर्तुळामध्ये यावे. • ताईने त्या बालकास कानात एक भावना सांगावी. • ती भावना बालकाने आपल्या हावभावातून व्यक्त करावी. किंवा त्या संदर्भात प्रसंग सांगावा. • वर्तुळातील उर्वरित बालकांनी ती भावना ओळखावी.	**कृती :** चित्र काढूया – भावना मला कशाकशाचा राग येतो ताईने बालकांना कागद द्यावा. • त्यावर त्यांना कशाकशाचा राग येतो याचे चित्र काढायला सांगावे. • चित्र काढताना ताईचे सगळ्या बालकांकडे लक्ष असावे. • बालकांचे चित्र काढून झाल्यावर, त्यांना विचारून त्यांनी कशाकशाचे चित्र काढले आहे. त्याची नावे त्यांच्या चित्रावर लिहावी. (काही बालके चित्र काढणार नसतील, तर त्यांना जबरदस्ती करू नये.)

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
	• असा खेळ सर्व मुलांना संधी मिळेपर्यंत खेळावा.	• बालकांनी काढलेली चित्रे वर्गात लावावीत.
पंचकोश		
मनोमय कोश		
विविधता	गप्पा – मला कसे वाटते? वर्गामध्ये एखादी घटना घडल्यास, बालकांना याबाबत तुम्हांला काय वाटले? असे विचारावे. उदा. शिल्पा पडली, अमन झोपला. बालकांना वेगवेगळ्या घटना सांगून त्याबद्दल काय वाटते यावर त्यांच्याशी गप्पा माराव्यात. आईने आवडता खाऊ केला. बहिणीने/मैत्रिणीने खेळणे घेतले. पपेटच्या माध्यमातून बालकांना भावनांची ओळख करून देता येईल. वेगवेगळ्या इमोजी बालकांना दाखवून, तुम्हांला असे कधी वाटते ते विचारावे?	
थीम/विषय	मी, माझे कुटुंब, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक	
ताईसाठी सूचना	जादुई पेटाऱ्यातील भावनाविषयक साहित्याच्या आधारे कृती करून घ्याव्यात. वयोगटनिहाय उपलब्ध करून देण्यात आलेल्या कृतिपत्रिका सोडवून घ्याव्यात.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-4** बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात. **C-4.2** विविध भावना ओळखतो. त्यावर नियंत्रण आणण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करतो. **अ) LO 4.2.1.1** सोप्या भावना ओळखतो. जसे : भीती, आनंद, दु:ख. **ब) LO 4.2.1.1** भावनांची चेहऱ्यावरील हावभाव व शब्द यांच्याशी सांगड घालतो. **अ) LO 4.2.1.1** स्वत:च्या भावना ओळखून, त्याबाबत कारणे सांगतो. जसे : त्याने माझा मनोरा तोडला म्हणून मला राग आला.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	भावनिक बुद्धिमत्ता, आपुलकी, मदतीची भावना, बौद्धिक विकास, भाषिक विकास, कुतूहल निर्माण होण्यास मदत होईल.	

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
निरीक्षण करावयाच्या बाबी	बालके एखाद्या घटनेला प्रतिसाद कसा देतात, त्यांना काय वाटते, याचे निरीक्षण करावे. बालके सांगितलेल्या वाक्यावरून भावनांचे चित्र उचलतात का? भावनेबद्दल योग्य शब्द सांगतात का? याचे निरीक्षण करावे.	

कृती क्र. : 117. Shadow Game : Understand, Create and Guess		
उपक्रमाचे नाव	हा खेळ सावल्यांचा	
उपक्रमाला लागणारे साहित्य	टॉर्च विविध सामग्रीसह कागद, मासिके, दगड आणि रिकाम खोके	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
• ताईने बालकांना वर्गाच्या बाहेर घेऊन जावे. • झाडांच्या, वनस्पती, प्राण्यांच्या सावल्या आणि स्वतःच्या सावलीचे त्यांना निरीक्षण करण्यास प्रोत्साहित करा. • बालकांना वेगळे काही दिसते का, हे विचारावे. • झाडांच्या खाली जमिनीवर काय दिसते हे विचारा, उन्हात बघायला सांगा आणि परत झाडाखाली बघायला सांगा, मग विचारा, काय फरक दिसतो, का सारखेच दिसते आहे. बालकांना त्यांची सावली पडते का हे बघायला सांगा. कशाकशाच्या सावल्या असतात, सावल्यांचे प्रकार सांगा.	ताईने बालकांना वर्गाच्या बाहेर घेऊन जावे. • झाडांच्या सावल्या, वनस्पती, प्राणी आणि स्वतः त्यांना निरीक्षण करण्यास प्रोत्साहित करा. • बालकांना वेगळे काही दिसते का, हे विचारावे. • झाडांच्या खाली जमिनीवर काय दिसते हे विचारा. उन्हात बघायला सांगा आणि परत झाडाखाली बघायला सांगा, मग विचारा. काय फरक दिसतो, का सारखेच दिसते आहे. बालकांना त्यांची सावली पडते का हे बघायला सांगा. कशाकशाच्या सावल्या असतात, सावल्यांचे प्रकार सांगा. • दुसऱ्या दिवशी बालकांना वर्गाबाहेर घेऊन जा. पण	• ताईने वर्गात खिडक्या व दारे लावून अंधार करावा. सावल्या तयार करण्यासाठी टॉर्च वापरून, टॉर्चच्या प्रकाशात एक एक वस्तू धरून, त्यांची सावली कशी दिसते याचा अनुभव द्यावा. • वेगवेगळ्या वस्तूंमधून प्रकाश परावर्तित होतो हे दाखवा. • खोलीत सावली नाही हे दाखवण्यासाठी, खोलीत सावली का नाही यावर चर्चा करा.

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td></td><td>वेगवेगळ्या वेळेत आणि आता सावली कशी दिसते याबद्दल विचारा.
• बालकांना घरी गेल्यावर पण या कृती करायला सांगा. दिवसाच्या वेगवेगळ्या वेळा (सकाळ, दुपार, संध्याकाळ)</td><td></td></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">अन्नमय, विज्ञानमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">वर्गात असणारे प्राण्यांचे कट आऊट्स किंवा रबरी खेळणी अशा वस्तू बाहेर वर्गासमोरील मोकळ्या जागेत न्या. त्याच्या समोर कागद ठेवा. त्यावर त्या चित्राची जी सावली पडेल, त्या सावलीचे चित्र गिरवायला सांगा.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2"></td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-7 बालके निरीक्षण व तार्किक विचाराने, सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात.
C-7.2 निसर्गाच्या निरीक्षणातून कार्यकारणभाव समजून घेऊन, तो दर्शवणारी साधी परिकल्पना मांडतो व त्याच्या स्पष्टीकरणाकरता/पडताळणीकरता निरीक्षणाचा आधार घेतो.
अ) LO 7.2.2 निरीक्षणावर आधारित कल्पनांचा किंवा युक्त्यांचा उपयोग करतो. (उदा. गरम अन्नावर फुंकर घालण्याच्या प्रौढांच्या कृतीचे अनुकरण करतो.)
ब) LO 7.2.2 ज्ञात माहितीचा नवीन संदर्भात वापर करतो. (उदा. पुस्तकातील चित्राप्रमाणे ठोकळ्यांचा महाल/मनोरा बनवतो.)
ब) LO 7.2.5 शिक्षक व समवयस्कांच्या मदतीने, पर्यावरणातील घटना व प्रसंगांबाबतच्या सोप्या प्रश्नांची उत्तरे देतो.</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
	क) LO 7.2.2 निरीक्षण करून सामान्यीकरण करतो. क) LO 7.2.5 नैसर्गिक घटनांबाबत चिकित्सक प्रश्न विचारून, उत्तरे मिळविण्यासाठी समवयस्कांसोबत समन्वय साधतो/शोध घेतो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	निरीक्षणकौशल्य	
निरीक्षण करावयाच्या बाबी	बालके स्वतःहून वेगवेगळ्या कोनात उभे राहून, सावली न्याहाळतात का हे पहावे.	
कृती क्र. : 118. Life cycle : Discuss and Understand Different Life Forms		
उपक्रमाचे नाव	जीवनचक्र	
उपक्रमाला लागणारे साहित्य		
विविध वयोगटातील व्यक्तींची चित्रे	फुलपाखराची जीवनचक्रदर्शक चित्रफीत किंवा स्टिक पपेट	बेडकाची पूर्ण जीवनचक्र चित्रफीत, किंवा स्टिक पपेट, कुंडी व बिया
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
कृती १ : लहान कोण मोठे कोण? • ताईने बालकांना वेगवेगळ्या वयोगटातील माणसांची चित्रे (फ्लॅश कार्ड) दाखवावीत यांच्यापैकी सर्वांत मोठे कोण आहे? सर्वांत लहान कोण आहे? म्हातारे कोण आहे? बाळ कोणते आहे? असे प्रश्न विचारावेत. तुमच्या घरात सर्वांत लहान कोण आहे? जो लहान आहे, तो मोठा होणार आहे का? असा संवाद साधावा. म्हातारी व्यक्ती लाहान होईल का?	**कृती १ : कसे झाले बीपासून झाड?** • ताईने बालकांना छोट्या कुंड्या किंवा नारळाच्या करवंट्या किंवा प्लॅस्टिक डबे देऊन, त्यात माती भरून, बिया पेरायला द्याव्यात. • रोज निरीक्षण करायला सांगावे. जे दिसत राहील, त्याचे चित्र एकाच कागदावर काढण्यास सांगावे. • बालके अगोदर नुसती माती, मग कोंब, मग जे दिसत जाईल त्याप्रमाणे चित्र काढतील.	**कृती १ : कसे झाले फुलपाखरू?** • ताईने फुलपाखराचे पूर्ण जीवनचक्र तयार करावे. (क्षणचित्रांच्या साहाय्याने, स्टिक पपेट्सच्या, फिंगर पपेटच्या साहाय्याने) त्यावर संवाद साधावा. • फुलपाखराची गाणी/गोष्टी म्हणत माहिती द्यावी. **कृती २ : जलचक्र** • ताईने चित्रकार्डांच्या मदतीने जलचक्र समजावून सांगावे. • त्यानंतर त्यांतील विविध प्रक्रियेतील चित्रकार्डे उलट्या सुलट्या क्रमाने ठेवावी. • बालकांना जलचक्राचा योग्य क्रम लावण्यास सांगावे.

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
पंचकोश		
विज्ञानमय कोश		
विविधता	जलचक्र दाखवता येईल, ऋतू या विषयावर बोलता येईल.	
थीम/विषय	मी, माझे कुटुंब, वनस्पती (फुले, शेती, रंग), प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक	
ताईसाठी सूचना	ताईने सुलभ संदर्भासाठी उपलब्ध कार्यपुस्तिका वापरावी.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-7** बालके निरीक्षण व तार्किक विचाराने, सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात. **C-7.2** निसर्गाच्या निरीक्षणातून कार्यकारणभाव समजून घेऊन, तो दर्शवणारी साधी परिकल्पना मांडतो व त्याच्या स्पष्टीकरणाकरता/पडताळणीकरता निरीक्षणाचा आधार घेतो. **अ) LO 7.2.2** निरीक्षणावर आधारित कल्पनांचा किंवा युक्त्यांचा उपयोग करतो. (उदा. गरम अन्नावर फुंकर घालण्याच्या प्रौढांच्या कृतीचे अनुकरण करतो.) **ब) LO 7.2.2** ज्ञात माहितीचा नवीन संदर्भात वापर करतो. (उदा. पुस्तकातील चित्राप्रमाणे ठोकळ्यांचा महाल/मनोरा बनवतो.) **ब) LO 7.2.5** शिक्षक व समवयस्कांच्या मदतीने, पर्यावरणातील घटना व प्रसंगांबाबतच्या सोप्या प्रश्नांची उत्तरे देतो. **क) LO 7.2.2** निरीक्षण करून सामान्यीकरण करतो. **क) LO 7.2.5** नैसर्गिक घटनांबाबत चिकित्सक प्रश्न विचारून, उत्तरे मिळविण्यासाठी समवयस्कांसोबत समन्वय साधतो/शोध घेतो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	निरीक्षण, तार्किक विचारशक्ती	
निरीक्षण करावयाच्या बाबी	बालकाच्या भाषिक कौशल्यांचे; जसे प्रश्नांची उत्तरे देणे, तसेच सहभागाचे निरीक्षण करावे.	

आधारशिला कृती क्र : 119. Countries and Culture : Know and Understand About the World		
उपक्रमाचे नाव	ओळख माझ्या भारत देशाची	
उपक्रमाला लागणारे साहित्य		
भारताचा नकाशा, भारताच्या विविध राज्यांचे कटआऊट्स, पझल्स	भारताच्या विविध राज्यातील लोकांचा पेहराव, जेवण, घरे यांची चित्रे. विविध राज्यांतील वैशिष्ट्ये दर्शवणारे व्हिडिओ, राज्यनिहाय नृत्य प्रकार.	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
कृती १ : • देशप्रेमावरील छोटी गीते, बालगीते म्हणून घ्यावीत. • भारताचा झेंडा दाखववावा. त्यामधील रंग ओळखण्यास सांगावे. • तिरंगा झेंडा बालकांनी कुठे व केव्हा पहिला आहे? अशाप्रकारे प्रश्न विचारावेत व चर्चा करावी. • भारताच्या विविध राष्ट्रीय प्रतीकांची ओळख चित्रकार्डांच्या माध्यमातून करून द्यावी. त्यावर चर्चा करावी.	**कृती १ : राष्ट्रीय प्रतीकांची चित्रे रंगवणे, तिरंगा झेंडा चित्र रंगवणे.** • बालकांना भारताच्या तिरंगा झेंड्याचे चित्र रंगविण्यास सांगावे, तसेच राष्ट्रीय फूल, फळ, प्राणी व पक्षी व झाड यांची चित्रे (आऊट लाईन) देऊन, चित्र रंगवण्यास सांगावे. • व्हिडिओच्या माध्यमातून बालकांना भारतातील विविध राज्यांतील वैशिष्ट्यपूर्ण बाबी दर्शवणारे व्हिडिओ दाखववावे व चर्चा करावी. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	**कृती १ : तिरंगा झेंडा चित्र काढून रंगवणे.** • बालकांना भारताच्या तिरंगा झेंड्याचे चित्र काढून रंगविण्यास सांगावे, तसेच राष्ट्रीय फूल, फळ, पक्षी व झाड यांची चित्रे रंगवण्यास सांगावे. • विविध राज्यांतील वैशिष्ट्यपूर्ण खाद्यपदार्थ – बालकांना राज्यांचे विविध पदार्थ दर्शवणारी चित्रकार्डे दाखवावीत. • ताईंनी आवश्यकतेनुसार संबंधित माहिती सांगावी. **कृती २ : करूया सफर** • भारताच्या विविध भागात लोक कसे राहतात, कोणते कपडे घालतात, काय खातात, घरे कशी असतात, घरे विशिष्ट पद्धतीची का असतात, यांविषयी चित्रफीत दाखवावी. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**
पंचकोश		
आनंदमय, विज्ञानमय कोश		
विविधता	आपल्या गावची वैशिष्ट्ये, स्थानिक संस्कृती यांची ओळख करून द्यावी; जसे की, विशिष्ट खाद्यपदार्थ, पोशाख, सण-उत्सव.	
थीम/विषय	मी, माझे कुटुंब व परिसर, मदतनीस	

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
ताईसाठी सूचना	वयोगटनिहाय उपलब्ध करून देण्यात आलेल्या कृतिपत्रिका सोडवून घ्याव्यात.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-12** बालके दृक् आणि ललित कलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात. **C-12.5** विविध कला, स्थानिक संस्कृती आणि वारसा यांची निर्मिती करताना आणि अनुभव घेताना, विविध प्रकारच्या प्रतिक्रियांना प्रतिसाद देतो व प्रशंसा करतो. **अ) LO 12.5.1** कलाकृतींबाबत आवडीनिवडी व इतर मते व्यक्त करताना शाब्दिक/अशाब्दिक प्रतिसाद देतो. **ब) LO 12.5.1** कलाकृती किंवा स्थानिक सांस्कृतिक अभिव्यक्ती यांच्या विविध पैलूंबाबत संवाद साधतो. (उदा. एखाद्या पात्राचा मोठा आणि थरथरणारा आवाज) **क) LO 12.5.1** विविध कलाकृती/रचना किंवा सांस्कृतिक अभिव्यक्ती यांची तुलना करतो आणि विविध प्रतिसाद शब्दांमध्ये स्पष्ट करतो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	सौंदर्यदृष्टी आणि संस्कृतीची ओळख.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	उपक्रमातील बालकांच्या सहभागाचे निरीक्षण करावे.	
आधारशिला कृती क्र : 120 Celebrating Heroes : Stories of National Pride		
उपक्रमाचे नाव	ओळख थोरा मोठ्यांची	
उपक्रमाला लागणारे साहित्य	थोर व्यक्तींचे, राष्ट्र पुरुषांचे फोटो	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
कृती : ओळख थोरांची • वर्गात विविध क्षेत्रांतील थोरांची चित्रे, फोटो लावून ठेवावेत. त्यांची नावे सांगावीत. कोणत्या क्षेत्रात मोठे नाव आहे ते सांगावे.	**कृती : ओळख थोरांची, गोष्टी मोठ्यांच्या** • काही थोर व्यक्तींच्या थोरांच्या गोष्टी सांगाव्यात. • २६ जानेवारी व १५ ऑगस्टचे महत्त्व सांगावे व दिनविशेष साजरे करावेत. • विविध क्षेत्रांत नाव कमावलेल्या व्यक्तीची ओळख करून द्यावी.	
पंचकोश		
विज्ञानमय कोश		

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
विविधता	चित्रांबरोबर चित्रफिती वापरून, तसेच स्थानिक महापुरुषांचा समावेश करून, विविधता आणता येईल.	
थीम/विषय	मी, माझे कुटुंब, परिसर, पाणी-पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन	
ताईसाठी सूचना	दिनविशेषाचे औचित्य साधून, संबंधित देशभक्त, राष्ट्रीय महापुरुष यांच्या जयंती, पुण्यतिथी कार्यक्रम परिपाठाच्या दरम्यान घ्यावयात. यासंदर्भाने उपलब्ध कार्यपुस्तिकेतील माहितीचा वापर करावा.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-12** बालके दृक् आणि ललितकलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात. **C-12.5** विविध कला, स्थानिक संस्कृती आणि वारसा यांची निर्मिती करताना आणि अनुभव घेताना विविध प्रकारच्या प्रतिक्रियांना प्रतिसाद देतो व प्रशंसा करतो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	संवेदनशीलता, राष्ट्राभिमान	
निरीक्षण करावयाच्या बाबी	अनुषंगिक उपक्रमात विद्यार्थी सहभागाचे निरीक्षण करावे.	
आधारशिला कृती क्र : 121 Throw and Catch The Ball		
उपक्रमाचे नाव	चेंडू फेकूया आणि झेलूया.	
उपक्रमाला लागणारे साहित्य	मोठा रंगीत चेंडू, प्लॅस्टिकचा चेंडू, कागदाचा चेंडू, कापडाचा चेंडू, विविध आकारांचे चेंडू, फुगे, रिंग, फ्रिसबी इ.	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
कृती : चेंडू झेलूया, पकडूया आणि ढकलूया. • आडव्या ओळीत बालकांना उभे करावे. एकेका बालकाबरोबर ताईंनी खालील कृती करून घ्याव्यात. १) ताईने घरंगळत सोडलेला मोठा रंगीत चेंडू, बालकाने दोन्ही हातांनी पकडावा.	**कृती : चेंडू झेलूया आणि फेकूया.** • बालकांना वर्तुळात उभे करा. ताईने दोन्ही हातांनी फेकलेला चेंडू बालकाने झेलावा. बालकाला पुन्हा ताईकडे फेकण्यास सांगावे. • ताईने काही अंतरावरून (अंदाजे पाच फूट) चेंडू बालकाकडे फेकावा आणि बालकाने दोन्ही हातांनी चेंडू पकडावा.	**कृती : चेंडू फेकूया, झेलूया.** • बालकांना वर्तुळात उभे करावे. जोडीदाराबरोबर समोरासमोर विविध आकारांचे चेंडू जोर लावून, ठरावीक अंतरावरून फेकण्याचा आणि झेलण्याचा सराव करण्यास सांगावे.

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
ताईंनी कमी अंतरावरून (अंदाजे तीन फूट) चेंडू बालकाकडे फेकावा आणि बालकाने दोन्ही हातांनी चेंडू पकडावा. २) ताईने बालकाला मोठा चेंडू वर फेकायला सांगून, तो झेलण्यास सांगावे.	• भिंतीवर वर्तुळ काढावे. त्या वर्तुळावर चेडू मारायला सांगणे.	• चेंडू मारून लगोरी पाडायला सांगावे.

पंचकोश	
अन्नमय कोश	
विविधता	प्लॅस्टिकचा चेंडू, कागदाचा चेंडू, कापडाचा चेंडू वापरावा. तुमच्याकडील अशा वेगवेगळ्या प्रकारच्या वस्तू वापरून, बालकांसोबत हा उपक्रम घ्यावा, तसेच त्याचे दृढीकरण करावे.
थीम/विषय	मी, माझे कुटुंब, परिसर, पाणी–पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन.
ताईसाठी सूचना	चेंडू फेकण्याच्या व झेलण्याच्या वेगवेगळ्या पद्धती जाणून घ्याव्यात.
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-3** सुदृढ आणि लवचीक शरीर विकसित होते. **C-3.1** विशिष्ट कृती करताना, ज्ञानेंद्रियांच्या संवेदना व शारीरिक हालचाली यांत समन्वय दर्शवतो. **अ) LO 3.1.1** चेंडू पकडणे, फेकणे आणि चेंडू लाथेने उडवणे या कृती नियंत्रितपणे करतो. **ब) LO 3.1.1** मोठा चेंडू झेलणे, फेकणे आणि लाथेने वेगाने चेंडू पुढे उडवणे या कृती जोर लावून करू शकतो. **ब) LO 3.1.2** जवळच्या लक्ष्यावरील चेंडू काही प्रमाणात अचूकतेने फेकतो. **क) LO 3.1.1** वेगवेगळ्या आकारांचे चेंडू झेलणे, फेकणे, आणि लाथेने उडवणे या कृतींमध्ये सुधारणा करतो.
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	स्थूल आणि सूक्ष्म स्नायू, कारक विकास, हस्तनेत्र समन्वय
निरीक्षण करावयाच्या बाबी	खेळातील सहभाग, उत्साह कसा आहे याचे निरीक्षण करावे. चेंडू फेकतो, झेलतो, पायाने उडवतो या क्रिया करताना, बलाचा वापर करतो का हे बघणे. प्रत्यक्ष झेलणे, पडकणे, चेंडू पायाने उडवणे इत्यादी. कृतीचे निरीक्षण करणे.

<table>
<tr><th colspan="3">आधारशिला कृती क्र : 121.1 Throw and Catch The Ball</th></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">चेंडू खेळूया – ढकलूया व पायाने उडवूया.</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">मोठा रंगीत चेंडू, प्लॅस्टिकचा चेंडू, कागदाचा चेंडू, कापडाचा चेंडू, विविध आकारांचे चेंडू, फुगे, रिंग, फ्रिसबी इ.</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td>कृती : चेंडू झेलूया, पकडूया आणि ढकलूया.
• आडव्या ओळीत बालकांना उभे करावे.
एकेका बालकाबरोबर ताईने खालील कृती करून घ्याव्यात.
१) ताईने बालकाकडे चेंडू फेकावा व त्याने तो झेलावा. त्याला ताईकडे पुन्हा फेकण्यास सांगावे.
२) बालकाला पायाच्या चवड्याच्या (अंगठ्याकडील) बाजूने चेंडू ढकलण्यास/लाथ मारण्यास सांगणे.
३) पायाने चेंडू भिंतीकडे ढकलायला सांगावा.</td><td>कृती १ : चेंडू फेकूया पायाने ढकलूया.
• जोडीदाराकडे उंचावरून चेंडू फेकण्यास सांगावे. ठरावीक अंतरावरून चेंडू बास्केट/बादलीमध्ये फेकण्यास सांगावे.
• ठरावीक अंतरावरून चेंडूने लगोरी फोडण्यास सांगावे.
• ठरावीक अंतरावरून उभे राहून भिंतीवर चेंडू फेकण्यास सांगावे.
कृती २ : चेंडू पायाने ढकलूया.
• बालकाला पायाच्या चवड्याच्या (अंगठ्याकडील) बाजूने चेंडू ढकलण्यास सांगणे.
• ताईने घरंगळत सोडलेला चेंडू, बालकाने त्याच्या पायाने ढकलणे. सर्व बालकांना चेंडू पायाने ढकलण्यास द्यावा.</td><td>कृती १ : चेंडू फेकूया पायाने ढकलूया.
• बालकाने एक दोन पावले टाकत समोरच्या दिशेने चेंडू फेकणे.
• जोडीदाराकडे बल लावून चेंडू फेकणे.
• बल लावून चेंडू पायाने उडवायला सांगणे.
कृती २ : चेंडू फेकूया, उडवूया आणि ढकलूया.
• विशिष्ट अंतरावर कोन किंवा बाटली (उपलब्ध वस्तू) चेंडूने उडवणे.
• चेंडू रिंगमधून टाकणे.
• मोठ्या चेंडूला पायाने किक मारणे/उडवणे/ढकलणे. पायाने ढकलत ढकलत पुढे जाणे.</td></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">अन्नमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">प्लॅस्टिकचा चेंडू, कागदाचा चेंडू, कापडाचा चेंडू वापरावा. तुमच्याकडील अशा वेगवेगळ्या प्रकारच्या वस्तू वापरून, बालकांसोबत हा उपक्रम घ्यावा. तसेच त्याचे दृढीकरण करावे.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">मी, माझे कुटुंब, परिसर, पाणी–पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन.</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">वर्गाबाहेरच्या मुक्त खेळात ही कृती घ्यावी.</td></tr>
</table>

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-3 सुदृढ आणि लवचीक शरीर विकसित होते.
C-3.1 विशिष्ट कृती करताना, ज्ञानेंद्रियांच्या संवेदना व शारीरिक हालचाली यांत समन्वय दर्शवतो.
अ) LO 3.1.1 चेंडू पकडणे, फेकणे आणि चेंडू लाथेने उडवणे या कृती नियंत्रितपणे करतो.
ब) LO 3.1.1 मोठा चेंडू झेलणे, फेकणे आणि लाथेने वेगाने चेंडू पुढे उडवणे या कृती जोर लावून करू शकतो.
ब) LO 3.1.2 जवळच्या लक्ष्यावरील चेंडू काही प्रमाणात अचूकतेने फेकतो.
क) LO 3.1.1 वेगवेगळ्या आकारांचे चेंडू झेलणे, फेकणे, आणि लाथेने उडवणे या कृतींमध्ये सुधारणा करतो.</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये</td><td colspan="2">स्थूल आणि सूक्ष्म स्नायू, कारक विकास, हस्तनेत्र समन्वय</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">खेळातील सहभाग, उत्साह कसा आहे याचे निरीक्षण करावे.
चेंडू फेकतो, झेलतो, पायाने उडवतो या क्रिया करताना बलाचा वापर करतो का, हे बघावे.
प्रत्यक्ष झेलणे, पडकणे, चेंडू पायाने उडवणे इ. कृतीचे निरीक्षण करावे.</td></tr>
<tr><td colspan="3">आधारशिला कृती क्र : 122 Keep your Balance</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">तोल सांभाळूया.</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">वही, पुठ्ठा, तांब्या, पेला, थाळी.</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td>कृती : आधार घेऊन एका पायावर उभे राहूया.
• ताईने बालकांना भिंतीचा आधार घेऊन, एका पायावर उभे राहून दाखवावे.
• आता ताईने बालकांना भिंतीचा आधार घेऊन उभे राहण्याची सूचना द्यावी आणि बालकांकडून कृती करून घ्याव्यात.</td><td>कृती : एका पायावर जास्त काळ उभे राहूया.
• ताईने एका पायावर उभे राहावे. बालकांना एक ते पाच अंक म्हणायला सांगावे.
• बालकांचे अंक म्हणून होईपर्यंत, ताईने एक पायावर तोल साधत उभे राहावे.
• आता हीच कृती ताईने बालकांना करायला सांगावी. ताईने एक ते पाच अंक म्हणावेत, तेव्हा बालकांना एका पायावर तोल साधत उभे राहायला सांगावे.</td><td>कृती : लंगडी घालूया.
• ताईने जमिनीवर १० ते १५ वर्तुळ एकमेकांना चिकटून आखून घ्यावेत.
• ताईने लंगडी घालत एका वर्तुळातून दुसऱ्या वर्तुळात पुढे जावे आणि आखलेले सगळे वर्तुळ पूर्ण करावे.
• बालकांना डोक्यावर वही, पुठ्ठा ठेवून चालण्यास सांगावे.
• तळहातावर पाण्याने भरलेला पेला घेऊन चालण्यास सांगावे.
• तळहातावर छोटी थाळी घेऊन चालण्यास सांगावे.</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
पंचकोश		
अन्नमय कोश		
विविधता	• बालकांना मित्रांच्या जोडीने एका पायावर उभे राहायला सांगावे. • बालकांना टेबलाला किंवा खुर्चीला धरून एका पायावर उभे राहायला सांगावे. • हातात काठी घेऊन जास्तीत जास्त वेळ एका पायावर उभे राहावे. • ताईने ४/५ टाळ्या वाजवणे व तोपर्यंत मुलांनी एका पायावर उभे राहावे. • वर्गाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत लंगडी घालत जायला सांगावे.	
थीम/विषय	मी, माझे कुटुंब, पाणी–पाऊस	
ताईसाठी सूचना	वर्गाबाहेरच्या मुक्त खेळात ही कृती घ्यावी.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-3** सुदृढ आणि लवचीक शरीर विकसित होते. **C-3.2** विविध शारीरिक कृतींमध्ये तोल, समन्वय आणि लवचिकता दर्शवतो. **अ) LO 3.2.1** आधाराने किंवा मदतीने एका पायावर उभे राहू शकतो. **ब) LO 3.2.1** एका पायावर जास्त काळासाठी आधाराशिवाय उभे राहू शकतो. **क) LO 3.2.1** १० ते १५ पावले एका पायावर उड्या मारतो. (लंगडी घालतो.)	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	तोल साधणे, लवचिकता, कारककौशल्य, तोल सांभाळणे, समन्वय साधणे.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	बालकांना आधार न घेता उभे राहता येते की नाही ते पाहावे.	
आधारशिला कृती क्र : 122.1 Keep your Balance		
उपक्रमाचे नाव	क्रियाकार्ड	
उपक्रमाला लागणारे साहित्य	जादूई पिटारामधील क्रियाकार्ड	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
कृती : • ताईने बालकांना रांगेत उभे करावे. • ताईने क्रियाकार्डातील एक एक क्रियाकार्ड दाखवावे व बालकांना त्याप्रमाणे क्रिया करण्यास	**कृती :** • ३ ते ४ वयोगटाच्या कृती घ्याव्यात. • चार चार बालकांचा एक गट करून, गटागटाने सामूहिक कृतिकार्ड दाखवावे.	**कृती : डोंगराला आग लागली पळा पळा** • खेळ घेऊन, ज्यावेळी जागेवर उभे राहण्यास सांगण्यात येईल तेव्हा ताईने एक क्रियाकार्ड दाखवावे.

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
सांगावे. सुरुवातीला थोडावेळ क्रियाकार्डानुसार क्रिया करून घ्यावी. हळूहळू वेळ वाढवावा.	कोणता गट जास्त वेळ कार्डाप्रमाणे कृती करेल, तो गट जिंकेल. याप्रमाणे गटागटाने खेळ घ्यावा.	• वर्तुळातील जे बालक सर्वांत शेवटपर्यंत स्वत: त्या क्रियेमध्ये जास्त वेळ उभे राहील. ते जिंकेल. याप्रमाणे वेगवेगळी क्रियाकार्ड दाखवून हा खेळ घ्यावा.

पंचकोश

अन्नमय, प्राणमय कोश

विविधता	वृक्षासन : जास्त वेळ कोण वृक्षासन करू शकेल, असा खेळ खेळावा. (बालकांना ताईने वृक्षासनाची स्थिती दाखवावी.)
थीम/विषय	मी, माझे कुटुंब व परिसर, वनस्पती (फुले, शेती, रंग), पक्षी व कीटक
ताईसाठी सूचना	महाराष्ट्राच्या जादुई पिटारामधील समाविष्ट क्रियाकार्डांचा वापर करावा. आवश्यकतेनुसार अधिकची क्रियाकार्डे स्वत: तयार करावी.
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-3** सुदृढ आणि लवचीक शरीर विकसित होते. **C-3.2** विविध शारीरिक कृतींमध्ये तोल, समन्वय आणि लवचिकता दर्शवतो. **अ) LO 3.2.1** आधाराने किंवा मदतीने एका पायावर उभे राहू शकतो. **ब) LO 3.2.1** एका पायावर जास्त काळासाठी आधाराशिवाय उभे राहू शकतो. **क) LO 3.2.1** १० ते १५ पावले एका पायावर उड्या मारतो. (लंगडी घालतो.)
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	तोल साधणे, लवचिकता, कारककौशल्य, तोल सांभाळणे, समन्वय साधणे.
निरीक्षण करावयाच्या बाबी	बालकांना आधार न घेता उभे राहता येते की नाही, ते पाहावे.

आधारशिला कृती क्र: 123. Yoga Exercises : Breathe, Stretch, Extend

उपक्रमाचे नाव	योग
उपक्रमाला लागणारे साहित्य	बसण्यासाठी चटई

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
कृती : उच्छ्वास (जोराने श्वास बाहेर सोडणे.) • बालकांना अर्धवर्तुळाकार बसवावे. बालकांना दीर्घश्वास	**कृती :** • ३ ते ४ वयोगटाच्या कृती करून घ्याव्यात व त्यानंतर पुढील कृती करून घ्याव्यात.	**कृती :** • ३ ते ५ च्या कृती करून घ्याव्यात. • बालकांना वर्तुळाकार बसवावे.

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
घेणे व सोडणे या कृती करून दाखवाव्या. • बालकांकडून कृती अनुकरणासह करून घ्यावी. • बालकांना परिपाठाच्या वेळी ताईने जोरात श्वास सोडण्याचे प्रात्यक्षिक करून दाखवावे. बालकांना उच्छ्वास कसा करावा, ते सांगून प्रत्यक्ष कृती घ्यावी. (उदा. पाच वेळा श्वास जोराने घेणे व सोडण्याची कृती करून घ्यावी.) छातीवर/पोटावर हात ठेवून, दीर्घ श्वास घेण्यास सांगावे व जोराने सोडण्यास सांगावे.	• सोपे व्यायाम प्रकार करून घ्यावे. १) खाली पुढे वाकणे. २) खाली बसून पायाचे अंगठे धरणे. ३) डाव्याबाजूस, उजव्याबाजूस बाजूस वाकणे. ४) उडी मारताना डाव्या उजव्या बाजूस वळणे. ५) स्वत:भोवती गिरक्या मारणे, डाव्या आणि उजव्या पायाने हवेत लाथ मारणे. ६) डाव्या आणि उजव्या हाताने हवेत फटकारणे. • बालकांना जमिनीवर झोपण्यास सांगावे. बालकांना अंग सैल सोडण्यास सांगावे. त्यांना त्यांचे पोट कसे वर खाली होत आहे त्याकडे लक्ष देण्यास सांगावे.	• ताईने बालकांना श्वासोच्छ्वास प्रात्यक्षिक करून दाखवावे. उदा. योगा प्रात्यक्षिकाचा व्हिडिओ. • बालकांना स्तब्ध बसवून डोळे बंद करून दीर्घश्वास घ्यायला लावावा. • श्वास आत-बाहेर करायला सांगून, तो गार-गरम ओळखायला लावावे. • श्वास नियंत्रण होण्यासाठी आवश्यक सराव घ्यावा. • सोपी आसने – वृक्षासन, ताडासन अशी सोपी आसने घ्यावीत. ताईने आधी अशी आसने करून दाखवावीत.
	पंचकोश	
	अन्नमय, प्राणमय कोश	
विविधता	• बालकांना मांडी घालून शांत बसण्यास सांगावे. • ध्यानमुद्रेत बसवून, बालकांकडून नाकाने श्वास सोडून ओम म्हणून घ्यावा. (तीन वेळा) • बालकांकडून दररोज प्रार्थनेच्या वेळी डोळे मिटून श्वासावर नियंत्रण ठेवण्याचा सराव करून घ्यावा.	
थीम/विषय	मी, माझे कुटुंब, परिसर, पाणी-पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन	
ताईसाठी सूचना	ताईने विविध योगासने घेण्यासाठी उपलब्ध कार्यपुस्तिकेमध्ये दिलेल्या सूचनांचा वापर करावा. सूचनेनुसार बालकांकडून सोपी योगासने करून घ्यावीत. सदर योगासने ताईने परिपाठाच्या वेळी एक दिवसाआड घ्यावीत.	

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-2** बालके ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात. **C-2.6** अनुभवांची सर्वंकष जाणीव होण्याकरिता, ज्ञानेंदियांमार्फत प्राप्त संवेदनांचे एकात्मिकरण करण्यास सुरुवात करतो. **अ) LO 2.6.1** जोराने श्वास बाहेर सोडणे. (उच्छ्वास) **ब) LO 2.6.2** अल्पकाळासाठी स्थिर बसतो किंवा पडून राहू शकतो. (शवासन करणे.) **क) LO 2.6.1** लयबद्धरीतीने श्वासोच्छ्वास करतो. **क) LO 2.6.2** स्थिर बसून अल्पकाळासाठी आपल्या श्वासावर लक्ष केंद्रित करतो/नियंत्रित ठेवतो. **CG-3** सुदृढ आणि लवचीक शरीर विकसित होते. **C-3.2** विविध शारीरिक कृतींमध्ये तोल, समन्वय आणि लवचिकता दर्शवतो. **अ) LO 3.2.1** आधाराने किंवा मदतीने एका पायावर उभे राहू शकतो. **अ) LO 3.2.2** अल्प वेळासाठी एक पायावर संतुलन साधू शकतो. **ब) LO 3.2.1** एका पायावर जास्त काळासाठी आधाराशिवाय उभे राहू शकतो. **क) LO 3.2.2.2** चांगले शारीरिक संतुलन दर्शवितो. जसे-मदतीशिवाय सायकल चालवितो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	• शारीरिक हालचालींवर नियंत्रण येणे. • श्वासावर नियंत्रण करता येते. • दीर्घश्वास घेतो व सोडतो.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	बालके श्वास आत बाहेर करण्याची क्रिया योग्यरीतीने करतात की नाही, या बाबींचे निरीक्षण करावे. बालके शवासनाची कृती योग्य पद्धतीने करतात का, याचे निरीक्षण करावे.	
आधारशिला कृती क्र : 124. Kick a Ball and Repeat		
उपक्रमाचे नाव	चेंडू पायाने ढकलूया	
उपक्रमाला लागणारे साहित्य	मोठा चेंडू	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
कृती : चेंडू पायाने ढकलूया. • बालकाला पायाच्या चवड्याच्या (अंगठ्याकडील) बाजूने चेंडू ढकलण्यास सांगावा.	**कृती : चेंडू पायाने ढकलूया.** • बालकाला पायाच्या चवड्याच्या (अंगठ्याकडील) बाजूने चेंडू ढकलण्यास सांगावा.	**कृती : चेंडू फेकूया, उडवूया आणि ढकलूया.** • विशिष्ट अंतरावरील कोन किंवा बाटली (उपलब्ध वस्तू) चेंडूने

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
• ताईने घरंगळत सोडलेला चेंडू बालकाने त्याच्या पायाने ढकलावा. • सर्व बालकांना चेंडू पायाने ढकलण्यास द्यावा.	• ताईने घरंगळत सोडलेला चेंडू बालकाने त्याच्या पायाने ढकलावा. • सर्व बालकांना चेंडू पायाने ढकलण्यास द्यावा.	उडवावी. चेंडू रिंगमधून टाकावा. मोठ्या चेंडूला पायाने लाथ मारवी/उडवावी/ढकलावी.

पंचकोश	
अन्नमय कोश	
विविधता	प्लॅस्टिकचा चेंडू, कागदाचा चेंडू, कापडाचा चेंडू वापरावा. तुमच्याकडील अशा वेगवेगळ्या प्रकारच्या वस्तू वापरून, बालकांसोबत हा उपक्रम घ्यावा, तसेच त्याचे दृढीकरण करावे.
थीम/विषय	मी, माझे कुटुंब, परिसर, पाणी–पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन.
ताईसाठी सूचना	चेंडूला किक् मारून फुटबॉल खेळण्याच्या कृती करून घ्याव्यात.
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-3** सुदृढ आणि लवचीक शरीर विकसित होते. **C-3.1** विशिष्ट कृती करताना ज्ञानेद्रिंयाच्या संवेदना व शारीरिक हालचाली यांत समन्वय दर्शवितो. **अ) LO 3.1.1** चेंडू पकडणे, फेकणे आणि चेंडू लाथेने उडवणे या कृती नियंत्रितपणे करतो. **ब) LO 3.1.1** मोठा चेंडू झेलणे, फेकणे आणि लाथेने वेगाने चेंडू पुढे उडवणे या कृती जोर लावून करू शकतो. **ब) LO 3.1.1** जवळच्या लक्ष्यावरील चेंडू काही प्रमाणात अचूकतेने फेकतो.
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	स्थूल आणि सूक्ष्म स्नायू, कारक विकास, हस्तनेत्र समन्वय
निरीक्षण करावयाच्या बाबी	• खेळातील सहभाग, उत्साह कसा आहे याचे निरीक्षण करावे. • चेंडू फेकतो, झेलतो, पायाने उडवतो या क्रिया करताना बलाचा वापर करतो का हे बघावे. • प्रत्यक्ष झेलणे, पडकणे, चेंडू पायाने उडवणे इ. कृतींचे निरीक्षण करावे.

<table>
<tr><th colspan="3">आधारशिला कृती क्र : 125 Walking Straight, Walking Curved</th></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">मजेशीर चालूया आणि उड्या मारूया.</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">खंजिरी, टाळ, खडू, दोरी, इ.</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td>कृती : सरळ रेषेत चालूया. चवड्यावर चालणे आणि धावणे.
• जमिनीवर सरळ रेष आखावी.
• ताईने सरळ रेषेवरून चालण्याचे प्रात्यक्षिक करून दाखवावे.
• बालकांना एकेकाने किंवा ओळीत उभे करून सरळ रेषेत चालण्यास सांगावे.
• चालताना समोर, वर, उजव्या आणि डाव्या बाजूला टाळ्या वाजवत चालण्यास सांगावे.
उलट पावली चालूया.
• वरील प्रमाणेच ताईने सरळ रेषेवरून उलट पावली चवड्यावर चालण्याचे प्रात्यक्षिक दाखवून, बालकांना अनुकरण करण्यास सांगावे.
धावूया.
• चालण्याचा पुरेसा सराव झाला, की बालकांना धावण्यास सांगावे.</td><td colspan="2">कृती १ : उड्या मारूया.
• पुढील प्रकारे वेगवेगळ्या उड्या मारण्याचे प्रात्यक्षिक दाखवून, बालकांना तशा उड्या मारण्यास सांगावे.
उड्या मारूया.
• जागेवर एक उडी आणि अनेक उड्या मारण्यास सांगावे. जिन्यावरून उड्या मारूया.
• जिन्याच्या सर्वांत खालच्या पायरीवर उभे राहून, तिथून खाली उडी मारण्यास सांगावे.
उंच उड्या मारूया.
• जागेवर साधी उडी आणि उंच उडी मारण्यास सांगावे.
उड्या प्राण्यांच्या
• पक्ष्यांचे आणि प्राण्यांचे आवाज आणि हातवारे करत उड्या माराव्यात. उदा. बेडूक उडी, माकड उडी, सशाची उडी
• टाळ्या वाजवत वरील सर्व प्रकारच्या उड्या मारायला सांगावे.
• छोटा पाट, छोटे डेस्क, छोटे स्टूल अशा चढत्या क्रमाने दोन ते अडीच फूट उंचीवरून उड्या मारण्यास सांगावे.</td></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">अन्नमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">• सरळ रेष आखण्याऐवजी शिडीसारखे चोकोन आखून, चौकोनातून किंवा फरशीच्या चौकोनातून अथवा फरशीच्या कडेवरून चालण्यास सांगावे.
• झांज किंवा घंटी वाजवत, सरळ रेषेत चालण्यास सांगावे. तोल सावरत चालण्यास सांगावे.
• टेबल, डेस्क, खुर्ची, छोट्या उंचीचा कट्टा अशा उंच वस्तूवरून तोल सावरत चालण्यास सांगावे.</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
	• दोन किंवा तीन बालकांचा गट करून, त्याचा चेंडू फेकणे आणि झेलणे, लाथेने ढकलणे आणि अडवणे अशा कृती करत खेळण्यास वाव द्यावा.	

थीम/विषय	प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक
ताईसाठी सूचना	–
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-3** सुदृढ आणि लवचीक शरीर विकसित होते. **C-3.4** एखादी वस्तू वाहून नेताना, चालताना, पळताना ताकद व चिकाटी दाखवतो. **अ) LO 3.4.1.1** सरळ रेषेत चालतो. **ब) LO 3.4.1.1** सरळ, नागमोडी, वक्ररेषेवर सहजतेने चालते. **क) LO 3.4.1.1** शारीरिक हालचालींचा सहजतेने समन्वय साधत चालतो व धावतो. **क) LO 3.4.1.2** हात डोक्यावर ताणून धरून, दहा मीटरपर्यंत चवड्यावर चालतो. (ताडासन)
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	• सूचनांचे पालन करता येते. पाय आणि नेत्र समन्वय • शारीरिक हालचालींवर नियंत्रण येणे.
निरीक्षण करावयाच्या बाबी	सूचनांचे पालन करता येते का? पाय आणि नेत्र समन्वय आहे का? शारीरिक हालचालींवर नियंत्रण आहे का? सगळ्या बालकांमध्ये खेळतो का? सर्व खेळांत सहभागी असतो का? याचे निरीक्षण करावे.

आधारशिला कृती क्र : 126. Playing Statues

उपक्रमाचे नाव	मूर्ती बनूया.
उपक्रमाला लागणारे साहित्य :	–

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे

कृती १ : आवाज ऐकून कृती करा.

- ताईने बालकांना वर्गाबाहेर घेऊन जावे.
- बालकांना वर्तुळाकार उभे करावे.
- ताईने मोबाइलवर बालकांना संगीत ऐकवावे.
- संगीत सुरू झाले, की पळायचे आणि संगीत थांबल्यावर पळणे थांबवायचे अशी सूचना द्यावी.
- याप्रमाणे खेळ घ्यावा.

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
कृती २ : मूर्ती बना/पुतळा • ताईने बालकांना वर्गाबाहेर घेऊन जावे. • बालकांना वर्तुळाकार उभे करावे. • ताईने बालकांना तोंडी सूचना द्याव्यात. • (ताईने) पळा पळा पळा पळा असे म्हणत रहावे. जेव्हा ताई अचानक 'मूर्ती' असे म्हणेल, तेव्हा बालकांनी एक मुर्ती/पुतळा बनून उभे राहावे. जसे : कोणाचे हात वर, कोणी तरी खाली बसलेले, डोक्यावर हात, व्यायाम करताना इत्यादी कोणतीही हालचाल न करता उभे राहावे. जी बालके हालचाल करतील ती आऊट होतील. • याप्रमाणे 'मूर्ती' हा खेळ घ्यावा.		

पंचकोश	
आनंदमय कोश	
विविधता	सूचना ऐकून असे वेगवेगळ्या कृतीचे खेळ घ्यावे.
थीम/विषय	ऋतू, मदतनीस
ताईसाठी सूचना	ताईने वर्गाबाहेर जागा नसल्यास वर्गात हा खेळ घ्यावा.
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-12** बालके दृक् आणि ललितकलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात. **C-12.2** संगीत, भूमिकाभिनय, नृत्य आणि विविध हालचाली यांची निर्मिती करण्यासाठी स्वतःचा आवाज, शरीर, जागा, आणि विविध वस्तू यांचा चौकसपणे उपयोग करतो व खेळतो. **अ) LO 12.2.4** रोजच्या प्रसंगामध्ये शांतता आणि स्थिरता यांचा वापर करतो. **ब) LO 12.2.4** संगीत, नाट्य आणि हालचाली यांच्या साहाय्याने शांतता आणि स्थिरता यांच्या बाबतीत प्रयोग करतो. **क) LO 12.2.4** संगीत, नाट्य आणि हालचाली यांच्या साहाय्याने शांतता आणि स्थिरता यांच्या बाबतीत प्रयोग करतो.
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	श्रवण कौशल्य, ऐकून कृती करण्याचे कौशल्य विकसित होणे.
निरीक्षण करावयाच्या बाबी	संगीत आणि सांगितलेल्या कृती ऐकून करणे बालकाला जमते आहे का? ज्या कृती सांगितल्या आहेत, त्याप्रमाणे बालक ऐकत आहे का? याचे निरीक्षण करावे.

<table>
<tr><th colspan="3">आधारशिला कृती क्र : 127. Creeping, Crawling, Rolling like Animals</th></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">प्राण्यांसारख्या हालचाली</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">–</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td>कृती : दिशा किंवा गती बदलून चालणे किंवा धावणे.
• बालकांना वर्गात विखरून उभे करावे.
• ताईने कृती सांगून, त्या कृतीचे प्रात्यक्षिक करून दाखवावे.
उदा. सरळ पुढे चाला/पळा. सरळ मागे चाला/लवकर लवकर चाला. उजवीकडे वळून चाला/पळा. डावीकडे वळून चाला/पळा. मागे वळून सरळ चाला/पळा.
• ताईने सूचना देऊन बालकांना त्या कृती करण्यास सांगावे.
• ताईने हातांच्या हालचाली करत चालण्यास आणि पळण्यास सांगावे.
उदा. हात वर करून चाला/पळा, हात समोर करून चाला/पळा, हात बाजूला करून चाला/पळा, हात पंखांसारखे हलवत चाला/पळा. (ससा, बेडूक, कासव)</td><td colspan="2">आवश्यक पूर्वतयारी : रेषा आखणे
कृती : सरळ, नागमोडी, वक्ररेषेवर चालणे.
• जमिनीवर सरळ, नागमोडी, वक्ररेषा आखाव्या.
• ताईने वरील सगळ्या रेषांवर चालण्याचे प्रात्यक्षिक करून दाखवावे व बालकांना त्याप्रमाणे अनुकरण करण्यास सांगावे.
• तोल सांभाळत चालणे
• ६ इंच रुंदी असलेल्या फळीवरून तोल सांभाळून चालण्यास सांगावे.
• जिना चढणे–उतरणे
• एका वेळी एकाच पायाचा वापर करून, जिना चढण्यास व उतरण्यास सांगावे.
• बोगदा पार करणे.
• मोठ्या रिकाम्या खोक्याचा बोगदा बनवून, त्यातून अलीकडे, पलीकडे जाण्यास सांगावे.
(हत्ती, उंट, जिराफ, ससा, हरिण बेडूक)
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td></tr>
<tr><th colspan="3">पंचकोश</th></tr>
<tr><td colspan="3">अन्नमय व आनंदमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">• चालताना किंवा पळताना टाळ्या वाजवण्यास सांगावे.
• झांज किंवा घंटेच्या तालाप्रमाणे, हळूहळू किंवा भरभर चालण्यास किंवा पळण्यास सांगावे.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक</td></tr>
</table>

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">विविध प्रकारे प्राण्यांच्या चालीच्या कृती करून घ्याव्यात. उपलब्ध कृतिपत्रिकेचा वापर करावा.</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-3 सुदृढ आणि लवचीक शरीर विकसित होते.
C-3.4 एखादी वस्तू वाहून नेताना, चालताना, पळताना ताकद व चिकाटी दाखवतो.
अ) LO 3.4.1.4 दिशा व गती बदलून सहजतेने चालतो किंवा धावतो.
ब) LO 3.4.1.1 सरळ, नागमोडी, वक्ररेषेवर सहजतेने चालतो.
क) LO 3.4.1.1 शारीरिक हालचालींचा सहजतेने समन्वय साधत चालतो, धावतो.</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्य</td><td colspan="2">प्राण्यांसारख्या उड्या मारण्याचे कौशल्य, शारीरिक लवचिकता निर्माण होणे.</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">पाय आणि नेत्र समन्वय साधता येतो का?</td></tr>
<tr><td colspan="3">आधारशिला कृती क्र : 127.1 Creeping, Crawling, Rolling like Animals</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">जिन्यावरचा खेळ</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">खडू, दोरी, लहान बाक, शिटी</td></tr>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>कृती १ : जिना चढूया, उडी मारूया
• ताईने पुढील क्रियांचे प्रात्यक्षिक करून दाखवावे आणि बालकांना करण्यास सांगावे.
• बालकांना जिन्याची एक पायरी चढून, तिथून खाली उडी मारण्यास सांगावे.
• बालकांना जिन्याच्या खालच्या पायरीवरून दुसऱ्या पायरीवर उडी मारण्यास सांगावे.
कृती २ : उडी मारताना टाळी
• बालकांना एका रेषेत किंवा वर्तुळाकार उभे करून उडी मारताना, हवेत असताना एक टाळी वाजवण्यास सांगावे.</td><td>कृती १ : जिना चढूया, उडी मारूया
• ताईने पुढील क्रियांचे प्रात्यक्षिक करून दाखवावे आणि बालकांना करण्यास सांगावे.
• बालकांना जिन्याच्या दोन पायऱ्या चढून तिथून खाली उडी मारण्यास सांगावे.
• बालकांना जिन्याच्या खालच्या पायरीवरून एक पायरी गाळून वर दुसऱ्या पायरीवर उडी मारण्यास सांगावे.
कृती २ : उडी मारताना टाळी
• बालकांना एका रेषेत किंवा वर्तुळाकार उभे करून उडी मारताना, हवेत असताना एक टाळी वाजवण्यास सांगावे.</td><td>कृती १ : जिना चढूया, उडी मारूया
• ताईने पुढील क्रियांचे प्रात्यक्षिक करून दाखवावे आणि बालकांना करण्यास सांगावे.
• बालकांना जिन्याच्या दोन पायऱ्या चढून तिथून खाली उडी मारण्यास सांगावे.
• बालकांना जिन्याच्या खालच्या पायरीवरून एक पायरी गाळून वर दुसऱ्या पायरीवर उडी मारण्यास सांगावे.
कृती २ : उडी मारताना टाळी
• बालकांना एका रेषेत किंवा वर्तुळाकार उभे करून उडी मारताना, हवेत असताना एक टाळी वाजवण्यास सांगावे.</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
• दोन दोन बालकांना समोरासमोर उभे करून, त्यांना उडी मारा आणि हवेत असताना एकमेकांना टाळी द्या असे सांगावे. तीन किंवा जास्त बालकांना वर्तुळाकारात उभे करून, त्यांना उडी मारताना शेजारच्या बालकास टाळी देण्यास सांगावे. **कृती ३ : लंगडी घालूया** • डाव्या पायाने लंगडी घालत सरळ रेषेत जाण्यास सांगावे. नंतर हीच कृती उजव्या पायाने लंगडी घालत करण्यास सांगावे. **कृती ४ : उड्या मारूया** • एक फूट उंच बाकावरून खाली उडी मारण्यास सांगावे.	• दोन दोन बालकांना समोरासमोर उभे करून त्यांना उडी मारा आणि हवेत असताना एकमेकांना टाळी द्या असे सांगावे. तीन किंवा जास्त बालकांना वर्तुळाकारात उभे करून, त्यांना उडी मारताना शेजारच्या बालकास टाळी देण्यास सांगावे. **कृती ३ : लंगडी घालूया** • डाव्या पायाने लंगडी घालत सरळ रेषेत जाण्यास सांगावे. नंतर हीच कृती उजव्या पायाने लंगडी घालत करण्यास सांगावे. **कृती ४ : उड्या मारूया** • एक फूट उंच बाकावरून खाली उडी मारण्यास सांगावे.	• दोन दोन बालकांना समोरासमोर उभे करून त्यांना उडी मारा आणि हवेत असताना एकमेकांना टाळी द्या असे सांगावे. तीन किंवा जास्त बालकांना वर्तुळाकारात उभे करून, त्यांना उडी मारताना शेजारच्या बालकास टाळी देण्यास सांगावे. **कृती ३ : लंगडी घालूया** • डाव्या पायाने लंगडी घालत सरळ रेषेत जाण्यास सांगावे. नंतर हीच कृती उजव्या पायाने लंगडी घालत करण्यास सांगावे. **कृती ४ : उड्या मारूया** • एक फूट उंच बाकावरून खाली उडी मारण्यास सांगावे.

पंचकोश	
अन्नमय व आनंदमय कोश	
विविधता	उड्या मारण्यासाठी बालकांना वेगवेगळ्या वस्तू द्याव्यात. कांदा फोडी सारखा खेळ, घ्यावा.
थीम/विषय	मी, माझे कुटुंब, परिसर, पाणी–पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन
ताईसाठी सूचना	वर्गाबाहेरील मुक्त खेळात ही कृती घ्यावी.
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-3** सुदृढ आणि लवचीक शरीर विकसित होते. **C-3.4** एखादी वस्तू वाहून नेताना, चालताना, पळताना ताकद व चिकाटी दाखवतो. **अ) LO 3.4.2.1** एका जागी उड्या मारतो. छोट्या अडथळ्यावरून उडी मारतो. **अ) LO 3.4.2.2** उंचावरून उडी मारून पायवरून स्थिर उभे राहतो. (उंची–२.५ ते ३ फुट)

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
	ब) LO 3.4.2 दोन्ही पायांनी उडी मारतो आणि एखाद्या कमी उंचीच्या वस्तूवरून कोणाच्या तरी सहाय्याने किंवा सहाय्य न घेता उडी मारतो. **क) LO 3.4.2** साधारण उंचीवरून सहजतेने उडी मारतो. (२ किंवा ३ पायऱ्यांवरूनच किंवा तीन फुटाच्या बाकावरून)	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	उड्या मारण्याचे कौशल्य, शारीरिक लवचिकता निर्माण होणे.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	पाय आणि नेत्र समन्वय साधता येतो का? हे पहावे.	
आधारशिला कृती क्र : 128 Run, Partner, Run!		
उपक्रमाचे नाव	चला पळूया.	
उपक्रमाला लागणारे साहित्य	ओढणी/दोरी,पोत, चेंडू	
कृती १ : • ताईने वर्गाच्या बाहेर जमिनीवर एक सरळ रेषा काढावी. त्या रेषेपासून ठरवीक अंतरापर्यंत बालकांना पळायला सांगावे. एका वेळी ४ बालकांना पळायला सांगावे. **कृती २ :** • बालकांना वेगवेगळ्या प्रकारे धावायला सांगा. उदा. मागे धावणे, सोबत धावणे, हात हलवत धावणे. **कृती ३ :** • ताईने बालकांच्या जोड्या तयार कराव्या. एका बालकाने मधल्या रेषेपर्यंत पळत जावे व दुसऱ्या बालकाकडे चेंडू द्यावा व त्याने पुढे शेवटच्या रेषेच्या बाहेर चेंडू घेऊन जावा.	३ ते ४ वयोगटाच्या कृती घ्याव्यात त्यानंतर पुढील कृती घ्याव्यात. **कृती १ : पोत्याची उडी** • ताईने बालकांना एका ओळीत उभे करावे. एका वेळी ४ बालकांना पळायला सांगावे. प्रत्येक बालकाला एक एक पोते द्यावे. • पोत्यात पाय घालून उड्या मारावयास सांगावे आणि कौशल्य आत्मसात झाल्यावर पोते उडीची स्पर्धा घ्यावी. **कृती २ : तीन पायांची शर्यत** • ताईने बालकांच्या जोड्या करून द्याव्यात. दोन बालकांना बाजूला उभे राहून एकाचा उजवा पाय दुसऱ्या बालकाच्या डाव्या पायाला बांधावा. तीन पायाने चालावयास सांगावे आणि कौशल्य प्राप्त झाल्यावर तीन पायाची शर्यत घ्यावी.	३ ते ५ वयोगटाच्या कृती घ्याव्यात. त्यानंतर पुढील कृती घ्याव्यात. **कृती : डॉच बॉल** • ताईने बालकांना मोठ्या वर्तुळात उभे करावे. • दोन बालकांना वर्तुळाच्या आत पळण्यासाठी पाठवावे. • वर्तुळात पळणाऱ्या बालकांना बाहेरच्या वर्तुळातील बालकांनी कमरेच्या खाली चेंडू मारून आऊट करायचे असे सांगावे. • वर्तुळात पळणाऱ्या बालकांनी चेंडू आपल्याला लागणारच नाही असे पळावे. • ज्या बालकांच्या कमरेखाली चेंडू लागला, तो आऊट असा खेळ पूर्ण करावा.

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
पंचकोश		
अन्नमय कोश		
विविधता	• प्राण्यांच्या चाली, वेगवेगळ्या अडथळ्यांच्या शर्यती, उड्या मारताना वेगवेगळ्या हालचाली अशा कृती करण्यास सांगावे. उदा. टाळ्या वाजवणे किंवा हात वर, समोर, बाजूला किंवा पक्ष्यासारखे हालवण्यास सांगावे. • झांज किंवा घंटेच्या तालाप्रमाणे हळूहळू किंवा भरभर उड्या मारण्यास सांगावे.	
थीम/विषय	मी, माझे कुटुंब, परिसर, पाणी–पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन	
ताईसाठी सूचना	विशेष बालकांसाठी सोपे खेळ निवडावे. त्यांना खेळताना मदत करावी.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-3** सुदृढ आणि लवचीक शरीर विकसित होते. **C-3.4** एखादी वस्तू वाहून नेताना, चालताना, पळताना ताकद व चिकाटी दाखवतो. **अ) LO 3.4.2.1** एका जागी उड्या मारतो. छोट्या अडथळ्यावरून उडी मारतो. **अ) LO 3.4.2.2** उंचावरून उडी मारून, पायावर स्थिर उभे राहतो. (उंची २.५ ते ३ फूट) **ब) LO 3.4.2** दोन्ही पायांनी उडी मारतो आणि एखाद्या कमी उंचीच्या वस्तूवरून कोणाच्या तरी सहाय्याने किंवा सहाय्य न घेता उडी मारतो. **क) LO 3.4.2** साधारण उंचीवरून सहजतेने उडी मारतो. (२ किंवा ३ पायऱ्यांवरूनच किंवा तीन फुटाच्या बाकावरून)	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	पळण्याचे कौशल्य, शारीरिक लवचिकता निर्माण होणे.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	पाय आणि नेत्र समन्वय साधता येतो का? सूचनांचे पालन करता येते का? हे पहावे.	
आधारशिला कृती क्र : 129 Jump Up, Jump Down, Jump All Around		
उपक्रमाचे नाव	वर खाली उड्या मारूया	
उपक्रमाला लागणारे साहित्य	दोरी, १ ते १० अंक/संख्या पत्ते	बटाटा, लहान टेबल, खेळातील कोन, रिंग/टायर

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
कृती : उड्या मारूया • पुढील प्रकारे वेगवेगळ्या उड्या मारण्याचे प्रात्यक्षिक दाखवून बालकांना तशा उड्या मारण्यास सांगावे. **उड्या मारूया.** • जागेवर एक उडी आणि अनेक उड्या मारण्यास सांगावे. **जिन्यावरून उड्या मारूया.** • जिन्याच्या सर्वांत खालच्या पायरीवर उभे राहून, तिथून खाली उडी मारण्यास सांगावे. **उंच उड्या मारूया** • जागेवर साधी उडी आणि उंच उडी मारण्यास सांगावे. **उड्या प्राण्यांच्या** • पक्ष्यांचे आणि प्राण्यांचे आवाज काढत आणि हातवारे करत उड्या मारणे. उदा. बेडूक उडी, माकड उडी, सशाची उडी • टाळ्या वाजवत वरील सर्व प्रकारच्या उड्या मारायला सांगावे. • छोटा पाट, छोटे डेस्क, छोटे स्टूल अशा चढत्या क्रमाने २ ते अडीच फूट उंचीवरून उड्या मारण्यास सांगावे.	**कृती : उडी मारणे.** • ताईने जमिनीवर दोरी ठेवावी व त्यावरून उडी मारून दाखवावे. व त्याप्रमाणे बालकांना कृती करण्यास सांगावे. **कृती २ :** अंक ऐकून उड्या मारणे. बालकांना ताईने मोठ्या वर्तुळात उभे करावे. बालकांना खालील अंक सांगून उड्या मारायला सांगणे. १) दोन पाय जुळवून उड्या मारणे. २) एक पाय वर, दुसरा खाली– १–२, १–२ अशा उड्या मारणे. ३) मागे उडी मारणे. ४) पुढे उडी मारणे. ५) डावीकडे उडी मारणे. ६) उजवीकडे उडी मारणे.	**कृती : शर्यत** • ताईने पुढील क्रियांचे प्रात्यक्षिक करून दाखवावे आणि बालकांना करण्यास सांगावे. **कृती १ : सोबत बटाटा, चालूया पटापटा** • प्रथम एका तळहातावर बटाटा घेऊन सरळ रेषेत चालण्यास सांगावे. नंतर दोन्ही तळहातांवर बटाटा घेऊन सरळ रेषेत चालण्यास सांगावे. **कृती २ : अडथळ्याची शर्यत** • जमिनीवर अडथळ्यासाठी वेग–वेगळ्या वस्तू ठेवून, बालकांची अडथळ्याची शर्यत घ्यावी.

पंचकोश	
आनंदमय कोश	
विविधता	• उड्या मारताना वेगवेगळ्या हालचाली करण्यास सांगावे. उदा. टाळ्या वाजवणे किंवा हात वर, समोर, बाजूला किंवा पक्ष्यासारखे हलवण्यास सांगावे.

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
	• झांज किंवा घंटेच्या तालाप्रमाणे हळूहळू किंवा भरभर उड्या मारण्यास सांगावे.	
थीम/विषय	मी, माझे कुटुंब, परिसर, पाणी–पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन	
ताईसाठी सूचना	वर्गाबाहेरील मुक्त खेळात या कृती घ्याव्यात.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-3** सुदृढ आणि लवचीक शरीर विकसित होते. **C 3.4** एखादी वस्तू वाहून नेताना, चालताना, पळताना ताकद व चिकाटी दाखवतो. **अ) LO 3.4.2.1** एका जागी उड्या मारतो. छोट्या अडथळ्यांवरून उडी मारतो. **अ) LO 3.4.2.2** उंचावरून उडी मारून, पायावर स्थिर उभे राहतो. (उंची २.५ ते ३ फूट) **ब) LO 3.4.2** दोन्ही पायांनी उडी मारतो आणि एखाद्या कमी उंचीच्या वस्तूवरून कोणाच्या तरी सहाय्याने किंवा सहाय्य न घेता उडी मारतो. **क) LO 3.4.2** साधारण उंचीवरून सहजतेने उडी मारतो. (२ किंवा ३ पायऱ्यांवरूनच किंवा तीन फुटाच्या बाकावरून)	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	उड्या मारण्याचे कौशल्य, शारीरिक लवचिकता निर्माण होण्यास मदत होईल.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	पाय आणि नेत्र समन्वय साधता येतो का? सूचनांचे पालन करता येते का?	
आधारशिला कृती क्र : 130. Ribbon Dance		
उपक्रमाचे नाव	रिबन डान्स करूया	
उपक्रमाला लागणारे साहित्य	रंगीबेरंगी रिबीन प्रत्येक बालकासाठी दोन रिबीन	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
कृती : रिबन डान्स/चेंडू फेकणे/स्थिर थांबणे (पुतळा बनणे)	**कृती १ : रिबन डान्स** • अंगणवाडी ताईने बालकांना वर्तुळात उभे करून, स्वत: वर्तुळात उभे रहावे. आपण नाच (नृत्य) करणार आहोत, याबद्दल बालकांना कल्पना	

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
• अंगणवाडी ताईने बालकांना वर्तुळात उभे करून, स्वत: वर्तुळात उभे रहावे. • आपण नाच (नृत्य) करणार आहोत, याबद्दल बालकांना कल्पना द्यावी. • प्रत्येक बालकाला प्रत्येकी दोन रिबीन द्याव्यात आणि त्यांना प्रत्यक्ष कृती करून दाखवावी. मोबाइलवर गाणी लावून किंवा ढोल/डफली वाजवून त्या तालावर नाचण्यास (नृत्य करायला) सांगावे.	द्यावी. प्रत्येक बालकांना प्रत्येकी दोन रिबीन द्याव्यात आणि त्यांना प्रत्यक्ष कृती करून दाखवावी. मोबाइलवर गाणी लावणे, गाण्याचा आवाज जसा लहान मोठा होईल, त्याप्रमाणे तालावर नाच (नृत्य) करायला सांगावे.	
पंचकोश		
आनंदमय कोश		
विविधता	रिबीनचा वापर करून नाच (नृत्य) करावा, आवाजानुसार दोरीवरील उड्या, जागेवर उड्या माराव्यात.	
थीम/विषय	वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू	
ताईसाठी सूचना	वर्गा बाहेरील मुक्त खेळात या कृती घ्याव्यात.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-12** बालके दृक् आणि ललितकलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात. **C 12.2** संगीत, भूमिकाभिनय, नृत्य आणि विविध हालचाली यांची निर्मिती करण्यासाठी स्वत:चा आवाज, शरीर, जागा, आणि विविध वस्तू यांचा चौकसपणे उपयोग करतो व खेळतो. **अ) LO 12.2.2** स्वत:चा आवाज, शरीर, वस्तू आणि वाद्यांचा वापर करून विविध ध्वनी निर्माण करतो. **ब) LO 12.2.2** आवाज, शरीर किंवा साधने यांचा वापर करून संदर्भ/परिस्थिती नुसार विविध ध्वनी निर्माण करतो. (भूमिका	

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
	अभिनय, एकल किंवा समूहामध्ये संगीतमय व्यवस्थित रचना, नकला यामध्ये) **क) LO 12.2.2.1** स्वत:च्या गाण्याचा आणि बोलण्याचा आवाज यांमध्ये फरक करतो आणि दोन्हीचा खेळकरपणे वापर करतो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	अवधान क्षमता, सर्जनशीलता, भावना प्रकटीकरण आणि आवाजातील फरक ओळखण्याची क्षमता विकसित होणे.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	लय किंवा आवाजातील फरक ओळखतो का, तालानुसार हालचाली करतो का, नाच (नृत्य) करताना काही वेगळ्या नवीन कृती करतो का, याचे निरीक्षण करावे.	
कृती क्र : 131		
उपक्रमाचे नाव	माझा खाऊ	
उपक्रमाला लागणारे साहित्य	फळे, पाणी, दूध, कागद, टरफले, खडू, पेन्सिल इत्यादी चित्रकार्ड पदार्थांची चित्रकार्डे, फळे, पेय यांची चित्रकार्ड.	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
• खाऊसाठी २ टाळ्या हा खेळ बालकांना पदार्थांची चित्रे दाखवून घ्यावा. • ताईने बालकांना वर्तुळाकार बसवून, त्यांना खाण्यास योग्य आणि अयोग्य अशा पदार्थांची नावे प्रत्येक बालकाच्या कानात सांगावी. • ही नावे ऐकल्यावर तो पदार्थ खाण्यायोग्य आहे किंवा नाही हे ठरवून, बालकाने मोठ्याने पदार्थाचे नाव आणि तो खाण्यास योग्य की अयोग्य ते सांगावे आणि जागेवर जाऊन बसावे.	**कृती १ : वेगवेगळा खाऊ खाऊया.** • ताईने बालकांना डब्यात रोज वेगवेगळे पदार्थ आणण्यास सांगावे. • पोषक आहार मिळत असेल, तर पालकांना घरी पदार्थ करण्यास सांगावे. उदा. पालेभाजी, डाळ/वरण/आमटी, भाकरी इत्यादी.	

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">आनंदमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">डब्यात रोज वेगवेगळ्या भाज्या, पराठे आणण्यास सांगावे.
बालकाने खाताना उजव्या हाताने खावे व एकाच हाताचा उपयोग करावा. डब्यातील अन्न न सांडता खाण्याचा प्रयत्न करावा. याबाबत प्रात्यक्षिकातून सजग करावे. काही पदार्थ प्यावे लागतात, काही पदार्थ चावून खावे लागतात, काही पदार्थ चोखूनही खावे लागतात. ही पदार्थांच्या खाण्याबाबतची विविधता बालकांना मूक अभिनयातून दर्शवावी. मूक अभिनयाद्वारे हे गमतीदार सादरीकरण करून घ्यावे.</td></tr>
<tr><td>प्रकल्प विषय</td><td colspan="2">मी, माझे कुटुंब व परिसर, भाज्या व फळे, ऋतू</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">–</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-1 बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात.
C-1 पोषक आहारात रुची आणि समज दर्शवतात व अन्नपदार्थ वाया घालवत नाही.
अ) LO 1.1.1.1 खाण्यास योग्य आणि खाण्यास अयोग्य अन्नपदार्थ ओळखतो.
ब) LO 1.1.1 मोठ्यांच्या सांगण्यानुसार वेगवेगळे अन्नपदार्थ खातो. (उदा. धान्य, भाज्या, फळे, डाळी, शेंगा, सुकामेवा (Nuts), दुधाचे पदार्थ.)
क) LO 1.1.1 स्वतःहून विविध अन्नपदार्थ खातो.</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्य</td><td colspan="2">संभाषण, वर्गीकरण, विश्लेषण, निर्णय क्षमता, तर्क क्षमता, कार्यकारण संबंध, सादरीकरण, अभिनय</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">• खाण्यायोग्य आणि खाण्यास अयोग्य पदार्थ ओळखू शकतो का?
• बालक त्याच्या पोषणास आवश्यक सर्व पदार्थ व सर्व चवींचे (उदा., आंबड, गोड, तिखट इत्यादी) पदार्थ व्यवस्थित खातो का? हे पहावे.</td></tr>
<tr><td colspan="3">कृती क्र : 132</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">मी माझे कपडे घालतो.</td></tr>
<tr><td colspan="3">उपक्रमाला लागणारे साहित्य</td></tr>
<tr><td colspan="2">बालकांचे नेहमी वापरायचे कपडे – शर्ट, झगा, चड्डी, मोजे, चप्पल, बूट.</td><td>दोरा, सुई, फुले, पाने इत्यादी.</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
कृती : कपडे-बूट घालू • बालकांना कपडे घालण्याच्या पद्धतीचे प्रात्यक्षिक करून दाखवावे. • बालकाला स्वतःचे कपडे स्वतःच घालण्यास सांगावे. • बालकांना चप्पल किंवा बूट घालण्याच्या पद्धतीचे प्रात्यक्षिक करून दाखवावे व बालकास अनुकरण करण्यास सांगितले असता, तो प्रयत्न करतो का? याचे निरीक्षण करावे. • स्वमदत कार्ये करण्यास प्रोत्साहन द्यावे.	**कृती : कपडे-बूट घालू** • बालकांना कपडे घालण्याच्या पद्धतीचे प्रात्यक्षिक करून दाखवावे. • प्रत्येक बालकाला किंवा दोन-दोन बालकांच्या गटात एक शर्ट द्यावा (घरून येताना बालकांना शर्ट, व बालिकांना फ्रॉक आणायला सांगावा.) व बटण लावण्यास सांगावे. • मोजे व बूट मित्राला घालायला सांगावे. • स्वमदत कार्ये करण्यास प्रोत्साहन द्यावे.	**कृती : तोरण बनवणे** • फुले, पाने इत्यादी सुईने दोऱ्यात ओवण्याचे प्रात्यक्षिक दाखवावे व प्रत्यक्ष गटामध्ये कृती करावयास द्यावी. • स्वमदत कार्ये करण्यास प्रोत्साहन द्यावे.

पंचकोश	
अन्नमय, प्राणमय, मनोमय कोश	
विविधता	• प्रत्येक बालकाला किंवा दोन दोन बालकांच्या गटात एक शर्ट द्यावा. • घरून येताना बालकांना शर्ट आणायला सांगावे व बटण लावण्यास सांगावे. • कापडावर धाव दोरा घालण्यास द्यावा. • तोरण तयार करण्यास सांगावे.
थीम/विषय	मी, माझे कुटुंब व परिसर, ऋतू
ताईसाठी सूचना	-
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-1** बालक त्याला निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात. **C-1.2** स्वत:ची मूलभूत काळजी आणि स्वच्छता यांचा अवलंब करतो. **अ) LO 1.2.2** स्वतः कपडे घालतो. बटण लावण्यासाठी व स्वतःच्या पायात चप्पल/बूट घालण्यासाठी मोठ्यांची मदत घेतो. **ब) LO 1.2.2** मदतीशिवाय स्वतः कपडे, चप्पल/बूट घालतो. **क) LO 1.2.2** देखरेखीखाली सुई-दोरा वापरून सोपे शिवणकाम करायला सुरुवात करतो.

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	• सूक्ष्म स्नायूंचा विकास, नेत्र-हस्त समन्वय विकास, स्वच्छतेची आवड निर्माण होणे.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	• सूक्ष्म स्नायूंचा विकास झाला आहे का? • नेत्र हस्त समन्वय विकसित झाला आहे का?	
कृती क्र : 133		
उपक्रमाचे नाव	भांडी स्वच्छ करूया.	
उपक्रमाला लागणारे साहित्य		
ताट, वाटी, डबा, साबण, पाणी इत्यादी.	ताट, वाटी, पेला, वर्गात उपलब्ध असणारी भांडी.	ताट, वाटी, डबा, बाटली, पाणी, भांडी घासण्याचा साबण, बालकांच्या हाताला लागणार नाही अशी घासणी.
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
कृती : अस्वछ ताटल्या विसळूया. • ताईने जेवणानंतर बालकांना आपली ताटली स्वच्छ आहे का? असा प्रश्न विचारावा. स्वच्छ नसलेली ताटली ठेवण्याची जागा ताईने बालकांना दाखवावी. • बालकांना दाखवलेल्या जागी ताटली ठेवायला सांगणे. प्रत्येक बालकाकडून योग्य ठिकाणी ताटली ठेवण्याची कृती करून घ्यावी. • ताईने ताटली स्वच्छ कशी करावी याचे प्रात्यक्षिक करून दाखवावे व बालकांकडून करून घ्यावे. • स्वच्छतेचे गाणे शिकवावे.	**कृती : स्वच्छ-अस्वच्छ वस्तूंचे वर्गीकरण करणे.** • स्वच्छ वस्तू ठेवण्याच्या जागी धुतलेल्या भांड्यांची चित्रे आणि खरकटी भांडी ठेवण्याचा जागी खरकट्या भांड्यांचे चित्र लावावे. • ताईंनी बालकांना स्वच्छ वस्तू ठेवण्यासाठी, धुतलेल्या भाड्यांची चित्रे आणि खरकटी भांडी ठेवण्याच्या जागी खरकट्या भांड्यांची लावलेली चित्रे दाखवावी. • बालकांना खरकटे आणि धुतलेले ताट, वाटी, पेले वेगळे करून दाखवावे. • बालकांना त्यांच्या ताटलीभोवती सांडलेले खरकटे अन्नस्वच्छ करण्यास सांगावे. • स्वच्छतेचे गाणे शिकवावे.	**कृती : भांडी स्वच्छ करूया** • जेवण झाल्यानंतर ताईने बालकांना भांडी घासण्याच्या जागी घेऊन जावे. ताईने तिचा डबा घासून आणि धुऊन दाखवावा. • बालकांना आपापले डबे घासायला आणि धुवायला सांगावे. • प्रत्येक बालकाकडून वरील कृती करून घ्यावी. • ताईनी बालकांना घरीही कामे करण्यास कामात मदत करण्यास प्रोत्साहन द्यावे. • स्वच्छतेचे गाणे शिकवावावे.

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">अन्नमय, मनोमय, प्राणमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">• बालकांकडून जेवत असल्याचे नाट्यीकरण करून घ्यावे.
• सर्व बालकांना रोज जेवल्यानंतर, योग्य जागी योग्य भांडी ठेवण्याची आठवण करून द्यावी.
• रंगकाम, मातीकाम केल्यानंतर वापरलेल्या वस्तू जसे – वाटी, ताटली, ब्रश, चमचे बालकांना धुऊन स्वच्छ करायला सांगावे.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">• मी, माझे कुटुंब व परिसर, पाणी–पाऊस</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">• दैनंदिन कृतीमध्ये स्वच्छतेचा वापर करण्यास प्रोत्साहन द्यावे.</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-1 बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात.
C-1.3 शाळा व वर्ग स्वच्छ आणि नीटनेटके ठेवतो.
अ) LO 1.3.2 मोठ्यांच्या मदतीने अस्वच्छ (खरकटे) ताटल्या आणि भांडी ठरवलेल्या जागी ठेवतो.
ब) LO 1.3.2 स्वच्छ पेले, ताटल्या ओळखतो आणि वापरतो तसेच स्वतंत्रपणे अस्वच्छ (खरकटे) ताटल्या आणि भांडी ठरवलेल्या जागी ठेवतो.
क) LO 1.3.2 स्वतःच्या ताटल्या आणि भांडी स्वच्छ करतो.</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये</td><td colspan="2">स्वावलंबन, स्वच्छतेची जाणीव, नीटनेटकेपणा</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">बालकांना खरकट्या वस्तू समजतात की नाही याचे निरीक्षण करावे.
स्वच्छ केलेल्या ताटल्या आणि भांडी ते ठरवलेल्या जागी ठेवता येतात की नाही याचे निरीक्षण करावे.
दैनंदिन कृतीत स्वच्छता पाळातो का हे पाहावे.</td></tr>
<tr><td colspan="3">कृती क्र : 134</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">फुंकर मारूया.</td></tr>
<tr><td colspan="3">उपक्रमाला लागणारे साहित्य</td></tr>
<tr><td>कागद, फुगे, साबणाचे पाणी, कापूस, वाळलेली पाने, हलके चेंडू इत्यादी.</td><td>कागद, फुगे, साबणाचे पाणी, कापूस, वाळलेली पाने, हलके चेंडू इत्यादी.</td><td>कागद, रंग इत्यादी.</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
कृती १ : हलक्या वस्तू फुंकर मारून उडवणे/पुढे ढकलणे. **कृती २ : फुंकर मारू-कपटे उडवू** • ताईने छोटे छोटे कागदाचे कपटे फुंकर मारून उडवून दाखवावे वनंतर बालकांकडून प्रत्यक्ष कृती करून घ्यावी. • बालकांकडून कृती करून घेताना त्यानांच तुकडे फाडायला सांगावे व फुंकर मारून उडवायला सांगावे. • बालकांना तोंडाने स्ट्रॉच्या साहाय्याने पाण्यावर फुंकर मारायला सांगावे. • कागदावर रंगाचे थेंब टाकून स्ट्रॉने फुंकर मारायला सांगावे.	**कृती १ : फुंकर मारू - वस्तू उडवू,** • फुगे, कापूस, वाळलेली पाने, कागदी कप तोंडाने फुंकर मारून पुढे ढकलण्यास सांगावे. **कृती २ : साबणाचे फुगे** • साबणाचे पाणी करून त्यात स्ट्रॉ बुडवून हवेत साबणाचे फुगे फुंकर घालून उडवणे अशी कृती घ्यावी. • फुंकर घालून आणखी कोणकोणत्या वस्तू हवेत उडवता येतात, त्यांची नावे विचारून घ्यावी. • ४ वर्षे बालकांना दिलेल्या कृती याही बालकंकडून करून घ्याव्यात.	**कृती १ : वयोगट ३ ते ५ च्या कृती आधी घेणे.** **कृती २ : फुंकर चित्र** • बालकांना अर्धवर्तुळात बसवावे. बालकांना एक एक कागद द्यावा. त्यावर निळा, पिवळा, लाल, केशरी, हिरवा या रंगांचे थेंब ब्रशने टाकावे. • रंगांच्या थेंबांवर फुंकर मारून, रंग पसरवून बालकांना त्याचे चित्र तयार करायला सांगावे. • फुगा फुगवून घेणे.

पंचकोश	
प्राणमय, अन्नमय कोश	
विविधता	• कागदाचे अगदी छोटे तुकडे करून ते स्ट्रॉ ने एका वाटीतून श्वास घेऊन, उचलावेत व दुसऱ्या वाटीत श्वास सोडून टाकावेत. • वाळलेली पाने, कापडाचे तुकडे, कागदी ग्लास फुंकर मारून हलवावे.
थीम/विषय	मी, माझे कुटुंब व परिसर
ताईसाठी सूचना	-
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-2** बालके ज्ञानेंद्रियांची कुशलता विकसित करतात. **C-2.6** अनुभवांची सर्वंकष जाणीव होण्याकरिता ज्ञानेंद्रियामार्फत प्राप्त संवेदनांचे एकात्मीकरण करण्यास सुरुवात करतो. **ब) LO 2.6.1** हलक्या वस्तूंना जोरात फुंकर घालून उडवतो. उदाहरणार्थ, कागद.
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	• श्वासावर नियंत्रण ठेवता येते, निरीक्षण क्षमतेचा विकास होतो.
निरीक्षण करावयाच्या बाबी	• बालके फुंकर कशा पद्धतीने मारतात, याचे निरीक्षण करावे.

<table>
<tr><th colspan="3">कृती क्र : 135</th></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">रंगकाम करूया</td></tr>
<tr><td colspan="3">उपक्रमाला लागणारे साहित्य</td></tr>
<tr><td>मोठा कोरा कागद, तेलकट खडू इत्यादी.</td><td>कागद, तेलकट खडू इत्यादी.</td><td>कागद, जलरंग तयार करून द्यावे रंगपेटी, ठोकळे इत्यादी.</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td>कृती : गिरगिटणे
सूक्ष्म स्नायूंचा विकास
• ताईने एका गटात ५ बालके असे गट करून, त्यांना वर्तुळात बसवावे. दोन्ही गटांना वेगळेवेगळे साहित्य द्यावे.
• काही गटांना धूळपाटीवर किंवा रांगोळीत गिरगिटायला लावावे. काही गटातील बालकांना कागद द्यावे. त्यांना कागदावर पेन्सिलच्या साहाय्याने मुक्तपणे गिरगिटायला सांगावे.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td><td>कृती : हस्त–नेत्र समन्वय
३ ते ४ वर्षे वयोगटाची कृती घेणे.
कृती १ : आकारात रंगकाम
• सूक्ष्म स्नायूंचा विकास : ताईने एका गटात ५ बालके असे गट करून, त्यांना वर्तुळात बसवावे. दोन्ही गटांना वेगळेवेगळे साहित्य द्यावे.
• A4 आकाराचा कागद घ्यावा. त्यावर मोठा भोपळा असा आकार काढून द्यावा. भोपळ्याच्या चित्राच्या आत रंगवा अशी सूचना द्यावी.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td><td>कृती : आकारात रंगकाम
३ ते ४ व ४ ते ५ वर्षे वयोगटाच्या कृती आधी घेणे.
कृती १ :
• सूक्ष्म स्नायूंचा विकास : ताईने एका गटात ५ बालके असे गट करून, त्यांना वर्तुळात बसवावे. दोन्ही गटांना वेगळेवेगळे साहित्य द्यावे.
• A4 आकाराचा कागद घ्यावा. त्यावर पाने, फुले असे आकार काढून देऊन ते रंगवायला लावावे. चित्राच्या आत रंगवा अशी सूचना द्यावी.
• असे वेगवेगळे आकार काढून बालकांना रंगकाम करण्यास द्यावे.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">अन्नमय, प्राणमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">• टायर फिरवणे, ठोकळ्यांचा मनोरा, ठिकरीचा मनोरा, भांड्यांचा/वाट्यांचा मनोरा लावणे. एका हाताने ग्लास पकडणे, प्राण्यांसारखे चालायला लावणे, मणी ओवणे, मोठी बटणे लावणे, रंगीत खडू पकडणे, चमच्यातील पदार्थ न सांडता चमचा पकडणे. अशा कृती करून घ्याव्यात.</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
थीम/विषय	मी, माझे कुटुंब, परिसर, पाऊस-पाणी, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन	
ताईसाठी सूचना	कृतिपुस्तिकेतील कृती करून घ्यावी.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-3** सुदृढ आणि लवचीक शरीर विकसित होते. **C 3. 3** हाताने कृती करताना हात व बोटे यांच्या हालचालींमध्ये अचूकता आणि नियंत्रण दर्शवतो. **अ) LO 3.3.1** साध्या कृतीमध्ये सूक्ष्म स्नायूंचा विकास, हस्त-नेत्र समन्वय आणि स्नायूंमधील बळकटपणा दर्शवितो. (उदा. गिरगिटणे, कागद फाडणे, चिकटवणे, मुक्तपणे रंगवणे, मातकाम.) **ब) LO 3.3.1** ज्या कृती करताना सूक्ष्म स्नायूंचा वापर केला जातो, तसेच हस्त-नेत्र समन्वयात काही प्रमाणात अचूकता लागते, अशा कृती करताना स्नायूंवर नियंत्रण दर्शवतो. (उदा. मोठे आकार कापणे, मोठे मणी ओवणे, बटण लावणे, स्क्रू लावणे, बाटलीचे झाकण लावणे-उघडणे, तेली खडूंचा वापर करून चित्र काढणे.) **क) LO 3.3.1** जास्त अचूकता लागणाऱ्या कृती, सूक्ष्म स्नायूंच्या समन्वयाने थोड्या मदतीस करतो. (उदा. पेन्सिलने चित्र काढणे, सरळ रेषेवर किंवा वक्ररेषेवर कापणे, छोटे मणी ओवणे.)	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	सूक्ष्म स्नायूंचे बळकटीकरण, हस्त-नेत्र समन्वय, कल्पनाशक्तीला वाव, अचूकता व नियंत्रण	
निरीक्षण करावयाच्या बाबी	• वरील कृती करत असताना, बालके हात, बोटे, अंगठा यांचा योग्य उपयोग करतात का याचे निरीक्षण करावे. • बालके एका हाताने व दोन्ही हातांनी कोणकोणत्या कृती करतात हे पाहावे. • हस्त-नेत्र समन्वय साधण्यासाठी घेतलेल्या कृती, बालके योग्य रीतीने करतात की नाही, याचे निरीक्षण करावे.	

<table>
<tr><th colspan="3">कृती क्र : 136</th></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">मलापण करता येते.</td></tr>
<tr><td colspan="3">उपक्रमाला लागणारे साहित्य</td></tr>
<tr><td>कागद, दोऱ्याचे रीळ, जाड दोरा, बाटली, चिंध्या, कागद, वेगवेगळ्या दट्ट्यापेटी इत्यादी.</td><td>कागद, मणी, बटणे व बाटलीचे झाकण इत्यादी.</td><td>बारिक, मणी, माती, रेती, कृत्रिम फुले, चाळणी, बोथट सुई-दोरा, भिंगरी विविध प्रकारच्या शेंगा इत्यादी.</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td>कृती : बाटलीमध्ये वस्तू भरूया.
सूक्ष्म स्नायूंचा विकास :
• ताईने एका गटात ५ बालके याप्रमाणे गट करून, त्यांना वर्तुळात बसवावे. दोन्ही गटांना वेगळेवेगळे साहित्य द्यावे.
• बाटलीमध्ये कागदाचे बोळे, कापडाच्या चिंध्या, कागदाचे तुकडे भरायला सांगावे.
• एका बादलीतून दुसऱ्या बादलीत मागाने पाणी ओतणे.
• एका मगाने दुसऱ्या मगात पाणी ओतणे.
कृती ३ : मणी ओवूया
• दोऱ्याचा रिकामे रीळ घेऊन, त्याची तीन सारखे भाग करून द्यावी.
• बालकांना ते जाड दोऱ्यामध्ये ओवण्यासाठी द्यावे.
• कागदाचे वेगवेगळ्या आकारांचे मणी करून ओवण्यास द्यावे.</td><td>कृती : हस्त-नेत्र समन्वय
३ ते ४ वर्षे वयोगटाच्या कृती घेणे.
• सूक्ष्म स्नायूंचा विकास : ताईने एका गटात ५ बालके याप्रमाणे गट करून, त्यांना वर्तुळात बसवावे. दोन्ही गटांना वेगळेवेगळे साहित्य द्यावे.
कृती १ : चेन लावूया, लेस बांधूया
• दप्तराची चेन काढणे/लावणे इत्यादी कृती द्याव्यात.
• जादुई पिटाऱ्यातील लेसिंग बोर्डची कृती करून घ्यावी.
• जादूई पिटाऱ्यातील लेसमध्ये मणी ओवून घ्यावेत.</td><td>३ ते ५ वर्षे वयोगटाच्या कृती घेणे.
कृती १ : चाळणे, सोलणे.
• साले सोलूया : भाजलेल्या शेंगदाण्याची साले सोलणे, मटाराच्या शेंगा सोलणे, कोथिंबीर निवडणे अशा कृती बालकांकडून करून घ्याव्यात.
• माती/रेती चाळूया बालकांना पिठाची चाळणी देऊन त्याद्वारे माती/रेती/ पीठ चाळण्यास सांगावे.
कृती २ : भिंगरी फिरवूया
• बोटांनी भिंगरी फिरवण्यास द्यावी.
कृती ३ : मणी ओवूया.
• साधारणपणे शाबुदाण्याच्या आकाराचे रंगीत मणी बालकांना द्यावेत.
• बोथट सुईत दोरा ओवण्यास सांगावे. त्यानंतर सुईच्या मदतीने रंगीत मणी दोऱ्यात ओवण्यास सांगावे.</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
पंचकोश		
अन्नमय, प्राणमय कोश		
विविधता	• उदा. टायर फिरवणे, ठोकळ्यांचा मनोरा, ठिकरीचा मनोरा, भाड्यांचा/वाट्यांचा मनोरा लावणे. एका हाताने ग्लास पकडणे, प्राण्यांसारखे चालायला लावणे, मणी ओवणे, मोठी बटणे लावणे, रंगीत खडू पकडणे, चमच्यातील पदार्थ न सांडता चमचा पकडणे अशा कृती करून घ्याव्यात. • हस्त–नेत्र समन्वय विकसित करण्यासाठी व स्नायूंची ताकद वाढवण्यासाठी काही पारंपरिक खेळ, उपक्रम व कृती घ्याव्यात. • उदा. खडापाणी, सागरगोटे, दोरावरील उड्या, विटी–दांडू, रुमालपाणी, झिम्मा–फुगडी, दोरीवर भिंतीवर चढणे.	
थीम/विषय	मी, माझे कुटुंब, परिसर, पाणी–पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन	
ताईसाठी सूचना	दिव्यांग बालकांचाही समावेश करून घ्यावा.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-3** सुदृढ आणि लवचीक शरीर विकसित होते. **C 3. 3** हाताने कृती करताना हात व बोटे यांच्या हालचालींमध्ये अचूकता आणि नियंत्रण दर्शवतो. **अ) LO 3.3.1** साध्या कृतींमध्ये सूक्ष्म स्नायू विकास, हस्त–नेत्र समन्वय आणि स्नायूंमधील बळकटपणा दर्शवतो.(उदा. गिरगिटणे, कागद फाडणे, चिकटवणे, मुक्तपणे रंगवणे, मातीकाम) **ब) LO 3.3.1** ज्या कृती करताना सूक्ष्म स्नायूंचा वापर केला जातो तसेच हस्त–नेत्र समन्वयात काही प्रमाणात अचूकता लागते, अशा कृती करताना स्नायूंवर नियंत्रण दर्शवतो. (उदा. मोठे आकार कापणे, मोठे मणी ओवणे, बटण लावणे, स्क्रू लावणे, बाटलीचे झाकण लावणे–उघडणे, तेली खडूंचा वापर करून चित्र काढणे.) **क) LO 3.3.1** जास्त अचूकता लागणाऱ्या कृती सूक्ष्म स्नायूंच्या समन्वयाने थोड्या मदतीसह करतो. (उदा. पेन्सिलने चित्र काढणे, सरळ रेषेवर किंवा वक्ररेषेवर कापणे, छोटे मणी ओवणे.)	

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	सूक्ष्म स्नायूंचे बळकटीकरण, हस्त-नेत्र समन्वय, कल्पनाशक्तीला वाव, अचूकता व नियंत्रण.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	• वरील कृती करत असताना, बालके हात, बोटे, अंगठा यांचा योग्य उपयोग करतात का, याचे निरीक्षण करावे. • बालके एका हाताने व दोन्ही हातांनी कोणकोणत्या कृती करतात, हे पाहावे. • हस्त-नेत्र समन्वय साधण्यासाठी घेतलेल्या कृती, बालके योग्य रीतीने करतात की नाही, याचे निरीक्षण करावे.	
कृती क्र : 137		
उपक्रमाचे नाव	सामान उचलून ठेवूया.	
उपक्रमाला लागणारे साहित्य		
छोटी खेळणी, पाण्याने भरलेले भांडे, पाण्याने, वाळूने भरलेली प्लॅस्टिकची बाटली, जड पुस्तके, वाळू भरलेला मग/कप इत्यादी, अर्धा किलो वजनापर्यंत असलेल्या परिसरातील वस्तू.	छोटी खेळणी, पाण्याने भरलेले भांडे, पाण्याने, वाळूने भरलेली प्लॅस्टिकची बाटली, जड पुस्तके, वाळू, भरलेला मग/कप इत्यादी, अर्धा किलो वजनापर्यंत असलेल्या परिसरातील वस्तू.	दोरी, बॅट, चेंडू, फुटबॉल इत्यादी.
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
कृती : वस्तू वाहून नेऊया. • हलक्या वस्तूपासून जड वस्तूपर्यंत, वेगवेगळ्या वस्तू बालकास जागेवरून उचलून परत ठेवण्यास सांगावे. • वस्तू हातात घेऊन एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी उदा. एका भिंतीपासून दुसऱ्या भिंतीपर्यंत नेण्यास सांगावे. • बालकांना रांगेत किंवा वर्तुळात, एक एक फुटाच्या अंतरावर उभे करावे. विविध वस्तू एकाकडून दुसऱ्याकडे देण्यास सांगावे.	**कृती : वस्तू उचलणे** **३ ते ४ वयोगटाच्या कृती घेणे.** **कृती १ :** • साधनांची खोकी, खेळाचे डबे, इत्यादी साहित्य उचलण्यास बालकांची मदत घ्यावी. उदा. पाण्याची लहान बादली उचलणे, छोट्या फुलझाडांच्या कुंड्या उचलणे इत्यादी. • जमेल ती मदत घरीही करावी हे गप्पा गोष्टीतून बालकांना सांगावे.	**कृती : वस्तू ओढणे आणि ढकलणे यांच्या शर्यती.** • ताईंनी पुढील क्रियांचे प्रात्यक्षिक करून दाखवावे आणि बालकांना करण्यास सांगावे. **कृती १ : दोरी खेचूया.** • दोन बालकांच्या हातात दोरी देऊन, रस्सीखेच हा खेळ घ्यावा. प्रथम दोन, मग चार, मग सहा असा बालकांचा सहभाग वाढवावा. • दोन बालकांना समोरासमोर पाय पसरून, तळपायास तळपाय लावून बसण्यास सांगावे.

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
• कृती करून झाल्यावर साहित्य जागेवर नेऊन ठेवण्यास सांगावे.	• घरी जेवणापूर्वईची तयारी करण्यासाठी मदत करावी हे सांगावे. • थोडे सामान भरलेली पिशवी उचलून आणणे.	• एकमेकांचे हात धरून एकाने दुसऱ्यास ओढून उभे करण्याचा प्रयत्न करण्यास सांगावे. नंतर दुसऱ्यास पहिल्या बालकाला असेच ओढून उभे करण्याचा प्रयत्न करण्यास सांगावे.
पंचकोश		
अन्नमय, प्राणमय, मनोमय कोश		
विविधता	• सारख्या वजनाच्या वस्तू एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेण्याची स्पर्धा घ्यावी. • झांज किंवा घंटा वाजल्यावर, वस्तू उचलून वर्तुळावर पळण्यास सांगावे. आवाज थांबला, की वस्तू खाली ठेवून उभे राहण्यास सांगावे. • वस्तू ढकलूया : टायर ढकलणे, मातीने भरलेले छोटे ड्रम ढकलणे. • बागकामात मदत करणे, भांड्यात माती भरून आणणे.	
थीम/विषय	मी, माझे कुटुंब व परिसर, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू	
ताईसाठी सूचना	–	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-3** सुदृढ आणि लवचीक शरीर विकसित होते. **C-3.4** एखादी वस्तू वाहून नेताना, चालताना, पळताना ताकद आणि चिकाटी दाखवतो. **अ) LO 3.4.3** हलकी वजने उचलू शकतो, हालचाल करू शकतो. (जसे–लहान मग घेऊन एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाऊ शकतो.) **ब) LO 3.4.3** शक्तीचे एखादे काम करण्याची तयारी दर्शवतो. (जसे– वर्गातील छोट्या फर्निचरची हलवाहलवी करण्यास मदत करतो.) **क) LO 3.4.3** खेळामध्ये ताकदीची आवश्यकता असलेल्या कृती सहजतेने करतो. (जसे रस्सीखेच खेळतो.)	

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये</td><td colspan="2">• सूचनांचे पालन करता येते, स्थूल स्नायूंना बळकटी येते.</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">• कष्टाच्या हालचाली करण्यास बालक उत्सुक असते का? पाय आणि नेत्र समन्वय साधता येतो का?
• कार्य पूर्ण झाल्यावर वस्तू उचलून ठेवतात का हे पाहावे.</td></tr>
<tr><td colspan="3">कृती क्र : 138</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">स्प्रे पेंटिंग</td></tr>
<tr><td colspan="3">उपक्रमाला लागणारे साहित्य</td></tr>
<tr><td colspan="2">खराब झालेला टूथब्रश, चाळणी, पाने, फुले, रंग कोरा कागद इत्यादी.</td><td>रंगकाम, मातीकाम करण्यासाठी आवश्यक साहित्य.</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td>सर्व बालकांना वर्तुळाकार बसवून घ्यावे.
• बालकांनी रंग, चाळणी, टूथब्रश हे साहित्य आपले वापरून झाले, की इतरांना वापरण्यास द्यावे असे ताईने सांगावे ताईसाठी सूचना यामध्ये छापावे.
• पाने, फुले चपटे/सपाट आकार बालकांमध्ये वाटावे. रंग, ब्रश, चाळण्या इत्यादी साहित्य मधे ठेवावे.
• ताईने बालकांना साहित्य आणण्यास एकेकाने जा असे सांगावे.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td><td>सर्व बालकांना वर्तुळाकार बसवून घ्यावे.
• पाने, फुले चपटे/सपाट आकार बालकांमध्ये वाटावे. रंग, ब्रश, चाळण्या इत्यादी साहित्य मधे ठेवावे.
• ताईने साहित्य आणण्यास एकेकाने जा असे सांगावे.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td><td>३ ते ४, ४ ते ५ वर्षे वयोगटाची कृती आधी करून घ्यावी.
कृती : स्प्रे पेंटिंग
• बालकांना ताईने एक कागद द्यावा. त्यावर एक फुलाचे चित्र असलेला साचा ठेवावा. त्यावरून टूथब्रश हातात घेऊन रंगात बुडवावा. ब्रशच्या दात्यावरून हळूवार अंगठा फिरवण्यास सांगावे म्हणजे कागदावर रंग होईल.
• फुलांच्या बाहेरच्या बाजूला स्प्रे करावा. साचा उचलल्यावर फुलाच्या बाहेर रंग दिसेल आणि आत पांढरा रंग दिसेल.
• याप्रमाणे वेगवेगळे साचे तयार करून, बालकांना स्प्रे पेंटिंग तयार करायला द्यावे.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
पंचकोश		
अन्नमय, प्राणमय, आनंदमय कोश		
विविधता	• आवारात पकडापकडी, साखळी विषामृत यांसारखे खेळ खेळण्यास बालकांना घेऊन जावे. • वेगवेगळ्या कृती करण्यास देता येतील. जसे : वर्ग सजावट, मातीकाम एकमेकांवर रंग उडवणे.	
थीम/विषय	मी, माझे कुटुंब, परिसर, पाणी–पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन	
ताईसाठी सूचना	कृतिपुस्तिकेतील कृती करून घ्यावी. • बालकांनी रंग, चाळणी, टूथब्रश हे साहित्य आपले वापरून झाले, की इतरांना वापरण्यास द्यावे असे ताईने सांगावे ताईसाठी सूचना यामध्ये छापावे.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-3** सुदृढ आणि लवचिक शरीर विकसित होते. **C-3.3** हाताने कृती करताना हात व बोटे यांच्या हालचालीमध्ये अचूकता आणि नियंत्रण दर्शवितो. **अ) LO 3.3.1** साध्या कृतींमध्ये सूक्ष्म स्नायू विकास, हस्त–नेत्र समन्वय आणि स्नायूमधील बळकटपणा दर्शवितो. **ब) LO 3.3.1** ज्या कृती करताना सूक्ष्म स्नायूंचा वापर केला जातो तसेच हस्त नेत्र समन्वयात काही प्रमाणात अचूकता लागते अशा कृती करताना स्नायूंवर नियंत्रण दर्शवतो. **क) LO 3.3.1** जास्त अचूकता लागणाऱ्या कृती सूक्ष्म स्नायूंच्या समन्वयाने थोड्या मदतीसह करतो. **CG-12** बालके दृक आणि ललितकथांमध्ये आपले क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायी मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात. **LO 12.1** विविध आकारांच्या द्विमितीय आणि त्रिमितीय कलाकृती तयार करण्यासाठी विविध प्रकारचे साहित्य आणि साधने हाताळतो व त्याबरोबर खेळतो.	

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
	अ) LO 12.1.1 योग्य कला साहित्य साधने आणि उपकरणे हाताळतो. ब व क) LO 12.1.1 साहित्य आणि साधने वापरताना विविध प्रकारांनी पकडतो आणि हाताळतो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	सहकार्य वृत्ती वाढीस लागते. बौद्धिक विकास होतो. अवयवांचा समन्वय साधता येतो, आनंद मिळतो.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	• बालक साहित्याचा वापर कसा करते ते पहावे. • इतरांबरोबर साहित्य वाटणी करून वापरतात का हे पहावे. • इतरांना साहित्य देतात का ते पहावे.	
कृती क्र : 139		
उपक्रमाचे नाव	बघ व वाच	
उपक्रमाला लागणारे साहित्य		
२ ठोकळे, २ चमचे, २ काड्या, २ मणी इत्यादी.	३ खडू, ३ चमचे, ३ मणी	चित्रपट्ट्या ३ चित्रे असलेल्या पट्ट्या
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
कृती : • बालकांना सरळ रेषेत आपल्या समोर बसवावे. • जमिनीवर एक उभी व आडवी रेष खडूने आखावी. त्या रेषेपासून एका खाली एक वस्तू ठेवाव्यात. • डावा हात वर करायला सांगावे. खडूची रेषा कोणत्या हाताला आहे हे विचारावे. • एक-एक वस्तू बालकांसमोर धरून, डावीकडून उजवीकडे वस्तूंची नावे वाचायला सांगावे.	**कृती :** • बालकांना सरळ रेषेत आपल्या समोर बसवावे. • जमिनीवर एक उभी व आडवी रेष खडूने आखावी. त्या रेषेपासून एका खाली एक वस्तू ठेवाव्यात. • डावा हात वर करायला सांगावे. खडूची रेषा कोणत्या हाताला आहे हे विचारावे. • एक एक वस्तू बालकांसमोर धरून डावीकडून उजवीकडे वस्तूंची नावे वाचायला सांगावे. • बालकांना सूचना द्यावी की, मी ज्या क्रमाने वस्तूंची नावे वाचेन, त्याच क्रमाने, वस्तू असलेली ओळ मला शोधून द्या.	**कृती :** ३ चित्रे असलेल्या पट्ट्या पेरू, आंबा, चेरी चेरी, पेरू, आंबा आंबा, चेरी, पेरू चेरी, आंबा, पेरू आंबा, पेरू, चेरी • बालकांना सरळ रेषेत आपल्या समोर बसवावे. • जमिनीवर एक उभी व आडवी रेष खडूने आखावी. त्या रेषेपासून एका खाली एक चित्रपट्ट्या ठेवाव्यात. • एकदा डावा हात वर करायला सांगावे. खडूची रेषा कोणत्या हाताला आहे हे विचारावे.

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>• उदा–ठोकळा चमचा
चमचा ठोकळा
अशा वेगवेगळ्या वस्तू घेऊन श्रवणभेद हा उपक्रम घ्यावा</td><td>• एकदा कृती करून दाखवावी. एका ओळीतील वस्तू ऐकवा
• उदाहरणार्थ,
– खडू, ठोकळा, बांगडी
– बांगडी, खडू, ठोकळा
• एकेका बालकाला ओळीनी व त्या वस्तू काढून देण्यास सांगावे.
टीप : चित्रपट्टी वाचताना डावीकडून उजवीकडे वाचावी. गरजेनुसार बालकांना डावा–उजवा सराव द्यावा तीन चित्रांचा श्रवणभेद ओळखणे बालकांना यायला लागले की ४,५ चित्रांचा श्रवणभेद द्यावा.</td><td>• एक चित्रपट्टी बालकांसमोर धरून डावीकडून उजवीकडे चित्रांची नावे वाचायला सांगावीत.
• बालकांना सूचना द्यावी. (मी ज्या क्रमाने वस्तूंच्या नावांचे वाचन करेन, त्याच क्रमाने, चित्रे असलेली चित्रपट्टी मला शोधून द्या.)
• एकदा कृती करून दाखवावी. एका पट्टीवरील चित्रांची नावे वाचून दाखवा.
• उदाहरणार्थ, पेरू, आंबा, चेरी आणि संबंधित पट्टी काढून दाखवावी.
टीप :
चित्रपट्टी वाचताना डावीकडून उजवीकडे वाचावी.
गरजेनुसार बालकांना डावा–उजवा सराव द्यावा.
बालकांना तीन चित्रांमधील श्रवणभेद ओळखणे जमायला लागले, की श्रवणभेदांची संख्या वाढवावी.</td></tr>
<tr><td colspan="3" align="center">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3" align="center">विज्ञानमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">• प्राणी, पक्षी व वस्तू यांच्या चित्रांचा वापर करून श्रवणभेद उपक्रम घ्यावा.
• पुरेसा सराव झाल्यावर एकाच किंवा सारख्या/थोडाच फरक असेलेल्या ध्वनीने सुरू होणाऱ्या वस्तू चित्रे घेऊन या कृतीची काठिण्य पातळी वाढवावी.
उदा. चेंडू, चमचा, चप्पल, दगड, ढग, धोतर</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
थीम/विषय	मी, माझे कुटुंब, परिसर, पाऊस–पाणी, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन.	
ताईसाठी सूचना	• बालकांना डावीकडून उजवीकडे वाचन करण्यासाठी प्रोत्साहन द्या.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-10** बालके भाषा एक (L1) मध्ये सफाईदारपणे वाचन व लेखन करतात. **C-10.1** शब्दध्वनीची जाणीव होऊन, शब्दध्वनी/अक्षरे शब्दांत गुंफतो आणि शब्दांपासून शब्दध्वनी/अक्षरे वेगळी करतो. **अ) LO 10.1.2** शब्दांची नक्कल आणि निर्मिती करतो. **ब) LO 10.1.2** शब्दातील प्रारंभिक आणि अंतिम अक्षर ओळखतो. **क) LO 10.1.2** अक्षरे स्वर आणि व्यंजने यामध्ये वेगळी करतो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	श्रवण कौशल्यांचा विकास, शब्दसंग्रह वाढ, अनुकरण क्षमतेचा विकास, शब्दांचा अर्थ व आशय यांच्या समजेचा विकास.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	• बालक डावीकडून उजवीकडे नजर, फिरवून वाचन करते का हे बघावे. • बालकाच्या वाचनातील सहभागाचे निरीक्षण करावे.	
	• बडबडगीताचे अनुभव देताना बालकांचा श्रवण, भाषण आणि अनुकरण यात होणारा गोंधळ तपासावा.	
कृती क्र : 140		
उपक्रमाचे नाव	आकाश बघूया.	
उपक्रमाला लागणारे साहित्य		
चित्रकार्डे, फ्लॅशकार्ड, कृती. उदा. झोपेतून उठतो, अंघोळ करतो, झोपतो, जेवतो, शाळेत जातो, खेळतो इत्यादी कृतींची फ्लॅशकार्डे.		
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
आवश्यक पूर्वतयारी : चित्रकार्डे **कृती : आकाशाची ओळख** • ताईने बालकांना वर्गाच्या बाहेर मोकळ्या मैदानात घेऊन जावे.		**आवश्यक पूर्वतयारी : फ्लॅश कार्ड, वस्तू** उदा. झोपेतून उठल्याचे, अंघोळ करतानाचे, झोपल्याचे, जेवत असल्याचे, शाळेत जाण्याचे, खेळण्याचे चित्र इ.

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td colspan="2">• वर्गाच्या बाहेर आल्यावर प्रत्येक बालकाला आकाशात काय काय दिसते आहे हे विचारावे.
• अपेक्षित उत्तर – सूर्य, पांढरे ढग, निळे आकाश इत्यादी.
• ताईने याप्रमाणे बालकांना आकाशाची ओळख करून द्यावी.
• ताईने बालकांना चित्रकार्ड गटात देऊन दिवस असल्यावर आकाशात काय दिसते आणि रात्री काय काय दिसते यांची वेगवेगळी कार्डे तयार करून घेऊन खेळ घ्यावा.
• अंगणवाडीत कोजागीरी साजरी करावी.
• छोट्या छोट्या चित्रफिती दाववाव्या
• वेगवेगळी गाणी म्हणून दाखवावीत (चंद्र, विमान, आकाशाच्या अंगणात खेळे चांदोबा)
• ढगाची आऊटलाईन काढून द्यावी व त्यात रंग भरण्यास किंवा कापूस चिकटवण्यास सांगावे.</td><td>कृती : सूर्य उगवल्यानंतर आपण काय करतो?
• ताईने बालकांना वर्तुळाकार उभे करावे.
• बालकांच्या मध्ये एक वर्तुळ आखून त्यात फ्लॅशकार्डे मांडून ठेवावी.
• बालकांनी खंजिरी वाजवल्यावर वर्तुळाकार पळायला सुरू करायचे.
• खंजिरीचा आवाज बंद झाल्यावर ताईने दिवस व रात्र यांतील एक नाव घ्यावे.
• दिवस असे म्हटल्यावर त्याप्रमाणे बालकांनी दिवसा करावयाच्या कामांची फ्लॅशकार्ड उचलावीत उदा. झोपेतून उठतो, याचे फ्लॅशकार्ड, सुर्याचे फ्लॅशकार्ड.
• फ्लॅशकार्डांची संख्या १५ ते २० इतकी असावी.
• प्रत्येक बालकाला एक कार्ड मिळाले पाहिजे, हे ताईने पाहावे</td></tr>
<tr><td colspan="3" align="center">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3" align="center">अन्नमय, प्राणमय, आनंदमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">आकाशात पाहूया, चित्र काढूया.
बालकांना रात्री आकाशात काय काय दिसते याचे चित्र काढायला सांगावे.
दुसऱ्या दिवशी शाळेत येताना काढलेले चित्र सोबत घेऊन यायला सांगावे.
चंद्राच्या कलेची चित्रे दाखवावीत.
कोजागीरी सादरी करावी.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">ऋतू</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">–</td></tr>
</table>

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-7 बालके निरीक्षण व तार्किक विचाराने, सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात.
C 7.2 निसर्गाच्या निरीक्षणातून कार्यकारणभाव समजून घेऊन, तो दर्शविणारी साधी परिकल्पना मांडतो व त्याच्या स्पष्टीकरणाकरिता /पडताळणीकरता निरीक्षणाचा आधार घेतो.
ब) LO 7.2.3.2 आकाशातील खगोलशास्त्रीय गोष्टी ओळखतो. (सूर्य, चंद्र, तारे, ढग इत्यादी.)
क) LO 7.2.3.2 दिवस-रात्रीचा संबंध, सूर्योदय आणि सूर्यास्त यांच्याशी संबंध जोडतो.</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये</td><td colspan="2">• आकाशातील खगोलशास्त्रीय गोष्टी ओळखता येतात.</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">• आकाशातील खगोलशास्त्रीय गोष्टी ओळखता येतात का?</td></tr>
<tr><td colspan="3">कृती क्र : 141</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">दिवस-रात्र, ऋतू ओळखूया</td></tr>
<tr><td colspan="3">उपक्रमाला लागणारे साहित्य</td></tr>
<tr><td colspan="3">दिवस व रात्र, सूर्य, चंद्र, ढग, उन्हाळा, पावसाळा, हिवाळा यांची फ्लॅशकार्डे</td></tr>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td colspan="2">• ताईने खालील विषयांवर बालकांना प्रश्न विचारावे व बालके स्वतः अनुभव घेऊन, उत्तरे देतील असा प्रयत्न करावा.
उदा. दिवस व रात्र, सूर्य, चंद्र, ढग, उन्हाळा, पावसाळा, हिवाळा या विषयांवर प्रश्न विचारावेत, जसे की : आपली शाळा कधी भरते? - आता उजेड आहे म्हणजे काय आहे? - दिवस आहे.
आपण कधी झोपतो? - रात्री.
चंद्र कधी दिसतो? - रात्री.
कृती :
• बालकांनी गटामध्ये बसवावे, प्रत्येक गटाचा एक नायक बनवून, त्याला वर्गाबाहेर वातावरणात पाहण्यास सांगावे व बाहेर काय जाणवले ते वर्गात येऊन त्या फ्लॅशकार्डमध्ये बघून सांगावे, म्हणजे बाहेर ऊन होते, पाऊस होता, ढग होते अशा प्रकारे बालके उत्तरे देतील व ताईने त्यावर सर्व गटांतील बालकांशी चर्चा करावी.</td><td>कृती : परिसरातील गमती-जमती
• परिसरातील गमतीजमतींवर ताईने बालकांशी चर्चा करावी, प्रश्न विचारावें व बालकांना विचार करून उत्तर देण्यासाठी प्रोत्साहित करावे.
उदा. आपण दिवसा कोणत्या गोष्टी करतो व का करतो?
• रात्री आकाशात काय दिसते, रात्री अंधार का असतो ?
• रात्री लवकर झोपावे व सकाळी लवकर उठावे तसेच बालक उठल्यापासून करत असलेल्या कामांबाबत गप्पा, गोष्टी, चर्चा करावी.</td></tr>
</table>

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td colspan="2">• सकाळी करायची कामे रात्री करायची कामे कोणती? याबद्दल बालकांना विचारावे.
• घरातील मोठ्या व्यक्ती सकाळी उठल्यापासून रात्री झोपपर्यंत काय काय करतात हे विचारावे.</td><td>हिवाळ्यात, पावसाळ्यात, उन्हाळ्यात आपण वापरत असलेल्या वस्तू, कपडे बालकांसमोर मांडून, आपण कधी काय वापरतो याविषयी प्रश्न विचारावेत. त्यांनी दिलेल्या उत्तरांवर चर्चा करावी.
• बाहेर हवा कशी असते हे विचारावे.</td></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">विज्ञानमय, मनोमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">अंगणवाडीमध्ये येताना, जाताना, घरी गेल्यावर आजूबाजूचे वातावरण कसे आहे हे बालकांना नियमित बघण्यास सांगावे.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">मी, माझे कुटुंब व परिसर, ऋतू</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">–</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-7 बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात.
C 7.2 निसर्गाच्या निरीक्षणातून कार्यकारणभाव समजून घेऊन, तो दर्शवणारी साधी परिकल्पना मांडतो व त्याच्या स्पष्टीकरणाकरता/पडताळणीकरता निरीक्षणाचा आधार घेतो.
अ) LO 7.2.3 दिवस–रात्रीत फरक करतो.
ब) LO 7.2.5 शिक्षक व समवयस्कांच्या मदतीने, पर्यावरणातील घटना व प्रसंगाबाबतच्या सोप्या प्रश्नांची उत्तरे देतो.
क) LO 7.2.3.2 दिवस–रात्रीचा संबंध सुर्योदय आणि सूर्यास्त यांच्याशी संबंध जोडतो.
क) LO 7.2.6 नैसर्गिक घटकांबाबत चिकित्सक प्रश्न विचारून, उत्तरे मिळवण्यासाठी समवयस्कांसोबत समन्वय साधतो/शोध घेतो (उदा. काय बुडते, काय तरंगते? लोहचुंबकाकडे कोणत्या वस्तू आकर्षित होतात?</td></tr>
</table>

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये</td><td colspan="2">ताई व समन्वयकांच्या मदतीने, पर्यावरणातील घटना व प्रसंगांबाबतच्या सोप्या प्रश्नांची उत्तरे देतो.
नैसर्गिक घटनांबाबत चिकित्सक प्रश्न विचारून, उत्तरे मिळण्यासाठी समन्वयकांसोबत समन्वय साधतो/शोध घेतो. (उदा. काय बुडते, काय तरंगते, लोहचुंबकाकडे कोणकोणत्या गोष्टी आकर्षित होतात.)</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">वातावरणातील बदल बालकाला कळत आहेत का?, जाणवलेले वातावरण बालक तोंडी सांगू शकते का?, आजूबाजूला झालेला बदल बालकाच्या लक्षात येतो का? हे पाहावे.</td></tr>
<tr><td colspan="3">कृती क्र : 142</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">पशू-पक्ष्यांना मदत करूया.</td></tr>
<tr><td colspan="3">उपक्रमाला लागणारे साहित्य :</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td>कृती : चर्चा गप्पा आणि प्रश्नोत्तरे
• आपल्या आजूबाजूला असणाऱ्या प्राणिमात्रांची आपण कशी काळजी घेऊ शकतो यावर चर्चा करावी. उदा. तुम्हांला कोणी मारले किंवा ओरडून बोलले तर कसे रडू येते, तसेच, आपल्या आजूबाजूला असलेल्या प्राणी, पक्षी (बालकांना नावे विचारावी.), यांना आपण मारले तर त्यांनाही त्रास होतो, अशी उदाहरणे देऊन आजूबाजूला असलेल्या प्राण्यांविषयी बालकाच्या मनात दया व प्रेम जागृत करावे.
• नैसर्गिक गोष्टींची काळजी कशी घ्यावी याची उदाहरणे देऊन, त्या कशा वापराव्या हे सांगावे.</td><td>कृती : गरजा ओळखणे.
• बालकांना वर्तुळाकार बसवून झाडे, प्राणी, पक्षी यांच्या गरजांविषयी चर्चा करावी.
• झाडांना काय खाऊ लागतो, पक्षी व प्राणी काय खातात असे प्रश्न बालकांना विचारावे व विचार करून उत्तर देण्यास प्रोत्साहित करावे.
• आपल्या आजूबाजूला असलेली झाडे, पक्षी, प्राणी यांचे निरीक्षण करायला लावावे.
• झाडे, पक्षी, प्राणी यांच्याविषयी असलेल्या गोष्टी सांगाव्यात, गाणी घ्यावी.</td><td>कृती : चर्चा आणि प्रश्नोत्तरे
• आपल्या आजूबाजूला नैसर्गिक संसाधने कोणती आहेत या विषयावर बालकांशी चर्चा करावी-वारा, पाणी, वनस्पती ही संसाधने आपण कोणकोणत्या गोष्टींसाठी वापरतो यावर चर्चा करून प्रश्न विचारावे.
• पाण्याचा वापर कोणकोणत्या गोष्टींसाठी केला जातो? कोणाकोणाला पाणी प्यायला लागते? असे वेगवेगळे प्रश्न विचारून बालकांना विचार करायला लावावा.</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
उदा. नळ बंद न केल्याने पाणी वाया जाते, घरातून बाहेर जाताना दिवे बंद न केल्यामुळे वीज वाया जाते.	• झाडे, प्राणी, पक्षी व त्यांच्या गरजा यांची फ्लॅशकार्डे लावून घेऊन, त्याच्या जोड्या बालकांकडून लावून घ्याव्या.	

पंचकोश	
मनोमय, अन्नमय कोश	
विविधता	• शक्य असल्यास प्राणी, पक्षी पाणी पिताना प्रत्यक्ष दाखवावे किंवा फोटो दाखवावे. • तिनही गटातील बालकांना चिऊ-काऊचा घास काढायला सांगणे.
थीम/विषय	प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक
ताईसाठी सूचना	–
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-7** बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात. **C 7.2** निसर्गाच्या निरीक्षणातून कार्यकारणभाव समजून घेऊन, तो दर्शवणारी साधी परिकल्पना मांडतो व त्याच्या स्पष्टीकरणाकरता/पडताळणीकरता निरीक्षणाचा आधार घेतो. **अ) LO 7.2.1.6** एखाद्या कृतीचा किंवा वर्तनाचा इतरांवर होणारा परिणाम स्पष्ट करतो. (उदा. कुत्र्याला दगड मारल्याने मुक्या प्राण्यांना त्रास होतो, नळ बंद न केल्याने पाणी वाया जाते.) **ब) LO 7.2.6** झाडे, प्राणी, पक्षी, यांच्या गरजांविषयी स्वतःचे मत मांडतो. **क) LO 7.2.6** सामाईक नैसर्गिक संसाधनांची संकल्पना स्पष्ट करतो. (उदा. आपल्याला पाणी गरजेचे आहे. त्याचप्रमाणे प्राणी, पक्षी, वनस्पती यांनाही गरजेचे आहे.)
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	• एखाद्याच्या कृतीचा किंवा वर्तनाचा होणारा परिणाम स्पष्ट करतो. • सामाईक नैसर्गिक संसाधनांची संकल्पना स्पष्ट करतो. उदा., आपल्याला पाणी गरजेचे आहे, त्याचप्रमाणे प्राणी, पक्षी व वनस्पतींनाही पाणी गरजेचे आहे.

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">• आजूबाजूला असलेल्या गोष्टींचा बालक कसा वापर करते, ते पाहावे. वरील विषयावर चर्चा झाल्यावर, बालकाच्या वर्तनात काही बदल झाला आहे का, ते पाहावे.</td></tr>
<tr><td colspan="3">कृती क्र : 143</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">एकास एक संगती</td></tr>
<tr><td colspan="3">उपक्रमाला लागणारे साहित्य</td></tr>
<tr><td>पान, फुले, बिया, काड्या इत्यादी.</td><td>मणी, काड्या, बिया इत्यादी.</td><td>मणी, काड्या, बिया इत्यादी.</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td>• ताईने ४ पाने व त्यापुढे ४ फुले मांडून जोडी लावून दाखवावी.
• जितकी पाने तितकी फुले अशी ओळख बालकांना करून द्यावी. त्यानंतर वरील कृती बालकांकडून करून घ्यावी.
• मणी, बिया देऊन या कृतीचा ५ ते ६ वेळा सराव करायला द्यावा.</td><td>कृती : मोजूया
अंकांची किंमत–तोंडी अंक
• (पटसंख्या खूप असल्यास बालकांचे छोटे छोटे गट करून कृती घ्यावी.)
• ताईने ५ वस्तू मोजून घ्याव्या.
• प्रत्येक बालकाला ५ वस्तू मोजून द्याव्या.
• ताईने स्वत: समोर एक वर्तुळ आखून घ्यावे.
• बालकासमोरही वर्तुळ काढून द्यावे.
• आता ताईने एक वस्तू उचलून वर्तुळात ठेवावी. वस्तू ठेवताना एक असे म्हणावे.
• वरील कृती बालकांना करायला सांगावी.
• यानंतर २,३,४,५ वस्तू ताईने मोजून दाखवाव्या आणि बालकांकडून मोजून घ्याव्या.</td><td>कृती : अंकांची किंमत–तोंडी अंक
• (पटसंख्या खूप असल्यास बालकांचे छोटे छोटे गट करून कृती घ्यावी.)
• ताईने १० वस्तू मोजून घ्याव्या.
• प्रत्येक बालकाला १० वस्तू मोजून द्याव्या.
• ताईने स्वतः समोर एक वर्तुळ आखून घ्यावा.
• बालकांसमोरही वर्तुळ काढून द्यावे.
• आता ताईने एक वस्तू उचलून वर्तुळात ठेवावी. वस्तू ठेवताना एक असे म्हणावे.
• वरील कृती बालकांना करायला सांगावी.
• यानंतर २,३,४,५...१० पर्यंत वस्तू ताईने मोजून दाखवाव्या आणि बालकांकडून मोजून घ्याव्या.</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
पंचकोश		
मनोमय, अन्नमय कोश		
विविधता	**मोजून अंक सांगू या.** तीन पर्यंतच्या वस्तूंचे गट/चित्रांचे गट देऊन, संख्यानामे ओळखण्यास सांगावे. **अंकाइतक्या टाळ्या (पाच पर्यंतच्या संख्या वापरून.)** ताईने बालकांना संख्या ऐकून, टाळ्या वाजवायला सांगाव्यात. ताईने दोन असे म्हटले असता, बालकांनी दोन टाळ्या वाजवाव्यात.	
थीम/विषय	मी, माझे कुटुंब व परिसर, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू	
ताईसाठी सूचना	–	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-8** बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार, मापे यांचा वापर करत जग समजुन घेऊ शकतात. **C-8.3** १० आणि २० या टप्प्याने ९९ पर्यंतच्या संख्या दोन्ही प्रकारे (पुढे आणि मागे) मोजतो. **अ) LO 8.3.1.2** ३ पर्यंतची संख्यानामे आणि वस्तूंमधील एकास एक संगती वापरून मोजणी करताना मोठ्यांचे अनुकरण करतो. **ब) LO 8.3.1.2** संख्येचे मूल्य समजून घेऊन वस्तूंची मोजणी करतो. (५ पर्यंतचा संच ओळखतो.) **क) LO 8.3.1.2** संख्यांचे मूल्य समजून घेऊन, १० पर्यंत वस्तूंची मोजणी करतो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	जोड्या लावता येणे, मोजणी, एकास एक संगती लावता येणे.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	• बालके तीन पर्यंतची संख्यानामे आणि वस्तू यांच्या जोड्या लावू शकतो की नाही, हे पाहावे. • बालकांना ५ पर्यंतची मोजणी करता येते की नाही, हे पाहावे. • बालकांना १० पर्यंतच्या संख्यांची मोजणी करता येते की नाही, हे पाहावे.	

<table>
<tr><th colspan="3">कृती क्र : 144</th></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">वस्तू मोजून देऊया.</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">ठोकळे, मणी, बिया, चेंडू</td></tr>
<tr><td>कृती : वस्तू देऊया.
• ताईने टोपली/खोक्यामध्ये विविध वस्तू ठेवाव्या.
• वस्तू ठेवलेल्या खोक्याच्या/टोपलीच्या भोवती बालकांना बसवावे.
• ताईने एक संख्या सांगावी. बालकांनी खोक्यातील/टोपलीमधील तेवढ्या वस्तू काढून दाखवाव्या.
• ताईने एक संख्या सांगावी बालकांनी तेवढ्या उड्या माराव्या किंवा टाळ्या वाजवाव्यात
• ताईने ठरावीक टाळ्या वाजवाव्यात किती टाळ्या वाजवल्या हे बालकांनी सांगावे.</td><td>कृती : टाळ्या आणि पावले मोजूया.
• बालकांना वस्तूंच्या आधारे मोजणी करता येते आहे असे लक्षात घेऊन, पुढील कृती घ्याव्या.
• ताईने बालकांना संख्या सांगावी. संख्येएवढ्या टाळ्या बालकांना वाजवायला सांगाव्या.
• मग ताईने एकेका बालकाला संख्या सांगून, तेवढी पावले चालण्यास सांगावे.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td><td>कृती : शून्याची किंमत
• ताईने तीन मणी मोजून घ्यावे.
• ताईने समोर गोल आखावा.
• ताईने बालकांना तीन-तीन मणी वाटावे.
• बालकांसमोर गोल आखावा आणि वाटलेले मणी गोलात ठेवायला सांगावे.</td></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">अन्नमय, विज्ञानमय कोश</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
विविधता	• बालकांच्या जोड्या करून, त्यांना वस्तू द्याव्या. एकाने संख्या सांगावी, दुसऱ्याने त्या संख्येएवढ्या वस्तू काढून दाखवाव्या. • खोक्यामध्ये काही वस्तू ठेवाव्या. खोक्यात शून्य वस्तू होण्यासाठी काय करता येईल, असे विचारून कृती करून घ्यावी. • बालकांना वाटीत मणी द्यावेत व ओवण्यासाठी कडक वायर/दोरा द्यावा. ताईनी अंक उच्चारावा. बालकांनी वाटीतून तेवढे मणी बाजूला काढावेत व नंतर ते ओवावेत. शेवटी ओवलेले सर्व मणी किती झाले ते मोजावेत.	
थीम/वषय	वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, वाहन	
ताईसाठी सूचना	कृतिपुस्तिकेतील कृती करून घ्यावी.	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-8** बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार, मापे यांचा वापर करत जग समजुन घेऊ शकतात. **C-8.3** १० आणि २० या टप्प्याने ९९ पर्यंतच्या संख्या दोन्ही प्रकारे (पुढे आणि मागे) मोजतो. **अ) LO 8.3.1.4** दिलेल्या वस्तू किंवा खेळणी मोजतो किंवा त्यातील पाच पर्यंतच्या वस्तू/खेळणी उचलून काढून देतो. (उदा, ठोकळे देणे.) **ब) LO 8.3.1.5** ५ पर्यंत मूर्त बाबी, सुट्या वस्तू व अमूर्त गोष्टी सहजतेने मोजतो. (५ पावले,५ टाळ्या) **क) LO 8.3.1.5** '०' ही संकल्पना संख्या म्हणून दिलेल्या संचातील वस्तू कमी करून (उलट मोजणे) या पद्धतीने समजून घेतो. (उदा. ३ मण्यांची उलट मोजणी, एक नंतर किती राहिल ?).	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	मोजणी करता येणे, अमूर्त पातळीवरील मोजणी, मागे उलट मोजता येणे, शून्य संकल्पना परिचय.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	• बालकांना वस्तू मोजून काढून देता येतात की नाही, ते पाहावे • बालकांना शून्य म्हणजे काहीच नाही, हे समजले आहे का, ते पाहावे.	
	कृती क्र : 145	
उपक्रमाचे नाव	कमी-जास्त सांगूया.	
उपक्रमाला लागणारे साहित्य	मणी, बिया, पेन्सिल, खडू	

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
कृती : कमी-जास्त सांगूया. • ताईने फरशीवर चौकोन आखून त्याचे दोन भाग करावे. • एका भागात एक वस्तू आणि दुसऱ्या भागात तीन वस्तू ठेवाव्या. • बालकांकडून दोन्ही भागातील वस्तू मोजून घ्याव्या. • चौकोनातील कोणत्या भागात जास्त वस्तू आहेत आणि कोणत्या भागात कमी वस्तू आहेत असे विचारावे. • आता चौकोनातील दोन्ही भागांत समान वस्तू ठेवाव्या. • बालकांना चौकोनातील वस्तू मोजायला सांगून कमी-जास्त आहेत का असे विचारावे. नाही असे उत्तर आल्यानंतर, मग दोन्ही भागातील वस्तू कशा आहेत असे विचारून, सारख्या किंवा समान याची बालकांना ओळख करून द्यावी. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	**कृती :** २० अंक मोजूया. • ताईने २० वस्तू गोळा कराव्या. • बालकांना वर्तुळात बसवावे. • ताईने एक वस्तू बालकांसमोर ठेवून, एकेका बालकाला संख्या म्हणायला सांगावे. • जिथे बालके संख्या सांगू शकणार नाहीत, तिथे मदत करून २० पर्यंत अंक क्रमाने वस्तू मांडत म्हणून घ्याव्या. • ताईने ५ पर्यंत गटात वस्तू ठेवाव्यात. गटातील वस्तूंची तुलना करण्यास प्रेरणा द्यावी. उदा. ३ वस्तू आणि ५ वस्तू, ४ वस्तू आणि ५ वस्तू इत्यादी. • प्रात्यक्षिकाद्वारे ताईने दोन गटांतील वस्तू मोजाव्या आणि गटांची तोंडी तुलना करून दाखववावी. कमी/जास्त अशा शब्दांच्या योग्य वापरावर भर द्यावा. • या गटातील वस्तू दुसऱ्या गटातील वस्तू पेक्षा कमी/जास्त आहेत, अशा तुलनात्मक शब्दांचा वापर करावा. • बालकांना पानांचा वाटा कमी आणि फुलांचा वाटा जास्त दाखवण्यास सांगावे. • बालकांना दोन्ही गटांची तुलना करण्यास सांगावे. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	**कृती :** पहिला, दुसरा मोजूया. • वर्गातील काही बालकांना आडव्या रांगेत उभे करावे. • ताईने एकेका बालकाच्या डोक्यावर हात ठेवत पहिला, दुसरा असे डावीकडून उजवीकडे म्हणून घ्यावे, तसेच उजवीकडून डावीकडे सातवा, सहावा असे देखील म्हणून घ्यावे. • नंतर बालकांना उजवीकडून दुसरा कोण आहे? डावीकडून चौथा कोण आहे असे विचारावे. • एकाच कागदावर चित्र काढायला सांगावे. – ५ फुले काढायला सांगावे. – ३ पाने काढायला सांगावे. जास्त काय आहे, त्याला वर्तुळ करायला सांगावे. • ४ वर्तुळ, ६ काड्या यांत काय जास्त हे विचारावे. त्याला वर्तुळ करण्यास सांगावे. • ७ चौकोन ४ वर्तुळ यात जे काय कमी त्याला वर्तुळ करायला सांगावे. • ८ रेषा, ५ पाने काढायला सांगावे. दोन्हीत काय कमी त्याला वर्तुळ करायला सांगावे. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">विज्ञानमय व अन्नमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">• वर्गाची दारे आणि खिडक्या मोजायला सांगून, काय कमी आहे? काय जास्त आहे? समान आहे का? असे प्रश्न विचारावे.
• एक ते वीसपर्यंतच्या संख्या बालकांकडून क्रमाने म्हणून घ्याव्यात.
• पहिला वार कोणता, दुसरा वार कोणता असा खेळ खेळावा.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, वाहन</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">कृतिपुस्तिकेतील कृती करून घ्यावी.</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-8 बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार, मापे यांचा वापर करत जग समजुन घेऊ शकतात.
C-8.3 १० आणि २० या टप्प्याने, ९९ पर्यंतच्या संख्या दोन्हीप्रकारे (पुढे आणि मागे) मोजतो.
अ) LO 8.3.1.5 तीन पर्यंतच्या दोन गटांची तुलना करतो. कोणत्या गटात कमी, जास्त किंवा समान वस्तू आहेत ते सांगतो.
ब) LO 8.3.1.6 २० पर्यंत मोजण्यास सुरुवात करतो.
क) LO 8.3.1.5 संख्येची दर्शनी किंमत व स्थानिक किंमत (क्रमागतता आणि वस्तूचे डावीकडून उजवीकडे व विरुद्ध बाजूने क्रमागत स्थान यांची समज दर्शवतो.
उदाहरणार्थ – खालील क्रमानुसार
⟶ डावीकडून तिसरा
१ २ ३ ४ ५ ६ ७
⟵ उजवीकडून पाचवा
७ ६ ५ ४ ३ २ १</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये</td><td colspan="2">कमी–जास्त, समान संकल्पना, मोजणी तर्क</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">बालके २० पर्यंत अंक म्हणण्याचा प्रयत्न करत आहेत की नाहीत याचे आणि क्रमवाचक शब्द परिचय, मोजणी यांचे निरीक्षण करावे.</td></tr>
</table>

<table>
<tr><th colspan="3">कृती क्र : 146</th></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">गट कितीचा ओळखूया.</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">खडू, पाने, मणी, पेन्सिल, असे वर्गातील साहित्य</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td>• ताईने दोन बालकांना समोर बोलवावे.
• समोर असलेल्या बालकांना उभी असणारी बालके किती आहेत असे विचारावे.
• एक, दोन न मोजता सांगायचे असे सांगावे.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td><td>• एक मोठे वर्तुळ आखून, त्यात ताईने चार खडू जवळ जवळ ठेवावे.
• एक–दोन असे न मोजता, फक्त पाहून वर्तुळात किती खडू आहेत, असे बालकांना विचारावे.</td><td>• एक मोठे वर्तुळ आखून, त्यात ताईने सहा पाने जवळ जवळ ठेवावी.
• एक–दोन असे न मोजता, फक्त पाहून वर्तुळात किती पाने आहेत असे बालकांना विचारावे.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">विज्ञानमय व अन्नमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">• बालकांसमोर तीनपर्यंत संख्या ठेवून, एक, दोन, तीन असे न मोजता फक्त पाहून, किती वस्तू असतील असा खेळ खेळावा.
• वर्गातील बालकांचे चार–चार गट करून, न मोजता किती बालके आहेत असा खेळ घ्यावा.
• बालकांप्रमाणेच वस्तूही वापराव्यात.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">कृतिपुस्तिकेतील कृती करून घ्यावी.</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-8 बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार, मापे यांचा वापर करत जग समजुन घेऊ शकतात.
C-8.3 १० आणि २० या टप्प्याने ९९ पर्यंतच्या संख्या दोन्ही प्रकारे (पुढे आणि मागे) मोजतो.
अ) LO 8.3.1.6 दोन किंवा तीन वस्तूंचा गट ओळखून, निरीक्षण सांगतो.
ब) LO 8.3.1.7 ४ वस्तूंचे गट ओळखतो. (उदा. ४ बिस्किटे, फळे, ठोकळे न मोजता सांगतो.)
क) LO 8.3.1.7 ६ वस्तूंच्या गटांची गणना त्वरित करतो. (उदा. सहा बिस्किट, गोळ्या किंवा ठोकळे न मोजता ओळखतो.)</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	अंदाज कौशल्ये, निरीक्षण, तर्क	
निरीक्षण करावयाच्या बाबी	वस्तूंचा गट फक्त पाहून, न मोजता किती वस्तू आहेत हे सांगता येते का याचे निरीक्षण करावे.	
कृती क्र : 147		
उपक्रमाचे नाव	बेरीज करूया.	
उपक्रमाला लागणारे साहित्य	संख्याकार्ड, वस्तू, शंख शिंपले, कृती संख्याची जोड व फोड	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
• तीनचा गट करून, बालकांना वर्तुळाकार बसवावे. • प्रत्येकाला पाच मणी द्यावेत. • त्यातून दोन मणी हातात घ्या असे बालकांना सांगावे. • बालकांना तुमच्या हातात किती मणी आहेत असे विचारावे. • त्यानंतर तीन मणी हातात घ्या असे सांगावे. • परत बालकांना तुमच्या हातात किती मणी आहेत असे विचारावे. • नंतर मण्यांप्रमाणे इतर वस्तूंमधून दोन ते तीन वस्तू बाजूला काढायला सांगाव्या. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	• बालकांना अर्धवर्तुळाकार बसवावे. • आपण बेरजेची एक कृती करून दाखवावी. • दोन काड्या घ्याव्यात. किती वस्तू आहेत असे बालकांना विचारावे. • नंतर दोन काड्या घ्याव्यात व बालकांना विचारावे, ''किती काड्या आहेत?'' • दोन्ही काड्या जवळ जवळ ठेवाव्यात. • बालकांना दोन्ही काड्या मोजायला सांगाव्यात. २ + २ = ४ काड्या झाल्या. • नंतर वेगवेगळ्या वस्तू देऊन, प्रत्येक बालकाला स्वतंत्रपणे कृती करण्याची संधी द्यावी. टीप : बालकांकडून विविध प्रकारे व्यवहार करून घेतल्यावर, आपण काय केले याची उजळणी करून घ्यावी. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	• बालकांना अर्धवर्तुळाकार बसवावे. • आपण बेरजेची एक कृती करून दाखवावी. • ४ वस्तू घ्याव्यात. किती वस्तू आहेत असे बालकांना विचारावे. • नंतर तीन वस्तू घ्याव्यात व बालकांना विचारावे, ''किती वस्तू आहेत?'' • दोन्ही बाजू जवळजवळ ठेवाव्यात. • बालकांनाच दोन्ही वस्तू मोजायला सांगावे. • नंतर वेगवेगळ्या वस्तू देऊन प्रत्येक बालकाला स्वतंत्रपणे कृती करण्याची संधी द्यावी. यासाठी ताईने बालकांकडून बेरजेचे गाणे म्हणून घ्यावे. • **शाब्दिक गणिताची निर्मिती करणे.** शाब्दिक गणितातून संबोध विकसित करण्यासाठी विनोदकडे ६ पेन्सिली आहेत, त्याला प्रकाशने अजून ४ पेन्सिली दिल्या, तर

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td></td><td></td><td>विनोदकडे किती पेन्सिली होतील? अशा काही शाब्दिक गणित कृतीने सोडविण्यास सांगावीत. या शब्दिक उदाहरणात वर्गातील बालकांची नावे घ्यावीत.
(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)</td></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">विज्ञानमय व अन्नमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">• खेळणी, वेगवेगळ्या वस्तू देऊन, त्या बालकाला वेगळ्या करण्यास सांगावे.
• डोंगराला आग लागली पळाऽऽ पळाऽऽ, ३ बालकांचा गट करा व ज्या बालकांनी गट केला आहे, त्यांना खेळत राहण्यास सांगावे व जे गट करू शकले नाहीत त्यांना वर्तुळामध्ये बसून, खेळ बघण्यास सांगावे असा खेळ घ्यावा.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">कृतिपुस्तिकेतील कृती करून घ्यावी.</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-8 बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार, मापे यांचा वापर करत जग समजुन घेऊ शकतात.
C-8.6 संख्यांची जोड व फोड आणि संख्यांचे गट करणे यांसारख्या लवचीक कार्यनीतीचा वापर करून, दोन अंकी संख्यांची बेरीज आणि वजाबाकी अचूकपणे करतो.
अ) LO 8.6.1 तोंडी उत्तर देण्याऐवजी ३ पर्यंतच्या वस्तू बाजूला काढतो किंवा गट करतो.
ब) LO 8.6.1 ५ पर्यंत वस्तूंचे दोन गट एकत्र करतो, पुन्हा मोजतो.
ब) LO 8.6.1.2 वस्तूंच्या गटातून ५ पर्यंतच्या वस्तू बाजूला काढतो व पुन्हा मोजतो.
क) LO 8.6.1.1 ९ पर्यंत वस्तूंचे दोन गट एकत्र करतो व पुन्हा मोजतो.
क) LO 8.6.1.2 वस्तूंच्या गटातून ९ पर्यंतच्या वस्तू बाजूला काढतो व पुन्हा मोजतो.</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	गणिती दृष्टिकोन, निरीक्षण कौशल्य, कार्यकारण, वैज्ञानिक दृष्टिकोन, नाट्यीकरण, गणितीय भाषा.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	विद्यार्थी सूचनांनुसार दोन गट एकत्र करून एकूण वस्तू सांगतात का?	
कृती क्र : 148		
उपक्रमाचे नाव	वाटप करूया.	
उपक्रमाला लागणारे साहित्य		
मणी, फुले, पाने, रंगीत दगड, आईस्क्रीमच्या काड्या, वाटी, कुंडा इत्यादी.	ठोकळे, पाने, रंगीत दगड, पाने, फुले, खडू इत्यादी.	ठोकळे, पाने, रंगीत दगड, पाने, फुले, खडू इत्यादी.
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
कृती : वाटप करूया • ताईने सर्वांना मिळतील इतकी फुले, पाने, मणी इत्यादी वस्तू घेऊन बसावे. ताईने त्यांपैकी एक वस्तू घेऊन बालकांना वाटावी. जसे – ताईने प्रत्येक बालकाला फूल द्यावे. • सर्वांना फूल दिल्यावर ताईने बालकांना सांगावे, ''मी तुम्हांला फुले वाटली, आता मी ज्याला बोलावेन त्याने, इथे असणाऱ्या वस्तूंपैकी एक वस्तू निवडून सगळ्यांना वाटायची आहे.'' • आता ताईने एकेका बालकाला बोलावून वस्तू वाटण्याची संधी द्यावी. • बालकांना वस्तू वाटायला देताना त्या वस्तू वाटी/कुंडा यांमध्ये ठेवून द्याव्यात, त्यामुळे वस्तू हाताळणे आणि एक एक वस्तू	**कृती : वाटप करूया** • सर्वांना वाटायला पुरतील इतकी फुले, पाने, मणी इत्यादीपैकी एक वस्तू घेऊन, बालकांबरोबर वर्तुळात बसावे. • दोन बालकांना आपल्या समोर बसवून फुले वाटावीत. त्यांपैकी एका बालकाला मणी देऊन ते वाटायला सांगावे. • अशा प्रकारे दुसऱ्या बालकालाही वस्तू दोघांमध्ये वाटण्याचा अनुभव द्यावा. • अशा पद्धतीने बालकांना छोट्या गटात वस्तू वाटण्याचा प्रत्यक्ष अनुभव द्यावा. तसेच या कृतीचा सातत्याने सराव घेतल्यानंतर बालकांना वस्तू देऊन, तीनच्या गटात हा खेळ खेळण्यास द्यावा. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**	**कृती : वाटप करूया** • सर्वांना मिळतील इतकी फुले, पाने, मणी इत्यादींपैकी एक वस्तू घेऊन बालकांबरोबर बसावे. कृतिपुस्तिकेतील कृती करून घ्यावी. ताईने ५ बालाकांना आपल्या समोर बसवून फुले वाटावीत. • त्यांपैकी एका बालकाला मणी देऊन त्याला गटातील इतरांना ते वाटायला सांगावे. • अशा प्रकारे प्रत्येक बालकाला वस्तू गटात वाटण्याचा अनुभव घेऊ द्यावा. • अशा पद्धतीने सर्व बालकांना मोठ्या गटात वस्तू वाटण्याचा प्रत्यक्ष अनुभव द्यावा. • वस्तू जास्त बालकांमध्ये वाटल्या, की प्रत्येकाला किती वस्तू कमी मिळतात, तर कमी बालकांमध्ये

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
वाटणे बालकांसाठी सोपे होईल. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**		वाटल्या तर प्रत्येकाला किती वस्तू जास्त मिळतात या विषयी सजग करावे. तसेच या कृतीचा सातत्याने सराव घेतल्यानंतर बालकांना वस्तू देऊन सहाच्या गटात हा खेळ खेळण्यास द्यावा. **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**

विविधता	• विविध वस्तूंचा वापर करावा. • सुट्या वस्तू, पातळ किंवा द्रवपदार्थ, पोळी किंवा एखादे फळ हे वाटून द्यायचे असेल, तर काय करावे याबाबत बालकांसोबत चर्चा करावी. • वस्तू वाटणे, प्रत्येकाचा वाटा, प्रत्येकाच्या वाट्यातील वस्तू, समान वाटणी, वस्तू उरणे या संकल्पनांविषयी बालकांस सजग करावे.
थीम/विषय	ऋतू, मदतनीस, वाहन
ताईसाठी सूचना	कृतिपुस्तिकेतील कृती करून घ्यावी.
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-8** बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार, मापे यांचा वापर करत जग समजुन घेऊ शकतात. **C-8.7** गुणाकार म्हणजे पुन्हा पुन्हा बेरीज आणि भागाकार म्हणजे समान वाटणी हे समजतो. **अ) LO 8.7.2** दिलेल्या वस्तूंचे वाटप करतो. **ब) LO 8.7.2** २ जणांमध्ये ६ वस्तूंचे समान वाटप करतो. (६ पर्यंत) **क) LO 8.7.2** ४ ते ५ जणांमध्ये वस्तूंचे समान वाटप करतो. (२० पर्यंत)
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	स्नायूंचा विकास, गणन कौशल्य, इतर बालकांशी समन्वय.
निरीक्षण करावयाच्या बाबी	• बालक सर्वांना सारख्याच प्रमाणात वस्तू वाटत आहे का? • गटातील प्रत्येक बालकाला अनुभव मिळत आहे का? हे पहावे.
कृती क्र : 149	
उपक्रमाचे नाव	संभाषण (सर्कल टाईम)
उपक्रमाला लागणारे साहित्य	–

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr>
<td>कृती क्र .१
कृती : गप्पा
ताईने गप्पा मारण्यासाठी, खाऊ तयार करणाऱ्या ताईला वर्गात बोलवावे.
• खाऊ तयार करणाऱ्या ताई आणि बालके यांना गप्पा मारण्याची संधी द्यावी.</td>
<td>कृती क्र .१
कृती : अनुभव गप्पा
• ताईने गप्पांचा विषय ठरवावा. (आजूबाजूची परिस्थिती, ऋतू, सण इत्यादींचा विचार करून विषय ठरवावा.)
• ताईने बालकांना सूचक प्रश्न विचारून, ठरवलेल्या विषयावर बोलते करावे.
उदा. पावसाळा ऋतू असल्यास
सूचक प्रश्न –
१) बाहेर काय दिसत आहे?
२) पाऊस पडताना कसा आवाज येतो?
३) तुला पाऊस आवडतो का? का?
४) पावसात आपण भिजू नये म्हणून काय काय वापरतो?
५) खूप वेळा पावसात भिजलो तर काय होते?</td>
<td>कृती क्र .१
कृती : काल मी काय काय केले.
ताईने बालकांना काल काय काय केले हे सांगावे.
• बालकांनी घरी काय काय केले यावर गप्पा माराव्या.
• प्रत्येक बालकाला बोलण्याची संधी द्यावी.
उदा. प्रश्न –
१) घरी कोण कोण होते?
२) काल काय खाऊ खाल्ला होता?
३) आईला कोणत्या कामात व काय मदत केली?
४) कुठे बाहेर फिरायला गेला होतात का? असे प्रश्न विचारावे.</td>
</tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">प्राणमय व अन्नमय कोश</td></tr>
<tr>
<td>विविधता</td>
<td colspan="2">• ताईने दोन/तीन सूचना एकाच वाक्यात सांगून कृती करायला सांगाव्या. उदा. पाणी प्या व बाटली जागेवर ठेवा. कचरा गोळा करा व टोपलीमध्ये टाका.
• वर्गात पालकांना बोलावून, बालकांना त्यांच्याशी बोलण्याची संधी उपलब्ध करून द्यावी.
• जेवणाच्या वेळी बालकांशी जाणीवपूर्वक संवाद साधावा.
• बालकांना एकमेकांशी संभाषण करायला प्रोत्साहित करावे.
• एखादा सण होऊन गेल्यावर सुट्टीच्या दुसऱ्या दिवशी ताईने बालकांशी गप्पा माराव्यात व सणाच्या दिवशी काय केले या विषयी बोलते करावे.</td>
</tr>
</table>

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">मी, माझे कुटुंब, परिसर, पाणी-पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">-</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-9 बालके दोन भाषांमध्ये दैनंदिन संवाद साधण्यासाठी प्रभावी संवाद कौशल्य विकसित करतात.
C-9.3 अर्थपूर्ण व अस्खलितपणे संभाषण करतो.
अ) LO 9.3.1 लक्षपूर्वक ऐकतो आणि आजूबाजूच्या परिचित लोकांशी छोटे संभाषण करतो.
ब) LO 9.3.1 दैनंदिन जीवनातील विविध शालेय परिस्थितीमध्ये समवयस्क व शिक्षक यांच्यासोबत संभाषण सुरू करतो.
क) LO 9.3.1 घटना, कथा किंवा त्यांच्या गरजा यांवर आधारित संभाषणात सहभागी होतो आणि प्रश्न विचारतो.</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये</td><td colspan="2">• लक्षपूर्वक ऐकणे, ऐकलेल्या सूचनांचे आकलन होणे, बोलता येणे, शब्दसंग्रहाचा वापर करता येणे, संदर्भाने बोलता येणे, संभाषण करता येणे, शब्दसंग्रहाचा वापर करता येणे.</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">• रोज घडणाऱ्या घटनांबद्दल संवाद साधता येतो की नाही, तसेच संदर्भाने बोलता येते की नाही, याचे निरीक्षण करणे.</td></tr>
<tr><td colspan="3" align="center">कृती क्र : 150</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">अक्षरध्वनी जोडूया</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">चित्रकार्ड</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td>• ताईने बालकांना चित्रकार्ड दाखवावे. त्यावरून चित्राचे नाव विचारावे. अशी विविध चित्रकार्डे वापरावीत.</td><td>पूर्वज्ञान - बालकाला पूर्वकृतीतून अनेक अक्षरध्वनीचा परिचय झालेला आहे.
कृती : अक्षरध्वनी जोडूया
• सुरुवातीला बालकाला, त्याने आधी ऐकलेल्या शब्दांतील अक्षरध्वनी ऐकवावे.</td><td>आवश्यक पूर्वज्ञान/पूर्वतयारी- बालकाला पूर्वकृतीतून अनेक अक्षर-ध्वनींचा परिचय झालेला आहे.
कृती : ध्वनी-अक्षर जोडूया.
• सुरुवातीला बालकांना त्यांनी आधी ऐकलेल्या शब्दांतील अक्षरध्वनी ऐकवावे आणि दाखवावे.</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
	• हे ध्वनी ध्वनिचित्रे दाखवून समूहात म्हणून घ्यावे. (उदा. हा त, का न, दा र) • ध्वनिचित्रे दाखवून वैयक्तिक म्हणून घ्यावे. • या शब्दातील अक्षर ध्वनिचित्रे वेगळी दाखवून, ऐकवून, त्याप्रमाणे उच्चार करावयास लावावा.	• हे ध्वनी जोडून (ध्वनिचित्रे दाखवून) तयार केलेले शब्द समूहात म्हणून घ्यावे. (क, स, त, आणि र ही ध्वनिचित्रे दाखवून क, स र क, क र असे शब्द तयार करावेत.) • हे ध्वनी जोडून (ध्वनिचित्रे दाखवून) तयार केलेले शब्द वैयक्तिक म्हणून घ्यावे. • हे ध्वनी जोडून (ध्वनिचित्रे दाखवून) तयार केलेले शब्द वेगळे ऐकवून, त्याप्रमाणे उच्चार करावयास लावावा. • हे ध्वनी (ध्वनिचित्रे दाखवून) जोडून शब्द तयार करण्यास सूचवावे. • योग्य तेथे योग्य दुरुस्ती करून ती बालकाकडून म्हणून घ्यावी.
पंचकोश		
विज्ञानमय, अन्नमय कोश व प्राणमय कोश		
विविधता	• वेगवेगळे अक्षरध्वनी एकत्र करून शब्द तयार करण्याचे खेळ खेळावे. • बालकांना माहीत असलेले व माहीत नसलेले वेगवेगळे शब्द त्यांच्याकडून तयार करून घ्यावे.	
थीम/विषय	पाणी–पाऊस, ऋतू, मदतनीस	
ताईसाठी सूचना	–	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-10** बालके भाषा एक (L1) मध्ये सफाईदारपणे वाचन व लेखन करतात. **C-10.1** शब्दध्वनीची जाणीव होऊन, शब्दध्वनी/अक्षरे शब्दात गुंफतो आणि शब्दापासून शब्दध्वनी/अक्षरे वेगळी करतो. **ब) LO 10.1.3** साधे शब्द तयार करण्यासाठी २–३ अक्षरध्वनी जोडतो. **क) LO 10.1.3** परिचित शब्द तयार करण्यासाठी (स्वर आणि व्यंजन) ध्वनी जोडतो.	

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये</td><td colspan="2">श्रवण कौशल्याचा विकास, शब्दसंग्रहात वाढ, भाषण कौशल्याचा विकास, सूचनांचे अनुपालन करण्याच्या क्षमतेचा विकास</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">अक्षरध्वनीचे अनुभव देताना बालकांचा श्रवण, भाषण यात होणारा गोंधळ तपासावा.</td></tr>
<tr><td colspan="3">कृती क्र : 151</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">डॉमिनो लावूया</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">१) लिखित आणि चित्रमय स्वरूपातील पुस्तके (आकाराने मोठी आणि जास्त चित्रे व कमी शब्द असणारी पुस्तके.
२) डॉमिनो चित्रशब्द लावणे.</td></tr>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>कृती : पुस्तक वाचन
ताईने बालकांना चित्रे असलेली पुस्तके हाताळण्यासाठी द्यावी. पुस्तकाचे सहभागाने वाचन करावे.
• लिखित अक्षरांकडे बालकांचे लक्ष वेधून हे चित्र आहे का? मग हे काय आहे? असे याआधी कुठे पाहिले आहे का? असे प्रश्न विचारून लिखित अक्षर आणि चित्र यांमध्ये असणाऱ्या फरकाची जाणीव करून द्यावी.
• ताईने बालकांसमोर विविध पुस्तके जमिनीवर मांडून ठेवावी. त्यामुळे बालकांना त्यांची रंगीत मुखपृष्ठे दिसतील.
• प्रत्येक बालकाला त्याच्या आवडीचे पुस्तक बघायला सांगावे.
• ३ ते ४ वर्षे वयोगटातील बालकांसाठी मोठी चित्रे असलेली पुस्तके ठेवावीत.</td><td colspan="2">कृती : चित्रशब्द डॉमिनो लावणे.
• बालकांच्या रोजच्या अनुभवातील शब्द वापरून, ताईने शब्दचित्रपट्ट्या तयार कराव्या.
• पट्ट्यांवरील शब्द डावीकडून उजवीकडे बोट ठेवून वाचून दाखवावे. प्रत्येक बालकाकडून वाचनाची कृती करून घ्यावी.
• ताईने पहिले कार्ड घ्यावे त्यावरील 'काका' हा शब्द वाचावा. असा दिसणारा शब्द कोणाकडे आहे हे विचारावे, बालकांना त्याचे कार्ड कप या शब्दाला लावून बघायला सांगावे. काका शब्द मिळाल्यावर तो बालकांकडून वाचून घ्यावा.
• एकेका बालकांकडून सगळी कार्डे लावून घ्यावीत.
• [→ कप] [कप–कान] [कान–काजू] [काजू–कापड]
उदाहरणात 'क' चे शब्द वापरून शब्दपट्ट्या केल्या आहेत.
• ताईने अशा स्वरूपाच्या वेगवेगळ्या पट्ट्या तयार करून, या उपक्रमाच्या सराव करून घ्यावा.
• ताईने आधी सोपे शब्द घ्यावेत, नंतर बालकांच्या अनुभवातील शब्द वापरून, शब्दपट्ट्या घ्याव्यात.</td></tr>
</table>

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
पंचकोश		
विज्ञानमय कोश		
विविधता	• विविध कात्रणांचा संग्रह, कमी शब्द आणि जास्त चित्र असणारी पुस्तके, पत्रिका वारंवार हाताळावयास द्यावे. • शब्दपट्ट्याप्रमाणे सोप्या वाक्यपट्ट्या तयार करून, वाचन घ्यावे. • फुलांची, फळांची, प्राण्यांची नावे असे चित्रशब्द साईट रीडिंग करावे.	
थीम/विषय	पाणी–पाऊस, भाज्या व फळे, मदतनीस	
ताईसाठी सूचना	–	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-10** बालके भाषा एक (L1) मध्ये सफाईदारपणे वाचन व लेखन करतात. **C-10.2** पुस्तकाची मूलभूत रचना/स्वरूप, मुद्रित अक्षरांची कल्पना ओळखतो, मुद्रित झालेल्या मजकुराची दिशा समजून घेतो व पुस्तकातील प्राथमिक विरामचिन्हे ओळखतो. **अ) LO 10.2.2** मुद्रित मजकूर आणि चित्रांमध्ये फरक करतो. **क) LO 10.2.2** डावीकडून उजवीकडे आणि वरून–खाली शब्दांचे अनुसरण करतो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	• निरीक्षण, फरक सांगता येणे, वाचन पूर्वतयारी.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	• लिखित/मुद्रित मजकूर आणि चित्रे यांमधील फरक बालकांना समजतो की नाही? बालकांना वाचनाची दिशा डावीकडून उजवीकडे आहे हे समजते की नाही? याचे निरीक्षण करावे.	
कृती क्र : 152		
उपक्रमाचे नाव	वाक्य तयार करूया	
उपक्रमाला लागणारे साहित्य	चित्रशब्दकार्ड, शब्दकार्ड	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
• अंगणवाडी ताईने बालकांना वर्तुळात बसवावे.	**कृती : वाक्य तयार करून सांगणे.** • ताईने बालकांना वर्गात अर्धवर्तुळात बसवावे.	वयोगट ४ ते ५ साठीची कृती करून घ्यावी.

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
• अंगणवाडी ताईने बालकांना प्रत्यक्ष वस्तू दाखवून, बालकांना त्याविषयी पूर्ण वाक्य बोलण्यास सांगावे. उदा. लाल ठोकळा–हा लाल रंगाचा ठोकळा आहे किंवा ठोकळ्याचा रंग लाल आहे किंवा लाल ठोकळा लाकडाचा आहे. • अशा प्रकारे विविध वस्तू दाखवून बालकांना पूर्ण वाक्यात बोलण्याची संधी द्यावी.	• ताईने प्रत्येक बालकाला आधी घेतलेले चित्रशब्दकार्ड द्यावेत. • दिलेल्या शब्दांवरून बालकांना वाक्य तयार करून सांगणे. उदा., झाड – गेटजवळ मोठे झाड आहे. दरवाजा– राजू दरवाजा बंद करून ये. • प्रत्येक बालकाला एक चित्र शब्द कार्ड दाखवावे. • बालकाने त्या शब्दापासून वाक्य तयार करण्यास सांगावे. • याप्रमाणे ताईने प्रत्येक बालकांकडून २ ते ३ शब्दांपासून वाक्य तयार करून घ्यावे. • काही बालकांना ताईची मदत लागली, तर तिथे मदत करावी.	**कृती : वाक्य तयार करून सांगणे.** • ताईने बालकांना वर्गात अर्धवर्तुळात बसवावे. • ताईने प्रत्येक बालकाला आधी घेतलेले शब्दकार्ड द्यावेत. • दिलेल्या शब्दावरून बालकांनी तोंडी वाक्य तयार करून सांगणे. उदा. गाडी–मला शाळेत येताना गाडी दिसली. कपाट–आई कपाटात माझे कपडे ठेवते. • प्रत्येक बालकाला एक शब्द सांगावा. • बालकाने त्या शब्दापासून वाक्य तयार करून सांगावे. • याप्रमाणे ताईने प्रत्येक बालकाकडून २ ते ३ शब्दांपासून वाक्य तयार करून घ्यावे. • काही बालकांना ताईची मदत लागली, तर तिथे मदत करावी. **प्रश्न विचारून पूर्ण वाक्यात उत्तर स्वीकारणे.** • ताईने प्रत्येक बालकाला एक एक प्रश्न विचारावा. बालकास पूर्ण वाक्यात उत्तर देण्यास सांगावे. उदा. तुला कोणता खेळ आवडतो ? तुझ्या मित्राचे नाव काय आहे ? आज तू जेवण्यासाठी डब्यात काय आणले आहेस ? **(वेळापत्रकानुसार कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.)**

वयोगट ३ ते ४ वर्षे	वयोगट ४ ते ५ वर्षे	वयोगट ५ ते ६ वर्षे
पंचकोश		
विविधता	• ताईने बालकांना परिसरातील शब्द, वर्गातील वस्तूंची नावे वापरून, असे अनेक उपक्रम घ्यावे. यासाठी ताईने भरपूर शब्दांचे कार्ड तयार करावेत. • तो, ती, ते वापरून वाक्य तयार करून घ्यावे.	
थीम/विषय	वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, मदतनीस, वाहन	
ताईसाठी सूचना	–	
अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती	**CG-10** बालके भाषा एक (L1) मध्ये सफाईदारपणे वाचन व लेखन करतात. **C-10.3** भाषा 1 (L1) च्या लिपीतील सर्व अक्षरे व अवयव ओळखतो आणि त्या ज्ञानाचा उपयोग शब्द वाचन–लेखनासाठी करतो. **ब) LO 10.3.3.2** तयार केलेल्या शब्दांवरून वाक्य तोंडी सांगतो किंवा शब्दावर आधारित विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देतो. **क) LO 10.3.3.2** तयार केलेल्या शब्दांवरून वाक्य तोंडी सांगतो किंवा शब्दावर आधारित विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देतो.	
साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये	शब्द तयार करणे वाक्य कसे तयार करायचे हेही समजणे.	
निरीक्षण करावयाच्या बाबी	• वाक्य तयार करता येतात का? याचे निरीक्षण करणे.	
कृती क्र : 153		
उपक्रमाचे नाव	हा, ही, हे वाचूया.	
उपक्रमाला लागणारे साहित्य	चित्रशब्द कार्ड	
वयोगट ३ ते ४ वर्षे	**वयोगट ४ ते ५ वर्षे**	**वयोगट ५ ते ६ वर्षे**
• अंगणवाडी ताईने बालकांना वर्तुळात बसवावे. • अंगणवाडी ताईने बालकांना प्रत्यक्ष वस्तू दाखवून, वस्तूविषयी हा/ही/हे शब्द वापरून, वाक्य म्हणून दाखवावे व त्यानंतर बालकांना मागे म्हणण्यास सांगावे.	**कृती : चित्र–शब्द वापरून वाक्यवाचन** ताईने बालकांना वर्तुळाकार बसवावे. • ताईने शब्दचित्रे असलेल्या वाक्यांची २० ते २५ कार्ड तयार करावी. उदा. हा आंबा (चित्र) आहे. हा भोपळा आहे. हा लाडू आहे. हा मुलगा आहे. हा टोमॅटो आहे. हा बटाटा आहे. हा  गोल आहे.	

<table>
<tr><th>वयोगट ३ ते ४ वर्षे</th><th>वयोगट ४ ते ५ वर्षे</th><th>वयोगट ५ ते ६ वर्षे</th></tr>
<tr><td>उदा. लाल ठोकळा – हा लाल रंगाचा ठोकळा आहे. हे कोरे कागद आहेत. हे पुस्तक आहे. ही बांगडी आहे.
• अशा प्रकारे विविध वस्तू दाखवून हा/ही/हे शब्द वापरून वाक्य म्हणवून घ्यावीत.</td><td colspan="2">• बालकांना 'हा' च्या चित्रमय पट्ट्या वाचता आल्यावर त्यांना 'ही' आणि 'हे' च्या पट्ट्या वाचायला द्याव्यात.
कृती १ : चित्र-शब्द वापरून वाक्य वाचन
• ताईने बालकांना वर्तुळाकार बसवावे.
ही  होडी आहे.
• ताईने शाळा चित्र असलेल्या वाक्यांची २० ते २५ कार्डे तयार करावी.
उदा. ही पाटी आहे, ही सायकल आहे, ही समई आहे. ही झोपडी आहे, ही मुलगी आहे.
• हे घर आहे, हे चाक आहे, हे पुस्तक आहे, हे दप्तर आहे, हे माकड आहे इत्यादी.</td></tr>
<tr><td colspan="3">पंचकोश</td></tr>
<tr><td colspan="3">विज्ञानमय व प्राणमय कोश</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">प्रकल्प निहाय चित्र असलेली वाक्यपट्ट्या तयार करून वापरता येतील.</td></tr>
<tr><td>थीम/वषय</td><td colspan="2">मदतनीस, वाहन</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">चित्रमय पट्ट्या तयार करून ठेवाव्यात.</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-10 बालके भाषा एक (L1) मध्ये सफाईदारपणे वाचन व लेखन करतात.
C -10.4 भाषा एक (L1) मधील कथा आणि परिच्छेद योग्य ठिकाणी विराम घेऊन, आणि आवाजातील चढ-उतारासहित अचूकपणे व ओघवतेपणाने शैलीत वाचतो.
ब) LO 10.4.1 परिचित अक्षरे, ध्वनी आणि सहजगत्या दिसणाऱ्या शब्दांचा वापर करून, लहान वाक्य वाचतो.
क) LO 10.4.1 परिचित अक्षरांनी बनलेली काही छोटी वाक्ये अचूकपणे वाचतो.</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये</td><td colspan="2">श्रवण क्षमता व वाचन कौशल्य, संभाषण कौशल्य, शब्दसंपत्तीत वाढ लिंगभेदाची समज शब्दचित्र, वाक्य वाचन करण्यास मदत</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">• बालके अक्षरे अचूक ओळखतात का? याचे निरीक्षण करावे.
• बालके शब्द व चित्र यांच्या जोड्या योग्य लावतात का? बालकांचे वाक्य तयार करण्याचे कौशल्य, यांचे निरीक्षण करावे.
• सर्व बालके कृतीत सहभागी होतात याचे निरीक्षण करावे.</td></tr>
</table>

संदर्भ ग्रंथ सूची

१) National Curriculum Framework for Foundational Stage, 2022, NCERT, New Delhi.

२) राज्य अभ्यासक्रम आराखडा : पायाभूत स्तर – २०२४, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

३) पायाभूत शिक्षण अभ्यासक्रम – २०२४, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

४) UNMUKH Trainers' handbook for Balvatika, April 2023, National Council of Educational Research and Training, New Delhi.

५) Aadharshila - National Curriculum for Early Childhood Care and Education 2024 For Children from Three to Six years, National Institute of Public Cooperation and Child Development Siri Institutional Area, Hauz Khas, New Delhi - 110016.

६) आकार बालशिक्षणक्रम, प्रथम आवृत्ती २०१४, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

७) बालशिक्षणाचे संघटन व व्यवस्थापन, मनीषा अष्टपुत्रे (लेखन व संपादन), मुक्ता चिपळूणकर २००८ व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००१.

८) पिंटूसाठी गोष्टी : भाग १ ते ५, ऑगस्ट २०२२, अक्षर स्पर्श, स्वाधार प्रकाशन, पुणे.

निर्मिती व लेखन

मुख्य लेखन समिती			
अ.क्र.	**नाव**	**पद**	**शाळेचे/कार्यालयाचे नाव**
१)	डॉ. माधुरी सावरकर	उपसंचालक	सेवापूर्व शिक्षण, बालशिक्षण व मानसशास्त्र विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
२)	डॉ. गितांजली बोरुडे	विभाग प्रमुख	बालशिक्षण व मानसशास्त्र विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
३)	श्रीम. सुषमा कोंडुसकर	अधिव्याख्याता	बालशिक्षण व मानसशास्त्र विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
४)	श्रीम. मनीषा अष्टपुत्रे	निवृत्त व्याख्याता	एस. एन. डी. टी. कॉलेज ऑफ होम सायन्स, पुणे.
५)	प्रतीक्षा बिबवे	अकॅडमिक हेड	एनरीच फाऊंडेशन, लर्निंग होम, पुणे.
६)	मृदुला धोंगडे	विश्वस्त/ विभागप्रमुख	पूर्वप्राथमिक विभाग, अभिजात एज्युकेशन सोसायटी, पुणे.
७)	संध्या नगरकर	CDPO	बालविकास प्रकल्प अधिकारी हडपसर, पुणे.
८)	चैत्राली रहाळकर-सिन्नरकर	संचालिका	स्वार्क फाऊंडेशन, पुणे.
९)	नीता वाळिंबे	बालशिक्षणतज्ज्ञ	रॉकेट लर्निंग, पुणे.
१०)	डॉ. वृषाली देहाडराय	सल्लागार	विक्रमशीला एज्युकेशन रिसोर्स सोसायटी, कोलकाता.
११)	डॉ. श्यामला दळवी	सल्लागार	विक्रमशीला-युनिसेफ.
लेखन साहाय्य			
१२)	डॉ. अश्विन किनारकर	सहायक शिक्षक	जि. प. प्राथमिक शाळा बांद्रा, केंद्र - वडंबा, पंचायत समिती रामटेक, जि. प. नागपूर.
१३)	सोनिया वडके	बालशिक्षणतज्ज्ञ	रॉकेट लर्निंग, पुणे.
१४)	प्रसेनजित गायकवाड	जिल्हा बालरक्षक समन्वयक	जिल्हा परिषद, नागपूर.
१५)	सुषमा साठ्ये	सल्लागार	स्वाधार, IDWC, पुणे.
१६)	निवृत्ती बोडखे	Community mobilizer	आगाखान फाऊंडेशन, पुणे.
१७)	आरती बिजुटकर	समन्वयक	ज्ञान प्रबोधिनी, निगडी, पुणे.
१८)	अभिलाषा संघई	संचालिका/ प्रधानाचार्य	सरस्वती विद्यानिकेतन, पूर्वप्राथमिक शाळा, परभणी.
अ.क्र.	**नाव**	**पद**	**शाळेचे/कार्यालयाचे नाव**

१९)	रेश्मा लेंगरे	बालशिक्षणतज्ज्ञ	आगाखान फाऊंडेशन, पुणे.
२०)	नंदिनी भावे	मुख्याध्यापक	सन्मित्र मंडळ गोरेगाव, नूतन शिशुमंदिर शिशुवाटिका, गोगटेवाडी, आरे रोड, गोरेगाव पूर्व, मुंबई.
२१)	श्रीम. स्पृहा इंदू	सहायक शिक्षक	चेंबूर एज्युकेशन सोसायटीची प्राथमिक शाळा, आर. सी. मार्ग, चेंबूर, मुंबई.
२२)	डॉ. अनुपमा तावशीकर	अधिव्याख्याता	जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, रत्नागिरी.
२३)	दशरथ मुंडे	सहशिक्षक	जि. प. शाळा सिरसम, ता. गंगाखेड, जि. परभणी.
२४)	प्रदीप गोडसे	पदवीधर शिक्षक	जि. प. शाळा, गणेशवाडी, ता. शिरूर अनंतपाळ, जि. लातूर.
२५)	मृदुला अडावद्कर	सुलभक	बियॉण्ड द क्लासरूम, पुणे.
२६)	सुनिता इंगळे	सहशिक्षक	न. पा. शाळा क्र. ६, कोपरगाव, जि. अहमदनगर.
२७)	प्रगती भावसार	शिक्षणतज्ज्ञ	कपिल मल्हार, बाणेर रोड, पुणे.
२८)	नवनाथ सूर्यवंशी	सहशिक्षक	जि. प. शाळा, हरीसोन ब्रँच, कोपरगाव.
२९)	शबनम डफेदार	सहायक शिक्षिका	दीपगृह ॲकॅडमी, देऊळगाव वाडा, दौंड.
३०)	सुरेश पेंढारवाड	सहायक शिक्षक	जि. प. प्राथ. शाळा सुर्ला, ता. झरी, जि. यवतमाळ.
३१)	मंदाकिनी गोसावी	पर्यवेक्षक	पिंपरी चिंचवड, पुणे.
३२)	माधुरी आहेर	सुलभक	मुक्तांगण, मुंबई.
३३)	अनंता बावधनकर	सहायक शिक्षक	जि. प. शाळा मुस्ती, ता. जि. सोलापूर.

श्रेयनामावली

अ.क्र.	व्यक्ती/संस्थेचे नाव	साहित्य प्रकार
१)	जयेश जोशी – एनरीच फाऊंडेशन, लर्निंग होम, पुणे.	कविता
२)	विक्रमशिला युनिसेफ – अंकुर प्रकल्प	गाणी, गोष्टी
३)	प्रसेनजित गायकवाड – जिल्हा बालरक्षक समन्वयक, जि. प. नागपूर.	गाणी
४)	डॉ. वृषाली देहाडराय, विक्रमशीला एज्युकेशन रिसोर्स सोसायटी, कोलकाता.	गाणी, गोष्टी
५)	श्रीम. मनीषा अष्टपुत्रे	गाणी
६)	विद्याधर शुक्ल	गाणी

प्रिय विद्यार्थी मित्रांनो आणि मैत्रिणींनो,

जर तुम्हांला कोणी अयोग्य रीतीने स्पर्श केल्यामुळे तुम्ही अस्वस्थ झाला असाल, तर तुम्ही अजिबात गप्प बसू नका. अशी घटना घडल्यास, तुम्ही खालील गोष्टी करणे आवश्यक आहे.

१) स्वतःला दोष देऊ नका.

२) तुमचा ज्यांच्यावर विश्वास आहे, त्यांना घडलेल्या घटनेबद्दल सांगा.

३) तुम्ही पोक्सो ई–बॉक्सद्वारे तुमच्या हक्कांच्या संरक्षणासाठी स्थापन केलेल्या राष्ट्रीय आयोगाला देखील कळवू शकता.

जेव्हा तुम्हांला कोणी अयोग्यरीत्या स्पर्श करतो, तेव्हा तुम्हांला वाईट वाटू शकते, तुम्ही गोंधळून जाऊ शकता, तुम्हांला असहाय्य वाटू शकते; पण तुम्हांला 'वाईट' वाटण्याचे काहीच कारण नाही, कारण यात तुमचा दोषच नाही.

हे बटण दाबा.

POCSO हा e-box ncpcr@gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

जर तुमचे वय १८ वर्षांपेक्षा कमी असेल. तुम्हांला कोणी त्रास दिला असेल आणि तुम्ही गोंधळलेले असाल, पीडित असाल, तणावात असाल अथवा अशा प्रकारचा त्रास सहन करणारे कोणी मूल तुमच्या माहितीत असेल, तर १०९८ (दहा नऊ आठ) ला संपर्क साधा. त्यामुळे आपले व मित्रांचे जीवन बदलू शकते.

CHILD LINE 1098 NIGHT & DAY

चाइल्ड लाइन १०९८ (दहा नऊ आठ) : ही एक २४ तास टोल फ्री राष्ट्रीय आपत्कालीन फोन सेवा आहे. महिला आणि बालविकास आपत्कालीन मंत्रालयातर्फे, पीडित मुलांसाठी राबविला जाणारा, चाइल्ड लाइन फाउंडेशनने सुरू केलेला हा उपक्रम आहे.

नए समाज की ओर
Towards a new dawn